कर्नाटक सरकार

सार्वजनिक शिक्षण विभाग

# विद्याप्रवेश

## शिक्षक मार्गदर्शिका

(इयत्ता 1 ली ते 3 री)




समग्र शिक्षण कर्नाटक,
बेंगळूरू - 560 001

# संकल्पना आणि मार्गदर्शन

| | |
|---|---|
| **डॉ. आर. विशाल,** भा.प्र.से.<br>मान. आयुक्त,<br>सार्वजनिक शिक्षण विभाग बेंगळूरू | **श्रीमती पल्लवी अकुराती,** भा.प्र.से.<br>मान. राज्य योजना निर्देशक,<br>समग्र शिक्षण कर्नाटक बेंगळूरू |

# सल्ला आणि मार्गदर्शन

| | |
|---|---|
| **श्रीमती एस्. गीता**<br>निर्देशक (गुणवत्ता),<br>समग्र शिक्षण कर्नाटक बेंगळूरू | **श्री. एम्. एन्. बेग**<br>निवृत्त निर्देशक<br>बेंगळूरू |

| | | |
|---|---|---|
| **श्री. एस्. जी. नागेश**<br>सहनिर्देशक (गुणवत्ता),<br>समग्र शिक्षण कर्नाटक बेंगळूरू | **श्रीमती मंजुळा**<br>ज्येष्ठ कार्यक्रमाधिकारी,<br>समग्र शिक्षण कर्नाटक बेंगळूरू | **डॉ. गुणवती एस्.**<br>ज्युनियर कार्यक्रमाधिकारी,<br>समग्र शिक्षण कर्नाटक बेंगळूरू |

# भाषांतर समिती

**श्री. राजीव व्ही. नायक**
प्राचार्य आणि सहनिर्देशक,
सरकारी शिक्षकांचे शिक्षण महाविद्यालय, (C.T.E) बेळगावी

| | |
|---|---|
| **श्री. श्रीपती**<br>व्याख्याता,<br>सरकारी शिक्षकांचे शिक्षण महाविद्यालय, (CTE) बेळगावी | **श्री. नागराज काळे**<br>व्याख्याता,<br>सरकारी शिक्षकांचे शिक्षण महाविद्यालय, (CTE) बेळगावी |

# संपन्मूल व्यक्ती

| | | |
|---|---|---|
| **श्री. सतीश ल. हळदणकर**<br>सहशिक्षक,<br>स.म.उ.प्रा. मुलींची शाळा गर्लगुंजी,<br>ता. खानापूर, जि. बेळगावी | **श्री. किशोरकुमार स. शितोळे**<br>सहशिक्षक,<br>स.म.उ.प्रा. शाळा गवाळी,<br>ता. खानापूर, जि. बेळगावी | **श्रीमती मेघा मा. देसाई**<br>सहशिक्षिका,<br>स.म.उ.प्रा. शाळा नमाजमाळ, संकेश्वर,<br>ता. हुक्केरी, शै. जि. चिक्कोडी |
| **श्री. प्रशांत अ. पोवार**<br>सहशिक्षक,<br>स.म.उ.प्रा. शाळा क्र. 5,<br>चव्हाट गल्ली, बेळगावी | **श्री. प्रवीण बा. कांबळे**<br>सहशिक्षक,<br>स.म.उ.प्रा. शाळा धोंडगट्टे<br>ता. हुक्केरी, शै. जि. चिक्कोडी | **श्री. शशिकांत ग. शेलार**<br>सहशिक्षक,<br>स.म.उ.प्रा. शाळा कोट<br>ता. हुक्केरी, शै. जि. चिक्कोडी |

| | | | |
|---|---|---|---|
| **श्री. सातेरी भ. पाखरे**<br>सहशिक्षक,<br>स. आ. म. शाळा येळ्ळूर,<br>ता. जि. बेळगावी | **श्री. जोतीबा गो. काळसेकर**<br>सहशिक्षक, स.म.उ.प्रा. शाळा<br>नागेनहट्टी, ता. जि. बेळगावी | **श्री. विजय प. पाटील**<br>सहशिक्षक,<br>स.म.उ.प्रा. शाळा अबनाळी,<br>ता. खानापूर, जि. बेळगावी | **श्री. विनायक प. पाटील**<br>सहशिक्षक,<br>स.म.उ.प्रा. शाळा नावगे,<br>ता. जि. बेळगावी |

# विद्याप्रवेश

## भाग - 1

| अ. क्र. | विवरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1 | भाग – 1, अध्याय - 1<br>विद्याप्रवेश-अर्थ आणि महत्व | 1 |
| 1.1 | मुख्यांश | 1 |
| 1.2 | विद्याप्रवेश – काय? व कशासाठी? | 3 |
| 1.3 | विद्याप्रवेश - महत्व | 3 |
| 1.4 | विद्याप्रवेश - व्याप्ती | 4 |
| 1.5 | विद्याप्रवेश - उद्देश | 4 |
| 1.6 | विद्याप्रवेशन - अध्यापन तत्व | 5 |
| 1.7 | नियोजन आणि व्यवस्थापन | 6 |
| 1.8 | विद्यार्थ्यांची प्रगती आणि नियमावली | 8 |
| 1.9 | विद्यार्थी अध्ययन प्रक्रियेत पालक आणि समाजाचा सहभाग | 8 |
| 1.10 | नमुना वेळापत्रक | 10 |
| 2 | अध्याय -2<br>विद्याप्रवेश-विकासात्मक ध्येयाधारित सामर्थ्ये आणि अध्ययन निष्पत्ती | 11 |
| 2.1 | विकासात्मक ध्येय-1 उत्तम आरोग्य आणि स्वास्थ्य राखण्यात मुले सक्षम होतात. (HW) | 11 |
| 2.1.1 | विकासात्मक ध्येय-1, मुख्य सामर्थ्ये | 11 |
| 2.1.2 | विकासात्मक ध्येय-1, अध्ययन निष्पत्ती | 12 |
| 2.2 | विकासात्मक ध्येय-2, मुले प्रभावी संवादक बनतात. (EC) | 13 |
| 2.2.1 | विकासात्मक ध्येय-2, मुख्य घटकांश | 13 |
| 2.2.2 | विकासात्मक ध्येय-2, मुख्य सामर्थ्ये | 13 |
| 2.2.3 | विकासात्मक ध्येय-2, अध्ययन निष्पत्ती | 14 |
| 2.3 | अभिवृद्धी ध्येय – 3 मुले सक्रीय अध्ययनार्थी बनून सभोवतालच्या वातावरणाशी जोडली जातात. (IL) | 16 |
| 2.3.1 | विकासात्मक ध्येय-3, मुख्य घटकांश | 16 |
| 2.3.2 | विकासात्मक ध्येय-3, मुख्य सामर्थ्ये | 16 |
| 3.3.3 | विकासात्मक ध्येय-3, अध्ययन निष्पत्ती | 17 |
| 3 | अध्याय 3<br>खेळाच्या तासिका – काय? का? कसे? | 20 |
| 4 | भाग – 2, अध्याय - 4 | 37 |
| 4.1 | विद्याप्रवेश – 72 दिवसांचा दैनंदिन कृती संच | 38 |
| 4.2 | मासिक मूल्यमापन मार्गसूची 1 ला महिना | 116 |
| 4.3 | मासिक मूल्यमापन मार्गसूची 2 रा महिना | 202 |
| 4.4 | मासिक मूल्यमापन मार्गसूची 3 रा महिना | 283 |

अध्याय - 1

# विद्याप्रवेश अर्थ आणि महत्व

## 1.1 मुख्यांश :

आज आपण नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चा स्वीकार केला आहे. त्यामुळे शिक्षणाकडे एका नव्या दृष्टीने पाहण्याची संधी आपल्याला प्राप्त झाली आहे. जागतिक बदलांना अनुसरून शैक्षणिक दृष्टीकोन, अध्यापन, उपक्रम आणि वर्गप्रक्रीयेमध्ये देखील बदल होण्याची गरज आहे. हे बदल घडवत असताना नवनवीन अविष्कारांमुळे मुलांचे मनोधैर्यही दिवसेंदिवस वाढत आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

शालेय शिक्षण हे शैक्षणिक कृतींच्या अंमलबजावणीचा पायाभूत घटक म्हणून ओळखले जाते. शालेय शिक्षणाचा पहिला टप्पा म्हणजेच पायाभूत अक्षरज्ञान आणि संख्याज्ञान होय. पुढे हाच सर्व विषयांच्या विकासाचा एक अविभाज्य भाग आहे हे आपल्याला विसरून चालणार नाही. हाच विचार समोर ठेऊन पायाभूत शिक्षण अधिक मजबूत बनविणे ही आजची महत्वपूर्ण गरज आहे.

कोविड-19 विषाणूच्या प्रादुर्भावामुळे शालेय विद्यार्थ्यांची खूप मोठी शैक्षणिक हानी झालेली आपल्याला दिसून आली आहे. विविध पर्यायी शैक्षणिक मार्गसूची तसेच आधुनिक तंत्रज्ञान व  माध्यमांचा वापर करून देखील आपल्याला भौतिक तासिकांच्या बरोबरीचा दर्जा साध्य करणे शक्य झालेले नाही. त्यामुळे झालेली ही शैक्षणिक कमतरता कशी भरून काढावी? यासाठी किती वेळ लागेल? शिक्षणातली क्रमबद्धता व सातत्य पूर्ववत होण्यासाठी काय केले पाहिजे? यासारखे अनेक प्रश्न आपल्याला सतावत आहेत. अशा परिस्थितीत आपल्याकडील उपलब्ध कालावधीनुसार मुलांच्या अध्ययन संधींना पूरक कृतींचे आयोजन व अंमलबजावणी करणे हा शैक्षणिक कमतरतेच्या समस्येला जबाबदारीने सामोरे जाण्याचा अनिवार्य मार्ग आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक शिक्षकाने कटिबद्ध होऊन सक्रीयपणे कार्य करणे अत्यंत गरजेचे आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून शिक्षकांनी या साहित्याचे आकलन करावे आणि कृतीआधारित अध्यापन प्रक्रियेचा अर्थ समजून घ्यावा असे सूचविण्यात येत आहे.

## पायाभूत स्तरातील प्रथम सहा वर्षीय शैक्षणिक संरचना

**पायाभूत अक्षरज्ञान आणि संख्याज्ञान**

| पूर्व प्राथमिक - 1 | पूर्व प्राथमिक - 2 | पूर्व प्राथमिक - 3 | विद्याप्रवेश | इयत्ता 2 री | इयत्ता 3 री |
|---|---|---|---|---|---|
| (3-4 वर्षे) | (4-5 वर्षे) | (5-6 वर्षे) बालवाटीका | इयत्ता 1 ली (6-7 वर्षे) | (7-8 वर्षे) | (8-9 वर्षे) |

# शिक्षकांसाठी महत्वपूर्ण संदेश

प्रिय शिक्षकमित्रहो,

कोविड-19 विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आपणा सर्वांना प्रत्यक्ष भेटणे अथवा मार्गदर्शन करणे शक्य झाले नाही. मुलांना सतावणाऱ्या शैक्षणिक कमतरतेसारख्या अनेक समस्यांनी आपणासही त्रस्त केले आहे. भौतिक तासिका चालविणे शक्य न झाल्यामुळे उपलब्ध सुविधांच्या सहाय्याने आपण विविध पर्यायी शैक्षणिक मार्गांचा वापर करून मुलांच्या शिक्षणाची काळजी घेतली आहे. वेळेवर शाळा सुरु झाल्या नाहीत तरीही पूरक पद्धती आणि तांत्रिक साधने आणि माध्यमांचा वापर करून मुलांशी संपर्कात राहण्याचे आपले प्रयत्न प्रशंसनीय आहेत.

2022-23 सालच्या शैक्षणिक वर्षाला अनुसरून विद्याप्रवेश या नवीन शालेय पूर्वतयारी उपक्रमामध्ये आम्ही आपणा सर्वांचे सहर्ष स्वागत करीत आहोत. तीन महिन्यांचा शालेय पूर्वतयारी 'विद्याप्रवेश' उपक्रम केवळ इयत्ता पहिलीसाठी तयार करण्यात आलेला असला तरीही इतर इयत्तांनासुद्धा शालेय पूर्वतयारी करणे अनिवार्य आणि नितांत गरजेचे आहे. प्रत्येक मुलाने शैक्षणिक नुकसान अनुभवले आहे हे आपण मान्य केले पाहिजे.

मुलांना शाळेसाठी तयार करीत असताना आपण अनेक अंशांकडे लक्ष दिले पाहिजे. केवळ भौतिकरित्या वर्गप्रक्रीयेशी संलग्न न राहता भावनिक आणि सामाजिकरित्या त्यांची जोडणी होणे गरजेचे आहे. याच पार्श्वभूमीवर बालकाच्या मुख्य 3 विकासात्मक ध्येयांवर आधारित 'विद्याप्रवेश' उपक्रमाची रचना करण्यात आली आहे.

ती ध्येये म्हणजे ......

**1. उत्तम आरोग्य आणि स्वास्थ्य राखण्यात मुले सक्षम होतात.** (Children maintain good health and well being - HW)

**2. मुले प्रभावी संवादक बनतात.** (Choldren become effective communicator - EC)

**3. मुले सक्रीय अध्ययनार्थी बनून सभोवतालच्या वातावरणाशी जोडली जातात.** (Children become involved learners and connect with their immediate environment - IL)

- ही तीनही ध्येये परस्परावलंबी असून सामर्थ्यांच्या विकासासाठी संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच मुलांचा सर्वांगीण विकास साधण्यास सहाय्यक ठरतात.
- उत्तम आरोग्य आणि स्वास्थ्य याविषयीचे ध्येय भौतिक विकास, पौष्टिकता आणि उत्तम आरोग्यदायी सवयी प्राप्त करण्याचे सामर्थ्य वाढविण्याकडे लक्ष पुरविते.
- प्रभावी संवादक बनण्याचे ध्येय केवळ भाषा संभाषण कौशल्याकडे लक्ष न देता पायाभूत अक्षरज्ञान, बौद्धिक अंश आणि भावनात्मक संवादाच्या विकासाकडेही लक्ष देते.
- सक्रीय अध्ययानार्थी हे पुढील ध्येय आपल्या स्थानिक परिसराशी जुळवून घेणे व परिसर जागृतीसोबत पायाभूत संख्याज्ञानाच्या टप्प्यातील अध्ययन अंश ग्रहण करण्याला महत्व देते. या ध्येयावरील सामर्थ्ये आणि अध्ययन निष्पत्ती भौतिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि सामान्य परिसराला प्रतिसाद देण्याबरोबरच मुलांच्या विकासाला भरपूर संधी प्राप्त करून देतात.
- 'विद्याप्रवेश' उपक्रमातील सर्व 'कृती' आणि 'अध्ययन पत्रके' मुख्य तीन ध्येयांवर आधारित सामर्थ्यांच्या अध्ययनाशी निगडीत आहेत. ध्येयवार सामर्थ्ये आणि अध्ययन निष्पत्ती प्रत्येक विद्यार्थ्याने प्राप्त करावीत हाच याचा उद्देश आहे.

'विद्याप्रवेश' उपक्रमामध्ये सुचविण्यात आलेल्या कृती या सल्लात्मक असून स्थानिक परिस्थितीनुसार शिक्षक त्यामध्ये योग्य ते बदल करू शकतात. मुलांच्या गरजा, आवडी-निवडी, विविधता आणि आकलन क्षमतेला पूरक अशा अध्ययन पत्रकांची निर्मिती करण्याबरोबरच अध्ययन कालावधीला अनुसरून कांही पत्रकांचा पुनर्वापर करण्याचीही संधी देण्यात आली आहे. मुलांना अध्ययनामध्ये जास्तीत जास्त गुंतवून ठेवण्याबरोबरच प्राप्त ज्ञानाचे दृढीकरण करणे ही देखील शिक्षकांची जबाबदारी आहे.

➢ शिक्षकांच्या सोयीसाठी या मार्गदर्शिकेचे दोन मुख्य भाग करण्यात आले आहेत. भाग-1 मध्ये विद्याप्रवेश उपक्रमाचा अर्थ, ध्येयवार सामर्थ्ये आणि अध्ययन निष्पत्ती तसेच खेळाच्या तासिकासंबंधीचे विवरण आपल्याला पहायला मिळेल. तर भाग-2 मध्ये तासिकानुसार 72 दिवसांच्या अंमलात आणावयाच्या दैनंदिन कृतींची माहिती देण्यात आली आहे.

➢ वर सुचविण्यात आलेली तीन मुख्य ध्येये ही परस्परावलंबी असून त्यावरील मुलभूत सामर्थ्ये अध्ययनाकडे लक्ष वेधून घेतात. ध्येयांशी निगडीत सर्व प्रमुख घटकांची निर्मिती सर्व मुलांचा विचार करूनच करण्यात आली आहे. दिव्यांग मुलांनीही अध्ययन प्रक्रियेमध्ये सक्रियपणे सहभाग घ्यावा याला महत्व देण्यात आले आहे. अशा मुलांनी आपल्या गरजा आणि कमतरता यांना अनुसरून वेळ आणि संधीचा जास्तीतजास्त उपयोग करून घेतला पाहिजे.

➢ 'विद्याप्रवेश' हा शालेय पूर्वतयारी उपक्रम 'खेळत खेळत शिक' या तत्वावर आधारित असून यासाठी स्थानिक उपलब्ध साहित्याचा वापर अध्ययनासाठी करावयाचा आहे. उदा. बाहुल्या, विविध प्रकारची खेळणी, संग्रहित वस्तू, मुलांच्या आवडीची कुतूहलजनक पुस्तके, चित्रमालिका, कथासंग्रह इत्यादी मुलांना गुंतवून ठेवणारी साधने येथे आवश्यक आहेत. आपण निवडलेले साहित्य अथवा खेळणी मुलांना सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून वापरण्यायोग्य असावीत याकडे विशेष लक्ष द्यावे.

➢ या उपक्रमातील खेळाच्या तासिका या दररोज 8 तासिका व आठवड्यातील 5 दिवस याप्रमाणे नियोजित केल्या आहेत. जर नियोजनाप्रमाणे 8 तासिकांमध्ये या कृती समर्पकपणे पूर्ण करणे शक्य झाले नाही तर त्या प्रक्रियेला अनुसरून योग्य ती उपाययोजना करावी. शनिवार हा एक दिवस उजळणीसाठी देण्यात आला आहे. या दिवशी आपण इतर 5 दिवस केलेल्या कृतींच्या उजळणीबरोबरच पुढील आठवड्यातील कृतींची पूर्वतयारी करावयाची आहे.

## 1.2 विद्याप्रवेश – काय? व कशासाठी?


- ➢ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या आशयाप्रमाणे इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी तीन महिन्याच्या अथवा बारा आठवड्यांच्या 'खेळत खेळत शिक' या तत्वांवर आधारित 'विद्याप्रवेश' या शालेय पूर्वतयारी उपक्रमाची शिफारस करण्यात आली आहे.
- ➢ कोविड-19 विषाणूच्या प्रादुर्भावामुळे शालेय शिक्षणापासून दूर राहिलेल्या मुलांचे शाळेमध्ये स्वागत करणे व अध्ययन प्रक्रियेशी त्यांची पुनर्जोडणी करण्याची संधी इथे आपल्याला मिळत आहे.
- ➢ सर्व मुलांना घर व शाळेमध्ये आनंदी, आपुलकीचे, सुरक्षित व अध्ययनपूरक वातावरण निर्माण करण्यामध्ये विद्याप्रवेश उपक्रम खूपच मार्गदर्शक ठरतो.
- ➢ मुलांना तणावमुक्त वातावरणात शिकण्याची संधी देण्याबरोबरच दिव्यांगांच्या गरजा ओळखण्याकडेही येथे लक्ष देण्यात आले आहे. मुलांची मातृभाषा आणि घरच्या भाषेचा स्वीकार करण्याबरोबरच अन्य भाषेच्या अध्ययनाला देखील संधी देण्यात आली आहे. तसेच सांकेतिक भाषेलाही महत्व दिले आहे.

## 1.3 विद्याप्रवेश - महत्व :

- ✓ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या आशयानुसार विद्याप्रवेशची निर्मिती झाली असली तरी संपूर्ण देशाचे लक्ष वेधणारी ही शालेय पूर्वतयारी योजना आहे.
- ✓ इयत्ता पाहिलीच्या मुलांना बौद्धिक, मानसिक, शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या तयार करणारी चौकट आपल्याला याद्वारे मिळते.
- ✓ मुलाच्या मुक्त अध्ययनाला मानसिक विकासाच्या टप्प्याकडून शैक्षणिक मनोवैज्ञानिक टप्प्याकडे घेऊन जाणाऱ्या कृतींची रचना करण्याची संधी यामुळे मिळते.
- ✓ नियोजित अध्ययन प्रक्रियेमध्ये अध्ययनासाठी दिलेला वेळ आणि त्याचा सदुपयोग करण्यासाठी दिलेल्या दिवसवार आणि आठवडावर कृतींचे व्यवस्थापन करण्यावर भर देण्यात आला आहे.
- ✓ तीन महिने किंवा बारा आठवड्यांच्या अध्ययन कालावधीत मुलांचा विकास, वाढ, अभिवृद्धी करण्याच्या अनेक संधी यामुळे प्राप्त होतात.

- ✓ ग्रहणशक्ती, कल्पनाशक्ती, तार्किक क्षमता यांच्या विकासाला महत्व देण्यात आले असून मुलांच्या सर्वांगीण विकासाला विविध अंगांनी चालना देण्याची संधी यामुळे उपलब्ध होते.
- ✓ मुक्त संवाद, आत-बाहेर संकल्पनेची समज, स्थानिक परिसराशी संबंधित संख्याज्ञान, स्नायु चलन कौशल्यांचा विकास, रंजक कथा व खेळाद्वारे भाषाविकासाबरोबरच मुलाला प्रभावी संवादक बनविणाऱ्या कृतींवर विद्याप्रवेश उपक्रम प्रकाश टाकतो.
- ✓ मुलांना उद्देशीत अध्ययनाकडे संचालित करणारा क्रम, अध्ययन प्रक्रियेची पद्धत आणि अपेक्षित अध्ययन ओळखण्याबरोबरच शिक्षकांना स्वयंमूल्यमापन करण्याची प्रेरणा यामुळे मिळते.

## 1.4 विद्याप्रवेश - व्याप्ती




- ❖ शालेय शिक्षणाच्या पहिल्या पाच वर्षाच्या टप्प्यामध्ये विद्याप्रवेश उपक्रम समाविष्ट आहे.
- ❖ इयत्ता पहिलीचे सुरुवातीचे तीन महिने किंवा बारा आठवड्याचा कालावधी निश्चित केलेला आहे.
- ❖ दररोज 8 तासिकांप्रमाणे आठवड्यातील पाच दिवस यासाठी ठरविण्यात आले आहेत.
- ❖ अध्ययन कालावधीची 8 तासिकांमध्ये विभागणी केलेली असून नियोजित कृतीनुसार वेळेची तडजोड करण्याची मुभा शिक्षकांना देण्यात आली आहे.
- ❖ प्रत्येक शनिवार हा आठवड्याभराच्या कृतींची उजळणी आणि पुढील आठवड्यातील कृतींच्या पूर्वतयारीसाठी राखीव ठेवण्यात आला आहे.


## 1.5 विद्याप्रवेश - उद्देश :

- ✓ विभिन्न पार्श्वभूमी असलेले विद्यार्थी इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेतात. त्यांची शालेय पूर्वतयारी करवून घेणे.
- ✓ इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सुलभ व मृदू धोरणाद्वारे मानसिक, बौद्धिक, शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या शालेय वातावरणाशी जुळवून घेण्यास सक्षम बनविणे.
- ✓ आनंददायक, खेळकेंद्रित वातावरणामध्ये मुलांच्या वयोमानाला अनुसरून मुक्त अध्ययन अनुभव देणे व सर्वांगीण विकास साधने.
- ✓ खेळाद्वारे पायाभूत अक्षरज्ञान व संख्याज्ञानाचे ध्येय साध्य करणे.

## 1.6 विद्याप्रवेश - अध्यापन तत्व :

विद्याप्रवेशचे अध्यापन तत्व हे प्रामुख्याने खेळकेंद्रित असून बौद्धिक, भावनिक आणि स्नायूंच्या चलन कौशल्याबरोबरच मूलभूत अक्षरज्ञान व संख्याज्ञान यांच्या अभिवृद्धीसाठी प्रेरित करते. मुलांच्या आवडी-निवडीना प्राधान्य देत संशोधन, समस्या परिहार, तार्किक विचार, ग्रहणशक्ती, कल्पनाशक्ती व सामंजस्य वाढविण्याची संधी यामधून मिळते. या अध्यापन तत्वामध्ये शिक्षकांनी लक्षात घ्यावयाचे अंश म्हणजे...

1. खेळ          2. संवाद          3. परिसर




### 1.6.1 खेळ :

खेळ केवळ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासालाच मदत करत नाहीत तर त्याच्या प्रगतीलाही प्रतिबिंबित करतात. जर अध्ययन अंश खेळकेंद्रित व परिसराशी निगडीत असेल तर मुलांच्या विकासाला अधिक वाव मिळतो. खेळांमध्ये मुक्त खेळ आणि निर्देशित खेळ असे दोन प्रकार असून त्यांच्या महत्त्वाविषयी जाणून घेऊ.

**मुक्त खेळ :** मुक्त खेळ हे मुलांची निवड, निर्णय घेणे तसेच इतरांच्या आवडी-निवडी लक्षात घेऊन त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठी मदत करतात. मुक्त खेळांमुळे मुले आपल्या आवडीच्या खेळात इतर मुलांसोबत समरस होण्यास शिकतात. आकर्षक वर्गखोलीची शिफारस करण्याबरोबरच संशोधक प्रवृत्ती, संगीतातील रुची आणि बाहुल्यांचा कोपरा तयार करण्यावरही येथे प्रकाश टाकण्यात आला आहे.

**निर्देशित खेळ :** हे खेळ शिक्षकांच्या निर्देशनावर आधारित असून योग्य मार्गदर्शन देण्याद्वारे खेळविले गेले पाहिजेत. मैदानी तसेच बैठ्या खेळांसाठी योग्य वातावरण निर्मिती करून या खेळांद्वारे अपेक्षित अध्ययन निष्पत्ती प्राप्त करता येते.

### 1.6.2 संवाद :

खेळ केंद्रित अध्ययन प्रक्रिया मूल आणि शिक्षक, मूल आणि मित्र, मूल आणि समवयस्क यांच्यामधील संवाद किंवा संवादाला महत्व देते. विद्याप्रवेशमध्ये तीन प्रकारचे संवाद सांगण्यात आले आहेत.

1) मित्रांशी संवाद          2) साहित्याशी संवाद          3) वडिलधाऱ्यांशी किंवा शिक्षकांशी संवाद

यामुळे अध्ययन प्रक्रिया परिपूर्ण होते असे अध्ययन तत्व सांगते.

### 1.6.3 परिसर :

मुलांमध्ये स्वाभाविकपणे कुतूहल असते; त्यामुळे प्रत्येक गोष्टीबद्दल जाणून घेण्याची त्यांच्यामध्ये उत्सुकता असते. त्यांच्या उत्सुकतेचा स्वीकार करून त्याला प्रेरित करणाऱ्या कृतींची रचना आपण केली पाहिजे. कौशल्याधारित वस्तू, करा व शिका कृतीसाहित्य, अंदाज बांधण्याचे कौशल्य वाढविण्यासाठी चित्रमालिका, मुक्त प्रश्नावली यांची नितांत आवश्यकता असते.

## 1.7 नियोजन आणि व्यवस्थापन :

सुरुवातीच्या 3 महिन्यांच्या किंवा 12 आठवड्यांच्या शालेय तयारीसाठी आवश्यक असणाऱ्या सूचना या मार्गदर्शिकेमध्ये दिलेल्या आहेत. तथापि, शिक्षकांनी त्यांच्या आवश्यकतेनुसार व स्थानिक संदर्भानुसार त्यामध्ये बदल करण्यास वाव आहे.

- ❖ मूलभूत सामर्थ्ये आणि अध्ययन निष्पत्ती यांना विकासात्मक ध्येयांतर्गत निर्धारित केले गेले असून त्यासंबधित विवरण अध्याय – 2 मध्ये दिले असून शिक्षकांनी त्याचा अवलंब करावा.
- ❖ माझा वेळ (Free Indoor Play) या शीर्षकांतर्गत 8 प्रकारच्या अध्ययन कोपऱ्यांचा परिचय करून देण्यात आला असून शिक्षकांनी आवश्यक साहित्याच्या संग्रहासहीत योजना तयार करणे. याबाबत अधिक माहिती अध्याय -2 मध्ये दिली आहे.
- ❖ दैनंदिन कृती व्यवस्थापनाविषयी सर्व सूचना आणि मार्गदशन दिलेले असून भाग – 2 मध्ये त्यांचे सविस्तर वर्णन दिले आहे.
- ❖ योजना तयार करण्याआधी शिक्षकांनी कृती/अभ्यासक्रमासाठी लागणाऱ्या साहित्यांचा विचार करून, स्थानिक संसाधने आणि वापरायोग्य असणाऱ्या टाकावू वस्तू, मोफत मिळणाऱ्या किंवा कमी खर्चिक वस्तू संग्रहित करून ठेवणे.
- ❖ मुलांकडून पुनारावर्तीत कृती करून घ्यावयाच्या संदर्भात आवश्यक असणाऱ्या अतिरिक्त अध्ययन पत्रकांचा वापर करून मुलांना अध्ययनामध्ये समाविष्ट करणे.

### 1.7.1 महत्वाचे घटक :

- ➢ सर्वप्रथम मुलांची पार्श्वभूमी जाणून घेतली पाहिजे. विविध पार्श्वभूमीतून येणाऱ्या मुलांची मानसिकता व पूर्वज्ञानाबद्दल जाणून घेणे खूप आवश्यक आहे कारण काही मुले अंगणवाडीचा अभ्यास करून इयत्ता पहिलीमध्ये आलेली असतात. तर काही मुलानी थेट पहिलीमध्ये प्रवेश घेतलेला असतो.
    - आवश्यकता असल्यास प्रत्येक मुलाच्या घरी भेट देणे.
    - मुलाच्या कुटुंबासोबत सकारात्मक संबंध ठेवणे.
- ➢ प्रत्येक मूल स्वतःच्या सामर्थ्यानुसार शिकत असते.
- ➢ शिक्षकांचे महत्वपूर्ण कार्य म्हणजे मुलांना प्रेरित करणे. त्यांच्या कोमल मनाला प्रतिसाद देणे, तसेच शिक्षक आणि विद्यार्थी या नात्याला प्रेमाने आणि आपुलकीने जोपासणे होय.
- ➢ आपण योजना तयार केलेली असली तरी वर्गखोलीतील परिस्थिती आणि मुलांच्या आवडीला अनुसरून त्यामध्ये योग्य ते बदल केले पाहिजे.
- ➢ योजना कार्यरुपात आणताना शिक्षकांनी विद्यार्थी, निर्देशित आंतरिक कृती तसेच बाह्य आणि लहान गटांमध्ये लागू करावयाच्या कृती याबाबत विचार करणे.
- ➢ उपलब्ध स्थानिक साहित्य, संग्रहित साहित्य किंवा बहुल्यांचा वापर मुलांकडून सोप्या व सुरक्षित पद्धतीने केला जाईल याकडे अधिक लक्ष देणे.




शिक्षकांनी चित्रमालिका, भित्तीचित्रे, अध्ययन पत्रके व विविध मॉडेल्सनी युक्त अशी आकर्षक वर्गखोली बनवावी. यामुळे मुलांची आवड आणि कुतूहल वाढून उद्देशपूर्ण अध्ययनासाठी सहकार्य मिळेल.

- ❖ प्रदर्शित केलेला प्रत्येक अंश हा लक्षवेधी व मुलांना सहजरित्या समजणारा असावा.
- ❖ प्रदर्शन फलकावरील वस्तू नियमितपणे बदलल्या जाव्या.
- ❖ प्रत्येक मुलाने तयार केलेल्या कृतीच्या प्रदर्शनाला येथे संधी मिळावी.
- ❖ प्रदर्शित केलेल्या वस्तू या निर्दिष्ट उद्देश पूर्ण करणाऱ्या असाव्या.
- ❖ प्रमाणापेक्षा अधिक कृतींचे किंवा अतिरिक्त, गोंधळयुक्त प्रदर्शन मुलांच्या मनावर चुकीचा परिणाम करू शकते. त्यामुळे त्यावर नियंत्रण असावे.
- ❖ मुलांना निरीक्षणासाठी अधिक वेळ देणे. दिलेल्या समस्येवर विचार करून प्रतिक्रिया नोंदविण्याची संधी देणे. उदा. घर कसे बांधतात? दिलेल्या सात काड्यांचा वापर करून हे शक्य आहे का? इ.

### 1.7.2 दिव्यांग मुलांच्या आवश्यकता :

सामर्थ्याला अनुसरून सर्व कृतींमध्ये त्यांना सामावून घेणे व मुक्तपणे विकसित होण्याची संधी देणे.

- इतर मुलांचे सामान्य वर्तन, परस्पर सहकार्य आणि तणावमुक्त भावनेने एकरूप होण्यासाठी मदत करणे.
- वर्गखोलीतील समस्या सोडविण्यासाठी ‘माझा वेळ’ ही कृती अधिक योग्य असून त्याचा सदुपयोग करण्यासाठी प्रेरित करणे.

- मुलाच्या घरातून सहकार्याची आवश्यकता आहे. असे वाटल्यास त्याच्या पालकांशी संपर्क साधून समालोचन करणे व मार्गदर्शन देण्याद्वारे अध्ययन अधिक परिणामकारक बनविणे.
- अशा मुलांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी नियोजित B.I.E.R.T., D.I.E.R.T व इतर संयोजाकांशी संपर्क साधून काळजी घेणे. स्वमग्न आणि अतिउत्साही मुलांना नियंत्रित करण्याविषयी जागृत राहणे.
- अध्यापनामध्ये प्रेमळ भाव अत्यावश्यक असून आपुलकी आणि मृदू धोरणाद्वारे दिव्यांग मुलांना प्रतीस्पंदित करणे.

## 1.8 विद्यार्थ्यांची प्रगती आणि नियमावली :

- **निरीक्षण :** मुलांची वाढ, व्यक्तिगत भिन्नता, सक्रियता आणि अध्ययन प्रक्रीयेतील एकाग्रता जाणून घेण्यासाठी निरीक्षण खूप महत्वाचे ठरते.
- **संग्रहीत दाखले :** निरीक्षणाच्या आधारावर मुलांचे सामान्य वर्तन, भाषेचा वापर, सामाजिक संबंध आणि परस्पर संवाद इत्यादी अंशांविषयी संक्षिप्त दाखले ठेवणे.
- **कृती संचयिका :** मुलांनी बनविलेल्या सृजनशील कृती जशा हस्तकला, रंगकाम, कोलाज आणि विविध प्रतीकृतींवर त्यांचे नाव लिहून कृती संचयीकेमध्ये दाखल करणे.
- **तपशील यादी :** विकासात्मक ध्येयांना अनुसरून अध्ययन निष्पत्तीची यादी करणे आणि त्याप्रमाणे मुलांच्या प्रगतीची नोंद करणे.
- **दर्जामापन यादी :** मुलांना दिलेले काम आणि कौशल्य यांना प्रतिक्रिया म्हणून त्यांनी साध्य केलेली प्रगती ही दर्जामापानाशी निगडीत असते. त्याप्रमाणे नोंदी ठेवणे.
- **छायाचित्रे आणि चित्रफिती :** मुलांच्या प्रतिक्रिया आणि अध्यापनावेळी त्यांनी दाखविलेली तत्परता हे अंश छायाचित्रे आणि चित्रफितींच्या सहाय्याने नोंद करून मुलाच्या बहुमुखी व्यक्तिमत्वाचा कायमस्वरूपी दाखला ठेवता येतो.

### मुलांची प्रगती समजून घेणे अथवा मूल्यमापन

- लहान लहान गटांमध्ये मुले कशाप्रकारे वर्तन करतात हे समजून घेणे शिक्षकांसाठी खूप महत्वाचे आहे. त्याचबरोबर निरीक्षण केलेल्या अंशांच्या नोंदी करून ठेवल्या पाहिजे. शिक्षकांनी संग्रहित केलेले अंश असो अथवा निरीक्षणाच्या नोंदी, विद्यार्थ्यांच्या भावनांना धक्का न पोहोचवता त्यांचे मूल्यमापन केले पाहिजे. प्रत्येक मुलाचे मूल्यमापन आणि प्रगतीची नोंद करताना त्याचे आधीचे दाखले व सद्याची प्रगती यांची तुलना करावी पण त्या मुलाची इतर मुलांशी बरोबरी करू नये.
- तिसरा मूल्यमापन टप्पा संपल्यानंतर मुलाच्या प्रगतीचे संकलन करावे. त्यामुळे मुलाच्या केवळ पुढील प्रगतीसाठीच मदत होत नाही तर अध्ययन अनुभवांची योजना तयार करण्यासाठी व पालाकांशी प्रगतीबाबत चर्चा करण्यासाठीदेखील हे सहाय्यक ठरते.

**ध्यानात ठेवा**

**मुले आपुलकी आणि शाब्बासकीच्या कौतुकाने शिकतात. पण टीका आणि चेष्टा केल्यामुळे कोमेजून जातात. ती शिकत नाहीत. त्यामुळे कोणत्याही मुलाला उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण असा शिक्का देऊ नये.**

## 1.9 विद्यार्थी अध्ययन प्रक्रियेत पालक व समाजाचा सहभाग :

औपचारिक शालेय शिक्षणाआधी पालकच मुलाचे पहिले शिक्षक असतात हे विसरून चालणार नाही. मुलांच्या शिक्षण आणि अध्ययन प्रक्रियेत पालक तसेच समाजाचा सहभाग ही एक पूरक व्यवस्था आहे. म्हणूनच शिक्षकांनी पालक व समाज यांचा सहभाग वाढविण्यासाठी खूप प्रयत्न केले पाहिजे. त्याकरिता खालील कांही अंश लक्षात घेणे गरजेचे आहे.

- प्रत्येक पालकाशी मुलांची प्रगती, त्याच्या आवडी-निवडी, कठीण वाटणारे अंश इत्यादीविषयी चर्चा करणे.
- शाळेमध्ये येऊन पालकांना आपल्या मुलाविषयी मुक्तपणे बोलण्यास प्रोत्साहीत करायला हवे.
- समाज व पालकांना शाळेमध्ये संपन्मूल व्यक्ती म्हणून कार्य करण्यास सांगून, मुलांसाठी घरच्यासारखे वातावरण शाळेमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न करणे.
- पिण्याचे पाणी तसेच इतर कांही सुविधा उपलब्ध करण्यासाठी समाजाचे सहकार्य घेणे.
- विविध स्तरातील स्थानिक व्यक्ती किंवा नेत्यांची शाळा सुधारणा समितीमध्ये सदस्य म्हणून नेमणूक करणे.

केवळ वरील अंशच नव्हे तर, शिक्षकांनी पालकांना खालील कांही विषयांमध्ये सल्लामसलत करून प्रोत्साहीत करावे.

1. मुलांसोबत वेळ घालवून त्यांच्यामध्ये भावनिक स्थैर्य व सकारात्मक आदर्श आचार-विचार रुजविणे.
2. मुलाच्या कांही शैक्षणिक कृतींमध्ये भाग घेऊन त्यांच्यामध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणे.
3. मुलांच्या भौतिक व शारीरिक विकासासाठी आवश्यक असलेल्या पोहणे, वाचन करणे यासारख्या विविध गोष्टींना प्राधान्य देणे.
4. दिवसातील कोणत्याही एका ठराविक वेळी किंवा रात्री झोपण्यापूर्वी मुलांना गोष्टी सांगून त्या गोष्टीतील पात्रे कोणती? त्यांची भूमिका कोणती? असे प्रश्न विचारून मुलांमध्ये उत्तम गुण रुजविणे.
5. मुलांना कथाकथन व चित्र पाहून गोष्टी सांगण्यास प्रोत्साहीत करणे.
6. गोष्ट सांगितल्यानंतर मुलांची स्तुती करणे.
7. शिक्षक किंवा पालकांच्या मार्गदर्शनाखाली मुलांना गोष्टी, गाणी यांचे व्हिडीओ पाहण्याची, खेळ खेळण्याची संधी उपलब्ध करून देणे व त्याबद्दल चर्चा करणे.
8. नाटक, रूपक व बाहुल्यांचा खेळ इत्यादी मध्ये विद्यार्थी भाग घेतील याकडे लक्ष देणे.
9. घरी असलेल्या वस्तूंचा आकार, रंग, त्यांचे मोजमाप इत्यादीविषयी चर्चा करणे.
10. आज शाळेमध्ये काय केले? जेवणात काय होते? कोणती गोष्ट वाचली? असे विविध प्रश्न दररोज विचारणे.
11. मुलांच्या वह्या तसेच दैनंदिनी दररोज पाहणे.
12. मुलाच्या चांगल्या कृतींची स्तुती करून प्रोत्साहन देणे.
13. मुलांनी केलेल्या चुका ओळखून त्या सुधारण्यासाठी मार्गदर्शन करणे.
14. उत्तमरित्या शिकण्यासाठी घरातील मोठ्या भावंडाचे किवा शिक्षक यांचे सहाय्य घेणे.
15. मुले शाळेत जाण्यायोग्य आहेत याची जाणीव पालक व समाजाला करून देण्यासाठी शाळेच्या विविध कार्यक्रमात जसे की शिक्षक-पालक सभा, घरी भेटी देणे, शाळा प्रारंभोत्सव इत्यादी मध्ये सहभागी करून घेण्यासाठी जागृती करणे.

## समाज व पालकांच्या मध्ये जागृती निर्माण करण्यासाठीचे मार्ग :

प्रत्येक मुलाची आवड-निवड समजून घेण्यासाठी पालकांशी संपर्क ठेवणे. घरामध्ये मुलांशी वागण्यासंदर्भात पालकांना सल्ला व मार्गदर्शन करणे.

इयत्ता 1 लीच्या प्रवेशापुर्वीच पालक मेळावा आयोजित करुन पालकांना मुलाच्यासोबत सहभागी होण्यास सांगणे. मेळाव्यामध्ये त्यांना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हाती घ्यावयाच्या कृतींची माहिती देऊन जागृती करणे. त्यामुळे पालकांना घरामध्ये गोष्ट सांगणे, बालगीते म्हणणे, चर्चा करणे, खेळातील कौशल्यांचा परिचय करून देणे याद्वारे शाळेमध्ये आवश्यक असणारे पोषक वातावरण निर्माण करणे शक्य होते.

## 1.10 नमुना वेळापत्रक :

| अवधी | वेळ (वि.प्र.) | खेळाच्या तासिका (कृती) | ८ अवधी |
|---|---|---|---|
| 1 | 30 मिनिटे | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) आणि गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 40 मिनिटे |
| 2 | 30 मिनिटे | माझा वेळ (Free Indoor play) | 40 मिनिटे |
| | 10 मिनिटे | लहान सुट्टी | |
| 3 | 30 मिनिटे | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | 40 मिनिटे |
| 4 | 30 मिनिटे | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | 40 मिनिटे |
| | 40 मिनिटे | जेवणाची सुट्टी | |
| 5 | 60 मिनिटे | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता (ऐकणे आणि बोलणे, आकलानासहीत वाचन, उद्देशपूर्वक लेखन) | 60 मिनिटे |
| 6 | 30 मिनिटे | मैदानी खेळ | 40 मिनिटे |
| | 10 मिनिटे | लहान सुट्टी | |
| 7 | 20 मिनिटे | रंजक कथा | 40 मिनिटे |
| 8 | 10 मिनिटे | पुन्हा भेटू | 20 मिनिटे |

* विद्याप्रवेश उपक्रमात एकूण 9 दैनंदिन कृती समाविष्ट असून त्यांचे 8 तासिकांमध्ये समायोजन करणे क्रमप्राप्त असल्याकारणाने सदर वेळापत्रकात अभिवादन आणि गुजगोष्टी या सुरुवातीच्या दोन कृती एकत्रितपणे पहिल्या तासिकेत समाविष्ट केलेल्या आहेत.

अध्याय - 2

# विद्याप्रवेश –विकासात्मक ध्येयाधारित सामर्थ्ये आणि अध्ययन निष्पत्ती

## 2.1 विकासात्मक ध्येय - 1 (Developmental Goal - 1) :

**उत्तम आरोग्य आणि स्वास्थ्य राखण्यात मुले सक्षम होतात.**

**(Children Maintain Good Health and Well being - HW)**

महत्वाच्या तीन विकासात्मक ध्येयांद्वारे मुलांची सर्वांगीण अभिवृद्धी साध्य करणे हाच निपुण भारत अभियानचा मुख्य उद्देश आहे. पहिले विकासात्मक ध्येय हे मुलांचे आरोग्य आणि स्वास्थ्य सांभाळणे हे असून त्यानुसार या ध्येयामध्ये खालील सामर्थ्यांचा समावेश होतो.

### 2.1.1 विकासात्मक ध्येय - 1, मुख्य सामर्थ्ये :

| | |
|---|---|
| 1 | मी आणि माझ्या सभोवतालचा परिसर<br>(Awareness of self) |
| 2 | धनात्मक चिंतन आणि अभिवृद्धी<br>(Development of positive self-concept) |
| 3 | स्व नियंत्रण<br>(Self-regulation) |
| 4 | निर्णय क्षमता आणि समस्या सोडविणे<br>(Decision-making and problem solving) |
| 5 | समाजाभिमुख वर्तन विकास<br>(Development of prosocial behavior) |
| 6 | स्व-संरक्षणासाठी आरोग्यदायक सवयी, स्वच्छता, निर्मलतेबद्दल जागृती<br>(Development of healthy habits, hygiene, sanitationand awarenessfor self-protection) |
| 7 | चलन कौशल्यांचा सर्वांगीण विकास<br>(Development of gross motor skills) |
| 8 | सूक्ष्म चलन कौशल्ये आणि हस्तनेत्र समन्वय यांचा विकास<br>(Development of fine motor skills and eyehand Co-ordination) |
| 9 | व्यक्तिगत आणि सांघिक खेळामधील सहभाग<br>(Participation in individual and team games and sports) |

## 2.1.2 विकासात्मक ध्येय - 1, अध्ययन निष्पत्ती :

| अ. क्र. | निपुण अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|
| 1 | HW 3.1 | स्वत:ची व इतरांची शारीरिक लक्षणे, लैंगिकता, अभिरुची आणि आवडी-निवडी याबाबत वर्णन करतात. Describes self and others in terms of physical characteristics, gender, interests, likes and dislikes. |
| 2 | HW 3.2 | एकत्र कुटुंबातील सदस्यांमधील परस्परसंबंध जाणून घेऊन त्यांचे वर्णन करतात. Exhibits the understanding of relationship with extended family members. |
| 3 | HW 3.3 | कृतींमध्ये स्वतंत्रतेचे प्रदर्शन करतात. Demonstrates independence in activities. |
| 4 | HW 3.4 | एकाचवेळी सूचना आणि साध्या नियमांचे पालन करतात. Follows instructions and simple rules at the same time. |
| 5 | HW 3.5 | रोजच्या जीवनातील बदलणाऱ्या कृतींबरोबर स्वत:ला जुळवून घेतात. Shows adaptability to any changes in routine/ daily schedule. |
| 6 | HW 3.6 | इतरांनी दिलेले काम/विषय पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करतात. Focuses attention to complete tasks/topics assigned by others. |
| 7 | HW 3.7 | शाब्दिक व अशाब्दिकारीत्या भावना व्यक्त करतात. (संकेत, चित्रे) Expresses emotions through verbal and non-verbal modes (gestures, drawings). |
| 8 | HW 3.8 | स्वत:ची आवड आणि प्राधान्यक्रमानुसार निवड करतात व जबाबदारी घेतात. Takes responsibility and makes choices basedon one's own preferences and interests. |
| 9 | HW 3.9 | समस्येवर उपाय सुचवितात आणि आपल्या वयानुरूप तडजोड करतात. Suggests solutions to conflicts and makes age appropriate adjustments. |
| 10 | HW 3.10 | खेळ खेळताना व चर्चा करताना इतरांच्या सल्ल्याचा आदर करतात व त्यांच्याशी सहमत होतात. Demonstrates willingness to include other's ideas during interaction and play. |
| 11 | HW 3.11 | लहान किंवा मोठ्या गटकार्यामध्ये गरजू मुलांना मदत करतात. Helps peers who are in need during large and small group activities. |
| 12 | HW 3.12 | विविध पार्श्वभूमीतून आलेल्या आणि दिव्यांग मुलांबद्दल स्वीकार्य व संवेदनशील भावना प्रदर्शित करतात. Demonstrates sensitivity and acceptability towards children from diverse backgrounds including children with special needs. |
| 13 | HW 3.13 | प्राथमिक आरोग्य, स्वच्छता, सुरक्षा व स्वास्थ्य आणि आहाराच्या चांगल्या सवयींचे सुधारित स्वातंत्र्यानिशी प्रदर्शन व जतन करतात. Maintains and displays basic health, hygiene, sanitation practices, and healthy eating practices with increased independence. |
| 14 | HW 3.14 | चांगल्या वाईट स्पर्शाबद्दल जागरुक राहतात व अपरिचीत व्यक्तींशी दूर राहतात. Demonstrates awareness about good touch and bad touch and maintains distance from trangers. |
| 15 | HW 3.15 | घर, शाळा तसेच मैदानावर सुरक्षिततेचे नियम पाळतात. Follows basic rules of safety at home, preschool and playground. |
| 16 | HW 3.16 | उच्च समन्वय साधून स्थूल चलन कौशल्याचे प्रदर्शन करतात. (उदा. पळणे, फेकणे, उडी मारणे, पकडणे इ.) Demonstrates gross motor skills with greater coordination, control and strength; eg. running, jumping, throwing, kicking and catching, etc. |
| 17 | HW 3.17 | संगीत आणि चलन कौशल्यामध्ये सर्जनशीलतेने आणि सक्रीय सहभाग दर्शवितात. Explores space and participates actively and creatively in music and movement activities. |
| 18 | HW 3.18a | अचूकता आणि नियंत्रणासह सूक्ष्म चलन कौशल्यांचे प्रदर्शन करतात. Exhibits fine motor skills with precision and control. |
| 19 | HW 3.18b | रेषेवरून कापणे, ओतणे, कपड्यांची बटणे लावणे इ. संकीर्ण कार्ये पूर्ण करण्यासाठी समन्वित हालचालींचा वापर करतात. Uses coordinated movements to complete complex tasks like cutting along a line, pouring, buttoning, etc. |
| 20 | HW 3.18c | चित्रे काढणे, रंगविणे, लेखनसाहित्य व्यवस्थितरीत्या पकडण्यासाठी आणि हाताळण्यासाठी चिमटीत पकडण्याचे कौशल्य (वस्तू पकडण्यासाठी अंगठा आणि तर्जनीचा समन्वय) वापरतात. Uses the pincer grip (coordination of the index finger and thumb to hold an item) to hold and manipulate tools for drawing, painting, and writing. |

## 2.2 विकासात्मक ध्येय - 2 (Developmental Goal - 2) :

### मुले प्रभावी संवादक बनतात.

### (Children Become Effective Communicator - EC)

### 2.2.1 विकासात्मक ध्येय - 2, मुख्य घटकांश (key componants) :

1. **मौखिक भाषा विकास** (Oral language Development)
2. **ध्वनी संकेतांची जागरुकता** (Phonological Awareness)
3. **अक्षर संकेत आणि ध्वनी यांचा परस्पर संबंध** (Decoding)
4. **शब्दसंग्रह** (Vocabulary)
5. **आकलनासहीत वाचन** (Reading with Comprehension)
6. **अस्खलित वाचन** (Reading Fluency)
7. **छापील साहित्याबद्दलची संकल्पना** (Concept about Print)
8. **लेखन** (Writing)
9. **वाचन संस्कृती / वाचनाकडे कल** (Culture of Reading/ Inclination towards Reading)

### 2.2.2 विकासात्मक ध्येय - 2, मुख्य सामर्थ्ये :

| अ. क्र. | सामर्थ्ये |
|---|---|
| **श्रवण/ऐकणे व भाषण/बोलणे** (Talking and Listening) | |
| 1 | **आकलनासह ऐकणे** (Listening with comprehension) |
| 2 | **सर्जनशील स्व अभिव्यक्ती आणि संभाषण** (Creative Self Expression and Conversation) |
| 3 | **भाषा आणि सर्जनशील विचार** (Language and Creative thinking) |
| 4 | **शब्दसंग्रह विकास** (Vocabulary Development) |
| 5 | **संभाषण आणि बोलण्याचे कौशल्य** (Conversation and talking skills) |
| 6 | **भाषेचा अर्थपूर्ण वापर** (Meaningful uses of language) |
| **आकलनासहीत वाचन** (Reading with comprehension) | |
| 1 | **पुस्तकांशी गट्टी** (Bonding with Books) |
| 2 | **छापील साहित्याची जागरुकता आणि अर्थपूर्ण ग्रहण** (Print Awareness and Meaning Making) |
| 3 | **अभिव्यक्तीसहीत वाचन** (Pretend Reading) |
| 4 | **ध्वनी संकेतांची जागरुकता** (Phonological Awareness) |
| 5 | **ध्वनी संकेत संघटन** (Sound Symbol Association) |
| 6 | **तर्क आणि ज्ञानासह पुर्वानुभवांचा वापर** (Prediction and use of previous experiences with knowledge) |
| 7 | **आनंदासाठी स्वतंत्र वाचन आणि विविध उद्देशांसाठी यमक शब्दांचे लेखन** (Independent reading for pleasure and writing of rhyming words various purposes.) |
| **उद्देशपूर्वक लेखन** (Writing with purpose) | |
| 1 | **प्रारंभिक साक्षरता कौशल्ये** (Early literacy skills) |
| 2 | **स्व-अभिव्यक्तीसाठी लेखन** (Writing for self-expression) |

| | |
|---|---|
| 3 | **शब्द रचनेमध्ये त्याच्या/तिच्या अक्षर आणि ध्वनी संकेत ज्ञानाचा वापर करून लेखन** (Make use of her/ his knowledge of letter and sounds, invents spellings to write) |
| 4 | **पारंपारिक पद्धतीने लिहिण्याचा सराव** (Make efforts to write in conventional ways) |
| 5 | **चित्र, शब्द आणि अर्थपूर्ण वाक्याद्वारे वाचनाला प्रतिक्रिया** (Response to reading with drawings/ words and meaningful sentences) |
| 6 | **लयबद्ध शब्दांचे लेखन** (writing of rhyming words) |
| 7 | **नामपद आणि क्रियापदांचा वापर करून अर्थपूर्ण वाक्यरचना** (Write meaningful sentences using naming words and action words) |
| 8 | **स्वअभिव्यक्तीसाठी संदेशांचे लेखन** (Write messages to express themselves) |
| 9 | **मिश्र भाषासंकेतांचा वापर** (Using mixed language codes) |
| 10 | **घरी आणि वर्गात विविध उद्देशांसाठी लेखन जसे यादी करणे, आजी-आजोबांसाठी शुभेच्छापत्र बनविणे, मित्रांना संदेश / आमंत्रण इ.** (Write for different purposes in the classroom's activities and at home, such as making list, writing greeting to grandparents, messages/ invitation to friends, etc.) |
| **विद्याप्रवेशमध्ये देण्यात आलेल्या वरील सामार्थ्यांबरोबरच समग्र शिक्षण कर्नाटककडून सुचविण्यात आलेल्या पुढील दोन सामर्थ्यांचा स्वीकार यामद्ध्ये करण्यात आला आहे.** | |
| 11 | **बाराखडी आणि जोडाक्षरांची ओळख आणि लेखन** (Identify and write the GUNITHAKSHARA and OTTAKSHARA letters) |
| 12 | **स्वतंत्रपणे शब्द आणि वाक्य रचना** (Create words and sentences independently) |

## 2.2.3 विकासात्मक ध्येय - 2, अध्ययन निष्पत्ती :

| अ. क्र. | निपुण अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|
| 1 | 3.1 | **अपरिचीत शिक्षक, नवीन मित्र-मैत्रिणी, शालेय कर्मचारी तसेच इतरांसोबत शालेय आणि घरच्या वातावरणामध्ये स्वत:च्या भाषेत संभाषण करतात.** ECL1 3.1: Engages in conversation in school and home with unfamiliar teachers, new friends, school staff, other adults, etc., in their own language. |
| 2 | 3.2 | **वाचन कोपरा तसेच इतर वाचन साहित्यातून पुस्तके निवडून चित्राच्या सहाय्याने गोष्ट समजून घेऊन छापील/ लिखित साहित्याचा तर्क करतात.** ECL1 3.2: Selects book from reading corners/ reading area and attempts to understand the story with the help of pictures and can predict the written text. |
| 3 | 3.3 | **गोष्टी कविता वाचनाचा त्यांचा अनुभव आपल्या भाषेत सांगतात, त्याविषयी बोलतात आणि मित्र-मैत्रिणींशी सामायिक करतात.** ECL1 3.3: Expresses their experiences of reading poems/ stories in their own language and talks about it and shares it with friends. |
| 4 | 3.4 a | **स्वत:च्या भाषेतील मनोरंजक कविता / गाणी पाठ करताना योग्य स्वर व आवाजातील चढउताराचा वापर करतात.** ECL1 3.4 (a)**:** Uses appropriate intonation and modulation of voice while reciting interesting poems/ songs in their own language. |
| 5 | 3.4 b | **स्वत:च्या भाषेतील परिचित कविता योग्य स्वरात प्रवाहीपणे पाठ करतात.** ECL1 3.4 (b)**:** Recites with fluency with appropriate intonation parts of familiar poems in their own language. |

| | | |
|---|---|---|
| **6** | **3.5 a** | **गोष्टी सांगण्यासाठी आपल्या आवडीची गोष्टीची पुस्तके शिक्षकांना देतात.**<br>ECL1 3.5 (a)**:** Gives their favourite storybooks to the teacher to narrate the story. |
| **7** | **3.5 b** | **चित्रातील वस्तूंचे बारकाईने निरीक्षण करून त्याविषयी बोलतात. तसेच वस्तूंची नावे शोधून लिहितात.**<br>CL1 3.5 (b)**:** Observes attentively the objects in the pictures and talks about them and write their name by using invented spellings. |
| **8** | **3.6 a** | **छापील साहित्याची जाणीव ठेऊन वाचन करतात.**<br>ECL13.6 (a)**:** Reads with the understanding of print awareness. |
| **9** | **3.6 b** | **गोष्टीची चित्रे समजून घेतो आणि घटनाक्रमानुसार मांडून गोष्ट वाचतो.**<br>ECL1 3.6 (b)**:** Reads the story by understanding and arranging the pictures in the sequence of events. |
| **10** | **3.7** | **परिचित गोष्टी आणि कवितांमध्ये येणाऱ्या शब्दांमधील वारंवार येणारे आवाज ओळखतात.**<br>ECL1 3.7: Identifies repeated sounds in words occurring in familiar stories and poems. |
| **11** | **3.8 a** | **गोष्टी, कविता आणि गाण्यातील वारंवार येणारे आवाज, शब्द इ. ओळखतात.**<br>ECL1 3.8 (a)**:** Identifies repeated sounds, words, etc. in stories, poems and songs. |
| **12** | **3.8 b** | **चित्रे आणि छापील साहित्य, पूर्वानुभव आणि माहिती अक्षर-ध्वनी संघटन इत्यादींच्या सहाय्याने लिखित मजकुराचा अंदाज करतात.** ECL1 3.8 (b)**:** Predicts about the written text with the help of pictures and print, previous experiences and information, letter-sound association etc. |
| **13** | **3.9** | **स्वत:चे नाव, मित्र-मैत्रिणींची नावे आणि सभोवतालच्या वस्तूंची नावे (शोधून) लिहिण्यात रस घेतात.**<br>CL1 3.9: Takes interest in writing (invented spellings) one's own name, names of their friends and objects around them. |
| **विद्याप्रवेशमध्ये देण्यात आलेल्या अध्ययन निष्पत्तीबरोबरच समग्र शिक्षण कर्नाटकच्यावतीने या पुढील दोन अध्ययन निष्पत्तींचा स्वीकार करण्यात आला आहे.** | | |
| **14** | **SSK- 1** | **लेखनाच्या योग्य क्रमाचा सराव करतात.**<br>practice the correct mode of writing. |
| **15** | **SSK-2** | **वर्णमालेतील अक्षरे ओळखतात व वाचतात.**<br>Recognize and read the letters of the alphabet. |
| **16** | **SSK-3** | **शिकलेल्या अक्षरांपासून साधे शब्द आणि वाक्ये तयार करतात.**<br>They will create simple word and phrases from learned letters. |

## 2.3 विकासात्मक ध्येय - 3 (Developmental Goal - 3) :

**मुले सक्रीय अध्ययनार्थी बनून सभोवतालच्या वातावरणाशी जोडली जातात.**

**(Children Become Involved Learners and Connect with their Immediate Environment - IL)**

### 2.3.1 विकासात्मक ध्येय - 3, मुख्य घटकांश (key componants) :

| | |
|---|---|
| 1 | संवेदनात्मक विकास (Sensory Development) |
| 2 | ज्ञानात्मक कौशल्य (Cognitive Skills) |
| 3 | परिसराशी संबंधित संकल्पना (Concept related to environment) |
| 4 | संकल्पनांची निर्मिती (Concept Formation) |
| 5 | संख्याज्ञान (Number Sense) |
| 6 | संख्यांच्या मूलभूत क्रिया (Number Operations) |
| 7 | मापने (Measurement) |
| 8 | आकार (Shapes) |
| 9 | माहिती संग्रह (Data Handling) |
| | आकृतीबंध (नमुने) (Pattern) |
| | दिनदर्शिका कृती (Calendar Activity) |
| | तंत्रज्ञानाचा वापर (Use of Technology) |

### 2.3.2 विकासात्मक ध्येय - 3, सामर्थ्ये :

| 1. संवेदनात्मक विकास (Sensory Development) | |
|---|---|
| * दृष्टी (Sight) | * गंध/वास (Smell) |
| * शब्द (ध्वनी) (Sound) | * चव (Taste) |
| * स्पर्श (Touch) | |
| **2. ज्ञानात्मक कौशल्ये (Cognitive Skills)** | |
| * निरीक्षण (Observation) | * सर्जनशील चिंतन (Creative Thinking) |
| * ओळखणे (Identification) | * विमर्षात्मक चिंतन (Critical Thinking) |
| * स्मरण (Memorisation) | * समस्या निवारण (Problem Solving) |
| * जोडणे (Matching) | * तार्किक चिंतन (Reasoning) |
| * वर्गीकरण (Classification) | * कुतूहल (Curiosity) |
| * आकृतीबंध (नमुने) (Patterns) | * प्रायोगिकता (Experimentation) |
| * रचनात्मक चिंतन (Sequential Thinking) | * संशोधन (Exploration) |
| **3 .परिसराशी संबंधित संकल्पना (Concept related to environment)** | |
| * नैसर्गिक : प्राणी, पक्षी, फळे, भाज्या, आहार इत्यादी. (Natural : animals, bords, fruits, vegetables, food etc.) | |
| * सामाजिक : मी, माझे कुटुंब, सहकारी (मित्र), सण-समारंभ, समाज, समाजातील मदतनीस, वाहतूक इत्यादी. (Social : myself, family, transport, festival, community helpers etc.) | |
| * भौतिक परिसर : हवा, पाणी, सूर्य, चंद्र, तारे, दिवस-रात्र, ऋतू, हवामान इत्यादी. (Physical : water, air, season, sun, moon, day | |

| | |
|---|---|
| and night) | |
| **4. संकल्पनांची निर्मिती** (Concept Formation) | |
| * **रंग** (Colours) | * **वजन** (weight) |
| * **आकार** (shapes) | * **उंची** (height) |
| * **अंतर** (distance) | * **काळ** (time) |
| * **मापने** (measurement) | * **अवकाशीय कल्पना** (Spatial sense) |
| * **आकारमान** (size) | * **संलग्नता** (One-to-one Correspondence) |
| * **लांबी** (length) | |
| **5. संख्याज्ञान** (Number Sense) | |
| * **मोजून किती सांगणे.** (Count and tell how many) | |
| * **संख्यासूचके ओळखणे.** (Numeral recognition) | |
| * **क्रमबद्धतेची जाणीव** (Sense of order) | |
| **6. संख्यांच्या मूलभूत क्रिया** (Number Operations) | |
| * **बेरीज** (Addition) | * **गुणाकार** (Multiplication) |
| * **वजाबाकी** (Subtraction) | * **भागाकार** (Division) |
| **7. मापने** (Measurement) | |
| * **लांबी** (Length) | * **वस्तूमान** (Volume) |
| * **वजन** (Mass) | * **उष्णता** (Temperature) |
| **8. आकार** (Shapes) | |
| **द्विमितीय व त्रिमितीय आकृत्या** (2, 3 D Shapes) | * **पातळी** (Plain) |
| * **सरळ रेषा** (Straigh line) | * **वक्र पातळी** (Curved Surface) |
| * **वक्र रेषा** (Curved Line) | |
| **9.** | |
| * **माहितीचे संग्रहण** (Data Handling) | * **आकृतीबंध (नमुने)** (Patern) |
| * **दिनदर्शिका कृती** (Calendar Activity) | * **तंत्रज्ञानाचा वापर** (Use of Technology) |

### 2.3.3 विकासात्मक ध्येय - 3, अध्ययन निष्पत्ती :

| अ. क्र. | निपुण अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|
| 1 | IL 3.1 | **परिसराचे निरीक्षण व अन्वेषण करण्यासाठी सर्व ज्ञानेंद्रियांचा वापर करतात.**<br>IL 3.1: Uses all the senses to observe and explore the environment. |
| 2 | IL 3.2 | **आपल्या सभोवतालच्या परिसरातील सामान्य वस्तू, ध्वनी, लोक, चित्रे, प्राणी, पक्षी यांचे निरिक्षण करून त्यांच्या बारीकसारीक तपशिलाचे वर्णन करतात.**<br>IL 3.2: Notices and describes finer details of common objects, sounds, people, pictures, animals, birds the immediate environment. |
| 3 | IL 3.3 a | **एकावेळी पाहिलेल्या 4-5 वस्तू लक्षात ठेवतात आणि स्मरण करून सांगतात.**<br>IL 3.3 (a): Remembers and recalls 4–5 objects seen at a time. |

| | | |
|---|---|---|
| 4 | IL 3.3 b | **परिचित वस्तूच्या चित्रामधील गाळलेले 3-5 भाग ओळखतात.**<br>IL 3.3 (b): Identifies 3–5 missing parts of a picture of familiar object. |
| 5 | IL 3.4 | **दोन गटांमधील 5-6 वस्तू साम्य पाहून एकमेकाशी जोडतात.**<br>IL 3.4: Places 5–6 objects of two groups in one-to-one correspondence. |
| 6 | IL 3.5 | **आकार, रंग आणि आकारमान या तीन घटकांद्वारे वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतात. वस्तूंच्या स्थानाचे वर्णन करण्यासाठी योग्य स्थितीदर्शक शब्द (बाजूला, आतमध्ये, खाली) वापरतात.**<br>IL 3.5: Compares and classifies objects by three factors like shape, colour and size, etc. Correctly uses position words (beside, inside, under) to describe the location of objects. |
| 7 | IL 3.6 | **4-5 चित्र कार्डे / वस्तू क्रमवारीत जोडतात / मांडतात. उदा. आकार, आकारमान आणि घटनाक्रम**<br>IL 3.6: Seriates/arranges 4–5 picture cards/objects in a sequence, e.g. shape, size and occurrence of events. |
| 8 | IL 3.7 | **एखादी गोष्ट वाचताना त्यामधील वेळेशी संबंधित घटना जशा की, प्रथम काय घडले? रात्री कोण आले? इत्यादी समजून घेतात.**<br>IL 3.7: When recited a story, can understand time related events like, what happened first? Who came at night? etc. |
| 9 | IL 3.8 a | **कारणांसह सोप्या समस्या परिस्थितीवर उपाय शोधतात.**<br>IL 3.8 (a): Provides solutions to simple problem situations with reasons. |
| 10 | IL 3.8 b | **परिसरातील वस्तूंची तपासणी आणि हाताळणी करण्यात गुंततात, प्रश्न विचारतात, चौकशी करतात, शोधतात आणि स्वत:च्या कल्पना तयार करून अंदाज बांधतात.**<br>IL 3.8 (b): Engages in investigating and manipulating objects in the environment, asks questions, inquires, discovers and constructs one's own ideas and predicts. |
| 11 | IL 3.8 c | **परिसराच्या चिंतेबद्दल जागरुकता आणि संवेदनशीलता प्रदर्शित करतात. उदा. पाणी वाया घालवू नये, वापरात नसताना दिवे बंद करावे. इत्यादी.**<br>IL 3.8: (c) Demonstrates awareness and sensitivity towards environmental concerns, e.g., do not waste water, switching of lights when not in use, etc. |
| 12 | IL 3.9 | **10 पर्यंतच्या वस्तू मोजतात.**<br>IL 3.9: Counts up to 10 objects. |
| 13 | IL 3.10 | **विशिष्ट संख्येपासून पुढे व मागे मोजू 9 पर्यंत शकतात.**<br>IL 3.10: Can count forward and backward from a particular number up to 9. |
| 14 | IL 3.11 | **संख्यांसह अंक ओळखतात आणि 9 पर्यंतचे अंक लिहितात.**<br>IL 3.11: Identifies numerals with numbers and writes numerals up to 9. |
| 15 | IL 3.12 | **वस्तू संख्या कमी होत जाते आणि शेवटी शून्य होते याबद्दल जागरुकता प्रदर्शित करतात. (उदा. एका झाडाच्या फांदीवर बसलेले 3 पक्षी एकामागून एक उडून गेले व शेवटी फांदीवर एकही पक्षी शिल्लक राहिला नाही.)**<br>IL 3.12: Demonstrates the awareness that things reduce in number and become nil. (e.g. 3 birds sitting on a branch of tree flew away one by one at the end, no bird is left on the branch.) |
| 16 | IL 3.13 | **10 पर्यंतच्या दोन संख्यांची तुलना करतात आणि पेक्षा मोठे व पेक्षा लहान अशा शब्दांचा वापर करतात.**<br>IL 3.13: Compares two numbers up to 10 and uses vocabulary like more than, less than. |
| 17 | IL 3.14 | **एकूण वस्तू 9 पर्यंत होतील अशाप्रकारे दोन गट एकत्रीत करतात.व पुन्हा मोजतात.**<br>IL 3.14: Combines two groups up to 9 objects and recounts. |

| | | |
|---|---|---|
| 18 | IL 3.15 | **संग्रहातून 9 पर्यंत वस्तू बाहेर काढतात आणि पुन्हा मोजतात.**<br>IL 3.15: Takes out objects from a collection up to 9 objects and recounts. |
| 19 | IL 3.20 | **भारतीय चलनी नोटा ओळखतात.**<br>IL 3.20: Identifies Indian currency notes. |
| 20 | IL 3.21 | **सर्वात लांब-सर्वात आखूड आणि सर्वात उंच-सर्वात ठेंगणा या संदर्भात लांबीच्या आधारे 3 वस्तूंची तुलना करतात.**<br>IL 3.21: Compares three objects in terms of their length as longest/shortest and tallest/shortest. |
| 21 | IL 3.22 | **पेक्षा जड / पेक्षा हलके या संदर्भात वजनाच्या आधारे 2 वस्तूंची तुलना करतात.**<br>IL 3.22: Compares two objects in terms of their weight as heavier than/lighter than. |
| 22 | IL 3.23 | **बाटल्या, पेले, बादली इ. अशा दोन पात्रांच्या धारणक्षमतेची तुलना करतात.**<br>IL 3.23: Compares capacities of two vessels like bottles, glasses, bucket, etc. |
| 23 | IL 3.25 | **समतल पृष्ठभागावरील त्रिमितीय आकारावरून द्विमितीय आकार शोधून ओळखतात.**<br>IL 3.25: Identifies 2-D shapes by tracing the faces of 3-D shapes on a plane surface. |
| 24 | IL 3.26 | **रोजच्या जीवनातील संदर्भात अर्धी भाकरी, पाण्याने अर्धा भरलेला पेला अशाप्रकारच्या शब्दांचा वापर करतात.**<br>IL 3.26: Uses vocabulary like half roti/half a glass of water, etc., in daily context. |
| 25 | IL 3.27 | **पानाचे ठसेकाम व बोटांचे ठसेकाम यांसह नवीन आकृतीबंध (नमुने) बनवितात.**<br>IL 3.27: Creates new patterns with leaf printing or thumb printing, etc. |
| 26 | IL 3.28 | **तिच्या/त्याच्या सभोवतालच्या परिस्थितीनुसार काढतो./ काढते. उदा. माझ्याकडे निळ्यापेक्षा लाल जास्त पेन्सिली आहेत.**<br>IL 3.28: Draws inferences from situations that surround her/him, e.g., I have more red pencils than blue. |
| 27 | IL 3.29 | **आठवड्यातील दिवसांची आणि वर्षातील महिन्यांची नावे सांगतात.**<br>IL 3.29: Recites the names of the days of the week and months of the year. |
| 28 | IL 3.30 | **आपल्या आजूबाजूला सामान्यत: उपलब्ध असणाऱ्या तांत्रिक साधनांच्या वापराविषयी माहिती सांगतात.**<br>IL 3.30: Describes usage of commonly available technological tools around her/him. |

****************************************☺***********************************************

## अध्याय -3

# खेळाच्या तासिका–काय? का? कसे?

| अ. क्र. | विवरण | काय? (कृती) | का? (उद्देश) | कसे? (पद्धत - शिक्षकांना सूचना / मार्गदर्शन) |
|---|---|---|---|---|
| 1 | Greet Meet *(Teacher initiated Morning group activity)*<br><br>अभिवादन | अभिवादन ही वर्ग सुरु होण्याआधी शिक्षकांनी मुलांसोबत मिळून करावयाची कृती आहे. शिक्षकांनी मुलांचे वर्गामध्ये स्वागत केले पाहिजे. मुलांना त्यांच्या नावाने हाक मारून त्यांच्यामध्ये आपुलकी, प्रेम आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करून चर्चेला प्रारंभ करणे. | दिवसातील प्रारंभिक उपक्रम असणारी ही कृती मुलाला सकारात्मकरित्या दिवसाची सुरुवात करण्यासाठी प्रेरित करते.<br>• शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये उत्तम बांधव्य निर्माण होण्यासाठी सहाय्यक ठरते.<br>• नवीन परिसरामध्ये शिकणाऱ्या मुलांसाठी स्वागताची अनुकूल आणि आरामदायक भावना निर्माण करते.<br>• दुसऱ्या दिवशी शाळेला येण्यासाठी मुले उत्सुक असावीत असे वातावरण तयार करते.<br>• मुलांमध्ये योग्य शिष्टाचार आणि इतरांना अभिवादन करण्याची सवय निर्माण होण्यासाठी मदत करते.<br>• आपले सहकारी आणि मित्रांसोबत धनात्मकरीत्या संवाद साधून सामाजिक कौशल्यांचा विकास करण्यास सहाय्यक ठरते.<br>• मुलांना आपली संधी येईपर्यंत संयम राखण्यास शिकविते. | • मुलांचे प्रेमाने आणि उत्साहाने स्वागत करणे.<br>• मुलांना ओळीने वर्गात प्रवेश करण्यास सांगणे.<br>• प्रत्येक मुलाला त्याच्या नावाने हाक मारून तो खास असल्याची भावना निर्माण करणे.<br>• दररोज वेगवेगळी संबोधने वापरून मुलांचे अभिनंदन करणे.<br>• दिव्यांग मुलांकडे विशेष लक्ष देणे.<br>• अभिवादन स्पष्ट असावे, प्रत्येक मुलाला महत्व देऊन गरज असल्यास अभिवादनाचे पुनरावर्तन करणे.<br>• पुढच्या मुलाला अभिवादन करण्याची संधी देण्याअगोदर आधीचे मूल प्रतिक्रिया देईपर्यंत वाट पाहणे.<br>• मुलाची निर्मळता लक्षात ठेऊन त्यांना संबोधताना योग्य विधान वापरणे तसेच प्रत्येकाला योग्य मार्गदर्शन करणे.<br>• वर्गात प्रवेश केल्यानंतर मुलांना निवांत बसण्याची सूचना देणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | Circle Time<br><br>गुजगोष्टी | मुक्त संवाद (मुलांचा बोलण्याचा वेळ) : मुलांच्या भावना आणि विचार स्वत:हून मुलांनी व्यक्त करण्यासाठी दिला गेलेला हा वेळ आहे. | • ही कृती मुलांमध्ये स्वअभिव्यक्तीची भावना निर्माण करते.<br>• श्रवण आणि भाषण कौशल्यांचा विकास करते.<br>• मुलांना इतर सहकाऱ्यांच्या भावना आणि अभिप्राय समजून घेण्यास सहाय्यक ठरते.<br>• मुलांना आपल्या आजूबाजूच्या परिसराबद्दल माहिती मिळविण्यास सहाय्यक ठरते.<br>• मुलांमध्ये सहानुभूती आणि संवेदना निर्माण करण्यास सहाय्यक ठरते.<br>• मुलांच्या कल्पनाशक्तीला आणि सृजनशीलतेला उत्तेजन देते. | • परस्परांमध्ये योग्य अंतर ठेऊन मुलांना वर्तुळाकार किंवा अर्धवर्तुळाकार रचनेमध्ये बसविणे.<br>• मुलांना वर्गावर वेगळे बसवू नये.<br>• सूचना स्पष्ट असाव्या.<br>• मोठ्या मुलांसोबत कृतीला सुरुवात करणे आणि लहान मुलांना कृतीमध्ये मुक्तपणे सहभागी होण्यास प्रोत्साहीत करणे.<br>• सर्व मुलांना कृतीमध्ये सहभागी होण्यास आणि आपल्या प्रतिक्रिया देण्यास प्रोत्साहीत करणे.<br>• कृतीमध्ये मोठ्या मुलांना जास्त महत्व देणे टाळणे.<br>• प्रत्येक मुलाला बोलण्याची संधी मिळेल याकडे लक्ष देणे. मुले इतरांना चिडवणार नाहीत याकडे लक्ष देणे. |
| 3 | माझा वेळ | 'माझा वेळ' हे शीर्षक म्हणजे मुलांचा मुक्त वेळ असून, आपल्या आवडीच्या कृती करण्याची भरपूर संधी त्यांना यामुळे मिळते. मुलांची ग्रहणशक्ती, कल्पनाशक्ती आणि तर्कशक्ती यासारख्या महत्वाच्या उद्देशांचा यामध्ये समावेश होतो.<br>मुलाच्या शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक विकासाला 'माझा वेळ' ही कृती सहाय्यक ठरते. या अनुषंगाने मुलांना स्वतंत्र कृती करण्यासाठी प्रेरणा आणि वेळ देण्यात आला आहे. यासाठी विद्याप्रवेशमध्ये आठ अध्ययन कोपऱ्यांची रचना करण्यात आली असून प्रत्येकाला | • माझा वेळ या तासिकेतील कृती विद्यार्थ्यांना स्वत: निवड करण्यासाठी, निर्णय घेण्यासाठी तसेच इतरांचे हक्क आणि दृष्टीकोन समजून घेण्यासाठी मदत करतात.<br>• या कृती मुलांना आपल्या भावना आपले अनुभव व्यक्त करण्याची संधी मिळवून देतात.<br>• सामजिक कौशल्ये जशी वस्तूंची देवाणघेवाण, आपल्या संधीची वाट पाहणे तसेच विचार विनिमय करून काम करणे यासारख्या सामर्थ्यांची वृद्धी करतात. | 'माझा वेळ' या कृतीसाठी आठ कोपऱ्यांमध्ये साहित्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. बालस्नेही साहित्य असणे खूप महत्वाचे आहे. यासाठी आपण कांही सुरक्षा आणि सावधगिरीचे नियम पाळले पाहिजेत.<br><br>• वेळोवेळी साहित्याची पुनर्रचना करून ते व्यवस्थित ठेवणे.<br>• आवश्यक साहित्य मुलांचा हात पोहोचेल अशाप्रकारे ठेवणे.<br>• धारदार, गंजलेले, जड, फुटणारे साहित्य वापरू नये.<br>• साहित्य चावणे, गिळणे, तोडणे, फेकणे, मोडतोड करणे असे प्रकार होणार नाहीत याकडे लक्ष देणे.<br>• सर्व मुले एकाच कोपऱ्यात जमा होऊन गोंधळ करणार नाहीत याकडे लक्ष देणे.<br>• दिव्यांग मुलेसुद्धा कृतींमध्ये सहभागी होतील व इतर मुले त्यांना मदत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | विविध नावे देण्यात आली आहेत. नावाला अनुसरून प्रत्येक कोपऱ्यामध्ये पूरक वस्तूंचा समावेश असला पाहिजे. चालू वर्षामध्ये उपलब्ध साहित्याची व्यवस्थित रचना करणे खूप गरजेचे आहे. पुढील दिवसात अनेक वस्तूंचा या कोपऱ्यात समावेश होऊ शकतो. ज्या कोपऱ्याकडे मूल जास्त आकर्षित होते. त्यावरून त्या मुलाची आवड समजून घेण्याकडे शिक्षकांनी लक्ष दिले पाहिजे. दिवसेंदिवस मुलाची आवड इतर कोपऱ्याकडे वळविण्याची, त्याबद्दल कुतूहल निर्माण करण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे. समन्वय शिक्षण हे गुणवत्तापूर्ण शिक्षणामध्ये खूप महत्वाचे आहे. 'माझा वेळ' मधील कृतींमध्ये सहभागी होणे कांही मुलांना साध्य न झाल्यास त्यांचे वेगळेपण लक्षात ठेऊन त्यांच्यासाठी पूरक कृतींची रचना करण्यामध्ये शिक्षकांची भूमिका महत्वाची आहे. विद्याप्रवेशच्या शेवटच्या म्हणजेच 72 व्या दिवशी प्रत्येक मूलाने आठही कोपऱ्यांमधील कृतींमध्ये सहभागी होऊन कार्य करणे खूप महत्वाचे आहे. | • प्रत्येक मुलाला निरनिराळ्या वस्तू हाताळण्याची आणि त्यांचे गुणधर्म समजून घेण्याची संधी मिळते. मुले पूर्वज्ञानाचा वापर करून वस्तूंचा विविध प्रकारे खेळण्यासाठी वापर करतात.<br>• सृजनशीलता आणि सौंदर्यप्रज्ञा विकसित करण्यास सहाय्यक होतात. | करतील याकडे लक्ष देणे.<br>• मुलाला आपल्या आवडीच्या कोपऱ्याची निवड करण्याची संधी देणे.<br>• साहित्याची निवड ही मुलाच्या वयोमानाला अनुसरून असावी.<br>• 'करा व शिका' या कृतीमध्ये अधिक सहभागी होण्याची संधी देणे.<br>• मुलांच्या खेळाकडे आणि अध्ययनाकडे लक्ष देणे, मूल रोज एकाच कोपऱ्यापुरते सीमित राहणार नाही याची काळजी घेणे.<br>• प्रत्येक कोपऱ्यासंदर्भात मूल त्याच्या आवडीनुसार तेथून विभिन्न अनुभव घेईल अशाप्रकारे मार्गदर्शन करणे.<br>• प्रत्येक मूल दररोज किमान 30 मिनिटे आपल्या आवडीच्या कोपऱ्यात कृतीमध्ये मग्न राहील यासाठी प्रयत्न करणे.<br>• आठ कोपरे निश्चित करण्यात आले असून ते स्वतंत्र आहेत हे लक्षात ठेवणे. कोपऱ्यांमध्ये सुचविण्यात आलेले साहित्य अथवा कृती बदलता येते किंवा त्यांच्या पुनर्रचनेला वाव आहे, पण कोपरा बदलता येणार नाही.<br>• 30 मिनिटांमध्ये मूलाला एकापेक्षा जास्त कोपऱ्यांना भेट देऊन कृतींमध्ये सहभागी होण्याची संधी देण्यात आली आहे.<br>• मुलांची आवड लक्षात घेऊन वाचन कोपरा किंवा ग्रंथालयामध्ये पुस्तकांची व्यवस्था करणे व त्यांच्यामध्ये पुस्तकांविषयी प्रेम आणि मित्रत्वाची भावना निर्माण करणे.<br>• मुले वाचनालयातील पुस्तके निवडून वाचत असताना त्यांच्या शैलीकडे लक्ष ठेवणे. |




| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन | कृतींमध्ये मुलांच्या सक्रीय सहभागाद्वारे पायाभूत संख्याज्ञान मिळविण्यास आणि सभोवतालच्या परिसराशी संबंध प्रस्थापित करण्यास वाव मिळतो. | • ही कृती प्रारंभिक गणित आणि संख्यासामर्थ्याचा पाया भक्कम होण्यासाठी मुलांना वर्गामध्ये आणि वर्गाबाहेर भरपूर वाव देते.<br>• प्रत्यक्ष अध्ययन अनुभवातून शिक्षणासाठी संधी देते.<br>• भौतिक, सामाजिक, नैसर्गिक परिसराशी संवाद वाढविण्यास सहाय्यक ठरते. | • प्रारंभिक संख्यासामर्थ्य कृती खेळांच्या सहाय्याने रंजक करत नाविन्यपूर्ण बनवणे.<br>• योग्य प्रकारे रचना केलेली वर्गखोली बनविणे.<br>• नियोजित खेळ / कृतींसाठी आवश्यक अध्ययन साहित्याची स्थानिक पातळीवर जुळवाजुळव करणे.<br>• तयार करून दिलेल्या एकूण कृतींबरोबरच आवश्यकतेनुसार स्वत: कृतींची रचना करणे. |


| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | • महत्वपूर्ण बाब म्हणजे मुलांची चिंतन आणि तर्कशक्ती वाढविते.<br>• मुले 5-6 वर्षे वयोगटापर्यंत आल्यानंतर अंक, आकार, रंग, आकृतीबंध आणि जागा यांचे ज्ञान आणि अनुभव मिळविण्यास सहाय्यक ठरते.<br>• मुलांनी त्यांच्या सभोवतालच्या संख्या, कॅलेंडर, कॅल्क्युलेटर, घड्याळ, अक्षरे चिन्हे ओळखणे आणि त्यांचा वापर समजून घेण्यास येथे संधी मिळते.<br>• मुलांना कथा, लयबद्ध कविता आणि काही गाणी समजून घेता येतात. अधिकाधिक संख्यांचा समावेश असलेले खेळ, कृती आणि कोडी यांमध्ये व्यस्त राहता येते. उदा. ब्लॉक्स, रिंग, दगड इ. मोठ्यापासून लहानापर्यंत आकारमानाच्या आधारे क्रमाने जोडणे, गट करणे आणि वर्गीकरण करणे.<br>• ज्ञानेंद्रियांच्या मदतीने संवेदनांचा विकास (दृष्टी, आवाज, स्पर्श, गंध आणि चव) होतो.<br>• निरीक्षण, ओळख, स्मरण, जोडणी, वर्गीकरण, रचना (आकृतीबंध), अनुक्रमिक विचार, सर्जनशील विचार, तुलनात्मक विचार, समस्या सोडवणे, तार्किक विचार, कुतूहल, प्रायोगिकता, अन्वेषण (परीशोधन) यासारखी संज्ञानात्मक कौशल्ये विकसित होतात. | • इयत्ता दुसरी व तिसरीमधील मुलांसाठी सुयोग्य, सुधारित किंवा श्रेणीबद्ध कृती आयोजित करणे.<br>• उच्च स्तरीय ज्ञानात्मक कौशल्ये प्राप्त करण्यास मदत करणे.<br>• दिलेल्या अध्ययन निष्पत्तींना पूरक अशी उपलब्ध अध्ययन पत्रके शिक्षकांनी मुलांना देऊन ती पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन करणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | • रंग, आकार, अंतर, मापन, आकारमान, लांबी, वजन, उंची, वेळ, जागेची जाणीव व एकमेकांशी संबंध जोडण्याची संकल्पना बिंबवली जातात.<br>• मोजून सांगणे, संख्यासूचक ओळखणे आणि अनुक्रमणिकेचे ज्ञान, माहिती संग्रह, दिनदर्शिका याबद्दल समजून घेऊन संख्याज्ञान वाढविता येते. | |
| 5 | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म चलन कौशल्यांचा विकास : ही कृती मुलांच्यामध्ये सृजनशीलतेला आणि सूक्ष्म स्नायू कौशल्यांच्या विकासाला वाव देते. | • ही कृती मुलांच्या सर्वांगीण विकासाला सहाय्यकारक आहे.<br>• सूक्ष्म चलन कौशल्ये विकसित होतात.<br>• सृजनशीलतेचा विकास होण्यास वाव मिळतो.<br>• स्वत:ची जाणीव आणि इतरांच्या भावनांचा आदर करण्यास सूचित करते.<br>• सकारात्मक विचार, सौंदर्योपासना आणि<br>• सामायिकरण करण्याची / सुसंगततेची मानसिकता वाढवते.<br>• डोळे - हातांचा समन्वय वाढवते.<br>• एकाग्रता वाढविण्याबरोबरच आकार / आकारमान / आकृतीबंध / कोडी / वाळू / माती यांसह खेळण्याचा छंद वाढवते.<br>• समाजाभिमुख वर्तनातून आपल्या कल्पनेच्या पैलूंचे शाब्दिक विवेचन करत भाषाविकास / संख्याज्ञान मिळविण्यास सहाय्यक ठरते. | • मुलांकडूनच कृतींची सुरुवात करणे.<br>• सर्व कृतींमध्ये प्रत्येक मूल सहभागी होईल याची खात्री करून घेणे.<br>• प्रत्येक मूल अद्वितीय असून त्यांच्यामध्ये स्वत:ची विशिष्ट क्षमता असते हा विश्वास निर्माण करणे.<br>• कृतींमध्ये मुलांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक विकास श्रेणीबद्ध असण्याबाबत लक्ष देणे.<br>• सुलभकाराने मुलांशी चांगले संबंध ठेवणे.<br>• मुलांना कात्री, कड्या यासारख्या वस्तू देताना सुलभकाराने विशेषत: मुलांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे.<br>• मुलांना स्वावलंबी होण्यासाठी प्रेरित करणे.<br>• मुलांना सहजपणे कृती करण्यासाठी योग्य जागा देणे.<br>• मुले तणावमुक्ततेने कृतीमध्ये सहभागी होतात याची खात्री करून घेणे.<br>• सुलाभकारानी स्पष्ट सूचना देणे.<br>• सर्व वर्गांसाठी करावयाच्या उपक्रमांची पूर्वतयारी करणे.<br>• मुलांवर वापरलेले साहित्य आणणे / काढून ठेवणे आणि खराब होऊ नये यासाठी जबाबदारी दिली पाहिजे.<br>• मुलांना सूचना समजल्यानंतर त्यांना कृती करू देणे.<br>• उपक्रम करताना स्वच्छतेवर लक्ष देणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | • चांगल्या आरोग्यदायी सावयींसह अभ्यासाची सवय लावते. | |
| 6<br><br>6.1 | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता ऐकणे आणि बोलणे | साक्षरता म्हणजे केवळ वाचणे आणि लिहिणे इतकेच नाही. तर त्यामध्ये मुलाचे श्रवण कौशल्य, विषयासंबंधी त्याच्या पद्धतीने अर्थ लावणे, तार्किक चिंतन करणे आणि परिणामकारकरित्या अभिव्यक्त होणे हे अंश समाविष्ट आहेत. येथे हे अंश मूल स्वतः आपल्या जगतात कसे खुलवते आणि आपल्या सभोवतालचे जग कसे जाणून घेते हे समजून येते. शाळेत येण्यापूर्वी मुलामध्ये बाह्य जगताचा त्याच्या पद्धतीने अर्थ लावून अभिव्यक्त होण्याची क्षमता असते हे नाकारता येत नाही. अशा मुलाला त्याने मिळविलेले ज्ञान भक्कम करण्यासाठी आणि त्याचा विस्तार करण्यासाठी उपयुक्त अशा विविध कृती आणि उपक्रम असले पाहिजेत. भाषा ऐकणे आणि बोलणे हे प्रमुखांश साध्य करण्यासाठी विविध कृतींची रचना केली पाहिजे. | • भाषा शिकण्याची सुरुवात ही ऐकणे आणि बोलण्याद्वारे होते.<br>• या कृतीद्वारे परिसरातील विविध आवाज ऐकण्याची संधी देता येते. उदा. प्राणी / पक्ष्यांचे ओरडणे, वाहनांचे आवाज इत्यादी.<br>• लहान-मोठ्या शब्दातील फरक ओळखण्याची संधी उपलब्ध करून देता येते.<br>• मुलाच्या उच्चारातील दोष शोधता येतात.<br>• बालगीते / गाणी गाताना स्पष्टतेवर लक्ष केंद्रित होते.<br>• शाळेत येण्यापूर्वी मुलाने भरपूर शब्दसंपत्ती जमवलेली असते तिचा वापर करता येतो.<br>• वर्गात मुलांना अधिकाधिक ऐकण्याची आणि बोलण्याची संधी देऊन शिकण्यासाठी वातावरण निर्मिती होते.<br>• मुलाला वर्गात मुक्तपणे बोलण्यासाठी वातावरण निर्मिती होते.<br>• प्रमाणित भाषेबरोबरच स्थानिक भाषेत बोलण्याची संधी देऊन मुलामध्ये बोलण्याबाबत आत्मविश्वास निर्माण करता येतो. | • ही शिक्षकांकडून सुरु करण्याची कृती आहे.<br>• विविध बालगीते/ गाणी गाण्यास सांगणे.<br>• लयबद्ध शब्द ऐकवणे.<br>• आशुभाषण करण्यास संधी देणे.<br>• नाट्याभिनय करण्यास सांगणे.<br>• शब्दांमधील पहिले, मधील आणि शेवटचे अक्षर ऐकवणे आणि पुनरुच्चार करण्यास सांगणे.<br>• उच्चारातील प्रारंभिक ध्वनीवरून वस्तू ओळखण्यास सांगणे.<br>• शब्द रचना करून म्हणण्यास सांगणे.<br>• आवाजातील फरक ओळखण्यास सांगणे.<br>• गाळलेले अक्षर / शब्द / अंक यांचा अंदाज बांधून सांगण्यास सांगणे.<br>• अक्षरे जोडून शब्द रचण्यास आणि म्हणण्यास सांगणे.<br>• इतरांचे आवाज ऐकून बरोबर / चूक ओळखण्यास सांगणे.<br>• मुक्तपणे बोलण्याची संधी देणे.<br>• दिलेल्या विषयासंबंधी तार्किक विचार करून स्वतःच्या शब्दात व्यक्त होण्यास सांगणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | • संभाषण, अनुभवांची देवाणघेवाण, प्रश्नोत्तरे, सूचनांचा वापर, बालगीते / गाणी म्हणणे, कथा सांगणे, प्रकट वाचन, नाट्याभिनय, खेळ इत्यादी कृतींद्वारे बोलण्याची संधी मिळते.<br>• नवीन शब्दांचा परिचय आणि त्यांच्या वापरासाठी नवनवीन पद्धती वापरता येतात.<br>• या कृतीमध्ये भाषा विकासाचे विविध पैलू निर्दिष्ट कालावधीत पुनरावर्तीत करून ऐकण्याचा आणि बोलण्याचा प्रभावीपणे सराव करण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. प्रत्येक सोमवारच्या कृतींमध्ये ऐकून अर्थग्रहण होणाऱ्या कृती समाविष्ट केल्यास मंगळवार आणि गुरुवारच्या कृती ध्वनी विज्ञानाशी संबंधीत असतील. बुधवारच्या कृती अभिव्यक्ती किंवा स्व-अभिव्यक्तीसंबंधी असल्यास शुक्रवारच्या कृती शब्दसंपत्तीचा विकास आणि त्यांच्या संदर्भानुसार वापरावर आधारित असतील. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन ऐकणे आणि बोलणे परिणामकारक होते. | |
| 6.2 | आकलना सहीत वाचन | वाचन ही मूलतः समजून घेण्याची प्रक्रिया आहे आणि आकलन हा वाचनाचा अविभाज्य भाग आहे.<br>पायाभूत साक्षरतेमध्ये वाचणे आणि बोलण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि | • या कृतीद्वारे पुस्तके धरण्याची पद्धत, वाचण्यास बसण्याची पद्धत आणि पाने पलटण्यासाठी बोटांची हालचाल यांचा सराव होतो. | • मुलांना वाचनासाठी वापरण्याची विविध तंत्रे, तार्किक अंश यांचा परिचय देणे.<br>✓ पूर्वज्ञान वापरणे.<br>✓ अंदाज करणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | क्षमता आहेत.<br>प्रारंभिक टप्प्यात मुले चित्रे, प्रसंग यांची कल्पना करून मजकुराचा अर्थ आणि भावना समजून घेतात. प्रारंभिक वर्गात मुले त्यांच्या अनुभवांच्या आधारे आणि त्यांनी शिकलेल्या आवाजांच्या आधारे मजकूर वाचतात.<br>भाषा विकास आणि पायाभूत साक्षरतेचा दुसरा भाग 'आकलनासाहीत वाचन' हा असून यामध्ये विद्याप्रवेशाशी संबंधीत 16 कृती सूचित केलेल्या आहेत.<br>येथे सूचित केलेल्या कृती, सदर अभ्यासक्रमात वेगवेगळ्या दिवशी विविध पद्धतीद्वारे पुनारावार्तीत झालेल्या आहेत. | • पाठ्यांशावर नजर फिरवून मनामध्ये अर्थाचा परस्परसंबंध लावण्यास वाव मिळतो.<br>• ध्वनी आणि संकेत यांच्या समन्वयातून वाचनात तर्क लावून विसंकेतन (Decoding 1 to 30 words) करत स्पष्ट उच्चारासह शब्दावाचनाचा वेग वाढवत पुढे जाता येते.<br>• भाषेतील लय आणि यमकांचे अर्थग्रहण होते.<br>• वाचन कोपरा / ग्रंथालयामधून छापील मजकूर निवडून वाचन करत आकलन करण्याची संधी मिळते.<br>• चित्रे, संकेत आणि सूचना फलक इत्यादी साहित्य वाचून समजून घेता येते.<br>• चित्रातील वस्तू / व्यक्ती / घटनांना नावे देण्यासह, ओळखून अर्थ लावण्यासाठी चित्रांसोबत मजकूराचा सबंध जोडता येतो.<br>• अनुभव आणि पूर्वज्ञानाच्या आधारे अंदाज करण्यास वाव मिळतो.<br>• वाचनानंतर आकलन करून हावभाव आणि मूक अभिनयाद्वारे प्रतिक्रिया देता येते.<br>• आनंद, मनोरंजन आणि इतर उद्देशांसाठी स्वतंत्रपणे वाचन करण्यास वाव | ✓ प्रश्न विचारणे.<br>✓ निर्णय घेणे.<br>✓ दृश्यीकरण<br>• पुस्तकाशी संबंधीत कृतींसह छापील साहित्यची जागरुकता औपचरिकपणे अंमलात आणणे.<br>• मुद्रण कोणत्या पद्धतीचे आहे. मुद्रणात ध्वनीचा कसा समावेश आहे. मुद्रणाचा अर्थ काय याबाबत अर्थग्रहण करून वापर करणे.<br>• रोजच्या वापरातील वस्तूंवरील लोगो व लेबल, चित्र संकेत, सूचना फलक, पुस्तकाचे नाव आणि मुखपृष्ठ इत्यादी संकल्पनांबाबत मुलांना विविध प्रकारचे प्रश्न विचारून आकलनासह वाचनाची संधी देणे.<br>• उदा. या पुस्तकाचे मुखपृष्ठ कोठे आहे? चॉकलेट, बिस्कीट यांचे कव्हर, सूचना फलकावरील सूचना आणि संबंधित चित्रसंकेतासहीत मुद्रण इत्यादीवरील लिपी-संकेतांच्या ध्वनींचे आकलन करणे.<br>• हे पृष्ठ मी कोठून वाचण्यास सुरुवात करू?<br>• बालगीते/ कविता / कथा सांगून शब्द आणि उच्चारातील लय आणि यतींच्या स्थानाबाबत समजून घेणे. (कोठे थांबत वाचन करत राहावे – मराठीमध्ये यतीचे स्थान ओळखण्यासाठी लेखन चिन्ह पाहून ध्वनीच्या चढ उतारासह वाचनाचा सराव करणे.<br>• वाक्यातील 2/3 अक्षरी शब्दांमधील लयबद्ध शब्द वाचण्यास आणि प्रकटीकरण करण्यास वर्गात संधी देणे.<br>• मुलांना सभोवतालच्या परिसरातील छापील साहित्य वाचण्याचे कार्य देऊन त्यांना औपचारिक स्तरावर छोटे छोटे ग्रंथ, कथा आणि कविता यांच्यापर्यंत पोहोचविणे.<br>• विविध शब्दातील ध्वनी विभाजन करणे आणि विविध ध्वनी एकत्र करून शब्द तयार करण्यासाठी कृतींचे आयोजन करणे.<br>• वाक्यातील सुरुवातीचे / मधील / शेवटचे शब्द ओळखणे आणि |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | मिळतो.<br>• आपण वाचलेला / निरीक्षण केलेला मजकूर, कथा आणि घटनांचा स्वत:च्या अनुभवांशी परस्परसंबंध जोडता येतो.<br>• वाचलेल्या विषयांचे विश्लेषण करणे, विवरण करणे, संक्षिप्तीकरण करणे, विस्तारीकरण करणे आणि आपल्या पुर्वानुभावाशी जोडून करून स्वत:च्या भाषेत व्यक्त होण्यास सक्षम होणे साध्य होते. | विशिष्ट शब्दातील सुरुवातीची / मधील / शेवटची लिपी / ध्वनी संकेत ओळखून समजून घेण्याचे कार्य मुलांना देणे. त्याचप्रमाणे मुलांना त्यांचे प्रकटीकरण करण्याची संधी देणे.<br>• एकामागून एक परिचित शब्द लिहून त्या शब्दाला संबंधित शब्दांची यादी तयार करण्यासाठी शब्दकोडे सोडविण्याची कृती शिक्षकांनी आयोजित करणे. त्यानंतर तेथे लिहिलेले शब्द वाचून समजून घेणे आणि सराव करणे याकरिता कृती देणे.<br><br>उदा. घर हा मुख्य परिचित शब्द असल्यास कुटुंबातील सदस्य, घरातील वस्तू, घरातील खोल्या, घरातील पाळीव प्राणी इ. घराशी संबंधित शब्द लिहिणे. अशाप्रकारे घराशी संबंधित शब्द शिक्षक फळ्यावर लिहितात आणि अधिकाधिक शब्द मुलांना विचारून लिहून वाचन क्रिया सुरु ठेवतात.<br>• मुलांना व्यवस्थित दिसतील असे चित्र-शब्दांचे तक्ते प्रदर्शित करणे. त्याना संबंधित चित्रे आणि शब्द वाचण्याचा उपक्रम राबवणे.<br>• मुलांना स्वतंत्रपणे वाचण्याची संधी देणे.<br>• कथा पुस्तकांमधून चित्रे वाचण्यास प्रोत्साहन देणे.<br>• चित्रमालिकेद्वारे घटनांचा क्रम समजून घेऊन वाचण्यासाठी विविध सचित्र पुस्तके मुलांना देणे.<br>• मुलांच्या वयोमानानुसार गट करणे. विविध वाचनप्रकार वापरून वाचनाची संधी देणे.<br>उदा. सामायिक वाचन : येथे शिक्षकांनी ठळक अक्षरातील पुस्तक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | घेऊन सहाय्यक ठरेल असे मोठ्याने उच्चारत पूर्ण कविता वाचणे व मुलांनी त्यामधील शब्द स्मरणात ठेऊन सांगणे.<br>• मार्गदर्शित वाचन : येथे शिक्षकांनी मुलांना अधिक सूचना देऊन वाचण्यास संधी देणे.<br>• कृती करण्यासाठी आवश्यक अध्ययन-अध्यापन साहित्याची जुळवाजुळव अगोदरच करणे. मुख्यत: संसाधने ही स्वस्त / विनामूल्य, सहजपणे उपलब्ध असावी.<br>• आठवड्याच्या शेवटी शनिवारी त्या आठवड्यातील कृतींचे पुनरावर्तन करणे.<br>• नियमितपणे मुलांच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे. |
| 6.3 | उद्देशपूर्वक लेखन | उद्देशपूर्वक लेखन हा ऐकणे आणि बोलणे व आकलनासहित वाचन यानंतरचा टप्पा असून याद्वारे मुलांना प्रभावी संवादक बनविले पाहिजे. यासाठी येथे पायाभूत भाषा आणि अक्षरज्ञान अंतर्गत 38 कृती दिलेल्या असून उद्देशपूर्वक लेखनासाठी 8 कृती ओळखून अध्ययन केले पाहिजे. | • या कृतीद्वारे लेखनाच्या आरंभिक कौशल्यांचा सराव होतो.<br>• मुलांना लेखनाकडे वळविता येते.<br>• उत्तम चलन कौशल्ये विकसित होतात.<br>• अक्षरे, शब्द, वाक्ये ओळखून लिहिता येतात.<br>• सर्जनशील अभिव्यक्ती कौशल्ये विकसित होतात.<br>• सूक्ष्म स्नायू कौशल्ये विकसित होतात.<br>• लेखनास पूरक असलेले सूक्ष्म स्नायू बळकट होतात. हात-डोळ्यांच्या सुसंगतीने लेखन करण्याचा सराव होतो.<br>• लेखनासाठी धूळपाटी लेखन (Scrach Writing) चा वापर करता येतो.<br>• लेखनासाठी चित्रे वापरता येतात.<br>• किर्यात्मक हेतूसाठी लेखन करता येते. | • मुलांना लेखानासाठी सूक्ष्म स्नायू विकसित करण्यासाठी कार्यवाही करणे.<br>• लेखनासाठी सुरुवातीला धूळपाटी लेखन (Scrach Writing) चा वापर करणे.<br>• लेखनासाठी चित्रे वापरणे.<br>• शिक्षकांनी मुलांसमोर फळ्यावर लिहिणे.<br>• लेखनाचा योग्य क्रम पाहण्यासाठी मुलांना संधी देणे.<br>• मुलांची नावे, मुलांनी लिहिलेली चित्रांची नावे इ. मुलांसमोर लिहिणे.<br>• शिक्षकांना वर्गात काहीही लिहायचे असल्यास मुलांसमोर लिहिणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | • आपले नाव लिहिता येते.<br>• लेखन साहित्यासह अन्वेषण करता येते.<br>• लेखनात योग्य क्रमाचा अवलंब करता येतो. उदा. डावीकडून सुरुवात करून उजवीकडे संपविणे.<br>• अवधानपूर्वक ऐकत लेखन होते.<br>• लेखनाद्वारे शब्दसंग्रह वाढतो.<br>• अक्षरे, शब्द आणि वाक्ये ओळखता येतात.<br>• छपाईची पद्धत जाणून घेता येते.<br>• लेखनाद्वारे आकलन होते.<br>• ऐकून समजून घेता येते.<br>• सामायिक (उक्त/श्रुत) लेखन करता येते.<br>• निरीक्षण, कल्पना, चिंतन आणि पर्यावरण जागरुकता बिंबविता येते. | |
| 7 | मैदानी खेळ | क्रीडा विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक मनोभाव निर्माण करण्यासाठी उपयुक्त आहेत. मैदानी खेळ मनाला केवळ आनंदच नव्हे तर शारीरिक, मानसिक विकासासाठीही सहाय्यक आहेत. मैदानी खेळ विविध वयाच्या मुलांना शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य देतात. मुलांना दररोज किमान 30 मिनिटे खेळण्यासाठी वाव दिला पाहिजे.<br>मैदानी खेळ मुलांना गटांमध्ये खेळण्याची, वातावरणाचा शोध घेण्याची कला विकसित करण्यास | *मैदानी खेळ मुलांना केवळ मनोरंजन आणि आनंदच देत नाहीत तर त्यांच्या सर्वांगीण विकासाला सहाय्यक ठरतात. याबरोबरच :*<br>• स्नायूंच्या वाढ आणि विकासाला सहाय्य करतात.<br>• शरीरामध्ये रक्ताभिसरण सुलभ आणि रोगप्रतिकारक शक्ती सुधारण्यासाठी सहाय्य करतात.<br>• शरीर नियंत्रण मिळविण्यासाठी सहाय्यक ठरतात.<br>• विहित निर्णय घेण्याचे कौशल्य विकसित | • वाळू आणि पाण्याचे क्षेत्र स्वच्छ आणि सुरक्षित असल्याची खात्री करणे.<br>• मुलांच्या संख्येनुसार मैदान पुरेसे मोठे असावे.<br>• मैदानी खेळाचे साहित्य मुलांच्या संख्येच्या प्रमाणात असल्याची खात्री करणे.<br>• खेळाचे साहित्य मुलांच्या वयानुसार असल्याची खात्री करणे.<br>• खेळताना गट संवादाला संधी देणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | आणि स्नायूंचा विकास करण्यास मदत करतात.<br>मैदानी खेळांसाठी भरपूर जागा द्यावी लागते.<br>मैदानी खेळांमध्ये या 3 उपक्रमांचा समावेश आहे.<br>मुक्त खेळ : चढणे-उतरणे, बैठका, मैदानातील खेळाचे साहित्य वापरून खेळणे वगैरे.<br>रचनात्मक कृती : शारीरिक हालचाल आणि संतुलन कृती. ठराविक खेळ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली खेळणे आवश्यक आहे.<br>प्रायोगिक कृती : माती उत्खनन, झाडांची लागवड आणि इतर बागकाम. | करतात.<br>● वेळेचा सदुपयोग करण्यास सहाय्यक ठरतात.<br>● स्मरणशक्ती विकसित करण्याबरोबरच समस्या सोडविण्याचे कौशल्य विकसित करतात.<br>● संघभावना विकासाबरोबरच नेतृत्वगुण निर्माण करण्यास मदत करतात.<br>● शिस्त, संयम, सहकार्य भावना, सामाजिक बांधिलकी सुधारण्यास आणि समज विकसित होण्यास सहाय्य करतात. | |
| 8 | रंजक कथा (कथेची वेळ) | कथा कोणाला आवडत नाही? सर्वांनाच आवडते. नाही का? त्यातही मुलांना कथा खूपच आवडतात आणि त्यांना आवडीच्या कथा सांगितल्या तर! पुन्हा पुन्हा कथाच सांगा म्हणून मुले तगादा लावतात. कथा, नाटके, अभिनय हे उपक्रम अध्ययनाची विविध सामर्थ्ये वाढवितात.<br>मुले कथा ऐकत असताना स्नेह, आदर, धैर्य, सामाजोजन, गटकार्य, सहकार्य भावना इ. मूल्ये आणि गुण विकसित होणे कितीही नाकारले तरी सामान्य आहे. याशिवाय मुले कथेतील संदर्भ | ● ऐकण्याचे सामर्थ्य विकसित होण्यास मदत होते.<br>● वैचारिक क्षमता विकसित होते.<br>● अंदाज बांधण्याचे कौशल्य वाढते.<br>● सर्जनशीलता विकसित होते.<br>● प्रश्न विचारण्याची भावना वाढीस लागते.<br>● एकाग्रता वाढण्याबरोबरच जिज्ञासूवृत्ती निर्माण होण्यास मदत होते.<br>● तसे झाल्यास, तसे न झाल्यास अशा परिस्थितीची तुलना करण्याचे कौशल्य विकसित होते.<br>● अभिव्यक्ती कौशल्य विकसित होण्यासह | कोणत्या प्रकारच्या कथा निवडाव्या?<br>● कथा मुलांच्या बौद्धिक पातळीला अनुसरून असाव्या.<br>● शाळेसभोवतालच्या वातावरणाशी संबंधित असाव्या.<br>● मनोरंजनात्मक असाव्या.<br>● आवड आणि उत्सुकता निर्माण करणाऱ्या असाव्या.<br>● मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव देणाऱ्या असाव्या.<br>● काठीवरील बाहुल्या, मुखवटे आणि चित्रकथा, चित्रमालिका वापरून सांगण्यायोग्य असाव्या.<br><br>कथेची प्रस्तुती कशी असावी?<br>● कथा मुलांना परिचित असावी आणि सोप्या भाषेत सांगावी.<br>● आवाजातील चढउतारासह आणि हवभावासाहित कथा सांगावी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | आणि पात्रांची त्यांच्या स्वतःच्या अनुभावांशी तुलना करून भावनिकरीत्या सामोरे जातात. कथा सांगण्याच्या पद्धती अनेक आहेत. त्यामुळे कथा सांगणारे शिक्षक असोत अथवा पालक काही घटक लक्षात घेणे महत्वाचे ठरते.<br>येथे कथेची निवड, वैशिष्टे, कथन शैली, ऐकणाऱ्याचे वय, कथेनंतरची प्रश्नोत्तरे इत्यादी लक्षात ठेवून 'रंजक कथा' या कथेच्या वेळेचा वापर वर्गात कशारितीने करावा हे सांगितले आहे. त्याचा आढावा घेऊ.<br>एका आठवड्यात कथेच्या वेळी एक किंवा दोन कथा सांगण्याची संधी असून, परिशिष्टामध्येही काही अधिक गोष्टी दिलेल्या आहेत. जरी त्या आधीच श्रेणीबद्ध जोडलेल्या असल्या तरीदेखील आपल्या शाळेच्या वातावरणाशी आणि विद्यार्थ्यांच्या बौद्धिक स्तराशी अनुसरून पुनर्जोडणी करण्याचे आणि अधिक कथा निवडण्याचे स्वातंत्र्य शिक्षकांना आहे.<br>सामान्यपणे गाणी, कथा, नाटक, चर्चा इत्यादी कोणत्याही उपक्रमाच्या नियोजनात सहसा सुरुवातीची सतत 30 मिनिटे मुलांचे अवधान केंद्रित करणे ही तारेवरची कसरत असते.<br>त्यामुळे सुरुवातीच्या काळात कथेच्या वेळेचे नियोजन पुढीलप्रमाणे असू द्यावे. | अस्खलित बोलण्याचे कौशल्य वाढते.<br>● कथेसंबंधीची चित्रे संग्रहित करण्याची आवड निर्माण होते.<br>● अभिनय कौशल्य आणि सहकार्याची भावना विकसित होते.<br>● सभेत बोलण्याची भीती दूर होऊन सभाधिटाई (Stage Daring) वाढण्यास मदत होते.<br>● नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत होते.<br>● शिस्त, संयम, सामायापालन इत्यादी मूल्ये प्रस्थापित होण्यास मदत होते.<br>● वाचनाचा छंद वाढविण्यास आणि जोपासण्यास मदत होते.<br>● शब्दसंग्रह वाढते आणि पुस्तकी शब्दांचा परिचय देण्यास मदत होते. | ● अनौपचारिक हालचाली नसाव्या.<br>● कथा सांगताना मध्ये सोपे प्रश्न विचारून उत्तरे मिळवावी.<br>● मुलांना प्रश्न विचारण्याची संधी द्यावी.<br>● चित्रे आणि इतर साधने वापरण्याची आवश्यकता असल्यास त्यांचा वापर करूनच कथा सांगावी.<br>● कथा थांबवण्याची गरज असल्यास एका उत्सुकता वाढवेल अशा ठिकाणी थांबवून योग्य त्या सूचना द्याव्या.<br><br>पहिल्या आठवड्यात कथेचे नियोजन असे असावे?<br>● कथा निवडल्यानंतर कथेच्या सदरीकरणासाठी आवश्यक साधने तयार करून घ्यावी.<br>● पहिल्या आणि दुसऱ्या दिवशी कथा सांगावी. कथा सांगताना भाषा, हालचाली, हावभाव योग्य असावे.<br>● कथा शिल्लक राहिल्यास कथेचा अर्थ पुन्हा जाणून घ्यावा.<br>● तिसऱ्या दिवशी कथेसंबंधी वस्तू, चित्र, साधने अधिक आकर्षक करून कथा सांगावी. अशा कथा सांगत असताना दुसरी आणि तिसरीच्या वर्गातील मुलांना सोपे प्रश्न विचारून कथेतील पात्रांसंबंधी माहिती संग्रहित करा.<br>● चौथ्या दिवशी कथा वेगळ्या शैलीत सांगण्याबरोबरच सामूहिकरीत्या कथेतील पात्रे, संदर्भ यांची वैशिष्टे विचारावी.<br>● पाचव्या दिवशी मुलांना कथा सांगण्यास संधी द्यावी.<br>● सुरुवातीच्या दिवसात इयत्ता 2 री व 3 री च्या विद्यार्थ्यांना कथा सांगू द्यावी आणि हळूहळू 1 लीच्या विद्यार्थ्यांना प्रयत्न करू द्यावा.<br>अशाप्रकारे पहिल्या तीन आठवड्यात एका आठवड्याला एक कथा याप्रमाणे कथांची प्रस्तुती होते. चौथ्या आठवड्यापासून कथेच्या सादरीकरणात शिक्षक वेगवेगळ्या अभिनव पद्धतींचा व तंत्रांचा वापर करू |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ✓ वातावरण निर्मितीसाठी कोणत्याही एका वातावरणपूर्व कृतीचे आयोजन करून मुलांचे लक्ष आपल्याकडे केंद्रित करून घ्या.<br>✓ तुम्ही ठरविल्याप्रमाणे कथा सांगा.<br>✓ दर 5 किंवा 8 मिनिटांनंतर कथा सांगणे थोडावेळ थांबवून कोणतीही एक छोटी कृती करण्यास सांगा.<br>✓ उदा. टाळ्या वाजविणे / उठून बसणे / जागा बदलणे इ. ... असे केल्याने मुलांचे लक्ष केंद्रित होते. त्यानंतर कथेचा पुढील भाग सांगणे. | | शकतात. म्हणजे....<br>● काठीवरील चित्रे / कापसाच्या बाहुल्या / बोटांच्या बाहुल्या वापरून कथाकथन करावे.<br>● मुखवटे वापरून अभिनयासह कथाकथन करावे.<br>● चित्रांचा क्रम लावून कथा पूर्ण करावी.<br>● मूर्त साहित्य वापरून कथा सदर करावी.<br>● प्रत्येकाने एकेक वाक्य सांगून कथा तयार करावी.<br>● कथेच्या पात्रांवर आधारित कथा तयार करावी.<br>● कथा ऐकल्यानंतर त्यामधील छोटी संभाषणे सांगण्यास संधी द्यावी.<br>● कथा अर्ध्यावरच थांबवून त्यापुढील कथेचा भाग मुलांना पूर्ण करण्यास सांगावा.<br>● क्रमाने 3, 6, 9 आणि 12 व्या आठवड्यांमध्ये आठवड्यातील 3 दिवस इंग्रजी भाषेतील कथा सांगावी. उदा. सोमवार, मंगळवार, बुधवार. इंग्रजी ही द्वितीय/ तृतीय भाषा असल्यामुळे चित्रे, इतर साधने व योग्य तयारीसह सोप्या भाषेत कथा सांगावी. कथेतील पात्रे दोन्ही भाषेत सांगून मुलांना अर्थ समजून द्यावा.<br>● 10, 11, 12 व्या आठवड्यांच्या कथेच्या वेळी सरावाप्रमाणे कथा सांगितल्यानंतर पुन्हा एकदा कथेचे बोल वाचले पाहिजे. ते ऐकून मुलांनी कथा समजल्याची खात्री करून घेण्यासाठी सोपे प्रश्न विचारावे.<br>● मुलांना कथेतील पात्रांची चित्रे काढण्यास किंवा रेखाचित्रे काढण्यास संधी द्यावी. इयत्ता 2 री व 3 री च्या वर्गातील मुलांना पपेट शो, कार्ड आणि साधने वापरून प्रदर्शन करण्याची संधी द्यावी.<br><br>सामान्य सूचना :<br>● निवडलेल्या कथा शिक्षकांनी दोन ते तीन वेळा वाचून अर्थ सजून घेणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | • कथेसाठी आवश्यक साहित्य क्रमानुसार जोडून ठेवणे.<br>• कथेच्या सादरीकरणासाठी वापरण्याच्या पद्धतीबाबत स्पष्टता असावी.<br>• विद्यार्थ्यांना वर्तुळाकाळात बसवून त्याच वर्तुळात शिक्षकानीही बसणे.<br>• कथा आधीच परिचित असल्यास मुलांना सांगण्याची संधी द्यावी.<br>• कथा सांगितल्यानंतर मुलांना सोपे प्रश्न विचारणे आणि कथा सादर करण्यास मुलांना प्रोत्साहन देणे.<br>• कथा आपल्या पालकांना सांगण्यासाठी मुलांना प्रवृत्त करणे.<br>• वाचन कोपऱ्यात लहान लहान गोष्टीची पुस्तके ठेऊन ती मुलांना स्वतंत्रपणे घेऊन वाचण्यास सांगणे.<br>• मुलांनी संग्रहित केलेल्या चित्रमालिका किंवा चित्रकथांचे प्रदर्शन करणे. |
| 9 | पुन्हा भेटू | ही त्या त्या दिवसाच्या कृतींचे पुनरावलोकन करण्यासाठी निश्चित केलेली कृती आहे.<br>या कृतीसाठी दिवसातील शेवटच्या तासातील 20 मिनिटे राखून ठेवली आहेत.<br>येथे मुले आपल्याला मिळालेल्या संधीचा उपयोग करून घेत आपले अध्ययन सामायिक (Share) करतील.<br>मुले त्यांच्या आवडीच्या कृतींबद्दल विशेषकरून अभिव्यक्त होतील.<br>आवश्यक संकल्पनांच्या अध्ययनाबाबत स्पष्टता प्राप्त करतील.<br>त्या दिवसातील सर्व कृती आनंदाने पूर्ण झाल्याबाबत 'पुन्हा भेटू' ही कृती खात्री करून देण्याबरोबरच पुढील दिवसाच्या कृतींसाठी मुलांना प्रेरित करण्यासाठी मदत करेल. | • मुलांनी दररोज (सतत) करत असलेल्या कृतींचे पुनरावलोकन करण्यास मदत होते.<br>• अप्राप्त किंवा कमतरता असलेल्या संकल्पना ओळखून अध्ययनाला बळकटी देता येते.<br>• अभिव्यक्ती सामर्थ्य वाढविण्यास मदत होते.<br>• पुढील दिवसाच्या कृतींसाठी तयार राहण्यास मुलांना प्रवृत्त करण्यास मदत होते.<br>• शालेय अनुभव पालकांसोबत सामायिक करण्यास प्रोत्साहन देता येते. | 'पुन्हा भेटू' या कृतीचे आयोजन करण्यापूर्वी :<br>• मुलांसह शिक्षकांनी वर्तुळाकारात बसावे.<br>• त्या दिवसाचे अनुभव सामायिक करण्यासाठी मुलांना सोपे प्रश्न विचारावे.<br>• प्रत्येक मुलाला आपले अनुभव सांगण्यासाठी प्रोत्साहीत करावे.<br>• मुलांची प्रगती पालकांसोबत सामायिक करण्यासाठी दैनंदिनी ठेवावी.<br>• कोणतेही बालगीत / बडबडगीत (प्रसागीत) म्हणण्यासह दिवसभराच्या कृती पूर्ण करून मुलांना निरोप द्यावा. |
| 10 | प्रतिबिंब | प्रतिबिंब – वर्गात चालणारे सातत्यपूर्ण (निरंतर) मूल्यमापन | • प्रत्येक मुलाचा सहभाग आणि अध्ययनाचे मूल्यांकन करण्यास सहाय्य | • शिक्षकांनी आपल्या वर्गातील मुलांच्या अध्ययन प्रक्रियेचे सतत (निरंतरपणे) निरीक्षण करावे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | होते.<br>● अध्ययन कमतरता ओळखून प्रत्येक मुलाच्या गरजेनुसार शिकवण्याची पद्धत / कृती तयार करणे आणि त्यांमध्ये बदल करणे सुलभ होते.<br>● पुढील आठवड्यातील कृतींचे नियोजन करण्यास मदत होते.<br>● प्रगतीचे मूल्यमापन हे सर्व तिन्ही विकासात्मक ध्येयांमध्ये करता येते. | ● विविध पद्धतीने (निरीक्षण, विवरण (तपशील) यादी, मुलांची अध्ययन पत्रके, छापील मजकूर, ध्वनीफीत, चित्रफीत, सांदर्भिक दाखले इ.) संग्रहित केलेल्या माहितीचे परीक्षण करावे. कृती / अध्ययन अनुभवामध्ये आवश्यक बदल करावे. |
| 11 | माझी प्रगती | 'माझी प्रगती'- हे पाक्षिक मूल्यमापन असून पहिल्या आठवड्याच्या शेवटी आणि त्यानंतर प्रत्येक विषम अनुक्रमांकात येणाऱ्या (1, 3, 5, 7, 9 व 11 व्या) आठवड्यात प्राप्त केलेल्या अध्ययन निष्पत्तींचे मूल्यमापन त्या त्या आठवड्यांच्या शनिवारी करणे. | * प्रत्येक मुलाच्या वर्गात किंवा मैदानात चालणारे खेळ / कृती / अध्ययन अनुभव यामध्ये भाग घेण्याच्या पद्धतीचे अवलोकन करून प्रगतीची नोंद करणे.<br>* आवड ओळखणे आणि क्वचितच घेतल्या जाणाऱ्या किंवा सहभाग नसणाऱ्या कृती शोधून त्यामध्ये आवश्यक बदल करणे.<br>* अपेक्षित अध्ययन निष्पत्तीच्या प्राप्तीचे प्रमाण अचूकपणे नोंद करणे. | * दोन आठवड्यातून एकदा संपूर्ण पाक्षिकाच्या सर्व कृतींमध्ये मुलाच्या सक्रीय सहभाची पद्धत आणि प्राप्त केलेल्या अध्ययन निष्पत्ती दिलेल्या विवरण यादीमध्ये नोंद कराव्या.<br>'माझी प्रगती'मध्ये तीन विकासत्माक ध्येयांचे एकूण मूल्यमापन करावे. |

* विद्याप्रवेश उपक्रमात एकूण 9 दैनंदिन कृती समाविष्ट असून त्यांचे 8 खेळांच्या तासिकांमध्ये समायोजन केलेले आहे. सदर तासिका प्रत्येक आठवड्याचे सोमवार ते शुक्रवार हे पाच दिवस घ्यावयाच्या आहेत.

* 'प्रतिबिंब' ही प्रत्येक शनिवारी घ्यावयाची पुनरावर्तन आणि मूल्यमापन कृती आहे.

* 'माझी प्रगती' ही 1, 3, 5, 7, 9 आणि 11 व्या आठवड्याच्या शेवटी घ्यावयाची मूल्यमापन कृती आहे.

* मासिक प्रगती ही 4, 8 आणि 12 व्या आठवड्याच्या शेवटी महिन्यातून एकदा घ्यावयाची मूल्यमापन कृती आहे

# विद्याप्रवेश

## भाग - 2

## अध्याय – 4

### 4.1 विद्याप्रवेश – 72 दिवसांचा दैनंदिन कृती संच

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा - 1** **दिवस - 1 (सोमवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 1 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | सामर्थ्य : शुभेच्छा आणि स्वागत यासारख्या सामाजिक गोष्टींचा विकास.<br>कृतीचा उद्देश : आदराची भावना निर्माण करणे.<br>आवश्यक साहित्य : फुगे / फुले / चॉकलेट<br>पद्धत :<br>मुलांना टाळ्या वाजवत वर्गात प्रवेश करू देणे.<br>मुले वर्गात प्रवेश करत असताना शिक्षकांनी मुलांना "नमस्ते, गुड मॉर्निंग" म्हणत शुभेच्छा देणे.<br>नंतर प्रत्येक मुलाचे/मुलीचे नाव विचारून त्याचे/तिचे नाव घेत फूल/फुगा/चॉकलेट देत स्वागत करणे.<br>उदा. "गीता, तुझे स्वागत आहे, Welcome" असे म्हणत स्वागत करणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | सामर्थ्य : स्व-जाणीव, धनात्मक व्यक्तिगत संकल्पानांचा विकास, ऐकणे व बोलणे.<br>कृती – 1 : माझ्याबद्दल... (विकासात्मक ध्येय - 1)<br>कृतीचा उद्देश : स्वत:बद्दल बोलण्यास प्रोत्साहित करणे.<br>आवश्यक साहित्य :<br>पद्धत :<br>मुलांना वर्तुळाकारात थांबवणे.<br>"नमस्कार, मुलांनो सुप्रभात" (हात जोडून) असे म्हणत त्यांचे स्वागत करणे आणि तीन वेळा टाळ्या वाजवणे.<br>मुलांना "नमस्कार, टीचर सुप्रभात" (हात जोडून) असे म्हणत प्रतिक्रिया द्यावयास सांगणे आणि तीन वेळा टाळ्या वाजवण्यास सांगणे.<br>त्यांना स्वत:बद्दल बोलण्यास प्रोत्साहित करणे.<br>उदा. "महेश, तू सकाळी काय खाऊन आलास?" सलीना, तुला कोणता नाश्ता आवडतो?"<br>* 2 री च्या वर्गातील मुलांना त्यांचे नाव, पालक आणि भावंडांची नावे सांगण्यास प्रोत्साहित करणे; तर 3 री च्या वर्गातील मुलांना त्यांच्या कुटुंबाबद्दल बोलण्यास सांगणे. |
| | माझा वेळ (Free Indoor play) | वर्गातील सर्व अध्ययन कोपऱ्यांकडे शिक्षकांनी मुलांना घेऊन जाणे. प्रत्येक साहित्य आणि त्यांचा वापर याबद्दल मार्गदर्शन करणे आणि काही नमुना कृतींचा परिचय करून देणे. मुलांना प्रश्न विचारत त्यांना समजल्याची खात्री करून घेणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन | सामर्थ्य : दृष्टी, ज्ञान, स्मरण, परिसर जागरुकता<br>कृती : 1 पहा आणि सांगा. (विकासात्मक ध्येय - 3)<br>कृतीचा उद्देश : पाहिलेली वस्तू ठराविक वेळेत स्मरण करून सांगण्याचे कौशल्य विकसित करणे.<br>आवश्यक साहित्य : वर्गात किंवा स्वयंपाक खोलीत उपलब्ध असलेली फळे, भाज्या, भांडी आणि इतर उपलब्ध वस्तू.<br>पद्धत : इयत्ता – 1 ली |

| | | | |
|---|---|---|---|
| | (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | | मुलांना अर्धवर्तुळाकारात बसवणे. एकावेळी 8 ते 10 वस्तू काही मिनिटांसाठी दाखवणे आणि त्या झाकून ठेवणे. आता मुलांना पाहिलेल्या वस्तू स्मरण करून सांगण्यास सांगणे. नंतर त्या वस्तूंची चित्रे दाखवून त्यामधील पाहिलेल्या वस्तूंची चित्रे आणि न पहिलेल्या वस्तूंची चित्रे त्याचप्रमाणे परस्पर संबंध असलेली वस्तूंची चित्रे यांचे वर्गीकरण करावयास सांगणे. ही कृती नियोजनबद्ध आणि संथपणे व्हायला हवी.<br>इयत्ता – 2 री<br>त्याने/तिने पाहिलेल्या वस्तूंमधील परस्पर संबंध आणि समानता असलेल्या वस्तूंचे वर्गीकरण करणे आणि यादी तयार करण्यास सांगणे.<br>इयत्ता – 3 री<br>या कृतीला संबंधित प्रश्न विचारणे.<br>उदा . 1. वस्तूंचे कोणत्या आधारावर वर्गीकरण केले आहे?<br>2. लाल रंग असलेल्या भाजीचे नाव सांग.<br>वापरावयाची अध्ययन पत्रके (Learning Sheets) : I.L-1 (इयत्ता 1 ली, 2 री, 3री ) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | | सामर्थ्य : सूक्ष्म चालना कौशल्यांचा विकास, सर्जनशीलतेचा विकास आणि सामायीकरण<br>कृती : 37 ठसे उमटवून चित्र काढणे. (विकासात्मक ध्येय - 1)<br>उद्देश :<br>सूक्ष्म स्नायू विकसित होण्यास मदत होते.<br>एकाग्रतेतून रंगांचा परिचय होतो.<br>सामायिक करण्याची (sharing) आणि जोडण्याची वृत्ती वाढते.<br>आवश्यक साहित्य : रंग आणि कागद<br>पद्धत : दोन मुलांना प्रत्येकी एक वाटी याप्रमाणे रंग आणि कागद देणे. प्रत्येक मुलाला त्याच्या आवडीचे चित्र काढण्यास सांगणे. नंतर त्यांची तर्जनी किंवा अंगठ्याचे टोक रंगात बुडवून कागदावर ते ठसे उमटवून चित्र काढण्यास सांगणे. याचप्रमाणे अक्षरे आणि अंक यांना बोटांच्या ठशांच्या सहाय्याने रंगविणे.<br>सूचना : मुलांना पाने रंगात बुडवून कागदावर ठसे उमटवून चित्रे काढण्यास सांगणे. याचप्रकारे पाय आणि हाताचे तळवे यांच्या ठशांच्या सहाय्याने चित्रे काढण्यास सांगणे.<br>विवरण : 2 री आणि 3 री च्या वर्गाला त्यांच्या कल्पनेनुसार चित्र काढण्यास व रंगविण्यास वाव देणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : स्मरण करणे, श्रेणीबद्ध विचार करणे, शब्दसंपत्तीचा विकास, अनुभव सामायीकरण (sharing)<br>कृती : 14 अनुभव सामायीकरण. (विकासात्मक ध्येय – 2) ECL-1<br>उद्देश :<br>मुलाने स्वतः समजून घेतलेल्या गोष्टी आठवणे.<br>घटनांचा क्रम विचारात घेऊन क्रमाने मांडणी करणे.<br>आपल्या बोलण्यात नवीन शब्दांची भर घालण्याकडे लक्ष देणे.<br>आवश्यक साहित्य :<br>पद्धत : मुलांना वर्तुळाकारात डोळे मिटून बसण्यास सांगा. अगोदरचा दिवस किंवा आठवड्याचा शेवटचा दिवस कसा घालविला याचा विचार करण्यास सागाणे. नंतर सोपे प्रश्न विचारुन उत्तरे मिळविणे.<br>* तू आज किती वाजता उठलास/ उठलीस?<br>* शाळेला येताना तुझ्याजवळ काय होते?<br>* वाटेत तू काय काय पाहिलास / पाहिलेस?<br>* कालचा दिवस तू कसा घालविलास? |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | * काल कोणतीही विशेष घटना घडल्यास आमच्याशी सामायिक करशील का?<br>* काल तू मित्रांबरोबर कोणता खेळ खेळलास / खेळलीस?<br>इयत्तावार विवरण : 2 री च्या वर्गातील मुलांना सोपे प्रश्न विचारून त्यांचे अनुभव वाढविण्याची संधी देणे.<br>3 री च्या वर्गातील मुलांना मुक्त संधी देऊन आपले अनुभव क्रमबद्धतेने जोडून सांगण्यास सांगणे. मागील इतर अनुभवही सांगण्याची संधी देणे. |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य : छापील मजकूराची जाणीव, शब्द ओळखणे, आकलन, शब्द संपत्तीचा विकास आणि पर्यावरण जागरूकता.<br>कृती : 18<br>चित्र संचयीका (विकासात्मक ध्येय – 2) विषय : तुम्ही बागेत पाहिलेल्या वस्तू / विषय.<br>उद्देश :<br>चित्र वाचन करणे आणि चर्चा करून समजून घेणे.<br>आनंद, मनोरंजन आणि इतर उद्देशांसाठी स्वतंत्रपणे वाचन करणे.<br>आवश्यक साहित्य :बागेशी संबंधित चित्रे, बागेमध्ये दिसणाऱ्या वस्तूंबद्दल कथन / कविता / गाणी यांची यादी.<br>पद्धत :<br>मुलांच्या परिचयाची गाणी आणि शिशुगीतांना संबंधित चित्रे ओळखणे.<br>गाण्यातील / कथेतील विशेष शब्द ओळखून त्यांची नावे सांगणे.<br>गाणी / कथांमधील मुख्य पात्रे ओळखणे आणि पुनरावर्तीत शब्द / ओळी सांगणे / लिहिणे.<br>नमुना चित्रे (बागेशी संबंधित) वाचणे आणि त्याबद्दल प्रतिक्रिया देत शिक्षकांशी चर्चा करणे.<br>व्यक्तिगत चित्र संचयीका : कथा किंवा गाण्यातील वस्तू किंवा विशेष शब्द प्रसंग चित्रानुसार वाचून समजून घेऊन व्यक्तिगतपणे चर्चा करण्यास मुलाला सक्षम करणे. मुले चित्र प्रसंग समजून घेतील याची खात्री करणे.<br>उदा. फुले, झाडे, पक्षी, मुलांची खेळणी, आसनव्यवस्था इत्यादींची चित्रे / चित्रफिती / क्षेत्रभेटी इ.<br>शिक्षकांनी सुलभकार म्हणून कार्य करताना वापरण्याचे विकासाचे प्रश्न :<br>तुम्ही बाग पहिली आहे का?<br>तुम्ही उद्यानामध्ये काय काय पहिले आहे?<br>तुमच्या गावामध्ये असलेल्या बागेतील कोणकोणत्या प्रकारच्या वस्तू आणि विषय तुमच्या लक्षात आहेत?<br>तुमच्या आवडत्या बागेमध्ये काय काय असल्यास तुला आनंद होतो?<br>तुमच्या शाळेत सुंदर बाग तयार करावयाची असल्यास तू कोणकोणती जबाबदारी घेशील?<br>बाग तयार करण्यासाठी कोणकोणते साहित्य आवश्यक आहे?<br>अशाप्रकारे शिक्षकांनी आपल्या स्थानिक संदर्भानुसार प्रश्नावली तयार करून वर्गनियोजन करणे.<br>बागेशी संबंधित चित्रे / चित्रपट / चित्रफित / गाणी / कथा वापरून किंवा प्रदर्शित करून मुलांशी चर्चा केली जाऊ शकते.<br>यासंदर्भात शिक्षकांनी मुलांना मुक्तपणे बोलण्याची, प्रश्न विचारण्याची आणि आपल्या सोप्या भाषेमध्ये चर्चा करण्याची संधी देणे.<br>शिक्षकांनी 2 री आणि 3 री च्या वर्गातील मुलांना 1 ली च्या वर्गातील मुलांसोबत परस्पर चर्चा करण्यास सहाय्य करण्यास सांगणे आणि विषय विस्तारावर चर्चा करताना सर्व मुलांनी व्यक्त केल्याची खात्री करणे. त्याचबरोबर 2 री आणि 3 री च्या वर्गातील मुलांना त्यांच्या वयोमानानुसार विषयाच्या व्याप्तीचे उच्चतम विचार चर्चेत येतील असे वर्गनियोजन करणे.<br>*( या कृतीचा पुढील भाग 5 व्या दिवशी पुढे चालू करावा )* |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : लेखनाच्या प्रारंभिक कौशल्यांचा सराव करून घेणे, लेखनाकडे मुलांची ओढ निर्माण करणे.<br>कृती : गिरविणे (विकासात्मक ध्येय – 2) ECW-1<br>उद्देश :<br>लेखन कौशल्यांचा सराव करणे.<br>सूक्ष्म स्नायू कौशल्ये विकसित करणे.<br>आवश्यक साहित्य : फळा, खडू<br>पद्धत :<br>* मुलांना भिंतफळ्यावर आवडीनुसार गिरविण्यास / लिहिण्यास सांगणे.<br>* सर्व मुलांचे लेखन / चित्र रेखाटन पाहून प्रोत्साहीत करणे.<br>* चित्रे काढण्यास प्रवृत्त करणे.<br>इयत्तावार विवरण : 2 री व 3 री च्या वर्गातील मुलांना भिंतफळ्यावर आवडीनुसार चित्र रेखाटण्यास / लिहिण्यास सांगणे. |
| | मैदानी खेळ | | सामर्थ्य : स्थूल स्नायू चलन कौशल्य विकास, निर्णय घेणे.<br>कृती : 16 मैदानी खेळाचे ठिकाण आणि साहित्य समजून घेणे. ( विकासात्मक ध्येय - 1)<br>आवश्यक साहित्य : स्किपींग दोऱ्या, चेंडू, बॅट<br>पद्धत :<br>मुलांना खेळाचे मैदान आणि संबंधित साहित्याचा परिचय करून देणे.<br>सुरक्षा नियमांची माहिती देणे.<br>मैदानी खेळाच्या साहित्याजवळ केंव्हाही पळणे किंवा इतरांना ओढणे आणि ढकलणे या गोष्टी करू नका.<br>तुम्ही इतरांबरोबर चेंडू घेऊन खेळता तेंव्हा तुम्हाला थांबत खेळावे लागते त्यावेळी सुरक्षितपणे खेळायाला विसरू नका.<br>2 री व 3 री च्या वर्गातील मुलानाही हे नियम सांगणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शीर्षक : सिंह आणि उंदीर<br>आवश्यक साहित्य : कथेसाठी लागणारे साहित्य<br>उद्देश :<br>श्रावण क्षमता विकसित करणे.<br>अंदाज व्यक्त करण्याचे कौशल्य वाढविणे.<br>पद्धत :<br>**कथाकथन**<br>शिक्षकांनी कथा सांगण्यापूर्वी कथा वाचून अर्थ समजून घेणे.<br>कथा सांगताना शिक्षकांनी मुलांसोबत वर्तुळाकारात बसणे.<br>शिक्षकांनी योग्य हावभावासह सोप्या भाषेत कथा सांगणे.<br>सोपे प्रश्न विचारून कथा समजल्याची खात्री करणे.<br>कथा :<br>एकदा जंगलाचा राजा सिंह याला खूप भूक लागली. तो अन्नासाठी जंगलात इकडे तिकडे फिरला. खूप शोधाशोध करूनही त्या दिवशी एकही प्राणी त्याच्या नजरेस पडला नाही. जसजसा वेळ निघून गेला तसा तो खूप दमला आणि |

| | | |
|---|---|---|
| | | एका मोठ्या झाडाखाली झोपी गेला. काही वेळानंतर त्याच झाडाखाली असलेल्या बिळातून एक उंदराचे पिल्लू बाहेर आले आणि खेळू लागले. खेळता खेळता ते सिंहाच्या अंगावर नाचू लागले; त्यामुळे सिंहाची झोपमोड झाली. रागातच तो उठला आणि उंदराच्या पिलाला हातात धरून म्हणाला, "अरे उंदरा तु माझ्या एका बोटाएवढाही नाहीस, तरी तुझी माझ्या अंगावर चढण्याची हिम्मत कशी झाली? भुकेने झोपलेलो असताना तू माझी झोपमोड केली आहेस. तुला आता एकाच घासात खाऊन संपवतो." त्यामुळे घाबरलेल्या पिलाने सिहांकडे विनवणी केली, "हे जंगलाच्या राजा, माझ्याकडून नकळत चूक झाली आहे. मला सोड. मला तु खल्लास तरी तुझे पोट भरणार नाही. कृपा करून मला सोड. आज मला सोडून माझ्यावर उपकार केलास तर कधीतरी मी तुला मदत करीन." काही क्षण सिंहाने विचार केला, " मी जंगलाचा राजा, आणि तू मला मदत करणार?" उपहासाने हसत सिंहाने त्या पिलाला "जा आणि कोठेही राहा" असे म्हणत सोडून दिले.तसे ते पिल्लू जीवाच्या आकांताने पळत बिळात शिरले.<br>काही दिवसानंतर कोठूनतरी दूरवरून 'मला वाचवा, मला वाचवा' असा सिंहाच्या ओरडण्याचा आवाज त्या उंदराच्या पिलाच्या कानावर पडला. त्या आवाजाच्या दिशेने ते पळत सुटले. पाहते तर काय? सिंह जाळ्यात अडकला होता. कितीही धडपड करून त्याला त्यातून बाहेर पडता येत नव्हते. हे पाहून उंदीर म्हणाला, "महाराज, जरा थांबा, मी माझ्या तीक्ष्ण दातांनी हे जाळे तोडून तुमची सुटका करतो" आणि त्याने ते जाळे कुरतडून सिंहाची सुटका केली. जाळ्यातून बाहेर येऊन सिंहाने उंदराच्या पिलाचे आभार मानले. उंदराच्या पिलालाही आपण सिंहाने केलेल्या उपकाराची परतफेड केल्याचा आनंद झाला आणि ते आपल्या बिळाकडे निघून गेले.<br>कथा सांगितल्यानंतर सोपे प्रश्न विचारणे.<br>या कथेमध्ये असलेल्या पात्रांची नावे सांगा.<br>उंदराला खाऊन टाकेन असे सिंह का म्हणाला?<br>*(कथेचा आनंद घेण्यासह ती व्यवस्थित ऐकत असल्याबाबत खात्री करणे.)* |
| | पुन्हा भेटू | • आज पूर्ण केलेल्या कृतींचे पुनरावलोकन / स्मरण करणे.<br>• आज मुलांनी पूर्ण केलेल्या सर्व कृती पालक आणि कुटुंबातील सदस्यांसोबत सामायिक करण्यास प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने परततील यासाठी एक छोटीशी आनंददायी वातावरण निर्मितीची कृती करून मुलांना निरोप देणे.<br>• "तूच करून बघ" ही कृती करण्यासाठी नियोजन करणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 1 दिवस - 2 (मंगळवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 2 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे | कृती : 1<br>मुलांना टाळ्या वाजवत आणि चुटकी वाजवत वर्गात प्रवेश करू देणे.<br>त्यांना वर्तुळाकारात थांबण्यास सांगणे.<br>"टाळ्या वाजव, चुटकी वाजव" ही कृती करण्यास मुलांना सांगणे. कृतीचे 3 ते 4 वेळा पुनरावर्तन करण्यास सांगणे. |

| | | |
|---|---|---|
| | हितगुज) | |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती : 1 "माझे नाव..." (विकासात्मक ध्येय – 1)<br>सामर्थ्य : स्व- जाणीव , धनात्मक व्यक्तिगत संकल्पनांचा विकास, ऐकणे व बोलणे.<br>कृतीचा उद्देश : स्वत:चे नाव सांगणे.<br>आवश्यक साहित्य : मध्यम आकाराचा चेंडू किंवा कागदी गोळा<br>पद्धत :<br>मुलांना वर्तुळाकारात बसविणे. खेळ सुरु करण्यापूर्वी स्पष्ट सूचना देणे. खेळाच्या सुरुवातीला, "तुझे नांव सांग." असे विचारत सुरुवात करणे व उत्तर मिळविणे.<br>उदा. " माझे नाव ___________."<br>चेंडू एका मुलाच्या/ मुलीच्या दिशेने उडविणे. तो त्या मुलाला/ मुलीला पकडून ठेवण्यास सांगून " माझे नाव ___________, तुझे नाव काय?" असे संभाषण करण्यास सांगणे.<br>मुलाने/ मुलीने आपली पाळी पूर्ण केल्यानंतर दुसऱ्या मुलाकडे/ मुलीकडे चेंडू फेकण्यास सांगणे.<br>अशाप्रकारे ज्याच्याकडे चेंडू येतो त्याने आपले नाव सांगत सर्व मुलांसाठी कृतीचे पुनरावर्तन करणे.<br>( प्रत्येक मुलाने आपला परिचय देताना इतरांनी वाट पहावी. आपली पाळी आली की उत्तर द्यावे. ) |
| | माझा वेळ (Free Indoor play) | दिवस – 02<br>वर्गातील सर्व अध्ययन कोपऱ्यांकडे शिक्षकांनी मुलांना घेऊन जाणे. प्रत्येक साहित्य आणि त्यांचा वापर याबद्दल मार्गदर्शन करणे आणि काही नमुना कृतींचा परिचय करून देणे. मुलांना प्रश्न विचारत त्यांना समजल्याची खात्री करून घेणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : ध्वनीची जाणीव, इतरांबरोबरची संवेदनशीलता, श्रवणक्षमता<br>कृती : 3 ध्वनी ओळखणे. (विकासात्मक ध्येय – 3)<br>उद्देश : ऐकलेले ध्वनी ओळखून सांगण्याचे कौशल्य विकसित करणे.<br>आवश्यक साहित्य : परिसरात उपलब्ध असलेली वाद्ये, मोबाईल<br>पद्धत : मुलांना मैदानात घेऊन जाणे. त्यांचे डोळे बंद करण्यास सांगणे आणि विविध प्रकारची वाद्ये वाजवून वेगवेगळे आवाज काढणे. त्यांना डोळे बंद असताना ऐकू येणारे आवाज ओळखण्यास प्रोत्साहित करणे. त्यानंतर मुलांच्या अनुभवांवर चर्चा करणे. याआधारे काही मुलांना कमी किंवा काहीही श्रवणज्ञान नसते; तर काहींना तीव्र श्रवणज्ञान असते हे त्यांना सांगून त्यांच्या कानांची काळजी कशी घ्यावी याबाबत चर्चा करणे. अंघोळ केल्यानंतर लगेच कान स्वच्छ करावे. त्यासाठी पालकांची मदत घ्यावी. कान स्वच्छ करण्यासाठी कानामध्ये कोणतीही टोकदार अथवा अपायकारक वस्तू घालू नये, याबद्दलची जाणीव करून देणे.<br>इयत्ता – 2 री<br>शिक्षकांनी वेगवेगळ्या प्राणी व पक्ष्यांचे आवाज काढून ते कोणत्या प्राणी / पक्ष्यांचे आवाज आहेत हे ओळखण्यास सांगणे.<br>मुलांना प्राण्यांचे व पक्ष्यांचे आवाज काढण्यास सांगणे.<br>इयत्ता – 3 री<br>परिसरात उपलब्ध असलेल्या वाद्यांचे आवाज ओळखण्यास सांगणे.<br>माहिती असलेल्या वाद्यांची यादी करण्यास सांगणे.<br>कोणत्याही उपलब्ध वाद्यांसह बालगीते म्हणणे. |
| | सृजनात्मक कला आणि | सामर्थ्य : सूक्ष्म चालना कौशल्यांचा विकास. |

<table>
<tr><td></td><td colspan="2">सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती)</td><td>कृती : 2 काडी चित्र रचना. (विकासात्मक ध्येय - 1, 2, 3)<br>कृतीचा उद्देश :<br>टाकावू वस्तूंचा पुनर्वापर करण्याबद्दल जाणून घेता येते.<br>मानसिक क्षमता विकसित करून क्रियाशील होण्यास प्रवृत्त करते.<br>अध्ययनाची सुरुवात करण्यास सहाय्यक ठरते.<br>आवश्यक साहित्य : काड्या, कागद, डिंक<br>पद्धत : मुलांना वर्तुळाकारात बसण्यास सांगून त्यांना कागद, काड्या आणि डिंक देणे. सुलभकारानी काडीचित्राचा नमुना मुलांना दाखवून मुलांनाही आपल्या आवडीचे काडी चित्र तयार करून कागदावर चिकटविण्यास सांगणे.<br>इयत्तावार विवरण : 2 री व 3 री च्या वर्गातील मुलांना काड्यांचा वापर करून आकृती बनविण्यास सांगणे आणि त्यामधील दोन किंवा तीन काड्या काढून आकृतीची दर्शनी दिशा बदलण्याबाबत सूचना देणे.</td></tr>
<tr><td></td><td rowspan="3">भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता</td><td>ऐकणे व बोलणे</td><td>सामर्थ्य : ध्वनी संकेतांचे ज्ञान,अक्षरांचा आवाजाशी परस्परसंबंध<br>कृती : 20 नावाच्या सुरुवातीच्या अक्षरावरून वस्तू ओळखणे. (विकासात्मक ध्येय - 2) ELC-2<br>कृतीचा उद्देश :<br>ध्वनी संकेतांबद्दल जागरुकता निर्माण करणे.<br>अक्षर आणि शब्द यामधील परस्परसंबंध जाणून घेणे.<br>शब्द ऐकून ओळखणे.<br>अंताक्षरी शब्द लिहिणे.<br>आवश्यक साहित्य : नाही<br>सल्लात्मक विषय : वर्गखोलीतील वस्तू<br>पद्धत : वर्गात संकेताद्वारे वस्तूंची नावे ओळखण्याची कृती आयोजित करणे. उदा. शिक्षकांनी “माझ्या मनात एक काळ्या रंगाची वस्तू असून तिचे नांव फ अक्षराने सुरु होते.” असे सांगितल्यास मुलांनी ‘फळा’ ही वस्तू ओळखणे. अशी विविध उदाहरणे देणे.<br>वर्गवार विवरण : 2 री आणि 3 री च्या वर्गातील मुलांना शब्दांपुढील कृती म्हणून वाक्यरचना आणि सोपे वाक्यसंग्रह तयार करण्याची कृती सांगणे.<br>( या कृतीचा पुढील भाग 5 व्या दिवशी पुढे चालू करावा )<br>वापरावयाची अध्ययन पत्रके(Learning Sheets): ECL-1 ( इयत्ता 1, 2, 3 )</td></tr>
<tr><td></td><td>आकलना सहीत वाचन</td><td>सामर्थ्य : शब्दसंग्रह वाढविणे, स्वयं – अभिव्यक्ती, अभिनय वाचन<br>कृती : 1 चित्रवाचन ( विकासात्मक ध्येय - 2)<br>कृतीचा उद्देश : विविध घटना / संदर्भ यांची चित्रे पाहून घटना समजून घेणे.<br>आवश्यक साहित्य : विविध घटना / स्थळ / यात्रा / मेळावे / बाग / बाजार / शाळा / प्राणी संग्रहालय / सण इत्यादींची चित्रे.<br>पद्धत : मुलांना गटांमध्ये विभाजित करून शिक्षकांनी विविध वर्तमान पत्रे, पुस्तके, नियतकालिके, यांमधील चित्रे पाहण्यास सांगणे. त्यामधील एक चित्र / घटनेचे चित्र निवडून शिक्षकांनी त्या संदर्भाचे वर्णन करणे.<br>वर्गवार विवरण : इयत्ता 2 री आणि 3 री च्या वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षकांनी संदर्भाचे वर्णन करताना त्या वर्गातील मुलांच्या वयाचा आणि गरजांचा विचार करावा.<br>विशेष सूचना : ( हीच कृती पहिल्या आठवड्याच्या चौथ्या दिवशी पुढे चालू करावी )</td></tr>
<tr><td></td><td>उद्देश</td><td>सामर्थ्य : उत्तम चालना कौशल्ये आणि सृजनशील अभिव्यक्तीचा विकास</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | | पूर्वक लेखन | कृती : 45 दाबचित्र (विकासात्मक ध्येय - 1) ECW-2<br>कृतीचा उद्देश :<br>लेखनास पूरक असलेले स्नायू बळकट करणे.<br>दृश्य चालना कौशल्ये विकसित करणे.<br>आकार ट्रेस करणे.<br>मुलांमध्ये असलेली सृजनशील कौशल्ये विकसित करणे.<br>आवश्यक साहित्य : वर्गातील उपलब्ध साहित्य, पेपर आणि पेन्सिल<br>पद्धत : दिलेले आकार ओळखण्यासाठी नियंत्रित दृश्य चालना कौशल्ये विकसित करण्यासाठी मुलांना संधी देणे. मुलांना वस्तू, कागद आणि पेन्सिल देऊन कागदावर वस्तू ठेवण्यास सांगणे आणि वस्तूच्या कडा पेन्सिलीने रेखांकित (ट्रेस) करण्यास सांगा. या नमुन्याप्रमाणे विविध आकाराच्या वस्तूंच्या कडा रेखांकित (ट्रेस) करून नंतर आकार ओळखण्यास सांगा.<br>उदा. मुले प्रथम वर्तुळ ओळखतील, त्यानंतर चौरस, आयत ओळखतील. मुलांनी ओळखलेल्या आकाराना क्रेयॉन्स किंवा रंग देऊन रंगवण्यास सांगणे.<br>इयत्तावार विवरण : 2 री व 3 री च्या वर्गातील मुलांना वेगवेगळे नमुने देऊन ते रचण्यास आणि केलेल्या रचनेमधील योग्य ते बदल ओळखण्याची कृती आयोजित करणे. |
| | मैदानी खेळ | | कृती :लंगडीद्वारे छप्पी (जिबली) चा खेळ<br>सामर्थ्य : शरीराचे संतुलन वाढविणे.<br>आवश्यक साहित्य : छप्प्या (माती/लाकडाचे गोल तुकडे), खडू<br>पद्धत :<br>खडूच्या सहाय्याने जमिनीवर खेळासाठी लागणारी चौरसाकृती घरे आखणे.<br>मुलांनी चौरसाकृती घरांच्या रेषांना छप्पी (जिबली) चा अथवा पायांचा स्पर्श न करता लंगडी घालत छप्पी (जिबली) एका घरातून पुढच्या घरात पायाने ढकलत पुढे नेण्यास सांगणे. अशाप्रकारे खेळ सुरु ठेवणे.<br>इयत्ता 2 री आणि 3 री च्या वर्गातील मुलांनाही हाच खेळ खेळण्यास सांगणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शीर्षक: सिंह आणि उंदीर<br>आवश्यक साहित्य : चित्रमालिका<br>उद्देश :<br>ऐकण्याची क्षमता विकसित करणे.<br>अंदाज व्यक्त करण्याचे कौशल्य वाढविणे.<br>वैचारिकक्षमता विकसित करणे.<br>प्रश्न विचारण्याची भावना निर्माण करणे.<br>पद्धत :<br>**चित्रमालिका**<br>चित्रमालिकेसह विविध कार्यतंत्रांतर्गत कथेच्या वेळचा मनोरंजनात्मक पद्धतीने वापर करणे.<br>*( कथेचा आनंद घेण्यासह ती व्यवस्थित ऐकत असल्याबाबत खात्री करणे. )* |
| | पुन्हा भेटू | | • आज पूर्ण केलेल्या कृतींचे पुनरावलोकन / स्मरण करणे.<br>• आज मुलांनी पूर्ण केलेल्या सर्व कृती पालक आणि कुटुंबातील सदस्यांसोबत सामायिक करण्यास प्रोत्साहित |

| | | |
|---|---|---|
| | | करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने परततील यासाठी एक छोटीशी आनंददायी वातावरण निर्मितीची कृती करू मुलांना निरोप देणे.<br>• "तूच करून बघ" ही कृती करण्यासाठी नियोजन करणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा - 1** **दिवस - 3 (बुधवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 3 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | दिवस – 2 मध्ये दिलेली शुभेच्छा देवाणघेवाण कृती पुनरावर्तीत करणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती : 1 स्टॅच्यूचा खेळ (विकासात्मक ध्येय – 1)<br>सामर्थ्य : स्व-जाणीव, धनात्मक व्यक्तिगत संकल्पनांचा विकास, ऐकणे व बोलणे.<br>कृतीचा उद्देश : स्वत:चे नाव सांगणे.<br>आवश्यक साहित्य : ऑडीओ (संगीत) प्लेयर (मोबाईल / वाद्य)<br>पद्धत :<br>संगीत वाजवणे आणि संगीतासह मुलांना नाचण्यास सांगणे.<br>संगीत थांबले की मुलांनी लगेच मूर्तीप्रमाणे थांबावे आणि पुन्हा संगीत सुरु होईपर्यंत आहे त्या स्थितीत रहावे अशा सूचना देणे.<br>स्थिर न थांबणाऱ्या मुलाला ओळखून त्याला "हॅलो, सुप्रभात, माझे नाव ___________." असे म्हणत खेळातून बाहेर होण्यास सांगणे.<br>संगीत वाजवत कृतीचे पुनरावर्तन करणे. प्रत्येकाला आपला परिचय करून देण्याची संधी मिळेपर्यंत कृती सुरु ठेवणे. |
| | माझा वेळ (Free Indoor play) | अध्ययन तयारीचा भाग असलेल्या 8 कोपऱ्यांमधील पहिल्या टप्प्यात निश्चित केलेल्या कोपरावार कृतींबाबत आणि त्या कोपऱ्यातील साहित्य वापरण्याबाबत शिक्षकांनी मुलांना माहिती देणे. मुलांना प्रश्न विचारून समजल्याबद्दल खात्री करणे.<br>( कोपरावार सल्लात्मक कृती देऊन सामर्थ्ये प्राप्त करण्यास अनुकूल होईल अशाप्रकारे अधिक कृतींचे नियोजन करणे. )<br>********************************************************************************<br>बिल्डींग ब्लॉक्स कोपरा :<br>सामर्थ्य : डोळे आणि हात यांचा समन्वय साधने. |

कृती : वस्तूंचे वर्गीकरण

उद्देश : वस्तूंच्या आकारमानाच्या आधारे वर्गीकरण करणे.

आवश्यक साहित्य : अध्ययन संच (कीट) मधील ब्लॉक्स

(उपलब्ध असलेले साबण, काडीपेटी, पेस्ट यांचे बॉक्स किंवा पुठ्ठ्याचे बॉक्स इत्यादी)

पद्धत :विद्याप्रवेश (वि. प्र.)

विविध आकारमानाच्या वस्तुंचे आकारमानाच्या आधारे (मोठ्या / लहान) वर्गीकरण करणे.

इयत्ता 2 री व 3 री :

विविध आकारमानाच्या वस्तू आकारमानाच्या आधारे चढत्या क्रमात मांडणे.

******************************************************************************

**गणित कोपरा :**

सामर्थ्य : वस्तूंचे आकारमान, उंच-ठेंगणा, जड-हलके या आधारे वर्गीकरण करणे आणि चित्रे / संख्यांची तुलना करणे.



कृती : आकृत्यांच्या चित्रांना आकृती कार्डे जोडणे.

उद्देश : समतल आकृत्या तुलना करून जोडणे.

आवश्यक साहित्य : * विविध समतल आकृत्या असलेला चित्र तक्ता

* रंगीत कागद कापून तयार केलेल्या समतल आकृत्या



( रंगीत कागद कापून तयार केलेल्या समतल आकृत्या चित्र तक्त्यावरील आकृत्यांशी समान किंवा आकृत्यांपेक्षा लहान असाव्या.)

पद्धत : विद्याप्रवेश (वि. प्र.)

विविध आकृत्यांची चित्रे असलेला तक्ता जमिनीवर ठेऊन त्यावरील आकृत्यांशी जुळणारी रंगीत कार्डे तक्त्यावर ठेऊन जोडणे.

इयत्ता 2 री व 3 री :

तक्त्यावरील आकृत्यांशी जुळणारी रंगीत कार्डे तक्त्यावर ठेऊन जोडणे आणि वर्गात असलेल्या विविध वस्तूंशी आकृत्यांची तुलना करणे.

******************************************************************************

**अन्वेषण किंवा विज्ञान कोपरा :**

सामर्थ्य : वैज्ञानीक दृष्टीकोन, संशोधनवृत्ती आणि वैचारिक मनोभाव विकसित करणे.





कृती : रंगांचा खेळ

उद्देश : स्वतंत्रपणे कार्य करत संशोधकवृत्ती विकसित करणे.

आवश्यक साहित्य : पारदर्शक प्लास्टिक पेले,पाणी व रंग

पद्धत : विद्याप्रवेश (वि. प्र.)

पाण्यामध्ये रंग मिसळल्यानंतर होणाऱ्या बदलांचे मुलांनी निरीक्षण करणे.

इयत्ता 2 री व 3 री :

पाण्यामध्ये रंग मिसळल्यानंतर होणाऱ्या बदलांचे मुलांनी निरीक्षण करणे आणि वर्गात असलेल्या विविध वस्तूंशी बदललेल्या पाण्याच्या रंगांची तुलना करणे.

******************************************************************************

**बाहुली कोपरा :**

सामर्थ्य : सौंदर्यदृष्टी जोपासणे, व्यक्तिगत स्वच्छता, अभिव्यक्ती कौशल्य विकसित करणे.

कृती : बाहुलीची पावले... माझी पावले...

उद्देश :

स्वतंत्रपणे कार्य करण्याची क्षमता विकसित करणे.




डोळे आणि हात यांचा परस्परसंबंध विकसित करणे.

आवश्यक साहित्य : बाहुल्या, प्राणी-पक्षी यांचे नमुने, रंग, ड्रॉइंगपेपर, प्लेट

पद्धत :विद्याप्रवेश (वि. प्र.)

बाहुल्यांचे पाय रंगात बुडवून पायांचे ठसे चित्रकला पेपरवर उमटविणे.

इयत्ता 2 री व 3 री :

बाहुल्यांचे पाय रंगात बुडवून पायांचे ठसे चित्रकला पेपरवर उमटविणे आणि पायांच्या ठशांच्या मापांची तुलना करणे.

*******************************************************************************

**वाचन / वर्गवाचनालय कोपरा :**

सामर्थ्य : चित्रे वाचून समजून घेणे, कल्पनाशक्ती, अभिव्यक्ती क्षमता विकसित करणे.

कृती : चित्र वाचन

उद्देश : चित्र ओळखून स्पष्टपणे वाचणे.



आवश्यक साहित्य : प्राणी-पक्षी, वस्तू यांची चित्रे

पद्धत :विद्याप्रवेश (वि. प्र.)

चित्र ओळखणे आणि स्पष्टपणे वाचणे.

इयत्ता 2 री व 3 री :

चित्र ओळखणे आणि स्पष्टपणे वाचणेयाबरोबरच शब्दाचे पहिले अक्षर उच्चारणे.

*******************************************************************************

**कलागृह / हस्तकला कोपरा :**

सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू विकासासह सौंदर्यदृष्टी जोपासणे, सर्जनशीलता विकसित करणे.

कृती : रंगीत बोटे



उद्देश : बोटांच्या ठशांपासून नक्षीकाम (आकृतिबंध) करणे.

आवश्यक साहित्य : रंग, रेखाचित्रे, जुन्या पुस्तकातील बाहुल्यांची चित्रे (आकृत्या, प्राणी, पक्षी)

पद्धत :विद्याप्रवेश (वि. प्र.)

बोटाचे टोक रंगात बुडवून आकृत्यांच्या रेखाचित्रांच्या कडांवरून बोटांचे ठसे उमटविणे.

इयत्ता 2 री व 3 री :

बोटाचे टोक रंगात बुडवून आकृत्यांबरोबरच प्राणी-पक्षी यांच्या रेखाचित्रांच्या कडांवरून बोटांचे ठसे उमटविणे. योग्य रंगांचा वापर करणे.

*******************************************************************************

**लेखन कोपरा :**

सामर्थ्य : लेखन तयारी सरावात व्यस्त असण्याबरोबरच अक्षरांचे बंध रचणे.

कृती : "सीताफळ रंगविणे."

उद्देश : बोटांच्या साध्या हालचालींचा सराव करणे.

आवश्यक साहित्य : सीताफळ, सफेद कागद, क्रेऑन्स

| | | |
|---|---|---|
| | | पद्धत : विद्याप्रवेश (वि. प्र.)<br>सीताफळ सफेद कागदावर ठेऊन( कोरलेल्या भागावर क्रेऑन्सच्या सहाय्याने रेषा मारणे.<br>**इयत्ता 2 री व 3 री :**<br>सफेद कागदावर गुंडाळीच्या आकाराचे चित्र काढणे.<br>********************************************************************************<br>**खेळणी / करा व शिका कोपरा :**<br><br>सामर्थ्य : वैचारिक क्षमता, सर्जनशीलता, स्वतंत्र कार्य करण्याची क्षमता वाढविणे.<br>कृती : ध्येय गाठणे.<br>उद्देश : स्नायू समतोलासह विशिष्ट ध्येय साध्य करणे.<br>आवश्यक साहित्य : मोठा चमचा, चेंडू, बुट्टी, पुठ्ठा<br>पद्धत : विद्याप्रवेश (वि. प्र.)<br>मोठ्या चमच्यामध्ये चेंडू ठेवून तो खाली न पाडता चमचा हातात पकडून शरीराचा समतोल राखून धावत जावून विशिष्ट ठिकाणी ठेवलेल्या बादलीमध्ये चेंडू टाकणे. ही कृती 5 - 6 वेळा पुनरावर्तीत करणे.<br>**इयत्ता 2 री व 3 री :**<br>वरील कृती चमचाऐवजी पुठ्ठा घेऊ धावण्याचे अंतर वाढवून सुरु ठेवणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : जुळवा, रंगांची कल्पना<br>कृती : 14 रंग जुळवणी. (विकासात्मक ध्येय – 3)<br>उद्देश : रंग ओळखणे.<br>आवश्यक साहित्य : डॉमिनो कार्ड्स / विविध रंगांची रंगकार्डे<br>पद्धत : सर्व मुलांना अर्धवर्तुळाकारात बसण्यास सांगणे. प्रत्येक मुलाला एक याप्रमाणे डॉमिनो कार्ड वितरीत करणे, वर्तुळाच्या मध्यभागी विविध रंगांची डॉमिनो कार्डे ठेवणे. त्यानंतर एकाच रंगाची असलेल्या मुलांना पुढे येण्यास सांगणे. हातातील कार्डच्या रंगाशी जुळणारे वर्तुळातीलकार्ड शोधून त्यावर ते कार्ड ठेवायास सांगणे. याचप्रमाणे इतर सर्व मुलांनीही पुढे येत रंग ओळखून आपापली डॉमिनो कार्डे जुळवणे. त्यानंतर एका गटाला एकाच रंगाची कार्डे येतील अशाप्रकारे मुलांना जोडण्यास सांगणे.<br>उदा. हिरवा, लाल, पिवळा, निळा इत्यादी रंगांची कार्डे<br>इयत्ता – 2 री<br>मुलांना आपण पाहिलेल्या रंगाशी जुळणाऱ्या रंगाची कमीतकमी दोन पुस्तके दाखविण्यास सांगणे.<br>इयत्ता – 3 री<br>मुलांना आपल्या सभोवतालच्या परिसरातील लाल, हिरवा, निळा, काळा आणि पांढरा इ. रंगाच्या आपण पाहिलेल्या वस्तू / प्राणी / पक्षी / वनस्पती यांची यादी करण्यास सांगणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | सामर्थ्य : सूक्ष्म चालना कौशल्यांचा आणि सृजनशीलतेचा विकास.<br>कृती : 48 कोलाज निर्मिती. (विकासात्मक ध्येय - 1)<br>कृतीचा उद्देश :<br>सूक्ष्म स्नायू विकासाला वाव देणे.<br>मुलांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे.<br>मर्यादित जागेचे (स्थळाची संकल्पना) भान ठेवत कार्य करण्याची पद्धत समजून घेणे.<br>फाडणे, कापणे, पकडणे, चिकटविणे इत्यादी कौशल्ये प्राप्त करणे.<br>आवश्यक साहित्य : रंगीत कागद, डिंक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **पद्धत :**<br>मुलांना कागदाचे छोटे छोटे तुकडे करण्यास सांगणे. त्यानंतर ते दिलेल्या रेखाचित्रांवर (झाड, झोपडी, प्राणी किंवा इतर कोणत्याही वस्तूचे चित्र) चिकटवण्यास सांगणे. मुलांना कोणत्याही डिझाइनमध्ये कागदाचे तुकडे फाडून स्वतःचे कोलाज बनविण्याची संधी देणे. कापडाचे जुने तुकडे, इतर टाकाऊ वस्तू, पाने किंवा पाकळ्या कोलाजमध्ये चिकटविण्यासाठी वापरल्या जाऊ शकतात.<br>**इयत्तावार विवरण :** 2 री व 3 री च्या वर्गातील मुलांना हीच कृती करण्यास सांगून बनविलेल्या कोलाजचे त्यांच्या स्वतःच्या शैलीत आणि भाषेत वर्णन करण्यास सांगा. |
| | **भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता** | **ऐकणे व बोलणे** | **सामर्थ्य :** क्रियात्मक स्व-अभिव्यक्ती, ध्वनीसंकेत आणि यमक ज्ञान, पर्यावरण चेतना, शब्दसंपत्तीचा विकास<br>**कृती :** 3 गाणे, बडबडगीत, कविता, नाटक. (विकासात्मक ध्येय - 2) ELC-3<br>**कृतीचा उद्देश :**<br>ध्वनी संकेतांबद्दल जागरुकता निर्माण करणे.<br>यमक ओळखण्याचे ज्ञान मिळविणे.<br>क्रियात्मक स्व-अभिव्यक्तीला वाव देणे.<br>आपल्या सभोवतालच्या परिसराशी परस्पर संबंध निर्माण करणे.<br>**आवश्यक साहित्य :** नाही<br>**पद्धत :**मुलांना वर्तुळाकारात थांबण्यास सांगणे. शिक्षकांनी मुलांना परिचित असलेले बडबडगीत म्हणून दाखविणे व आपल्यासोबत मुलानाही म्हणण्यास सांगणे.<br>उदा. लहान माझी बाहुली ....<br>**लक्षात ठेवण्याचे मुद्दे :**<br>* मुलांना गाण्याचा आनंद मिळण्यासाठी अभिनयासह उत्साहाने गीत गाणे.<br>* मुलांना माहिती असलेले गाणे गाण्यास प्रोत्साहित करा.<br>**वर्गवार विवरण :** इयत्ता 2 री आणि 3 री च्या वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षकांचे अनुकरण करत लयबद्धतेने अभिनयासह गाण्यास सांगणे.<br>*( हीच कृती 9 व्या दिवशी पुढे चालू करावी )* |
| | | **आकलना सहीत वाचन** | **सामर्थ्य :** वाचनाकडे मुलांचा कल<br>**कृती :** वाचन कोपरा<br>**कृतीचा उद्देश :** मुलांना अध्ययनात आवड निर्माण करणे. वाचनासाठी वर्गात वातावरण निर्मिती करणे.<br>**आवश्यक साहित्य :** विविध कथांची पुस्तके, वर्तमान पत्रे, माझे वाचन कार्ड, सफेद कागद, स्केच पेन, सचित्र कोश, चित्रकथा इत्यादी.<br>**पद्धत :**<br>* मुलांना वाचन कोपर्याकडे पाठविणे.<br>* मुलांना त्यांच्या आवडीनुसार पुस्तक निवडण्यासाठी वाव देणे.<br>* पुस्तक वाचण्यास व आनंद घेण्यास प्रोत्साहित करणे.<br>**वर्गवार विवरण :** इयत्ता 2 री आणि 3 री च्या वर्गातील विद्यार्थ्यांना वाचन केल्यानंतर व्यक्त होण्यास सांगणे.<br>उदा. वाचनानंतर आपल्या आवडीचे पुस्तक / पात्र / संदर्भ / प्रसंग याबद्दल बोलणे. |
| | | **उद्देश पूर्वक लेखन** | **सामर्थ्य :** सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकास आणि उद्देशपूर्वक लेखन<br>**कृती :** 37 चित्र काढणे आणि नाव देणे (विकासात्मक ध्येय - 2) ECW-3<br>**कृतीचा उद्देश :** |

| | | |
|---|---|---|
| | | चित्र काढण्याद्वारे सूक्ष्म स्नायुंचा विकास करणे.<br>नाव देण्याद्वारे लेखन कौशल्य विकसित करणे.<br>आवश्यक साहित्य : कागद, क्रेऑन्स आणि रंगीत पेन्सिल<br>पद्धत :<br>* मुलांना आपल्या आवडीचे चित्र काढण्यास सांगणे.<br>उदा. फळ, बाहुली, खेळणी, पुस्तक, फूल इत्यादी.<br>* काढलेल्या चित्राला एक नाव देण्यास सांगणे.<br>वर्गवार विवरण : इयत्ता 2 री च्या विद्यार्थ्यांना थोडे कठीण चित्र काढण्यास सांगणे आणि 3 री च्या वर्गातील विद्यार्थ्यांना एखाद्या प्रसंगाचे सोपे चित्र काढण्यास सांगणे. |
| | मैदानी खेळ | कृती : 'तळ्यात मळ्यात' खेळ<br>सामर्थ्य : एकाग्रता वाढविणे, ऐकण्याचे कौशल्य विकसित करणे, शरीराचा संतुलन राखणे.<br>आवश्यक साहित्य : चुन्याची / शाडूची पूड<br>पद्धत :<br>चुन्याच्या पुडीने मुलांच्या संख्येनुसार एक मोठे वर्तुळ काढणे.<br>मुलांना वर्तुळाच्या रेषेबाहेर थांबण्यास सांगणे.<br>शिक्षकांनी 'तळ्यात म्हटल्यास वर्तुळात पुढे उडी मारणे, व मळ्यात म्हटल्यास मागे बाहेर उडी मारणे.<br>हा खेळ सूचना ऐकून खेळण्यास सांगणे. चुकलेल्या विद्यार्थ्याला खेळातून बाद घोषित करणे.<br>इयत्ता 2 री आणि 3 री च्या वर्गातील विद्यार्थ्यांनाही हा खेळ खेळण्यास सांगणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | शीर्षक: सिंह आणि उंदीर<br>आवश्यक साहित्य : मुखवटे<br>उद्देश :<br>ऐकण्याची क्षमता विकसित करणे.<br>अंदाज व्यक्त करण्याचे कौशल्य वाढविणे.<br>वैचारिक क्षमता विकसित करणे.<br>प्रश्न विचारण्याची भावना निर्माण करणे.<br>कथेसंबंधीची चित्रे संग्रह करण्याची आवड निर्माण करणे.<br>पद्धत :<br>मुखवटे<br>मुखवटे वापरून कथेच्या वेळचा मनोरंजनात्मक पद्धतीने वापर करणे. मोठ्या मुलांना भूमिका देऊन अभिनय करण्यास सांगणे.<br>कथा सांगितल्यानंतर सोपे प्रश्न विचारणे.<br>*( कथेचा आनंद घेण्यासह ती व्यवस्थित ऐकत असल्याबाबत खात्री करणे. )* |
| | पुन्हा भेटू | • आज पूर्ण केलेल्या कृतींचे पुनरावलोकन / स्मरण करणे.<br>• आज मुलांनी पूर्ण केलेल्या सर्व कृती पालक आणि कुटुंबातील सदस्यांसोबत सामायिक करण्यास प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने परततील यासाठी एक छोटीशी आनंददायी वातावरण निर्मितीची कृती करून |

| | | |
|---|---|---|
| | | मुलांना निरोप देणे.<br>● "तूच करून बघ" ही कृती करण्यासाठी नियोजन करणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 1      दिवस - 4 (गुरुवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 4 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | • कृती : 1<br>टाळ्या वाजवून आणि टीचकी वाजवून मुलांना वर्गात प्रवेश द्या.<br>मुलांना वर्तुळाकार थांबण्यास सांगणे.<br>"गुड मॉर्निंग मुलानो ,कसे आहात?" असे म्हणून मुलांना शुभेच्छा द्या आणि मुलांना "गुड मॉर्निंग टीचर" असा प्रतिसाद देण्यासाठी प्रोत्साहित करा . आम्ही छान आहोत , धन्यवाद ! ".<br>जोपर्यंत मुले अभिवादनांना आत्मविश्वासाने प्रतिसाद देत नाहीत तोपर्यंत कृतीकृती पुन्हा करा. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती – क्लॅप आणि क्लॅप<br>पद्धत:<br>मुलांना वर्तुळात उभे करा,<br>तालात टाळ्या वाजवण्याचा परिचय करून द्या.<br>हे काही वेळा पुन्हा करा. मग त्याच पद्धतीने, हळूहळू मुलांना तुमच्यासोबत करायला लावा.<br>नंतर सूचनेप्रमाणे त्याच लयामध्ये तुमचे नाव सांगा : "माझे नाव .................." ( टाळ्या वाजवत )<br>• मुलाला त्याच लयामध्ये त्याचे / तिच्या नावाचा परिचय करून करून देण्यासाठी त्याच पद्धतीचा वापर करण्यास सांगा.<br>प्रत्येक मुलाला त्याच्या / तिच्या नावाचा परिचय करून करून देण्याची संधी द्या. |
| | माझा वेळ (Free Indoor play) | अंमलबजावणी पद्धत :<br>* मूल त्याच्या/ तिच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जाऊन दिलेली कृती लक्षपूर्वक करत आहे याची खात्री करून घेणे.<br>*आवश्यक तेथे मुलाला योग्य मार्गदर्शन करणे.<br>* आवश्यक साहित्याच्या उपलब्धतेकडे लक्ष देणे.<br>* दिव्यांग मुलांना कोपऱ्यात जाण्यासाठी तसेच कृती सहजपणे पूर्ण करण्यासाठी मदत करणे.<br>* कृतीचे साहित्य वापरताना मुलांच्या सुरक्षिततेकडे विशेष लक्ष देणे. (तोंडात रंग टाकणे, ... फेकणे.. इत्यादी.<br>* मुलाच्या आधीच्या दिवशीच्या अपूर्ण असणाऱ्या कृती पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन करणे.<br>* शिक्षकांनी मुलाची आवड आणि सर्जनशीलता लक्षात घेवून, प्रशंसा करून आवश्यक तिथे प्रेरणा देणे.<br>* दिलेली कृती आणि साहित्य वापरून मुलासाठी अध्ययनाचे व्यासपीठ प्रदान केल्याची शिक्षकांनी स्वत: खात्री करणे.<br>* मुलांना उपक्रमांमध्ये आनंदाने सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे.<br>* मुले प्रत्येक दिवशी निर्दिष्ट केलेल्या जागेवर आणि प्रत्येक जागेवरील कृतींमध्ये व्यस्त राहतील याची काळजी |

| | | |
|---|---|---|
| | | घेणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : आकाराची संकल्पना<br>कृती – 26 आकार ओळखून त्यांना नावे देणे (विकासात्मक ध्येय : 3)<br>उद्देश:- विविध आकार ओळखा आणि त्यांची नावे द्या.<br>आवश्यक गोष्टी: विविध आकार, डफली, ऑडिओ प्लेयर, टी.व्ही<br>पद्धत: प्रत्येक मुलाला वेगवेगळ्या आकाराच्या वस्तू द्या, आकाराबद्दल गाणे/कविता लिहा किंवा गा. मुलांना गाणे / कवितेतील आकार दाखवून गाण्याची पुनरावृत्ती करू द्या. प्रत्येक मुलाला त्यांच्या समोर असलेल्या आकाराला स्पर्श करण्यास सांगा आणि नंतर मुलांना आकाराविषयी थोडक्यात बोलण्यास प्रोत्साहित करा.<br>गणित अध्ययन किटमधील आकार घेवून खेळ खेळणे.<br>वर्ग- 2<br>त्याने पाहिलेल्या विविध आकाराच्या वस्तूंची नावे सांगणे.<br>उदा: भाकरी, बशी, सूर्य / चंद्र- वर्तुळाकार, फळा- आयताकार, टेबल -चौरसाकार, गॅस सिलिंडर- वृत्तचीत्ती, वाढदिवसाची कागदाची टोपी – शंकू आकार इत्यादी.<br>वर्ग – 3<br>1. त्याला माहीत  असलेल्या आकृत्यांची नावे आणि त्यांच्याविषयी थोडक्यात बोलण्यास प्रेरित करणे.<br>2. त्याला माहीत असलेली आकृती काढायला सांगणे.<br>* वापरण्यासाठी अध्ययन पत्रके : I.L-2 &  3  ( वर्ग - 1 ली, 2 री, 3री ) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | सामर्थ्य : स्वत:बद्दल आणि इतरांबद्दल जागरूकता, तोंडी भाषा विकास, शब्द भांडार वाढवितात.<br>कृती – 2 अभिनय गीत/ नाटक  (विकासात्मक ध्येय – 1 )<br>उद्देश -<br>शारीरिक वाढ व  विकास होणे..<br>शब्द भांडार वृद्धिंगत करण्यासाठी यमक, लय, संदर्भ आणि स्पष्ट उच्चार करणे .<br>हावभाव ओळखणे.<br>साहित्य : गाणे ( टिंग टिंग टिंगाक )  :<br>टिंग टिंग टिंगाक ....... टिंग टिंग टिंगाक<br>टिंग टिंग टिंगाक ....... टिंग ... (2)<br>डोळ्यांनी पाहू सुंदर जग<br>कानांनी ऐकू गाणी मग...<br>टिंग टिंग टिंगाक ....... टिंग टिंग टिंगाक<br>टिंग टिंग टिंगाक ....... टिंग ... (2)<br>नाकाने सुगंध घेतो पटपट<br>जिभेची चव चटपट चटपट...<br>टिंग टिंग टिंगाक ..... टिंग टिंग टिंगाक......<br>टिंग टिंग टिंगाक .... टिंग ... (२)<br>त्वचेने होते स्पर्श ज्ञान,<br>देहाचे करते रक्षण छान....<br>टिंग टिंग टिंगाक ..... टिंग टिंग टिंगाक..... |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | टिंग टिंग टिंगाक ... टिंग ...(२)<br>पद्धत : मुलांना गोलाकार उभे करणे. सुलभकाराने तालबद्ध कृती पूर्ण करण्यासाठी मुलांना संधी देणे. बालगीते, अभिनय गीते, गाणी साधने वापरून किंवा हावभाव करत म्हणणे. उदा. शरीराच्या अवयवांची ओळख करून देण्यासाठी डोळे, नाक, जीभ, त्वचा आणि कान दाखविण्यासाठी वरील गीत अभिनयासाहित म्हणणे.<br>सूचना : 2 री आणि 3 री वर्गांतील मुलांना अभिनय गीते गायल्यानंतर प्रश्न विचारून उत्तर मिळविणे.<br>* सोडवायचे अभ्यास पत्रक : H. W. – 1 ( इयत्ता 1ली, 2री, 3री ) |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : ध्वनी शास्त्राबबद्दल जागरूकता, शब्दभांडाराची वृद्धी, चालना कौशल्य ( Motorskill ) विकास<br>कृती : 15 लयबद्ध शब्द ऐकणे (विकासात्मक ध्येय – 02 ) ECL – 4<br>उद्देश :<br>* ध्वनी शास्त्राबद्दल जागृती निर्माण करणे.<br>* लयबद्ध शब्दांचा शब्दभांडार वाढविणे.<br>* स्थूल आणि सूक्ष्म चालना (Motorskill) कौशल्याचा विकास करणे.<br>आवश्यक साहित्य – नाही<br>पद्धत:<br>* मुलांना परिचित असलेली बालगीते निवडणे.<br>* गाणे म्हणताना लयबद्ध शब्दांवर जोर देणे.<br>* बालगीते म्हणत अभिनयासहीत सादर करणे.<br>वर्गवार विवर : 2 री आणि 3 रीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे अनुकरण करून लयबद्धरित्या अभिनायासाहित गाणे.<br>( 8 व्या दिवसाला पुढील भाग आहे.) |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य: शब्दभांडाराची अभिवृद्धि, स्वयं अभिव्यक्ती, घटना वाचतात.<br>कृती 1: चित्र वाचा (विकासात्मक ध्येय – 2 )<br>उद्देश : विविध घटना / संदर्भाची चित्रे पाहून संदर्भाला अनुसरून काय? का? कसे? अशा प्रश्नांची उत्तरे देतात.<br>* आवश्यक साहित्य : विविध घटना / स्थळ/ जत्रेची चित्रे / बाग / बाजार / शाळा / प्राणी संग्रहालय / सण / यांची चित्रे<br>पद्धत: दुसऱ्या दिवसातील चित्र वाचन कृती चालू ठेवून मुलांचे गट करून आधी वापरलेल्या संदर्भाचे चित्र देणे. मुलांनी चित्र पाहून घटना समजून घेतील. त्यानंतर शिक्षक आजूबाजूच्या परिसराला अनुसरून प्रश्न विचारून उत्तर मिळविणे.<br>शिक्षक एखाद्या संदर्भाचे चित्र दाखवून त्यावर आधारीत खालील प्रमाणे प्रश्न विचारु शकतो.<br>* तुम्ही कधी अशा स्थळाला गेला आहात का?<br>* या संदर्भातील तुम्हाला काय काय आठवते?<br>* या चित्रामध्ये असलेल्या व्यक्ती काय करत आहेत?<br>* या चित्रामध्ये असलेल्या व्यक्ती काय खेळत आहेत? इत्यादी<br>2 री आणि 3 री वर्गांसाठी : शिक्षक विशिष्ट संदर्भासाठी तार्किक प्रश्न विचारत असताना व्यक्तिगत अभिव्यक्तीला वाव देणे.<br>विशेष सूचना : या कृतीचा पुढील भाग दुसऱ्या आठवड्यातील 8 व्या दिवशी घेतलेला आहे. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना आणि सृजनात्मक अभिव्यक्ती<br>कृती 51 : ठिपक्या जोडून रंग भरणे. (विकासात्मक ध्येय : 01 ) ECW - 4<br>उद्देश : |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | *सूक्ष्म स्नायू चालना कौशल्याचा विकास करणे.<br>*मुलांच्या सृजनात्मक अभिव्यक्तीला वाव देणे.<br>साहित्य: क्रेयॉन्स, रंगीत पेन्सिल, खडू<br>पद्धत: पाटी किंवा पेपरवर ठिपक्यांनी विविध आकार काढणे. मुलांना ते ठिपके जोडून रंग भरायला सांगणे.<br>वर्गवार विवरण : 2 री आणि 3 री च्या मुलांना ठिपके घेवून विविध आकार तयार करण्यास सांगून इयता पहिलीच्या मुलांना सोबत घेवून ठिपके जोडून रंग भरण्यास सांगणे. यासाठी मोठ्या वर्गातील मुलांच्या सहकार्याने सामुहिक कृतीचे आयोजन करणे. |
| | मैदानी खेळ | | कृती : आत बाहेर<br>सामर्थ्य : एकाग्रता वाढवितात, श्रवण कौशल्य वाढवितात, शारीरिक संतुलित विकास<br>साहित्य : काठी<br>पद्धत :<br>मुलांची संख्या लक्षात घेवून काठीच्या सहाय्याने एक मोठे वर्तुळ आखणे.<br>मुले वर्तुळाच्या रेषेच्या बाहेर उभे राहतील .<br>शिक्षकांच्या या सूचनेप्रमाणे खेळ खेळण्यास सांगणे 'बाहेर / आत'.<br>सूचनेचे पालन न करणारी मुले खेळातून बाहेर जातील .<br>2 री आणि 3 री च्या मुलांनी हा खेळ पुढे चालू ठेवावा. |
| | रंजक कथा<br>(कथेची वेळ) | | शीर्षक : सिंह आणि उंदीर<br>आवश्यक साहित्य : संभाषण असलेली दृकपट्टी / फ्लॅशकार्ड<br>उद्देश :<br>➢ ऐकण्याचे सामर्थ्य विकसित करणे.<br>➢ अंदाज बांधण्याचे कौशल्य वृद्धिंगत करणे.<br>➢ विचारशक्ती विकसित करणे.<br>➢ प्रश्न विचारण्याच्या वृतीचा विकास करणे.<br>➢ गोष्टीशी संबंधित चित्रांचा संग्रह करण्याची आवड निर्माण करणे.<br>➢ अभिव्यक्ती कौशल्य विकसित करणे.<br>➢ अस्खलित बोलण्याचे कौशल्य विकसित करणे.<br>पद्धत :<br>**पात्राभिनय**<br>➢ शिक्षकांनी गोष्टीचे पुनरावलोकन करणे.<br>➢ गोष्टीचा सारांश सांगण्यासाठी दुसरी आणि तिसरीच्या मुलांना मदत करणे.<br>➢ फ्लॅशकार्ड घेवून पात्रांचे संभाषण सांगणे.<br>➢ मुलांनी कथा सांगताना चूक केल्यास चूक सुधारून त्यानंतर योग्य कथा पुढे चालू ठेवण्यास मदत करणे. |
| | पुन्हा भेटू | | ● दिवसभरात केलेल्या कृती पुनरावर्तीत करणे.<br>● दिवसभरात केलेल्या कृती पालकांशी तसेच कुटुंबातील इतर सदस्यांसोबत चर्चा करण्यास प्रोत्साहित करणे.<br>● दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत, यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना निरोप देणे.<br>● 'तू करून बघ' ही कृती करण्यासाठी योग्य योजना आखणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा – 1 दिवस –5 (शुक्रवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 5 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | पद्धत – 4 थ्या दिवशी घेतलेली कृती 1 पुनरावर्तीत करणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | दिवस 4 था मधील गुजगोष्टी या विभागातील कृती पुन्हा करणे. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुले आपल्या आवडत्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करणे.<br>शिक्षकाने नियमावलीप्रमाणे / मार्गदर्शकाप्रमाणे कार्य करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य: वर्गीकरण, परिसराबद्दल जागरुकता<br>कृती 17 : गट करणे. (विकासात्मक ध्येय - 3)<br>उद्देश : - वस्तूंचे भौतिक लक्षणावर आधारित वर्गीकरण करणे<br>आवश्यक साहित्य : वेगवेगळ्या प्रकारचे ब्लॉक, बटणे, गोट्या, नट, अंगठ्या, खेळणी/ गणित अध्ययन कीट<br>पद्धत : वस्तूंच्या भौतिक लक्षणावर आधारित तुलना करा आणि त्यावर आधारित वस्तूंचे गटामध्ये विभागून, त्यांच्यामधील फरक जाणून घेणे.<br>उदा. : विविध प्रकारचे ब्लॉक, बटने, गोळ्या, नट, बिया, अंगठ्या यांचे आकार, आकारमान, रंग यांच्या आधारे वेगवेगळ्या गटांमध्ये वर्गीकरण करणे.<br>या प्रक्रियेचा अनुभव घेतल्यानंतर, कोणत्या लक्षणांच्या आधारे गटांमध्ये वर्गीकरण केले आहे ते जाणून घेवू.<br>इयत्ता दुसरी –<br>1. शाळेमध्ये उपलब्ध असलेल्या विविध वस्तू आणि खेळाच्या साहित्यांचे आकार, आकारमान आणि रंगांच्या आधारे वर्गीकरण करून दाखविणे.<br>2. वस्तू कोणत्या आधारे वर्गीकृत केलेल्या आहेत?<br>इयत्ता तिसरी –<br>बॉल, अंगठी, चिंचोके, गोळ्या, मणी इत्यादी वस्तू दाखवून त्यांचे नाव आणि भौतिक लक्षणांबदल सांगणे.<br>सोडवायची अध्ययन पत्रके : I.L-4 ( इयत्ता 1 ली, 2 री, 3री ) |
| | सृजनात्मक | सामर्थ्य: सूक्ष्म चालना कौशल्यांची अभिवृद्धि आणि सृजनशीलतेचा विकास |

| | | | |
|---|---|---|---|
| | कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | | कृती 35 : माती किंवा पीठापासून आकार / वस्तू तयार करणे.   (विकासात्मक ध्येय – 1)<br>उद्देश :<br>सूक्ष्म स्नायूंची हालचाल वृद्धिंगत करणे.<br>डोळे आणि हातांचा समन्वय साधणे .<br>मुलांच्या कल्पनेतील आकार तयार करण्याबरोबरच सृजनशीलतेच्या अभिव्यक्तीसाठी साठी मदत करणे.<br>आवश्यक साहित्य : चिखल किंवा मळलेले पीठ<br>पद्धत : मुलांना चिखल / मळलेले पीठ देवून त्यापासून त्यांच्या इच्छेने नमुने तयार करण्यास सांगणे. सणांना संबधित पणती इत्यादी सारख्या वस्तू तयार करून त्यांना रंगवायला सांगणे. मुले माती अथवा मळलेले पीठ वापरून वस्तू तयार करण्यासाठी सुलभकारांनी निरीक्षण करून सहकार्य करणे. कृती पूर्ण झाल्यानंतर मुलांनी तयार केलेल्या आकार/ वस्तूचे त्यांच्या भाषेत वर्णन करणे. सुलभकार मुलांना वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू तयार करण्यासाठी लहान धार नसलेला प्लास्टिक चाकू, साचा, लाटणे,फुले, रंग यासारखी इतर साधने देवू शकतात. आकार / वस्तू वैविध्यपूर्ण करण्यासाठी बिया, चित्रे, दगड,शिंपल्या इत्यादी द्यावेत. कृतीच्या नंतर मुले आपले हात स्वच्छ करतील याची काळजी घेणे.<br>टीप : इयत्ता 2 री आणि 3 री साठी विविध विषयानुसार ( सण, समारंभ, स्वयंपाक खोलीतील उपकरणे ) मॉडेल तयार करणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य: लक्षपूर्वक ऐकणे, सृजनात्मक विचार, परिसर जागरूकता निर्माण करणे.<br>कृती 5 : शब्द ओळखणे (विकासात्मक ध्येय - 2)   ECL-5<br>उद्देश:<br>* प्रश्न विचारण्यासाठी मुलांमध्ये श्रवण कौशल्याचा विकास करणे.<br>* औपचारिक संभाषणाचे कौशल्य विकसितकरणे.<br>* श्रवण केलेल्या मुद्द्यांवर आपले मत व्यक्त करणे.<br>* सृजनशील स्व-अभिव्यक्तीला वाव देणे.<br>* आजूबाजूच्या परिसराविषयी जागरूकता निर्माण करणे.<br>पद्धत : मुलांना वर्तुळाकारात बसविणे.<br>होय/ नाही यावर आधारित प्रश्न विचारून विचार करून शब्द कसा शोधायचा हे दाखविणे.<br>उदा : मुलांना विचार करून सांगण्यासाठी प्रोत्साहित करणे. समजा हा आंबा आहे. अशा पद्धतीचे प्रश्न विचारण्यास व विचार करून उत्तर देण्यास प्रेरित करणे. शिक्षक 'आंबा' या शब्दाला अनुसरून होय/ नाही उत्तर येईल असे प्रश्न विचारतील.<br>उदा: ही वस्तू आहे का? हे फळ आहे का? ही भाजी आहे का? हा प्राणी आहे का? ही व्यक्ती आहे का?<br>हे हालचाल करते का?<br>हे वर्गात आहे का?<br>हे जंगलात मिळते का?<br>मुलांना या कृतीचा परिचय करून दिल्यानंतर या पद्धतीने बरोबर उत्तर येईपर्यंत प्रश्न विचारत राहणे.<br>टीप : 3 री चे विद्यार्थी वरीलप्रमाणे स्वत: प्रश्न  विचारतील आणि 2 रीचे विद्यार्थी त्यांना योग्य असे उत्तर देतात. |
| | | आकलना सहीत | सामर्थ्य: छापील मजकूराची जाणीव , शब्द ओळख, आकलन, शब्द भांडाराची वृद्धी आणि पर्यावरण जागरूकता.<br>कृती : 18  चित्र संचयिका    (विकासात्मक ध्येय - 2) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वाचन | विषय : 'तुम्ही बागेत पाहत असलेल्या वस्तू / गोष्टी'.<br>उद्देश:<br>मुलांनी चित्र पाहणे आणि चर्चा करून अर्थ समजून घेवून व्यक्तिगत संचयिका तयार करणे.<br>अनुभव आणि पूर्वज्ञानावर आधारित कल्पना करणे / अंदाज बांधणे.<br><br>आवश्यक साहित्य : कागद,क्रेयॉन्स, डिंक, बागेशी संबंधित चित्रे, गोष्टी, कविता, गाण्यांची यादी<br>पद्धत : मुलांना परिचित असलेली गाणी आणि बालगीतांना संबधित चित्रे निश्चित करणे.<br>गाणे / कथेमध्ये असलेले वेगळे / विशेष शब्द ओळखून सांगतील. मुलांनी सुचविलेले शब्द शिक्षकांनी फळ्यावर लिहतील. त्या शब्दांवर चर्चा करतील. आणि संबंधित परिचित शब्दांच्या आधारे शब्दकोश फळ्यावर किंवा तक्त्यावर लिहून चर्चा करतील.<br>मुलांना पेपर, क्रेयॉन्स आणि इतर संबधित साहित्य देवून बागेचे चित्र पाहून किंवा बागेमधील आधीच्या अनुभवावर आधारीत मुलांना चित्र काढण्यास आणि त्यामध्ये रंग भरण्यास प्रेरित करतील.<br>व्यक्तिगत चित्र संचयिका :<br>मुलांनी काढलेली चित्रे त्यांच्या व्यक्तिगत चित्र संचायिकेत संग्रहित करायला सांगणे आणि त्यांना पुढे 6 व्या दिवशी चर्चा करण्यास सांगणे.<br>उदा : फुले झाडे, पक्षी, मुलांची खेळण्याचे साहित्य, बसण्याचे बाक इत्यादी.. चित्रे / व्हिडीओ / क्षेत्रभेटीच्या अनुभवावर आधारीत मुले व्यक्तिगतरित्या चित्र काढतील याची काळजी घेणे.<br>बागेशी संबंधित चित्रे / व्हिडीओ / गाणी / गोष्टी वापरून किंवा दाखवून मुलांसोबत चर्चा करता येईल.<br>शिक्षकांनी 2 री आणि 3 री च्या मुलांना, 1 ली च्या मुलांसोबत परस्पर सहकार्य करण्यास सूचना करणे आणि विस्तारितरित्या चर्चा करताना सर्व मुलांच्या अभिव्यक्तीला वाव मिळेल याची खात्री करणे. तसेच 2 री आणि 3 री च्या मुलांना स्वतंत्रपणे आणखी चित्रे काढून रंग भरण्यास वाव देऊन त्यांना देखील चित्र संचायिकेत संग्रहित करण्याची संधी देणे.<br>( सदर कृतीचा पुढील भाग 7 व्या दिवशी चालू ठेवणे. ) |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य: हात आणि डोळ्यांमधील सुसंगतता<br>कृती 52 : चित्र काढा (विकासात्मक ध्येय – 1 ) ECW– 5<br>उद्देश:<br>सूक्ष्म चालना कौशल्याचा विकास करणे.<br>हात आणि डोळ्यांमधील सुसंगतता विकसित करणे<br>आवश्यक साहित्य : फळा / पाटी, खडू<br>पद्धत : मुलांना विविध चित्रे / आकृती काढण्यास वाव देणे. त्यांच्या कल्पनेतील चित्र काढण्यास सांगणे. मुलांना योग्य वाटतील ती चित्रे काढून रंग भरण्यास सांगणे. मुलांच्या सृजनात्मकतेला वाव द्यावा. शिक्षकांनी आपले विचार मुलांवर लादू नयेत.<br>टीप : 1 ली च्या मुलांनी काढलेल्या चित्र / आकृतीला 2 री च्या मुलांनी नाव सुचविणे. 3 री च्या मुलांनी चित्राला अनुसरून 1-2 वाक्ये बोलणे. |
| | मैदानी खेळ | | कृती : डोळ्यावर पट्टी बांधणे<br>सामर्थ्य: सूक्ष्म वृत्ती, शोध वृत्ती विकसित करणे.<br>पद्धत: |

| | | |
|---|---|---|
| | | एका मुलाच्या डोळ्यांना पट्टी बांधणे व सर्व मुलांना लपण्यास सांगणे .<br>लपल्यानंतर त्या मुलाने पट्टी सोडून निर्धारित वेळेत इतरांना शोधणे.<br>पट्टी बांधलेल्या मुलाला सर्वात आधी जो सापडतो त्याने हा खेळ पुढे चालू ठेवणे.<br>2 री आणि 3 री ची मुले हा खेळ स्वत: खेळत राहतील. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | कथा सांगणे ही एक रोज चालणारी कृती आहे. ही कृती मुलांना छापील साहित्याबद्दल जागृती, शब्दभांडार वृद्धिंगत करणे, श्रवण कौशल्य आणि प्रमाण भाषेतील शब्द समजून घेण्याबरोबरच नितीमुल्ये आणि संस्कार शिकविते.<br>गोष्टीचे शीर्षक : सिंह आणि उंदीर<br>आवश्यक साहित्य : संभाषण असणारे फ्लॅशकार्ड<br>उद्देश:<br>➢ विचारशक्ती वाढविणे.<br>➢ ऐकण्याचे सामर्थ्य वृद्धिंगत करणे.<br>➢ अंदाज बांधण्याची वृत्ती वाढविणे.<br>➢ प्रश्न विचारण्याच्या वृत्तीचा विकास करणे.<br>➢ गोष्टीशी संबंधित चित्रे संग्रहित करण्याची आवड निर्माण करणे.<br>➢ अभिव्यक्ती कौशल्याचा विकास करणे.<br>➢ अस्खलित बोलण्याचे कौशल्य विकसित करणे.<br>पद्धत :<br>**पात्राभिनय**<br>➢ शिक्षकांनी गोष्टीचे पुनरावलोकन करणे.<br>➢ गोष्टीचा सारांश सांगण्यासाठी दुसरी आणि तिसरीच्या मुलांना मदत करणे.<br>➢ फ्लॅशकार्ड घेवून पात्रांचे संभाषण सांगणे.<br>➢ मुलांनी कथा सांगताना चूक केल्यास चूक सुधारून त्यानंतर योग्य कथा पुढे चालू ठेवण्यास मदत करणे. |
| | पुन्हा भेटू | • दिवसभरात केलेल्या कृती पुनरावर्तीत करणे.<br>• दिवसभरात केलेल्या कृती पालकांशी तसेच कुटुंबातील इतर सदस्यांसोबत चर्चा करण्यास प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत, यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना निरोप देणे.<br>• 'तू करून बघ' हि कृती करण्यासाठी योग्य योजना आखणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 1 दिवस –6 (शनिवार)

| | |
|---|---|
| प्रतिबिंब (वर्गातील निरंतर मूल्यमापन) | • विविध तंत्र वापरून (निरीक्षण, तपशील पट्टी, मुलांची अध्ययन पत्रके, व्हिडीओ, सांदर्भिक नोंदी, इत्यादी) तुम्ही संग्रह केलेल्या मूल्यमापन नोंदी/माहिती यांचे पुनरावलोकन करणे.<br>• प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिगत गरजेनुसार पुढील आठवड्यातील अध्ययन प्रक्रियेची योजना आखणे.<br>• अध्ययनाच्या तिन्ही विकासात्मक ध्येयांच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे. |

# माझी प्रगती-1

**आठवडा - 1** **दिवस –6 (शनिवार)**

| प्राप्त केलेल्या अध्ययन निष्पत्ती | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती | क्वचित | कधीतरी | नेहमी |
| 1 | शाळेच्या दैनंदिन कृतींशी जुळवून घेतो/ घेते. | | | |
| 2 | शाळेला आनंदाने येतो/ येते. | | | |
| 3 | शिक्षकांना व वर्गमित्रांना अभिवादन करतो/ करते. | | | |
| 4 | सामुहिक कृतीमध्ये उत्साहाने सहभागी होतो/ होते. | | | |
| 5 | साध्या सूचनांचे पालन करतो/ करते. | | | |
| 6 | आपल्या आजूबाजूच्या परिसराविषयी कुतुहूल दाखवितो/ दाखविते. | | | |
| 7 | चिखल / पिठापासून प्रतिकृती तयार करण्याचा आनंद घेतो/ घेते. | | | |
| 8 | एकाच प्रकारच्या वस्तूंचा गट करतो/ करते. | | | |
| 9 | इंद्रियांच्या सहाय्याने वस्तू ओळखतो/ ओळखते. | | | |
| 10 | लयबद्ध कविता/बालगीतांचा आंनद घेतो/ घेते. | | | |
| 11 | चित्रफितीतील वस्तूंची नावे ओळखतो/ ओळखते. | | | |
| 12 | विचार व्यक्त करण्यास घाबरतो/ घाबरते. | | | |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा -2** **दिवस –7 (सोमवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 7 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती 1 : चला उडूया पक्ष्याप्रमाणे<br>साहित्य: ड्रम<br>पद्धत:<br>पक्ष्याप्रमाणे उडण्याची नक्कल करत वर्गात प्रवेश करण्यास विध्यार्थ्यांना सांगणे व शिक्षकांना "हाय टीचर" असे म्हणण्यास सांगणे.<br>शिक्षकाने हॅलो.............(विध्यार्थ्याचे नाव )घेत त्यांचे स्वागत करणे.<br>● Left right left असे म्हणत मार्च पास्ट करत वर्गात वर्तुळाकार थांबण्यास सांगणे. कृती आकर्षक वाटावी यासाठी ड्रम चा वापर करावा. (विद्यार्थी आपले गुडघे व्यवस्थितरित्या वाकवितात याची खात्री करा तसेच त्यांचे पाय जमिनीला स्पर्श करत आहेत याचीही खात्री करा)<br>कृती 2: लाल, पिवळा, हिरवा ( ट्राफिक सिग्नल)<br>आवश्यक साहित्य : ट्राफिक सिग्नलचे मॉडेल / लाल, पिवळा, हिरव्या रंगाचे कार्ड्स<br>● ही कृती दिलेल्या सूचनांचे पालन करत वर्तुळाकार उभे राहून करावी.<br>● "पिवळा दिवा" असे ऐकल्यानंतर / पाहिले असता विद्यार्थी वर्तुळाकार चालतील.<br>● 'हिरवा दिवा' असे ऐकल्यानंतर/पाहिले असता पक्ष्याप्रमाणे विद्यार्थी उडण्याची नक्कल करतील.<br>● 'लाल दिवा' असे ऐकल्यानंतर/ पाहिले असता एकाच जागी थांबून हसतील.<br>● ही कृती 3-4 वेळा करावी. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | पहिल्या दिवसाच्या गुजगोष्टी करणे. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुले आपल्या आवडत्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करणे.<br>शिक्षकाने मार्गदर्शकाप्रमाणे कार्य करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : शब्दांची ओळख, स्मरण आणि पर्यावरणाची जाणीव.<br>कृती 2 : ऐक व सांग (विकासात्मक ध्येय – 3)<br>उद्देश : विविध ध्वनी ऐकणे.<br>आवश्यक साहित्य: मोबईल,टेप रेकॉर्डर<br>पद्धत: मुलांना विविध गटात बसण्यास सांगणे. प्रत्येक गटातील विद्यार्थी श्रवण उपकरणांच्या सहाय्याने प्राण्यांचे आवाज ऐकून ते आवाज कोणत्या प्राण्याचे हे ओळखणे.प्रत्येक विद्यार्थ्याला संधी मिळेपर्यंत कृती सुरु ठेवणे.<br>वर्ग – 2, 3<br>1. शिक्षकाने विविध प्राणी व पक्ष्यांचे आवाज काढून ते ओळखण्यास सांगणे.<br>2. प्राणी व पक्ष्यांच्याआवाजाची नक्कल करण्यास सांगणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्ये व सृजनशीलता यांचा विकास, डोळे व हात यांच्यामधील समन्वय, आकारांची कल्पना.<br>कृती 33 – ट्रेस करणे ( वाळूमध्ये ) ध्येय – 1<br>उद्देश<br>सूक्ष्म स्नायूंची वाढ होते.<br>डोळे व हात यांच्यामधील समन्वय साधणे .<br>लेखनासाठी पूरक कृती होते.<br>साहित्य – वाळू<br>पद्धत: मुलांना एका ट्रे मध्ये वाळू देणे. वाळूवरती लिहिण्यासाठी लहान काडी देणे. वाळूवरती विविध वक्राकार रेषा काढण्यास सांगणे.<br>विवर: इयत्ता 2 व 3 री च्या मुलांना सरळ रेषा व वक्राकार रेषा वापरून आपल्याला आवडते चित्र काढण्याची संधी देणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य :श्रवणकौशल्य, सृजनशीलता, स्व-अभिव्यक्ती, औपचारिक संभाषण<br>कृती: 8 उत्स्फूर्त भाषण (विकासात्मक ध्येय - 2) ECL–6<br>उद्देश :<br>* निवडलेल्या विषयावर अस्खलितपणे बोलणे.<br>* औपचरिक संभाषणाचे कौशल्य विकसित करणे.<br>* श्रवण केलेल्या मुद्द्यांवर आपले मत व्यक्त करणे.<br>* सृजनशील स्व-अभिव्यक्तीला वाव देणे.<br>आवश्यक साहित्य: प्राणी, पक्षी, वाहने यांची चित्रे/दृकपट्या, डब्बा/बॉक्स<br>पद्धत: डब्ब्यामध्ये प्राणी, पक्षी, वाहनेयांची चित्रे/दृकपट्या ठेवणे. मुलांना एक दृकपट्टी उचलण्यास सांगणे व त्यामधील असलेल्या चित्रावर आपले मत व्यक्त करण्याची संधी देणे.<br>इयत्तावर विवरण : इयत्ता 2 रीच्या मुलांना 2-3 मिनिटांचा अवधी देणे.<br>इयत्ता 3 रीच्या मुलांना निवडलेल्या विषयासंबधी दैनंदिन वापर ,फायदे/तोटे इ.अंशावर बोलण्यास सांगणे. |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य: मुद्रित पाठाची ओळख, शब्द ओळखणे, अर्थग्रहण, शब्द्संपतीची वृद्धी आणि पर्यावरणाची जाणीव<br>कृती : 18<br>चित्र संग्रह ( विकासात्मक ध्येय - 2) विषय: तुम्ही पाहिलेल्या बागेतील वस्तू.<br>उद्देश: चित्रातील वस्तू/व्यक्ती/घटनाना नावे देणे,अंदाज बांधणे, समजून घेवून पाठ्यक्रमाशी संबध जोडणे.<br>मुलांनी चित्र वाचून चर्चा करणे, अर्थ समजून घेवून व्यक्तिगत चित्रसंग्रह तयार करणे.आणि व्यक्तिगत तसेच समूहामध्ये सादरीकरण करणे. गटामध्ये बसून भित्तीपत्रके तयार करणे.<br>आवश्यक साहित्य: मुलांनी स्वत: काढलेली चित्रे.<br>पद्धत: ‘तुम्ही पाहिलेल्या बागेतील वस्तू/विषयासंबंधी मुलांनी काढलेली चित्रे कृती संचयीका मधून काढून त्यावर सहजरीत्या बोलण्यास प्रोत्साहित करणे. शिक्षकांनी 2 री व 3 री च्या मुलांनी 1 लीच्या मुलांना सोबत घेवून विषयावर विस्तृत चर्चा करणे. चर्चेदरम्यान सर्व मुलांनी मत व्यक्त केल्याची खात्री करणे. तसेच 2 री व 3 री च्या मुलांना स्वतंत्ररित्या बोलण्यास संधी देणे.<br>(तुम्ही पाहिलेल्या बागेतील वस्तू/विषयासंबंधी- या कृतीचा पुढील/उर्वरित भागच 11 व्या दिवशी पुढे सुरु ठेवणे.) |
| | | उद्देश पूर्वक | सामर्थ्य: प्रारंभिक लेखन कौशल्ये, लेखनाकडे कल वाढविणे.<br>कृती : पहा व रेखाटा ((विकासात्मक ध्येय - 2) ECW–1 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | लेखन | उद्देश<br>* लेखनाचे प्रारंभिक कौशल्ये रुजविणे.<br>* लेखनाविषयी आवड / कल वाढविणे.<br>* आवश्यक साहित्य: वर्तमान पत्रे, रिकामी पाने, क्रेयॉन्स पेन्सिल इत्यादी.<br>पद्धत: मुलांना वर्तमान पत्रे/ रिकामी पाने देणे. त्यांना त्यांच्या इच्छेनुसार रेखाटण्यास /लिहिण्यास सांगणे. सर्व मुलांनी लिहिलेले/ रेखाटलेले चित्र सर्वांना दाखवून प्रोत्साहित करणे. 2 री व 3 री च्या मुलांना अक्षर/अंक वापरून चित्र रेखाटण्यास प्रेरित करणे.<br> |
| | मैदानी खेळ | | कृती: बुट्टीमध्ये चेंडू फेक (विकासात्मक ध्येय - 1)<br>सामर्थ्य: स्थूल स्नायू चालना कौशल्य विकसित करणे.<br>आवश्यक साहित्य: 10 ते 20 चेंडू<br>पद्धत: एक बुट्टी थोड्या अंतरावर ठेवणे.<br>एका ठराविक अंतरावर रेषा ओढणे.<br>मुलांना त्या रेषेवर थांबून एकेक चेंडू बुट्टीमध्ये टाकण्यास सांगणे. इयत्ता 2 री व 3 री च्या मुलांना बुट्टीचे रेषेपासून अंतर थोडे वाढवून खेळ खेळणे. |
| | रंजक कथा<br>(कथेची वेळ) | | शीर्षक: सूर्य आणि वारा<br>आवश्यक साहित्य: कथा साहित्य.<br>उद्देश:<br>➢ ऐकण्याचे सामर्थ्य वृद्धिंगत करणे.<br>➢ कल्पक वृत्ती वाढविणे.<br>पद्धत:<br>**कथाकथन**<br>➢ शिक्षकांनी कथा सांगण्यापूर्वी वाचून अर्थ समजून घेणे.<br>➢ योग्य हावभावसहित सोप्या भाषेमध्ये कथा सांगावी.<br>➢ कथा सांगतेवेळी मुलांना वर्तुळाकार बसविणे.<br>➢ साधे सोपे प्रश्न विचारून कथा समजून घेण्यास मदत करणे.<br>कथा<br>एके काळी... सूर्य आणि वारा यांच्यामध्ये भांडण झाले की कोण अधिक सामर्थ्यवान आहे ? वारा जोरदार असल्याचे सांगत होता , परंतु सूर्य स्वत:स महान मानत होता . प्रकरण खूप गुंतागुंतीचे होत चालले होते . मग त्याला समोर एक प्रवासी येताना दिसला. प्रवाश्याला पाहून वाऱ्याला एक युक्ती सुचली तो सूर्याला म्हणाला, “बघ, एक प्रवासी येत आहे . जो कोणी त्या प्रवाश्याच्या अंगावरील चादर हटवू शकेल तो शक्तिशाली असेल .” सूर्य तयार झाला. सूर्य ढगाच्या मागे लपला . वाऱ्याचा जितका वेग तितका तो वाहू लागला . वर जितका वेगवान होत असे तितका तो प्रवाशी चादर घट्ट पकडत असे . तरीपण वाऱ्याला प्रवाश्याची चादर हटवता आली नाही. खूप वेळ |

| | | |
|---|---|---|
| | | प्रयत्न करून वारा आत्ता थकला होता . आत्ता सूर्याची पाळी आली तो ढगांच्या मागून बाहेर आला . कडक उन्हाने प्रवाशी त्रस्त झाला त्याने चादर काढून टाकली . वाऱ्याने पराभव स्वीकारला आणि सूर्य विजयी झाला.<br>**प्रश्न:**<br>*** जोरदार भांडण कोणाचे झाले?**<br>*** सूर्याने कोणती युक्ती काढली?**<br>*** शेवटी कोणाचा पराभव झाला?**<br>*** गोष्टीचे तात्पर्य काय?**<br>**(कथेचा आनंद घेण्याबरोबर , मुले कथा योग्यरीत्या श्रवण करत असल्याची खात्री करून घेणे.)** |
| | पुन्हा भेटू | ● दिवसभरात केलेल्या कृती पुनरावर्तीत करणे.<br>● दिवसभरात केलेल्या कृती पालकांशी तसेच कुटुंबातील इतर सदस्यांसोबतचर्चा करण्यास प्रोत्साहित करणे.<br>● दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत, यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना निरोप देणे.<br>● 'तू करून बघ' ही कृती करण्यासाठी योग्य योजना आखणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा -2** **दिवस –8 (मंगळवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 8 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | **कृती:1 - चला उडूया पक्ष्याप्रमाणे**<br>**साहित्य: ड्रम**<br>**पद्धत – 7 व्या दिवशी घेतलेली कृती 1 पुनरावर्तीत करणे.**<br>**कृती : 2 ऐका व प्रतिसाद/प्रतिक्रिया दे. मुलांना वर्तुळाकार उभे करून सूचना स्पष्ट करा. खाली दिलेल्या सूचना लयबद्धरित्या उच्चारून कृती करण्यास सांगा.**<br>**सूचना**<br>Stand up! (उभे राहा)<br>Clap your hands (टाळी वाजवा)<br>Turn around (गोल फिरा)<br>Clap your hands! (टाळी वाजवा)<br>Sit down (खाली बसा)<br>Clap your hands (टाळी वाजवा)<br>Wave your hands (हवेमध्ये हात झुलवा) |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | दिवस 2 रा मधील 'गुजगोष्टी' या विभागातील कृतीच करणे. |
| | माझा वेळ | मुले आपल्या आवडत्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | (Free Indore Play) | | शिक्षकाने नियमावलीप्रमाणे/ मार्गदर्शकाप्रमाणे कार्य करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | | सामर्थ्य :सूक्ष्म स्नायू चालना कौशल्ये व सृजनशीलता यांचा विकास, डोळे व हात यांच्यामधील समन्वय.<br>कृती-चित्र चीकटविणे विकासात्मक ध्येय - 1<br>उद्देश:<br>सूक्ष्म स्नायूंची वाढ होते.<br>चित्र निवडून संग्रह करण्याचे कौशल्य वृद्धिंगत होणे.<br>हात व बोटे यांचे कुशलता विकसित करून एकाग्रता वाढविणे.<br>आवश्यक साहित्य: वर्तमान पत्रे/पुस्तके, रट्ट आणि फेविकॉल<br>पद्धत: मुलांना वर्तुळाकार बसविणे.विविध चित्रे असलेली जुनी पुस्तके/वर्तमानपत्रे मुलांना देणे. त्यामधील मोठी चित्रे कापून रट्ट/ जुन्या रजिस्टर चे कवर/ चार्ट वरती चित्रे चिकटविन्यास सांगणे. त्यानंतर चिकटविलेल्या चित्रावर उभ्या आडव्या (वक्ररेषा) काढण्यास सांगणे.<br>सुलभकाराने हि चित्रे वापरून पझल तयार करणे आणि ते खेळविणे. पझल तयार करण्यासाठी टाकावू वस्तूंचा वापर करून खेळणी तयार करण्यात मुलांना गुंतविणे.<br>टीप: 2 री व 3 री च्या मुलांना स्वत: चित्रे कापून रट्टवर चिकटविन्यास सांगणे.व त्याविषयी आपल्या भाषेत मत व्यक्त करण्यास सांगणे.<br>वापरावायची वर्कशिट्स I.L–5 ( इयत्ता 1,2,3) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांच्या कृती) | | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्ये व सृजनशीलता यांचा विकास, डोळे व हात यांच्यामधील समन्वय.<br>कृती-चित्र चिकटविणे विकासात्मक ध्येय - 1<br>उद्देश:<br>सूक्ष्म स्नायूंची वाढ होते.<br>चित्र निवडून संग्रह करण्याचे कौशल्य वृद्धिंगत होणे.<br>हात व बोटे यांचे कुशलता विकसित करून एकाग्रता वाढविणे.<br>आवश्यक साहित्य: वर्तमान पत्रे/पुस्तके, रट्ट आणि फेविकॉल<br>पद्धत: मुलांना वर्तुळाकार बसविणे. विविधचित्रे असलेली जुनी पुस्तके/वर्तमानपत्रे मुलांना देणे. त्यामधील मोठी चित्रे कापून रट्ट/ जुन्या रजिस्टर चे कवर/ चार्ट वरती चित्रे चिकटविन्यास सांगणे. नंतर चिकटविलेल्या चित्रावर उभ्या आडव्या वक्ररेषा (Zigzag) काढण्यास सांगणे.<br>सुलभकाराने हि चित्रे वापरून पझल तयार करणे आणि ते खेळविणे. पझल तयार करण्यासाठी टाकावू वस्तूंचा वापर करून खेळणी तयार करण्यात मुलांना गुंतविणे.<br>टीप: 2 री व 3 री च्या मुलांना स्वत: चित्रे कापून रट्टवर चिकटविन्यास सांगणे.व त्याविषयी आपल्या भाषेत मत व्यक्त करण्यास सांगणे. |
| | भा षा वि का स आ | ऐकणे व बोल णे | सामर्थ्य : ध्वनी शास्त्राची ओळख, शब्दभांडाराची वृद्धी, चालना कौशल्यांचा विकास होतो.<br>कृती: 15 लयबद्ध शब्द ऐकणे ( विकासात्मक ध्येय - 2) ECL-4 ( 4 थ्या दिवशीची या विभागातील कृती पुढे सुरु ठेवणे)<br>उद्देश:<br>ध्वनिशास्त्राची ओळख करून देणे.<br>लयबद्ध शब्दांच्या माध्यमातून शब्दभांडार वाढविणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | णि<br>पा<br>या<br>भूत<br>सा<br>क्षर<br>ता | | स्थूल तसेच सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकसित करणे.<br>पद्धत:<br>मुलांना 4 थ्या दिवशी म्हणून घेतलेली बालगीते पुन्हा म्हणून घेणे. बालगीते गातेवेळी लयबद्ध शब्दावर थोडा जास्त जोर देणे. बालगीताला साजेसा अभिनय करण्यास सांगणे. जोर देवून म्हटलेले लयबद्ध शब्द व्यक्तिगतरित्या म्हणून घेणे.<br>टीप: 2 री व 3 री च्या मुलांनी शिक्षकाचे अनुकरण करत बालगीते तालबद्ध ,चालीमध्ये तसेच अभिनय करीत गायन करणे. गायिलेली गीते लिहिण्यास सांगणे. (14 व्या दिवशी पूर्ववत करणे.) |
| | | आकलनासहीत वाचन | सामर्थ्य : शब्दभांडाराची वृद्धी, स्व-अभिव्यक्ती,घटना/संदर्भ समजून घेणे.<br>कृती : चित्र वाचणे. (विकासात्मक ध्येय - 2)<br>उद्देश: विविध घटना/संदर्भ यांची चित्रे पाहून घटना किंवा संदर्भ स्पष्ट/वर्णन करणे.<br>आवश्यक साहित्य: विविध घटना/स्थळ/जत्रा/मेळावे यांची चित्रे,बाग/बाजार/शाळा/प्राणी संग्रहालय/सन इत्यादींची चित्रे<br>पद्धत: दिवस-4 मधील 'चित्र वाचन' हि कृती पुढे चालू ठेवून मुलांचे गट करून पूर्वी वापरलेले संदर्भ चित्रे देणे.त्यानंतरत्या चित्रांचे निरीक्षण करून त्यामधील संदर्भाचे वर्णन करणे आणि घटना वाचण्याची कृती करण्यास सांगणे<br>टीप: इयत्ता2 री व 3 री च्या मुलांना घटना/संदर्भ मुलांच्या अनुभवाशी जोडून वर्णन करण्यास सांगणे. |
| | | उद्देशपूर्वक लेखन | सामर्थ्य : हात व डोळे यांचे समन्वय,लेखनाच्या कौशल्याचा विकास ,सृजनशील अभिव्यक्ती.<br>कृती : मुक्त चित्र रेखाटणे (विकासात्मक ध्येय - 2)ECW-6<br>उद्देश:<br>लेखनाचे प्रारंभिक कौशल्ये रुजविणे.<br>डोळे व हात या मधील समन्वय वृद्धिंगत करणे.<br>क्रियात्मक अभिव्यक्तीला वाव देणे.<br>आवश्यक साहित्य: पाटी, पेन्सील/खडू<br>पद्धत: पाटी वर मुक्तपणे लिहिण्यास, आपल्याला जे वाटते , ते रेखाटण्याची संधी देणे. त्यांच्या लेखनाविषयी त्यांना बोलण्याची संधी देणे. प्रश्नांच्या द्वारे लेखनाबद्दल माहिती घेणे.<br>टीप: इयत्ता2 री व 3 री च्या मुलांना त्यांनी स्वत: रेखाटलेल्या चित्राविषयी बोलण्यास सांगणे. |
| | मैदानी खेळ | | कृती:- 20(a) चेंडू वर व खाली फेकणे. (विकासात्मक ध्येय - 1)<br>सामर्थ्य: स्थूलस्नायू चालना कौशल्य विकसित करणे.<br>आवश्यक साहित्य: चेंडू<br>पद्धत:<br>मुलांना वर्तुळाकार बसवून चेंडू वर फेकण्यास सांगून पुन्हा पकडण्यास सांगणे.<br>टीप: इयत्ता2 री व 3 री च्या मुलांना चेंडू वर फेकून पकडण्यास सांगणे तसेच जमिनीवर उसळी मारून पकडण्यास सांगणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | रंजक कथा (कथेची वेळ) पहिल्या/आदल्या दिवशीच्या उद्देशान्वये रंजक कथा (कथेची वेळ) सुरु ठेवणे.<br>**कथाकथन** |


| | | |
|---|---|---|
| | | शिक्षकांनी कथा कथन करण्याबरोबरच मुलांना प्रत्यक्षरीत्या सहभागी करून घेवून कथा पूर्ण करणे. उदा: कोणी काय म्हटले? त्यानंतर काय झाले? असे प्रश्न विचारणे कथा पूर्ण झाल्यानंतर साधे प्रश्न विचारणे.<br>* जोरदार भांडण कोणाचे झाले? * सूर्याने कोणती युक्ती काढली? *शेवटी कोणाचा पराभव झाला?<br>* गोष्टीचे तात्पर्य काय?<br>(कथेचा आनंद घेण्याबरोबर , मुले कथा योग्यरीत्या श्रवण करत असल्याची खात्री करून घेणे.) |
| | पुन्हा भेटू | ● दिवसभरात केलेल्या कृती पुनरावर्तीत करणे.<br>● दिवसभरात केलेल्या कृती पालकांशी तसेच कुटुंबातील इतर सदस्यांसोबत चर्चा करण्यास प्रोत्साहित करणे.<br>● दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत, यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना निरोप देणे.<br>● 'तू करून बघ' हि कृती करण्यासाठी योग्य योजना आखणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा -2     दिवस – 9 (बुधवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 9 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती:1<br>पद्धत:<br>हाय फाईव देत मुलांना वर्गात प्रवेश करण्यास सांगुन 'हाय टीचर' असे म्हणण्यास सांगा. शिक्षकांनी हॅलो........(मुलांचे नाव) घेत स्वागत करणे.<br>कदम ताल करण्यास सांगणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | सामर्थ्य: स्व- जाणीव , सकरात्मक दृष्टीकोनाची वृद्धी, ऐकणे व बोलणे.<br>कृती:1 भाजी घ्या भाजी ( विकासात्मक ध्येय - 1)<br>उद्देश: कविता ऐकून साध्या सोप्या प्रश्नांची उत्तरे देणे.<br>पद्धत:<br>दिलेली कविता तालबद्ध व चालीमध्ये अभिनयासहित म्हणणे व त्यानंतर कवितेवर आधारित काही प्रश्न विचारणे.<br>भाजी घ्या ओ भाजी,<br>ताजी ताजी भाजी .<br>चवळी कोवळी कोवळी<br>लिंबे आंबट पिवळी<br>मुळा, गाजर, कांदा,<br>आणला कि हो दादा.<br>काकडी आणि कोथिंबीर,<br>छान होते कोशिंबीर. |
| | माझा वेळ (Free Indore | मुले आपल्या आवडत्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करणे.<br>शिक्षकाने नियमावलीप्रमाणे/ मार्गदर्शकाप्रमाणे कार्य करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | **Play)** | | |
| | **पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती)** | | **सामर्थ्य : परस्पर संबंध ओळखून जोडी जुळवणे, पर्यावरणाची जागृती.**<br>**कृती: 15 ओळखून जोडी लावणे.( विकासात्मक ध्येय - 3)**<br>**उद्देश: दोन वस्तूमधील सहसंबध ओळखणे.**<br>**आवश्यक साहित्य: कुलूप-चावी, मेणबत्ती-काडीपेटी, कप-बशी, तांब्या-मग्ग, खडू-डस्टर, पेन्सील-रबर**<br>**पद्धत:**<br>**सुरुवातीला वस्तुमधील परस्पर संबध ओळखून वस्तूच्या जोड्या लावण्यास सांगणे. संग्रहित केलेल्या वस्तू- कुलूप-चावी, मेणबत्ती-काडीपेटी, कप-बशी, तांब्या-मग्ग, खडू-डस्टर, पेन्सील-रबर इत्यादी एकत्रित ठेवून परस्पर संबधित वस्तू शोधण्यास सांगणे.आणि प्रत्येक वस्तूची नावे ओळखणे. प्रथमता वस्तूच्या ढिगामधून पेन्सील बाजूला काढून दाखविणे. नंतर पेन्सीलशी संबधित असलेला रबर बाहेर काढून दाखविणे. अशारितीने एक वस्तू व त्यासंबधीत दुसरी वस्तू ओळखून तुलना करण्यास सांगणे.**<br>**इयत्ता- 2 री:**<br>**मुलांनी आपल्याला माहित असलेल्या परस्पर संबधित वस्तूची नावे तोंडी सांगणे.**<br>**इयत्ता- 3 री मुलांनी वस्तूचे नाव सांगून त्या वस्तूशी परस्पर संबधित वस्तूचे नाव ओळखण्यास प्रोत्साहित करणे.**<br>**उदा: खडू-फळा**<br>**वापरावयाची अध्ययन पत्रके:I.L-6 & 7( इयत्ता 1 ली , 2 री 3 री )** |
| | **सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांच्या कृती)** | | **सामर्थ्य : हात व डोळे यांचे समन्वय, लेखनाच्या कौशल्याचा विकास , सृजनशील अभिव्यक्ती.**<br>**कृती: कोडी(Puzzle) तयार करणे. (विकासात्मक ध्येय – 1)**<br>**उद्देश:**<br>**सूक्ष्म स्नायूंची वाढ होते.**<br>**चित्र निवडून संग्रह करण्याचे कौशल्य वृद्धिंगत होणे.**<br>**हात व बोटे यांचे कुशलता विकसित करून एकाग्रता वाढविणे.**<br><br>**आवश्यक साहित्य: वर्तमान पत्रे/पुस्तके, रद्दृ आणि फेविकॉल**<br>**पद्धत: आदल्या दिवशीची कृती पूर्ण करून झिगझ्याग पझल तयार करणे. (विविध चित्रे असलेली जुनी पुस्तके/वर्तमानपत्रे मुलांना देणे. त्यामधील मोठी चित्रे कापून रद्दृ/ जुन्या रजिस्टर चे कवर/ चार्ट वरती चित्रे चिकटविन्यास सांगणे व त्या चित्रांचा वापर करून पझल तयार करण्यास सांगणे.)**<br>**टीप: 2 री व 3 री च्या मुलांना स्वत: संग्रहित केलेली चित्रे चार्ट वर चिकटवून स्वत:चे असे एक पझल तयार करण्यास सांगणे.**<br>* **वापरावयाची अध्ययन पत्रके : H.W.-2( इयत्ता 1 ली , 2 री 3 री )** |
| | **भाषा विकास आणि पा** | **ऐकणे व बोलणे** | **सामर्थ्य :क्रियात्मक स्व अभिव्यक्ती,ध्वनी संकेत तसेचयमकची जाणीव, पर्यावरण जागृती, शब्दसंपतीची वृद्धी करणे.**<br>**कृती: 3 गाणी, बालगीते, कविता/नाटक ( विकासात्मक ध्येय - 2) ECL-3 ( 3 ऱ्या दिवसापासून पुढे पूर्ववत करणे)**<br>**उद्देश: ध्वनी संकेताची ओळख बिंबवणे. 'यमक' ही कल्पना रुजविणे. क्रियात्मक अभिवृत्तीला वाव देणे. आपल्या आजूबाजूच्या परिसराशी समन्वय साधने.**<br>**पद्धत:**<br>**मुलांना वर्तुळाकार उभे करून शिक्षकांनी 3 ऱ्या दिवशी ओळख करून दिलेले बालगीत अभिनयासहित सादर करून दाखविणे. मुलांनी शिक्षकांचे अनुकरण करणे.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | या<br>भूत<br>सा<br>क्षर<br>ता | | *लक्षात ठेवा:<br>*मुले बालगीताचा आनंदघेण्यासाठी योग्य अभिनय व उत्साहाने बालगीत सादर करा.<br>*मुलांना अभिनयासहित बालगीत म्हणण्यास प्रेरित करा.<br>टीप: 2 री व 3 री च्या मुलांनी शिक्षकाचे अनुकरण करत बालगीते  तालबद्ध ,चालीमध्ये तसेच अभिनय करीत गायन करणे. गायिलेली गीते लिहिण्यास सांगणे. (27व्यादिवशी पूर्ववत करणे) |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य :शब्द ओळखणे, मुद्रित लेखनाची ओळख, अर्थग्रहण/आकलन, शब्दसंपतीची वृद्धी<br>कृती- 11-नावांचे विश्व/जग (विकासात्मक ध्येय -  2)<br>उद्देश:<br>परिचित संदर्भातील वस्तूचा लीपि संकेताशी सहसंबध ओळखणे/लावणे. साहित्य आणि वस्तू एकच आहेत अशा निर्णयापर्यंत येवून वाचनाची आवड निर्माण करणे.<br>आवश्यक साहित्य: वही, कार्डशीट, पेन्सील, क्रेयोन्स, तसेच आपल्या आजूबाजूला डोळ्याला दिसणाऱ्या वस्तू.<br>पद्धत:<br>मुलांच्या सहाय्याने वर्गामध्ये आढळणाऱ्या परिचित वस्तूंच्या नावांच्या पाट्या तयार करणे<br>उदा: टेबल, खुर्ची, दरवाजा इत्यादी.<br>- तयार केलेल्या नावांच्या पाट्या त्या त्या वस्तूवर चिकटविणे. वस्तूच्या नावांच्या दृकपट्ट्याचा(flashcards) आणखी एक संच तयार करून ठेवणे.<br>-वर्गामध्ये दृकपट्ट्या(flashcards) दाखविले असता, मुलांनी मोठ्या आवाजात वाचणे.<br>-शब्दाचा उच्चार करता करता त्या वस्तुजवळ जाण्यास सांगणे.<br>-मुलाला किमान चार पाच वस्तूची नावे सांगण्याची संधी देणे.<br>-चित्रासहीत नामफलक/दृकपट्ट्या तयार करून, वर्गामध्ये मुलांना चित्र पाहून ओळखून वाचण्यास सांगणे.<br>टीप: 2 री व 3 री च्या मुलांना कथा/पाठातील प्रमुख शब्दांच्या दृकपट्ट्या तयार करण्यास सांगणे.शिक्षकांनी मुलांना कथा/ पाठ देवून वाचण्याची संधी उपलब्ध करून देणे. त्यानंतर दृकपट्ट्या मधील शब्द कथेमध्ये शोधण्यास सांगणे.<br> |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य :सूक्ष्म स्नायू कौशल्याचा विकास, उद्देशपूर्वक लेखन<br>कृती- 37 चित्र रेखाटून नाव देणे. (विकासात्मक ध्येय -  2) ECW-3<br>उद्देश:<br>सूक्ष्म स्नायू कौशल्याचा विकास करणे.<br>उद्देशपूर्वक लेखन करण्यास सक्षम बनविणे.<br>आवडते चित्र रेखाटणे.<br>आवश्यक साहित्य: पेपर, क्रेयोन्स, पेन्सील इत्यादी.<br>पद्धत: मुले आपल्या इच्छेनुसार एखाद्या झाडांचे चित्र काढतात.चित्रात रंग भरून नाव देण्यास सुचविणे.<br>टीप: 2 री व 3 री च्या मुलांना त्यांच्या आवडीच्या झाडाचे चित्र काढून रंग भरून नाव देण्यास सांगणे. |

| | | |
|---|---|---|
| | मैदानी खेळ | सामर्थ्य: स्थूलस्नायू चालना कौशल्य विकसित करणे.<br>कृती-23 – चेंडू फेक.....बादलीमध्ये (विकासात्मक ध्येय – 1)<br>आवश्यक साहित्य: मोठा चेंडू, बादली<br>पद्धत:<br>चेंडू थोड्या अंतरावर ठेवलेल्या बादलीमध्ये टाकण्यास प्रोत्साहित करणे.<br>कृतीच्या कोणत्या तरी एका टप्प्यात प्रत्येक मुल यशस्वी होईल अशा पद्धतीने प्रोत्साहित करणे.<br>टीप: 2 री व 3 री च्या मुलांना जास्त अंतरावर बादली ठेवून खेळ घेणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | शीर्षक : मित्रांची कथा<br>आवश्यक साहित्य : चित्रमालिका<br>उद्देश:<br>ऐकण्याचे कौशल्य विकसित करणे.<br>कल्पक वृत्ती वृद्धिंगत करणे.<br>तार्किक शक्ती वाढीस लावणे.<br>प्रश्न विचारण्याचे कौशल्य विकसित करणे.<br>पद्धत:<br>**काडी चित्रे**<br>काडी चित्राचा वापर करून कथा समय मनोरंजनात्मक बनविणे.<br>( कथेचा आनंद घेण्याबरोबर , मुले कथा योग्यरीत्या श्रवण करत असल्याची खात्री करून घेणे.) |
| | पुन्हा भेटू | • दिवसभरात केलेल्या कृती पुनरावर्तीत करणे.<br>• दिवसभरात केलेल्या कृती पालकांशी तसेच कुटुंबातील इतर सदस्यांसोबत चर्चा करण्यास प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत, यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना निरोप देणे.<br>• 'तू करून बघ' हि कृती करण्यासाठी योग्य योजना आखणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा -2** **दिवस – 10 (गुरुवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 10 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | 7 व्या दिवशी केलेली कृती पुनरावर्तीत करणे. |

| | | |
|---|---|---|
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 9 व्या दिवशी सादर केलेले बालगीत पुन्हा म्हणणे व खालील काही साधे प्रश्न मुलांना विचारून उत्तरे मिळविणे.<br>नमुना प्रश्न:<br>या गीतातील भाज्यांची नावे सांगा.<br>तुला कोणती भाजी आवडते?<br>तू मुळा पहिला आहेस का?<br>चवळी कशी आहे? |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुले आपल्या आवडत्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करणे.<br>शिक्षकाने नियमावलीप्रमाणे/ मार्गदर्शकाप्रमाणे कार्य करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : तुलना , पर्यावरणाची जाणीव, रंगाचीकल्पना, आकार-आकारमान<br>कृती- 12 मला ओळखशील का? (विकासात्मक ध्येय - 3) <br>उद्देश: वस्तूचा आकार, आकारमान आणि रंग यावर आधारित जोड्या जुळविणे.<br>आवश्यक साहित्य : अवतीभोवती असलेल्या विविध वस्तू, ब्लॉक्स, खडे, बाटलीचे कॅप्स, लिंबू, चेंडू इ.<br>पद्धत:<br>एकसारख्या वस्तू ओळखण्यासाठी मुलांना 8-10 वस्तू देणे. मुले ही कृती गटामध्ये करू शकतात. प्रत्येक गटाला ब्लॉक्स, खडे, बाटलीचे कॅप्स, लिंबू, चेंडू अशा वस्तू देवून त्यातील बाटलीचे कॅप्स शोधण्यास सांगणे. दिलेल्या वस्तुंचा आकार, आकारमान, रंग इत्यादी गुणलक्षणाच्या आधारे तुलना करण्यास सांगणे. तसेच विभिन्न प्रकारच्या वस्तू देवून त्या वस्तू एकमेकांशी कशा वेगळ्या आहेत हे समजून घेण्यास सांगणे.<br>टीप: 2 री च्या मुलांना वरीलप्रमाणे कृती करवून घेणे.<br>3 रीच्या मुलांना 10 ते 15 वस्तू गटामध्ये देवून त्यांचे आकारमान, आकार, रंग इ. आधारे जुळवण्यास सांगणे.<br>* वापरावयाची अध्ययन पत्रके:I.L–8 & 9 (इयत्ता 1 ली , 2 री 3 री ) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांच्या कृती) | सामर्थ्य :सूक्ष्म स्नायू चालना कौशल्ये व सृजनशीलता यांचा विकास, डोळे व हात यांच्यामधील समन्वय.<br>कृती - 34 आकृती चिकटविणे/मला शोध. (विकासात्मक ध्येय 1 व 3 )<br>उद्देश<br>कात्री योग्यरीत्या हातात पकडून आकृती/पेपर कापण्याची पद्धत समजून घेणे.<br>हात व बोटांचे कौशल्य विकसित होण्याबरोबरच एकग्रता वाढविणे.<br>वस्तूंची तुलना करण्यास शिकणे.<br>आवश्यक साहित्य:<br>1.कात्री, रंगीत पेपर, फेविकोल<br>2.खडू, पेन्सील, पुस्तके, खडे/बिया/पिशवी ( वस्तू 3 पेक्षा अधिक असाव्यात)<br>पद्धत:<br>1.पांढऱ्या पेपर वर विविध आकृत्या ( वर्तुळ, त्रिकोण, चौकोन, आयत ) कापून दुसऱ्या रंगीत कागदावर चिकटविन्यास सांगणे.<br>2.शिक्षकांनी मुलाला एक वस्तू द्यावी.त्यासारख्या दिसणाऱ्या/ त्यासंबधित वस्तू वर्गामध्ये शोधण्यास सांगणे.हा खेळ विविध वस्तूच्या सहाय्याने पुनरावर्तीत करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | तसेच सुलभकाराने जमिनीवर दोन वर्तुळ काढून त्यांना A व B अशी नावे देणे. व शिक्षकाने दिलेली वस्तू A गटात व मुलांनी शोधलेल्या वस्तू B वर्तुळात ठेवण्यास सांगणे.<br>टीप: 2 री व 3 री च्या मुलांना वस्तू शोधून त्यांची तुलना करून जोड्या जुळवण्यास सांगून हा खेळ खेळणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य :ध्वनीशास्त्राची ओळख, अक्षर व उच्चार/आवाज यांचा समन्वय.<br>कृती-20 नावाच्या पहिल्या अक्षरावरून वस्तू ओळखणे. (विकासात्मक ध्येय - 2) ECL-2(2 ऱ्या दिवसापासून पुढे पूर्ववत करणे)<br>उद्देश:<br>*ध्वनिशास्त्राची ओळख रुजविणे.<br>*अक्षर व त्यांचा उच्चार मधील सहसंबध ग्रहण करणे.<br>*अंताक्षरी शब्द लिहिणे.<br>सुचविलेला विषय- फळे.<br>पद्धत: विविध कोडी वापरून मुलांना फळांची नावे तर्क करून सांगण्यास प्रोत्साहित करणे. उदा: शिक्षकाने " माझ्या मनात असलेले फळ हिरव्या रंगाचे असून त्याचे पहिले अक्षर द्रा असे आहे" तर ते फळ कोणते? असे विचारून योग्य उत्तर मिळविणे. अशाप्रकारे विविध कोडी/उदाहरणे देणे.<br>टीप: 2 री व 3 री च्या मुलांना शब्दांच्या पुढील भाग म्हणजे वाक्य रचतील किवा साधी वाक्ये रचतील अश्याप्रकारे कृती पुढे चालू ठेवणे. (22 व्या दिवशी पुढे पूर्ववत करणे)<br>*वापरावयाची अध्ययन पत्रके:EC–2 ( इयत्ता 1 ली , 2 री 3 री ) |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य :शब्दसंपत्तीची वृद्धी, स्व-अभिव्यक्ती, घटना/संदर्भ वाचतात.<br>कृती-1 A तर्कवाचन ( विकासात्मक ध्येय - 2)<br>उद्देश: पुस्तकातील चित्र संदर्भ/ चित्र कथा पाहून योग्य अर्थ लावून अभिव्यक्त करणे.<br>आवश्यक साहित्य : सचित्र कोश, चित्रकथांचे पुस्तक<br>पद्धत:<br>मुले चित्रकथेचे पुस्तक/कोश पाहून त्यामधील घटना/ संदर्भानुसार नक्कल करून वाचन करणे.<br>टीप:इयत्ता 2 री व 3 री च्या मुलांना चित्रकथा/चित्रसंदर्भ साहित्याशी संबध जोडून सहजरीत्या वाचनात व्यक्त करण्यास सांगणे. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य :लेखन कौशल्य, सृजनशीलता यांचा विकास, डोळे व हात यांच्यामधील समन्वय.<br>कृती-2 मुक्त हस्त चित्र रेखाटणे. ECW-6 (विकासात्मक ध्येय - 2)<br>उद्देश:<br>लेखनाचे प्रारंभिक कौशल्ये रुजविणे.<br>डोळे व हात या मधील समन्वय वृद्धिंगत करणे.<br>क्रियात्मक अभिव्यक्तीला वाव देणे.<br>आवश्यक साहित्य:पाटी, पेन्सील/खडू<br>पद्धत:<br>पाटी वर मुक्तपणे लिहिण्यास, आपल्याला जे वाटते ते रेखाटण्याची संधी देणे. त्यांच्या लेखनाविषयी त्यांना बोलण्याची संधी देणे. प्रश्नांच्या द्वारे लेखनाबद्दल माहिती घेणे.<br>टीप:इयत्ता2 री व 3 री च्या मुलांना त्यांनी स्वतः रेखाटलेल्या चित्राविषयी 4-5 वाक्ये बोलण्यास सांगणे. |
| | मैदानी खेळ | | कृती – 24- चेंडू आपटून(Bounce) पकडणे. (विकासात्मक ध्येय - 1)<br>सामर्थ्य :स्थूल स्नायू चालना कौशल्य विकसित होते. |

| | | |
|---|---|---|
| | | आवश्यक साहित्य: चेंडू.<br>पद्धत:<br>मुलांना समोरासमोर उभे करून एकेकट्याने चेंडू जमिनीला आपटून उडवण्यास सांगून पकडणे.<br>टीप: इयत्ता2 री व 3 री च्या मुलांना चेंडू निर्दिष्ट मुलाकडे फेकण्यास सुचविणे.चेंडूचा आकार बदलू शकता. |
| | रंजक कथा<br>(कथेची वेळ) | शीर्षक : मित्रांची कथा<br>आवश्यक साहित्य: मुखवटे<br>उदेश:<br>श्रवण कौशल्य वृद्धींगत करणे.<br>तर्क करण्याचे कौशल्य वाढीस लावणे.<br>विचार शक्तीचा विकास करणे.<br>प्रश्नमनोभाव निर्माण करणे.<br>पद्धत:<br>बाहुल्या<br>बाहुल्यांचा उपयोग करून रंजक कथा (कथेची वेळ) ही तासिका मनोरंजनात्मक बनविणे. मोठ्या मुलांना सहभागी करून घेवून त्यांना विविध पात्रे देवून अभिनय सादर करणे.<br>कथा सांगितल्यानंतर विविध प्रश्न विचारावे.<br>(कथेचा आनंद घेण्याबरोबर , मुले कथा योग्यरीत्या श्रवण करत असल्याची खात्री करून घेणे.) |
| | पुन्हा भेटू | • दिवसभरात केलेल्या कृती पुनरावर्तीत करणे.<br>• दिवसभरात केलेल्या कृती पालकांशी तसेच कुटुंबातील इतर सदस्यांसोबत चर्चा करण्यास प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत, यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना निरोप देणे.<br>• ‘तू करून बघ’ हि कृती करण्यासाठी योग्य योजना आखणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती


## आठवडा -2

## दिवस – 11 (शुक्रवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 11 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे | 9 व्या दिवशी परिचित केलेली अभिवादन कृती पुनरावर्तीत करणे. |

| | | |
|---|---|---|
| | हितगुज) | |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 9 व्या दिवशी गायिलेले गीत खालील प्रकारे गावून त्यांच्या आवडत्या भाज्याविषयी प्रश्न विचारून उत्तरे मिळविणे.<br>शिक्षक : भाजी घ्या ओ भाजी,<br>विद्यार्थी: ताजी ताजी भाजी<br>शिक्षक : चवळी कोवळी कोवळी<br>विद्यार्थी: लिंबे आंबट पिवळी<br>शिक्षक : मुळा,गाजर,कांदा,<br>विद्यार्थी: आणला कि हो दादा.<br>शिक्षक : काकडी आणि कोथिंबीर,<br>विद्यार्थी: छान होते कोशिंबीर.<br>तुला माहित असलेल्या भाज्यांची नावे सांग.<br>तुझी आवडती भाजी कोणती?<br>तुझ्या नावडत्या भाज्या कोणत्या? |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुले आपल्या आवडत्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करणे.<br>शिक्षकाने नियमावलीप्रमाणे/ मार्गदर्शकाप्रमाणे कार्य करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य :तुलना करणे, जोडणे(Matching), वर्गीकरण, आकार/आकारमान संकल्पना आणि पर्यावरणाची जाणीव<br>कृती- 18 तुलना करूया ( विकासात्मक ध्येय - 3)<br>उद्देश : वस्तूचा आकार व आकारमान यावर आधारित तुलना करून वर्गीकरण करणे.<br>आवश्यक साहित्य: पेन्सील, मापके,फळे(सफरचंद, संत्री) भाज्या (बटाटे,कांदा) भांडी(पेला,वाटी,ताटे) विविध आकारमानाच्या इतर वस्तू<br>पद्धत:<br>प्रथमता सहजरीत्या मिळणाऱ्या वस्तू जसे पेन्सील, फळे, भाज्याआणि इतर वस्तू वापरून तुलना करणे.<br>आकारमान व प्रमाण यावर आधारित तुलना करणे.<br>आकारमानावर आधारित वस्तूच्या गटातील सर्वात मोठी वस्तू, मुलांच्या गटातून सर्वात उंच मुलगा, सर्वात लांब खडू निवडण्यास सांगणे. तुलना एकाच प्रकारच्या वस्तूंशी व्हावी. तुलनात्मक कृती ही मिश्र गटामध्ये करू नये.<br>उदा: आयताकार वस्तूची तुलना वर्तुळाकार वस्तूशी अथवा चेंडूची तुलना सफरचंदाशी तुलना करू नये.<br>त्याचप्रमाणे प्रमाणावर आधारित तुलना करताना एकाच प्रकारच्या वस्तू असलेल्या कोणत्या गटात अधिक वस्तू आहेत हे तुलना करून ठरविणे.<br>टीप:इयत्ता2 री च्या मुलांना- 1. भोपळा आणि बटाटा यामधील जड व हलका असा फरक ओळखण्यास सांगणे.<br>2. मुळा आणि शेवगा यामधील उंच व ठेंगू ओळखण्यास सांगणे.<br>इयत्ता 3 – जाड-बारीक, उंच-ठेंगू, जड-हलका या संकल्पनांना उदाहरणे सांगून लिहिण्यास सांगणे.<br>**वापरावयाची अध्ययन पत्रके : I.L–10, & 11 ( 01, 02, 03 इयत्ता)** |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्ये व सृजनशीलता यांचा विकास, डोळे व हात यांच्यामधील समन्वय.<br>कृती-41 – रांगोळी/ आकृतिबंध( Patterns) ध्येय – 1<br>उद्देश: |

| | | | |
|---|---|---|---|
| | चलन कौशल्ये (मुलांच्या कृती) | | सूक्ष्म स्नायूंची वाढ होते.<br>हात व डोळे यांच्यातील समन्वय विकसित करणे.<br>सौंदर्योपासना वृद्धिंगत करणे.<br>बाह्यस्वरूप( कठोर,सौम्य) समजते.<br><br>आवश्यक साहित्य: रांगोळी, पेपर, फेविकॉल.<br>पद्धत:<br>एक रेखाचित्र(outline), एका वाटीमध्ये फेविकॉल, रंगीत रांगोळी/ वाळू देणे. मुले दिलेले चित्र एका पेपरवर चिकटवून त्यावर ब्रशच्या सहाय्याने फेविकॉल लावणे. त्यावर रांगोळी/ वाळू आपल्या बोटाने टाकण्यास सांगणे. चित्रातील अतिरिक्त वाळू/रांगोळी काढण्यासाठी ट्रे, पेपरप्लेट इत्यादी देणे. याचबरोबर फेविकॉल, रंगीत रांगोळी/ वाळू यांचा वापर करून फुल, झोपडी बनवू शकतात. मुले आपले चित्र पाहून खूपच आनंदी होतील. तसेच मुलांना त्यांच्या परिचयाच्या संकल्पना देवून चित्र बनवण्यास प्रोत्साहित करणे.<br>इयत्ता2 री व 3 री च्या मुलांना ठिपक्यांची रांगोळी काढून रंग भरण्यास सांगणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : शब्दसंपत्तीची वृद्धी, तर्कशक्ती, गटातील सदस्याबरोबर सहकार्याने काम, सुचनांचे पालन करतात.<br>कृती-6 रहस्यमयवस्तू/अक्षर/नंबरओळखणे (विकासात्मक ध्येय - 2) ECL-7<br>उद्देश:<br>योग्य शब्द रचणे.<br>सांघिक मनोभाव वाढीस लावणे.<br>सूचना लक्षपूर्वक ऐकून पालन करणे.<br>शब्दसंपत्तीची वृद्धी करणे.<br>आवश्यक साहित्य: बॅग, उपलब्ध वस्तू.<br>पद्धत:<br>वर्गातील खडू, रबर, डस्टर, फासा इत्यादी वस्तू एका बॅगमध्ये भरा. एकेका मुलांना पुढे बोलावून बॅगमधील कोणत्याही एका वस्तूला स्पर्श करून ती वस्तू ओळखण्यास सांगणे.प्रश्नाच्या सहाय्याने वस्तू योग्यरीत्या ओळखण्यास सहाय्य करणे.<br>उदा:<br>तू स्पर्श केलेली वस्तू लहान आहे की मोठी?<br>तू स्पर्श केलेल्या वस्तूचा आकार कसा आहे?<br>ती वस्तूकशापासून बनवली आहे?<br>तू स्पर्श केलेली वस्तू कोणती असेल?<br>- मुलांनीओळखलेल्या वस्तूविषयी त्यांच्याशी चर्चा करा.<br>टीप: इयत्ता2 री च्या मुलांना त्यांनी ओळखलेल्या वस्तूविषयी 3-4 वाक्यात बोलण्यास सांगणे.<br>3 री च्या मुलांना त्यांनी ओळखलेल्या वस्तूविषयी 3-4 मिनिटे बोलण्यास सांगणे. |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य :मुद्रित/छापीलमजकुराची जागरुकता, शब्द ओळखणे व अर्थग्रहण, शब्दसंपत्तीची वृद्धी आणि पर्यावरणाची जागृती .<br>कृती – 18 चित्रसंचयिका ( विकासात्मक ध्येय - 2) विषय:उद्यानात तुम्ही पाहिलेल्या वस्तू किंवा<br>उद्देश:<br>मुलांनी गटामध्ये बसून तयार केलेल्या भित्तीपत्रिका प्रदर्शित करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आवश्यक साहित्य: तक्ते, स्वरचित चित्रे, क्रेयोन्स, फेविकॉल, मोजपट्टी, टॅग .<br>पद्धत:<br>मुले गटामध्ये आवश्यक साहित्य घेवून केवळ रात्रीच्या वेळी पाहू शकणाऱ्या वस्तूविषयी भित्तीपत्रिका तयार करण्यासाठी आवश्यक साहित्य देणे. तयार केलेली भित्तीपत्रिका वर्गामध्ये सादर करण्याची संधी देणे आणि भित्तीपत्रिका वर्गात प्रदर्शित करणे.<br>टीप:इयत्ता2 री व 3 री च्या मुलांना मार्गदर्शन करून गटामध्ये उपक्रम (Projects) करण्यास सांगणे. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य :उद्देशपूर्वक लेखन, क्रियात्मक स्व-अभिव्यक्ती, लेखनाचा योग्य क्रम अनुसरतात.<br>कृती:31 आदर्श लेखन  विकासात्मक ध्येय - 2ECW-7<br>उद्देश:<br>लेखनाचा योग्य क्रम अनुसरणे.<br>क्रियात्मकस्व-अभिव्यक्तीला वाव देणे.<br>आवश्यक साहित्य:खडू, फळा.<br>पद्धत:<br>शिक्षक मुलांच्या समोर फलकलेखन करणे.<br>लेखनाचा योग्य क्रम पाहण्याची संधी मुलांना उपलब्ध करून देणे.<br>मुलांची नावे, मुलांनी काढलेली चित्रांची नावे वैगेरे मुलांच्या समोर लिहिणे.<br>शिक्षक वर्गात जे कांही फलक लेखन करतील ते मुलांना व्यवस्थित दिसेल अश्यापद्धतीने करणे.<br>टीप:इयत्ता2 रीच्या मुलांना शब्द  व 3 री च्या मुलांना वाक्ये फळ्यावर श्रुतलेखन देवून लिहिण्याच्या योग्य क्रमाचे निरीक्षण करणे. आवश्यकता भासल्यास योग्य अभिप्राय देवून मार्गदर्शन करणे. |
| | मैदानी खेळ | | कृती: 29 रोलिंग ( घरंगळने)  विकासात्मक ध्येय - 1<br>सामर्थ्य : स्थूल स्नायू चालना कौशल्य विकसित होते.<br>आवश्यक साहित्य : चेंडू<br>पद्धत :<br> <br>जमिनीवर एक सरळ रेषा आखणे.<br>मुले क्रमवार त्या रेषेवरून चेंडू घरंगळत ( गडगडत) नेण्यास सांगणे.<br>टीप:इयत्ता2 री व 3 री च्या मुलांना वर्तुळाकारउभे करून क्रमवार चेंडू वर्तुळाकार घरंगळत( गडगडत) नेण्यास सांगणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शीर्षक : मित्रांची कथा<br>आवश्यक साहित्य: संवाद असलेल्या दृकपट्ट्या ( Flashcards)<br>उद्देश:<br>ऐकण्याचे सामर्थ्य वृद्धिंगत करणे.<br>कल्पक वृत्ती वाढीस लावणे.<br>तर्कशक्ती विकसित करणे.<br>कथेशी संबधित असणारी चित्रे संग्रहित करण्याचीआवड निर्माण करणे.<br>प्रश्नामोनोभाव निर्माण करणे.<br>अभिव्यक्ती सामर्थ्य वाढीस लावणे.<br>अस्खलितपणे बोलण्याचे कौशल्य रुजविणे. |

| | | |
|---|---|---|
| | | पद्धत :<br>**पात्राभिनय**<br>कथेचे पुनरावलोकन करणे.<br>कथा सादर करण्यासाठी 2 री व 3 री च्या मुलांना सहाय्य करणे.<br>दृकपट्ट्या देवून पात्रांचे संवाद उच्चारण्यास सांगणे.<br>मुले चूक करत असल्यास सकारात्मकरित्या स्वीकारून नंतर दुरुस्त्या सुचवून कथा पुढे सुरु ठेवणे. |
| | पुन्हा भेटू | • दिवसभरात केलेल्या कृती पुनरावर्तीत करणे.<br>• दिवसभरात केलेल्या कृती पालकांशी तसेच कुटुंबातील इतर सदस्यांसोबत चर्चा करण्यास प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत, यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना निरोप देणे.<br>• 'तू करून बघ' हि कृती करण्यासाठी योग्य योजना आखणे. |


# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा -2      दिवस – 12 (शनिवार)

| | |
|---|---|
| प्रतिबिंब (वर्गातील निरंतर मूल्यमापन ) | • विविध तंत्र वापरून (निरीक्षण, तपशील पट्टी, मुलांची अध्ययन पत्रके, व्हिडीओ, सांदर्भिक नोंदी, इत्यादी) तुम्ही संग्रह केलेल्या मूल्यमापन नोंदी/माहिती यांचे पुनरावलोकन करणे.<br>• प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिगत गरजेनुसार पुढील आठवड्यातील अध्ययन प्रक्रियेची योजना आखणे.<br>• अध्ययनाच्या तिन्ही विकासात्मक ध्येयांच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती


## आठवडा - 3      दिवस – 13 (सोमवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 13 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती: कदमताल<br>आवश्यक आवश्यक साहित्य: ड्रम/ढोल.<br><br>1. तीन वेळा टाळ्या वाजवून मुलांना वर्गात प्रवेश करावयास सांगून हाय टीचर ( Hi teacher) असे म्हणण्यास सांगणे.<br>शिक्षकांनी "hello.............."(विद्यार्थ्यांचे नाव) घेवून स्वागत करणे.<br>मागील दिवसाप्रमाणे कदमताल कृती करणे.<br>2. प्रत्येक विद्यार्थ्यांना त्यांच्या नावानिशी बोलावून "Good morning, welcome" "Have a magical Monday" असे म्हणून मुलांचे स्वागत करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | मुलांना "Thank you. Same to you" असे हस्तांदोलनासहित प्रत्युत्तर देण्यास प्रेरित करणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती – 1 – माझ्याविषयी थोडेसे...<br>सामर्थ्य : स्वजाणीव, सकारात्मक परिकल्पनांची अभिवृद्धी,ऐकणे व बोलणे कौशल्य विकसित होते.<br>उद्देश: विशिष्ट विषयावर बोलणे.<br>आवश्यक आवश्यक साहित्य :पिशवी( Bag), पेपर, चेंडू, बॉक्स, कंगवा, पेन्सिल, खडे, गोट्या, कापूस, खेळणी, काठी, वाळलेले पान, साबण इत्यादी.<br>पद्धत : 1. मुलांना वर्तुळाकार उभे करणे.<br>2. दोन वेळा टाळ्या वाजवून एक वेळ उडी मारणे. (Clap twice, jump once)<br>दोन वेळा लंगडी घालून हवेत हात हलविणे. (Hop twice, Wave your hands) ही कृती घेणे.<br>3. मुलांना वर्तुळाकार बसवून शिक्षकांनी वेगवेगळ्या वस्तूंनी भरलेली पिशवी घेवून वर्तुळामध्ये बसणे.<br>4. मुलांना चेंडू देवून क्रमवार हस्तांतरित ( Pass) करण्यास सांगणे.मध्येच शिक्षकांनी 'STOP' असे उच्चारले असता, ज्या मुलाच्या हातात चेंडू असेल त्याने पुढे येवून पिशवीतील एक वस्तू निवडून ती कोणती वस्तू आहे ते ओळखणे.<br>5. त्यानंतर मुलाने ती वस्तू कशी ओळखली असे विचारून मुलाला वस्तूचा आकार, रंग, इत्यादी विषयी बोलण्यास प्रेरित करणे.<br>6. कृती पुनरावार्तीत करून प्रत्येक मुलाला संधी मिळेल या याकडे लक्ष द्या.<br>( शिक्षकांनी स्वत:चे काही प्रश्न विचारून मुलांना स्वत:च्या स्थानिक भाषेत बोलण्याची संधी देणे.) |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने आपल्या आवडत्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करणे.<br>शिक्षकांनी नियमावलीप्रमाणे कार्य करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : कमी - जास्त – समान संकल्पना, निरीक्षण, ओळखणे, पर्यावरणाचीजाणीव.<br>कृती – 33 : कमी – जास्त - समान (विकासात्मक ध्येय-3 )<br>उद्देश : कमी-जास्त-समान ही संकल्पना समजून घेणे.<br>आवश्यक साहित्य : वेगवेगळ्या प्रमाणात धान्ये, खेळण्यातील नोटा व नाणी, चित्रे.<br>पद्धत : तांदूळ/डाळी/नाचना/मसूर इत्यादी धान्याच्या वेगवेगळ्या प्रमाणातील लहान-मोठ्या राशी बनविणे.मुलांना निरीक्षण करावयास सांगून कोणती राशी कमी/जास्त/समान आहे असे ओळखण्यास सांगणे.<br>इयत्ता 2 री च्या मुलांना : 1. वरीलप्रमाणे विविध आहार धान्य वापरून कमी- जास्त असा फरक ओळखण्यास सांगणे.<br>2. 10 रुपयाची नोट व 20 रुपयाची नोट दाखवून त्यामधील कमी- जास्त असा फरक ओळखण्यास सांगणे.<br>इयत्ता- 3 री - विविध किमतीच्या खेळणी वापरून कमी-जास्त-समान ओळखण्यास सांगणे.<br>वापरावयाची अध्ययन पत्रके - I.L - 12 ( इयत्ता- 1 ली, 2 री, 3 री ) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू | सामर्थ्य : समाजाभिमुख वर्तणुकीचा विकास, इतरांच्या भावना आणि हक्क यांचा आदर, सृजनशीलतेचा विकास,निरीक्षण व कल्पना शक्तीचा विकास, शब्दसंपत्तीचा विकास होतो.<br>कृती - 10 आपले सण (विकासात्मक ध्येय-1 ) |


<table>
<tr>
<td rowspan="4"></td>
<td colspan="2">चलन कौशल्ये (मुलांच्या कृती)</td>
<td>उद्देश :<br>• मुलांना आपल्या संस्कृती,परंपरांची जाणीव करून देणे.<br>• सौंदर्याचा आस्वाद घेण्याची वृत्ती वाढविणे.<br>• राष्ट्रीय सण साजरे करून देशप्रेम जोपासणे.<br>आवश्यक साहित्य : सण/उत्सव यांची चित्रे/दृकपट्ट्या ( Flash Cards)<br>पद्धत :<br>मुलांना प्रमुख राष्ट्रीय व सांस्कृतिक सण व ते साजरे करण्याची पद्धत यांची माहिती देणे.स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, मकर संक्रांत/पोंगल/बिहू, लोहरी, दिवाळी, दसरा, होळी, ईद, ख्रिसमस,गुरुपौर्णिमा इत्यादी सणांचे महत्व समजावून सांगणे.त्याचबरोबर ते सण साजरे करताना सुरक्षिततेची काळजी घेण्यासंदर्भातही मार्गदर्शन करणे.यातून भारतामध्ये वेगवेगळे सण कसे साजरे केले जातात याची माहिती मुलांना होते.<br>इयत्ता 2 री व 3 री च्या मुलांना सण साजरे करताना वापरण्यासाठी तोरण बनविण्यास सांगणे.<br>वापरावयाचे अध्ययन पत्रक - H.W. - 3 ( इयत्ता- 1 ली , 2 री, 3 री )</td>
</tr>
<tr>
<td rowspan="3">भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता</td>
<td>ऐकणे व बोलणे</td>
<td>सामर्थ्य : श्रवण कौशल्याचा विकास,क्रियात्मक स्व-अभिव्यक्ती, औपचारिक संभाषण, रंगांची कल्पना.<br>कृती – 8 : पहा आणि सांगा (विकासात्मक ध्येय-2) ECL-8<br>उद्देश :<br>• निवडलेल्या विषयावर अस्खलितपणे बोलणे.<br>• औपचारिक संभाषणाचे कौशल्य विकसित करणे.<br>• श्रवण केलेल्या मुद्यावर आपला अभिप्राय देणे.<br>• सृजनशील अभिव्यक्तीसाठी वाव देणे.<br>आवश्यक साहित्य: प्राणी, पक्षी, वाहने इत्यादींची चित्रे किंवा खेळणी.<br>पद्धत :<br>प्राणी, पक्षी, वाहने इत्यादींची चित्रे किंवा खेळणी एका पिशवीमध्ये भरणे. एकेका मुलाला पुढे बोलावून पिशवीतून एक खेळणे किंवा चित्र बाहेर काढण्यास सांगणे.निवडलेल्या वस्तूचा आकार, रंग,उपयोग,लक्षणे इत्यादी विषयी बोलण्यास सांगणे.<br>इयत्ता 2 री च्या मुलांना त्यांनी निवडलेल्या वस्तूविषयी 2-3 मिनिटे बोलण्यास प्रेरित करणे.<br>इयत्ता 3 रीच्या मुलांना त्यांनी निवडलेल्या वस्तूच्या दैनंदिन वापरा विषयी बोलण्यास सांगणे.</td>
</tr>
<tr>
<td>आकलना सहीत वाचन</td>
<td>सामर्थ्य : शब्दसंपत्तीचा विकास ,स्व-अभिव्यक्ती.<br>कृती: 1 B : पहा आणि वाचा.<br>उद्देश : वस्तूच्या कव्हर ( wrappers) वरील चित्र किंवा छापील मजकूर पाहून वाचणे.<br>आवश्यक साहित्य : विविध टाकावू वस्तूंचे कव्हर्स ( wrppers), बस तिकिटे, पावत्या इत्यादी.<br>पद्धत :<br>एका रिकाम्या बॉक्स मध्ये लिखित मजकूर असलेल्या वस्तूंचे कव्हर्स ( Wrappers) ठेवणे.मुलांनी पुढे येवून बॉक्स मधील कव्हर बाहेर काढून त्यावरील चित्र किंवा लिखित मजकूर ओळखून वाचणे.<br>इयत्ता 2 री व इयत्ता 3 रीच्या मुलांना वस्तूवरील कव्हर ओळखण्या बरोबरच त्यावरील इतर सूचना तसेच दिनांक इत्यादी बाबी वाचण्यास सांगणे.</td>
</tr>
<tr>
<td>उद्देश पूर्वक</td>
<td>सामर्थ्य : उद्देशपूर्वक लेखन, एकाग्रता आणि श्रवण कौशल्य, सृजनात्मक विचार, शब्दसंपत्तीचा विकास.<br>कृती - 32 : अनुभवात्मक लेखन (विकासात्मक ध्येय – 2 ) ECW-8</td>
</tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | | लेखन | उद्देश :<br>● अनुभवात्मक लेखनाच ( shared Writing) परिचय करून देणे.<br>● उद्देशपूर्वक लेखन करण्याचा क्रम समजून घेणे.<br>● लेखनामध्ये सृजनात्मक विचार व्यक्त करणे.<br>● शब्दसंपत्ती वाढविणे.<br>आवश्यक आवश्यक साहित्य: फळा, पेपर इत्यादी.<br>पद्धत:<br>या कृतीचे महिन्यातून दोन किंवा तीन वेळा आयोजन करणे.एखादा विषय देवून त्या विषयाला संबंधित आपले अनुभव कथेच्या किंवा लेखनाच्या माध्यमातून अभिव्यक्त करण्यास सांगणे.<br>कांही सुचविलेले विषय : घर,चहा कसा तयार करावा,बागेला दिलेली भेट.<br>लक्षात ठेवा:<br>● प्रत्येक विषयाशी संबंधित वाक्य रचना करण्यासाठी कांही पर्याय (clues) देणे व लेखनाचे प्रात्यक्षिक देणे.<br>● प्रथम शिक्षकांनी सुरुवातीचे वाक्य फळ्यावर लिहून वाचणे. त्यानंतर मुलांना आपले स्वत:चे वाक्य सांगून लिहावयास सांगणे.<br>● मुलांना आपल्या मातृभाषेत प्रतिक्रिया देण्याची संधी देणे.अशा संदर्भात शिक्षकांनी त्याचे शालेय भाषेत भाषांतर करून सांगणे.<br>टीप: इयत्ता 1 ली च्या मुलांनी विवरण करून सांगितलेला विषयांशचे इयत्ता 2 री व 3 रीच्या मुलांना लेखनाच्या माध्यमातून अभिव्यक्त करण्यास सांगणे. |
| | | | ❖ आदर्श लेखन<br>● शिक्षकांनी मुलांसमोर फलकलेखन करणे.<br>● लेखनाचा योग्य क्रम पाहण्याची संधी मुलांना उपलब्ध करून देणे.<br>● मुलांची नावे, मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे वैगेरे मुलांच्या समोरच लिहिणे.<br>● शिक्षक वर्गात जे कांही फलक लेखन करतील ते मुलांना व्यवस्थित दिसेल अश्यापद्धतीने करणे. |
| | मैदानी खेळ | | कृती : आंधळी कोशिंबीर<br>सामर्थ्य : अंदाज बांधण्याचे व संशोधन कौशल्य विकसित होते.<br>पद्धत:<br>▪ एका मुलाचे डोळे बांधून इतर मुलांना लपून बसण्यास सांगणे.<br>▪ लपलेल्या मुलांना ठराविक वेळेत शोधण्यास सांगणे.<br>▪ ज्या मुलाला प्रथम शोधून काढतो त्या मुलाचे डोळे बांधून खेळ पुढे सुरु ठेवणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शीर्षक : सोनी आणि टोमॅटो<br>आवश्यक आवश्यक साहित्य : वस्तू किंवा चित्रे.<br>उद्देश :<br>➢ श्रवण कौशल्य विकसित करणे.<br>➢ भाषण कौशल्य वृद्धिंगत करणे.<br>पद्धत :<br>➢ शिक्षकांनी कथेची रचना शैली समजावून घेवून वाचणे. |

| | | |
|---|---|---|
| | | ➢ कथेतील पात्र किंवा वस्तू मुलांना समजून सांगणे.<br>➢ प्रथमता कथा मराठीमध्येच सांगणे.<br>➢ त्यानंतर कथा मराठीत सांगत सांगत मध्ये मध्ये कथेतील पात्र किंवा वस्तूंचा इंग्रजीमध्ये परिचय करून देणे.<br>➢ त्यांनंतर निवडक शब्दांचे पुनरुच्चार करावयास सांगणे.<br>**कथा:**<br> |
| | पुन्हा भेटू | • दिवसभरात केलेल्या कृती पुनरावर्तीत करणे.<br>• दिवसभरात केलेल्या कृतीविषयी पालकांशी तसेच कुटुंबातील इतर सदस्यांसोबत चर्चा करण्यास प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत, यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना निरोप देणे.<br>• 'तू करून बघ' ही कृती करण्यासाठी योग्य योजना आखणे. |

<table>
<tr><th>दिवस</th><th>तासिका</th><th>कृतींचे विवरण</th></tr>
<tr><td rowspan="4">14</td><td>अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज)</td><td>कृती : 1<br>प्रत्येक मुलाला तिच्या/त्याच्या नावाने बोलावून<br>"Good morning, welcome" "Have a Ting tong Tuesday" असे म्हणून मुलांचे स्वागत करणे. मुले "Good morning Thank you. Same to you" असे प्रत्युत्तरादाखल म्हणतील व हस्तांदोलन करतील.<br>कृती: 2 मागील दिवसाप्रमाणे 'कदमताल' कृती करून घेणे.</td></tr>
<tr><td>गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती)</td><td>कृती : स्वत: समजून घ्या<br>पद्धत :<br>1.मुलांना वर्तुळाकार बसविणे.<br>2. आज कोणता वार असा प्रश्न विचारणे...मुले 'मंगळवार' असे उत्तर देतील<br>(What day is it today? Today is Tuesday) असे इंग्रजीमध्ये विचारून उत्तर देण्यासाठी मार्गदर्शन करा.<br>3. शिक्षकांनी मुलांना डोळे बंद करण्यास सांगणे.<br>4. आता डोळे बंद केल्यानंतर कसे वाटते ते विचारणे.<br>5. कोणतीही कथा पाहण्यासाठी डोळे आवश्यक आहेत असे उत्तर येण्यासाठी प्रोत्साहित करणे.<br>6. कान, नाक, जीभ इत्यादीविषयी बोलण्यास प्रेरित करणे.<br>( सूचना: शिक्षक आपली स्वत:ची काही प्रश्ने विचारू शकतात आणि मुलांना आपल्या स्थानिक भाषेत बोलण्यास प्रोत्साहित करू शकतात.)<br>कृती: लयबद्द गीत (Rhyme) Head, Shoulders, Knees and Toes<br>पद्धत: तालबद्ध व योग्य अभिनयासहित लयबद्द गीत (Rhyme) मुलांना सादर करून दाखविणे.<br>Head, shoulders, knees and toes<br>Knees and toes, Knees and toes,<br>Head, shoulders, knees and toes<br>It's my body. It's my body.<br>Eyes and ears and mouth and nose<br>Mouth and nose, Mouth and nose,<br>Eyes and ears and mouth and nose<br>It's my body. It's my body.</td></tr>
<tr><td>माझा वेळ (Free Indore Play)</td><td>* मूले सर्व अध्ययन कोपऱ्यातील कृतीमध्ये व्यस्त असल्याची तसेच योग्यरीत्या पूर्ण करत असल्याची खात्री करणे.<br>* अपूर्ण कृती पूर्ण करण्यासाठी मुलाला सहाय्य करणे.<br>* पुढील दिवसामध्ये कोणत्या मुलाकडे अधिक लक्ष द्यावे याची मानसिक तयारी करावी.<br>* दिवसाच्या शेवटी अध्ययन कोपऱ्यामध्ये पुढील टप्प्यातील कृती करण्यासाठी आवश्यक साहित्यांची तयारी करणे.</td></tr>
<tr><td>पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक</td><td>सामर्थ्य : शब्दांची जाणीव/ओळख, स्मरण आणि पर्यावरणाची जाणीव.<br>कृती – 2 : ऐक आणि सांग (Listen and tell) ध्येय – 3<br>उद्देश : शब्द ऐकून ओळखणे.<br>आवश्यक साहित्य : ध्वनिवर्धक, मोबईल<br>पद्धत: मुलांना विविध गटामध्ये बसवून ध्वनिवर्धकाच्या सहाय्याने प्राण्यांचे आवाज ऐकविणे, आणि प्राण्याचे नाव ओळखण्यास सांगणे.सर्व मुलांना संधी मिळेपर्यंत कृती सुरु ठेवणे.</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | | इयत्ता 2 री - 1) शिक्षकांनी प्राणी,पक्ष्यांच्या आवाजाची नक्कल करून त्यांची नावे ओळखण्यास सांगणे.<br>2) प्राणी,पक्ष्यांच्या आवाजाची नक्कल करण्यास सांगणे.<br>इयत्ता 3 री - 1) स्थानिक परिसरातील वाद्यांचा ध्वनी ओळखण्यास सांगणे.<br>2) त्या वाद्यांची यादी करणे.<br>3) वाद्याचा वापर करून एखादे बालगीत म्हणणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांच्या कृती) | | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्ये व सृजनशीलता यांचा विकास.<br>कृती - 51 : ठिपके जोडून चित्र बनव व रंग भर. ध्येय – 1<br>उद्देश :<br>• सूक्ष्म स्नायूंची वाढ होते.<br>• हात व डोळे यांच्यातील समन्वय विकसित होते.<br>• रंगाची कल्पना येते.<br>आवश्यक आवश्यक साहित्य : क्रेयॉन्स, रंगीत पेन्सील, खडू.<br>पद्धत : विविध आकारातील व आकृतिबंधातील ठीपकेयुक्त चित्रे मुलांना देवून ठिपके जोडून चित्र पूर्ण करण्यास सांगणे. त्यानंतर चित्र क्रेयॉन्स , कलर पेन्सील यांच्या सहाय्याने रंग भरण्यास सांगणे.<br>टीप : इयत्ता 2 री व इयत्ता 3 रीच्या मुलांना त्यांचे आवडते चित्र रेखाटण्यास सांगून रंग भरण्यास सांगणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : ध्वनी शास्त्राची ओळख,शब्दसंपत्तीचा विकास, चालना कौशल्यांचा विकास.<br>कृती - 15 : लयबद्ध शब्द ऐकणे (विकासात्मक ध्येय - 2 ) ECL-4 ( 8 व्या दिवसाची या विभागातील कृती पुढे सुरु ठेवणे)<br>उद्देश :<br>ध्वनिशास्त्राची ओळख करून देणे.<br>लयबद्ध शब्दांच्या माध्यमातून शब्दभांडार वाढविणे.<br>स्थूल तसेच सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकसित करणे.<br>पद्धत:<br>मुलांकडून चौथ्या दिवशी म्हणून घेतलेली बालगीते पुन्हा म्हणून घेणे.<br>बालगीत गात असताना लयबद्ध शब्दावर थोडा जास्त जोर देणे.<br>बालगीताला साजेसा अभिनय करण्यास सांगणे.<br>जोर देवून म्हटलेले लयबद्ध शब्द व्यक्तिगतरित्या म्हणून घेणे.<br>टीप: 2 री व 3 री च्या मुलांनी शिक्षकाचे अनुकरण करत बालगीते तालबद्ध ,चालीमध्ये तसेच अभिनय करीत गायन करणे. गायिलेली गीते लिहिण्यास सांगणे. ( 26 व्या दिवशी पूर्ववत करणे. ) |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य : शब्द ओळखणे, मुद्रित लेखनाची ओळख, अर्थग्रहण/आकलन, शब्दसंपतीची वृद्धी<br>कृती - 11A : नामफलक (विकासात्मक ध्येय-2)<br>उद्देश : नामफलकातील नावे चित्राच्या सहाय्याने ओळखणे व वाचणे.<br>आवश्यक साहित्य : दृकपट्ट्या ( Flashcards) वही,चित्र तक्ता<br>पद्धत : |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | • मुलाचे नाव लिहून नावाच्या बाजूला कोणत्याही प्राणी/पक्षी/वस्तू यांचे चित्र चिकटविणे आणि नामफलक ( Lable) तयार करणे.<br>• आपले नाव ओळखून वाचण्यास सांगणे. एखाद्या वेळेस आपले नाव ओळखण्यात अयशस्वी झाल्यास चित्राच्या मदतीने आपले नाव ओळखण्यास/वाचण्यास समर्थ करणे.<br>टीप: 2 री व 3 री च्या मुलांना आपल्या मित्राचे नाव ओळखण्याची कृती करून घेणे. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : लेखन कौशल्य,सृजनशीलतेच विकास, डोळे व हात यांच्यामधील समन्वय.<br>कृती – 2 : मुक्त हस्त चित्र रेखाटने. ECW-6 (विकासात्मक ध्येय-2)<br>उद्देश :<br>• लेखनाची प्रारंभिक कौशल्ये रुजविणे.<br>• डोळे व हात यांच्यामधील मधील समन्वय वृद्धिंगत करणे.<br>• क्रियात्मक अभिव्यक्तीला वाव देणे.<br>आवश्यक साहित्य : पाटी, पेन्सील/खडू<br>पद्धत : पाटीवर मुक्तपणे लिहिण्याची व आपल्याला जे वाटते ते रेखाटण्याची संधी देणे.त्यांच्या लेखनाविषयी त्यांना बोलण्याची संधी देणे.प्रश्नांच्या द्वारे लेखनाबद्दल माहिती घेणे.<br>टीप : इयत्ता 2 री व 3 री च्या मुलांना त्यांनी स्वत: रेखाटलेल्या चित्राविषयी 4 - 5 वाक्ये बोलण्यास सांगणे |
| | | | • आदर्श लेखन<br>• शिक्षकांनी मुलांसमोर फलकलेखन करणे.<br>• लेखनाचा योग्य क्रम पाहण्याची संधी मुलांना उपलब्ध करून देणे.<br>• मुलांची नावे, मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे वैगेरे मुलांसमोरच लिहिणे.<br>• शिक्षक वर्गात जे कांही फलक लेखन करतील ते मुलांना व्यवस्थित दिसेल अश्यापद्धतीने करणे. |
| | मैदानी खेळ | | कृती : लगोरी (विकासात्मक ध्येय – 1 )<br>सामर्थ्य : हात - पाय यांची हालचाल,चपळता.<br>आवश्यक साहित्य : 7 चपटे दगड / लगोरीच्या सोंगट्या,स्पंज चा चेंडू.<br><br>पद्धत:<br>• मुलांना दोन गटामध्ये विभागणे.<br>• एका छोट्या वर्तुळामध्ये 7 चपटे दगड/लगोरीच्या सोंगट्या एकमेकावर रचून ठेवणे.<br>• वर्तुळापासून थोड्या अंतरावर रेषा ओढणे.<br>• त्या रेषेवरून गटातील सदस्यांनी रचलेल्या सोंगट्या चेंडूने पाडणे.सोंगट्या खाली पाडल्यास त्याच गटातील सदस्यांनी पुन्हा रचण्याचा प्रयत्न करणे.<br>• सोंगट्या रचत असताना विरोधी गटातील सदस्यांनी त्यांना चेंडूने मारण्याचा प्रयत्न करणे.चेंडूचा स्पर्श न होता खेळाडूंनी पडलेल्या सोंगट्या रचल्यास 1 गुण देवून पुन्हा त्याच गटाला संधी देणे. आणि चेंडूचा स्पर्श झाल्यास विरोधी गटाला संधी देणे.<br>• अशारितीने खेळ सुरु ठेवने व अधिक गुण मिळविणाऱ्या गटाला विजयी घोषित करणे.<br>टीप : इयत्ता 2 री व 3 री च्या मुलांना देखील वरीलप्रमाणे खेळ खेळविणे. |
| | रंजक कथा (कथेची | | पद्धत :<br>➢ मागील दिवसाच्या उद्देशान्वये रंजक कथा (कथेची वेळ) ही तासिका पूर्ववत करणे. |

| | | |
|---|---|---|
| | वेळ) | ➢ शिक्षकांनी कथा सांगण्याबरोबरच विविध प्रश्नांच्या माध्यमातून कथा पूर्ण करणे.<br>➢ उदा: वस्तूचा रंग कोणता? मुलाचे नाव काय? |
| | पुन्हा भेटू | • दिवसभरात केलेल्या कृती पुनरावर्तीत करणे.<br>• दिवसभरात केलेल्या कृतीविषयी पालकांशी तसेच कुटुंबातील इतर सदस्यांसोबत चर्चा करण्यास प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत, यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना निरोप देणे.<br>• 'तू करून बघ' ही कृती करण्यासाठी योग्य योजना आखणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती


**आठवडा - 3** **दिवस – 15 (बुधवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 15 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती : 1<br>प्रत्येक मुलाला तिच्या/त्याच्या नावाने बोलावून<br>"Good morning, welcome" "Have a wonderful wednesday" असे म्हणून मुलांचे स्वागत करणे. मुले "Good morning Thank you. Same to you" असे प्रत्युत्तरादाखल म्हणतील व हस्तांदोलन करतील.<br>कृती : 2 - 13 व्या दिवशी परिचित केलेली 'अभिवादन' या तासिकेतील कृती पुनरावर्तीत करणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती : स्वत: समजून घे.<br>आवश्यक साहित्य : मानवी शरीराच्या अवयवांच्या दृकपट्ट्या (Flascards), चेंडू, मोबईल/ध्वनिक्षेपक.<br>पद्धत:<br>1. मुलांना वर्तुळाकार बसवून दृकपट्ट्या(Flascards) मध्यभागी ठेवणे.<br>2. पासिंग बॉल ( passing ball) हा खेळ संगीताच्या सहाय्याने खेळविणे.<br>3. संगीत ( Music ) थांबले असता ज्या मुलाच्या हातात चेंडू असेल त्याने दृकपट्ट्या(Flascards) पैकी एक दृकपट्टी निवडणे व त्याचे नाव ओळखणे.व तो अवयव शरीरावर दाखविणे. उदा : तो/ती हात उंचावणे, व जोरात 'हात' असे उच्चारणे.तसेच शरीराचे अवयव इंग्रजी भाषेमध्ये सुद्धा उच्चारावेत.संगीत (Music) सुरु ठेवून खेळ पुन्हा सुरु करणे.सर्व मुलांना संधी मिळेल याची खात्री करणे.<br>शरीराच्या अवयवाचे कार्य विचारणे – मी तोंडाने बोलतो,पायाच्या सहाय्याने चालतो/नृत्य करतो/पळतो/उड्या मारतो, हातच्या सहाय्याने लिहितो/काम करतो/खेळतो. अशी उत्तरे देण्यासाठी मुलांना प्रेरित करणे.<br>सूचना : शिक्षक आपली स्वत:ची काही प्रश्ने विचारू शकतात आणि मुलांना आपल्या स्थानिक भाषेत बोलण्यास प्रोत्साहित करू शकतात.)<br>कृती: लयबद्द गीत (Rhyme) Head, Shoulders, Knees and Toes<br>पद्धत:<br>▪ तालबद्ध व योग्य अभिनयासहित लयबद्द गीत (Rhyme) मुलांना सादर करून दाखविणे.<br>▪ शरीराचे अवयव इंग्रजी भाषेमध्ये परिचित करून देणे. |

| | | |
|---|---|---|
| | | ▪ काही सोपे प्रश्न विचारणे. |
| | माझा वेळ<br>(Free<br>Indore<br>Play) | अध्ययन  सिद्धतेचा भाग असलेल्या 8 अध्ययन कोपऱ्या मध्ये पहिल्या टप्प्यात निश्चित केलेल्या अध्ययन कोपऱ्यानुसार  कृती विषयी तसेच त्या अध्ययन कोपऱ्यात ठेवावयाच्या,सामग्री वापरावयाची पद्धत मुलांना समजावून सांगणे.मुलांना प्रश्न विचारून त्यांना ते समजले आहे याची खात्री करून घेणे.<br>( अध्ययन कोपऱ्यानुसार कृती दिलेल्या आहेत त्याशिवाय शिक्षकांनी सामर्थ्य प्राप्त होण्याच्या दृष्टीने अतिरिक्त कृतीची योजना आखावी. )<br>*****************************************************************************<br>**बिल्डींग ब्लॉक्स कोपरा :**<br><br> सामर्थ्य – हात व डोळे यांचा समन्वय साधतो.<br>कृती: आकारमानाच्या आधारे वस्तू  जोडणे.<br>उद्देश : 4 ते 5 ब्लॉक्स/ वस्तू जोडणे.<br>आवश्यक साहित्य : अध्ययन किट मधील ब्लॉक्स ( उपलब्द नसल्यास - रिकाम्या काडीपेट्या,विविध आकाराची पुस्तके, टूथपेस्ट बॉक्सेस. )<br>पद्धत : आकारमानाच्या आधारे आवश्यक साहित्य एकमेकावर जोडणे/रचणे.<br>टीप : इयत्ता 2 री व 3 री च्या मुलांना- 2 वेगेवेगळ्या प्रकारच्या वस्तू एकमेकावर रचून त्या वस्तू मोजणे आणि उंचीची तुलना करणे.<br>*****************************************************************************<br>**गणित कोपरा :**<br>सामर्थ्य : वस्तूंचे आकारमान, उंच - ठेंगू, जड - हलका या आधारे वस्तूंचे वर्गीकरण करतात आणि सांकेतिकरित्या संख्यांची तुलना करतात.<br><br>कृती : चला ... थोडे चालूया...<br>उद्देश : सूचनांचे पालन करून स्वतंत्ररीत्या कार्यान्वित बनणे.<br>आवश्यक साहित्य: खडू.<br>पद्धत : वर्गामध्ये जमिनीवर वक्र/सरळ रेषा ओढून मुलांना त्यावरून चालण्यास सांगणे.<br>टीप : इयत्ता 2 री व 3 री च्या मुलांना चाललेले अंतर पायाच्या एककात मोजण्यास सांगणे.<br>*************************************************************************************<br>**संशोधन/विज्ञान कोपरा :**<br>सामर्थ्य : वैज्ञानिक मनोभाव, संशोधन वृत्ती आणि तार्किक मनोभाव विकसित होतो.<br>कृती : रंगांची गम्मत...(विकासात्मक ध्येय-3 )<br>विविध रंग मिसळून नवीन रंग तयार करण्याविषयी जाणून घेणे.<br>आवश्यक साहित्य : पारदर्शक प्लास्टिक पेला,पाणी,रंग.<br>पद्धत : वविध रंग पाण्यात मिसळून तयार होणाऱ्या नवीन रंगाचे निरीक्षण करण्यास सांगणे.<br>टीप : इयत्ता 2 री व 3 री च्या मुलांना दोन मुलभूत रंग मिसळून तयार होणाऱ्या नवीन रंगाचे निरीक्षण करण्यास सांगणे.<br>*******************************************************************************<br>**बाहुली कोपरा :**<br>सामर्थ्य: सौंदर्योपासना, अभिव्यक्ती कौशल्याचा विकास करणे.<br>कृती: बाहुल्या जोडणे.<br>उद्देश: विविध आधारावर बाहुल्यांचे वर्गीकरण करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | आवश्यक आवश्यक साहित्य: विविध प्रकारच्या बाहुल्या ( विविध आकाराचे खेळण्यातील प्राणी, पक्षी, मानव, वाहने इ.)<br>पद्धत : 1. दोन बाहुल्यांचे गट करण्यास सांगणे.<br>2. तीन बाहुल्यांचे गट करण्यास सांगणे.<br>मुले आपल्या स्वतःच्या कल्पनेने बाहुल्यांची रचना/मांडणी करतील.( आकारमानाच्या आधारे, क्रमवार, प्राणी, पक्षी, मनुष्य यांचे गट, मनुष्यासोबत कुत्रा/पक्षी व झाडे अशाप्रकारे रचना/मांडणी करणे.)<br>टीप : इयत्ता 2 री व 3 री च्या मुलांना गट करण्याचे कारण विचारणे.<br>*********************************************************************************<br>**वाचन कोपरा :**<br>सामर्थ्य : चित्र वाचनाबरोबरच अर्थ ग्रहण, कल्पना शक्ती, अभिव्यक्ती कौशल्य विकसित करणे.<br>कृती – चित्रवाचन ( Picture Reading )<br>उद्देश : चित्र ओळखण्याबरोबर स्पष्ट वाचन करणे.<br>आवश्यक साहित्य : क्रियापदयुक्त चित्रे/तक्ते.<br>पद्धत : चित्र पाहून क्रियापद ओळखण्यास सांगणे.<br>टीप : इयत्ता 2 री व 3 री च्या मुलांना क्रियापद ओळखण्याबरोबर योग्य हावभाव/अभिनय करण्यास सांगणे.<br>************************************************************************************<br>**हस्तकला / कलागृह कोपरा :**<br><br>सामर्थ्य : सूक्ष्म स्नायूंची वाढ, सौंदर्योपासना, सृजनशीलतेचा विकास.<br>कृती : कापसाचे बोळे चिकटविणे.<br>उद्देश : दिलेल्या सूचनांचे आकलन करून घेवून कार्यान्वित होणे.<br>आवश्यक साहित्य : कापूस, ड्राइंग पेपर, डिंक.<br>पद्धत: शिक्षक मुलांना अक्षरे/आकृत्या/रेखाकृती काढलेले ड्राइंग पेपर देतात आणि त्यावर कापसाचे बोळे चिकटविण्यास सांगणे.<br>टीप : इयत्ता 2 री व 3 री च्या मुलांना चित्रात दाखविल्याप्रमाणे चेहऱ्याचा भाग रेखाटण्यास सांगणे.<br>*******************************************************************************<br>**लेखन कोपरा :**<br>सामर्थ्य : लेखन सरावामध्ये व्यस्त होवून अक्षरांचा आकृतिबंध( Patterns) रचतात.<br>कृती : चला लेखन करू... (विकासात्मक ध्येय-3 )<br>उद्देश : अक्षरांच्या आकृतिबंध रचनेसाठी आवश्यक पूर्वतयारी करणे.<br><br>आवश्यक आवश्यक साहित्य: वाळूयुक्त ट्रे ( Sand Tray)<br>पद्धत : वाळूच्या ट्रेमध्ये ( Sand Tray) हाताच्या बोटाच्या सहाय्याने अक्षरांचा आकृतिबंध ( Pattern) रेखाटण्याचा सराव करण्यास सांगणे.<br>टीप : इयत्ता 2 री व 3 री च्या मुलांना वाळूच्या ट्रे ( Sand Tray) मध्ये हाताच्या बोटाच्या सहाय्याने विविध अक्षरे (मराठी तसेच इंग्रजी) रेखाटण्याचा सराव करण्यास सांगणे.<br>******************************************************************************<br>**खेळणी / करा व शिका कोपरा :**<br>सामर्थ्य : तर्कशक्ती, सृजनशीलता,स्वतंत्ररीत्या कार्य करण्यास सक्षम बनतात...<br>कृती : जोडून पाहू...<br>उद्देश : सुसंगत आणि क्रमबद्ध वस्तू जुळविणे... |

| | | |
|---|---|---|
| | | आवश्यक साहित्य : चिंचोके, मणी, बटण, खडे.<br>पद्धत : शिक्षकांनी सरळरेषा, वक्ररेषा, आकृत्या रेखाटून देणे, मुलांना चित्रात दाखविल्याप्रमाणे वरील साहित्यांचा वापर करून त्या रेषेवरून आकाराप्रमाणे वस्तू ठेवण्यास सांगणे.<br>टीप : इयत्ता 2 री व 3 री च्या मुलांना त्यांनी स्वतः काढलेल्या चित्राच्या सहाय्याने वरील कृती करण्यास सांगणे.<br> |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : ओळख, स्मृती, परिसर जागरूकता<br>कृती 16 : गटात न जुळणारी वस्तू वस्तू ओळखणे. (विकासात्मक ध्येय – 3 )<br>उद्देश : गटाशी संबंधित नसलेली वस्तू ओळखणे.<br>आवश्यक साहित्य : फळे आणि भाज्यांचे नमुने, पेन्सिल आणि पेनचा सट, त्रिकोणाकार पुठ्ठे/ वस्तू आणि एक गोल, प्राणी आणि पक्ष्यांच्या चित्रांचा सट ( प्रत्येक साहित्याचे 3 सट )<br>पद्धत : प्रत्येक सटात एकाच प्रकारच्या तीन वस्तू आणि एक वेगळ्या प्रकारची वस्तू घेवून अशाप्रकारचे अनेक सट तयार करणे.मुलांच्या प्रत्येक गटाला एक - एक सट देणे. मुलांना त्या वस्तूंचे सूक्ष्म निरीक्षण करण्यास सांगणे. वेगळी किंवा गटात न जुळणारी वस्तू ओळखून त्याचे कारण विचारणे.प्रत्येक गटातील मुलांनी या कृतीमध्ये भाग घेवून त्यांना दिलेल्या वस्तूंमधील वेगळी वस्तू कशी निवडली याचे वर्णन करायला सांगणे.<br>इयत्ता 2 री :<br>1. आवश्यक साहित्य घेवून गटात न जुळणारी वस्तू ओळखायला सांगणे.<br>इयत्ता 3 री :<br>1. गटात न जुळणारी वस्तू ओळखणे, सांगणे आणि त्याचे विवरण करणे.<br>* वापरावयाची अध्ययन पत्रके : I.L-13 (1 ली, 2 री, 3 री ) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | सामर्थ्य : सूक्ष्म चालना कौशल्य विकास आणि सृजनशीलतेचा विकास.<br>कृती 47 : ब्रश वापरून चित्र रंगवणे (विकासात्मक ध्येय – 1)<br>उद्देश :<br>• ब्रश पकडण्याची आणि वापरावयाची पद्धत समजून घेणे.<br>• हात आणि डोळे यांच्यामध्ये सुसंगतता वाढवणे.<br>आवश्यक साहित्य : ब्रश, रंग.<br>पद्धत : मुलांना पांढऱ्या पेपरवर रंग आणि ब्रश कसा वापरावा हे दाखविणे. मुलांना त्यांच्या आवडीची चित्रे काढण्याची संधी देणे.नंतर त्या चित्राला ब्रशने रंग भरायला सांगून चित्राचे वर्णन त्यांच्या भाषेत करण्यास प्रोत्साहन देणे.<br>टीप : 2 री आणि 3 रीच्या मुलांना निसर्गाशी संबंधित चित्र काढून रंग भरण्यास सांगणे. |
| | भाषा विकास आणि<br>ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : चित्र वाचन.<br>कृती 17 : हे चेहरे काय सांगतात ? (विकासात्मक ध्येय – 2 ) ECL-9<br>उद्देश :<br>* सांगितलेल्या शब्दानुसार चेहऱ्यावर योग्य हावभाव व्यक्त करणे.<br>* हावभावासहित वेगवेगळ्या भावना चेहऱ्यावर व्यक्त करणे.<br>आवश्यक साहित्य : गोष्टीची पुस्तके / चित्रफीत.<br>पद्धत : वेगवेगळ्या भावना व्यक्त करणारी चित्रे असलेली गोष्टीची पुस्तके निवडा. मुलांना चित्र दाखवून चित्रामधील |

| | | | |
|---|---|---|---|
| | पा<br>या<br>भूत<br>सा<br>क्षर<br>ता | | व्यक्ती कोणत्या भावना व्यक्त करत आहे हे ओळखायला सांगणे. उदा : चित्रातील मुलगी /मुलगा आनंद व्यक्त करत आहे. चित्रातील मुलगी/मुलगा दुःखी आहे इत्यादी.जोपर्यंत चित्ररूपातील भावना प्रत्येक मुले ओळखत / दर्शवत नाहीत तोपर्यंत ही कृती चालू ठेवा. नंतर कथा वाचून सांगा. त्यामध्ये आलेल्या वेगवेगळ्या भावनांना संबंधित शब्द ओळखायला सांगा. शेवटी गोष्टीला संबंधित प्रश्न विचारून उत्तरे मिळवा.<br>उदा: 1) ............ ही घटना घडताना .......... ला कसे वाटले ?<br>2) नवीन कपडे घातल्यानंतर .......... ने कशी प्रतिक्रिया दिली.<br>पुढील टप्प्यात मुलांना त्यांचे डोळे बंद करून या प्रश्नांना भावाभिनय करून उत्तर द्यायला सांगा.<br>नंतर मुलांना मुद्रणाची संकल्पना विकसित करण्यासाठी वेगवेगळ्या भावनांचा तक्ता तयार करण्यास मार्गदर्शन करा. मुलांना वेगवेगळ्या भावना व्यक्त करणारे चेहरे रेखाटण्याची संधी द्या.<br>टीप : 2 री च्या मुलांनी एकानंतर 2-3 हावभाव व्यक्त करणे. 3 रीच्या मुलांनी जास्तीत जास्त चेहऱ्यावरील हावभाव व्यक्त करण्याचा प्रयत्न करणे.<br>वापरावयाची अध्ययन पत्रके : EC – 3 ( इयत्ता 1 ली, 2 री, 3 री ) |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य : शब्द ओळखणे, छापील मजकुराची जाणीव, अर्थग्रहण, शब्द भांडार वाढविणे.<br>कृती 11 : नावांचे जग.<br>उद्देश : परिचित संदर्भातील वस्तूंचा लिपी संकेतांशी संबंध जुळविणे. आवश्यक साहित्य आणि वस्तू एकच आहेत या निष्कर्षावर येणे आणि वाचनाची आवड निर्माण करणे.<br>आवश्यक साहित्य : वही, कार्डशीट पेपर, पेन्सिल, क्रेयॉन्स , आपल्या डोळ्यांना दिसणाऱ्या सभोवतालच्या वस्तू.<br>पद्धत :<br>● मुलांच्या मदतीने वर्गामध्ये असणाऱ्या सामान्य / परिचित वस्तूंच्या नावाची यादी तयार करणे. उदा: टेबल, खुर्ची, दरवाजा इत्यादी.<br>● तयार केलेली नावांची यादी ( नामफलक ) त्या त्या वस्तूवर चिकटविणे.<br>● त्याच नामफलकांची अजून एक यादी फ्लॅशकार्डवर तयार करून ठेवणे.<br>● शब्दांचे फ्लॅशकार्ड वर्गात दाखवून, मुलांकडून मोठ्याने वाचून घेणे.<br>● शब्द उच्चारल्यानंतर मुलांनी ती वस्तू हाताने दाखवावी.<br>● प्रत्येक मुलांनी कमीतकमी 4 ते 5 वस्तूंची नावे सांगण्यास संधी देणे.<br>● ते शब्द गोष्टीमध्ये आल्यानंतर ओळखण्यास प्रेरित करणे.<br>● चित्रासहीत नामफलक किंवा फ्लॅशकार्ड तयार करून, कृतीच्या ठिकाणी / वेळी मुलांना ओळखून वाचण्यास ( चित्रांच्या सहाय्याने ) संधी देणे.<br><br>2 री आणि 3 रीच्या मुलांनी कथा / मजकुरात आलेल्या मुख्य शब्दांचे फ्लॅशकार्ड तयार करणे.<br>मुलांना शिक्षकांनी कथा / मजकूर देवून वाचण्यास प्रोत्साहन देणे. नंतर फ्लॅशकार्डमधील शब्द गोष्टीमध्ये शोधण्याची सूचना देणे.<br>टीप : याआधी या कृतीमध्ये घेतलेले शब्द सोडून वेगवेगळी ठिकाणे,वेगवेगळ्या संदर्भात येणारे शब्द घेवून कृती पुढे चालू ठेवणे. |
| | | उद्देश पूर्वक | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू कौशल्य अभिवृद्धि, उद्देशपूर्वक लेखन. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | लेखन | कृती - 37 **:** चित्र काढणे आणि नाव देणे (विकासात्मक ध्येय – 2 ) **ECW-3**<br>उद्देश :<br>• सूक्ष्म स्नायू कौशल्यांचा विकास करणे.<br>• उद्देशीत लेखनाशी जुळवून घेणे.<br>• आवडीचे चित्र काढणे.<br>आवश्यक साहित्य : पेपर, क्रेयॉन्स , पेन्सिल<br>पद्धत : मुलांना त्यांच्या आवडीच्या फुलाचे, फळाचे चित्र काढण्यास सांगणे. काढलेल्या चित्रात रंग भरून त्या चित्राला नाव देण्यास सांगणे.<br>टीप : 2 री आणि 3 रीच्या मुलांना त्यांच्या आवडीच्या फुलाचे, फळाचे चित्र काढण्यास सांगणे. काढलेल्या चित्रात रंग भरून त्या चित्राला नाव देण्यास सांगणे. |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षकांनी मुलांसमोर फलक लेखन करणे. लेखनाचा योग्य क्रम पाहण्याची संधी मुलांना उपलब्ध करून देणे. मुलांची नावे व मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे वगैरे मुलांसमोर लिहिणे. शिक्षक वर्गात जे काही फलक लेखन करतील ते मुलांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने करणे. |
| | मैदानी खेळ | | कृती : लंगडी<br>सामर्थ्य : शरीराचे संतुलन वाढवणे.<br>आवश्यक साहित्य : छप्पी ( जिबली / लहान सपाट दगड ), रंगीत खडू.<br>जमिनीवर रंगीत खडूच्या सहाय्याने चौरस काढणे.मुलांना चौरसाच्या रेषेला स्पर्श न करता छप्पी ( जिबली / लहान सपाट दगड ) एका चौकातून दुसऱ्या चौकात एक पाय उचलून दुसऱ्या पायाने ( लंगडी घालत ) ढकलत खेळ खेळणे.<br>2 री आणि 3 री च्या मुलांनी हा खेळ पुढे खेळत राहणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शीर्षक : सोनी आणि टोमॅटो.<br>आवश्यक साहित्य : चित्रे<br>उद्देश :<br>➢ श्रवण कौशल्य विकसित करणे.<br>➢ शब्दभांडार वाढविणे.<br>पद्धत :<br>➢ मुलांना साहित्यातील चित्रे दाखवून गोष्टीतील पात्रे / वस्तूंची नावे सांगण्यासाठी सोपे प्रश्न विचारून कथा पुन्हा सांगणे.<br>➢ गोष्टीतील वाक्ये वाचताना गोष्टीमध्ये येणारी सोनी, टोमॅटो इत्यादी चित्रांची मुलांनी नावे सांगण्यासाठी प्रश्न विचारत गोष्टीचा समारोप करणे.<br>( गोष्टीचा आनंद घेण्याबरोबरच लक्षपूर्वक ऐकत आहेत याची खात्री करून घेणे. ) |
| | पुन्हा भेटू | | • दिवसभरात केलेल्या कृती पुनरावर्तीत करणे.<br>• दिवसभरात केलेल्या कृतींचे पालकांशी तसेच कुटुंबातील इतर सदस्यांसोबत चर्चा करण्यास प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत, यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना निरोप देणे.<br>• ‘तू करून बघ’ ही कृती करण्यासाठी योग्य योजना आखणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 3

## दिवस – 16 (गुरुवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 16 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती 1 :<br>प्रत्येक मुलाला त्याच्या नावाने बोलवून "Good morning, welcome " "Have a thrilling Thursday" असे म्हणून स्वागत करा. त्यांनी "Good morning, Thank you. Same to you" असे उत्तर द्यायला हवं.<br>कृती 2 :<br>दिवस 14 मध्ये उल्लेख केलेल्या शुभेच्छांची देवाणघेवाण कृती पुनरावर्तीत करा. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती : मज्जा करूया.<br>आवश्यक साहित्य : खडू / काठी<br>पद्धत :<br>1. मुलांना मैदानात घेवून जा आणि वर्तुळाकारात उभे करा.<br>2. प्रत्येक मुलाकडे खडू / काठी द्या आणि खाली बसून त्यांच्या हातचा किंवा पायाचा आकार खडू / काठीने जमिनीवर रेखाटायला मदत करा.<br>3. त्यांचे पाय, पायाची बोटे आणि हात, इतरांच्या पाय, पायाची बोटे आणि हातांशी तुलना करण्यास सांगा. तसेच चित्राचा आकार, आकारमान आणि ते कसे दिसते याबद्दल बोलायला सांगा.<br>कृती : इंग्रजी गाणे ( Rhyme)<br>• Head, shoulders, knees and toes इंग्रजी गाणे (Rhyme) खालील पद्धतीने गा.<br>**Teacher: Head, shoulders,**<br>**Students: knees and toes**<br>**Teacher: Knees and toes,**<br>**Students: Knees and toes,**<br>**Teacher: Head, shoulders,**<br>**Students: knees and toes**<br>**Teacher: It's my body.**<br>**Students: It's my body.**<br>**Teacher: Eyes and ears and**<br>**Students: mouth and nose**<br>**Teacher: Mouth and nose,**<br>**Students: Mouth and nose,**<br>**Teacher: Eyes and ears and**<br>**Students: mouth and nose**<br>**Teacher: Eyes and ears and**<br>**Students: mouth and nose** |

| | | |
|---|---|---|
| | | **Teacher: It's my body.** |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुले त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करतात.<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे काम करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : रंग आणि आकाराच्या आधारे वर्गीकरण आणि परिसराबद्दल जाणीव.<br>कृती - 31 : वर्गीकरण करणे (विकासात्मक ध्येय 3 )<br>उद्देश : गुणधर्मानुसार वर्गीकरण करणे.<br>आवश्यक साहित्य : मातीच्या गोळ्यासारख्या वस्तू, खडे, बटण, बिया, अंगठ्या<br>पद्धत : वेगवेगळ्या आकार आणि रंगांच्या वस्तू जमिनीवर पसरवून एकाच रंगाच्या किंवा आकाराच्या वस्तूंचा गट करणे. दिलेल्या वस्तूंची तुलना करून त्यांच्यातील साम्य आणि फरक ओळखण्यास सुचविणे. तसेच साम्य आणि फरक कोणत्या आधारावर ओळखता येते याबद्दल चर्चा करणे.<br>इयत्ता – 2 री<br>1. वेगवेगळ्या रंगाच्या आणि आकाराच्या वस्तूंचे गट करण्यास सांगणे.<br>इयत्ता - 3 री<br>सूचनेप्रमाणे फक्त एकाच रंगाच्या किंवा आकाराच्या वस्तू वेगळ्या करून गट करणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांच्या कृती) | सामर्थ्य : सूक्ष्म चालना कौशल्यांची अभिवृद्धि आणि सृजनशीलतेचा विकास, डोळे आणि हातांची सुसंगतता<br>कृती - 34 : आकृत्या चिकटविणे. (विकासात्मक ध्येय : 1)<br>उद्देश :<br>• वेगवेगळ्या आकृत्या ओळखणे.<br>• कात्रीने कागद कापून चिकटविण्याची पद्धत शिकणे.<br>• हात आणि बोटांची कुशलता वृद्धिंगत करण्याबरोबरच एकाग्रता वाढविणे.<br>आवश्यक साहित्य : रंगीत पेपर, कात्री, डिंक.<br>पद्धत : पांढऱ्या पेपरमध्ये वेगवेगळ्या आकृत्यांची (वर्तुळ, त्रिकोण, चौरस आणि आयत) चित्रे कापून दुसऱ्या एका रंगीत पेपरवर चीकटविण्यास सांगणे. |
| | भा षा वि का स आ णि पा या भूत सा — ऐकणे व बोल णे | सामर्थ्य : शब्द रचना<br>कृती - 10 : शब्दरचना ( गट -2 ) ECL -10<br>उद्देश :<br>❖ शब्दरचना कौशल्य वृद्धिंगत करणे.<br>❖ शब्दभांडार वाढविणे.<br>पद्धत :<br>❖ मुलांना वर्तुळाकार उभे करून स्पष्ट सूचना देवून कृतीला सुरुवात करणे.<br>❖ मी सांगितलेलं अक्षरे ऐका.<br>❖ अक्षरे जोडून शब्द रचना करून सांगा.<br>उदा: शिक्षकांनी जोराने ‘ स ’( थोडा वेळ शांत राहून ) ‘ र ’ असे उच्चारल्यास मुले अक्षरे ऐकून ‘ सर ’ अशी शब्द रचना करतील. |

| | | | |
|---|---|---|---|
| | क्षर<br>ता | | ही कृती शिक्षक टप्प्याटप्प्याने तीन अक्षरी आणि चार अक्षरी शब्द तयार करण्यासाठी वापरतील.<br>टीप: 2 री ची मुले एका अक्षराला संबंधित 2 - 3 शब्द सांगतील. 3 रीची मुले 2 री च्या मुलांनी सांगितलेले शब्द वापरून स्वतः वाक्य रचना करतील.<br>**अभ्यास पत्रक :** EC – 4 ( **वर्ग : 1, 2, 3** ) |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य : शब्दभांडाराची अभिवृद्धि, स्वयं अभिव्यक्ती, घटना वाचतात.<br>कृती - 1 A : तार्किक वाचन. (विकासात्मक ध्येय : 2 )<br>उद्देश : अंदाज बांधून पुस्तकातील चित्रांचा संबंध जोडून वाचन करतील.<br>आवश्यक साहित्य : सचित्र निर्देशिका / सचित्र गोष्टीचे पुस्तक<br>पद्धत : मुले पुस्तकातील चित्रे पाहून स्वतः अंदाज बांधून वाचन करतील.<br>2 री आणि 3 री च्या मुलांना त्यांच्या आवडत्या गोष्टी सांगणे आणि चित्र काढून वाचन करण्यास वाव देणे. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : इतर मुलांसह लेखन, उद्देशपूर्वक लेखन, निरीक्षण आणि श्रवण, सृजनशील विचार, शब्दभांडाराची अभिवृद्धि.<br>कृती - 32 : सामुहिक लेखन (विकासात्मक ध्येय – 2 ) ECW-8<br>उद्देश :<br>• सामुहिक लेखनाची ओळख करून देणे.<br>• उद्देशीत लेखनाच्या पायऱ्यांचा सराव करणे.<br>• लक्षपूर्वक उद्देशीत लेखनामध्ये समरस होणे.<br>• सृजनात्मक विचार करून लेखनातून व्यक्त करणे.<br>• शब्दभांडाराची अभिवृद्धि करणे.<br>आवश्यक साहित्य : फळा, ड्रॉईंग पेपर.<br>पद्धत : सामुहिक लेखन कृती महिन्यातून दोन अथवा तीनदा आयोजित करणे. एखादा विषय घेवून त्या विषयाला संबंधित त्यांचे अनुभव गोष्टीच्या स्वरूपात किंवा लेखनाच्या स्वरूपात मांडणे.<br>उदा : विषय – माझी शाळा<br>लक्षात घ्यावयाचे मुद्दे :<br>• प्रत्येक विषयाला संबंधित वाक्ये तयार करण्यासाठी आवश्यक संकेत (clue) देणे. शिक्षकांनी मुलांसह स्वतः सहभाग घेवून लेखनाचे प्रात्यक्षिक दाखविणे.<br>• शिक्षकांनी पहिले वाक्य लिहून वाचणे.नंतर मुलांना त्यांचे स्वतःचं वाक्य सांगून लिहायला सांगणे.<br>• मुलांना त्यांच्या स्थानिक भाषेतून प्रतिसाद देण्याची संधी उपलब्ध करून देणे. नंतर शिक्षकांनी सर्वांना प्रमाणित भाषेत भाषांतर करून सांगणे.<br>टीप : 1 ली च्या मुलांनी सांगितलेले मुद्दे 2 री आणि 3 री च्या मुलांना लिहून व्यक्त करण्यास सांगणे. |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षकांनी मुलांसमोर फलक लेखन करणे. लेखनाचा योग्य क्रम पाहण्याची संधी मुलांना उपलब्ध करून देणे.मुलांची नावे व मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे वगैरे मुलांसमोर लिहिणे. शिक्षक वर्गात जे काही फलक लेखन करतील ते मुलांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने करावे. |
| | मैदानी खेळ | | कृती : पुतळ्यासारखे उभे राहा.<br>सामर्थ्य : एकाग्रता वाढविणे, सूचना पालन, पायांची हालचाल.<br>पद्धत: शिक्षक Fire in the mountain Run Run Run... असे म्हटल्यानंतर मुले पळायला लागतील. मग मध्येच शिक्षक statue असे म्हणताच मुलांनी पळाणे थांबवून आहे त्या स्थितीत पुतळ्यासारखे एकाच जागी थांबले पाहिजे. हालचाल करणारी मुले खेळातून बाहेर जातील. |

| | | |
|---|---|---|
| | | 2 री आणि 3 री च्या मुलांना वेगवेगळ्या योगाच्या आसनात थांबायची सूचना देणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | शीर्षक : सोनी आणि टोमॅटो<br>आवश्यक साहित्य : मुखवटे<br>उद्देश :<br>➢ ऐकण्याचे कौशल्य वृद्धिंगत करणे.<br>➢ शब्दभांडार वृद्धिंगत करणे.<br>➢ कुतुहल निर्माण करण्याचे कौशल्य विकसित करणे.<br>पद्धत:<br>➢ कथा मराठी आणि इंग्रजी भाषेत सांगणे.<br>➢ पात्रांना अनुसरून तयार तयार केलेले मुखवटे घालावयास सांगणे.<br>➢ मोठ्या वर्गातील मुलांना घेवून पात्रांची विभागणी करून अभिनय करावयास सहकार्य करणे.<br>➢ कथाकथन मनोरंजनात्मक बनविणे.<br>❖ कथा सांगून झाल्यानंतर प्रश्न विचारा.<br>( गोष्टीचा आनंद घेण्याबरोबरच लक्षपूर्वक ऐकत आहेत याची खात्री करून घेणे. ) |
| | पुन्हा भेटू | • दिवसभरात केलेल्या कृती पुनरावर्तीत करणे.<br>• दिवसभरात केलेल्या कृतींची चर्चा पालक तसेच कुटुंबातील इतर सदस्यांसोबत करण्यास प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत, यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना निरोप देणे.<br>• ‘तू करून बघ’ ही कृती करण्यासाठी योग्य योजना आखणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 3 दिवस – 17 (शुक्रवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 17 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती 1 : 1<br>प्रत्येक मुलाला त्याच्या / तिच्या नावाने बोलवून “Good morning, welcome ” “Have a Funfilled Friday” असे म्हणून मुलांचे स्वागत करा. ते “Good morning, Thank you. Same to you” असा प्रतिसाद देतील.<br>कृती : 2<br>दिवस – 14 मध्ये उल्लेख केलेल्या शुभेच्छा देवाणघेवाण कृती पुन्हा करा. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती : फरक शोधा.<br>आवश्यक साहित्य : ध्वनिवर्धक किंवा मोबाईल, विविध प्राण्यांचे फ्लॅशकार्ड.<br>पद्धत: 1. मुलांना वर्तुळात उभे करा.<br>2. त्यांच्या आवडत्या प्राण्याविषयी बोलण्यासाठी प्रेरित करा. ( पाळीव प्राणी किंवा जंगली प्राणी ) या नमुन्याप्रमाणे शिक्षकांनी प्रारंभ करणे.<br>3. बोलण्यासाठी प्रत्येक मुलाला संधी मिळेल याची खात्री करा. |

| | | |
|---|---|---|
| | | 4. 2 री आणि 3 री च्या मुलांनी आवडत्या प्राण्याची वैशिष्ट्ये काय आहेत याबद्दल बोलणे.<br>( सूचना : शिक्षक त्यांचे स्वत:चे प्रश्न विचारू शकतात आणि मुलांना त्यांच्या स्थानिक भाषेत बोलायला प्रोत्साहन देवू शकतात. )<br>• **Head, shoulders, knees and toes** ही **rhyme** ( लयबद्द गीत ) अभिनयासहित मुलांसोबत म्हणणे. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुले त्यांच्या आवडत्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करतात.<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे काम करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : ध्वनी जागरूकता, स्मरणशक्ती आणि परिसराबदल जागरूकता<br>कृती 2 : आवाज ऐकून ओळख. (विकासात्मक ध्येय 3 )<br>उद्देश : आवाज ऐकून ओळखणे.<br>आवश्यक साहित्य : श्रवण यंत्र.<br>पद्धत : मुलांना वेगवेगळ्या गटात बसायला सांगणे. प्रत्येक गटातील मुलांनी श्रवणयंत्राच्या सहाय्याने प्राण्याचा आवाज ऐकून, कोणता प्राणी आहे ते ओळखणे. प्रत्येक मुलाला संधी मिळेपर्यंत कृती पुढे चालू ठेवणे.<br>इयत्ता 2 री –<br>1. शिक्षकांनी प्राणी किंवा पक्ष्याचा आवाज काढून, हा कोणत्या प्राणी किंवा पक्ष्याचा आवाज आहे हे ओळखायला सांगणे.<br>2. नंतर मुलांना प्राणी आणि पक्ष्यांचा आवाज काढायला सांगणे.<br>इयत्ता 3 री –<br>1. प्राण्यांचा आवाज ओळखून प्राण्यांच्या नावांची यादी करणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांच्या कृती) | सामर्थ्य : स्वत: आणि इतरांबद्दल जाणीव,तोंडी भाषा विकास, शब्दभांडाराची अभिवृद्धि.<br>कृती 03 : अभिनय गीत / नाटक. (विकासात्मक ध्येय – 1 )<br><br>चिव चिव चिमणी<br>दिसते किती देखणी<br>दाणे पहा खाते<br>पाणी कशी पिते<br>अंगणात येते<br>चिव चिव करते<br>साद मला देते<br>झाडांची वेलींची नावे मला सांगते<br>फळांची फुलांची ओळख करते<br>चिव चिव चिव चिव भुर्र उडून जाते<br><br>उद्देश :<br>• शारीरिक वाढ आणि विकास होतो.<br>• शब्दभांडार वाढविण्याबरोबरच ताल, लय, संदर्भ आणि स्पष्ट उच्चार करतात.<br>• हावभाव ओळखणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आवश्यक साहित्य : बालगीताची प्रत.<br>पद्धत : मुलांना वर्तुळाकारात उभे करणे. सुलभकारांनी मुलांना माहीत असलेले बालगीत गाण्यास प्रेरित करणे. बालगीत शरीराची हालचाल, हावभावासह म्हणणे. बालगीतातील लयबद्ध शब्द ऐकून त्यांचा आनंद घेण्यास प्रोत्साहन देणे.<br>टीप : 2 री आणि 3 री वर्गांसाठी अभिनय गीत म्हणून झाल्यानंतर प्रश्न विचारून उत्तर मिळविणे.<br>वापरावयाचे अभ्यास पत्रक : H. W. – 4 ( इयत्ता 1 ली, 2 री, 3 री ) |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : लक्ष केंद्रित करणे आणि ऐकणे, अनुक्रमिक विचार, स्थूल स्नायू कौशल्य अभिवृद्धी.<br>कृती - 19 : ध्वनीतील फरक ओळखणे . (विकासात्मक ध्येय -2 ) ECL - 11<br>उद्देश :<br>❖ वेगवेगळे शब्द ऐकून फरक ओळखणे.<br>❖ शब्द क्रमाने सांगण्याचा सराव करणे.<br>❖ ध्वनीशी संबंधित सूक्ष्म स्नायू चालना कौशल्ये विकसित करणे.<br>आवश्यक साहित्य : खडू, मार्कर, क्रेयॉन्स, क्रमसंख्या लिहिलेला तक्ता.<br>पद्धत : शिक्षक चार शब्द एकत्रितरीत्या सांगतील.त्यामधील तीन शब्द एकाच आरंभिक ध्वनीने सुरु होणारे असले पाहिजेत आणि एक शब्द वेगळ्या ध्वनीने सुरु होणारा असावा. उदा: कमळ, कर, काम, मकर यामधील वेगळा आरंभिक ध्वनी असलेला शब्द कोणता? असे विचारून ओळखायला सांगणे.<br>टीप : 2 री च्या मुलांना जोडाक्षरे असलेले शब्द देणे. 3 री च्या मुलांनी स्वत: शब्दांच्या गटाची रचना करून सांगणे. |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य : छापील मजकुराबद्दल जाणीव, शब्द ओळखतात, अर्थग्रहण करतात, शब्दभांडाराचा विकास आणि परिसराची जाणीव.<br>कृती - 18 : चित्र संचयिका (विकासात्मक ध्येय – 2 ) विषय : फक्त रात्रीच्यावेळी दिसणाऱ्या वस्तू / गोष्टी.<br>उद्देश :<br>• चित्र वाचणे आणि चर्चा करून अर्थग्रहण करणे.<br>• आनंद, मनोरंजन आणि इतर उद्देशांसाठी स्वतंत्रपणे वाचन करणे.<br>आवश्यक साहित्य : फक्त रात्रीच्यावेळी दिसणाऱ्या वस्तू/गोष्टींना संबंधित चित्रे, त्यांना पूरक अशी गाणी/ गोष्टी/ कविता यांची यादी.<br>पद्धत :<br>❖ मुलांना परिचित असलेली गाणी आणि बालगीतांना संबंधित चित्रे ओळखणे.<br>❖ गाणे किंवा गोष्टीमध्ये आलेले विशेष शब्द ओळखून त्यांना नावे देणे.<br>❖ गाणे किंवा गोष्टीमध्ये आलेली प्रमुख पात्रे ओळखणे आणि पुनरावर्तीत शब्द/ओळी सांगणे/लिहिणे.<br>❖ नमुना चित्रे ( फक्त रात्रीच्यावेळी दिसणाऱ्या वस्तू / गोष्टींना संबंधित ) वाचणे आणि त्याविषयी प्रतिसाद देत शिक्षकांशी चर्चा करतील.<br>वैयक्तिक चित्र संचयिका : कथा किंवा गाण्यामध्ये येणाऱ्या वस्तू किंवा विशेष शब्द, संदर्भिक चित्रे वाचून अर्थग्रहण करून व्यक्तिगतरीत्या चर्चा करण्यास मुलांना अनुमती देणे. ती चित्रे वाचून अर्थग्रहण करून अभिव्यक्त होतात.<br>उदा : चंद्र, चांदण्या, पथदीप इत्यादी चित्रे किंवा व्हिडीओ.<br>शिक्षकांनी मार्गदर्शन करताना वापरावयाचे प्रश्न :<br>• फक्त रात्रीच्यावेळी दिसणाऱ्या वस्तू किंवा गोष्टी कोणत्या ?<br>• त्यातील तुला आवडणाऱ्या वस्तू कोणत्या ? |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अशाप्रकारे शिक्षकांनी प्रश्नावली तयार करून वर्गाला अनुकूल होईल याची काळजी घेतात.<br>फक्त रात्रीच्यावेळी दिसणाऱ्या वस्तू / गोष्टींची चित्रे / व्हिडीओ / गाणी / गोष्टी वापरून अथवा दाखवून मुलांसोबत चर्चा करणे.<br>सदर संदर्भासाठी शिक्षकांनी मुलांना मुक्तपणे बोलण्याची, प्रश्न विचारण्याची आणि त्यांच्या सोप्या भाषेत चर्चा करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.<br>शिक्षकांनी 2 री आणि 3 री च्या वर्गातील मुलांना, 1 ली च्या मुलांसोबत परस्पर चर्चा करण्यासाठी सहकार्य करावयास सांगणे आणि विषयची सविस्तरतपणे चर्चा करताना सर्व मुलांना व्यक्त होण्याची संधी मिळेल याची खात्री करणे. त्याबरोबरच 2 री आणि 3 री च्या मुलांनी त्यांच्या वयोमानाला अनुसरून विषय व्याप्तीवरील उन्नत विचार चर्चेमध्ये समाविष्ट होतील यासाठी संधी उपलब्ध करून देणे.<br>(सदर कृतीचा पुढील भाग 23 व्या दिवशी घ्यावयाचा आहे.) |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : लेखन कौशल्याचा सराव, शब्दभांडाराची अभिवृद्धि, हात आणि डोळे यांची सुसंगतता, सृजनशीलता.<br>कृती - 34 : नोंदवही रचना (विकासात्मक ध्येय – 2 ) ECW-9<br>उद्देश :<br>• मुलांची हस्तपुस्तिका तयार करणे.<br>• मुलांच्या आवडत्या चित्रांचा संग्रह करून पुस्तक तयार करणे.<br>• चित्रे काढणे आणि त्यांचा संग्रह करण्याची आवड निर्माण करणे.<br>आवश्यक साहित्य : पेपर, रंग, कार्डशीट.<br>पद्धत : शिक्षकांनी वर्गाची नोंदवही तयार करण्यासाठी मुलांना मदत करणे. यामध्ये प्रत्येक मुलाला एका पेपरवर सुचविलेल्या विषयाबदल चित्र काढायला किंवा लिहायला सांगणे. नंतर तो पेपर वर्गाच्या नोंदवहीमध्ये ठेवण्यासाठी उपलब्ध करून देणे. सर्व मुलांचे पेपर एकत्रित करून वर्गाची नोंदवही तयार करणे.<br>सुचविलेले विषय : माझा आवडता खेळ.<br>टीप : 2 री आणि 3 री चे सर्व विद्यार्थी नोंदवही रचना करतील. ( 31 व्या दिवशी ही कृती पुढे चालू राहील ) |
| | मैदानी खेळ | | कृती : सांगा सांगा किती ? तुम्ही सांगाल तेवढे.<br>सामर्थ्य : संख्या ज्ञान विकसित करणे.<br>पद्धत : मुलांनी वर्तुळाकारात उभे करून शिक्षकांनी सांगा सांगा किती ? असे म्हटल्यानंतर मुलांनी तुम्ही सांगाल तेवढे असे उत्तर द्यावे. नंतर शिक्षकांनी सांगितलेल्या संख्येला अनुसरून मुलांनी गट करणे. संख्येला अनुसरून गट न करणाऱ्या मुलांनी खेळातून बाहेर जाणे.<br>2 री च्या मुलांना समसंख्या आणि 3 री च्या मुलांना विषम संख्या सांगत खेळ खेळणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शीर्षक : सोनी & टोमॅटो<br>आवश्यक साहित्य : आवश्यक साहित्य, पात्रांची चित्रे.<br>उद्देश :<br>➢ ऐकण्याचे कौशल्य वृद्धिंगत करणे.<br>➢ शब्दभांडार वृद्धिंगत करणे.<br>➢ कुतुहल निर्माण करण्याचे कौशल्य विकसित करणे.<br>➢ अभिनय कौशल्य विकसित करणे.<br>पद्धत:<br>➢ कथा वाचून पुनरावलोकन करणे.<br>➢ गोष्टीतील पात्रांची नावे मुलांन सांगायला लावून निरोप देणे.<br>➢ याच पद्धतीने लहान गोष्टी शिक्षकांनी सांगणे. |

| | | |
|---|---|---|
| | पुन्हा भेटू | • दिवसभरात केलेल्या कृती पुनरावर्तीत करणे.<br>• दिवसभरात केलेल्या कृतींची चर्चा पालक तसेच कुटुंबातील इतर सदस्यांसोबत करण्यास प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत, यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना निरोप देणे.<br>'तू करून बघ' ही कृती करण्यासाठी योग्य योजना आखणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा - 3** **दिवस – 18 (शनिवार)**

| | |
|---|---|
| प्रतिबिंब (वर्गातील निरंतर मूल्यमापन) | • विविध तंत्र वापरून (निरीक्षण, तपशील पट्टी, मुलांची अध्ययन पत्रके, व्हिडीओ, सांदर्भिक नोंदी, इत्यादी) तुम्ही संग्रह केलेल्या मूल्यमापन नोंदी/माहिती यांचे पुनरावलोकन करणे.<br>• प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिगत गरजेनुसार पुढील आठवड्यातील अध्ययन प्रक्रियेची योजना आखणे.<br>• अध्ययनाच्या तिन्ही विकासात्मक ध्येयांच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे. |

# माझी प्रगती-2

**आठवडा - 3** **दिवस – 18 (शनिवार)**



| प्राप्त केलेल्या अध्ययन निष्पत्ती | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती | क्वचित | कधीतरी | नेहमी |
| 1 | शाळेच्या दैनंदिन कृतींशी जुळवून घेतो/ घेते. | | | |
| 2 | शाळेला आनंदाने येतो/ येते. | | | |
| 3 | शिक्षकांना व वर्गमित्रांना अभिवादन करतो/ करते. | | | |
| 4 | सामुहिक कृतीमध्ये उत्साहाने सहभागी होतो/ होते. | | | |
| 5 | साध्या सूचनांचे पालन करतो/ करते. | | | |
| 6 | आपल्या आजूबाजूच्या परिसराविषयी कुतुहूल दाखवितो/ दाखविते. | | | |
| 7 | चिखल / पिठापासून प्रतिकृती तयार करण्याचा आनंद घेतो/ घेते. | | | |
| 8 | एकाच प्रकारच्या वस्तूंचा गट करतो/ करते. | | | |
| 9 | इंद्रियांच्या सहाय्याने वस्तू ओळखतो/ ओळखते. | | | |
| 10 | लयबद्ध कविता/बालगीतांचा आंनद घेतो/ घेते. | | | |
| 11 | चित्रफितीतील वस्तूंची नावे ओळखतो/ ओळखते. | | | |
| 12 | विचार व्यक्त करण्यास घाबरतो/ घाबरते. | | | |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा - 4** **दिवस – 19 (सोमवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 19 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती – 1 : आईस ब्रेकर<br>आवश्यक साहित्य : ढोल/ड्रम.<br>पद्धत :<br>1. मुलांनी मुठ्ठी आवळून हात वर करून 'जय' असे म्हणत वर्गात प्रवेश करावा. नंतर " हाय टीचर " असे मुलांना म्हणायला सांगणे.<br>2. मुले वर्गात आल्यानंतर शिक्षकांनी " नमस्ते, गुड मॉर्निंग " अशा शुभेच्छा द्याव्यात.<br>3. त्यानंतर प्रत्येक मुलाला नावासहित " तू आज कसा आहेस ?" असे विचारून " मी छान आहे. धन्यवाद!" असा प्रतिसाद द्यायला प्रेरित करणे.<br>4. प्रतिसाद ऐकून, "आज कोणता वार आहे?" आणि "आज सोमवार आहे" असे उत्तर मुलांकडून आले पाहिजे.<br>5. मुलांना Left right left असे म्हणत कदमताल करत वर्गामध्ये वर्तुळ तयार करायला सांगणे. मुलांमध्ये आवड आणि उत्साह निर्माण करण्यासाठी शिक्षक ढोलचा वापर करू शकतात.<br>( प्रत्येक मुलाचे गुडघे वाकलेले आहेत आणि त्यांचे पाय जमिनीला स्पर्श करत आहेत याची खात्री करा. ) |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती - 1 : रंगात रंगुया (विकासात्मक ध्येय – 1 )<br>सामर्थ्य : स्वजाणीव, धनात्मक व्यक्तिगत कल्पनांची अभिवृद्धि, श्रवण करतात आणि बोलतात.<br>उद्देश : आवडत्या विषयावर मुलांनी बोलणे.<br>आवश्यक साहित्य : रंगीत पेन्सिल, ट्रे.<br>पद्धत :<br>1. मुलांना वर्तुळाकारात बसवा.<br>2. मुलांशी सहजपणे संवाद साधत रंगांबद्दल बोलण्यास प्रोत्साहित करा.<br>( तुम्हाला कोणकोणते रंग माहित आहेत? )<br>3. नंतर इयत्ता 2 री आणि 3 री च्या मुलांना "तुमचा आवडता रंग कोणता?" असे विचारा. ( " मला निळा / लाल / हिरवा / पिवळा इत्यादी रंग आवडतो / आवडतात. असे सांगायला प्रेरित करा. )<br>4. त्यानंतर वेगवेगळ्या रंगांच्या पेन्सील ट्रे मध्ये ठेवा.<br>5. त्यांच्या आवडीच्या रंगाची पेन्सिल उचलण्यासाठी एकेका मुलांना संधी द्या.<br>6. मुलांना चर्चा करायला सांगा आणि त्या विशिष्ट रंगाची पेन्सिल त्याने / तिने का निवडली ते विचारा. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुले त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करतात.<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे काम करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता | सामर्थ्य : स्पर्श संवेदना, परिसराबद्दल जागरूकता.<br>कृती – 9B : सूचित संख्या ( क्रमाने जोडणी ) (विकासात्मक ध्येय – 3 )<br>उद्देश : क्रमाने जोडणे.<br>आवश्यक साहित्य : 1 ते 10 पर्यंतचे संख्या कार्ड ( गणित अध्ययन आंदोलन कीट मधील कार्ड वापरू शकतो ) |

| | | | |
|---|---|---|---|
| | आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती ) | | पद्धत : मुलांना वर्तुळाकारात बसविणे. 1 ते 10 पर्यंतचे संख्या कार्ड एका ट्रेमध्ये ठेवून त्यामधील सूचित संख्या क्रमाने जोडण्यासाठी संधी उपलब्ध करणे.<br>इयत्ता : 2 री<br>1 ते 10 पर्यंतच्या संख्या उलट्या क्रमाने म्हणत लिहिणे.<br>इयत्ता : 3 री<br>संख्या क्रमाने लिहित अक्षरात लिहिणे.<br>❖ वापरावयाची अध्ययन पत्रके : I. L. – 14 ( 1 ली, 2 री 3 री ) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांच्या कृती) | | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायूंचा विकास, सृजनशीलतेचा विकास, हात आणि डोळ्यांची सुसंगतता, आकाराच्या संकल्पनेचा विकास.<br>कृती - 33 : वाळूमध्ये गिरवणे.<br>उद्देश :<br>• सूक्ष्म स्नायूंचा विकास करणे.<br>• हात आणि डोळ्यांमधील सुसंगतता साधण्यास मदत करणे.<br>• पूरक कृतीतून लेखन कौशल्य विकसित करणे.<br>आवश्यक साहित्य : वाळू, काडी / काठी<br>पद्धत : एका खोलगट ट्रेमध्ये वाळू घेवून, लहान काठीने गिरवायला सांगणे. वेगवेगळ्या रेषांमधील सरळरेषा / वक्ररेषा आणि आकार काढायला सांगणे. वेगवेगळी चित्रे काढायला सांगणे.<br>टीप : 2 री आणि 3 री च्या मुलांना सरळरेषा आणि वक्ररेषा वापरून वेगवेगळ्या आकृत्या काढायला संधी उपलब्ध करून देणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : शब्दभांडार विकसित करणे, अंदाज बांधणे, गटातील सदस्यांसोबत एकमेकांच्या मदतीने कृती करणे.<br>कृती – 6A : मला शोधा. (विकासात्मक ध्येय – 2 ) ECL - 12<br>उद्देश :<br>❖ सांघिक भावनेचा विकास करणे.<br>❖ योग्य शब्दांची रचना करणे.<br>❖ सूचना लक्षपूर्वक ऐकून त्यानुसार अनुकरण करणे.<br>❖ शब्दभांडार विकसित करणे.<br>आवश्यक साहित्य : परिचित वस्तू, प्राणी, पक्ष्यांची चित्रे.<br>पद्धत : चित्रांच्या दृकपट्ट्या ( फ्लॅशकार्ड ) एका बॉक्समध्ये घालणे. वर्गातील प्रत्येक मुलाला बोलावून बॉक्समधील एक – एक फ्लॅशकार्ड उचलून त्याचे नाव सांगायला लावणे. मुलांनी उचललेल्या चित्राबद्दल त्यांच्यासोबत चर्चा करणे. अशा पद्धतीने ही कृती पुढे चालू ठेवणे.<br>टीप : 2 रीच्या मुलांनी त्यांनी उचललेल्या चित्राबद्दल 3-4 वाक्ये बोलणे. 3 रीच्या मुलांनी 2-3 मिनिटे त्या चित्राविषयी बोलणे. |
| | | आकलना | सामर्थ्य : शब्द ओळखणे, छापील मजकुराची जाणीव, अर्थग्रहण, शब्दभांडाराची अभिवृद्धि.<br>कृती – 11A : नामफलक (विकासात्मक ध्येय – 2 )<br>उद्देश : नामफलकावरील नावे चित्रांच्या सहाय्याने ओळखणे आणि वाचणे.<br>आवश्यक साहित्य : दृक पट्टी (फ्लॅशकार्ड) , वही, व्हिडीओ.<br>पद्धत : प्रत्येक मुलाचे नाव फ्लॅशकार्डवर किंवा कार्डशीट पेपरवर लिहून मुलाच्या नावाच्या बाजूला कोणतीही वस्तू, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सहीत वाचन | प्राण्याचे चित्र चिकटवून नामफलक तयार करणे. नंतर मुलाला त्याचे नाव ओळखण्यास सांगणे. जर मुलांना आपले नाव ओळखता आले नाही तर नावाच्या बाजूला चिकटवलेल्या चित्राच्या मदतीने त्यांना त्यांचे नाव ओळखायला सांगणे.<br>2 री आणि 3 री : शिक्षकांनी शब्दांच्या यादीचा तक्ता मुलांना दाखवून त्यातील काही शब्द मोठ्याने वाचतील आणि शिक्षकांनी सांगितलेले शब्द ओळखून मुले तक्त्यामध्ये ते शब्द दाखवतील. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : उद्देशपूर्वक लेखन, सृजनशील विचार, शब्दभांडाराची अभिवृद्धि, ऐकून अर्थग्रहण करणे, परिसराबद्दल जागरूकता.<br>कृती - 33 : यादी करूया (विकासात्मक ध्येय – 2 ) ECW-10<br>उद्देश :<br>• उद्देशानुसार लेखन करण्याची संधी उपलब्ध करून देणे.<br>• सृजनशील विचार वृद्धिंगत करणे.<br>• परिसराबद्दल जागरूकता निर्माण करणे.<br>• शब्दभांडार विकसित करणे.<br>• सूचना ऐकून अर्थग्रहण करणे.<br>आवश्यक साहित्य : वही, कागद, क्रेयॉन्स<br>पद्धत : मुलांचे शब्दभांडार वाढविण्यासाठी आणि उद्देशीत लेखनाला संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुलांना वेगवेगळ्या विषयांशी संबंधित शब्दांची यादी करण्यास सांगणे.<br>सुचविलेला विषय : आम्ही पाहीलेल्या वस्तू.<br>उदा : वर्गामध्ये असलेल्या वस्तूंची नावे एका तक्त्यावर लिहिण्याच्या कृतीचे आयोजन करू शकतो. शिक्षकांनी या तक्त्यावर वापरल्या जावू शकणाऱ्या सामान्य शब्दांची यादी करून, मुले ती यादी पाहू आणि वाचूशकतील अशा पद्धतीने वर्गात प्रदर्शित करणे.<br>टीप : इयत्ता 1 ली च्या मुलांनी तयार केलेल्या यादीमध्ये 2 री च्या मुलांनी आणखी शब्द मिळविणे. 3 रीच्या मुलांना तक्त्यावरील शब्द वापरून त्यांचे स्वतःचे वाक्य तयार करण्यासाठी संधी देणे. |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षकांनी मुलांसमोर फलक लेखन करणे. लेखनाचा योग्य क्रम पाहण्याची संधी मुलांना उपलब्ध करून देणे. मुलांची नावे व मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे वगैरे मुलांसमोर लिहिणे. शिक्षक वर्गात जे काही फलक लेखन करतील ते मुलांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने करणे. |
| | मैदानी खेळ | | कृती 17 : वेगवेगळ्या पद्धतीने चालणे. (विकासात्मक ध्येय -1 )<br>सामर्थ्य : स्थूल स्नायू चालना कौशल्य विकसित करणे.<br> <br>पद्धत :<br>• मैदानावर / जमिनीवर रेषा आखणे.<br>• मुलांना रेषेवरून चालायची सूचना देणे.<br>• मुलांना रेषेवरून हळूवारपणे किंवा वेगाने, पुढे किंवा मागे चालायची सूचना देणे.<br>• सौचालायाचा वापर करण्यासाठी किंवा पाणी पिण्यासाठी जाताना ओळीत जाण्याची सूचना देणे.<br>2 री आणि 3 री च्या मुलांना वेगवेगळ्या प्रकारच्या रेषा उदा : वक्र, वळणाच्या रेषा जमिनीवर आखून त्या रेषेवरून चालण्याची सूचना देणे. वर्तुळ आखून त्या वर्तुळावर फिरत गाणे गाण्यास सांगणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शीर्षक : तेनालीरामचे चातुर्य.<br>उद्देश : |

| | | |
|---|---|---|
| | | ➢ श्रवण कौशल्य विकसित करणे.<br>➢ अंदाज बांधण्याचे कौशल्य वृद्धिंगत करणे.<br>**पद्धत :**<br>➢ शिक्षकांनी कथा सांगण्यापूर्वी ती कथा वाचून त्याचा अर्थ समजून घेतला पाहिजे.<br>➢ कथा योग्य हावभावासहित सोप्या भाषेत सांगायला हवी.<br>➢ कथा सांगण्यासाठी शिक्षकांनी मुलांसोबत वर्तुळात बसणे.<br>➢ सोपे प्रश्न विचारून गोष्टीचा सारांश माहिती होवू द्यावे.<br>**कथा :**<br>एके दिवसी राजा कृष्णदेवराय कोणत्यातरी एका कारणामुळे तेनालीरामवर नाराज झाले होते. रागाने त्यांनी भरलेल्या दरबारात तेनालीरामला सांगितले की उद्यापासून मला तुझे तोंड दाखवू नकोस. त्यावेळी तेनालीराम दरबारातून बाहेर निघून गेला.<br>दुसऱ्या दिवशी जे◌व्हा महाराज दरबाराजवळ येत होते तेव्हा एका चुगलीखोराने त्यांना हे सांगून भडकविले की, तेनालीराम तुमच्या आदेशाचे पालन न करता दरबारात उपस्थित आहेत. हे ऐकून महाराज भयंकर चिडले. तो चुगलखोर दरबारी पुढे म्हणाला तुम्ही स्पष्ट सांगितले होते की, "दरबारात आल्यानंतर चाबकाचे फटके मिळतील" पण त्यांनी याचीही पर्वा केली नाही. आता तर तेनालीराम आपल्या आदेशाचे पालन करणे शक्यच नाही.हे सर्वकाही ऐकून राजा दरबारात आला. त्यांनी पाहिले की डोक्यात मातीचा एक माठ घालून तेनालीराम काहीतरी विचित्र हावभाव करत आहे. त्या माठाच्या चारी बाजूला प्राण्यांच्या तोंडाचे चित्र बनलेले होते.'तेनालीराम हा काय मुर्खपणा चालविला आहेस, तू माझ्या आज्ञेचे पालन केलेले नाही. आता शिक्षा म्हणून चाबकाचे फटके खायला तयार रहा.'<br>'मी कोणत्या आज्ञेचे पालन केले नाही महाराज?' माठात तोंड लपवून तेनालीराम बोलला – 'तुम्ही बोलला होता की, उद्यापासून मला तुझे तोंड दाखवू नकोस, तुम्हाला माझे तोंड दिसते आहे का?'<br>हे देवा! कुभांराने मला फुटलेला माठ तर नाही ना दिला.<br>हे ऐकताच महाराजांना हसू आले व ते बोलले – " तुझ्यासारख्या बुध्दिमान आणि हजरजबाबीवर कोणी नाराज होऊच शकत नाही. आता हा मातीचा माठ डोक्यावरून काढ व आपल्या जागेवर आसनस्थ हो. "<br><br>* कथा सांगितल्यानंतर सोपे प्रश्न विचारा.<br>1) तेनालीराम कोणाच्या दरबारात होता?<br>2) तेनालीरामने तोंड कसे लपवले होते?<br>( गोष्टीचा आनंद घेण्याबरोबरच मुलांनी कथा लक्षपूर्वक ऐकली आहे याबद्दल खात्री करणे. ) |
| | पुन्हा भेटू | • दिवसभरात केलेल्या कृती पुनरावर्तीत करणे.<br>• दिवसभरात केलेल्या कृतीची चर्चा पालक तसेच कुटुंबातील इतर सदस्यांसोबत करण्यास प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत, यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना निरोप देणे.<br>• दुसऱ्या दिवशी 'बागेला भेट' उपक्रमाचे नियोजन करावे आणि त्यासाठी अनुसरून कृती तयारी करणे.<br>• शाळेमध्ये 'छोटसं पुस्तक प्रदर्शन' आयोजित करून पालकांना प्रदर्शनास भेट देण्याचे आवाहन करणे. |

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 20 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | 19 व्या दिवशी उल्लेख केलेल्या शुभेच्छा देवाणघेवाण कृती पुन्हा एकदा करा. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 14 व्या दिवसाच्या गुजगोष्टी कृती पुन्हा करा. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुले त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करतात.<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे काम करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : कोडी ( चित्र ) सोडवितात, समस्या निराकरण.<br>कृती -13 : पूर्ण आणि अर्धा (विकासात्मक ध्येय 3 )<br>उद्देश : ‘ पूर्ण आणि अर्धा ’ ची कल्पना करणे.<br>आवश्यक साहित्य : फळे, प्राणी, पक्षी आणि मासे यांच्या चित्रांचे तुकडे.<br>पद्धत : एका बाजूला पूर्ण फळाचे चित्र आणि दुसऱ्या बाजूला अर्ध्याभागातून कापलेल्या फळाचे चित्रे दाखविणे. एका मुलने अर्ध्याभागातून कापलेल्या फळाचे चित्र निवडून सर्वांना दाखवणे आणि बाकीच्या मुलांनी त्या फळाच्या चित्राच्या अर्ध्या भागाचे योग्य तुकडे जोडून ते चित्र पूर्ण करणे.<br>इयत्ता 2 री : प्राणी / पक्षांच्या चित्रांचे तुकडे जोडून मूळ चित्र पूर्ण करणे.<br>इयत्ता 3 री : प्राणी / पक्षांच्या चित्रांचे तुकडे जोडून मूळ चित्र पूर्ण करणे आणि त्यांची नावे लिहिणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांच्या कृती) | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायूंच्या चालना कौशल्यांचा विकास, सृजनशील अभिव्यक्ती.<br>कृती - 49 : कापणे. (विकासात्मक ध्येय – 1 )<br>उद्देश :<br>• पेपर हातात पकडून कात्रीने कापून चिकटवण्याची पद्धत जाणून घेणे.<br>• हात आणि बोटांचे कौशल्य विकसित करण्याबरोबरच एकाग्रता वाढविणे.<br>आवश्यक साहित्य : कात्री ( शक्य असल्यास प्लास्टिक कात्री ) रंगीत पेपर, डिंक.<br>पद्धत : एका हातात कात्री आणि दुसऱ्या हातात पेपर घेवून मुलांना दाखवा. त्यांना बोटांनी कात्री धरावयाचा सराव करून घेणे.प्रत्येक मुलाकडे कात्री आणि पेपर देवून वेगवेगळ्या प्रकारे म्हणजेच सरळ, वक्र ( झिगझॅग ) आणि वेगवेगळ्या आकारामध्ये कापायला सांगणे. नंतर त्यांना एका तक्त्यावर किंवा रिकाम्या पेपरवर चिकटवून कोलाज तयार करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सूचना : मुलांनी योग्य ( नॉन स्टिक ) कात्री वापरली पाहिजे. शिक्षकांनी काळजीपूर्वक मुलांकडे लक्ष दिले पाहिजे. मुलांनी सावधानता बाळगून शिक्षकांच्या सूचनेनुसार काम केले पाहिजे.<br>टीप : 2 री आणि 3 री च्या मुलांना झिगझॅग किंवा वेगवेगळ्या आकारामध्ये कापायला सांगणे.नंतर त्यांना एका तक्त्यावर किंवा रिकाम्या पेपरवर चिकटवून कोलाज तयार करायला सांगणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : शब्द रचना.<br>कृती - 10 : शब्दरचना. ( गट -2 ) ECL-10<br>उद्देश :<br>❖ शब्दरचना कौशल्य वृद्धिंगत करणे.<br>❖ शब्दभांडार वाढविणे.<br>पद्धत :<br>❖ मुलांना वर्तुळाकार उभे करून स्पष्ट सूचना देवून कृतीला सुरुवात करणे.<br>❖ मी सांगितलेलं अक्षरे ऐका.<br>❖ अक्षरे जोडून शब्द रचना करून सांगा.<br>उदा: शिक्षकांनी जोराने ‘ स ’( थोडा वेळ शांत राहून ) ‘ र ’ असे उच्चारल्यास मुले अक्षरे ऐकून ‘ सर ’ अशी शब्द रचना करतील.<br>ही कृती शिक्षक टप्याटप्याने तीन अक्षरी आणि चार अक्षरी शब्द तयार करण्यासाठी वापरतील.<br>टीप: 2 री ची मुले एका अक्षराला संबंधित 2-3 शब्द सांगतील. 3 रीची मुले 2 री च्या मुलांनी सांगितलेले शब्द वापरून स्वत:चे वाक्य रचना करतील. |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य : शब्द ओळखतात, छापील मजकुराची जाणीव, आकलन, शब्दभांडाराची अभिवृद्धि.<br>कृती - 11 B : पुस्तक प्रदर्शन. (विकासात्मक ध्येय -2 )<br>उद्देश : पुस्तकांबद्दल बांधिलकी वाढविणे.<br>आवश्यक साहित्य : वेगवेगळ्या प्रकारची पुस्तके.<br>पद्धत : शाळेच्या आवारामध्ये पुस्तक मेळ्याचे आयोजन करून, मुलांना पुस्तकांकडे आकर्षित होण्यास मदत करणे. पुस्तक मेळ्यामध्ये पालकांना सहभागी होण्यास प्रोत्साहित करणे.<br>2 री आणि 3 री च्या मुलांनी पुस्तक मेळ्यात पाहिलेल्या पुस्तकांची यादी बनवून त्या पुस्तकांची नावे वाचणे. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : हात आणि डोळे यांची सुसंगतता, लेखन कौशल्य विकास, सृजनशील अभिव्यक्ती.<br>कृती - 2 : मुक्त हस्त चित्र रचना. (विकासात्मक ध्येय – 2 ) ECW- 6<br>उद्देश :<br>• लेखन कौशल्याचा सराव करणे.<br>• हात आणि डोळ्यांची सुसंगतता वाढविणे.<br>• कृतियुक्त अभिव्यक्तीला संधी देणे.<br>• सृजनशीलतेला प्रोत्साहन देणे.<br>आवश्यक साहित्य : क्रेयॉन्स, रंगीत पेन्सिल, मार्कर, पांढरा पेपर.<br>पद्धत : पेपरवर मुक्त हस्त चित्र काढायला, त्यांच्या कल्पकतेनुसार रंग भरायला प्रोत्साहन देणे. चित्राबद्दल बोलायला सांगणे. योग्य प्रश्न विचारून चित्राबद्दल माहिती मिळविणे.<br>टीप : इयत्ता 2 री व 3 री च्या मुलांना त्यांच्या आवडीचे चित्र/विशिष्ट संदर्भाचे चित्र काढून त्याबद्दल 4-5 वाक्ये लिहायला सांगणे. |
| | | | आदर्श लेखन : |

| | | |
|---|---|---|
| | | शिक्षकांनी मुलांसमोर फलक लेखन करणे. लेखनाचा योग्य क्रम पाहण्याची संधी मुलांना उपलब्ध करून देणे. मुलांची नावे व मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे वगैरे मुलांसमोर लिहिणे. शिक्षक वर्गात जे काही फलक लेखन करतील ते मुलांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने करावे. |
| | मैदानी खेळ | कृती - 18 : अडथळा शर्यत. (विकासात्मक ध्येय -1 )<br>सामर्थ्य : स्थूल स्नायू चालना कौशल्य अभिवृद्धी.<br>आवश्यक साहित्य : लांब काठ्या, दोरी, स्किपींग रोप.<br>पद्धत :<br>• खेळ खेळण्यासाठी योग्य अशी जागा निवडणे.<br>• सुरुवातीच्या रेषेपासून अंतिम रेषेपर्यंत ठिकठिकाणी काही मुलांना दोरी पकडून, काहींना काठी पकडून उभे करणे ( टेबल व इतर वस्तूही ठेवू शकतो ) व अडथळा निर्माण करणे.<br>• मुलांनी सुरुवातीच्या रेषेपासून पळत,उड्या मारत, अडथळे चुकवत व आपला समतोल राखत अंतिम रेषेकडे जाणे.<br>• 2 री आणि 3 री च्या मुलांना समन्वय आणि  समतोलता राखण्यासाठी पोत्यातील दौड, तिपाई दौड हे खेळही घेता येतील. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | मागील दिवसाच्या उद्देशाप्रमाणे आजचीही रंजक कथा (कथेची वेळ) ( तुमच्या आवडीची ) घेणे.<br>**कथा कथन**<br>शिक्षक कथा/कथा सांगत असताना मुलांना मध्येमध्ये प्रश्न विचारत कथा पूर्ण करतात. उदा : यानंतर काय झाले ? नंतर तिथे कोण आले ? इत्यादी.<br>कथा सांगितल्यानंतर सोपे प्रश्न विचारा.उदा:<br>1) त्यानंतर त्याने काय केले ?<br>2) शेवटी काय झाले ?<br>( गोष्टीचा आनंद घेण्याबरोबरच मुलांनी कथा लक्षपूर्वक ऐकली आहे याबदल खात्री करणे. ) |
| | पुन्हा भेटू | • दिवसभरात केलेल्या कृती पुनरावर्तीत करणे.दिवसभरात केलेल्या कृतींची पालक तसेच कुटुंबातील इतर सदस्यांसोबत चर्चा करण्यास प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत, यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना निरोप देणे.<br>• दुसऱ्या दिवशी ‘बागेला भेट’ या उपक्रमाचे नियोजन कराणे आणि त्याला अनुसरून कृतीची तयारी करणे.<br>• शाळेमध्ये ‘छोटसं पुस्तक प्रदर्शन’ आयोजित करून पालकांना प्रदर्शनास भेट देण्याचे आवाहन करणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा - 4** **दिवस – 21 (बुधवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 21 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती 1 : ICE BREAKER.<br>1. मुलांना ब्रशने दात घासण्याचे हावभाव करत वर्गामध्ये प्रवेश करू द्या. "हाय टीचर" असे म्हणण्यास सांगा.<br>2. मुले वर्गात येत असताना शिक्षकांनी मुलांना " नमस्ते, गुड मॉर्निंग " अशा शुभेच्छा देणे.<br>3. नंतर प्रत्येक मुलाचे नाव घेवून " तुम्ही आज कसे आहात ?" असे विचारणे. आणि " मी छान आहे, धन्यवाद " असा प्रतिसाद द्यायला मुलांना प्रोत्साहन देणे.<br>4. मुलांना विचारा, " आज कोणता वार आहे ?" आणि " आज बुधवार आहे " असा प्रतिसाद द्यायला मुलांना सांगा.<br>5. Left right left असे म्हणत कदमताल करत वर्गामध्ये वर्तुळ तयार करायला मुलांना सांगणे. मुलांमध्ये आवड आणि उत्साह निर्माण करण्यासाठी शिक्षक ढोलचा वापर करू शकतात.<br>( प्रत्येक मुलाचे गुडघे वाकलेले आहेत आणि त्यांचे पाय जमिनीला स्पर्श करत आहेत याची खात्री करा. ) |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 15 व्या दिवसाच्या गुजगोष्टी कृती पुन्हा करा. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुले त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करतात.<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे काम करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : गंधाची कल्पना, परिसराची जाणीव.<br>कृती : गंधाचा अंदाज बांधणे. (विकासात्मक ध्येय – 3 )<br>उद्देश : गंध ओळखणे.<br>आवश्यक साहित्य : कांदे, लसूण, अगरबत्ती, पुदिना, ताजी आणि कुजलेली फळे, उग्र वास असलेले पदार्थ.<br>पद्धत : मुलांना वर्तुळाकार किंवा ओळीत बसायला सांगणे. कांदे, लसूण, अगरबत्ती, पुदिना, ताजी आणि कुजलेली फळे, उग्र वास असलेले पदार्थ घेवून त्यांचा वास घेण्यास सांगणे.नंतर एकेका मुलाच्या डोळ्याला पट्टी बांधून वस्तू / पदार्थाचा वास घेवून त्याचे नाव ओळखायला सांगणे.प्रत्येक मुलाला यासाठी संधी देणे.<br>इयत्ता 2 री : डोळ्यांना पट्टी बांधून काही पदार्थ घेवून फक्त वास घेवून त्यांची नावे ओळखणे.<br>इयत्ता 3 री : वास घेवून ताजी आणि कुजलेली फळे / भाजी यांचे गटात वर्गीकरण करणे.<br>वापरावयाची अध्ययन पत्रके : I. L – 15 (1 ली, 2 री , 3 री) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांच्या कृती) | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना विकास.<br>कृती - 46 : पेपर किंवा कापड दुमडणे. ( घडी घालणे )<br>उद्देश :<br>• सूक्ष्म स्नायू विकसित करणे.<br>• कापड किंवा पेपर दुमडण्याचे/घडी घालण्याचे कौशल्य विकसित करणे.<br>आवश्यक साहित्य : पेपर, कापड.<br>पद्धत : प्रत्येक मुलाला पेपर देवून वेगवेगळ्या प्रकारे घडी घालण्यास शिकविणे. ( मूळ आकारांमधील – चौरस, त्रिकोण इत्यादी आकार शिक्षकांनी करून दाखवणे. ) याचबरोबर इतरही वेगवेगळ्या प्रकारचे आकार करण्यासाठी मुलांना प्रोत्साहन देणे. शिक्षकांनी स्वतः एक – दोन आकार करून दाखविणे. ( होडी , मासा, विमान बॉल तसेच |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | वेगवेगळ्या प्रकारचे प्राणी इत्यादी ) सराव झाल्यानंतर पेपर ऐवजी कापड घेवून असेच आकार तयार करता येतील.<br>2 री आणि 3 री च्या मुलांना पेपर दुमडून त्यांना त्यांच्या आवडीचे आकार तयार करण्यास सांगणे. |
| भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | | सामर्थ्य : भाषा अभिवृद्धि, भाषेचा अर्थपूर्ण वापर, निरीक्षण आणि श्रवण, परिसराची जाणीव.<br>कृती - 12 : मी शोधत आहे. (विकासात्मक ध्येय – 2 ) ECL-13.<br>उद्देश :<br>* संकेतांवर आधारीत वस्तू ओळखणे.<br>* परिसरातील घटकांबद्दल जागरूकता निर्माण करणे.<br>* कल्पना शक्ती वाढविणे.<br>पद्धत : मुलांना वर्तुळाकारात उभे करणे. शिक्षकांनी एखादे वाक्य सांगितल्यानंतर आणि त्यातील संकेतांवरून मुलांनी संबंधित वस्तूचे नाव ओळखणे. उदा: 4 पाय असणाऱ्या जोरात भुंकणाऱ्या प्राण्याला मी शोधात आहे असे म्हटल्यावर मुले अंदांज बांधून ‘ कुत्रा ’ असे म्हणतील.<br>* फळ्यावर लिहायला पांढऱ्या रंगाची वस्तू मी शोधत आहे. असे म्हटल्यावर मुले अंदांज बांधून ‘ खडू ’ असे म्हणतील. इत्यादी.<br>मुलांच्या आजूबाजूच्या परिसरातील वस्तूंची नावे या कृतीमध्ये वापरावीत. मुलांनी कृतीची ओळख करून घेतल्यानंतर इतर मुलांना वस्तू ओळखायला संकेतांचा अर्थ लावायला मदत करणे.<br>टीप : 3 रीच्या मुलांनी स्वतः प्रश्न तयार करून ओळखायला सांगणे आणि 2 री च्या मुलांनी उत्तर शोधण्याचा प्रयत्न करणे. |
| | आकलना सहीत वाचन | | सामर्थ्य : ध्वनी शास्त्राची जाणीव, निरीक्षण आणि श्रवण, शब्द भांडाराची अभिवृद्धि.<br>कृती - 21 : शब्द शोध. (विकासात्मक ध्येय : 2 )<br>उद्देश : गोष्टीतील शब्दांचे ध्वनी ओळखणे.<br>आवश्यक साहित्य : फ्लॅश कार्ड, फळा.<br>पद्धत : शिक्षकांनी माहितीतील कोणतीही एक कथा सांगणे. त्यामध्ये येणारे प्रमुख शब्द फ्लॅश कार्ड / फळ्यावर लिहून मुलांना दाखविणे. एक आठवडा मुलांना ते शब्द पहायची संधी देणे. ती कथा सांगताना किंवा दुसरी कोणतीही कथा सांगताना पुन्हा ते शब्द / ध्वनी आल्यास ओळखायला सांगणे.<br>2 री आणि 3 री च्या मुलांना फळ्यावर लिहिलेले शब्द गोष्टीच्या पुस्तकात / कार्ड मध्ये ओळखायला सांगणे.<br>सूचना : हीच कथा 34 व्या दिवशी पुनरावर्तीत होईल. |
| | उद्देश पूर्वक लेखन | | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू कौशल्य अभिवृद्धि, उद्देशपूर्वक लेखन.<br>कृती - 37 : चित्र काढणे आणि नाव देणे. (विकासात्मक ध्येय – 2 ) ECW-3.<br>उद्देश :<br>• सूक्ष्म स्नायू कौशल्ये विकसित करणे.<br>• हेतुपूर्व लेखनाशी जुळवून घेणे.<br>• आपल्या पसंतीचे चित्र रंगविणे.<br>आवश्यक साहित्य : कागद, क्रेयॉन्स , पेन्सिल.<br>पद्धत : मुलांनी त्यांच्या आवडीच्या वाहनाचे चित्र काढणे. काढलेल्या चित्रात रंग भरून त्यला नाव द्यायला सांगणे.<br>टीप : 2 री आणि 3 री च्या मुलांनी त्यांच्या इच्छेने स्वतः चित्र काढून त्याला नाव देणे. |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षकांनी मुलांसमोर फलक लेखन करणे. लेखनाचा योग्य क्रम पाहण्याची संधी मुलांना उपलब्ध करून देणे.<br>मुलांची नावे व मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे वगैरे मुलांसमोर लिहिणे. शिक्षक वर्गात जे काही फलक लेखन |

| | | |
|---|---|---|
| | | करतील ते मुलांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने करणे. |
| | मैदानी खेळ | कृती - 23 : ध्येय गाठणे. (विकासात्मक ध्येय - 1 )<br>सामर्थ्य : स्थूल स्नायू चालना कौशल्यांचा विकास.<br>आवश्यक साहित्य : मोठा चेंडू, कागदी कप.<br>पद्धत :<br>• कागदी कप एकमेकावर रचून पिरॅमिड तयार करणे.<br>• थोड्या अंतरावर पिरॅमिड ठेवून मुलांना तो चेंडूने पाडण्यास सांगणे.<br>टीप : दुसरी आणि तिसरीच्या मुलांना पिरॅमिडचे, त्यांच्यापासूनचे अंतर वाढवणे. |
| | रंजक कथा<br>(कथेची वेळ) | शीर्षक : तेनालीरामचे चातुर्य.<br>आवश्यक साहित्य : संभाषण असलेली दृकपट्टी / फ्लॅशकार्ड.<br>उद्देश :<br>➢ श्रवण कौशल्य विकसित करणे.<br>➢ अंदाज बांधण्याचे कौशल्य वृद्धिंगत करणे.<br>➢ विचारशक्ती विकसित करणे.<br>➢ प्रश्न विचारण्याच्या वृतीचा विकास करणे.<br>➢ गोष्टीशी संबंधित चित्रांचा संग्रह करण्याची आवड निर्माण करणे.<br>➢ अभिव्यक्ती कौशल्य विकसित करणे.<br>पद्धत :<br>**पात्राभिनय**<br>➢ शिक्षकांनी गोष्टीचे पुनरावलोकन करणे.<br>➢ गोष्टीचा सारांश सांगण्यासाठी दुसरी आणि तिसरीच्या मुलांना मदत करणे.<br>➢ फ्लॅशकार्ड घेवून पात्रांचे संभाषण सांगणे.<br>मुलांनी कथा सांगताना चूका केल्यास त्या चूका सुधारून कथा पुढे चालू ठेवण्यास मदत करणे. |
| | पुन्हा भेटू | • दिवसभरात केलेल्या कृती पुनरावर्तीत करणे.<br>• दिवसभरात केलेल्या कृतींची चर्चा पालक तसेच कुटुंबातील इतर सदस्यांसोबत करण्यास प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत, यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना निरोप देणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा - 4** **दिवस – 22 (गुरुवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 22 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत | कृती -1<br>21 व्या दिवशी उल्लेख केलेल्या शुभेच्छांवर आधारित हितगुज हि कृती पुनरावर्तीत करणे.<br>पद्धत : |

| | | |
|---|---|---|
| | शिक्षकांचे हितगुज) | ● मुलांना वर्तुळाकार थांबवून सूचना द्या.<br>● शिक्षकांनी " आज्जी म्हणते दात घासा." असे म्हटल्यावर मुलांनी दात घासण्याची नक्कल करावी.<br>● शिक्षकांनी , " आज्जी म्हणते " असे न-म्हणता फक्त " दात घासा " किंवा " केस विंचरा " असे म्हटल्यास मुलांनी ती नक्कल करू नये. तसे केल्यास त्या खेळातून / कृतीतून बाहेर (out) पडावे लागेल. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 16 व्या दिवशीची गुजगोष्टी ही कृती करून घेणे. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जाऊन कृती निर्वहन करणे.<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे कार्य निर्वहन करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : ध्वनी/आवाजाची जाणीव, इतराविषयी संवेदनशीलता,अनुभव.<br>कृती - 3 : आवाज ओळखणे.<br>उद्देश : विविध शब्द ओळखून सांगणे.<br>आवश्यक साहित्य : स्थानीक परिसरात उपलब्ध असणारी संगीत उपकरने.<br>पद्धत : मुलांना मैदानात/बाहेर घेऊन जाणे.<br>मुलांना त्यांचे डोळे बंद करुण घेण्यास सांगणे. विविध प्रकारची वाद्ये/ संगीत उपकरणे वाजवून ठरावीक ध्वनी/ध्वनी शब्द तयार करणे. मुलांनी डोळे बंद करून ऐकलेले ध्वनी शब्द ओळखण्यास त्यांना प्रोत्साहित करणे. त्यानंतर मुलांच्या अनुभवावर चर्चा करणे. या आधारे कांही जन अगदी कमी किंवा काहीच ध्वनी ज्ञान नसलेले असतात तर काहीजण तीक्ष्ण ध्वनी ज्ञान असणारे असतात, याबद्दल त्यांना सांगून, अशा लोकांबद्दल सहानुभूतीची भावना निर्माण करणे.आपल्या कानांची जोपासना कशी करू शकतो याबद्दल मुलांसोबत चर्चा करणे. त्यांनी अंघोळीनंतर लगेचच स्वत:चे कान स्वच्छ करण्यास आपल्या पालकांचे सहाय्य घेऊ शकतात. तसेच कान स्वच्छ करण्यासाठी कोणतेही तीक्ष्ण/अपायकारक वस्तू वापरुनये याची जाणीव करुन देणे.<br>इयत्ता : 2 री - अनेक प्रकारचे ध्वनी ओळखून सांगावयास लावणे.<br>इयत्ता : 3 री - ध्वनीशब्द ऐकून वाद्यांच्या नावांची यादी करणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांच्या कृती) | सामर्थे: सूक्ष्मस्नायू चालना कौशल्याचा विकास आणि सृजनात्मकतेची अभिवृद्धी.<br>कृती- 52 : पाटीवर किंवा फलकावर चित्र काढणे.<br>उद्देश :<br>● पाटीवर खडू धरण्याचे कौशल्य वाढते.<br>● लिखाण व चित्र काढून त्यात रंग भरण्याचे कौशल्य वाढते.<br>साहित्य : पाटी/फळा, खडू<br>पद्धत : फळा व रंगीत खडू देऊन विविध आकार व चित्रे काढण्यास सांगणे. त्यांच्या आवडीचे चित्रे काढू शकतात. शिक्षकांनी त्यांच्या मताने कोणतेही चित्र काढण्यास दबाव आनुनये. मुलांना त्यांना आवडीचे चित्र काढून त्यांच्या आवडीचे रंग भरण्यास सांगणे.<br>● वापरावयाचे अभ्यास पत्रक (Worksheet) H.W. - 5 ( इयत्ता 01, 02, 03 ) |
| | भाषा \| ऐकणे व | सामर्थ्य : ध्वनी संकेताची जाणीव, अक्षर-शब्द परस्पर संबंध.<br>कृती – 20 : नावाच्या पहिल्या अक्षरापासून वस्तू ओळखणे. (विकासात्मक ध्येय- 2) ECL-2 (10 व्या दिवसापासून |

| | | | |
|---|---|---|---|
| | विकास आणि पायाभूत साक्षरता | बोलणे | पुढे)<br>उद्देश:<br>• ध्वनी संकेतांची जाणीव करून देणे.<br>• अक्षर आणि शब्दांच्या मधील परस्पर संबंध समजून घेणे.<br>• शब्द समजून ओळखणे.<br>• अंत्याक्षरी शब्द लिहिणे.<br>सूचित विषय- परिसरातील वस्तू<br>पद्धत : दिलेल्या सुचकांच्या / संकेतांच्या आधारे वर्गाबाहेरील परिसरातील वस्तूंच्या नावांचा अंदाज बांधण्याच्या कृतींचे नियोजन करणे. उदाहरणार्थ - शिक्षकांनी, “ माझ्या मनातील वस्तू हिरव्या रंगाची असून त्या वस्तूचे नाव ‘ प ’ अक्षरावरून सुरु होते.” असे म्हटल्यावर, मुले ‘ पान ’ असे ओळखतील . अशाप्रकारे विविध उदाहरणे द्यावीत.<br>वर्गवार विवरण : इ. 2 री आणि 3 री च्या विद्यार्थांना शब्दांचा पुढील भाग म्हणजेच वाक्य रचना तसेच सोप्या वाक्यांचा समूह रचण्याच्या कृतींना चालना देणे. ( 40 व्या दिवसापर्यंत पुढे नेणे )<br>• अध्ययन पत्रके (worksheet) - EC - 5 ( इ.- 1, 2, 3 ) |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य : शब्द ओळखणे, मुद्रणाची जाणीव, अर्थ ग्रहण, शब्द संपत्तीचा विकास.<br>कृती - 11C : माझी पहिली शब्द पेटी. (विकासात्मक ध्येय – 2 )<br>उद्देश : ओळखीच्या विषयावर आधारित शब्दांना संबधित चित्रे काढणे व चित्र ओळखून शब्द वाचणे/ओळखणे.<br>आवश्यक साहित्य : दृकपट्टी ( flash cards), वही, चित्र तक्ता.<br>पद्धत : विध्यार्थ्यांनी जुन्या नियतकालिकांमधून तसेच गोष्टीच्या पुस्तकातून 3 - 4 अक्षरी शब्दांची कात्रणे एका पेटीत संग्रहित करून,नंतर त्यांना कागदावर चिकटवून, प्रत्येक शब्दाला संबंधित चित्र काढण्याचे प्रयत्न करावे.<br>इ. 2 री व 3 री : विद्यार्थांना सोपी वाक्ये लिहून एका पेटीत संग्रहित करून. नंतर ती वाक्ये कागदावर चिकटवून, त्या वाक्यांना संबंधित चित्रे काढण्यास सांगणे. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : उद्देशपूर्वक लेखन, सृजनशील चिंतन, शब्द संपत्तीची अभिवृद्धी, ऐकून अर्थ लावून घेणे, परिसराची जाणीव.<br>कृती – 33 : यादी करूया. (विकासात्मक ध्येय-2) ECW-10.<br>उद्देश:<br>• उद्देशाला अनुसरून लिखाणाला वाव मिळवून देणे.<br>• सृजनात्मक विचार वाढविणे.<br>• परिसराची जाणीव करून देणे.<br>• शब्द संपत्ती वाढविणे.<br>• सूचना ऐकून त्यांचा अर्थ लावणे.<br>आवश्यक साहित्य : वही, कागद, क्रेयाँन्स.<br>पद्धत : मुलांची शब्द संपती वाढविण्यास तसेच उद्देशपर लिखाणाला वाव देण्यासाठी मुलांना विविध विषयांना संबंधित शब्दांची यादी करण्यास सांगणे.<br>सूचित विषय : रंग<br>संपूर्ण वर्गासह एका कार्डशीटवर यादी करण्याच्या कृतीचे आयोजन करणे. या कार्डशीटवर लिहिता येणाऱ्या सामान्य शब्दांची यादी शिक्षकांनी तयार करणे. मुलांना ही यादी पाहण्यास तसेच वाचण्यास साहाय्य होईल अशा प्रकारे वर्गातील एका कोपऱ्यात प्रदर्शित करणे.<br>वर्गनिहाय विवरण : इ. 2 री च्या विद्यार्थ्यांना 1 ली च्या विध्यार्थ्यांनी तयार केलेल्या यादीमध्ये अतिरिक्त शब्द जोडू |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | द्या. 3 री च्या विद्यार्थ्यांना सूचीबद्ध शब्दांसाठी त्यांची स्वत:ची वाक्ये तयार करू द्या. |
| | | | ❖ आदर्श लेखन :<br>● शिक्षकांनी मुलांसमोर फलकलेखन करणे.<br>● लेखनाचा योग्य क्रम पाहण्याची संधी मुलांना उपलब्ध करून देणे.<br>● मुलांची नावे, मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे वैगेरे मुलांच्या समोरच लिहिणे.<br>● शिक्षक वर्गात जे कांही फलक लेखन करतील ते मुलांना व्यवस्थित दिसेल अशापद्धतीने करणे. |
| | मैदानी खेळ | | कृती – 29 : रोलिंग (सुरळी ) ध्येय - 1<br>सामर्थ्य : स्थूल स्नायू चालना कौशल्य विकास.<br>आवश्यक साहित्य : रिंग<br>पद्धत : जमिनीवर उभी रेषा काढा. मुलांनी रिंग हातात घेऊन ओळीत थांबावे, व त्या रेषेवर हातातील रिंग गडगडत सोडावी. दुसरी व तिसरीच्या वर्गातील मुलांना वक्र रेषेवर रिंग गडगडत सोडण्यास सूचित करणे. |
| | रंजक कथा<br>(कथेची वेळ) | | शीर्षक: तेनालीरामकृष्णाचे चातुर्य.<br>आवश्यक साहित्य: काड्यांचे चित्र.<br>उद्देश:<br>● श्रवण सामर्थ्य वाढविणे.<br>● तर्कशक्ती वाढविणे.<br>● विचार शक्ती वृद्धिंगत करणे.<br>● जिज्ञासू वृत्ती ( प्रश्न विचारण्याचा मनोभाव ) जागविणे.<br>● अंदाज बांधण्याचे/ तर्क शक्तीचे कौशल्य वाढविणे.<br>● गोष्टीला संबंधित चित्रे संग्रहित करण्याची आवड निर्माण करणे.<br>पद्धत :<br>**काड्यांचे चित्र**<br>काड्यांच्या चित्रांचा वापर करून कथेची वेळ मनोरंजनात्मक पद्धतीने रचणे. मोठ्या विद्यार्थ्यांच्या सहाय्याने पात्रांचे वाटप करून अभिनय करण्यास मदत करा.<br>कथा/कथा सांगितल्यानंतर सोपे प्रश्न विचारा.<br>1. राजाने तेनालीरामला तोंड दाखवू नको, निघून जा असे का म्हटले?<br>2. तेनालीरामाने शोधलेला उपाय कोणता ?<br>( कथेचा आनंद घेत, ऐकत आहेत याची खात्री करून घेणे.) |
| | पुन्हा भेटू | | ● दिवसभरात केलेल्या कृती पुनरावर्तीत करणे.<br>● दिवसभरात केलेल्या कृतीची चर्चा पालक तसेच कुटुंबातील इतर सदस्यांसोबत करण्यास प्रोत्साहित करणे.<br>● दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत, यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना निरोप देणे.<br>● दुसऱ्या दिवशी 'बागेला भेट' उपक्रमाचे नियोजन करावे आणि त्यासाठी अनुसरून कृती तयारी करणे.<br>● शाळेमध्ये 'छोटसं पुस्तक प्रदर्शन' आयोजित करून पालकांना प्रदर्शनास भेट देण्याचे आवाहन करणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 4      दिवस – 23 (शुक्रवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 23 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती - 1<br>21 व्या दिवशी उल्लेखित केलेल्या अभिवादानात्मक , हितगुजमधे दिलेल्या कृती पुनारावर्तीत करा.<br>कृती – 2 : खेळ फुग्यांचा [ बलून टाइम ]<br>पद्धत :<br>1. मुलांना 4 किंवा 5 गटात विभागा.<br>2. प्रत्येक गटाला एक फुगा द्या.<br>3. फुग्याला फुंकर मारून हवेत उडविण्यास सांगा.<br>4. फुगा जमिनीवर टेकता कामानये असे मुलांना सूचित करा.<br>5. फुगा हवेत तरंगत राहिला पाहिजे असे मुलांना सूचित करा.<br>6. जर फुगा जमिनीवर टेकला तर तो गट खेळातून बाहेर [out ] होईल. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती- 1 तर्क / अंदाज बांधण्याचा खेळ. [ ध्येय - 1 ]<br>सामर्थ्य : स्वजाणीव, व्यक्तिगत सकारात्मक परीकल्पनेची अभिवृद्धी, ऐकणे व बोलणे.<br>उद्देश : आवडत्या विषयावर बोलणे.<br>साहित्य : स्थानिक आहार पदार्थांची दृक पट्टी [ flash cards] / चित्र कार्ड्स, लकोटा.<br>पद्धत :<br>1. आहार पदार्थांचे फ्लँश कार्ड्स वर उचलून धरा आणि ‘ आज आपण आपल्या आवडत्या आहार पदार्थांबद्दल बोलणार आहोत ’ असे सांगा.<br>2. आहार पदार्थांचे चित्र कार्ड लकोट्यात घाला. हळुवारपणे ते चित्र कार्ड , त्यातील कांही भाग दिसेल याप्रमाणे बाहेर खेचा. व त्या चित्राचे नाव मुलांना ओळखण्यास सांगा.<br>3. मुलांचा अंदाज स्वीकारून “होय, हे उत्तर देखील असू शकते!” असे म्हणत प्रोत्साहित करा.<br>4. संपूर्ण चित्र क्रमवारपणे दाखवा. मुले ते ओळखत असताना असे त्याचे नाव सांगुण मुलांना, “ तुम्हाला हा पदार्थ आवडतो का ?” ( आइस्क्रिम/ डोसा- चटणी/ वडा/भात इत्यादी.) असे विचारा.<br>5. “ होय, मला आवडतो / नाही, मला आवडत नाही ” असे सांगुन मुलांना आपल्या आवडीचे व नावडते पदार्थ सांगावयास प्रोत्साहित करा.<br>6. काही वेळ ही कृती पुनरावर्तीत करा.<br>7. नंतर मुलांना विचारा, “ तुम्हाला कोणता आहार पदार्थ आवडतो ?”<br>8. “ मला भाकरी/दूध, इत्यादी आवडते.” असे सांगण्याच्या माध्यमातून उत्तरे मिळावा.<br>9. प्रत्येक मुलाकडून, तो त्याच्या आवडीनिवडी सांगण्यास समर्थ आहे याची खात्री करून घ्या. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जाऊन कृती निर्वहन करणे.<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे कार्य निर्वहन करणे. |
| | पायाभूत | सामर्थ्य : तुलना, समायोजन, वर्गीकरण, आकारमान/प्रमाण परिकल्पना आणि परिसराची जाणीव. |

| | | | |
|---|---|---|---|
| | संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | | कृती – 18 : तुलना करूया. (विकासात्मक ध्येय 3 )<br>उद्देश : आकारमान आणि प्रमाणावर आधारित तुलना करणे.<br>आवश्यक साहित्य : पेन्सिल, मापने, फळे ( सफरचंद, संत्री ) , भाजीपाला ( बटाटे, कांदा ) , भांडी ( चमचा, वाट्या, ताट ), विविध आकाराच्या इतर वस्तू.<br>पद्धत :सोप्या पध्दतीचे तुलना कार्य प्रथम स्ट्रॉ, पेन्सील, फळे, भाज्या आणि इतर वस्तूंचा वापर करून करणे.<br>● आकारमान आणि प्रमाणाच्या आधारावर तुलना करणे. आकारमानावर आधारित वस्तूंच्या समूहातून सर्वात मोठी वस्तू , मुलांच्या समूहातील सर्वात उंच मुलगा, सर्वात लांब काठी / खडू निवडण्यास सांगणे.<br>● तुलना ही एकाचा प्रकारच्या वस्तूंसोबत झाली पाहिजे. तुलना ही कृती मिश्र गटात करता कामानये. उदा. - आयताकार वस्तूंची तुलना वृत्ताकार वस्तूंसोबत, अथवा चेंडूची तुलना सफरचंदासोबत करू नये.<br>● त्याच पद्धतीने प्रमाणाची तुलना करतेवेळी एकाच प्रकारच्या वस्तू असणाऱ्या कोणत्या गटात वस्तू जास्त आहेत याची तुलना करणे.<br>इयत्ता - 2 वरील प्रमाणे उंच - ठेंगू, लहान - मोठा याला पूरक वस्तू देऊन तुलना करून सांगणे.<br>इयत्ता - 3 तुलना करतील, नंतर वर्गीकरण करून प्रमाणाची परिकल्पना सांगणे आणि लिहिण्यास सांगणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | | समर्थे : स्वतःची आणि इतरांबद्दलची जाणीव, मौखीक भाषा विकास, शब्द संपत्तीची अभिवृद्धी.<br>कृती : अभिनय गीत [ माझे कुटुंब ]<br>अंग... अंग...चिऊ... अंग... अंग...काऊ...(2)<br>आईने केला छान छान खाऊ<br>बाबांनी आणले कपडे मऊ<br>आजोबांच्या संगे फिरुनी येऊ<br>आजीच्या गोष्टीत रमून जाऊ<br>ताईच्या संगे चित्रे पाहू<br>दादाच्या संगे मिठाई खाऊ<br>अंग... अंग...चिऊ... अंग... अंग...काऊ...(2)<br>माझे कुठुंब जवळुनी पाहू.<br>उद्देश :<br>● शारीरिक वाढ व विकास होतो.<br>● शब्द संपत्ती वाढीसोबातच यमक, लयबद्ध, संदर्भ, आणि स्पष्ट उच्चारण करतात.<br>● हावभाव ओळखतात.<br>साहित्य : लयबद्ध गाण्यांच्या प्रती.<br>पद्धत: मुलांना वर्तुळाकार उभे करणे. सुलभकारांनी मुलांना माहित असलेली / अभिनय गीते/लयबद्ध गीते गाण्यास संधी देणे.ही गीते शारीरिक हावभावांसोबत गायली गेली पाहिजेत.<br>विवरण : इ . 2 री व 3 री च्या वर्गानी अभिनय गीत गाऊन झाल्यानंतर प्रश्न विचारून उत्तरे मिळवा.<br>सराव पत्रक ( worksheet ) : H.W.- 6 (इ.-01,02,03 वर्ग) |
| | भाषा विका | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य: शब्दसंपत्तीची अभिवृद्धी, ओळखणे, समूहातील सदस्यांसोबत मिळून मिसळून काम करणे.<br>कृती - 6A : ' मला शोधा '. (विकासात्मक ध्येय - 2 ) ECL-12<br>उद्देश : |

| | | | |
|---|---|---|---|
| | स<br>आ<br>णि<br>पा<br>या<br>भूत<br>सा<br>क्षर<br>ता | | • योग्य शब्द रचना.<br>• सांघिक मनोभाव वाढविणे.<br>• सूचना लक्षपूर्वक ऐकून पालन करणे.<br>• शब्द संपतीची अभिवृद्धी करणे.<br>आवश्यक साहित्य : ओळखीच्या वस्तू, प्राणी, पक्षांची चित्रे.<br>पद्धत : चित्रांची दृकपट्टी एका बॉक्समधे ठेवावे. वर्गातील प्रत्येक मुलाला बोलावून बॉक्समधील एक चित्र उचलून त्याचे नाव ओळखण्यास सांगणे.<br>मुलाने चित्र ओळखल्यानंतर त्यावर चर्चा करणे. अशा प्रकारे ही कृती पुढे चालू ठेवावी.<br>विवरण – 2 री च्या वर्गातील मुलांनी त्यांनी ओळखलेल्या चित्राबद्दल 3-4 वाक्ये बोलली पाहिजेत.<br>3 री च्या वर्गातील मुलांनी 2 ते 3 मिनिटे त्या चित्राबद्दल बोलावे. |
| | | आकलनासहित वाचन | सामर्थ्य : मुद्रित आशयाची जाणीव, शब्द ओळख, शब्दसंपत्तीची वाढ व परिसराची जाणीव.<br>कृती – 18 : चित्र संच (विकासात्मक ध्येय- 2 ) विषय : “ रात्रीच्या वेळी दिसणाऱ्या वस्तू ”.<br>उद्देश :<br>• मुलांनी चित्र पाहणे आणि चर्चेतून त्याचा अर्थ लावणे आणि वैयक्तिक चित्र संच रचणे.<br>• अनुभव व पुर्वज्ञानावर आधारित तर्क लावणे/ ओळखणे.<br>आवश्यक साहित्य : कोरा कागद, क्रेयॉन्स, डिंक, फक्त रात्रीच्यावेळी दिसणाऱ्या वस्तूंची चित्रे, त्यांच्याबद्दल कथा/ कविता/ गाणी इ. ची यादी.<br>पद्धत : मुलांच्या परिचयाची गाणी व बालगीतांना संबधित चित्रे ओळखणे.<br>• गाणी/कथेमधे असणाऱ्या विशेष शब्दांना ओळखून त्यांची नावे सांगणे. मुलांनी आकलनासहित सांगितलेले शब्द शिक्षकांनी फळ्यावर लिहावेत.त्या शब्दांवर चर्चा करणे तसेच त्या परिचित शब्दांच्या आधारावर शब्दसरणी ( शब्दमालिका) रचून फळ्यावर किंवा चार्टवर लिहून चर्चा करणे.<br>• कागद, क्रेयॉन्स, व इतर साहित्य देऊन मुलांना रात्रीच्यावेळी दिसणाऱ्या वस्तूंची चित्रे पाहून स्वतः त्यांची चित्रे काढून त्यांना त्यात रंग भरण्याची संधी उपलब्ध करून देणे.<br>व्यक्तिगत चित्र संच : मुलांनी तयार केलेली चित्रे त्यांच्या कृती संचयीकेत संग्रहित करण्यास सांगणे. व त्यावर पुढील 25 दिवसांमध्ये चर्चा करण्यास सांगणे.<br>उदा. - आकाश, चंद्र, तारे, पथदीप, इ. चित्रे/व्हिडीओ/ अनुभवांच्या आधारे मुलांना व्यक्तिगतरित्या चित्रे काढण्यास संधी मिळवून देणे.<br>2 री व 3 री च्या मुलांनी 1 ली च्या वर्गातील मुलांसोबत परस्पर सहाय्य घेण्यास शिक्षकांनी सुचविणे आणि विषयाची सविस्तर चर्चा करतेवेळी सर्व मुले अभिव्यक्त होतील याची खात्री करणे. त्याचबरोबर 2 री व 3 री च्या मुलांना देखील व्यक्तिगतरित्या चित्र काढण्यास आणि रंग भरण्यास संधी देऊन त्यांनी देखील त्यांच्या कृती संचयीकेत ती चित्रे संग्रहित करण्यास संधी मिळवून देणे.<br>( सदर कृतीचा पुढील भाग 25 व्या दिवसापर्यंत पुढे नेणे.) |
| | | उद्देशपूर्वक लेखन | सामर्थ्य : कल्पना करणे/ सृजनशीलता, रंगांची परिकल्पना, आकारमान व आकारांची कल्पना.<br>कृती – 22 : ऐका व चित्र काढा. (विकासात्मक ध्येय-2 ) ECW – 11<br>उद्देश :<br>• श्रवण केलेल्या विषयांची कल्पना करण्याचे सामर्थ्य वाढविणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | • सृजनात्मकतेला उत्तेजित करणे.<br>• रंग, आकारमान व आकारांची परिकल्पना दृढ करणे.<br>आवश्यक साहित्य : कोरे कागद, पेन, क्रेयॉन्स<br>पद्धत : भरपूर वर्णनात्मक शब्द असलेल्या कथेचे पुस्तक मोठ्याने वाचा. उदा. - " साक्षीचे मोठे डोळे , व कुरळे केस आहेत.सुमाच्या शाळेत भरपूर झाडे आहेत. " कथा वाचून झाल्यावर मुलांना क्रेयॉन्स तसेच कोरे कागद द्यावेत. कथेतील ठराविक वाक्ये पुन्हा वाचून त्यांना संबंधित प्रश्न विचारणे.<br>• साक्षीचा चेहरा तू रेखाटू शकशील का ?<br>• सुमाच्या शाळेचे चित्र तू रेखाटू शकशील का ?<br>प्रश्न विचारल्यानंतर मुलांना अध्ययन सराव पत्रिका EC-1.19 मधे चित्र रेखाटण्यास संधी उपलब्ध करून देणे.<br>वर्गवार विवरण :<br>इ. 2 री च्या विद्यार्थ्यांना EC 2.19 मधे तसेच, इ. 3री च्या मुलांना EC 3.19 मधे ऐकलेल्या कथा/संदर्भ चित्रित करण्यास संधी मिळून देणे. अध्ययन पत्रक : EC- 6 (इ.1,2,3 ) |
| | | | आदर्श लेखन:<br>शिक्षकांनी मुलांसमोर फलकलेखन करणे. लिखाणाचा योग्य क्रम मुलांना पाहता यावा अशी व्यवस्था करणे. मुलांची नावे, मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे, इ. मुलांसमोर त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने लिहावेत. शिक्षकांनी वर्गामध्ये जे कांही फलक लेखन करावयाचे आहे ते मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अश्या पद्धतीने करावे. |
| | मैदानी खेळ | | कृती- 20 : चेंडू पकड. (विकासात्मक ध्येय - 1 )<br>सामर्थ्य : स्थूल स्नायू चालना कौशल्य अभिवृद्धी, भुजा व पायांच्या शक्तीचा विकास.<br><br>पद्धत:<br>• दोन मुलांना पाठीलापाठ लाऊन उभे करणे.<br>• एक फुटबॉल घेऊन एकमेकांना द्यावयास ( pass ) सूचित करणे.<br>• दुसरी व तिसरीच्या वर्गातील मुलांना हाच खेळ खेळवावा. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शिर्षक : तेनालीरामचे चातुर्य.<br>साहित्य : पपेटस् ( कळसूत्री बाहुल्या )<br>उद्देश :<br>➢ श्रवण सामर्थ्य वृद्धिंगत करणे.<br>➢ तर्क / अंदाज कौशल्य वाढविणे.<br>➢ वैचारिक शक्ती विकसित करणे.<br>➢ प्रश्न मनोभाव निर्माण करणे.<br>➢ कथेला संबंधित चित्रे संग्रह करण्याची आवड निर्माण करणे.<br>➢ अभिव्यक्ती सामर्थ्य वाढविणे.<br>➢ नअडखळता बोलण्याचे कौशल्य वाढविणे.<br>पद्धत :<br>**पपेटस् प्रदर्शन**<br>➢ कथेचे पुनरावलोकन करणे.<br>➢ मुलांना संवादाची पद्धत समजावून देणे. |

| | | |
|---|---|---|
| | | ➢ पपेटस् प्रदर्शनासाठी 2 री व 3 री च्या विद्यार्थ्यांचे सहय्य घेणे.<br>(कथेचा आनंद घेत, ऐकत आहेत की नाही याची खात्री करून घेणे.) |
| | पुन्हा भेटू | • दिवसभरात केलेल्या कृती पुनारावार्तीत करा.<br>• दिवसभरात केलेल्या सर्व कृतींची चर्चा पालकांसोबत आणि कुटुंबातील सदस्यांसोबत करण्यास प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना सोडणे.<br>• पुढील आठवड्यात " बागेच्या भेटीला " ही योजना आखा आणि त्याला अनुसरून कृतींची तयारी करा.<br>• शाळेत " छोटे पुस्तक प्रदर्शन " आयोजीत करा, पालक/पोषक यांना देखील निमंत्रणाचे आयोजन करा. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 4 दिवस – 24 (शनिवार)

| | |
|---|---|
| प्रतिबिंब (वर्गातील निरंतर मूल्यमापन) | • विविध तंत्र वापरून (निरीक्षण, तपशील पट्टी, मुलांची अध्ययन पत्रके, व्हिडीओ, सांदर्भिक नोंदी, इत्यादी) तुम्ही संग्रह केलेल्या मूल्यमापन नोंदी/माहिती यांचे पुनरावलोकन करणे.<br>• प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिगत गरजेनुसार पुढील आठवड्यातील अध्ययन प्रक्रियेची योजना आखणे.<br>• अध्ययनाच्या तिन्ही विकासात्मक ध्येयांच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे. |

### 4.2 मासिक मूल्यमापन मार्गसूची

(शाळेसाठी विद्यार्थ्यांची पुर्वसिद्धता)

## पहिला महिना

**उद्देश : शालेय उपक्रमात आवड निर्माण करणे आणि शालेय परिसराशी व अध्ययनाशी जुळवून घेण्यास मुलांना मदत करणे.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थ्याचे नाव | | | | वर्ग | |
| उंची आणि वजन | | | | | |
| वजन | | | उंची | | |
| व्यक्तिगत स्वच्छता (संबंधित रकान्यात ✓ अशी खूण करणे.) | | | | | |
| | स्वच्छ आहेत | सुधारणा हवी | | स्वच्छ आहेत | सुधारणा हवी |
| कपडे | | | नखे | | |
| दात | | | डोळे | | |
| कान | | | नाक | | |
| केस | | | | | |

*** खालील कृतींमध्ये संपूर्ण महिन्याची मुलाची प्रगती एकत्रित करून संबंधित रकान्यात ✓ अशी खुण करणे.**

| दैनंदिन कृतींची जुळवाजुळव व अनुकरण | क्वचित | कधीतरी | नेहमी |
|---|---|---|---|
| शाळेला आनंदाने येतो/ येते. | | | |
| शिक्षकांना तसेच मित्रांना अभिवादन करतो/ करते. | | | |
| स्वतःच्या तसेच इतरांच्या वस्तूंबद्दल काळजी घेतो/ घेते. | | | |
| वस्तू इतारांसोबत वाटून घेतो/ घेते. | | | |
| इतरांना मदत करतो/ करते. | | | |
| इतरांची तसेच परिसराची काळजी घेतो/ घेते. | | | |
| आपल्या पाळीची (वेळेची) वाट बघतो/ बघते. | | | |
| सामुहिक कृतींमध्ये सक्रीय भाग घेतो/ घेते. | | | |
| उपकरणासह वर्ग मित्रांसोबत खेळायला आवडते. | | | |
| स्वतःच्या भावना इतरांना सांगतो/ सांगते. | | | |
| कृती हाताळण्यास पुढाकार घेतो/ घेते. | | | |
| तल्लीन/मग्न होऊन नृत्य करतो/ करते. | | | |
| खेळ तसेच दैनंदिन कृतींचे नियम पाळतो/ पळते. | | | |
| सरळ सोप्या सूचनांचे पालन करतो/ करते. | | | |
| मैदानी खेळ किंवा कृतींमधील सहभाग | मदतीची गरज आहे | परिश्रमाने करतो/ करते | करतो/ करते |
| वाळू आणि पाण्यासोबत खेळताना मग्न होऊन खेळतो/ खेळते. | | | |
| शारीराचा तोल सांभाळतो/ते. (वक्र रेषेवरून पुढे व मागे चालणे.) | | | |
| गरजेनुरूप वेगाने आणि हळुवारपणे धावतो/ धावते. | | | |
| दोन्ही हातांनी चेंडू धरतो/ते व हवेत उडवितो/ उडविते. | | | |
| अडथळ्यावरून ( हर्डल्स ) उड्या मारतो/ मारते. | | | |
| सृजनशीलता, सौंदर्यज्ञान, तसेच स्नायू चलन विकासासाठी कला कृतींमध्ये सहभाग | मदतीची गरज आहे. | परिश्रमाने करतो/ करते | करतो/ करते |
| वाळूमध्ये वक्र रेषा काढतो/ काढते. | | | |
| फुगीर चित्रांचा वापर करून सोप्या पद्धतीने छापतो/ छापते. | | | |
| रंग आणि अनुक्रमानुसार मणी दोऱ्यात ओवतो/ ओवते. | | | |
| अगदी सुलभरीत्या रेखाचित्रे काढतो/ काढते. | | | |
| कापणे व चीकटविणे यासारख्या कृती करतो/ काढते. | | | |
| चिखल/ पीठाच्या सहाय्याने साचे/ आकार तयार करतो/ करते. | | | |
| संख्याज्ञान तसेच परिसर जागृतीमधील प्रदर्शन | क्वचित | कधीतरी | नेहमी |
| परिसरातील विषयांवर परीक्षण करण्यास कुतूहल व आनंद दर्शवितो/ दर्शविते. | | | |
| इंद्रियांच्या सहाय्यने वस्तू ओळखतो/ ओळखते. (स्पर्श, वास, चव, दृष्टी व ध्वनी) | | | |
| एखाद्या लक्षणावरून/वैशिष्ट्यावरून वस्तूंची जोडणी करतो/ करते. (आकार/ रंग/ आकारमान) | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| दोन चित्रांची तुलना करून फरक शोधतो/ शोधते. | | | |
| मूळ रंगांची जोडणी करतो/ करते, ओळखतो/ ओळखते, नावे सांगतो/ सांगते आणि वर्गीकरण करतो/ करते. | | | |
| भागशः आणि संपूर्ण सहसंबंधांची जाणीव प्रदर्शित करतो/ करते. | | | |
| रिकामे आणि भरलेले या संकल्पनांचा अर्थ लावतो/ लावते. | | | |
| तोंडी अभिव्यक्तीचे प्रदर्शन | क्वचित | कधीतरी | नेहमी |
| मोठ्यांशी व लहानांशी मुक्तपणे बोलतो/ बोलते. | | | |
| भावना,गरजा व्यक्त करतो/ते. आणि आवड प्रदर्शित करतो/ करते. (शाब्दिक, अशाब्दिक प्रतीक्रीयांद्वारे) | | | |
| पूर्ण वाक्यात स्पष्टपणे बोलतो/ बोलते. | | | |
| कथा व लयबद्द लक्षपूर्वक ऐकतो/ ऐकते. | | | |
| लयबद्ध गीते गावून आनंदि होतो/ होते. | | | |
| प्रारंभिक वाचन कौशल्यांचे प्रदर्शन | क्वचित | कधीतरी | नेहमी |
| चित्रे, पुस्तके आणि इतर मुद्रित सामग्रीच्या सहाय्याने परीक्षण करतो/ करते आणि त्यात रमतो/ रमते. | | | |
| कथा व कविता लक्षपूर्वक ऐकतो/ ऐकते. | | | |
| चित्रातील वस्तूंचे नाव सांगतो/ सांगते. | | | |
| वाक्यांतील शब्द ओळखतो/ ओळखते. | | | |
| लयबद्ध शब्द ओळखतो/ ओळखते. | | | |
| प्रारंभिक लेखन कौशल्यांचे प्रदर्शन | क्वचित | कधीतरी | नेहमी |
| अनुकरणाने पेन्सील धरतो/ धरते. | | | |
| वाळू/हवेत गिरवतो/ गिरवते. | | | |
| विचार, प्रसंग, घटना इ प्रकट करण्यासाठी चित्र काढतो/ काढते. | | | |

| | | |
|---|---|---|
| मुलांची वैशिष्टे | विशेष आवड | |
| | मुलाची प्रतिभा | |
| | सामर्थ्ये | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| हजेरी | नियमित | होय / नाही | वेळेचे बंधन/ पालन | होय / नाही |

| | |
|---|---|
| सामान्य टीप (Remarks) | |

| | | |
|---|---|---|
| शिक्षकांची सही व दिनांक | मुख्याध्यापकांची सही व दिनांक | पालकांची सही व दिनांक |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा – 5** **दिवस – 25 (सोमवार)**

<table>
<tr><th>दिवस</th><th>तासिका</th><th>कृतींचे विवरण</th></tr>
<tr><td rowspan="3">25</td><td>अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज)</td><td>कृती 1 : माझ्या चांगल्या सवयी.<br>साहित्य:- केस विंचरने, दात घासणे, हात धुणे, नखे कापणे, इत्यादींची चित्रे.<br>पद्धत:-<br>● मुलांना वर्ग खोलीच्या बाहेर एका ओळीत थांबवविणे.(सुरक्षेचे नियम पाळणे.)<br>● चांगल्या सवयींची चित्रे क्रमवार दाखविणे.(शिक्षकांनी वर्ग खोलीच्या दारात थांबाणे.)<br>● प्रदर्शित केकेल्या चित्रांची नक्कल करत मुलांना वर्ग खोलीत प्रवेश करण्यास सूचना देणे.<br>● वर्गखोलीत प्रवेश केल्यानंतर वर्तुळाकारात उभे राहण्यास सूचित करणे.<br>● मुलांचे स्वागत करून, “ आज कोणता वार?” असे विचारावे. “ आज __________वार” म्हणून मुलांना उत्तरे देण्यास प्रोत्साहित करणे.<br>कृती 2:<br>● हवामान नकाशा तयार करणे. (नली-कली कार्डांच्या मदतीने).<br>● हवामानाबद्दल मुलांना प्रश्न विचारा, “आजचे हवामान कसे आहे?” “आज खूप ऊन आहे”, “आज ढगाळ वातावरण आहे”, “पाउस पडतोय”. इ. प्रकारे उत्तरे देण्यास मुलांना प्रोत्साहित करणे.<br>● हवामान नकाशात नोंदी करण्यास मुलांना सांगणे.</td></tr>
<tr><td>गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती)</td><td>कृती:- रंगीत कापड<br>साहित्य:- विभान्न प्रकारचे पोशाख/ गडद रंगांच्या कापडांची चित्रे.<br>पद्धत:- (कृती करण्यासाठी मुलांना आपल्या आवडीच्या रंगाचा पोशाख घालून येण्यास सांगणे.)<br>सामान्यत: मुलांना वर्तुळाकार थांबण्यास सांगणे. शिक्षकांनी एक पाण्याची बाटली वर्तुळाच्या मध्यभागी फिरवत, एका मुलाला बोलण्यास निवडावे. तो/ती त्यांच्यावर नंबर(पाळी) आल्यावर त्याने/तिने बोलले पाहिजे( उत्तर दिले पाहिजे).<br>1. कोणत्या रंगाचा पोशाख तुला आवडतो?<br>2. हा पोशाख परिधान करण्यास तुला आवडेल कि नाही?<br>सर्व मुलांना या पद्धतीने क्रमवार विचारत पुढे चालू ठेवणे.<br>सूचना:- प्रत्येक मुल इतरांचे विचार ऐकत, या कृतीत सक्रीय भाग घेत आहे याची खात्री शिक्षकांनी करून घ्यावी.<br>वरील दोन प्रश्नांना उत्तरे देण्याच्या माध्यमातून वरील कृती पुढे चालू ठेवावी. व संबंधित मुलालाच वर्तुळाच्या मध्यभागी असणाऱ्या चित्र कार्डांची निवड करून खालील अंशाला संबंधित स्वताचे अभिप्राय व्यक्त करण्यास सांगणे.<br>(सर्व सामान्य पोशाखांची चित्रे.)<br>1. हा पोशाख कोण परिधान करतो?<br>2. ते असा पोशाख कधी परिधान करतात?<br>3. ते हा पोशाख का परिधान करतात?</td></tr>
<tr><td>माझा वेळ</td><td>मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्यन कोपऱ्यात जाऊन कृती निर्वहन करणे.</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | (Free Indore Play) | | शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे कार्य निर्वहन करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | | सामर्थ्य:- स्पर्श ज्ञान, परिसराची जाणीव.<br>कृती – 9 बी “दिलेली संख्या” (अनुक्रमे जोडणे) (विकासात्मक ध्येय-3)<br>उद्देश:- अनुक्रमे जोडणी करणे.<br>आवश्यक साहित्य:- 1 ते 10 पर्यंतचे कार्ड्स (‘कीट’ मधील संख्या कार्डांच्या मदतीने ).<br>पद्धत:- मुलांना वर्तुळाकार बसण्यास सांगणे. 1 ते 10 पर्यंतचे संख्या कार्ड्स एका ट्रे मधे ओतून, त्यात दिलेल्या संख्यांचे कार्ड अनुक्रमे जोडण्यास मुलांना संधी मिळवून देणे.<br>इयत्ता-2 री<br>1ते 10 पर्यंतच्या संख्या उतरत्या क्रमात सांगून लिहिण्यास लावणे.<br>(10,9,8,7,6,5,4,3,2,1)<br>इयत्ता-3 री<br>अनुक्रमे लिहिलेल्या संख्या शब्दांमध्ये लिहिण्यास सांगणे.<br>● वापरावयाची अध्ययन पत्रके (Worksheet): 1.L- 16 (इ. 1,2,3 री चे वर्ग) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | | सामर्थ्ये:- सूक्ष्म स्नायू चालना शक्तीचा विकास, सृजनशिलतेची अभिव्यक्ती , डोळे व हातांमधील समन्वय साधने, आकारांची परिकल्पना.<br>कृती:- 33 वाळूमध्ये गिरविणे.<br>उद्देश:- * सूक्ष्म स्नायूंचा विकास होतो.<br>*डोळे व हातांमधील समन्वय साधण्यास सोयीस्कर होते.<br>साहित्य:- वाळू, काठी<br>पद्धत:- खोलगट ट्रे मधे वाळू भरून, छोटीशी काठी/काडी देऊन वाळूमध्ये गिरविण्यास सांगणे. विविध प्रकारच्या सरळ रेषा, वक्र रेषा आणि आकार काढण्यास सांगणे. सरळ रेषा आणि वक्र रेशेंचा वापर करून त्यांना आवडीचे चित्र काढण्यास सांगणे.<br>विवरण:- 2री व 3 री च्या वर्गाला भूमितीय रेखाकृतींचा वापर करून (वर्तुळ, त्रिकोण, आयत आणि चौकोन) चित्रे काढण्यास सांगणे. |
| | भाषा विकास व पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य:- समाजाभिमुख वर्तणुकीचा विकास, इतरांच्या भावना व हक्कांबद्दल संमान.<br>कृती:-- 7- C “सामाजीक सहकार्याचा अभिनय” (विकासात्मक ध्येय-1) ECL- 14<br>उद्देश:-<br>●समाजाभिमुख वर्तणुकीच्या विकासाची अभिवृद्धी करणे.<br>●इतरांच्या भावना व हक्कांबद्दल संमान.<br>●श्रम/ कामाचा संमान करणे.<br>साहित्य:- समाजातील विविध व्यावसायिकांची दृकापट्टी (चित्रफित)<br>पद्धत:- मुलांना चित्र कार्ड घेऊन त्या कार्डावरील सामाजिक सहाय्य करणाऱ्या व्यक्तींबद्दल बोलू द्या. बाकीच्या मुलांना त्या सामाजिक सहाय्यकाला ओळखू द्या.<br>वर्गनिहाय विवरण:- 2री च्या वर्गातील मुलांनी त्यांना आवडीच्या समाज सहाय्यकांचा अभिनय करणे.<br>3री च्या वर्गातील मुलांनी त्यांना सांगितलेल्या समाज सहाय्यकांचा अभिनय करणे. |
| | | आक | सामर्थ्य:- मुद्रित आशयाची जाणीव, शब्द ओळख, अर्थ लावणे, शब्दसंपतिची वाढ व परिसराची जाणीव. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | लना सहीत वाचन | कृती...18<br>● चित्र संच (विकासात्मक ध्येय- 2) विषय:- "रात्रीच्या वेळी दिसणाऱ्या वस्तू".<br>उद्देश:-<br>● चित्रातील वस्तू / व्यक्ती/ घटनांची नावे सांगणे. ओळखून अर्थ लावण्यास चित्रांसोबत आशयाचा संबंध जोडणे.<br>● मुलांनी चित्र पाहणे, आणि चर्चेतून अर्थ लावणे. व व्यक्तिगत चित्र संचाची रचना करणे, व्यक्तिगत आणि समूहामध्ये मांडणे व गटात बसून भित्तीपत्रके तयार करणे.<br>साहित्य:- मुलांनी काढलेली चित्रे.<br>पद्धत:- फक्त रात्रीच्यावेळी दिसणाऱ्या वस्तूंना संबंधित मुलांनी तयार केलेली चित्रे, कृती संचातून काढून त्यावर सहजपणे बोलण्यास प्रोत्साहित करणे.<br>शिक्षकांनी 2री व 3री च्या वर्गातील मुलांना 1 ली च्या वर्गातील मुलांसोबत परस्पर साहाय्य घेण्यास सांगणे. आणि विषय सविस्तरपने चर्चा करतेवेळी सर्व मुलांनी अभिव्यक्त झाल्याची खात्री करून घेणे. त्याचबरोबर 2री व 3री च्या वर्गातील मुलांना स्वतंत्रपणे बोलण्यास संधी देणे.<br>(सदर कृतीचा पुढील भाग 29 व्या दिवसापर्यंत पुढे चालू नेणे.) |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य:- उद्देशीत लिखाण, चालना कौशल्याचा विकास आणि सृजनशील दृष्टीकोन.<br>कृती:- 38 "शुभेच्छा पत्रके तयार करणे". (विकासात्मक ध्येय-2) ECW-12<br>उद्देश:-<br>● उद्देशाला अनुसरून लिखाणाचे कौशल्य वाढविणे.<br>● चालना कौशल्य विकसित करणे.<br>● सृजनात्मक दृष्टीकोन उत्तेजित करणे.<br>● शुभेच्छा पत्रके तयार करण्यास संधी मिळवून देणे.<br>साहित्य:- कागद, क्रेयोंस.<br>पद्धत:- मुलांनी त्यांना आवडीची चित्रे काढून, रंग भरून, स्वत:चे नाव आणि ज्या कोणाला शुभेच्छा देऊ इच्छितात त्यांचे नाव लिहू द्या. (शिक्षकांनी, मुलांनी सुचविलेल्या व्यक्तींची नावे लिहिण्यास साहाय्य करावे.) हि कृती राष्ट्रीय आणि स्थानिक सन, जन्मदिन विशेष इत्यादी संदर्भात देखील करू शकतात.<br>वर्गनिहाय विवरण:- इ. 2री च्या वर्गातील मुलांनी शुभेच्छा संदेशांची यादी करण्यास सांगणे. उदा.- शुभोदय, जन्मदिनाच्या शुभेच्छा, इ.<br>इ.3री च्या वर्गातील मुलांनी त्या संदेशांना शुभेच्छापत्र तयार करण्यास सांगणे. (26 दिवसापर्यंत पुढे चालेल.) |
| | | | आदर्श लेखन:- शिक्षकांनी मुलांसमोर फलकलेखन करणे. लिखाणाचे योग्य क्रम/ पद्धत , मुलांना पाहता यावे अशी व्यवस्था करणे.<br>मुलांची नावे, मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे, इ. मुलांसमोर त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने लिहावेत. शिक्षकांनी वर्गामध्ये जे कांही फलक लेखन करावयाचे आहे ते मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अश्या पद्धतीने करावे. |
| | मैदानी खेळ | | कृती :- ध्यान<br>सामर्थ्य:- एकाग्रता वाढविणे.<br>पद्धत:- मुलांना सामान्य सूचना देणे.<br><br>डोळे झाकून पाठ (शरीर) ताठ ठेवून बसण्यास सांगणे. दोन्ही हात सरळ ताठ मुद्रावस्थेत मांडीवर ठेवून शांतीमंत्र |


| | | |
|---|---|---|
| | | म्हणण्यास सांगणे.<br>दुसरी व तिसरीच्या मुलांना देखील हीच कृती (ध्यान) घेणे. |
| | रंजक कथा<br>(कथेची वेळ) | **शीर्षक:- खरे सौंदर्य**<br>**साहित्य:- गोष्टीचे पुस्तक/ साहित्य.**<br>**उद्देश:-**<br>➢ ऐकण्याचे सामर्थ्य विकसित करणे.<br>➢ शोधण्याचे (तर्क) कौशल्य वाढविणे.<br>पद्धत : **कथाकथन**<br>➢ शिक्षकांनी कथा सांगण्यापूर्वी कथा वाचून समजून घेणे.<br>➢ योग्य हावभावानियुक्त सोप्या भाषेत कथा सांगाणे.<br>➢ कथा संगतेवेळी शिक्षकांनी मुलांसोबत वर्तुळाकारात बसावे.<br>➢ सोपी प्रश्ने विचारत कथा समजावून देणे.<br>**कथा/कथा:-**<br>एके दिवशी एका जंगलात सर्व पक्षी मिळून सन साजरा करत होते. तेथे जमलेले सर्व पक्षी मी कसा चांगला आहे, मी किती सुंदर आहे, हे दर्शवित होते. मग कोण सुंदर आहे ते पाहुया म्हणून एकेक करत ते पक्षी व्यासपीठावर येवू लागले. कावळा पंढरा कोट घालून आला होता, कोकिळेने लाल शर्ट घातला होता, चिमणीने हिरवा पायजमा तर पोपट लाल जाकेट. पारीवाळ छत्री घेवून आले होते, बगळ्याने विजार घालून टोपी देखील घातली होती. पण कोणत्याही प्रकारची वेशभूषा नकरता आलेला मोर त्याचा पिसारा फुलवून नाचू लागला. सर्व पक्षांनी टाळ्या वाजवून मोरच सुंदर आहे, असे घोषित करून त्याला बक्षीस देण्यात आले.<br>कथा सांगून झाल्या नंतर सोपे प्रश्न विचारणे.<br>1. गोष्टीतील पक्षांची नावे सांगा?<br>2. पोपटाने कोणत्या प्रकारचा पोशाख घातला होता?<br>(गोष्टीचा आनंद घेत मुले लक्षपूर्वक ऐकत आहेत का, याची खात्री करून घेणे.) |
| | पुन्हा भेटू | ● दिवसभरात केलेल्या कृती पुनारावार्तीत करणे.<br>● दिवसभरात केलेल्या सर्व कृती पालकांसोबत आणि कुटुंबातील सदस्यांसोबत चर्चा करण्यास प्रोत्साहित करणे.<br>● दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत यासाठी एक आनंददायी वातावरण निर्माण करून मुलांना सोडणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा – 5** **दिवस – 26 (मंगळवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 26 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | **कृती 1 : माझ्या चांगल्या सवयी. (पुढील भाग)**<br>साहित्य:- केस विंचरने, दात घासणे, हात धुणे,नखे कापणे, इत्यादींची चित्रे.<br>वेळ:- 5 मिनिटे.<br>पद्धत:-<br>25 व्या दिवसाच्या सूचनांचे पालन करून, आणि हवामान नकाशाबद्दल मुलांना विचारून ते त्यांना हवामान नकाशात भरावयास सूचना देणे.<br>कृती:- 2 : माझ्या ताटात काय आहे? ( तळ्यात-मळ्यात खेळाचा नमुना)<br>वेळ:- 5 मिनिटे.<br>पद्धत:-<br>• वर्गखोलीत जमिनीवर एक मोठा वर्तुळ काढणे. (मुलांच्या संखेस अनुसरून)<br>• मुलांना वर्तुळाच्या बाहेर गोलाकार उभे करणे.<br>• शिक्षकांनी भाज्यांची नावे सांगितल्यास, मुलांनी वर्तुळाच्या आत उडी मारावी, आणि फळांची नावे सांगितल्यास त्यांनी वर्तुळाच्या बाहेर उडी मारावी. आणि असे करण्यास जो कोणी चुकेल, तो/ती खेळातून बाहेर (out) होतील. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 25 व्या दिवसाच्या कृती पुढे चालू ठेवणे. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | • नियमावलीत सांगितल्याप्रमाणे कार्य निर्वहन करणे.<br>• मुले सर्व अध्ययन कोपऱ्यातील कृतींमध्ये व्यस्त आहेत. तसेच योग्य रित्या पूर्ण करत आहेत याची खात्री करून घेणे.<br>• अपूर्ण असलेल्या कृती मुलांना पूर्ण करण्यास साहाय्य करणे.<br>• येणाऱ्या (पुढील) दिवसात कृतींमध्ये मुले व्यस्त असताना कोणत्या मुलाकडे अधिक लक्ष दिले पाहिजे याबद्दल शिक्षकांनी मानसिकरीत्या सिद्ध असले पाहिजे.<br>• दिवसाच्या शेवटी अध्यन कोपऱ्यात पुढील पायरीच्या आवश्यक सामाग्रींची तयारी करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य:- योजना कार्य पूर्ण करणे, परिसराची जाणीव.<br><br>कृती:- 10 "योजना कार्य पूर्ण करणे" (आकृतिबंध) . (विकासात्मक ध्येय-3)<br>उद्देश:- योजना कार्य पूर्ण करणे.<br>साहित्य:- पेन्सिल, खोड रबर (eraser), मेंडर, किंवा सफरचंद, केळी, मोसंबी, पेरू, इ. फळांची दृकपट्टी(Flash cards), चौकोन, आयत, त्रिकोण व वर्तुळाकार कापलेल्या आकृत्या.<br>पद्धत:- फळे घेऊन एका सरळ रेषेत जोडून ठेवणे. जोडण्याचा/मांडण्याचा क्रम पुढील प्रमाणे. केळी, सफरचंद, केळी, सफरचंद, केळी, सफरचंद, सफरचंद, केळी, सफरचंद, सफरचंद, केळी. मुलांना फळांची रचना ओळखण्यास प्रोत्साहित कराणे. मुलांना याच रचनेचे अनुकरण करून फळे जोडून ठेवण्यास सांगणे. तसेच त्रिकोण, वर्तुळ, चौकोनाकार आकृतींचा वापर करून सोप्या नमुन्यांचे अनुकरण करून योजना कार्य रचण्यास (आकृतिबंध) सांगणे. याच प्रकारे फुले, पाने, फांद्या, खडे, बिया, इ. वापरून रचना करणे.<br>इ.- 2 री<br>विविध प्रकारच्या आकृतींची चित्रे देवून त्या पुढील आकृती पूर्ण करणे. |



| | | | |
|---|---|---|---|
| | | | ___________ , _______________<br>इ. 3 री<br>संख्यांची रचना पूर्ण करण्यास सांगणे.<br>उदा.- 1, 2, 1, 2, __ __ __ __ __ __ __ __ __ __<br>वापरावयाची अध्ययनपत्रके (Worksheet) : 1.L – 17,18,19,20 (इ. 1ली, 2री, 3री वर्गांसाठी ) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | | सामर्थ्य:- समाजाभिमुख चालीरीतींचा विकास, इतरांच्या भावना, हक्कांचा संमान करणे. सृजनशीलता व सकारात्मक दृष्टिकोनाचा विकास करणे, कल्पना शक्तीचा विकास, शब्द संपत्तीची अभिवृद्धी.<br>कृती:- 10 बी , सणांवर आधारित गाणी सांगणे.<br>गणपती आला न नाचून गेला... (2)<br>मोदक लाडू खावून गेला<br>गणपती माझा नाचत आला.<br>मनाला माझ्या आनंद झाला<br>उंदरावर बैसुनी हो गेला.<br>वक्रतुंड, एकदंत हा आला<br>रिद्धी- सिद्धीचा गणेश आला.<br>दुखांचा डोंगर हरण केला<br>बुद्धीचा दैवत लंबोदर आला.....<br>उद्देश:-<br>• मुलांना आपल्या संकृतीतील अनेक विषयांची ओळख करून देणे.<br>• सौंदर्य चेतनेचा विकास करणे.<br>• सणांना संबंधित गाणी ऐकत सणांची विशेषता समजावून देणे.<br>साहित्य:- विविध सणांची दृकपट्टी, चित्रे.<br>पद्धत:- सांस्कृतिक आणि राष्ट्रीय सण जे प्रामुख्याने साजरे केले जातात त्यांचा परिचय करून देणे. सण साजरे करण्याची पद्धत समजावून सांगणे. स्वातंत्र्य दिन , प्रजासत्ताक दिन, मकर संक्रांति, दिवाळी, ख्रिसमस, ईद-मिलाद, गुरुपौर्णिमा, इ. सणांबद्दल विष्लेषण करणे. भारतात या सणांचे आचरण कसे केले जाते ते सांगणे.<br>ठराविक सणांबद्दल गाणी, नृत्य, कला, सृजनात्मक कृती इ. मधे भाग घेणे.<br>विवरण:- 2 री व 3 री च्या वर्गांनी सणांना संबंधित जी गाणी असतात त्यातील विशेषता/वैशिष्टे सांगणे. |
| | भा षा वि का स व पा या भूत सा क्षर ता | ऐकणे व बोल णे | सामर्थ्य:- ध्वनिशास्त्राची ओळख, शब्द संपत्तीची अभिवृद्धी, चालना कौशल्याचा विकास.<br>कृती:- 15, लयबद्ध शब्द ऐकणे. (विकासात्मक ध्येय- 2) ECL-4 ( 14व्या दिवसापासून पुढे)<br>उद्देश:-<br>• ध्वनिशास्त्राची ओळख करून देणे.<br>• लयबद्ध शब्दांच्या माध्यमातून शब्दसंपत्ती वाढविणे.<br>• सूक्ष्म आणि स्थूल चालना कौशल्यांची अभिवृद्धी करणे.<br>पद्धत:-<br>• मुलांना नवनवीन लयबद्ध गीते सांगणे.<br>• गाणी म्हणताना लयबद्ध शब्दांवर जास्त जोर देऊन म्हणणे.<br>• गाण्याला अनुरूप अभिनय करण्यास सांगणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | • जोर देऊन बोललेले शब्द प्रत्येकाकडून वदवून घेणे.<br>• गाण्यातील लयबद्ध शब्दांचा परिचय करून देणे. व त्यांना आणखीन काही यमक जुळणारी (लयबद्ध) शब्द सांगायला लावणे.<br>वर्गनिहाय विवरण:- इ. 2री च्या वर्गातील विद्यार्थ्यांनी लयबद्ध शब्दांना आणखीन दोन-दोन लयबद्ध शब्द जोडण्याचा प्रयत्न करणे.<br>इ. 3री च्या वर्गातील मुलानी दिलेले शब्द स्वत:च्या वाक्यात वापरणे. ( 32 व्या दिवसापर्यंत पुढे चालू ठेवणे) |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य:- शब्द ओळखणे, मुद्रणाची जाणीव, अर्थ ग्रहण, शब्द संपत्तीची अभिवृद्धी.<br>कृती:- 11 ए : नामफलक (विकासात्मक ध्येय-2)<br>उद्देश:- नामफलकावरील नावे चित्रांच्या सहाय्याने ओळखतील आणि वाचतील, गोष्टीतील प्रमुख पात्र ओळखतील.<br>आवश्यक साहित्य:- दृकपट्टी, वही, चित्रफित, कथापुस्तक.<br>पद्धत:- मुलाच्या सवंगड्याच्या नावासमोर कोणतीतरी वस्तू, प्राण्यांचे चित्र चिकटवून नामफलक रचणे. नंतर त्या सवंगड्याचे नाव ओळखण्यास सांगणे. जर मुलाने नाव ओळखण्यात चूक केली तर नावासमोर चिकटविलेल्या चित्रांच्या सहाय्यने त्याचे नाव दाखविणे योग्य होईल.<br>2 री व 3 री चे वर्ग : शिक्षकांनी मुलांना विविध कथापुस्तके द्यावीत. त्या कथांमध्ये आलेले प्रमुख पात्र, वस्तूंची नावे ओळखण्यास सांगणे. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य:- उद्देशीत लिखाण, चालना कौशल्याचा विकास आणि सृजनात्मक दृष्टीकोन.<br>कृती:- 38 “शुभेच्छा पत्रके तयार करणे”. (विकासात्मक ध्येय-2) ECW-12 (25 व्या दिवसापर्यंत पुढे चालेल.)<br>उद्देश:-<br>• उद्देशाला अनुसरून लिखाणाचे कौशल्य वाढविणे.<br>• चालना कौशल्य विकसित करणे.<br>• सृजनात्मक दृष्टीकोन उत्तेजित करणे.<br>• शुभेच्छा पत्रके तयार करण्यास संधी मिळवून देणे.<br>साहित्य:- कागद, क्रेयोंस.<br>पद्धत:- मुलांनी त्यांना आवडीची चित्रे काढून, रंग भरून, स्वत:चे नाव आणि ज्या कोणाला शुभेच्छा देऊ इच्छितात त्यांचे नाव लिहू द्या. (शिक्षकांनी, मुलांनी सुचविलेल्या व्यक्तींची नावे लिहिण्यास साहाय्य करावे.) हि कृती राष्ट्रीय आणि स्थानिक सन, जन्मदिन विशेष इत्यादी संदर्भात देखील करू शकतात.<br>वर्गनिहाय विवरण:- इ. 2री च्या वर्गातील मुलांनी शुभेच्छा संदेशांची यादी करण्यास सांगणे. उदा.- शुभोदय, जन्मदिनाच्या शुभेच्छा, इ.<br>इ.3री च्या वर्गातील मुलांनी त्या संदेशांना शुभेच्छापत्र तयार करण्यास सांगणे. |
| | | | आदर्श लेखन:- शिक्षकांनी मुलांसमोर फलकलेखन करणे. लिखाणाचे योग्य क्रम/ पद्धत , मुलांना पाहता यावे अशी व्यवस्था करणे.<br>मुलांची नावे, मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे, इ. मुलांसमोर त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने लिहावेत. शिक्षकांनी वर्गामध्ये जे कांही फलक लेखन करावयाचे आहे ते मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अश्या पद्धतीने करावे. |
| | मैदानी खेळ | | कृती:- सोपा व्यायाम<br>सामर्थ्य:- हात - पायांच्या स्नायुंना चालना.<br>पद्धत:- वर्गखोलीच्या आत सरळ साध्या सूचना देऊन व्यायाम करण्यास सांगणे. “दोन्ही हात वर उचला, दोन्ही हात खांद्याच्या सरळ रेषेत बाजूला घ्या”. |

| | | |
|---|---|---|
| | | 2 री व 3 री च्या मुलांना जास्तीचा व्यायाम देणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | पहिल्या दिवसाच्या उद्देशा प्रमाणे रंजक कथा (कथेची वेळ) पुढे चालू ठेवणे.<br>**कथाकथन**<br>शिक्षकांनी कथेचे निरुपण करतेवेळी मुलांचे लक्ष वेधून घेत कथा पूर्ण करणे.<br>उदा.- यानंतर काय झाले? नंतर कोण आले? इत्यादी.<br>कथा सांगून झाल्यावर सोपे प्रश्न विचारणे.<br>1) पांढरा कोट घालून चालणारा पक्षी कोणता?<br>2) छत्री घेऊन आलेला पक्षी कोणता?<br>(कथेचा आनंद घेत मुले श्रवण करत आहेत कि नाही याची खात्री करून घेणे.) |
| | पुन्हा भेटू | • दिवसभरात केलेल्या कृती पुनारावार्तीत करणे.<br>• दिवसभरात केलेल्या सर्व कृती पालकांसोबत आणि कुटुंबातील सदस्यांसोबत चर्चा करण्यास प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत यासाठी आनंददायी वातावरण निर्माण करून मुलांना सोडणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा – 5      दिवस – 27 (बुधवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 27 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती:- 1, मी एक भाजी<br>साहित्य:- विविध प्रकारच्या भाज्यांचे चित्र कार्डस्<br>वेळ:- 5 मिनिटे<br>पद्धत:-<br>• विविध भाज्यांची चित्रे क्रमवार दाखविणे.<br>• दाखविलेली चित्रे पाहून त्याचे नाव व रंग ओळखण्यास सांगणे. ते ओळखून वर्गखोलीत प्रवेश घेण्यास मुलांना सांगणे.<br>उदा.- "मी गाजर,नारंगी रंगाचे गाजर".<br>कृती:- 2<br>• वर्गात प्रवेश केल्यानंतर वर्तुळाकार थांबण्यास सांगणे.<br>• मुलांचे स्वागत करून "आज कोणता वार?" असे मुलांना विचारणे. व "आज वार ______" असे उत्तर देण्यास मुलांना प्रोत्साहित करणे.<br>• हवामान नकाशाबद्दल मुलांना विचारणे.<br>• हवामान नकाशातील नोंदी दर्शविण्यास मुलांना सांगणे. |
| | गुजगोष्टी | कृती:- कथा ऋतुमानाची |

| | | |
|---|---|---|
| | (सकाळच्या सामुहिक कृती) | साहित्य:- ऋतुमानाला अनुसरून वापरल्या जाणाऱ्या पोशाखांची चित्रे (Flash cards). (सुती कपडे, स्वेटर, टोपी, पायमोजे, रेनकोट, स्कार्फ, माकड टोपी, इ.)<br>पद्धत:-<br>‘रिमोट’ चा खेळ खेळवा म्हणजेच, बर्तुळाच्या मध्यभागी ठेवलेले फ्लॅश कार्डस निवडण्यासाठी मुलाला त्याची पाळी (वेळ) येण्यास TV रेमोटचा वापर करा. तो/ती खालील वाक्यांच्या आधारे बोलण्याची संधी मिळवेल.<br>1. मी हा पोशाख ___________<br>2. मी या ऋतुमध्ये ___________<br>3. या ऋतुमध्ये हे खूप गरम/थंड/ओले असते.<br>4. मी हा पोशाख का घालतो?<br>सर्व मुलांना त्यांची पाळी (वेळ) येयीपर्यंत हि कृती पुढे चालू ठेवणे. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | अध्ययन सिद्धता भागश: 8 कोपर्यापैकी सर्व प्रथम ठराविक कोपऱ्यातील कृतींबद्दल तसेच त्या त्या कोपऱ्यातील साहित्यांच्या वापराबद्दल शिक्षकांनी मुलांना परिचय करून देणे. मुलांना प्रश्न विचारत त्यांच्या आकलनाबद्दल खात्री करून घेणे.<br>(प्रत्येक अध्ययन कोपऱ्यानुरूप सहाय्यात्मक कृती देऊन, सामर्थ्य मिळविण्यास अनुकूल होईल अश्या मुलांना जास्तीच्या कृती देता येतील.)<br>*************************************************************************<br>**कोपरा – बिल्डींग ब्लॉक्स कोपरा**<br>सामर्थ्य:- डोळे व हातांमध्ये समन्वय साधने.<br>कृती:- रेल्वेचा नमुना तयार करणे.<br>उद्देश:- निर्देशाप्रमाणे व्यवस्थित ब्लॉक (ठोकळे) जोडण्याचे कौशल्य मिळविणे.<br>साहित्य:- अध्यन किट मधील बिल्डींग ब्लॉक (ठोकळे).<br>(उपलब्ध नसल्यास साबणाचे खोके, काड्यापेठ्या, पेस्ट/क्रीम चे खोके, विविध आकाराची पुस्तके)<br>पद्धत:-<br>विद्या प्रवेश ( वी. प्र.): उपलब्ध ब्लॉक्स (ठोकळे) रेल्वे डब्यांच्या नमुण्या प्रमाणे जोडणे.<br>2 री व 3 री च्या वर्गांना:<br>ट्रक, पायर्या, कमान, अशा विविध नमुन्याचे ब्लॉक जोडणी करण्यास सांगणे.<br>*************************************************************************<br>**कोपरा – गणित कोपरा**<br>सामर्थ्य:- वस्तूंचा आकार, उंच- आखूड, जड- हलके, या आधारांवर वर्गीकरण करणे तसेच सांकेतिक रित्या संख्यांची जोडणी करणे.<br>उद्देश:- जड व हलक्या वस्तूंचे वर्गीकरण.<br>साहित्य:- प्लास्टिकचा चेंडू, रबरी चेंडू, पुट्ठे, नाणी, कापूस या प्रकारच्या विविध वजनाच्या वस्तू.<br>पद्धत:-<br>विद्या प्रवेश (वी.प्र.)<br>• दिलेले साहित्य/वस्तू पाहून, हाताळून झाल्यावर जड-हलक्या वस्तूंचे वर्गीकरण करतो/ते.<br>2 री व 3 री च्या वर्गांना:<br>वरील कृती विध्यार्थांनी पूर्ण केल्यानंतर, आपल्या परिसरातील जड आणि हलक्या वस्तू ओळखतील.<br>************************************************************************<br>**संशोधन/विज्ञान कोपरा** |

सामर्थ्य:- वैज्ञानिक, परीक्षण मनोभाव, तसेच वैचारिक मनोभाव वाढविणे.

कृती:- पाण्यात विरघळणारे.

उदेश:- पाण्यात विरघळणाऱ्या/ नविरघळणाऱ्या वस्तू ओळखणे.

साहित्य:- प्लास्टिकचे पारदर्शक चंचूपात्र, पाणी, वाळू, मीठ, खडी, रंग, इ.

पद्धत:- (वी.प्र. तसेच 2री , 3री चे वर्ग)

पारदर्शक असणाऱ्या दोन प्लाष्टीकच्या चंचूपात्रात अर्धे भरतील इतके पाणी ओता. एका पात्रात मीठ तसेच दुसऱ्या पात्रात वाळू घालून ढवळणे. कांही वेळानंतर पाण्यात दिसणाऱ्या बदलाचे निरीक्षण करणे.

*****************************************************************************

**बाहुली कोपरा**

सामर्थ्य:- सौंदर्योपासना, व्यक्तिगत स्वच्छता, अभिव्यक्ती कौशल्य वाढविणे.

कृती:- मी, माझ्या बाहुलीची स्वच्छता.

उद्देश:- स्वच्छतेच्या जानिवेसोबतच चांगल्या सवयींचे प्रदर्शन.

साहित्य:- बाहुली, हातरुमाल, टाँवेल, नेल कटर, खेळण्यातली प्लेट, कंगवा, न्यापकीन (इतर आवश्यक वस्तू)

पद्धत:-

विद्या प्रवेश (वी.प्र. तसेच 2री , 3री चे वर्ग):

मुल त्याच्या दैनंदिन कृतींमध्ये करत असलेल्या स्वच्छतेच्या चांगल्या सवयी बाहुली सोबत करण्यास सांगणे. (दात घासणे, तोंड धुणे, नखे कापणे, जेवणे, झोपणे) या प्रकारच्या दैनंदिन चांगल्या सवयींच्या कृती बाहुली सोबत प्रदर्शित करणे.

*****************************************************************************

**वाचन/ वर्ग वचनालय कोपरा**

सामर्थ्य:- चित्र वाचनासहित आकलन करणे, कल्पना शक्ती,
अभिव्यक्ती सामर्थ्य वाढविणे.

कृती:- "चित्र वाचन"


उद्देश :- फरक ओळखून सांगणे.

साहित्य:- फरक असणारी दोन एकसारखी चित्रे.

पद्धत:-

विद्या प्रवेश (वी.प्र. तसेच 2री , 3री चे वर्ग):

तीन ते चार फरक असणारी दोन एकसारखी चित्रे मुलांना देऊन त्यातील फरक तोंडी सांगण्यास सांगणे.



*****************************************************************************

**कलागृह /हस्तकला कोपरा**

कृती:- "हस्त चित्र"

उद्देश:- डोळे-हात यांच्यातील परस्पर समन्वय ठेवणे.

साहित्य:- पांढरा कागद, पेन्सिल, क्रेयोंस.


पद्धत:- (वी.प्र.)



पांढऱ्या कागदावर तळहात पसरून ठेवा, पेन्सिलीच्या सहाय्याने बोटांमधून, हाताच्या भोवत्याने तळहाताची आकृती तयार करणे, व त्यात रंग भरने.

*****************************************************************************

**लेखन कोपरा**

| | | |
|---|---|---|
| | | सामर्थ्य:- लेखन सिद्धतेच्या अभ्यासामध्ये मग्न होवून अक्षरांचा आकार रचणे.<br>कृती:- रेखा चित्र.<br>उद्देश:- लेखनास आवश्यक पुर्वसिद्धता कौशल्यांचा विकास.<br>साहित्य:- ड्रॉईंग शीट , पांढरे कागद, पेन्सिल, बांगडी, नाणे, झाकण, काड्यांची पेठी.<br>पद्धत:- विद्या प्रवेश (वी.प्र)<br>कागदावर वरील साहित्यांचा वापर करून आकृती रचणे.<br>2 री व 3 री चे वर्ग:<br>मूर्त स्वरूपात असलेल्या वस्तू पाहून त्यासारखेच रेखा चित्र काढण्यास प्रयत्न करणे.<br>***********************************************************************<br>हस्त कौशल्य कोपरा :<br>सामर्थ्य:- वैचारिक शक्ती, सृजनशीलता, स्वतंत्रपणे कार्य निर्वहन करणे.<br>कृती:- ओरेगामी<br>उद्देश:- दिलेल्या सूचनांचे व्यवस्थित व क्रमबद्धपणे पालन करणे.<br>साहित्य:- रंगीबेरंगी कागद.<br>पद्धत:-<br>विद्या प्रवेश (वी.प्र.) : 2 री व 3 री चे वर्ग<br><br>चित्रात दिलेल्या सूचनांप्रमाणे मुलांनी ओरेगामी हि कृती करणे. (शिक्षकांनी हि कृती निर्वहन करण्यापूर्वी मुलांना एक-दोन वेळा नमुना दाखल कृती करून दाखविणे. आवश्यक वाटल्यास मुलांना सहाय्य करणे.)<br>2 री व 3 री चे वर्ग:<br>विद्यार्थ्यांनी स्वत: आकृती रचन्यासोबत दिलेल्या कृतींचे निर्वहन करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शक कृती) | सामर्थ्य:- तुलना करणे, परिसराची जाणीव, रंग, आकार, व आकारमानाची संकल्पना.<br>कृती- 12 ए "स्पर्श करा,मोजून पहा" (विकासात्मक ध्येय-3)<br>उद्देश:- स्पर्श करून मोजून सांगणे.<br>साहित्य:- ठोकळे, खडू, खडे, बाटलीची झाकणे, चेंडू, बिया.<br>पद्धत:-<br>पाच किंवा पाच पेक्षा जास्त वस्तू ओळीत ठेवावे (ठोकळे, खडे, बाटलीचे झाकण, चेंडू ) प्रत्येक वस्तूंना स्पर्श करून मोजण्यास सांगणे.<br>इ.- 2 री<br>पाच पेक्षा जास्त वस्तूंना स्पर्श करून मोजण्यास सांगणे.<br>इ.- 3 री<br>'गटातील वस्तू कोणत्या गुनलक्षनाच्या आधारावर वर्गीकरण करण्यात आल्या?' अशा प्रश्नांची उत्तरे मिळविणे.<br>वापरावयाची अध्ययनपत्रके: 1.L- 21,22 (इ. 1ली, 2री, 3री चे वर्ग) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची | सामर्थ्य:- समाजाभिमुख वर्तन रूढ करणे, इतरांच्या भावना व हक्कांना संमान देऊन समाजात सहाय्यक ठरणाऱ्या इतर व्यवसायांचा संमान करणे.<br>कृती:- 7 ए समाजाचे सहाय्यक.<br>उद्देश:-<br>●आकलन क्षमता वाढविणे.<br>●समाज सहाय्यकांचे काम ओळखणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | कृती) | | साहित्य:- विविध व्यावसायिकांची चित्रे /दृकपट्टी.<br>पद्धत:- मुलांनी समाजाला सहाय्यक व्यावसायिकांचा मुकाभिनय करणे, बाकीच्या मुलांनी ते कोण ओळखून सांगाणे.<br>विवरण:- 2री व 3री च्या वर्गांनी स्थानिक समाजातील सहाय्यकांना ओळखून त्यांच्याप्रमाणे नक्कल करण्यास सांगणे.<br>वापरावयाची अध्ययनपत्रके: H.W.-7 (इ. 1ली, 2री, 3री चे वर्ग) |
| | भाषा विकास व पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य:- क्रियाशील स्व-अभिव्यक्ती , ध्वनी संकेत व लयबध्दतेची जाणीव, परिसराची जान, शब्दसंपत्तीचा विकास<br>कृती:- 3 गाणी, लयबद्ध गीते, कविता/नाटक. (विकासात्मक ध्येय- 2) ECL-3 (9व्या दिवसापासून पुढे घेतले.)<br>उद्देश:-<br>• ध्वनी संकेताची ओळख करून देणे.<br>• लयबद्धतेची ओळख निर्माण करणे.<br>• क्रियाशील स्व-अभिव्यक्तीला संधी देणे.<br>• आपल्या आजूबाजूच्या परिसराशी परस्पर संबंध जोडणे.<br>पद्धत:- मुलांना वर्तुळाकारात थांबवून, शिक्षकांनी मुलांना 3 ऱ्या दिवशी ओळख करून दिलेले लयबद्ध गीत अभिनयासहित म्हणून दाखविणे. शिक्षकांचे अनुकरण करत मुलांना ते गीत पुन्हा म्हणण्यास सांगणे.<br>लक्षात ठेवायचे अंश:<br>• मुलांना गाण्याचा आनंद घेता यावा म्हणून, शिक्षकांनी योग्य अभिनय आणि उत्साहाने गाणे म्हणणे.<br>• मुलाला माहित असलेले गाणे म्हणण्यास प्रोत्साहित करणे.<br>वर्गनिहाय विवरण:- 2री च्या वर्गातील मुलांनी लयबद्ध गीतात येणाऱ्या लयबद्ध शब्दांना ओळखणे. 3 री च्या वर्गातील मुलांनी त्या लयबद्ध शब्दांना आणखीन काही शब्द शोधून जोडावे. |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य:- शब्दांची ओळख, मुद्रणाची जाणीव, अर्थ ग्रहण, शब्दसंपत्तीचा विकास.<br>कृती:-11 बी , पुस्तक मेळा (विकासात्मक ध्येय-2)<br>उद्देश:- पुस्तकांवरील प्रेम वृद्धिंगत करणे.<br>साहित्य:- विविध प्रकारची पुस्तके.<br>पद्धत:- शाळा परिसरात पुस्तक मेळा भरवून, मुलांचा पुस्तकांकडील कल वाढविणे. पुस्तक मेळ्याला पालकांनीही सहभाग दर्शवावा यासाठी प्रोत्साहित करणे.<br>2री व 3री चे वर्ग : या मुलांसाठी आपल्याजवळील पुस्तके व ग्रंथालयातील आपल्या आवडीच्या पुस्तकांची निवड करून पुस्तक मेळा आयोजित करणे. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य:- शब्दांची ओळख, मुद्रणाची जाणीव, अर्थ ग्रहण, शब्दसंपत्तीचा विकास.<br>कृती:-11 बी , पुस्तक मेळा (विकासात्मक ध्येय-2) ECW-13<br>उद्देश:-<br>• पुस्तकांची नावे ओळखणे.<br>• मुद्रणाची संकल्पना निर्माण करणे.<br>• वाचनाचा कल वाढविणे.<br>• पुस्तके आकलनासहित वाचणे.<br>• शब्दसंपत्तीचा विकास करणे.<br>साहित्य:- ग्रंथालयातील पुस्तके, वह्या. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पद्धत:-<br>शालेय परिसरात पुस्तक मेळा भरवून मुलांना अनेकविध पुस्तकांचा परिचय करून घेण्यास संधी मिळवून देणे. त्या अंतर्गत पुस्तकांकडील त्यांचा कल वाढविण्याचा प्रयत्न करणे. त्यांनी पाहिलेल्या पुस्तकांची नावे सांगण्यास लावणे. पुस्तक मेळ्याला पालकही आपला सहभाग दर्शवतील यासाठी प्रोत्साहित करणे.<br>वर्गनिहाय विवरण:-<br>2री च्या वर्गातील मुलांनी त्यांनी पाहिलेल्या पुस्तकांच्या नावांची यादी करण्यास सांगणे, तसेच 3री च्या वर्गातील मुलांनी पुस्तक मेळ्यात त्यांनी पाहिलेल्या पुस्तकांबद्दल 4 - 5 वाक्ये लिहिण्यास संधी मिळवून देणे. |
| | | | आदर्श लेखन: शिक्षकांनी मुलांसमोर फलकलेखन करणे. लिखाणाचे योग्य क्रम/ पद्धत, मुलांना पाहता यावे अशी व्यवस्था करणे.<br>मुलांची नावे, मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे, इ. मुलांसमोर त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने लिहावेत. शिक्षकांनी वर्गामध्ये जे कांही फलक लेखन करावयाचे आहे ते मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अश्या पद्धतीने करावे. |
| | मैदानी खेळ | | कृती:- सोप्या श्वासोच्छवासाचा व्यायाम Breathing Exercise<br>सामर्थ्य:- एकाग्रता वाढविणे.<br>पद्धत:- मुलांना सरळ सोप्या सूचना देणे.<br>डोळे मिटून, पाठीचा कणा ताठ ठेवून बसण्यास सांगणे. दोन्ही हात सरळ मुद्रावस्थेत घेऊन मांडीवर ठेवणे. श्वासोच्छवास सावकाशपणे आत व बाहेर सोडण्यास सांगणे.<br>2री व 3री च्या वर्गातील मुलांना जास्तीचा श्वासोच्छवासाचा व्यायाम करण्यास सांगणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | गोष्टीचे शीर्षक: खरे सौंदर्य<br>साहित्य: चित्रमालिका<br>उद्देश:<br>➢ श्रवण सामर्थ्य वाढविणे.<br>➢ तर्क शक्ती वाढविणे.<br>➢ वैचारिक शक्ती वाढविणे.<br>➢ प्रश्नार्थक मनोभाव जागृत करणे.<br>पद्धत: **चित्रमालिका**<br>चित्रमालिका विविध पद्धतीने मांडून गप्पागोष्टींचा वेळ मनोरंजनात्मक स्वरुपात मांडणे.<br>(मुले गोष्टीचा आनंद घेत श्रवण करत आहेत कि नाही याची खात्री करून घेणे.) |
| | पुन्हा भेटू | | ● दिवसभरात केलेल्या कृती पुनारावार्तीत करणे.<br>● दिवसभरात केलेल्या सर्व कृती पालकांसोबत आणि कुटुंबातील सदस्यांसोबत चर्चा करण्यास प्रोत्साहित करणे.<br>● दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत यासाठी आनंददायी वातावरण निर्माण करून मुलांना सोडणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा – 5** **दिवस – 28 (गुरुवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
| --- | --- | --- |
| 28 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती:- 1<br>27 व्या दिवसाच्या सूचनांना अनुसरून, पुन्हा हावामान नकाशाबाद्दल मुलांना विचारणे. नंतर  हवामान नकाशा कार्ड मधे त्याची नोंद करण्यास सांगणे.<br>कृती:- 2 'गाढवाला (जागे) उठवूनाका'.<br>साहित्य:- घंटा<br>पद्धत :-<br>1. मुलांना वर्तुळाकार थांबण्यास सांगणे.<br>2. एका विद्यार्थ्याला गाढवाची नक्कल करण्यास सांगणे. (गाढव वर्तुळाच्या मध्यभागी झोपल्याचे नाटक/नक्कल करणे. )<br>3. बाकीच्या मुलांनी घंटा हातात घेऊन एकाकडून दुसऱ्याकडे देत पुढे-पुढे हस्तांतरित करावी. घंटा पुढे मुलांना देत असताना घंटेचा आवाज होताकामानाये.<br>4. घंटेचा आवाज झाल्यास ज्या कोणत्या मुलाच्या हातात घंटा असेल त्या मुलाच्या जागेवर गाढवाची नक्कल करणारा मुलगा येवून बसेल.<br>5. व त्या मुलाने पुढे गाढवाची नक्कल केली पाहिजे. अशा प्रकारे हि कृती पुढे चालू राहील. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती:- माझी आवडती बाहुली<br>साहित्य:- विविध प्रकारच्या बाहुल्या (कागदी बाहुल्या, कळसूत्री बाहुल्या, लाकडी बहुल्या, लोकरी बाहुल्या, कापडी बाहुल्या, स्थानिक परिसरात उपलब्ध असणाऱ्या बाहुल्या, इत्यादी)<br>पद्धत:-<br>1. मुलांना अर्धवर्तुळाकारात बसण्यास सांगणे.<br>2. विविध प्रकारच्या बाहुल्या ट्रेमध्ये ठेवणे.<br>3. प्रत्येक मुलाला पुढे बोलावून ट्रेमधील बाहुली निवडण्यास सांगणे.<br>4. मुलाला त्याने/तिने निवडलेल्या बाहुलीबद्दल कांही प्रश्न विचारणे.<br>उदा.- तुम्ही ही बाहुली का निवडलीत?<br>तुम्ही या बाहुलीसोबत कधी खेळला आहात का?  तुम्हाला बाहुल्या आवडतात का?<br>तुम्हाला बाहुल्या का आवडतात?<br>तुम्हाला बाहुल्या का आवडत नाहीत?<br>एक विद्यार्थी उत्तर देत असेल तर इतर मुलांनी त्याचे/तीचे बोलने ऐकण्यास सांगणे. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्यन कोपऱ्यात जाऊन कृती निर्वहन करणे.<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे कार्य निर्वहन करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन | सामर्थ्य:- गंध (वास) ज्ञान, परिसराची जाणीव.<br>कृती :- 4  'गंध ओळखा' (Smelling sense)  (विकासात्मक ध्येय-3)<br>उद्देश:-  गंध ओळखणे.<br>साहित्य:- कांदा, लसून, अगरबत्ती, पुदिना, ताजे व कुजलेली फळे, दुर्गंधीयुक्त वस्तू.<br>पद्धत:- मुलांनी वर्तुळाकार किंवा ओळीत बसावे. कांदा, लसून, अगरबत्ती, पुदिना, ताजे व कुजलेली फळे, दुर्गंधीयुक्त वस्तू मुलांना देवून त्याचा वास/ गंध घेण्यास सांगणे. नंतर प्रत्येक मुलाच्या डोळ्यावर पट्टी बांधून दिलेल्या वस्तू/फळाचा गंध घेऊन त्याचे नाव ओळखण्यास सांगणे.प्रत्येक मुलाला संधी मिळवून देणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शक कृती) | | इ.- 2री<br>आपल्या अवती-भोवतीच्या परिसरातील चांगल्या व वाईट गंधाचे अनुभव सांगायला लावणे.<br>इ.- 3री<br>गंध असणाऱ्या फळे, भाज्या, सालींची यादी करण्यास सांगणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | | सामर्थ्य:- समाजाभिमुख वर्तन रूढ करणे, इतरांच्या भावना व हक्कांना संमान देऊन समाजाला सहाय्यक ठरणाऱ्या इतर व्यवसायांचा संमान करणे.<br>कृती:- 7 ए समाजचे सहाय्यक.<br>उद्देश:-<br>●आकलन शक्ती वाढविणे.<br>●समाज सहाय्यकांचे काम ओळखणे.<br>साहित्य:- विविध व्यावसायिकांची चित्रे /दृकपट्टी.<br>पद्धत:- समाजामध्ये आपल्याला साहाय्य करणाऱ्या विविध व्यवसाय करत असणाऱ्या व्यक्तींचे पात्र मुलांना परिचीत करून देणे. उदा.- वैद्य, पोलीस, शिक्षक, अश्या व्यक्तींना मुलांनी समाजात पहिले असतील याबद्दल समजावून सांगणे. हे सर्वजन कश्या प्रकारे आपल्या जीवनात सहाय्यक ठरतात याबद्दल चर्चा करण्यास प्रेरित करणे. त्यांच्या पात्रांचा मुकाभिनय करण्यास मुलांना सांगणे. एका मुलाने मुकाभिनय केल्यास बाकीच्या मुलांनी ते कोणते पात्र याचा अंदाज बांधून ओळखन्यास सांगणे.<br>विवरण:- 2री व 3री च्या मुलांना स्थानिक समाजातील विविध सहाय्यकांना ओळखून त्यांच्याप्रमाणे नक्कल करण्यास सांगणे.<br>वापरावयाची अध्ययनपत्रके:H.W.-8 (इ. 1ली, 2री, 3री चे वर्ग) |
| | भाषा विकास व पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य:- सृजनात्मकता, स्व-अभिव्यक्ती, शब्द संपत्तीचा विकास, ओळखून/तर्क करून वाचणे.<br>कृती:- 1 सी , ‘मला पहा, बोलते व्हा...’ (विकासात्मक ध्येय-2) ECL-15<br>उद्देश:-<br>● सूचित विषयाला अनुसरून स्वत:च्या शब्दात बोलणे.<br>● नवीन शब्दांचा शोध घेत शब्द संपत्तीचा विकास करणे.<br>साहित्य:- दृक पट्या<br>पद्धत:- पँनेल बोर्डवर आठवड्यातून एकदा प्राणी, वनस्पती, प्राणी संग्रहालयाचे चित्र आणि साजरे केलेल्या विविध सणांची चित्रे चिकटवून, मुलांना ते पाहून त्या बद्दल बोलण्यास प्रोत्साहित करणे.<br>वर्गनिहाय विवरण:- 2री च्या वर्गातील मुलांना त्यांच्या विषयाबद्दल जास्त सविस्तरपणे बोलण्यास सांगणे.<br>3री च्या वर्गातील मुलांना 3 मिनिटे नअडखळता बोलण्यास सांगणे. |
| | | आकलना सहित वाचन | सामर्थ्य:- शब्द ओळखणे, मुद्रणाची जाणीव, अर्थ ग्रहण, शब्द संपत्तीचा विकास.<br>कृती 11 C ‘ माझी पहिली शब्द पेटी’ (विकासात्मक ध्येय – 2 रे)<br>उद्देश:- ओळखीच्या विषय वस्तूंवर आधारित शब्दांना संबधित चित्रे काढणे व चित्र ओळखून शब्द वाचणे/ ओळखणे.<br>साहित्य:- दृकपट्टी ( flash cards), वही, चित्र तक्ता.<br>पद्धत:- विध्यार्थ्यांनी जुन्या नियतकालिकांमधून तसेच गोष्टीच्या पुस्तकातून 3- 4 अक्षरी शब्दांची कात्रणे एका पेटीत संग्रहित करणे. नंतर त्यांना कागदावर चिकटवून, प्रत्येक शब्दाला संबंधित चित्र काढण्याचे प्रयत्न करणे.<br>इ. 2 री व 3 री :- विद्यार्थांनी सोपी वाक्ये लिहून एका पेटीत संग्रहित करावी. नंतर ती वाक्ये कागदावर चिकटवून, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | त्या वाक्यांना संबंधित चित्रे काढण्यास सांगणे.<br>सूचना:- यापूर्वी हि कृती करतेवेळी वापरलेले शब्द व वाक्ये सोडून, नवीन शब्द व वाक्ये वापरावीत. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य:- स्व-नियंत्रण, धनात्मक व्यक्तिगत संकल्पनांची अभिवृद्धी, आणि इतरांच्या भावना व हक्कांचा संमान.<br>कृती:- 6 सी, “ बागेचे चित्र काढूया” (विकासात्मक ध्येय- 2) ECW-14<br>उद्देश:-<br>● धनात्मक व्यक्तिगत संकल्पनांची अभिवृद्धी करणे.<br>● इतरांच्या भावना व हक्कांचा संमान राखणे.<br>● स्वत:च्या भवनांवर नियंत्रण ठेवण्याचे सामर्थ्य वाढविणे.<br>साहित्य:- कोरा कागद, रंग, पेन्सिल, क्रेयोंस.<br>पद्धत:- मुलांना अध्ययनपत्रिका EC 1.20 मधील बागेचे चित्र काढण्यास सांगणे, व त्यांनी पाहिलेल्या बागेबद्दल त्यांच्या भावना प्रकट करण्यास सांगणे.<br>वर्गनिहाय विवरण:-<br>2री च्या वर्गातील मुलांनी अध्ययनपत्रक EC 2.20 मधील बागेचे चित्र काढून त्याबद्दल बोलणे. 3री च्या वर्गातील मुलांनी अध्ययनपत्रक EC 3.20 मधील बागेचे चित्र काढून, संबंधित शब्दांची यादी करणे.<br>वापरावयाची अध्ययनपत्रके : EC-7 (इ. 1ली, 2री, 3री चे वर्ग) |
| | | | आदर्श लेखन: शिक्षकांनी मुलांसमोर फलकलेखन करणे. लिखाणाचे योग्य क्रम/ पद्धत , मुलांना पाहता यावे अशी व्यवस्था करणे.<br>मुलांची नावे, मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे, इ. मुलांसमोर त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने लिहावेत. शिक्षकांनी वर्गामध्ये जे कांही फलक लेखन करावयाचे आहे ते मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने करावे. |
| | मैदानी खेळ | | कृती:- वज्रासन (Vajrasana) <br>सामर्थ्य:- एकाग्रता वाढविणे, स्नायूंची चालनाशक्ती वाढविणे.<br>पद्धत:- मुलांना सरळ साध्या सूचना देणे.<br>डोळे बंद करून पाठ ताठ ढेवून वज्रासनात बसण्यास सांगणे.<br>दोन्ही हात सरळ मुद्रा करून चित्रात दाखविल्याप्रमाणे मांडीवर ठेवण्यास सूचित करणे.<br>2री व 3री च्या वर्गातील मुलांना याच अवस्थेत जास्त वेळेपर्यंत बसण्यास प्रोत्साहित करणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | गोष्टीचे शीर्षक:- खरे सौंदर्य<br>साहित्य:- मुखवटे<br>उद्देश:-<br>➢ श्रवण सामर्थ्य वाढविणे.<br>➢ तर्क शक्ती वाढविणे.<br>➢ वैचारिक शक्ती वाढविणे.<br>➢ प्रश्नार्थक मनोभाव जागृत करणे.<br>➢ कथेला सबंधित चित्रांच्या संग्रहाची आवड निर्माण करणे.<br>पद्धत:-<br>**मुखवटे**<br>मुखवट्यांचा वापर करून कथेची वेळ मनोरंजनात्मकपणे रचणे. मोठ्या विध्यार्थांच्या सहाय्याने गोष्टीतील विविध |

| | | |
|---|---|---|
| | | पात्र त्यांना देवून अभिनय करण्यास साहाय्य करणे.<br><br>(मुले गोष्टीचा आनंद घेत श्रवण करताहेत कि नाही याची खात्री करून घेणे.) |
| | पुन्हा भेटू | • दिवसभरात केलेल्या कृती पुनारावार्तीत करणे.<br>• दिवसभरात केलेल्या सर्व कृती पालकांसोबत आणि कुटुंबातील सदस्यांसोबत चर्चा करण्यास प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत यासाठी आनंददायी वातावरण निर्माण करून मुलांना सोडणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा – 5** **दिवस – 29 (शुक्रवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 29 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती : 1, ‘ मी एक चवदार फळ’<br>साहित्य : विविध प्रकारच्या फळांची चित्रे.<br>पद्धत :<br>• विविध प्रकारच्या फळांची चित्रे क्रमवार दाखविणे.<br>• फळाचे नाव व त्याचा रंग सांगण्याच्या माध्यमातून त्यांना वर्गात प्रवेश करण्यास सांगणे.<br>उदा.- “ मी पेरू, हिरव्या रंगाचा पेरू”.<br>• मुलांनी वर्गात प्रवेश घेतल्यानंतर वर्तुळाकारात थांबण्यास सांगणे.<br>• मुलांचे स्वागत करणे.<br>• हवामान नकाशाबद्दल मुलांना विचारणे आणि ते हवामान नकाशा कार्ड मधे नोंद करण्यास त्यांना सूचित करणे.<br>कृती:- 2, ‘ गाढव आणि केळी’<br>कार्य पद्धत:-<br>1. मुलांना वर्तुळाकार थांबवून, एका विध्यार्थ्याच्या डोळ्यांवर पट्टी बांधून वर्तुळाच्या मध्यभागी उभे करणे.<br>2. एक चेंडू मुलांच्या हातात देवून पुढे,पुढे हस्तांतरित करण्यास सांगणे. एखादे गाणे चालू करणे, व मधेच गाणे बंद करणे.<br>3. गाणे बंद झाल्यावर चेंडू ज्या मुलाच्या हातात असेल त्याने कोणत्याही एका फळाचे नाव सांगावे.<br>4. डोळ्यांवर पट्टी बांधलेल्या मुलाने फळाचे नाव सांगितलेल्या मुलाला ओळखले पाहिजे.<br>5. त्याने/तिने योग्य मुलास ओळखले तर, मिळालेल्या मुलाने गाढवाचे स्थान घेतले पाहिजे (त्याच्यावर राज्य येयील). त्याने कृती पुढे चालू ठेवणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 28 व्या दिवसाच्या कृती पुनरावर्तीत करणे. |

| | | |
|---|---|---|
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्यन कोपऱ्यात जाऊन कृती निर्वहन करणे.<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे कार्य निर्वहन करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य:- समस्या निवारण, तार्किकता<br>कृती:- 11 व 11 सी, "विचार कक्षा" (Think Box) (विकासात्मक ध्येय- 3)<br>उद्देश:- क्रमवार जोडणे.<br>साहित्य:- कासव आणि कोल्ह्याचे चित्र कार्ड.<br>पद्धत:- 'कोल्हा व कासवाची कथा'<br>एके दिवशी सकाळी कोल्ह्याला खूप भूक लागली होती. तो जंगला मधे आहाराच्या शोधात फिरत होता. तेवढ्यात त्याने कासवाला तेथून जाताना पहिले. कोल्ह्याने कासवाला खायचे ठरविले. व धावत जावून त्याने कासवाला पकडले. कासवाला खाण्यासाठी, कोल्ह्याने त्याचे जाड व घट्ट असलेले कवच मोडण्यासाठी आपल्या हाताने होतील तेवढे प्रयत्न केले, पण ते साध्य झाले नाही. कासव खूप हुशार होते, ते कोल्ह्याला म्हणाले, "प्रिय कोल्हया ! तूला मला खायची इच्छा झाली आहे का? जर तू मला खाणार असशील तर प्रथम मला तळ्यात नेवून सोड, जेणेकरून पाण्यात गेल्याने माझे कवच मृदू होईल व तुला ते सहज रित्या फोडून खाता येयील". मूर्ख कोल्ह्याने कासवाला जवळच्याच एका तळ्यात नेवून सोडले. कासव तळ्यात गेल्या बरोबर, वेगाने पाण्यात पोहून कोल्हयापासून आपली सुटका करून घेतली व कोल्ह्याकडे पाहून हसू लागला.<br>यानंतर प्रश्न विचारून, कासवाने कशी सुटका करून घेतली हे सांगितल्यानंतर चर्चा घडवून आणणे. मुलांनी समस्या निवारण करण्यास त्यांचे स्वत:चे अनुभव प्रकट करू देणे.<br>कृती:- 11 ए " क्रमवार जोडणे"<br>मुलांना चित्र कथांचे कार्ड देवून अनुक्रमे जोडण्यास सांगून विवरण करण्यास सांगणे.<br>इ. - 2री<br>कथा ऐकल्यानंतर सोपे प्रश्न विचारणे.<br>उदा.- या कथेत येणाऱ्या प्राण्यांची नावे सांगणे.<br>इ.- 3 री<br>हीच कथा मुक्तपने सांगण्यास मुलांना संधी मिळवून देणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | सामर्थ्य : समाजाभिमुख वर्तनाचा विकास, इतरांच्या भावनांचा आणि हक्कांचा आदर करणे, सृजनात्मक आणि सौंदर्यात्मक विकासाचे निरीक्षण, कल्पनाशक्तीचा विकास, शब्दभांडाराची अभिवृद्धी.<br>कृती : 10 C - सणांसाठी वर्गखोल्यांची सजावट.<br>उद्धेश:<br>• आपल्या संस्कृतीत असलेल्या विविध विषयाबद्दल मुलांमध्ये जाणीव निर्माण करणे.<br>• सौंदर्यात्मकतेचा विकास करणे.<br>• शाळेमध्ये आयोजित विद्याप्रवेश उपक्रमांची सजावट कशी करावी हे शिकविणे.<br><br>साहित्य :सजावटीसाठी लागणाऱ्या विविध वस्तू.<br>पद्धत : प्रमुख सांस्कृतीक आणि राष्ट्रीय सणांची ओळख करून देणे. सण साजरे करण्याच्या पद्धती सांगणे. स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताकदिन, मकर संक्रांती, दीपावली, होळी, ख्रिसमस, ईद मिलाद, गुरुपौर्णिमा इत्यादी सणांविषयी माहिती देणे. भारतामध्ये हे सण कसे साजरे केले जातात हे सांगणे.<br>वेगवेगळ्या सणांना अनुसरून शाळेची सजावट करण्यामध्ये मुलांना गुंतविणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | विवरण : 2 री आणि 3 री च्या विध्यार्थ्यांना सणांच्या सजावटीसाठी पताके तयार करावयास सांगणे. |
| | | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य :आकलन, सृजनात्मक चिंतन, तार्किक विचार सरणी, परिसराविषयी जाणीव.<br>कृती : 5A “ लयबद्ध कोडी ”(विकासात्मक ध्येय - 01) ELC - 16<br>उद्धेश :<br>• विविध प्रश्ने विचारून मुलांमध्ये आकलन सामर्थ्याची वाढ करणे.<br>• सृजनात्मक चिंतनाचा वापर करून बोलण्याची संधी उपलब्ध करून देणे.<br>• आपल्या आजूबाजूच्या परिसराविषयी जाणीव निर्माण करून देणे.<br>साहित्य : कोड्यांचे पुस्तक.<br>पद्धत : मुलांना काही कोडी देवून त्यांना त्या कोड्यांना संबंधित लयबद्ध शब्द सांगावयास लावणे.<br>उदाहरणार्थ : “माझी शाळा” अशा प्रकारच्या काही शब्दांचा मी विचार करत आहे. (अपेक्षित उत्तरे माळा, काळा, वाळा...)<br>वर्गावर विवरण : 2 री च्या वर्गातील मुलांनी प्रत्येक शब्दाला कमीत कमी 4 लयबद्ध शब्द सांगणे.<br>3 री च्या वर्गातील मुलांनी प्रत्येक शब्दाला 4 पेक्षा जास्त लयबद्ध शब्द सांगणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | आकलनासहीत वाचन | सामर्थ्य : मुद्रित मजकुराची जाणीव, शब्द ओळखणे, अर्थग्रहण, शब्द संपत्तीमध्ये वाढ आणि परिसराविषयी जाणीव.<br>कृती : 18<br>• चित्र संचयीका : (विकासात्मक ध्येय – 2 ) विषय : फक्त रात्रीच्यावेळी दिसणाऱ्या वस्तू.<br>उद्धेश :<br>• मुलांना गटामध्ये बसवून त्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे विवरण करणे.<br>साहित्य : चार्ट, स्वतः काढलेली चित्रे , रंगीत खडू ( क्रेयॉन्स ) , डिंक , पट्टी , टॅग.<br>पद्धत : मुलांना गटामध्ये बसवून, आवश्यक वस्तूंचा वापर करून फक्त रात्रीच्यावेळी दिसणाऱ्या वस्तूंचे चार्ट बनविण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन करणे. तयार केलेल्या चार्ट्सचे स्पष्टीकरण वर्गाखोलीमध्ये देण्याची संधी उपलब्ध करणे.<br>तयार केलेल्या भित्तीपत्रकांना वर्गखोलीमध्ये प्रदर्शित करणे.<br>शिक्षकांनी 2री आणि 3 री च्या मुलांना योग्य ती मदत करून गटामध्ये योजनाकार्य पूर्ण करावयास सांगणे. |
| | | उद्देशपूर्वक लेखन | सामर्थ्य : स्वनियंत्रण, सकारात्मक दृष्टिकोनाचा विकास आणि इतरांच्या भावनांचा आणि हक्कांचा आदर करणे.<br>कृती – 6 D : “ ठिपके जुळव ” (विकासात्मक ध्येय – 02 ) EWC – 15<br>उद्धेश :<br>• सकारात्मक दृष्टिकोनाचा विकास करणे.<br>• इतरांच्या भावना आणि हक्कांविषयी आदर निर्माण करणे.<br>• स्वत:च्या भावनांवर नियंत्रण ठेवण्याचे सामर्थ्य निर्माण करणे.<br>• ठिपक्यांचे चित्र पूर्ण करणे.<br>साहित्य : ठिपक्यांची चित्रे.<br>पद्धत : मुलांना ठिपक्यांची चित्रे देवून ठिपके जोडून चित्र पूर्ण करावयास सांगणे.<br>वर्गावर विवरण : 1 ली च्या मुलांनी ठिपके जोडून पूर्ण केलेल्या चित्रांना, 2 री च्या मुलांना नावे देण्यास सांगुण त्या चित्राविषयी बोलावयास सांगणे. 3 री च्या मुलांना या चित्राविषयी 3-4 ओळी लिहावयास सांगणे. |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षकांनी मुलांसमोर फलक लेखन करणे. अक्षर लेखनाचा योग्य क्रम पाहण्याची संधी मुलांना उपलब्ध करून देणे.<br>मुलांची नावे, मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे इत्यादी मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | लिहावेत. शिक्षकांनी वर्गामध्ये जे काही फलक लेखन करावायाचे आहे ते मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने करावे. |
| | मैदानी खेळ | | कृती : योगासन योग मुद्रा.( Yoga Poses )<br>सामर्थ्य : एकाग्रता वाढविणे,स्नायू बळकट करणे.<br>साहित्य :<br>पद्धत : मुलांना सोप्या सोप्या सूचना देणे.<br>मुलांच्या वयानुसार त्यांना सोपी योगासने शिकविणे.<br>उदा : 1. वृक्षासन<br>2. ताडासन<br>3. उत्थानासन<br>4. उत्काटासन इ.<br>दुसरी आणि तिसरीच्या मुलांना थोडी कठीण योगासने करण्यासाठी प्रोत्साहित करणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शीर्षक : सुंदर गोष्टी.<br>साहित्य : संभाषनयुक्त दृकपट्ट्या.<br>उद्धेश :<br>• श्रवण कौशल्य वृद्धिंगत करणे.<br>• आकलन सामर्थ्य वृद्धिंगत करणे.<br>• वैचारिक शक्ती वृद्धिंगत करणे.<br>• प्रश्ने विचारण्याचा मनोभाव निर्माण करणे.<br>• कथेला अनुरूप चित्रांचा संग्रह करण्याची आवड निर्माण करणे.<br>• अभिव्यक्ती सामर्थ्य वाढविणे.<br>• न अडखळता बोलण्याचे सामर्थ्य वृद्धिंगत करणे.<br>पद्धत :<br>**पात्राभिनय**<br>• कथेचे पुनरावलोकन ( पुन:स्मरण ) करणे.<br>• कथाकथन करण्यासाठी दुसरी व तिसरीच्या मुलांना सहाय्य करणे.<br>• कथा कथन करत असताना चुका झाल्यास त्याच क्षणी दुरुस्त न करता, त्या चुकांना सकारात्मकरीत्या स्वीकारून नंतर त्या चुका दुरुस्त करून कथा कथन करावयास सांगणे.<br>कथेतील पात्रांची छोटी छोटी संभाषणे दृकपट्टीवर लिहून देणे. |
| | पुन्हा भेटू | | • दिवसभरात मुलांनी केलेल्या सर्व कृतींचे पुनरावर्तन करणे.<br>• दिवसभरात मुलांनी केलेल्या सर्व कृती पालक व कुटुंबातील सर्व सदस्यांसोबत चर्चा करण्यासाठी प्रोत्साहित करणे.<br>दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत यासाठी आनंददायी वातावरण निर्माण करून मुलांना निरोप देणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा – 5 दिवस – 30 (शनिवार)

| | |
|---|---|
| प्रतिबिंब (वर्गातील निरंतर मूल्यमापन) | • विविध तंत्र वापरून (निरीक्षण, तपशील पट्टी, मुलांची अध्ययन पत्रके, व्हिडीओ, सांदर्भिक नोंदी, इत्यादी) तुम्ही संग्रह केलेल्या मूल्यमापन नोंदी/माहिती यांचे पुनरावलोकन करणे.<br>• प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिगत गरजेनुसार पुढील आठवड्यातील अध्ययन प्रक्रियेची योजना आखणे.<br>• अध्ययनाच्या तिन्ही विकासात्मक ध्येयांच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे. |

# माझी प्रगती-3

## आठवडा – 5 दिवस – 30 (शनिवार)

| प्राप्त केलेल्या अध्ययन निष्पत्ती | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती | क्वचित | कधीतरी | नेहमी |
| 1 | शाळेच्या दैनंदिन कृतींशी जुळवून घेतो/ घेते. | | | |
| 2 | शाळेला आनंदाने येतो/ येते. | | | |
| 3 | शिक्षकांना व वर्गमित्रांना अभिवादन करतो/ करते. | | | |
| 4 | सामुहिक कृतीमध्ये उत्साहाने सहभागी होतो/ होते. | | | |
| 5 | साध्या सूचनांचे पालन करतो/ करते. | | | |
| 6 | आपल्या आजूबाजूच्या परिसराविषयी कुतुहल दाखवितो/ दाखविते. | | | |
| 7 | चिखल / पिठापासून प्रतिकृती तयार करण्याचा आनंद घेतो/ घेते. | | | |
| 8 | एकाच प्रकारच्या वस्तूंचा गट करतो/ करते. | | | |
| 9 | इंद्रियांच्या सहाय्याने वस्तू ओळखतो/ ओळखते. | | | |
| 10 | लयबद्ध कविता/बालगीतांचा आंनद घेतो/ घेते. | | | |
| 11 | चित्रफितीतील वस्तूंची नावे ओळखतो/ ओळखते. | | | |
| 12 | विचार व्यक्त करण्यास घाबरतो/ घाबरते. | | | |
| 13 | रंग ओळखतो, नाव सांगतो/ सांगते, तुलना आणि गट करतो/ करते. | | | |
| 14 | पूर्ण वाक्यात स्पष्टपणे बोलतो/ बोलते. | | | |
| 15 | लयबद्ध कविता / बालगीतांचा आनंद घेतो/ घेते. | | | |
| 16 | आरोग्यदाई आहार पद्धतींचा अवलंब करतो/ करते. | | | |
| 17 | आरोग्य आणि स्वच्छतेच्या सवयींचा अवलंब करतो/ करते. | | | |
| 18 | वर्गातील जबाबदारी आणि कृती स्वतंत्रपणे करतो/ करते. | | | |
| 19 | 2 ते 4 अडचणी असलेले कोडे/मार्ग शोध सारख्या समस्या सोडवितो/ सोडविते. | | | |
| 20 | विविध वस्तूच्या लांबींची तुलना करतो/ करते. | | | |
| 21 | मार्गदर्शन दिल्यास साध्या नैसर्गिक घटनांचे निरीक्षण/संशोधन करतो/ करते. | | | |
| 22 | एकापेक्षा जास्त गुणधर्मांच्या आधारावर वस्तूंचे वर्गीकरण करतो/ करते. (रंग, | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | आकार, आकारमान) | | | |
| 23 | लयबद्द शब्द ओळखतो/ ओळखते. | | | |


# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा – 6 दिवस – 31 (सोमवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 31 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती : SUN, MOON, STAR<br>साहित्य : सूर्य, चंद्र, तारे यांची चित्रे.<br>पद्धत :<br>• मुलांना वर्गखोलीबाहेर एका ओळीत उभे करणे.<br>• सूर्य, चंद्र, तारे यांची चित्रे एकानंतर एक दाखविणे. (शिक्षकांनी वर्गखोलीच्या दरवाजा जवळ उभे राहणे.)<br>• दाखविलेली चित्रे मुलांना पाहायला सांगून सूचनेप्रमाणे टाळ्या वाजवत वर्गखोलीमध्ये प्रवेश करण्यास सांगणे.<br>SUN : एक वेळा टाळी वाजवीणे.<br>MOON : दोन वेळा टाळी वाजवीणे.<br>STAR : तीन वेळा टाळी वाजवीणे.<br>• वर्गामध्ये प्रवेश केल्यानंतर वर्तुळाकार उभे राहण्यास सांगणे.<br>• "What day is today ? ( आज कोणता वार आहे ? )" अशाप्रकारे मुलांना विचारून Today is ....... ( आज ..........) अशी उत्तरे मिळाविणे.<br>• हवामान नकाशा बनवून घेणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | ाझे रोप, माझे झाड.<br>साहित्य : विविध प्रकारच्या रोपांची व झाडांची चित्रे.<br>पद्धत :<br>1. मुलांना अर्धवर्तुळाकारामध्ये बसविणे.<br>2. सर्व कार्ड वर्तुळाच्या मध्यभागी ठेवणे.<br>3. प्रत्येक मुलाला क्रमवार बोलावून त्यांना त्यांच्या आवडीचे एक कार्ड निवडण्यास सांगणे.<br>4. मुलांनी निवडलेल्या कार्डातील चित्राविषयी प्रश्ने विचारून त्यांना उत्तरे देण्यास प्रोत्साहित करणे.<br>प्रश्न : हे कोणते रोप/झाड आहे ? तू हेच चित्र का निवडलास ? तू कधीतरी एखादे रोप लावला आहेस का ? तू कोणते रोप लावला आहेस ?<br>वर्ग - दुसरी आणि तिसरीसाठी<br>दिलेल्या प्रश्नासोबत खालील प्रश्ने वापरू शकता.<br>• तुम्हाला रोप लावायला आवडते का ? |

| | | |
|---|---|---|
| | | • तुम्हाला रोप लावायला का आवडते ?<br>• झाडांचे संरक्षण कसे केले पाहिजे ? |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती निर्वहन करणे.<br>शिक्षकांनी नियमावलीत दिल्याप्रमाणे कार्यनिर्वहन करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : जोडणे, परिसराची जाणीव, रंग, आकार, आकारमानाची संकल्पना.<br>कृती – 12 A : “ स्पर्श करूया आणि मोजुया ”(विकासात्मक ध्येय - 03)<br>उद्धेश : मूर्त वस्तूंना स्पर्श करून मोजणे.<br>साहित्य : आजूबाजूच्या विविध वस्तू.<br>पद्धत : काही वस्तू एका ओळीमध्ये ठेवणे. मुलांना प्रत्येक वस्तूला स्पर्श करून अनुभव घेण्यास सांगणे. दोन वस्तूंमध्ये तुलना करून त्यांच्यातील फरक ओळखून सांगणे. नंतर मूर्त वस्तू मोजून दाखविणे.<br>इयत्ता : दुसरी<br>रंग, आकार, आकारमानाशी संबंधित 10 वस्तू ठेवून त्यांना स्पर्श करून मोजणे.<br>इयत्ता : तिसरी<br>दिलेल्या 20 वस्तू मोजून त्या वस्तूंच्या नावांची यादी करावयास सांगणे.<br>उपयोगात आणावयाची अद्ययणनपत्रके : EC I. L.– 23 ( वर्ग – 1, 2 , 3 ) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांच्या कृती) | सामर्थ्य : सकारात्मक स्व - संकल्पनेचा विकास, इतरांच्या हक्क आणि भावनांचा आदर.<br>कृती – 6 D : ठिपके जुळवून चित्र पूर्ण कर.<br>उद्धेश :<br>• सुक्ष्म स्नायूंचा विकास करणे.<br>• डोळे आणि हात यांच्यामध्ये समन्वय साधने.<br>साहित्य : वेगवेगळ्या ठिपक्यांची चित्रे.<br>पद्धत : मुलांना बागेमध्ये घेवून जाने आणि तेथील रोपे, झाडे, पक्षी दाखवून त्यांच्यापासून आपल्याला होणारे फायदे सांगणे. त्याबरोबरच वनस्पती आणि प्राण्यांविषयी सहानुभूती, पक्ष्यांना पाणी आणि आहार देणे इत्यादी कृतीद्वारे अपंग आणि वडीलधाऱ्या व्यक्तींसोबत आदराने वागण्यास शिकविणे.<br>ठिपकेयुक्त निसर्गचित्र देवून क्रमवार ठिपके जोडून चित्र पूर्ण करावयास संधी उपलब्ध करून देणे. फळबागेचे चित्र काढावयास सांगून त्यांनी पाहिलेल्या फळबागे विषयी आपला अनुभव सांगावयास संधी उपलब्ध करून देणे.<br>विवरण : दुसरी आणि तिसरीतील मुलांना रोप, झाड, प्राणी आणि पक्षी यांची चित्रे काढून रंग भरावयास सांगणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत<br>ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : श्रवण कौशल्य, क्रियात्मक स्व-अभिव्यक्ती, औपचारिक संभाषण, रंगांची परिकल्पना.<br>कृती – 8 A : बघ आणि सांग. (विकासात्मक ध्येय – 2 ) ECL - 8<br>उद्धेश :<br>• निवडलेल्या विषयाबद्दल अस्खलित ( न अडखळता ) बोलणे.<br>• औपचारिक संभाषण कौशल्याचा विकास करणे.<br>• ऐकलेल्या संभाषणाबद्दल आपले मत मांडणे.<br>• सृजनात्मक स्व-अभिव्यक्तीसाठी संधी उपलब्ध करून देणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | साक्षरता | | साहित्य : प्राणी, पक्षी, वाहने एत्यादिंची चित्रे/खेळणी.<br>पद्धत : प्राणी, पक्षी, वाहने एत्यादिंची चित्रे/खेळणी एका पिशवीमध्ये घालून एकेका मुलांना बोलावून पिशवीतील कोणतेही एक चित्र/खेळणी घेवून त्याचा आकार, रंग, उपयोग, लक्षनांबद्दल बोलावयास सांगणे.<br>वर्गवर विवरण : दुसरीच्या मुलांनी निवडलेल्या विषयाबद्दल 2 ते 3 मिनिटे बोलणे. तिसरीच्या मुलांनी निवडलेल्या विषयाबद्दल त्याच्या दैनंदिन वापर आणि उपयोजना विषयी बोलणे. |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य : सुरुवातीचा आणि शेवटचा ध्वनी/अक्षर ओळखणे.<br>कृती – 10 D : "शब्द शोधणे" (विकासात्मक ध्येय – 1 )<br>उद्धेश : सुरुवातीची आणि शेवटची अक्षरे आणि ध्वनी ओळखणे.<br>साहित्य : विविध खाद्यपदार्थ / चित्रे.<br>पद्धत : मुलांना सण / समारंभादिवशी बनविल्या जाणाऱ्या त्यांच्या आवडीच्या गोड पदार्थांच्या नावातील पहिले आणि शेवटचे अक्षर सांगावयास लावणे.<br>उदाहरण : पुरण पोळी हा शब्द मुलांनी पु - ळी असा सांगावा.<br>इयत्ता दुसरी आणि तिसरी : विविध खाद्यपदार्थांची नावे बनविण्यासाठी उपयोगी पडतील अशा अक्षरांच्या दृकपट्ट्या बनवून त्या अक्षरांच्या सहाय्याने खाद्यपदार्थांची नावे तयार करून वाचणे व त्यांची यादी तयार करून घेणे. |
| | | उद्धेश पूर्वक लेखन | सामर्थ्य : लेखन कौशल्यांचा सराव, शब्दभांडाराची अभिवृद्धी, डोळे आणि हात यांच्यामध्ये समन्वय, सृजनशीलता.<br>कृती – 34 : " हस्तपुस्तक रचना " ( 17 व्या दिवसापासून पुढे ) (विकासात्मक ध्येय – 2 ) ECW – 9<br>उद्धेश :<br>• मुलांची हस्तपुस्तिका तयार करणे.<br>• मुलांना आवडणाऱ्या चित्रांचा संग्रह करून पुस्तक तयार करणे.<br>• चित्रे काढण्याचा आणि चित्र संग्रह करण्याचा छंद वाढविणे.<br>साहित्य : कागद, रंग, तक्ते.<br>पद्धत : शिक्षकांनी मुलांना वह्या तयार करण्यासाठी मदत करणे. या वहीमध्ये प्रत्येक मुलांना एका पानावर दिलेल्या विषयावर चित्र काढावयास सांगणे. नंतर ते चित्र वर्गाच्या मार्गदर्शिकेमध्ये समाविष्टीत करायला देवून हस्तपुस्तिका बनविण्यामध्ये सहकाऱ्य करण्याची संधी उपलब्ध करून देणे. सर्व मुलांची पाने एकत्रित करून वर्गाची हस्तपुस्तिका तयार करणे.<br>विषय : फळे<br>वर्गवार विवरण : दुसरी आणि तिसरीच्या मुलांनी वेगवेगळ्या हस्तपुस्तिका बनविणे.<br><br>आदर्श लेखन :<br>शिक्षकांनी मुलांसमोर फलक लेखन करणे. अक्षर लेखनाचा योग्य क्रम पाहण्याची संधी मुलांना उपलब्ध करून देणे. मुलांची नावे, मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे इत्यादी मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने लिहावेत. शिक्षकांनी वर्गामध्ये जे काही फलक लेखन करावायाचे आहे ते मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने करावे. |
| | मैदानी खेळ | | कृती –26: ससे उडी (विकासात्मक ध्येय – 1 )<br>सामर्थ्य : स्थूल स्नायू चालना कौशल्य अभिवृद्धी.<br>साहित्य : बॉक्स, दोरीउडीची दोरी.<br>पद्धत :<br>• मुलांमध्ये शर्यती लावणे.<br>• शर्यतीमध्ये काही वस्तूंचा वापर अडथळे निर्माण करण्यासाठी करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | • मुलांना सश्याप्रमाणे उड्या मारत वाटेमध्ये येणाऱ्या सर्व अडथळ्यांवर मात करत ही शर्यत पूर्ण करण्याची सूचना देणे.<br>दुसरी आणि तिसरीच्या मुलांना बेडूक उड्या हा खेळ खेळविणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | शीर्षक : 'माझा वाचन सवंगडी'.<br>साहित्य : पुस्तक<br>उद्धेश :<br>• श्रवण सामर्थ्य वाढविणे.<br>• संभाषण ( भाषण ) कौशल्य वाढविणे.<br>पद्धत :<br>➢ शिक्षकांनी कथेची रचनाशैली समजावून घेवून कथा वाचणे.<br>➢ कथेतील पात्र/वस्तूंचा परिचय मुलांना करून देणे.<br>➢ प्रथमता कथा मराठीमध्येच सांगणे.<br>➢ नंतर कथा मराठीमध्ये सांगत सांगत मध्ये मध्ये कथेतील पात्र/वस्तूंचा इंग्रजीमध्ये परिचय करून देणे.<br>➢ ठराविक शब्दांचा पुनरुच्चार मुलांना करावयास सांगणे.<br>कथा :<br><br><br>(मुले कथा ऐकण्याचा आनंद घेण्याबरोबरच कथा समजून घेत आहेत याची खात्री करून घेणे. ) |
| | पुन्हा भेटू | • दिवसभरात मुलांनी केलेल्या सर्व कृतींचे पुनरावर्तन करणे.<br>• दिवसभरात मुलांनी केलेल्या सर्व कृती पालक व कुटुंबातील सर्व सदस्यांसोबत चर्चा करण्यासाठी प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत यासाठी आनंददायी वातावरण निर्माण करून मुलांना निरोप देणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा – 6** **दिवस – 32 (मंगळवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 32 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती : SUN, MOON, STAR<br>साहित्य : सूर्य,चंद्र,तारे यांची चित्रे.( मागील कृती प्रमाणे )<br>पद्धत :<br>( आठवडा 6 वा ) 31 व्या दिवशीच्या अभिवादनामध्ये SUN, MOON, STAR या कृतीत दिलेल्या सर्व सुचनांचेच इथे पालन करणे.<br>कृती - 1 : हवामान नकाशा बनवून घेणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती - 5 : “माझ्या जबाबदाऱ्या” ( शाळा संसद ) ध्येय – 1<br>सामर्थ्य : स्मरण, चिंतन, स्वयं शिस्त, समाजाभिमुख वर्तन.<br>साहित्य : विद्यार्थ्यांची नावे आणि जबाबदाऱ्या लिहिण्यासाठी कार्डशीट, स्केचपेन.<br>पद्धत : विद्यार्थ्यांनी दररोज करावयाची कार्ये आणि जबाबदाऱ्यांची यादी बनविणे. उदाहरणार्थ ग्रंथालय मंत्री, आहार मंत्री, स्वच्छता मंत्री, क्रीडा मंत्री, शौचालय मंत्री इत्यादी. अशा प्रकारच्या जबाबदाऱ्या आणि त्या सांभाळणाऱ्या मुलांची नावे लिहून एक तक्ता बनविणे. प्रत्येक जबाबदारीला संबंधित चित्र असलेले बॅच बनवून मंत्र्यांना परिधान करावयास सांगणे. वर्गातील प्रत्येक मुलाला संधी मिळेल या कडे लक्ष देणे. मुले दिलेली जबाबदारी स्वतंत्रपणे/स्वत:हून पार पाडत आहेत का हे पाहणे. जास्तीत जास्त जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी प्रोत्साहित करणे.<br>कृती 2 :“माझे रोप माझे झाड.” ( मागील कृती प्रमाणे )<br>साहित्य : विविध प्रकारच्या रोपांची व झाडांची चित्रे.<br>पद्धत :<br>( आठवडा 6 वा ) 31 व्या दिवसा मधील गुजगोष्टीमध्ये ‘माझे रोप माझे झाड’ या कृतीत दिलेल्या सर्व सुचनांचेच इथे पालन करणे. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती निर्वहन करणे.<br>शिक्षकांनी नियमावलीत दिल्याप्रमाणे कार्यनिर्वहन करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु | सामर्थ्य : जोडणे, परिसराची जाणीव, रंग, आकार, आकारमानाची संकल्पना.<br>कृती – 12 B : “स्पर्श करूया आणि मोजुया ” (विकासात्मक ध्येय – 03 )<br>उद्देश : मूर्त वस्तूंना स्पर्श करून मोजणे.<br>साहित्य : आजूबाजूच्या विविध वस्तू.<br>पद्धत : एका ओळीमध्ये 10 वस्तू ठेवणे. मुलांनी प्रत्येक वस्तूला स्पर्श करून मोजणे. त्यानंतर आपल्या वर्गातील मुलांची संख्या मोजणे. वस्तू किंवा मुले मोजत असताना प्रत्येक वेळी जोराने टाळी वाजवून संख्या मोठ्याने उच्चारणे.<br>इयत्ता : दुसरी<br>एका ओळीमध्ये 15 वस्तू ठेवून मोजावयास सांगणे.<br>इयत्ता : तिसरी |

| | | | |
|---|---|---|---|
| | करावयाची मार्गदर्शित कृती) | | दिलेल्या 20 वस्तू मोजून त्या वस्तूंची नावे सांगणे.<br>वर्गातील मुलांची संख्या मोजावयास सांगणे, जी संख्या येईल तितक्या टाळ्या वाजविण्यास सांगणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांच्या कृती) | | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्यांचा विकास आणि सृजनशिलतेची अभिवृद्धि.<br>कृती : “करून पहा.”<br>उद्देश :<br>• सूक्ष्म स्नायूंच्या चालना कौशल्यांची अभिवृद्धि करणे.<br>• बोटांची कार्यकुशलता वाढविणे आणि एकाग्रता वाढविणे.<br>• चीकटविताना स्वच्छता बाळगण्याविषयी माहिती देणे.<br><br>साहित्य : कात्री, रंगीत चित्रे, डिंक.<br>पद्धत : मुलांना वर्तुळाकारामध्ये बसविणे. जुन्या वर्तमानपत्रामधील फुले/प्राणी/पक्षी/घरे इत्यादींची चित्रे कातरून ती पुठ्यावर चिकटविण्यास सांगणे. नंतर त्या पुठ्ठ्यांचे वेगवेगळ्या आकाराचे 6 – 7 तुकडे करावयास सांगणे. त्या तुकड्यांना जोडल्यानंतर पुन्हा सुरुवातीचे चित्र येईल अशा पद्धतीने जोडावयास सांगणे. यामुळे कमी खर्चातील साहित्य वापरून मुलांच्या सृजनशीलतेला प्रोत्साहन दिल्या सारखे होयील.<br>विवरण : दुसरी आणि तिसरीच्या मुलांना कातरलेल्या तुकड्यांचा वापर करून वेगवेगळे प्राणी आणि पक्षी बनविण्यास सांगणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : ध्वनिशास्त्राची जाणीव, शब्दभांडाराचा विकास, चालना कौशल्यांचा विकास.<br>कृती – 15 : लयबद्ध शब्द ऐकणे. (विकासात्मक ध्येय – 02 ) ECL – 4 ( 26 व्या दिवसापासून पुढे. )<br>उद्देश :<br>• ध्वनिशास्त्राची जाणीव निर्माण करणे.<br>• लयबद्ध शब्दांच्या माध्यमातून शब्दसंग्रह वाढविणे.<br>• स्थूल आणि सूक्ष्म चालना कौशल्यांचा विकास करणे.<br>पद्धत :<br>• मुलांना 26 व्या दिवशी जे लयबद्ध गीत सांगितले होते तेच पुन्हा सांगणे.<br>• गीत सांगत असताना लयबद्ध शब्दांवर जास्त भर देणे.<br>• गीताला अनुसरून अभिनय करावयास सांगणे.<br>• गीतातील लयबद्ध शब्द सांगावयास लावणे.<br>• गीतातील लयबद्ध शब्दांचा परिचय करून देणे आणि त्या लयबद्ध शब्दांना अजून एक लयबद्ध शब्द जोडावयास सांगणे.<br>वर्गावर विवरण : दुसरीच्या मुलांनी लयबद्ध शब्दांना अजून दोन लयबद्ध शब्द जोडण्याचा प्रयत्न करणे.<br>तिसरीच्या मुलांनी ओळखलेल्या लयबद्ध शब्दाचा वाक्यात उपयोग करणे. |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य : स्व – जाणीव, सकारात्मक दृष्टिकोनाचा विकास, ऐकणे व बोलणे कौशल्यांची अभिवृद्धी.<br>कृती : “ माझा परिचय / असा मी ” (विकासात्मक ध्येय – 1 )<br>उद्देश : आपल्याला आवडणाऱ्या आणि न आवडणाऱ्या गोष्टी अभिव्यक्त करणे.<br>साहित्य : पेन, पेन्सील, रंगीत खडू ( क्रेयॉन्स )<br>पद्धत : शिक्षकांनी सुरुवातीला आपल्याला आवडणाऱ्या आणि न आवडणाऱ्या गोष्टी मुलांना सांगणे. नंतर प्रत्येक मुलाला त्याला आवडणाऱ्या आणि न आवडणाऱ्या गोष्टी विषयी मुक्तपणे बोलण्याची संधी उपलब्ध करून देणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कोणत्याही कृतीमध्ये भाग घेण्या बरोबरच काही जबाबदाऱ्या स्वीकारण्याविषयी प्रोत्साहित करणे. कोरा कागद देवून त्यांना आवडणाऱ्या प्राणी, पक्षी, खाध्यपदार्थ, बाहुली, व्यक्ती, फुले इत्यादींची चित्रे काढून त्यामध्ये रंग भरून त्या चित्रांना नावे देण्यास सांगणे.<br>दुसरी आणि तिसरीच्या मुलांना आपल्याला आवडणाऱ्या आणि न आवडणाऱ्या गोष्टी विषयी सहजपणे बोलण्याची संधी उपलब्ध करून देणे.<br>उपयोगात आणावयाची अध्ययनपत्रके : EC – 8 ( वर्ग 1, 2, 3 ) |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : लेखन कौशल्यांचा सराव, शब्दभांडाराची अभिवृद्धी, डोळे आणि हात यांच्यामध्ये समन्वय, सृजनशीलता.<br>कृती – 34 : “ हस्तपुस्तक रचना ” (विकासात्मक ध्येय – 2 ) ECW – 9<br>उद्देश :<br>• मुलांची हस्तपुस्तिका तयार करणे.<br>• मुलांना आवडणाऱ्या चित्रांचा संग्रह करून पुस्तक तयार करणे.<br>• चित्रे काढण्याचा आणि चित्र संग्रह करण्याचा छंद वाढविणे.<br>साहित्य : कागद, रंग, तक्ते, स्टेपलर.<br>पद्धत : शिक्षकांनी मुलांना दोन A4 आकाराची पाने घेवून त्यांची घडी करून त्यांना टाचणी मारून लहान वही तयार करण्यासाठी मदत करणे. या वाहीमध्ये प्रत्येक मुलाला एका पानावर, दिलेल्या विषयावर चित्र काढावयास सांगणे.<br>विषय : माझी खेळणी.<br>वर्गवार विवरण : दुसरी आणि तिसरीच्या मुलांनी वेगवेगळ्या वह्या बनविणे. |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षकांनी मुलांसमोर फलक लेखन करणे. अक्षर लेखनाचा योग्य क्रम पाहण्याची संधी मुलांना उपलब्ध करून देणे. मुलांची नावे, मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे इत्यादी मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने लिहावेत. शिक्षकांनी वर्गामध्ये जे काही फलक लेखन करावायाचे आहे ते मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने करणे. |
| | मैदानी खेळ | | कृती – 27 : “ चढणे ”( Climbing ) ध्येय – 1<br>सामर्थ्य : स्थूल स्नायू चालना कौशल्यांचा विकास.<br>साहित्य : दोरी, शिडी किंवा पायऱ्या.<br>पद्धत :<br>• पायऱ्या असलेल्या ठिकाणी मुलांना पायऱ्या चढायला आणि उतरायला सांगणे.<br>दुसरी आणि तिसरीच्या मुलांसाठी हीच कृती करून घेणे.<br>मजबूत दोरी किंवा शिडी घेवून मुलांच्याकडून या कृतीचा सराव करून घेणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | पद्धत :<br>• पहिल्या दिवसाच्या उद्देशाप्रमाणे रंजक कथा (कथेची वेळ) पुढे चालू ठेवणे.<br>• शिक्षकांनी कथाकथनामध्ये मुलांचा सहभाग घेवून कथा पूर्ण करणे.<br>उदाहरण : पुढे काय झाले असेल ? पुस्तक कोठून आले ? इत्यादी.<br>कथा सांगून झाल्यानंतर मराठीमध्ये सोपी प्रश्ने विचारने.<br>( मुले कथा ऐकण्याचा आनंद घेण्याबरोबरच कथा समजून घेत आहेत याची खात्री करून घेणे. ) |
| | पुन्हा भेटू | | • दिवसभरात मुलांनी केलेल्या सर्व कृतींचे पुनरावर्तन करणे.<br>• दिवसभरात मुलांनी केलेल्या सर्व कृती पालक व कुटुंबातील सर्व सदस्यांसोबत चर्चा करण्यासाठी प्रोत्साहित करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | • दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत यासाठी आनंददायी वातावरण निर्माण करून मुलांना निरोप देणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा – 6 दिवस – 33 (बुधवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 33 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती – 1 : " गाडी सोडा. "<br>साहित्य : विविध वाहनांची चित्रे.<br>पद्धत :<br>• मुले वर्गामध्ये प्रवेश करत असताना विविध वाहनांची चित्रे दाखविणे.<br>• मुलांनी त्यांना आवडणारे वाहन चालविण्याचा अभिनय करत वर्गामध्ये प्रवेश करणे.<br>• वर्गामध्ये प्रवेश केल्यानंतर मुलांना वर्तुळाकार उभे राहण्यास सांगणे.<br>• "What day is today ? ( आज कोणता वार आहे ? )" अशाप्रकारे मुलांना विचारून "Today is ....... ( आज ..........)" अशी उत्तरे मिळविणे.<br>• हवामान नकाशा बनवून घेणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती : " चूक कि बरोबर ".<br>साहित्य : चित्र कार्ड ( अंघोळीसाठी बादली आणि मगचा उपयोग करणे, अंघोळीसाठी शॉवरचा उपयोग करणे, पाण्याचा पुनर्वापर करणे, पाणी वाया घालविणे, नळ बंद करणे, झाडांना नियमितपणे पाणी घालणे, झाडे लावणे इत्यादी. )<br>पद्धत :<br>• मुलांना वर्तुळाकार बसविणे.<br>• चित्र कार्डे एका पिशवीमध्ये घालून पिशवी एका मुलाकडून दुसऱ्या मुलाकडे पास करून 'पासिंग द पार्सल' ही कृती करून घेणे.<br>• ज्या मुलाकडे पिशवी येईल त्याने त्यातील एक चित्र घेवून त्या चित्राविषयी बोलावयास प्रोत्साहित करणे.<br>प्रश्ने : चित्र कोणते आहे ? तुम्ही त्या परिस्थितीमध्ये असाल तर काय कराल ? तुम्ही असे का केला असता ? पाणी आणि वनस्पतींच्या संरक्षणासाठी आम्ही काय केले पाहिजे ? |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती निर्वहन करणे.<br>शिक्षकांनी नियमावलीत दिल्याप्रमाणे कार्यनिर्वहन करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि | सामर्थ्य : स्पर्श ज्ञान, परिसराची जाणीव.<br>कृती – 9 B : " सुचविलेली संख्या " ( क्रमवार जोडणे ) (विकासात्मक ध्येय – 3 )<br>उद्देश : क्रमवार जोडणे.<br>साहित्य : 1 ते 10 पर्यंतची संख्या कार्ड. ( गणित कीट मध्ये दिलेले कार्ड वापरणे )<br>पद्धत : मुलांना वर्तुळाकारामध्ये बसन्यास सांगणे. 1 ते 10 पर्यंतचे संख्या कार्ड एका ट्रे मध्ये ठेवून त्यातील |

| | | | |
|---|---|---|---|
| | वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | | सुचविलेले संख्या कार्ड घेवून त्यांना क्रमवार जोडावयाची संधी निर्माण करणे.<br>इयत्ता : 2 री 1 ते 10 पर्यंतच्या संख्या उलट सांगून लिहिण्यास सांगणे.<br>इयत्ता : 3 री क्रमवार लिहिलेल्या संख्यांना अक्षरात लिहिण्यास सांगणे.<br>उपयोगात आणावयाची अध्ययन पत्रके : **HW – 9 ( वर्ग – 1, 2, 3. )** |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांच्या कृती) | | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्यांचा विकास आणि सृजनशिलतेची अभिवृद्धी.<br>कृती : "करून पहा."<br>उद्देश :<br>• सूक्ष्म स्नायूंच्या चालना कौशल्यांची अभिवृद्धि करणे.<br>• बोटांची कार्यकुशलता वाढविणे आणि एकाग्रता वाढविणे.<br>• चीकटविताना स्वच्छता बाळगण्याविषयी माहिती देणे.<br>साहित्या : कात्री, रंगीत नकाशे, डिंक.<br>पद्धत : मुलांना वर्तुळाकारामध्ये बसविणे. मुलांना वेगवेगळ्या नकाशांची चित्रे ( तालुका / जिल्हा ) देवून ती चित्रे कातरून पुठ्यावर चिकटविण्यास सांगणे. नंतर त्या पुठ्यांचे वेगवेगळ्या आकाराचे 6 – 7 तुकडे करावयास सांगणे. त्या तुकड्यांना जोडल्यानंतर पुन्हा नकाशा बनेल अशा पद्धतीने जोडण्यास सांगणे.<br>विवरण : दुसरी आणि तिसरीच्या मुलांना कातरलेल्या तुकड्यांचा वापर करून तालुका, जिल्हा आणि राज्याचा नकाशा बनविण्यास सांगणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : शब्द ओळखणे, शब्दभांडाराचा विकास, मुद्रित मजकुराची जाणीव आणि आकलन.<br>कृती - 11A : "नाम फलक ." (विकासात्मक ध्येय – 20 ) ELC- 17<br>उद्देश :<br>• चित्राच्या सहाय्याने शब्द ओळखणे.<br>• मुद्रित शब्दांचा मोठ्याने उच्चार करणे.<br>साहित्य : कथा कार्ड, सुगावा (Clue ) चित्रे ( कथेमध्ये येणाऱ्या वेगवेगळ्या घटनांची / संदर्भांची चित्रे. )<br>पद्धत : प्रत्येक मुलाच्या नावापुढे एक चित्र चीकटविणे. ज्या मुलांना आपले नाव वाचता येत नाही त्यांनी चित्र पाहून आपले नाव ओळखणे.<br>उदाहरण : रमेश या मुलाच्या नावासमोर झाडाचे चित्र चीकटविणे. रमेश हा शब्द वाचता नाही आला तरी झाडाच्या चित्रावरून आपले नाव ओळखणे.<br>वर्गवार विवरण : दुसरीच्या मुलांनी मुद्रित शब्दांचा उच्चार मोठ्याने करणे. तिसरीच्या मुलांनी चित्राची मदत न घेता शब्द ओळखून अर्थ समजून घेणे. |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य : लक्षपूर्वक ऐकणे, शब्दभांडाराची अभिवृद्धी, अनुक्रमिक विचार, स्मरनशक्तीचा विकास.<br>कृती – 16 : "पुढे काय ? " (विकासात्मक ध्येय – 2 )<br>उद्देश : अनुभव आणि पुर्वज्ञानाच्या आधारे अंदाज लावणे आणि परस्पर संबंध जोडणे.<br>साहित्य : कथा कार्ड, सुगावा (Clue ) चित्रे ( कथेमध्ये येणाऱ्या वेगवेगळ्या घटनांची / संदर्भांची चित्रे. )<br>पद्धत :<br>❖ शिक्षकांनी वर्गात प्रवेश केल्यानंतर मुलांशी संवाद साधताना, आधी, नंतर, त्यानंतर, त्याआधी इत्यादी शब्दांचा वापर करून मुलांना त्यांचा अर्थ समजावणे.<br>उदाहरण : जेवण करण्या आधी तू काय करतोस ? जेवण केल्यानंतर काय करतोस ? अशा पद्धतीने संदर्भानुसार आधी, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | त्यानंतर, त्याआधी इत्यादी शब्दांचा वापर करून मुलांना त्यांचा अर्थ समजावणे.<br>❖ नंतर शिक्षकांनी मोठ्या आवाजात, योग्य चढउतारामध्ये मुलांना परिचित असलेली कथा सांगणे.<br>❖ मुलांनी कथा ऐकल्यानंतर गोष्टीला संबंधित, आधी काय झाले होते ? त्याआधी काय झाले होते ? त्यानंतर काय झाले ? घटना घडलीच नसती तर काय झाले असते ? नंतर काय झाले ? अशा पद्धतीने संदर्भानुसार शब्दांचा / वाक्यांचा उपयोग करून लक्ष केंद्रित करण्यासाठी, विचार करण्यासाठी, स्मरणशक्ती वाढविण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे.<br>उदाहरण : ( कथावाचन ) एके दिवसी रामू नावाचा एक शेतकरी आपल्या शेतातील भाताची पोती आपल्या बैलगाडीमध्ये भरून घरी घेवून जात असताना मोठा पाऊस आला आणि त्याच्या बैलगाडीचे चाक चिखलात अडकले. त्याने भरपूर प्रयत्न केला पण बैलगाडी चिखलातून बाहेर निघाली नाही. नंतर आजूबाजूला असलेल्या लोकांच्या मदतीने बैलगाडीतील भाताची पोती खाली उतरवून, बैलांच्या आणि लोकांच्या मदतीने बैलगाडी चिखलातून बाहेर काढली. नंतर पुन्हा भाताची पोती बैलगाडीमध्ये भरून घरी घेवून गेला.<br>विचारावयाची प्रश्ने :<br>1. रामू कोण होता ?<br>2. त्याने कोणते पिक घेतले होते ?<br>3. भाताची पोती घरी घेवून येत असताना काय झाले ?<br>4. पाऊस पडल्यामुळे काय झाले ?<br>5. पाऊस पडला नसता तर काय झाले असते ?<br>6. त्याच्या आजूबाजूला लोक नसते तर काय झाले असते ?<br>दुसरी आणि तिसरी मुलांसाठी : मुलांच्या वयानुरूप दिलेल्या उत्तरांना पुन्हा प्रश्ने विचारून कृती पुढे चालू ठेवणे.<br>उपयोगात आणावयाची अध्ययनपत्रके : EC – 9 ( वर्ग – 1, 2, 3. ) |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : लेखन कौशल्यांचा सराव, निरीक्षण, कल्पना, सृजनशील विचार, परिसराची जाणीव.<br>कृती – 35 : " हवामान नकाशा " (विकासात्मक ध्येय – 2 ) ECW – 16<br>उद्देश :<br>• लेखनाचा सराव करून घेणे.<br>• निरीक्षण कौशल्याचा विकास करणे.<br>• सृजनशील विचारांना प्रोत्साहन देणे.<br>• परिसराची जाणीव निर्माण करणे.<br>साहित्य : कागद , पेन्सील.<br>पद्धत :<br>❖ आठवड्यातील वारांविषयी मुलांशी चर्चा करणे.<br>❖ आठवड्यातील वारांची यादी वर्गखोलीमध्ये प्रदर्शित करणे.<br>❖ वर्गातील हवामान नकाशाच्या सहाय्याने, हवामानाचे घटक जसे ढग, पाऊस, ऊन, थंडी, वादळ इत्यादींचा परिचय करून देणे.<br>❖ गट कार्यातील कृतीमध्ये त्या दिवसाच्या हवामानाचे निरीक्षण करून हवामान ओळखावयास सांगणे.<br>वर्गवार विवरण : दुसरीच्या वर्गातील मुलांना दिवसाचे हवामान त्यांच्या पुस्तकामध्ये आणि तिसरीच्या वर्गातील मुलांना हवामान नकाशामध्ये नोंद करावयास सांगणे. (40 व्या दिवसापर्यंत पुढे चालू ठेवणे ) |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षकांनी मुलांसमोर फलक लेखन करणे. अक्षर लेखनाचा योग्य क्रम पाहण्याची संधी मुलांना उपलब्ध करून देणे. मुलांची नावे, मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे इत्यादी मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | लिहावे. शिक्षकांनी वर्गामध्ये जे काही फलक लेखन करावयाचे आहे ते मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने करावे. |
| | मैदानी खेळ | | कृती – 28 : " लहान टायर/ब्यारेल ढकला " (विकासात्मक ध्येय – 1 )<br>सामर्थ्य : स्थूल स्नायू चालना कौशल्यांची अभिवृद्धी.<br>साहित्य : टायर किंवा ब्यारेल.<br>पद्धत :<br>• शिक्षकांनी प्रत्येक मुलाला एक लहान टायर किंवा ब्यारेल ढकलण्यास सांगणे.<br>• मुलांना आपण टायर / ब्यारेल ढकलू किंवा ओढू शकतो असे सांगणे.<br>दुसरी आणि तिसरीच्या मुलांना हाच खेळ खेळविणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शीर्षक : "माझा वाचन सवंगडी".<br>साहित्य : कथेची पुस्तके, चित्रे.<br>उद्देश :<br>• श्रवण सामर्थ्य वाढविणे.<br>• शब्दसंपत्ती वाढविणे.<br>• एकाग्रता वाढविणे.<br>पद्धत :<br>➢ कथेच्या पुस्तकातील चित्रे मुलांना दाखवून, त्यातील पात्र / वस्तूंची नावे सांगतील अशा पद्धतीची प्रश्ने मुलांना विचारून कथा पुन्हा सांगणे.<br>➢ कथेतील वाक्ये वाचत असताना गोष्टीमध्ये येणाऱ्या माकड, पुस्तक इत्यादी चित्रांना मुले नावे सांगतील अशी प्रश्ने विचारत कथा कथन करणे.<br>(कथा ऐकण्याचा आनंद घेण्याबरोबरच कथा समजून घेत आहेत याची खात्री करून घेणे. ) |
| | पुन्हा भेटू | | • दिवसभरात मुलांनी केलेल्या सर्व कृतींचे पुनरावर्तन करणे.<br>• दिवसभरात मुलांनी केलेल्या सर्व कृती पालक व कुटुंबातील सर्व सदस्यांसोबत चर्चा करण्यासाठी प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत यासाठी आनंददायी वातावरण निर्माण करून मुलांना निरोप देणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा – 6

## दिवस – 34 (गुरुवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 34 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे | कृती : 01<br>दिवस – 33 सूचनांचा अवलंब करणे आणि हवामान कृती विषयी मुलांना विचारून त्यांना हवामान कार्डामध्ये ओळखाण्यास सूचित करणे. |

| | | |
|---|---|---|
| | हितगुज) | |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | मुलांना वर्तुळाकार उभे करून, पुढील इंग्रजी लयबद्ध गीत (Rhyme) अभिनयासहित गायला सांगणे.<br>This is the way I clap my hands,<br>clap my hands,<br>clap my hands,<br>Clap, clap, clap.<br><br>This is the way I tap my feet,<br>Tap my feet,<br>Tap my feet<br>Tap, tap, tap. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती निर्वहन करणे.<br>शिक्षकांनी नियमावलीत दिल्याप्रमाणे कार्यनिर्वहन करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : आरोग्यदायी सवयींचा विकास, स्वच्छता आणि आत्मरक्षणाची जाणीव, समाजाभिमुख गुण जसे काळजी घेणे, आदान प्रदान करणे, सहकार्य, सहानुभूती इत्यादींचा विकास करणे.<br>कृती – 12 A : " चला हाथ धुवूया "(विकासात्मक ध्येय – 01 )<br>उद्देश : आरोग्यदायी सवयी जोपासणे.<br>साहित्य : हात धुण्याच्या पायऱ्यांचे चित्र.<br>पद्धत : हात धुण्याच्या पायऱ्यांचे चित्र बनविणे. ही चित्रे देवून मुलांना योग्य क्रमाने जोडण्यास सांगणे. हात धुण्याच्या महत्वाबद्दल मुलांनी बोलणे.<br>इयत्ता 2 री : हात धुण्याच्या पायऱ्या क्रमवार सांगावयास लावणे.<br>इयत्ता 3 री : खालील प्रमाणे प्रश्ने विचारून उत्तरे मिळविणे.<br>• हात धुण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तू कोणत्या ?<br>• हात न धुतल्यामुळे कोणकोणत्या समस्या निर्माण होतात ? |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांच्या कृती) | सामर्थ्य : स्व-जाणीव करून घेणे आणि इतरांबद्दल जाणीव करून घेणे, भाषा अभिवृद्धी, शब्दसंपत्तीचा विकास.<br>कृती - 2 : " अभिनयगीत "<br>उद्देश :<br>• शारीरिक वाढ आणि विकास करणे.<br>• शब्दसंपत्तीच्या विकासासोबत यमक, लय, संदर्भ आणि स्पष्ट उच्चार करणे.<br>• हावभाव ओळखतात.<br>साहित्य : बालगीते आणि लहान लहान नाटकांचा संग्रह.<br>पद्धत : मुलांना वर्तुळाकार उभे करणे. सुलभकारांनी तालबद्ध कृती करण्यासाठी मुलांना संधी निर्माण करून देणे. अभिनय गीते, उपकरणे वापरून किंवा हावभाव करून गाण्यास सांगणे.<br>उदाहरण : शरीराच्या वेगवेगळ्या भागांचा परिचय करून देण्यासाठी डोके, खांदा, मांडी आणि बोटे दाखवीत अभिनयगीत गायला सांगणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | वर्गवार विवरण : दुसरी आणि तिसरीच्या मुलांना अभिनयगीताशी संबंधित प्रश्न विचारून उत्तरे मिळविणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : ध्वनिशास्त्राची जाणीव, अक्षर आणि ध्वनींचा परस्पर संबंध.<br>कृती – 20 B : " अंताक्षरी " (विकासात्मक ध्येय – 2 ) ELC – 18<br>उद्देश :<br>• अंत्याक्षराच्या सहाय्याने अक्षरांचा स्पष्ट उच्चार ओळखणे.<br>• अक्षर आणि उच्चारांचा परस्पर संबंध ओळखणे.<br>पद्धत : मुलांनी त्यांना माहित असलेल्या शब्दांना अनुसरून अंताक्षरी खेळणे.<br>उदा : 'पवन' असा शब्द आल्यानंतर या शब्दाच्या शेवटी येणाऱ्या 'न' या अक्षरापासून सुरु होणारा शब्द सांगणे.<br>वर्गवार विवरण : दुसरीच्या वर्गातील मुलांना त्यांनी सांगितलेल्या शब्दांचा वाक्यात उपयोग करावयास सांगणे. तिसरीच्या मुलांना त्यांनी सांगितलेल्या शब्दांना समानार्थी शब्द सांगावयास सांगणे. |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य : ध्वनिशास्त्राची जाणीव, श्रवण आणि एकाग्रता, शब्दसंपत्तीचा विकास.<br>कृती – 21 : " शब्द शोध " (विकासात्मक ध्येय – 2 )<br>उद्देश :कथेतील शब्द आणि त्या शब्दातील ध्वनी ओळखणे.<br>साहित्य : दृक पट्टी, फळा.<br>पद्धत : 21 व्या दिवशी सांगितलेल्या कथेचे पुनरावर्तन करणे. मुलांना परिचित असलेल्या कथा सांगणे. त्यामध्ये येणाऱ्या प्रमुख शब्दांना दृक पट्टीवर / फळ्यावर लिहून प्रदर्शित करणे व एका आठवड्यापर्यंत मुले तेच शब्द पाहतील अशी संधी उपलब्ध करून देणे. ती कथा किंवा दुसरी कथा सांगत असताना ते शब्द आल्यास त्यांना आणि त्यांचा उच्चार ओळखून दाखविणे.<br>पहिले ते तिसरी : शिक्षकांनी मुलांना फळ्यावर लिहिलेल्या शब्दांना कथा पुस्तक / तक्त्यामध्ये ओळखण्यास सांगणे. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : डोळे आणि हात यांच्यामध्ये समन्वय, लेखन कौशल्यांचा सराव ,सृजनात्मक अभिव्यक्ती.<br>कृती – 02 : " मुक्तपणे चित्र रेखाटणे " (विकासात्मक ध्येय – 2 ) EWC – 6<br>उद्देश :<br>• लेखन कौशल्यांचा सराव करणे.<br>• डोळे आणि हात यांच्यामध्ये समन्वय साधण्याचे कौशल्य विकसित करणे.<br>• क्रियात्मक अभिव्यक्तीसाठी संधी उपलब्ध करून देणे.<br>• सृजनात्मक अभिव्यक्तीसाठी प्रोत्साहन देणे.<br>साहित्य : रंगीत खडू ( Creyons ), रंगीत पेन्सील, मार्कर, कोरा कागद.<br>पद्धत : कागदावर मुक्तपणे चित्र रेखाटण्यासाठी, आणि त्यामध्ये हवा तो रंग भरण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे. त्यांच्या चित्राबद्दल / लिखानाबद्दल बोलावयास सांगणे. योग्य प्रश्ने विचारून त्यांच्या चित्राबद्दल / लिखाणाबद्दल माहिती मिळविणे.<br>वर्गवार विवरण : इयत्ता दुसरी आणि तिसरीच्या मुलांना त्यांच्या आवडीचे चित्र काढून त्याबद्दल 4 – 5 वाक्ये लिहिण्यास सांगणे. |
| | | | आदर्श लेखन : शिक्षकांनी मुलांसमोर फलक लेखन करणे. अक्षर लेखनाचा योग्य क्रम पाहण्याची संधी मुलांना उपलब्ध करून देणे. मुलांची नावे, मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे इत्यादी मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने लिहावे. शिक्षकांनी वर्गामध्ये जे काही फलक लेखन करावायाचे आहे ते मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने करणे. |
| | मैदानी खेळ | | कृती – 29 : " घरंगळणे " ( Rolling ) (विकासात्मक ध्येय – 1)<br>सामर्थ्य : स्थूल स्नायू चालना कौशल्यांचा विकास. |

| | | |
|---|---|---|
| | | साहित्य : फुटबॉल.<br>पद्धत :<br>• जमिनीवर एक लहान वर्तुळ काढणे.<br>• मुलांना फुटबॉल घेवून त्या वर्तुळावरून ढकलत ( गडगडत ) घेवून जाण्यास सांगणे.<br>इयत्ता दुसरी आणि तिसरीच्या मुलांना देखील हाच खेळ घेणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | शीर्षक : माझा वाचन सवंगडी.<br>साहित्य : पपेट (कळसूत्री), पडदा.<br>उद्देश :<br>• श्रवण सामर्थ्य वाढविणे.<br>• शब्दभांडार वाढविणे.<br>• संभाषण कौशल्याचा सराव करणे.<br>पद्धत :<br>• कथा मराठी आणि इंग्रजी भाषेमध्ये सांगणे.<br>• तयार केलेल्या पपेट आणि स्क्रीनचा उपयोग करून, वरच्या वर्गातील विध्यार्थ्यांना पात्रे देवून, शिक्षक सांगतील त्या पध्दतीने संभाषणाचा, मराठी आणि इंग्रजीमध्ये पुनरुच्चार करावयायास सहकार्य करणे.<br>• रंजक कथा (कथेची वेळ) हा अवधी मनोरंजनात्मक बनविणे.<br>(कथा ऐकण्याचा आनंद घेण्याबरोबरच कथा समजून घेत आहेत याची खात्री करून घेणे. ) |
| | पुन्हा भेटू | • दिवसभरात मुलांनी केलेल्या सर्व कृतींचे पुनरावर्तन करणे.<br>• दिवसभरात मुलांनी केलेल्या सर्व कृती पालक व कुटुंबातील सर्व सदस्यांसोबत चर्चा करण्यासाठी प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत यासाठी आनंददायी वातावरण निर्माण करून मुलांना निरोप देणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा – 6 दिवस – 35 (शुक्रवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 35 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती – 1 : “ माझी निवड ” ( My Choice )<br>साहित्य : चार्ट<br>पद्धत :<br>• मुले वर्गामध्ये प्रवेश करत असताना चार्टमध्ये दिलेल्या. कोणत्याही एका संकेताची निवड करावयास सांगणे.<br>• मुलांच्या निवडीनुसार शिक्षकांनी मुलांचे स्वागत करणे.<br>उदाहरण : मुलाने “High Five” या संकेताची निवड केल्यास शिक्षकांनी त्याला High Five देवून त्याचे स्वागत करणे.<br>• ”आज कोणता वार आहे ?” असे मुलांना विचारून, “आज ________” अशी उत्तरे मिळविणे.  |

| | | |
|---|---|---|
| | | • हवामान नकाशा बनवून घेणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | मुलांना वर्तुळाकार उभे करून पुढील इंग्रजी लयबद्ध गीत ( Rhyme ) अभिनयासहित गायला सांगणे.<br>शिक्षकांनी पहिली ओळ म्हटल्या नंतर मुलांनी दुसरी ओळ म्हणणे अशा पध्दतीने कृती पुढे चालू ठेवणे.<br><br>Teacher :This is the way I clap my hands,<br>Students :clap my hands,<br>Teacher : clap my hands,<br>Students : Clap, clap, clap.<br><br>Teacher:This is the way I tap my feet,<br>Students : Tap my feet,<br>Teacher: Tap my feet<br>Students : Tap, tap, tap. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती निर्वहन करणे.<br>शिक्षकांनी नियमावलीत दिल्याप्रमाणे कार्यनिर्वहन करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : तुलना करणे, जोडणे (Matching), वर्गीकरण, आकार / आकारमान संकल्पना आणि पर्यावरणाची जाणीव.<br>कृती -18 : " तुलना करूया " (विकासात्मक ध्येय -3)<br>उद्देश : वस्तूचा आकार व प्रमाण यावर आधारित तुलना करून वर्गीकरण करणे.<br>साहित्य: पेन्सील, मापके, फळे (सफरचंद, संत्री) भाज्या (बटाटे, कांदा) भांडी ( चमचा, वाटी, ताटे)आणि विविध आकारमानाच्या इतर वस्तू.<br>पद्धत:<br>• प्रथमता सहजरीत्या मिळणाऱ्या वस्तू जसे पेन्सील, फळे, भाज्या आणि इतर वस्तू वापरून तुलना करणे.<br>• आकारमान व प्रमाण यावर आधारित तुलना करणे. आकारमानावर आधारित वस्तूच्या गटातील सर्वातमोठी वस्तू, मुलांच्या गटातून सर्वात उंच मुलगा, सर्वात लांब खडू निवडण्यास सांगणे.<br>• एकाच प्रकारच्या वस्तूंशी तुलना व्हावी. तुलनात्मक कृती हि मिश्र गटामध्ये करू नये.<br>उदा: आयताकार वस्तूची तुलना वर्तुळाकार वस्तूशी अथवा चेंडूची सफरचंदाशी तुलना करू नये.<br>• त्याचप्रमाणे प्रमाणावर आधारित तुलना करतेवेळी एकाच प्रकारच्या वस्तू असलेल्या ज्या गटात अधिक वस्तूआहेत हे तुलना करून ठरविणे.<br>इयत्ता 2 री च्या मुलांना–<br>1. भोपळा आणि बटाटा यामधील जड व हलका असा फरक ओळखण्यास सांगणे.<br>2. मुळा आणि शेवगा यामधील उंच व ठेंगू ओळखण्यास सांगणे.<br>इयत्ता 3री च्या मुलांना – जाड-बारीक, उंच-ठेंगू, जड-हलका या संकल्पनांची उदाहरणे देवून लिहिण्यास सांगणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांच्या | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्ये व सृजनशीलता यांचा विकास, डोळे व हात यांच्यामधील समन्वय.<br>कृती –41: – रांगोळी / आकृतिबंध (Patterns) (विकासात्मक ध्येय – 1 )<br>उद्देश :<br>• सूक्ष्म स्नायूंची वाढ करणे.<br>• हात व डोळे यांच्यातील समन्वय विकसित करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | कृती) | | • सौंदर्योपासना वृद्धिंगत करणे.<br>• बाह्यस्वरूप (कठोर, सौम्य) समजणे.<br>• वेगवेगळ्या वस्तूंच्या उपयोगासोबतच त्या वापराच्या पध्दती समजून घेणे.<br>साहित्य: रांगोळी, पेपर, डिंक.<br>पद्धत:<br>सोपे रेखाचित्र ( Outline ) किंवा चित्र मुलांना काढण्यास सांगणे. एका वाटीमध्ये डिंक दुसऱ्या वाटीमध्ये रंगीत रांगोळी देणे. काढलेल्या चित्रावर मुलांनी ब्रशच्या सहाय्याने डिंक लावणे. नंतर त्यावर आपल्या बोटाने रांगोळी टाकणे. चित्रावरील अतिरिक्त रांगोळी काढण्यासाठी ट्रे, पेपरप्लेट इत्यादी देणे. मुले तयार झालेले चित्र पाहूनआनंदी होतील. यानंतर मुलांच्या आवडीचे, त्यांच्या परिचयाचे चित्र देणे. किंवा मुलांनीच फुले, घर इत्यादींची चित्रे काढणे.<br>वर्गावर विवरण : इयत्ता दुसरी आणि तिसरीच्या मुलांना रांगोळीच्या सहाय्याने वेगवेगळी रेखाचित्रे रेखाटण्यास सांगणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : शब्द समायोजन<br>कृती – 10 : “ शब्द रचना ” ( गट – 2 ) ECL - 10<br>उद्देश :<br>• शब्द रचना सामर्थ्य वाढविणे.<br>• शब्दभांडार वाढविणे.<br>पद्धत : मुलांना वर्तुळाकार बसवून, स्पष्टपणे सूचना देवून कृती सुरु करणे.<br>* मी सांगत असलेली अक्षरे लक्षपूर्वक ऐका.<br>* अक्षरांचा वापर करून / अक्षरे जोडून शब्द तयार करा आणि सांगा.<br>उदाहरणार्थ : शिक्षकांनी मोठ्याने ‘ फ ’ ( विराम ) ‘ ळ ’ असा उच्चार केल्यानंतर मुलांनी ऐकून ‘ फळ ’असा शब्द तयार करून सांगणे.<br>या कृतीमध्ये शिक्षक टप्प्या टप्प्याने तीन आणि चार अक्षरांचे शब्द वापरू शकतात.<br>वर्गवार विवरण : इयत्ता दुसरीच्या मुलांनी एका अक्षराला संबंधित 2-3 शब्द सांगणे. इयत्ता तिसरीच्या मुलांनी, दुसरीच्या मुलांनी सांगितलेल्या शब्दांचा वापर करून स्वतःचे वाक्य बनविणे. |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य: मुद्रित मजकुराची जाणीव, शब्द ओळखणे, अर्थग्रहण, शब्द संपत्तीची वाढ आणि परिसराविषयी जाणीव<br>कृती 18 : “ चित्र संचयीका ” ( अल्बम ) : (विकासात्मक ध्येय – 2 ) विषय : प्राणीसंग्रहालयामध्ये पहावयास मिळणारे प्राणी / पक्षी / वस्तू.<br>उद्देश :<br>• चित्र वाचन करणे आणि चर्चा करून चित्राचा अर्थ समजून घेणे.<br>• आनंद, मनोरंजन आणि इतर उद्देशासाठी स्वतंत्रपणे वाचन करणे.<br>साहित्य : प्राणीसंग्रहालयाशी संबंधित चित्रे, प्राणीसंग्रहालयामध्ये पहावयास मिळणारे प्राणी / पक्षी / वस्तूना संबंधित कथा/कविता/गाणी.<br>पद्धत :<br>• मुलांच्या परिचयाची गाणी आणि बालगीतांना संबंधित चित्रे ओळखणे.<br>• गाणी / कथेमध्ये येणारी विशेष शब्द ओळखून नावे देणे.<br>• गाणी / कथेमध्ये येणारी प्रमुख पात्रे ओळखणे आणि पुनारावार्तीत झालेले शब्द / ओळी लिहिणे/सांगणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | • प्राणीसंग्रहालयाशी संबंधित चित्रे वाचणे आणि त्या चित्रा विषयी प्रतिक्रिया व्यक्त करून शिक्षकांशी चर्चा करणे.<br>व्यक्तिगत चित्र संचयीका : कथा किंवा गाण्यामध्ये येणाऱ्या विशेष वस्तू किंवा शब्द आणि संदर्भ चित्र वाचून प्रत्येक मुलांनी समजून घेवून त्यावर व्यक्तिगतरीत्या चर्चा करण्यासाठी संधी निर्माण करून देणे. त्या चित्राचे अर्थ ग्रहण करून, अभिव्यक्त होत असल्याची खात्री करून घेणे.<br>उदाहरण : प्राणी, पक्षी, वनस्पती, पिंजरा, आसने इत्यादिंची चित्रे/चित्रफित/प्राणीसंग्रहालयाला भेट.<br>शिक्षकांनी वापरावयाची काही विकासात्मक प्रश्ने :<br>• तुम्ही प्राणी संग्रहालय पहिले आहे का ?<br>• तुम्ही प्राणी संग्रहालयामध्ये काय काय पहिले आहे ?<br>• तुमचा आवडता प्राणी/पक्षी कोणता ?<br>• तुम्ही पाहिलेल्या प्राणी/पक्षाचे नाव सांगा.<br>• तुमच्या शाळेमध्ये एक सुंदर पक्षीधाम असल्यास किंवा बनवायचे झाल्यास तू कोणत्या जबाबदाऱ्या घेशील ?<br>• पक्षीधाम बनविण्यासाठी कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता असते ? इत्यादी.<br>अशा पद्धतीने शिक्षकांनी प्राप्त परिस्थितीनुसार प्रश्नावली तयार करून अध्ययनास अनुकूलन करून देणे.<br>प्राणीसंग्रहालयाशी संबंधित चित्रे/चित्रफित/गाणी/कथा इत्यादींचा उपयोग करून किंवा दाखवून मुलांशी चर्चा करणे. यावेळी शिक्षकांनी मुलांना मुक्तपणे बोलण्याची, प्रश्ने विचारण्याची आणि स्वत:च्या भाषेमध्ये सहजपणे चर्चा करण्याची संधी उपलब्ध करून देणे.<br>शिक्षकांनी इयत्ता दुसरी आणि तिसरीच्या मुलांना, पहिलीच्या मुलांशी परस्पर चर्चा करण्यासाठी मदत करण्यास सांगणे. आणि विषयाची सखोल चर्चा होत असताना सर्वजन अभिव्यक्त होत असल्याची खात्री करून घेणे. याबरोबरच इयत्ता दुसरी आणि तिसरीच्या मुलांना त्यांच्या वयोमानानुसार विषयावर चिंतन करून अभिव्यक्त होण्याची संधी उपलब्ध करून देणे.<br>( सदर कृतीचा पुढील भाग 37 व्या दिवसामध्ये समाविष्टीत असेल. ) |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : उद्देशपूर्वक लेखन, सृजनात्मक चिंतन, शब्दसंपत्तीचा विकास, श्रवण करून आकलन करणे, परिसराची जाणीव.<br>कृती – 33 : “ यादी बनवूया ” (विकासात्मक ध्येय – 2 ) ECW – 10<br>उद्देश :<br>• उद्देशाला संबंधित लेखन करण्याची संधी उपलब्ध करून देणे.<br>• सृजनात्मक चिंतनाचा विकास करणे.<br>• परिसराविषयी जाणीव निर्माण करणे.<br>• शब्दसंपत्तीचा विकास करणे.<br>• सूचनांचे श्रवण करून आकलन करून घेणे.<br>साहित्य : वही, कागद, रंगीत खडू ( क्रेयोन्स )<br>पद्धत : मुलांच्या शब्दसंपत्तीचा विकास करण्यासाठी आणि उद्देशीत लेखणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुलांना वेगवेगळ्या विषयांना संबंधित शब्दांची यादी करावयास सांगणे.<br>सुचविलेला विषय : माझी वस्त्रे.<br>पूर्ण वर्ग सहभागी होईल अशा पद्धतीने, कार्डशीटवर शब्दांची यादी करावयाच्या कृतीचे आयोजन करणे. या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | चार्टवर लिहावयाच्या शब्दांची यादी शिक्षकांनीच तयार करून, मुलांना पाहता आणि वाचता येईल अशा पध्दतीने वर्गखोलीमध्ये प्रदर्शित करणे.<br>वर्गावर विवरण : इयत्ता पहिलीच्या मुलांनी बनविलेल्या यादीमध्ये दुसरीच्या मुलांनी अधिक शब्द समाविष्ट करणे. तिसरीच्या मुलांना यादीतील शब्दांचा वापर करून वाक्ये बनविण्याची संधी उपलब्ध करून देणे. |
| | | | आदर्श लेखन : शिक्षकांनी मुलांसमोर फलक लेखन करणे. अक्षर लेखनाचा योग्य क्रम पाहण्याची संधी मुलांना उपलब्ध करून देणे. मुलांची नावे, मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे इत्यादी मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने लिहावे. शिक्षकांनी वर्गामध्ये जे काही फलक लेखन करावायाचे आहे ते मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने करावे. |
| | मैदानी खेळ | | कृती – 31 :“ नृत्य ”(विकासात्मक ध्येय – 1 )<br>सामर्थ्य : स्थूल स्नायू चालना कौशल्य अभिवृद्धी.<br>साहित्य : ड्रम / संगीत.<br>पद्धत : ड्रम किंवा संगीताच्या तालावर मुलांना ठेका धरून नाचावयास सांगणे.<br>दुसरी आणि तिसरीच्या मुलांना देखील हाच खेळ घेणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शीर्षक : माझा वाचन सवंगडी.<br>साहित्य : पात्रांची चित्रे / साहित्य<br>उद्देश :<br>• श्रवण सामर्थ्य वाढविणे.<br>• उत्सुकता / कुतूहल प्रवृत्ती वाढविणे.<br>• शब्दसंपत्ती वाढविणे.<br>पद्धत :<br>➢ शिक्षकांनी कथेचे वाचन करून पुनरावलोकन करणे.<br>➢ कथेतील पात्रांची नावे मुलांना सांगावयास लावून कथाकथन करणे.<br>➢ शिक्षकांनी कथेतील संभाषणे हावभावासहित सांगताना मुलांना लक्षपूर्वक निरीक्षण करावयास सांगून मुलांना अनुकरण करण्यासाठी प्रोत्साहित करणे.<br>➢ अशा प्रकारच्या छोट्या कथा शिक्षकांनी सांगणे. |
| | पुन्हा भेटू | | • दिवसभरात मुलांनी केलेल्या सर्व कृतींचे पुनरावर्तन करणे.<br>• दिवसभरात मुलांनी केलेल्या सर्व कृती पालक व कुटुंबातील सर्व सदस्यांसोबत चर्चा करण्यासाठी प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत यासाठी आनंददायी वातावरण निर्माण करून मुलांना निरोप देणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा – 6 — दिवस 36 (शनिवार)

| | |
|---|---|
| प्रतिबिंब (वर्गातील निरंतर मूल्यमापन) | • विविध तंत्र वापरून (निरीक्षण, तपशील पट्टी, मुलांची अध्ययन पत्रके, व्हिडीओ, सांदर्भिक नोंदी, इत्यादी) तुम्ही संग्रह केलेल्या मूल्यमापन नोंदी/माहिती यांचे पुनरावलोकन करणे. |

| | |
|---|---|
| | • प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिगत गरजेनुसार पुढील आठवड्यातील अध्ययन प्रक्रियेची योजना आखणे.<br>• अध्ययनाच्या तिन्ही विकासात्मक ध्येयांच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 7 दिवस – 37 (सोमवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 37 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती : 1<br>साहित्य : विविध प्राण्यांची चित्रे / खेळणी.<br>वेळ : 5 मिनिटे.<br>पद्धत :<br>• मुलांना वर्गखोलीच्या बाहेर ओळीने उभे करा. ( सुरक्षिततेचे नियम पाळा )<br>• मुले वर्गामध्ये प्रवेश करत असताना त्यांना एक एक करून प्राण्यांची चित्रे दाखवा.( शिक्षकांनी वर्गखोलीच्या दरवाजामध्ये उभे राहणे )<br>• मुलांनी त्यांनी पाहिलेल्या चित्रातील प्राण्याचे नाव सांगून त्याच्या ओरडण्याच्या आवाजाची नक्कल करत वर्गामध्ये प्रवेश करण्याची सूचना देणे.<br>उदाहरण : मी सिंह आहे , मी डरकाळी फोडतो ( डरकाळीचा आवाज )<br>• मुले वर्गामध्ये प्रवेश करत असताना शिक्षकांनी मुलांना नमस्ते,गुड मॉर्निंग म्हणून शुभेच्छा देणे.<br>• आज कोणता वार आहे ? अशाप्रकारे मुलांना विचारून आज .......... अशी उत्तरे मिळविणे.<br>• हवामान नकाशा बनवून घेणे.<br>कृती : 2 TPR<br>पद्दत :<br>• मुलांना वर्तुळाकारामध्ये उभे करून दिलेल्या सूचना व्यवस्तीत ऐकून त्यांचे पालन करावयास सांगणे.<br>• सोप्या TPR सूचना देणे.<br>उदाहरण : हात वर करा.पाय जमिनीवर आपटा.डोके मागे पुढे हलवा. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती : “ तुझे आरोग्य तुझ्या हातात ”<br>सामर्थ्य : स्व जाणीव,व्यक्तिगत स्वच्छता आणि संवहन कौशल्य अभिवृद्धी.<br>साहित्य : टिश्यू पेपर<br>पद्धत :<br>• मुलांना वर्तुळाकारामध्ये उभे करणे.<br>• मुलांना आपल्या हाताचे निरक्षण करून ते स्वच्छ आहेत का हे सांगावयास लावणे.<br>• मुलांना वर्गखोलीतील कपाट,खेळणी,तक्ते इत्यादींना स्पर्श करून आपापल्या जाग्यावर बसायला सांगणे.<br>• आता पुन्हा मुलांना आपल्या हाताचे निरक्षण करून ते स्वच्छ आहेत का हे सांगावयास लावणे.बरीच मुले |

| | | |
|---|---|---|
| | | अजूनही आपले हात स्वच्छ आहेत असे सांगतील.<br>• आता त्यांना एक टिश्यू पेपर देवून आपले हात हळुवारपणे त्या पेपर ला पुसावयास सांगणे.त्यानंतर मुलांना पांढरा शुभ्र असलेल्या टिश्यू पेपरचा रंग कसा तांबडा होतो याचे निरीक्षण करावयास सांगणे.<br>• टिश्यू पेपरवरील तांबडा रंग म्हणजे त्यांच्या हातावरील घाण / किटाणू आहेत याची कल्पना द्या.<br>• मुलांना वर्तुळाकारामध्ये बसवून काही सोपी प्रश्ने विचारून गट चर्चा करावयास सांगा.<br>1. तुम्ही तुमचे हात नेहमी धुता का ?<br>2. तुम्ही तुमचे हात केंव्हा धुता ?<br>3. हात धुण्यासाठी तुम्ही कशाचा वापर करता ?<br>4. आम्ही आपले हात स्वच्छ का धुतले पाहिजेत ?<br>5. आम्ही आपले हात स्वच्छ का धुतले नाहीत तर काय होईल ? इत्यादी...<br>शिक्षकांनी सर्व मुले गट चर्चेमध्ये भाग घेत आहेत याची खात्री करून घेणे. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती निर्वहन करणे.<br>शिक्षकांनी नियमावलीत दिल्याप्रमाणे कार्यनिर्वहन करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : स्पर्श ज्ञान,परिसराची जाणीव.<br>कृती - 9B : “ सुचविलेल्या संख्या ” ( क्रमवार जोडणे ) (विकासात्मक ध्येय – 3 )<br>उद्देश : क्रमवार जोडणे.<br>साहित्य : 1 ते 10 पर्यंतची संख्या कार्डे / रबरी अंक. ( गणित पेटी / कीटमधील कार्ड आणि अंक वापरणे )<br>पद्धत : मुलांना वर्तुळाकारामध्ये बसावयास सांगणे.1 ते 10 पर्यंतची संख्या कार्डे / रबरी अंक एका ट्रे मध्ये ठेवून त्यातील सुचविलेली संख्या कार्डे / रबरी अंक घेवून त्यांना क्रमवार जोडावयाची संधी निर्माण करणे.<br>इयत्ता - 2 : 1 ते 20 पर्यंतची संख्या कार्डे / रबरी अंक क्रमाने जोडून सांगावयास लावणे.<br>इयत्ता - 3 : 1 ते 20 पर्यंतची संख्या कार्डे / रबरी अंक सरळ आणि उलट क्रमाने म्हणत म्हणत लिहावयास सांगणे.<br>उपयोगात आणावयाची अध्ययन पत्रके : I. L. - 24 (वर्ग – 1, 2, 3) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांच्या कृती) | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्यांची अभिवृद्दी आणि सृजनशिलतेचा विकास, डोळे आणि हात यांच्यामध्ये समन्वय,आकारांची परिकल्पना.<br>कृती - 33 : “ गिरविणे/रेखाटणे ” ( ट्रेस करणे ) ( वाळू ) (विकासात्मक ध्येय – 1 )<br>उद्धेश :<br>• सूक्ष्म स्नायूंच्या चालना कौशल्यांची अभिवृद्दी करणे.<br>• डोळे आणि हात यांच्यामध्ये समन्वय साधणे.<br>• लिखाणासाठी पूरक कृती आहे.<br>साहित्य : वाळू.<br>पद्दत : मुलांना एका ट्रेमध्ये वाळू घालून देणे आणि त्यांना त्या वाळूमध्ये लिहिण्यासाठी एक लहान कडी देणे.माळूमध्ये वेगवेगळ्या वक्राकृती काढावयास सांगणे.त्यानंतर त्यांना वाळूमध्ये सोप्या रेखाकृती जसे वर्तुळ,त्रिकोण,आयात आणि चौरस इत्यादी काढून त्या रेखाकृतीपासून विविध चित्रे काढावयास प्रोत्साहित करणे. उदाहरणार्थ वर्तुळापासून चक्र,चौरसापासून घर इत्यादी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | वर्गवार विवरण : इयत्ता दुसरी आणि तिसरीच्या मुलांना रेखाकृतीपासून विविध चित्रे काढावयास सांगणे.<br>उपयोगात आणावयाची अध्ययन पत्रके : HW – 10 ( वर्ग – 1, 2, 3. ) |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : श्रवण,औपचारिक संभाषण,सृजनशीलता,स्व-अभिव्यक्ती.<br>कृती - 8 : “ अशुभाषण ” (विकासात्मक ध्येय – 2 ) ECL – 6<br>उद्धेश :<br>• निवडलेल्या विषयावर न अडखळता बोलणे.<br>• औपचारिक संभाषण कौशल्य वाढविणे.<br>• ऐकलेल्या विषयावर आपले मत मांडणे.<br>• सृजनात्मक स्व-अभिव्यक्तीसाठी संधी उपलब्ध करून देणे.<br>साहित्य : प्राणी,पक्षी,वाहनांची चित्रे / दृकपट्या.<br>पद्दत : एका डब्ब्यामध्ये / पेटीमध्ये प्राणी,पक्षी,वेगवेगळ्या वाहनांची चित्रे असलेल्या दृकपट्ट्या ठेवून मुलांना त्यातील कोणतीही एक दृकपट्टी घेवून त्यातील चित्राविषयी आपल्या शब्दात बोलवायची संधी उपलब्ध करून देणे.<br>वर्गवार विवरण : इयत्ता दुसरीच्या मुलांनी निवडलेल्या विषयावर 2 ते 3 मिनिटे बोलणे. इयत्ता तिसरीच्या मुलांनी निवडलेल्या विषयाच्या दैनंदिन वापराविषयी किंवा उपयोजनाविषयी बोलणे. |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य: मुद्रित मजकुराची जाणीव,शब्द ओळखणे,अर्थग्रहण,शब्द संपत्तीची वाढ आणि परिसराविषयी जाणीव.<br>कृती 18 : “ चित्र संचयीका ” ( अल्बम ) : (विकासात्मक ध्येय – 2 )<br>विषय : प्राणीसंग्रहालयामध्ये पहावयास मिळणारे प्राणी / पक्षी / वस्तू.<br>उद्धेश :<br>• मुलांनी चित्र वाचन करणे आणि त्यावर चर्चा करून चित्राचा अर्थ समजून घेणे.आणि व्यक्तिगत चित्र संचयीका बनविणे.<br>• अनुभव आणि पुर्वाज्ञानाच्या आधारावर तर्क लावणे.<br>आवश्यक साहित्य : कागद,रंगीत खडू ( क्रेयोन्स ),डींक, प्राणीसंग्रहालयामध्ये पहावयास मिळणारे प्राणी / पक्षी / वस्तूना संबंधित चित्रे.<br>पद्धत :<br>• गाणी आणि बालगीतामध्ये येणारी प्राणीसंग्रहालयाला संबंधित चित्रे ओळखणे.<br>• गाणी / कथेमध्ये येणारे विशेष शब्द ओळखून नावे देणे. मुलांनी ओळखलेले शब्द शिक्षकांनी फळ्यावर लिहिणे आणि त्या शब्दावर चर्चा करणे.परिचित शब्दाच्या आधारावर शब्द जाळे बनवून फळ्यावर किंवा चार्टवर लिहून चर्चा करणे.<br>• मुलांना कोरा कागद,रंगीत खडू इत्यादी साहित्य देवून प्राणीसंग्रहालयामध्ये पहावयास मिळणारे प्राणी / पक्षी / वस्तू यांची चित्रे पाहून स्वतः ती चित्रे रेखटून त्यामध्ये रंग भरावयास संधी उपलब्ध करून देणे.<br>व्यक्तिगत चित्र संचयीका : मुलांनी रेखाटलेल्या चित्रांना आपल्या चित्र संचयीकेमध्ये समाविष्टीत करावयास सांगून त्या चित्रा विषयी 41 व्या दिवशी चर्चा करावयास सांगणे.<br>उदाहरण : प्राणी,पक्षी, पिंजरा,आसने इत्यादिंची चित्रे / चित्रफित आणि अनुभवांच्या आधारे मुलांना स्वतः चित्र रेखाटण्याची संधी देणे.<br>शिक्षकांनी इयत्ता दुसरी आणि तिसरीच्या मुलांना, पहिलीच्या मुलांशी परस्पर चर्चा करण्यासाठी मदत करण्यास सांगणे.आणि विषयाची सखोल चर्चा होत असताना सर्वजन अभिव्यक्त होत असल्याबद्दल खात्री करून घेणे.त्यासोबतच मुलांना स्वतंत्रपणे चित्र रेखाटून रंग भरावयास संधी देवून त्यांच्या चित्र संचयीकेमध्ये संग्रह |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | करावयाची संधी देणे.<br>( सदर कृतीचा पुढील भाग 41 व्या दिवसामध्ये समाविष्टीत असेल. ) |
| | | उद्धेश पूर्वक लेखन | सामर्थ्य : उद्देशपूर्वक लेखन,सृजनशील विचार,शब्दभांडाराची अभिवृद्दी,श्रवण करून आकलन करणे,परिसराची जाणीव.<br>कृती – 33 : “ यादी बनवूया ” (विकासात्मक ध्येय – 2 ) ECW – 10<br>उद्देश :<br>• उद्देशाला संबंधित लेखन करण्याची संधी उपलब्ध करून देणे.<br>• सृजनात्मक चिंतनाचा विकास करणे.<br>• परिसराविषयी जाणीव निर्माण करणे.<br>• शब्दसंपत्तीचा विकास करणे.<br>• सूचनांचे श्रवण करून आकलन करून घेणे.<br>साहित्य : वही,कागद,रंगीत खडू ( क्रेयोन्स )<br>पद्दत : मुलांचा शब्दभांडार वाढविण्यासाठी आणि उद्देशीत लेखणाची सं/धी उपलब्ध करून देण्यासाठी मुलांना वेगवेगळ्या विषयांना संबंधित शब्दांची यादी करावयास सांगणे.<br>सुचविलेला विषय : फुले.<br>पूर्ण वर्ग सहभागी होईल अशा पद्धतीने कार्डशीटवर शब्दांची यादी करावयाच्या कृतीचे आयोजिन करू शकतो.या चार्टवर लिहावयाच्या शब्दांची यादी शिक्षकांनीच तयार करून,मुलांना पाहता आणि वाचता येईल अशा पद्दतीने वर्गखोलीमध्ये प्रदर्शित करणे.<br>वर्गावर विवरण : इयत्ता पहिलीच्या मुलांनी बनविलेल्या यादीमध्ये दुसरीच्या मुलांनी अधिक शब्द समाविष्ट करणे. तिसरीच्या मुलांना यादीतील शब्दांचा वापर करून वाक्ये बनविण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे. |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षकांनी मुलांसमोर फलक लेखन करणे.अक्षर लेखनाचा योग्य क्रम पाहण्याची संधी मुलांना उपलब्ध करून देणे.मुलांची नावे,मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे इत्यादी मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने लिहावेत.शिक्षकांनी वर्गामध्ये जे काही फलक लेखन करावायाचे आहे ते मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने करावे. |
| | मैदानी खेळ | | कृती : 19 “ उडी मारणे,धक्का देणे,गोल फिरणे.” (विकासात्मक ध्येय – 1 )<br>सामर्थ्य : स्थूल स्नायू चालना कौशल्यांचा विकास,स्थळाची/क्षेत्रफळाची जाणीव,शरीराचे संतूलन,पायांचे समायोजन.<br>पद्दत :<br>• मुलांना वर्तुळाकारामध्ये उभे करणे.<br>• शिक्षकांनी वर्तुळाच्या मध्यभागी उभे राहणे आणि उडी मारणे,धक्का देणे,गोल फिरणे इत्यादी क्रिया समजावून सांगून स्वतः करून दाखविणे.<br>• शिक्षकांनी एक क्रिया करावयास सांगून खेळाची सुरुवात करणे. उदाहरण : जंप – स्किप, जंप - स्किप इत्यादी.<br>इयत्ता दुसरी आणि तिसरीच्या मुलांना जंप - जंप – स्किप, जंप - जंप - स्किप अशा पद्दतीने क्रिया वाढवत जाणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शीर्षक : “ निळ्या रंगाचा कोल्हा ”<br>साहित्य : कथेची पुस्तके,चित्रे.<br>उद्देश : |

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>

- श्रवण सामर्थ्य वाढविणे.
- एकाग्रता वाढविणे.
- न अडखळता अस्खलितपणे बोलण्याचे कौशल्य वृद्धिंगत करणे.

**पद्धत :**

**कथाकथन**

- ➢ शिक्षकांनी कथाकथन करण्या आधी कथा वाचून समजून घेणे.
- ➢ योग्य हावभावासहित सोप्या भाषेमध्ये कथाकथन करणे.
- ➢ कथाकथन करत असताना शिक्षकांनी मुलांसोबत वर्तुळाकारामध्ये बसणे.
- ➢ सोपे प्रश्न विचारून कथा समजाविणे.

**कथा :**

एका जंगलामध्ये सिंह,वाघ,अस्वल,हरीण,कोल्हा,चित्ता,हत्ती,ससा इत्यादी प्राणी राहत होते.एके दिवसी एक शिकारी शिकार करावयास जंगलात आला.तेंव्हा त्याला कोल्हा दिसला.शिकऱ्यापसून सुटका करून घेण्यासाठी कोल्हा तेथून पाळला आणि जंगलातून गावामध्ये शिरला.त्याला पहाताच गावातील कुत्री त्याचा पाठलाग करू लागतात. आता आपल्याला ही कुत्री फाडून खाणार या भीतीने कोल्हा एका धोब्याच्या घरात शिरतो. पण कुत्री अजूनही आपल्याच मागे आहेत हे लक्षात आल्यावर तिकडच्या एका पिंपात उडी मारून लपतो.

त्या पिंपात नीळ असते.त्या निळीमुळे कोल्ह्याचे अंग निळे होऊन जाते.थोड्यावेळाने कुत्री नाहीत हे बघून कोल्हा जंगलात धूम ठोकतो.त्याच्या निळ्या रंगातला अवतार बघून जंगलातले सिंह, वाघ, लांडगे घाबरून जातात. आपल्या जंगलात कोण हा विचित्र प्राणी आला हा विचार ते करू लागतात.आपल्या निळ्या रंगाला जंगलातले सगळे प्राणी भ्याले हे बघून कोल्ह्याला वाटले आता आपल्याला या जंगलात बस्तान बसवता येईल. सर्व प्राण्यांना तो म्हणाला, "मला ब्रह्मदेवाने तुमच्या रक्षणासाठी पाठविले आहे."

त्याचे हे सगळे बोलणे ऐकल्यावर सर्व प्राण्यांनी 'होय महाराज' करीत एकच गिल्ला केला. आपली युक्ती सफल झाल्याचे लक्षात येताच, सिंहाला प्रधानपद दिले. वाघाला पलंगावर पहारा करण्याचे काम दिले तर लांडग्याला द्वारपाल म्हणून नेमले.कोल्ह्यांना राज्याबाहेर हाकलले. सिंह, वाघ रोज कोल्ह्यासाठी निरनिराळे प्राणी मारून खाण्यासाठी आणू लागले.एके दिवशी अचानक कोल्हेकुई ऐकू येत होती. त्याबरोबर या नव्या महाराजांच्या अंगावर रोमांच उभे राहिले आणि सहजगत्या तेही ओरडू लागले. त्याबरोबर आपण ज्याला राजा समजत होते तो एक कोल्हा आहे हे लक्षात येताच, सिंह आणि वाघाने त्याचा फडशा पाडला. कोल्होबाला पळायचीसुद्धा संधी दिली नाही.

कथाकथानानंतर खालील प्रमाणे सोपी प्रश्ने विचाराने.

1. नीळ असलेल्या पिंपात उडी कोणी मारली ?
2. कोल्हा विचित्र प्राण्याप्रमाणे का दिसत होता ? इत्यादी...

(कथा ऐकण्याचा आनंद घेण्याबरोबरच कथा समजून घेत आहेत याची खात्री करून घेणे.)

</td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>पुन्हा भेटू</td>
<td>

- दिवसभरात मुलांनी केलेल्या सर्व कृतींचे पुनरावर्तन करा /आठवा.
- दिवसभरात मुलांनी केलेल्या सर्व कृती पालक व कुटुंबातील सर्व सदशांसोबत चर्चा करण्यासाठी प्रोत्साहित करणे.
- दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना निरोप देणे.

</td>
</tr>
</table>

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 7 दिवस – 38 (मंगळवार)

<table>
<tr><th>दिवस</th><th>तासिका</th><th>कृतींचे विवरण</th></tr>
<tr><td rowspan="2">38</td><td>अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज)</td><td>कृती : 1<br>37 व्या दिवसामध्ये उल्लेखित, शुभेच्छा देवान घेवाण कृती 1 ची पुनरावृत्ती करणे.<br>कृती : 2 TPR<br>• मुलांना वर्तुळाकारामध्ये उभे करून दिलेल्या सूचना व्यवस्तीत ऐकून त्यांचे पालन करावयास सांगणे.<br>• सोप्या TPR सूचना देणे.<br>उदाहरण : * उडी मारा.<br>* जमिनीला स्पर्श करा.<br>* कमरेवर हात ठेवा.</td></tr>
<tr><td>गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती)</td><td>कृती – 2 : वेडं कोकरु.<br>सामर्थ्य : स्व जाणीव,भाषण कौशल्य अभिवृद्धी,शब्दसंपत्तीचा विकास.<br>साहित्य : बालगीतांचा तक्ता ( Rhyme Chart )<br>पद्दत : लयबद्ध हालचाल करावयास मुलांना संधी आणि अनुभव उपलब्ध करून देणे.लहान मुलागा लहान मुलगा हे लयबद्ध गीत गायला सांगणे.गावून झाल्यानंतर लयबद्ध गीतावर काही प्रश्ने विचारा.<br><br>वेडं कोकरु<br>खुप थकलं;<br>येताना घरी<br>वाट चुकलं !<br><br>अंधार बघून<br>भलतंच भ्यालं<br>दमून दमून<br>झोपेला आलं !<br><br>शेवटी एकदा<br>घर दिसलं<br>वेडं कोकरु<br>गोड हसलं !<br><br>डोकं ठेवुन<br>गवताच्या उशीत<br>हळुच शिरलं<br>आईच्या कुशीत! मंगेश पाडगावकर<br><br>वरील बालगीत मुलांना गायला लुवून खालील प्रमाणे प्रश्ने विचारून उत्तरे मिळविणे.<br>1. कोकरू घरी येत असताना काय झाल ?<br>2. कोकरू काय पाहून घाबरले ?<br>3. कोकरू केंव्हा गोड हसले ?<br>4. कोकरू कोणाच्या कुशीत शिरलं ?</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | माझा वेळ (Free Indore Play) | • मुले सर्व अध्ययन कोपऱ्यातील कृतींमध्ये सहभागी होवून त्या कृती व्यवस्तीतपणे पूर्ण करत असल्याची खात्री करून घेणे.<br>• अपूर्ण असलेल्या कृती पूर्ण करण्यासाठी मुलांना सहकार्य करणे.<br>• पुढील दिवसामध्ये मुले कृतीमध्ये सहभागी होत असताना कोणत्या मुलांकडे जास्त लक्ष दिले पाहिजे याची पूर्वतयारी शिक्षकांनी केली पाहिजे.<br>• दिवसाच्या शेवटी अध्ययन कोपऱ्यामध्ये पुढील पायरीसाठी आवश्यक असणारे साहित्य तयार करून घेणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : मांडणी/रचना ओळखणे आणि पूर्ण करणे,परिसराची जाणीव.<br>कृती - 10A : " दिलेल्या रचनेचा/मांडणीचा अवलंब कर. "<br>उद्देश : मांडणी/रचना पूर्ण करणे.<br>साहित्य : पेन्सील,खोडरबर,शार्पनर,इत्यादी वस्तू आणि सफरचंद,पेरू,केळी,संत्री इत्यादी फळांची चित्रे,चौरस,त्रिकोण,वर्तुळ इत्यादी आकृत्यांची कातरलेली चित्रे.<br>पद्दत : फळे घेवून एका ओळीमध्ये सरळ मांडणी करणे.मांडणीचा क्रम असा असुदे केळी – सफरचंद, केळी – सफरचंद, केळी – सफरचंद किंवा सफरचंद – सफरचंद – केळी, सफरचंद – सफरचंद – केळी, सफरचंद – सफरचंद – केळी.मुलांना फळांच्या मांडणीची पद्दत ओळखण्यासाठी प्रोत्साहित करणे.याच पद्दतीच्या मांडणीचा वापर करून फळांची मांडणी करावयास सांगणे. अशा पद्दतीने फुले,पाने,बिया,खडे इत्यादींचा वापर करून मांडणी मारणे.<br>इयत्ता दुसरी आणि तिसरीच्या मुलांना वरील कृती करावयास सांगणे.<br>वापरावयाची अध्ययन पत्रके - I. L. -25 (वर्ग – 1, 2, 3) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांच्या कृती) | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्यांची अभिवृद्धी आणि सृजनशिलतेचा विकास,गणित आणि विज्ञान परीकाल्पनेची अभिवृद्धी.<br>कृती – 22 : " वाळू आणि पाण्याचा खेळ." ध्येय – 1<br>उद्धेश :<br>• स्थूल आणि सूक्ष्म स्नायू चालना कौशल्यांच्या विकासासाठी सहाय्यक.<br>• साचे तयार करताना गणित आणि विज्ञानाच्या संकल्पना वाढविण्यासाठी सहाय्यक ठरते.<br>• सृजनशीलता आणि कल्पनाशक्तीचा विकास होतो.<br>साहित्य : वाळू,पाणी,खेळणी,साचे.<br>उद्धेश : सुलभकारांनी मुलांना वाळूच्या ढिगाजवळ घेवून जाणे.वाळूमध्ये खेळावयास मुलांना प्रोत्साहन देणे.अशा पद्दतीने सुलभकारांनी दोन आठवड्यातून एकदातरी मुलांना वाळू आणि पाण्यामध्ये खेळण्यासाठी घेवून गेले पाहिजे.खेळण्यासाठी आवश्यक असलेल्या साच्यांची जुळवाजुळव करून ठेवणे.नुलांनी साच्यामध्ये पाणी मिश्रित वाळू भरणे आणि रिक्त करणे.यामुळे मुलांना भरलेले – रिक्त,कमी – जास्त इत्यादी संकल्पनांचा विकास होण्यास मदत होते.<br>वर्गवार विवरण : इयत्ता दुसरी आणि तिसरीच्या मुलांनी कमी आणि जास्त या संकल्पनेशी संबंधित वेगवेगळ्या साच्यापासून गट बनविणे. |
| | भाषा विका / ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : ध्वनिशास्त्राची जाणीव,शब्दभांडाराचा विकास, चालना कौशल्यांचा विकास.<br>कृती – 15 : " लयबद्द शब्द ऐकणे." (विकासात्मक ध्येय – 02 ) ECL – 4 ( 32 व्या दिवसापासून पुढे. )<br>उद्धेश :<br>• ध्वनिशास्त्राची जाणीव निर्माण करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | स<br>आ<br>णि<br>पा<br>या<br>भूत<br>सा<br>क्षर<br>ता | | • लयबद्ध शब्दांच्या माध्यमातून शब्दसंग्रह वाढविणे.<br>• स्थूल आणि सूक्ष्म चालना कौशल्यांचा विकास करणे.<br>साहित्य : फळा,चुन्ना.<br>पद्धत :<br>• विविध लयबद्द शब्दांचे गट/यादी बनविणे.<br>• मुलांचे वेगवेगळे गट बनवून प्रत्येक गटाला एक लयबद्द शब्दांचा गट/यादी देणे.<br>• लयबद्द शब्दांचा वापर करून शिक्षकांच्या मदतीने विविध वाक्ये तयार करणे.<br>वर्गवार विवरण : इयत्ता दुसरी आणि तिसरीच्या मुलांनी लयबद्द शब्दांच्या गटातील शब्द वापरून स्वतः वाक्ये तयार करणे. ( 44 व्या दिवसापासून पुढे.) |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य : शब्दसंपत्तीचा विकास,स्व अभिवृद्दी,प्रकट वाचन.<br>कृती : “ चित्र वाचन. ” (विकासात्मक ध्येय – 2 )<br>उद्धेश : विविध घटना / संदर्भ यांची चित्रे पाहून घटना / संदर्भ समजावून घेणे.<br>साहित्य : विविध घटना,स्थळ,यात्रा,मेळावे,उद्यान,बाजार,शाळा,प्राणी संग्रहालय,सण इत्यादींची चित्रे.<br>पद्धत : मुलांची वेगवेगळ्या गटामध्ये विभागणी करणे.शिक्षकांनी मुलांना वेगवेगळ्या वर्तमानपत्रातील, पुस्तकातील, नियाताकालीकेमधील चित्रांचे निरीक्षण करावयास सांगून त्यामधील एकाद्या घटना/संदर्भाचे चित्र निवडण्यास सांगणे आणि शिक्षकांनी त्या घटना/संदर्भाचे विवरण देणे.<br>इयत्ता दुसरी आणि तिसरी : शिक्षकांनी इयत्ता दुसरी आणि तिसरीच्या मुलांचे वय आणि आवश्यकता लक्षात घेवून घटना/संदर्भाचे विवरण देणे.<br>विशेष सूचना : हीच कृती 8 व्या आठवड्यातील 44 व्या दिवशी घेतली आहे. |
| | | उद्धेश पूर्वक लेखन | सामर्थ्य : लेखन कौशल्यांचा सराव,शब्दभांडाराची अभिवृद्धी, डोळे आणि हात यांच्यामध्ये समन्वय, सृजनशीलता.<br>कृती – 34 : “ हस्तपुस्तक रचना ” (विकासात्मक ध्येय – 2 ) ECW – 9 ( 32 व्या दिवसापासून पुढे. )<br>उद्धेश :<br>• मुलांची हस्तपुस्तिका तयार करणे.<br>• मुलांना आवडणाऱ्या चित्रांचा संग्रह करून पुस्तक तयार करणे.<br>• चित्रे काढण्याचा आणि चित्र संग्रह करण्याचा छंद वाढविणे.<br>साहित्य : कागद,रंग,तक्ते,स्टेपलर.<br>पद्धत : शिक्षकांनी मुलांना दोन A4 आकाराची पाने घेवून त्यांची घडी करून त्यांना टाचणी मारून लहान वही तयार करण्यासाठी मदत करणे.या वाहीमध्ये प्रत्येक मुलांना एका पानावर दिलेल्या विषयावर चित्र काढावयास किंवा लिहावयास सांगणे.<br>विषय : माझी खेळणी.<br>वर्गवार विवरण : दुसरी आणि तिसरीच्या मुलांनी व्यक्तिगत वह्या बनविणे. |
| | | | लिखाणाचे नमुने :<br>शिक्षकांनी मुलांसमोर फलक लेखन करणे.अक्षर लेखनाचा योग्य क्रम पाहण्याची संधी मुलांना उपलब्ध करून देणे.मुलांची नावे,मुलांनी काढलेल्या चित्रांची नावे इत्यादी मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने लिहावेत.शिक्षकांनी वर्गामध्ये जे काही फलक लेखन करावायाचे आहे ते मुलांच्या समोरच त्यांना व्यवस्थित दिसेल अशा पद्धतीने करावे. |
| | मैदानी खेळ | | कृती – 19 : “ उडी मारणे,धक्का देणे,गोल फिरणे.”<br>सामर्थ्य : स्थूल स्नायू चालना कौशल्यांचा विकास,स्थळाची/क्षेत्रफळाची जाणीव,शरीराचे संतूलन,पायांचे |

| | | |
|---|---|---|
| | | समायोजन.<br>पद्दत :<br>• जमिनीवर रेषा आखणे.<br>• मुलांना त्या रेषेवरून उडी मारत जाण्यास सांगणे.<br>• शिक्षकांनी एक क्रिया करावयास सांगून खेळाची सुरुवात करणे. उदाहरण : जंप – स्किप, जंप - स्किप इत्यादी.<br>इयत्ता दुसरी आणि तिसरीच्या मुलांना देखील हीच कृती घेणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | शीर्षक : “ निळ्या रंगाचा कोल्हा ”<br>पहिल्या दिवसाच्या उद्देशानुसार कथेची वेळ पुढे चालू ठेवणे.<br>शिक्षकांनी कथा सांगताना सोपे प्रश्न विचारून कथा पूर्ण करणे.<br>**कथाकथन**<br>कथाकथानानंतर खालील प्रमाणे सोपे प्रश्न विचारणे.<br>1 प्राण्यांची सभा बोलावून कोल्ह्याने काय सांगितले?<br>2 प्राण्यांनी कोल्ह्यावर विश्वास ठेवण्याचे कारण काय?<br>(कथा ऐकण्याचा आनंद घेण्याबरोबरच कथा समजून घेत आहेत याची खात्री करून घेणे.) |
| | पुन्हा भेटू | • दिवसभरात मुलांनी केलेल्या सर्व कृतींचे पुनरावर्तन करा /आठवा.<br>• दिवसभरात मुलांनी केलेल्या सर्व कृती पालक व कुटुंबातील सर्व सदशांसोबत चर्चा करण्यासाठी प्रोत्साहित करणे.<br>• दुसऱ्या दिवशी मुले आनंदाने शाळेत यावीत यासाठी एक आनंददायी संदर्भ निर्माण करून मुलांना निरोप देणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 7      दिवस – 39 (बुधवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 39 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती- 1<br>साहित्य: पक्ष्यांची चित्रे / खेळणी<br>पद्धत:<br>मुलांना वर्गाच्या बाहेर एका ओळीत उभे करा. (सुरक्षा उपायांचे निरीक्षण करा) पक्ष्यांची चित्रे एक एक करून दाखवा, (शिक्षक वर्गात असावेत.)<br>चित्र दाखवून त्या पक्षाचे नाव व पक्षाचा आवाज काढून वर्गात प्रवेश करण्याची सूचना करावी.<br>उदा. मी मोर......<br>• वर्गात प्रवेश केल्यानंतर गोलाकार उभे राहण्याची सूचना देणे.<br>• मुले वर्गात प्रवेश करताना, शिक्षक मुलांना “गुड मॉर्निंग, गुड मॉर्निंग” असे म्हणतात.. |

| | | |
|---|---|---|
| | | • मुलांना विचारा, आज कोणता दिवस आहे? "आणि 'आज ........................' असे सांगून मुलांचा प्रतिसाद घ्या.<br>**कृती: 2 TPR**<br>मुलांना वर्तुळाकार उभे करून आणि सूचनाचे अनुकरण करण्यास सांगा.<br>सरळ TPR सूचना द्या.<br>उदा. पक्ष्याप्रमाणे उड.<br>साश्याप्रमाणे उडी मार.<br>बेडकाप्रमाणे उड्या मार. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती: Sneeze and cough<br>• आवश्यक साहित्य – रुमाल, sanitiser<br>पध्दत-<br>विद्यार्थ्यांना वर्तुळाकार उभे करा. .<br>• शिंकताना रुमाल कसा वापरायचा हे सांगा.<br>• मुलांना त्याचे अनुकरण करायला सांगा.<br>• हात धरून कसे खोकावे? हे दाखवा. त्याचे अनुकरण करण्यास सांगा.<br>• SANITISER च्या वापराबद्दल विचारा व विवरण द्या.<br>• जोपर्यंत मुल या क्रिया वापरण्यास शिकत नाही तो पर्यंत क्रियेची पुनरावर्ती करा.<br>मुलांना वर्तुळात बसवा. मुलांना गट चर्चा करण्यास सांगून खालील प्रश्न विचार.<br>• आपण केव्हा शिंकतो ?<br>• शिंकताना आम्ही काय वापरले पाहिजे ?<br>• तुम्ही इतरांसमोर शिंकलात तर काय होईल?<br>• आम्ही कसे खोकले पाहिजे?<br>• मुखवटा(मास्क) वापरण्याचा मुख्य उद्देश काय आहे? इ. शिक्षकांनी प्रश्न विचारून हे सुनिश्चित केले पाहिजे की सर्व मुलांनी गटात सहभाग घेतला पाहिजे. |
| | माझा वेळ (Free Indoor play) | शिक्षक मुलांना कोपरा उपक्रमांची ओळख करून देतील आणि शिकण्याच्या तयारीचा भाग म्हणून 8 कोपऱ्यांमधील सामग्रीचा वापर करतील. मुलांना प्रश्न विचारल्याने त्यांची समज सुनिश्चित होते.<br>(• मूलभूत शिक्षणविषयक कृती दिल्यास, मुले त्यांची क्षमता साध्य करण्यात मदत करण्यासाठी अतिरिक्त कृतीचा विचार करू शकता.)<br>*******************************************************************************<br>**बिल्डिंग ब्लॉक्स कोपरा :**<br>• सामर्थ्य- डोळे आणि हात यांचा समन्वय साधने.<br>• कृती – रेषेवर जोडणे.<br>• उद्देश – वस्तूंना निच्छितपणे जोडण्याचे कौशल्य वाढविणे, एकाग्रता, सौंदर्य दृष्टी, आत्मविश्वा वाढविणे.<br>• साहित्य- बीज, खडे, ब्लॉक्स इ.<br>• पध्दत- शिक्षक खडूच्या सहाय्याने जमिनीवर सरळ / वक्ररेषा मारतात.<br>त्या रेषेवर बिया, खडे आणि ब्लॉक्सची मांडणी करतील. |

**2 री व 3 री इयत्तेसाठी -**

**मुले जमिनीवर खडूने आकृत्या काढतात आणि त्यावर बिया, खडे आणि ब्लॉक्स ओळीने ठेवतात.**

************************************************************************************

## गणित कोपरा :

- **सामर्थ्य: आकार, उंची, वजन, जड - हलके आणि लाक्षणिकरित्या संख्यांची तुलना यावर आधारित वस्तूंचे वर्गीकरण करणे.**
- **उद्देश: वस्तूंचे उंच / लहान असे  वर्गीकरण करणे.**
- **साहित्य: ब्लॉक्स, रिकामे माचीस बॉक्स / सोप बॉक्स / टूथपेस्ट बॉक्स, उंच / ठेंगू संकल्पना बिंबविण्याचे साहित्य**
- **पद्धत:** (वि प्र)

**उपलब्ध ब्लॉक / सामग्रीमधील सामग्रीचे उंच/ ठेंगूवर आधारित वर्गीकरण करण्यास सांगणे.**

* **स्वत:पेक्षा उंच आणि ठेंगू असलेल्या गोष्टींची नावे सांगणे.**

(2री आणि 3 री वर्गासाठी)-

* **परिसरातील उंच/ ठेंगू झाडे, घरे, प्राणी इत्यादींची नावे देणे**

---

## संशोधन/विज्ञान कोपरा :



**सामर्थ्य : वैज्ञानिक, शोधात्मक आणि विचारशील वृत्ती विकसित करणे.**

**कृती: तरंगणारे / बुडणारे (विकासात्मक ध्येय-** 3)

**उद्दिष्ट: तरंगणाऱ्या आणि बुडणाऱ्या साहित्याचे वर्गीकरण करणे.**

**साहित्य: - पाणी, टब, प्लास्टिक बॉल, झाकण, आइस्क्रीम स्टिक, तुकडा, नाणे, इ. तरंगणाऱ्या - बुडणाऱ्या वस्तू.**

**पद्धत:**

विद्या प्रवेश:

**टबच्या पाण्यात कोणत्या वस्तू तरंगत आहेत आणि बुडत आहेत यावर आधारित वस्तूंना** 2 **गटांमध्ये विभागणे.**

**इयत्ता** 2 **री आणि** 3 **री: तो वरील कृती  व्यतिरिक्त त्याच्या अनुभवाने तरंगणाऱ्या / बुडणाऱ्या वस्तूंची नावे सांगतात.**

---

## बाहुली कोपरा :

- **सामर्थ्य: सौंदर्यशास्त्र, व्यक्तिगत स्वच्छता, अभिव्यक्ती कौशल्ये वाढविणे.**
- **कृती: पहा माझी बाहुली.**
- **उद्देश: विशिष्ट विषयावर अभिव्यक्ती विकसित करणे.**
- **सामग्री:- गाय, वाघ, हत्ती, मोर, कोंबडी, कबूतर, आणि इतर प्राणी - पक्षाच्या बाहुल्या.**
- **पद्धत:**
- विद्या प्रवेश:

**2 री आणि 3 री वर्ग:**

**कोपऱ्यामध्ये उपलब्ध असणाऱ्या बहुल्यामधील 2-3 बाहुल्या मित्राबरोबर निवडतात.**

**स्वत:च्या बाहुली बद्दल बोलतात.**

---

**वर्ग वाचनालय/ वाचन कोपरा :**

- सामर्थ्य : चित्राचे निरीक्षण करून अर्थ समजून घेणे. कल्पनाशक्ती, अभिव्यक्ती सामर्थ्य वाढविणे.
- कृती: चित्र वाच. (लक्ष 1)
- उद्देश: चित्र ओळखण्याबरोबर त्याच्याबद्दल स्पष्टपणे बोलतो.
- ( अध्ययन निष्पत्ती-ECL 3.5b)
- साहित्य: प्रसंग चित्रे ( घर, दवाखाना, शाळा, मदत करणे, अपघाताचा प्रसंग, स्वच्छतेच्या सवयी)
- विद्याप्रवेश:

वाचन कोपऱ्यामध्ये उपलब्ध असणाऱ्या विविध प्रसंगाची चित्र कार्डे निरीक्षण करून स्वत:च्या पद्धतीने विवरण करतात.

2 री आणि 3 री वर्ग:

प्रसंगावर आधारित चित्रांविषयी शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देतील.

* तुझ्या घरातील तुला आवडणारी व्यक्ती कोणती?

* दवाखान्यात तू पाहिलेल्या वस्तू/ व्यक्तींची नावे सांग.

**कलागृह/ हस्तकला कोपरा :**



- सामर्थ्य: सूक्ष्म स्नायूंच्या वाढीबरोबर सौन्दर्योपासना, सृजनशीलता वाढविणे.
- कृती: टोपी पाहिजे का? टोपी ( टोपी तयार करणे)
- उद्देश : दिलेल्या मार्गदर्शनाचा अर्थ समजून घेवून कृतीला सुरवात करणे.
- साहित्य : वर्तमानपत्र/ रंगीत कागद
- विद्याप्रवेश ( वि.प्र.)

2 री आणि 3 री वर्ग:

कृती: प्रथम वर्तमानपत्राचा कागद घेऊन शंकू आकार दुमडण्याचा सराव करून घेणे.

मुले शंकू आकार दुमडण्यास शिकल्याचे निश्चित झाल्यानंतर रंगीत कागद देऊन टोपी तयार करून घेणे.

**लेखन कोपरा :**

लेखन सरावाच्या सिद्धतेत समरस करून घेण्याबरोबर अक्षरातील फरक दाखवून देणे.

- कृती : रेषा काढणे.
- उद्देश: लेखनाच्या पूर्व सिद्धतेसाठी वेगवेगळ्या प्रकाराच्या रेषांचा सराव करून घेणे.
- साहित्य: पेपर, पेन्सिल, खोड रब्बर, पट्टी
- विद्याप्रवेश ( वि.प्र.)

2 री आणि 3 री वर्ग:


1. मुलांना शिक्षकाने दिलेले वर्णन स्पष्टपणे ऐकण्यास सांगणे.
2. चेंडू भिंतीला मारल्यानंतर, साप जमिनीवर सरपटताना, विमान उडताना, कीटक एका फुलावरून दुसऱ्या फुलावर उडताना अशाप्रकारचे संदर्भ देवून त्या प्रकारे रेषा मारण्यास सांगणे.
3. मुलांच्या कृतीचे निरीक्षण करणे.

| | | |
|---|---|---|
| | | 4. मुलांनी रेषा मारण्यापूर्वी शिक्षकाने रेषा मारून दाखविणे.<br>**खेळणी/ करा व कोपरा :**<br>• सामर्थ्य : निरीक्षण शक्ती, सृजनशीलता, स्वतंत्रपणे कार्य निभावणे.<br>• कृती: चित्र रेखाटा<br>• उद्देश: कलोपासानेला ओळखणे आणि प्रोस्ताहित करणे.<br>• साहित्य: पांढरा कागद, डिंक, रंग, पेन्सिलला टोक काढल्यानंतरचा कचरा.<br>• पध्दत:<br>विद्याप्रवेश ( वि.प्र.)<br>पेन्सिलला टोक काढल्यानंतरचा कचरा फुलाच्या आकारात जोडणे, रंग भरणे, पाने व देठ काढणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | • सामर्थ्य: तुलना, पर्यावरण जागरुकता, रंगांची कल्पना, आकार आणि आकारमान.<br>• कृती : 12 A- स्पर्श कर – मोजून बघ ( विकासात्मक ध्येय-3)<br>• उद्देश : स्पर्श करून मोजून सांगणे.<br>• साहित्य: खडे, बाटलीचे झाकण, खडू, चेंडू, कडधान्य.<br>• पद्धत :<br>1. 5 किंवा 5 पेक्षा जास्त वस्तू एकत्र करून प्रत्येक वस्तूला स्पर्श करून मोजण्यास सांगणे.<br>2. गुणलक्षणाच्या आधारे जोडणे.<br>3. विविध प्रकारच्या वस्तू देवून एकाहून एक कसे वेगळे आहेत हे समजावून सांगणे.<br>• इ. 2 री.<br>कमीत कमी 10 वस्तू देवून त्यांना गुणलक्षणाच्या आधारे वेगळे करण्यास सांगणे.<br>• 3 री.<br>कमीत कमी 20 वस्तू देवून त्यांना गुणलक्षणाच्या आधारे वेगळे करण्यास सांगणे.<br>वेगळे केलेल्या वस्तूंचे गुणलक्षणे सांगण्यास सांगणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांच्या कृती) | • सामर्थ्य: स्थूल आणि सूक्ष्म स्नायू वळण कौशल्याची अभिवृद्धी, सृजनशीलता आणि सौंदर्यप्रज्ञेचा विकास.<br>• कृती: 21 . योगा, नृत्य आणि व्यायाम. (लक्ष 1)<br>• उद्देश:<br>1. स्थूल आणि सूक्ष्म स्नायुंच्या वाढीसाठी मदत होणे.<br>2. सृजनशीलतेला अभिव्यक्त होण्यास मदत होणे.<br>3. मुलांचा सर्वांगीण विकास आणि आरोग्यासाठी मदत होणे.<br>4. उत्तम शैली शिकणे.( उभे राहणे, बसणे, चालणे)<br>• साहित्य:<br>दुपट्टा आणि कोणतेही संगीत वाद्यकृती करताना कोणतेही लोकप्रिय किंवा सांप्रदायिक संगीत सुरु करणे. मुलांना संगिताला योग्य दुपट्टा चालविण्यास सांगणे किंवा चित्रात दाखविल्याप्रमाणे योगासनातील विविध आसने करण्याचा प्रयत्न करण्यास सांगणे. अशाप्रकारे सुलाभकार नित्य अभ्यासक्रमाप्रमाणे कृती करून घेतात. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | |  <br>**2 री आणि 3 री इयत्तेतील मुलांना वरील कृतीबरोबर योगासनाची विविध आसने करण्यास प्रोत्साहित करणे.**<br>**वापरावयाच्या अभ्यास पत्रिका** H.W.-11 ( 01, 02,03 री ) |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | • **सामर्थ्य: क्रीयात्मक स्व अभिवृद्धी , ध्वनी संकेत आणि प्रास शब्द ऐकणे, परिसर प्रज्ञा, शब्दसंपत्तीची वाढ**<br>• **कृती 3: गाणे, प्रास गीत, कविता / नाटक ( विकासात्मक ध्येय-2 ) ECL -3**<br>• **उद्देश :**<br>1. **ध्वनी संकेतांची जाणीव करून देणे.**<br>2. **प्रास पदांची जाणीव निर्माण करणे.**<br>3. **क्रियात्मक स्व अभिवृद्धीला वाव करून देणे.**<br>4. **स्वतःच्या परिसराशी संबंध प्रस्थापित करणे.**<br>• **साहित्य: नाही**<br>• **पध्दत:**<br>1. **मुलांना गोलाकार उभे करणे.**<br>2. **शिक्षकांनी मुलांना नवीन प्रास गीत अभिनायासहित गाऊन दाखविणे.**<br>3. **शिक्षकांचे अनुकरण करीत मुलांना गाणे म्हणण्यास सांगणे.**<br>**लक्षात ठेवायचे अंश-**<br>❖ **मुले गीत आनंदाने आणि योग्य अभिनयासहित उत्साहाने गाऊ देत.**<br>❖ **मुले गाण्यातील प्रास शब्द शिक्षकांच्या सहाय्याने ओळखू देत.**<br>**इयात्तावर विवरण -**<br>**2 री च्या वर्गातील मुले प्रास गीतात येणारे प्रास शब्द ओळखतात.**<br>**3 री च्या वर्गातील मुले त्या प्रास शब्दासारखे आणखी शब्द शोधतात.** |
| | | आकलना सहीत वाचन | • **सामर्थ्य:**<br>1. **शब्द ओळखणे.**<br>2. **छापील मजकुराची ओळखणे.**<br>3. **आकलन, शब्द संपत्तीची अभिवृद्धी करणे.**<br>• **कृती: नावाचे जग ( लक्ष-2 )**<br>• **उद्देश :**<br>1. **परिचित परिसरातील वस्तूचा लेखन संकेताबरोबर संबंध जोडणे.**<br>2. **पाठ्य आणि वस्तू एकच आहेत या निर्धारापर्यंत येऊन वाचनामध्ये आवड निर्माण करणे.**<br>• **साहित्य: वही, चार्ट पेपर, पेन्सिल, क्रेयोन्स इ. आजूबाजूच्या वस्तू.**<br>• **पध्दत:**<br>▪ **मुलांच्या मदतीने आजूबाजूच्या परिचित/सामान्य वस्तूंच्या नावाची यादी करणे. उदा. टेबल , खुर्ची, पेन, पेन्सिल इ.**<br>▪ **तयार असलेल्या नावाच्या पट्ट्या त्या त्या वस्तूवर चिकटविणे.** |

<table>
<tr><td></td><td></td><td></td><td>

- अशाच प्रकारच्या आणखी एक एक नावाच्या पट्ट्या तयार करून ठेवणे.
- तयार झालेल्या नावाच्या पट्ट्या वर्गात प्रदर्शित करून मुलांना वाचण्यास सांगणे.
- शब्द वाचल्यावर मुलाने त्या वस्तूसमोर जाणे.
- कमीत कमीत 4 – 5 वस्तूची नावे सांगण्यास संधी देणे.
- ते शब्द गोष्टीमध्ये ओळखण्याची संधी देणे.
- चित्रासहीत नामफलक तयार करणे, कृतीच्या ठिकाणी/वेळेला मुलांनी ओळखून वाचण्यास संधी देणे.




इयत्ता 2 री व 3 री

- ➢ कथेमध्ये आलेल्या मुख्य शब्दांची नामपट्टी तयार करणे.
- ➢ लक्ष्यात ठेवा: या मागील कृतीमध्ये आलेले शब्द सोडून वेगवेगळी स्थळे , प्रसंगांमध्ये आलेले शब्द वापरून ही कृती करून घेणे.

</td></tr>
<tr><td></td><td></td><td>उद्देश पूर्वक लेखन</td><td>

- सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू वळण कौशल्य अभिवृद्धी. अक्षर ओळखणे.
- कृती 36: ठिपके जोड – अक्षर लिही ( लक्ष्य : 2) ECW-17<br>उद्देश:
  - सूक्ष्म स्नायू वळण कौशल्य अभिवृद्धी करणे.
  - अक्षर ओळखणे.
  - टिपक्यापासून अक्षर तयार करणे.
- साहित्य:वही,पेन्सिल,फळा, खडू
- पध्दत:

1. मुलांना ठिपके वापरून ब,द,क,म,ळ लिहिण्याची पध्दत लिहून दाखविणे.
2. मुलांना ब,द,क,म,ळ या अक्षरांचे ठिपके जोडण्यास सांगणे.

इयात्तावर विवरण :<br>
इयत्ता 2 री च्या मुलांना वर्णमालेतील कोणत्याही 5 अक्षरांचे ठिपके जोडून अक्षरे लिहिण्यास सांगणे. इयत्ता 3 री च्या मुलांना तुम्हाला समजलेल्या कोणत्याही 5 शब्दांचे ठिपके जोडून शब्द लिहिण्यास सांगणे. ( 45 दिवसाच्या पुढील भाग )

</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td>

लेखनाचा नमुना:

- ➢ शिक्षकानीमुलांच्या समोर फळ्यावर लिहिणे.
- ➢ लेखनाचा योग्य क्रम मुलांना दिसेल याची संधी देणे.
- ➢ मुलांचे नाव, मुलांनी काढलेल्या चित्राचे नाव इत्यादी मुलांसमोर फळ्यावर लिहिणे.
- ➢ शिक्षकानी वर्गामध्ये जे काही लिहितात ते मुलांच्या समोर लिहिणे.

</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">मैदानी खेळ</td><td>

कृती: 19 ओढणे, वाकविणे , फिरविणे.<br>
सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू वळण कौशल्य अभिवृद्धी,आकृतीबंधाची जाणीव, शरीराचा समतोल,पायांची जोडणी<br>
साहित्य : ..................<br>
पध्दत:

1. जमिनीवर रेषा मारणे .
2. मुलांना एक खेळ करून दाखविणे. उदा. RUN JUMP . ही कृती सांगत असताना खेळ सुरु करणे.

</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | 3. दुसरीच्या व तिसरीच्या मुलांना रन रन जंप असे सांगत खेळ खेळविणे. |
| | रंजक कथा<br>(कथेची वेळ) | ● शीर्षक: निळ्या रंगाचा कोल्हा<br>● साहित्य: जंगली प्राण्याच्या चित्राचा तक्ता<br>● उद्देश:<br>● ऐकण्याचे सामर्थ्य वाढविणे.<br>➢ एकाग्रता केंद्रित करणे.<br>➢ ओघळपणे बोलण्याचे कौशल्य वाढविणे.<br>➢ अभिव्यक्ती सामर्थ्य वाढविणे.<br>➢ प्रश्न विचारण्याची वृत्ती वाढविणे.<br>➢ सृजनशीलतेची अभिवृद्धी करणे.<br>पध्दत:<br>**चित्रकथा**<br>निळ्या रंगाचा कोल्हा या चित्र कथेचा तक्ता प्रदर्शन करून कथा सांगण्यास सांगणे . येथे चित्र पाहून एकेक ओळीची एकेकट्याने रचना करण्यास प्रेरित करणे. शेवटी शिक्षकांनी पुन्हा एकदा हीच कथा व्यवस्थित करून सांगणे.<br>( मुले कथेचा आनंद घेण्याबरोबर ऐकत आहेत कि नाही याची खात्री करून घेणे.) |
| | पुन्हा भेटू | ● या दिवशी केलेल्या कृती शक्य तितक्या लवकर पुनरावर्तीत करणे.<br>● या दिवसात केलेल्या कृती सहकारी किंवा पालकासोबत करण्यास सांगणे.<br>● मुलांना आनंद वाटेल अशा कृती घ्या.<br>● उदा. म अक्षरापासून सुरु होणाऱ्या घरातील वस्तूंची नावे लक्षात ठेऊन घेऊन सहकाऱ्यासोबत चर्चा/खेळ खेळण्यास सांगणे.<br>● मागे घडलेला एखादा सुखदायक प्रसंग/घटना सांगण्यास सांगणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा - 7** **दिवस – 40 (गुरुवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 40 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे | ● कृती : 1<br>● साहित्य: पक्ष्यांची चित्रे / खेळणी<br>● पध्दत: दिवस 39 मध्ये नमूद केलेल्या शुभेच्छा विनिमय कृतींची पुनरावर्ती करा.<br>● कृती : 2 TPR<br>1. मुलांना गोलाकार उभे करा. सूचना सांगून त्यांचे पालन करण्यास सांगा. |

| | | |
|---|---|---|
| | हितगुज) | 2. साध्या TPR सूचना द्या.<br>उदा. घोड्यासारखे पळ.<br>मोरासारखे ओरड .<br>हरणासारखे उड्या मार. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती : स्वच्छता (Hygiene Charades)<br>सामर्थ्य : आत्मचेतना, तोंडीभाषा अभिवृद्धी, शब्द संपत्ती वाढविणे.<br>साहित्य: दैनंदिन नित्य कामांची चित्र कार्ड.<br>पध्दत:<br>मुलांना गोलाकार उभे करा.<br>दात घासणे,हात धुणे इत्यादी आरोग्यदाई सवयींची चित्रे पसरवून ठेवा.<br>मुलांना एकेक करून आमंत्रित करा आणि एकेक चित्र कार्ड घेण्यास सांगा.<br>एक ही शब्द न वापरता वरील स्वच्छता सवयींचा अभिनय करण्यास सांगणे.कोणत्या क्रियेचा अभिनय चाललेला आहे. याचा अंदाज इतर मुलांनी लावणे.<br>नंतर अभिनय केलेल्या मुलाने त्या विशिष्ट क्रीयाबद्दल बोलावे.<br>उदाहरण : दात घासणे, हात धुणे.इ.<br>सर्व मुलांना बोलायला संधी द्या आणि संकेत देऊन उत्तरे ओळखण्यास सांगा. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुले अध्ययन कोपऱ्यात जावून आपल्या आवडीच्या कृती करणे. शिक्षकानी मार्गदर्शकाचे कार्य करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | • सामर्थ्य: फळाबद्दल माहिती देणे. आरोग्यदायी आहाराच्या सवयी लावणे.<br>• कृती 39 : फळांबद्दल जाणून घेणे .( विकासात्मक ध्येय-3)<br>• उद्देश: आरोग्यदायी आहार सवयीमध्ये फळांचे महत्व माहीती करून घेणे.<br>• साहित्य: विविध रंगाचे कागद , कात्री<br>• पध्दत:<br>1. फळांबद्दल काही प्रश्न विचारून तासाला सुरुवात करणे.<br>उदा. तुम्ही खाणाऱ्या फळाची नावे सांगा?<br>तुमचे आवडते फळ कोणते?<br>2. मुले त्यांना आवडणाऱ्या फळाचे चित्र काढून रंग भरतात. कात्रीच्या सहाय्याने योग्य आकारात कापतात. मुलाच्या डोक्यावर असलेल्या कागदी पट्टीवर चित्र चिकटवून किरीट तयार करतात.<br>3. फळे आणि पालेभाज्या खाण्यासाठी मुलांना प्रोत्साहित करणे.<br>इ. 2 री साठी : फळांचे चित्र काढून आवडता रंग भर.<br>इ. 3 री साठी: तुमच्या आवडत्या फलाबद्दल माहिती सांगा. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू | • सामर्थ्य: स्थूल आणि सूक्ष्म स्नायू वळण कौशल्याची अभिवृद्धी करणे .<br>• कृती : 31 नृत्य ( लक्ष्य 1) |

<table>
<tr>
<td rowspan="3"></td>
<td colspan="2">चलन कौशल्ये (मुलांची कृती)</td>
<td>• साहित्य: संगीत / संगीत वाद्य<br>• उद्देश:<br>➢ स्थूल आणि सूक्ष्म स्नायूच्या वाढीस मदत करणे.<br>➢ संगीत वाद्यांची ओळख करून देणे.<br>➢ सौन्दर्योपासनेच्या विकासाबरोबर एकाग्रता वाढविणे.<br>• पध्दत:<br>1. मुलांना गोलाकार उभे करावे.<br>2. संगीत/ तालानुसार नृत्य करण्यास सांगणे.<br>2 री व 3 री साठी : वरील कृती करण्यास प्रोत्साहित करणे.</td>
</tr>
<tr>
<td rowspan="2">भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता</td>
<td>ऐकणे व बोलणे</td>
<td>• सामर्थ्य: ध्वनी संकेतांची ओळख, अक्षर शब्द परस्पर संबंध ओळखणे.<br>• कृती 20 : नावाच्या पहिल्या अक्षरापासून वस्तूंची नावे शोधणे.( विकासात्मक ध्येय-2 ) ECL – 2 ( 22 व्या दिवसापासून चालू ठेवणे.)<br>• उद्देश:<br>➢ ध्वनी संकेताबद्दल जागरूकता वाढविणे.<br>➢ अक्षरे आणि शब्दामधील परस्पर संबंध समजून घेणे.<br>➢ शब्द समजून घेऊन ओळखणे.<br>➢ अंताक्षरी शब्द लिहिणे.<br>• साहित्य: नाही<br>• नमुन्यादाखल विषय : भाज्या<br>• पध्दत:<br>कोड्याच्या रुपात भाज्यांची नावे ओळखून सांगण्याची कृती घेणे.उदाहरात माझ्या मनातील भाजीचा रंग जांभळा असून . त्याचे नाव ‘वां’अक्षरापासून सुरु होते.असे सांगितल्यानंतर मुले ‘वांगे’ म्हणून ओळखतात. अशी वेगवेगळी उदाहरणे देणे.<br>2 री व 3 री साठी: शब्दांचा पुढील भाग म्हणून मुलांना वाक्य रचना करण्यास सांगणे. ( 46 दिवसापासून चालू ठेवणे)<br>वापरावयाच्या सराव वोर्कशीट : EC-10 (इ. 01, 02,03 री.)</td>
</tr>
<tr>
<td>आकलना सहीत वाचन</td>
<td>• सामर्थ्य: ध्वनी विज्ञानाबद्दल जागरुकता, निरीक्षण आणि ऐकणे, शब्दसंपत्तीचा विकास करणे.<br>• कृती 21 : शब्द शोध ( लक्ष्य – 2)<br>• उद्देश:<br>➢ गोष्टीतील शब्दामधील ध्वनी ओळखणे.<br>➢ साहित्य: FLASH CARD, फळा.<br>पध्दत:<br>1. शिक्षकाने कोणतीही एक कथा सांगणे.<br>2. त्या गोष्टीमध्ये येणारे महत्वाचे शब्द FLASH CARD / फळ्यावर लिहून प्रदर्शन करून मुलांना एक आठवडा पाहण्यास संधी देणे.<br>3. ही कथा सांगताना किंवा दुसरी कथा सांगताना ते शब्द आल्यास त्यांची ओळख करून देणे.</td>
</tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | | | इ. 2 री व 3 री साठी: शिक्षकाने गोष्टीत येणारे बाराखडी शब्द आणि जोड शब्द चार्टमध्ये लिहून प्रदर्शित करणे व मुलांना ओळखायला सांगणे. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | • सामर्थ्य: उद्देशपूर्वक लेखन,निरीक्षण ,सृजनशील चिंतन, परिसर जाणीव<br>• कृती: ३५ हवामान नकाशा ( विकासात्मक ध्येय-2) ECW 16 ( ३३ व्या दिवसापासून प्रारंभ )<br>• उद्देश:<br>➢ उद्देशीत लेखनाच सराव करणे.<br>➢ निरीक्षण कौशल्याचा विकास करणर.<br>➢ सृजनशील विचाराना प्रोत्साहन देणे.<br>➢ परिसरची जाणीव निर्माण करणे.<br>साहित्य: कागद,पेन्सिल.<br>पध्दत:<br>1. मुलांशी आठवड्याच्या वारांबद्दल चर्चा करणे.<br>2. आठवड्याच्या वारांची यादी प्रदर्शित करणे.<br>3. वर्गातील हवामान नकाश्याच्या मदतीने ढग, पाऊस ,ऊन , थंडी ,वादळ इ. हवामानाच्या घटकांचा परिचय करून देणे.<br>4. गट कृती दरम्यान दिवसाच्या हवामानाचे निरीक्षण करणे.<br>2 री व 3 री साठी : मुलांनी त्यांच्या पुस्तकातील हवामान तक्त्यात आपली निरीक्षणे नोंद करणे. (46 दिवसापासून चालू ठेवणे) |
| | | | लिखानाचा नमुना:<br>शिक्षकांनी मुलांसमोर मुलाचे ,मुलांनी काढलेल्या चित्राचे नाव इ फळ्यावर लिहिणे.लिहिण्याचा योग्य क्रम मुलांना पाहण्यास देणे.<br>तसेच जे काही फळ्यावर लिहितात ते सर्व मुलांच्या समोर लिहिणे. |
| | मैदानी खेळ | | कृती: उड्या मारणे, टाळ्या वाजविणे,वळविणे<br>सामर्थ्य: स्थूल स्नायू वळण कौशल्य वाढविणे. फरकाची जाणीव, शरीराचा समतोल, पायांची हालचाल<br>पद्धत :<br>1. मुलांना वर्तुळाकार उभे करणे.<br>2. शिक्षकाने एक कृती मुलांना करून दाखविणे. उदा. हात वर – हात खाली<br>3. ही कृती सांगत खेळाला सुरवात करणे.<br>2 री व 3 री साठी : हात वर – हात खाली ही कृती सांगत खेळाला सुरवात करणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शिर्षक : निळ्या रंगाचा कोल्हा<br>साहित्य: मुखवटे<br>उद्देश :<br>• ऐकण्याचे सामर्थ्य वाढविणे.<br>• एकाग्रता वाढविणे.<br>• सरळ बोलण्याचे कौशल्य वाढविणे. |

| | | |
|---|---|---|
| | | ● अभिव्यक्ती सामर्थ्य वाढविणे.<br>● प्रश्न विचारण्याची मनोभावना वाढविणे.<br>● सृजनशिलतेची अभिवृद्धी करणे.<br>● तसे झाल्यास? तसे झाले नसते तर? इ. संदर्भांना जोडण्याचे कौशल्य वाढविणे.<br>● मुल्ये जोपासणे.<br>पद्धत:<br>**मुखवटे**<br>1. गोष्टीला संबंधित मुखवटे वापरून 'रंजक कथा (कथेची वेळ)' मनोरंजनात्मक करणे.<br>2. मोठ्या मुलांच्या सहाय्याने गोष्टीतील पात्रे त्यांना देऊन अभिनय करण्यास प्रोत्साहन देणे.<br>3. कथा ऐकल्यानंतर सरळ प्रश्न विचारा. |
| | पुन्हा भेटू | ● या दिवशी केलेल्या कृती शक्य तितक्या लवकर पुनरावर्तीत करा.<br>● या दिवसात केलेल्या कृती पालकासोबत करण्यास सांगणे.<br>● मुलांना आनंद वाटेल अशा कृती घ्या.<br>● उदा. क अक्षरापासून सुरु होणाऱ्या घरातील वस्तूंची नावे लक्षात ठेऊन घेऊन सहकाऱ्यासोबत चर्चा/खेळ खेळण्यास सांगणे.<br>● मागे घडलेला एखादा सुखदायक प्रसंग/घटना सांगण्यास सांगणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 7

## दिवस – 41 (शुक्रवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 41 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | ● कृती : फळांचे चित्र/ खेळणी<br>● वेळ: 5 मिनिटे<br>● पद्धत:<br>1. मुलांना वर्गाबाहेर एका ओळीत उभे करा.<br>2. फळांची चित्रे एकेक करून दाखवा. (शिक्षकांनी वर्गाच्या दरवाजावर थांबावे).<br>3. चित्र पाहून त्या फळाचे नाव सांगत वर्गात प्रवेश करण्यास सांगणे. उदा. मी, मी सफरचंद. रंग माझा लाल.<br>4. मुले वर्गात प्रवेश करताना शिक्षकांनी मुलांना गुड मॉर्निंग, नमस्ते म्हणून शुभेच्छा देणे.<br>5. वर्गात प्रवेश केल्यावर गोलाकार उभे राहण्यास सांगणे.<br>6. मुलांना विचारा, आज कोणता वार? आणि आज .............<br>7. असे प्रश्न विचारून मुलांना प्रतिक्रियात्मक बनवा.<br>कृती :2 |

| | | |
|---|---|---|
| | | हवामानाचा नकाशा याची कृती करून घ्या. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | • कृती : Story Talk<br>• सामर्थ्य : आत्म चेतना,तोंडीभाषा अभिवृद्धी, शब्द संपत्ती वाढविणे.<br>• साहित्य: दैनंदिन नित्य कामांची चित्र कार्ड<br>• पध्दत:<br>1. चित्र कार्डे एकावर एक अशी पकडून रीनाच्या दैनंदिन दिनचर्येबद्दल कथा सांगणे.<br>उदा. रीना सकाळी लवकर उठून दात घासते. नंतर अंघोळ करते.......<br>2. मुलांना गोलाकार बसवून चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी सरळ प्रश्न विचारणे.<br>उदा. तुम्ही उठल्याबरोबर प्रथम काय करता?<br>तुमची पुढील कृती कोणती? इत्यादी...<br>3. मुलांना आपली दिनचर्या मौखीकपणे पट्टी करण्यास मदत करणे.<br>4. आपली दिनचर्या आपणाला बलशाली व निरोगी ठेवण्यास मदत करते याचे विवरण देणे.<br>सर्व मुले गटातील चर्चेमध्ये सहभागी झाले आहेत का याची खात्री करून घेणे. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | शिक्षक मुलांना कोपरा उपक्रमांची ओळख करून देतील आणि शिकण्याच्या तयारीचा भाग म्हणून 8 कोपऱ्यांमधील सामग्रीचा वापर करणे. मुलांना प्रश्न विचारून त्यांची समज सुनिश्चित करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | • सामर्थ्य: समस्यांचे निराकरण , तार्किकता<br>• कृती 11 आणि 11 अ.: "चिंतन पेटी " ( विकासात्मक ध्येय-3)<br>• उद्देश : क्रमवार जोडणे.<br>• साहित्य: कासव आणि कोल्ह्याच्या चित्रांची कार्डे<br>• पध्दत: कोल्हा आणि कासवाची कथा<br>एका सकाळी कोल्हा फार भुकेलेला होता. तो जंगलामध्ये आहार शोधत होता. अचानकपणे कोल्ह्याला कासव फिरत असलेला दिसला. त्याने कासवाला खायचे ठरविले. पळत येऊन त्याने कासवाला पकडले. कासवाला खाण्यासाठी त्याची पाट फोडण्याचा प्रयत्न केला पण ते शक्य झाले नाही. कासव फार हुशार होते. त्याने कोल्ह्याला सांगितले प्रिय कोल्होबा मला खाण्यासाठी प्रथम मला पाण्याच्या विहिरीमध्ये सोडायला पाहिजे.त्यामुळे माझी पाठ मऊ होईल. तेव्हा तू मला सहज पणे फोडून खाऊ शकशील. तेव्हा मूर्ख कोल्ह्याने कासवाला पाण्यामध्ये सोडले.कासव वेगाने पाण्यामध्ये शिरले आणि कोल्ह्याकडे पाहून हसू लागले.<br>आता प्रश्न विचार.<br>उदा. कासवाने कशाप्रकारे आपली सुटका करून घेतली?<br>• कृती: 11 अ – क्रमवार जोडा.<br>मुलांना चित्र कथेची कार्डे क्रमवार जोडण्यास सांगणे. विवरण करण्यास सांगणे.<br>इ. 2 री साठी – कथा ऐकल्यानंतर सरळ व साधे प्रश्न विचारणे.उदा. या कथे मध्ये आलेल्या प्राण्यांची नावे सांगा.<br>इ. 3 री साठी - या कथेतून तुला कोणते मूल्य समजले? |
| | सृजनात्मक कला आणि | • सामर्थ्य: स्थूल आणि सूक्ष्म स्नायू वळण कौशल्याची अभिवृद्धी.डोळे हात यांचा समन्वय. |

<table>
<tr>
<td rowspan="3"></td>
<td colspan="2">सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती)</td>
<td>
• कृती: 35 क्ले/माती आणि मळलेल्या पिठापासून साचा तयार करणे.( विकासात्मक ध्येय-1)<br>
• उद्देश:<br>
➢ सूक्ष्म स्नायूंचा विकास करणे.<br>
➢ डोळे व हात यांच्यामध्ये समन्वय साधणे.<br>
➢ आपल्या कल्पनेतील आकृती साकारणे व त्याच बरोबर सृजनशील अभिव्यक्ती वाढीस सहाय्य करणे.<br>
• साहित्य:<br>
क्ले / मळलेले पीठ<br>
• पध्दत:<br>
1. मुलांना क्ले / माती / पिठापासून आपण निवडलेले साचे (model) तयार करण्यास सांगणे.<br>
2. सणामध्ये उपयोगी होणाऱ्या वस्तू तयार करून रंग लावण्यास सांगणे.<br>
3. वस्तू तयार करताना आपण निरीक्षण करणे.<br>
4. मुलांना विविध वस्तू तयार करण्यास साचे देणे.<br>
5. कृतीमध्ये विविधता आणण्यास कड्या स्ट्रो, लहान दगड, चीप देवू शकतो.<br>
○ इ. 2 री व 3 री साठी: सण समारंभ व स्वयंपाक घरातील उपकरणे तयार करण्यास प्रोत्साहित करणे.
</td>
</tr>
<tr>
<td rowspan="2">भा षा वि का स आ णि पा याभू त साक्ष रता</td>
<td>ऐकणे व बोलणे</td>
<td>
• सामर्थ्य: शब्द संपत्तीचा विकास, अंदाज लावणे,गटातील सहकार्यासोबत सहकारपूर्ण काम, सूचनांचे पालन<br>
• कृती : वस्तूंचा अंदाज लावणे ( लक्ष्य) ECL-7<br>
• उद्देश:<br>
➢ योग्य शब्द रचणे.<br>
➢ सांघिक मनोभावना वाढीस लावणे.<br>
➢ सूचना लक्ष्य देऊन ऐकून त्यांचे पालन करणे.<br>
➢ शब्द संपत्तीचा विकास करणे.<br>
• साहित्य: पिशवी, उपलब्ध वस्तू<br>
• पद्धत : वर्गातील खडू,रबर, चुना, डस्टर, डाईस,इ. वस्तू एका पिशवीत घालुन एका मुलाला बोलावून पिशवीतील एका वस्तूला स्पर्श करून वस्तू ओळखण्यास सांगणे.<br>
उदा.<br>
• तू स्पर्श केलेली वस्तू लहान आहे कि मोठी ?<br>
• तु स्पर्श केलेल्या वस्तुचा आकार कसा आहे?<br>
• ती वस्तू कशापासून बनविली आहे?<br>
• तू स्पर्श केलेली वस्तू घट्ट कि मऊ आहे?<br>
• ती वस्तू कोणती आहे? असे प्रश्न विचारून उत्तरे मिळावा.<br>
मुलांनी ओळखलेल्या वस्तू बद्दल चर्चा करा.<br>
इ. 2 री साठी: ओळखलेल्या वस्तूबद्दल 3-4 ओळीत बोलणे.<br>
3 री साठी: ओळखलेल्या वस्तूबद्दल 2-3 मिनिटे बोलणे.
</td>
</tr>
<tr>
<td>आकलना</td>
<td>
• सामर्थ्य: शब्द ओळखणे , छापील मजकुराची ओळख, आकलन, परिसराचे जाणीव, शब्द संपत्तीची अभिवृद्धी.
</td>
</tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | | सहीत वाचन | • कृती 18:<br>चित्र संचयीका ( लक्ष्य 2) विषय : फक्त प्राणी संग्रहालयात आढळणाऱ्या वस्तू<br>• उद्देश:<br>➢ चित्र मधील वस्तू/व्यक्ती/घटना नाव देऊन प्रतिमेशी निगडीत अर्थ लावणे.<br>➢ मुले चित्रे वाचतात.<br>➢ चर्चा करून अर्थ समजून घेतात आणि व्यक्तिगत चित्र संचयीका तयार करतात.<br>➢ व्यक्तिगत रित्या आणि गटामध्ये चर्चा करतात.<br>➢ गटामध्ये बसून भित्तीपत्रक तयार करतात.<br>• साहित्य: मुलाने काढलेली चित्रे<br>• पध्दत: मुलांनी फक्त प्रनिसंग्रालयात आढळणाऱ्या वस्तूसंबंधित काढलेली चित्रे चित्र संचायीकेतून घेऊन त्याबद्दल सहज बोलण्यासाठी प्रोत्साहित करणे.शिक्षकाने 2 री व 3 री च्या मुलांना 1 ली च्या मुलासोबत परस्पर सहाय्याने वागण्यास सांगणे. आणि विषयावर आधारित चर्चा करुन २ री व 3 री च्या विध्यार्थ्यांना स्वतंत्रपणे बोलण्याची संधी देणे.<br>( सदर कृतीचा पुढील भाग 43 व्या दिवसानंतर चालू ठेवणे)<br>सराव पत्रिका EC-11 (इयत्ता 1, 2, 3) |
| | | उद्देश पूर्वक लेखन | • सामर्थ्य: मुलांकडून लेखन, उद्देशपूर्वक लेखन, लक्ष देणे आणि ऐकणे, सृजनशील चिंतन, शब्द संपत्ती वाढविणे.<br>• कृती: सामायिक लेखन ( विकासात्मक ध्येय-2) ECW-8<br>• उद्देश:<br>➢ सामायिक लेखनाचा परिचय करून देणे.<br>➢ उद्देशानुसार लेखनाच्या क्रमाचा सराव करून घेणे.<br>➢ लक्षपूर्वक उद्देशीत लेखनात गुंतवून ठेवणे.<br>➢ सृजनात्मकरित्या विचार करून ते लेखनव्दारे व्यक्त होणे.<br>➢ शब्द संपत्तीचा विकास करणे.<br>• साहित्य: फळा, DRAWING SHEET.<br>• पद्धत: सामायिक लेखनाची कृती महिन्यातून दोन ते तीन वेळा आयोजित करणे. कोणताही एक विषय घेऊन त्या विषयाला संबंधित आपले अनुभव कथा किंवा लिखानाच्याद्वारे मुलांना व्यक्त होण्यास सांगणे .<br>उदाहरण:<br>• माझे गाव<br>• चहा करण्याची पद्धत<br>• आवडता खेळ इ.<br>लक्ष्यात ठेवायच्या गोष्टी:<br>➢ प्रत्येक विषयाला संबंधित वाक्ये बनविण्यासाठी आवश्यक सूचना देणे.<br>➢ शिक्षकांनी पहिले वाक्य लिहून वाचणे. नंतर मुलांनी स्वत: चे वाक्य लिहून वाचण्यास सांगणे.<br>➢ मुलांना आपल्या मातृ भाषेत प्रतिक्रिया देण्यास सांगणे.त्यानंतर शिक्षकांनी ते वाक्य प्रमाण भाषेत |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सांगणे.<br>इयत्ता 2 री व 3 री साठी: 1 ली च्या मुलांनी सांगितलेले वाक्य 2 री व 3 री च्या मुलाना लिहिण्यास सांगणे. |
| | | | लेखानाचा नमुना:<br>शिक्षकांनी मुलांसमोर मुलाचे ,मुलांनी काढलेल्या चित्राचे नाव इ. फळ्यावर लिहिणे.लिहिण्याचा योग्य क्रम मुलांना पाहण्यास देणे.<br>तसेच जे काही फळ्यावर लिहितात ते सर्व मुलांच्या समोर लिहिणे. |
| | मैदानी खेळ | | • कृती: उड्या मारणे, टाळ्या वाजविणे,वळविणे<br>• सामर्थ्य: स्थूल स्नायू वळण कौशल्य वाढविणे. फरकाची जाणीव, शरीराचा समतोल, पायांची हालचाल<br>• पद्धत : मुलांना वर्तुळाकार उभे करणे.<br>1. शिक्षकाने आत व बाहेर उडी मारण्याचे दाखविणे. मुलांना अनुकरण करून दाखविणे.<br>2 री व 3 री साठी : मुलानी हाच खेळ खेळणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | • शिर्षक : निळ्या रंगाचा कोल्हा<br>• साहित्य: मुखवटे<br>• उद्देश :<br>➢ ऐकण्याचे सामर्थ्य वाढविणे.<br>➢ एकाग्रता वाढविणे.<br>➢ सरळ बोलण्याचे कौशल्य वाढविणे.<br>➢ अभिव्यक्ती सामर्थ्य वाढविणे.<br>➢ प्रश्न विचारण्याची मनोभावना वाढविणे.<br>➢ सृजनशिलतेची अभिवृद्धी करणे.<br>➢ तसे झाल्यास? तसे झाले नसते तर? इ. सदर्भाना जोडण्याचे कौशल्य वाढविणे.<br>➢ मुल्ये जोपासणे.<br>• पद्धत :<br>**पात्राभिनय**<br>➢ गोष्टीचे पुनरावलोकन करणे<br>➢ कथा सांगण्यासाठी 2 री व 3 री च्या मुलांना मदत करणे.<br>➢ मुलांचे संभाषण स्पष्ट नसेल तर ते सकारात्मकपणे स्वीकारून त्यानंतर ते दुरुस्त करून कथा पूर्ण करण्यास सांगणे. |
| | पुन्हा भेटू | | या दिवशी केलेय कृती शक्य तितक्या लवकर पुनारावार्तीत करा.<br>• या दिवसात केलेल्या कृती पालकासोबत करण्यास सांगणे.<br>• मुलांना आनंद वाटेल अशा कृती घ्या.<br>• उदा. क अक्षरापासून सुरु होणाऱ्या घरातील वस्तूंची नावे लक्षात ठेऊन घेऊन सहकाऱ्यासोबत चर्चा/खेळ खेळण्यास सांगणे.<br>• मागे घडलेला एखादा सुखदायक प्रसंग/घटना सांगण्यास सांगणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा - 7** **दिवस – 42 (शनिवार)**

| | |
|---|---|
| प्रतिबिंब (वर्गातील निरंतर मूल्यमापन) | • विविध तंत्र वापरून (निरीक्षण, तपशील पट्टी, मुलांची अध्ययन पत्रके, व्हिडीओ, सांदर्भिक नोंदी, इत्यादी) तुम्ही संग्रह केलेल्या मूल्यमापन नोंदी/माहिती यांचे पुनरावलोकन करणे.<br>• प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिगत गरजेनुसार पुढील आठवड्यातील अध्ययन प्रक्रियेची योजना आखणे.<br>• अध्ययनाच्या तिन्ही विकासात्मक ध्येयांच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे. |

# माझी प्रगती-4

**आठवडा - 7** **दिवस – 42 (शनिवार)**

| प्राप्त केलेल्या अध्ययन निष्पत्ती | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती | क्वचित | कधीतरी | नेहमी |
| 1 | आरोग्य आणि स्वच्छतेच्या सवयींचा अवलंब करतो/ करते. | | | |
| 2 | आरोग्यदाई आहार पद्दतींचा अवलंब करतो/ करते. | | | |
| 3 | नृत्य आणि नाटकामध्ये भाग घेतो/ घेते. | | | |
| 4 | लयबद्द आणि बालगीते गाण्याचा आनंद लुटतो/ लुटते. | | | |
| 5 | कागदांना सरळ किंवा ओरिगामी प्रमाणे घडी घालतो/ घालते. | | | |
| 6 | आरोग्यदाई स्वच्छतेच्या सवयींचा अवलंब करतो/ करते. | | | |
| 7 | इतरांसोबतचे सामाजिक संबंध अभिव्यक्त करतो/ करते. | | | |
| 8 | संदर्भानुसार आपल्या भावना व्यक्त करतो/ करते. | | | |
| 9 | कोणत्याही घटना / दृश्य लहान लहान वाक्यामध्ये विवरण करतो/ करते आणि पुन्हा सांगतो/ सांगते. | | | |
| 10 | शब्दांच्या सुरुवातीची आणि शेवटची अक्षरे ओळखतो/ ओळखते. | | | |
| 11 | अक्षरे ओळखतो/ ओळखते, एकत्रित करतो/ करते आणि विभाजित करतो/ करते. | | | |
| 12 | लेखन साधनांचा योग्य वापर करतो/ करते. | | | |
| 13 | आरोग्यकारक सवयींचा सराव करतो/ करते. | | | |
| 14 | गट चर्चेमध्ये भाग घेतो/ घेते. | | | |
| 15 | गट चर्चा करताना नेतृत्व करतो/ करते. | | | |
| 16 | शिशुगीत / गाण्यामध्ये सहभागी होतो/ होते. | | | |
| 17 | इतरांबरोबर सामाजिक संबंध स्थापन करण्याचा प्रयत्न करतो/ करते. | | | |
| 18 | मार्गदर्शन असताना साध्या नैसर्गिक घटनांचे निरीक्षण आणि अन्वेषण करतो/ करते. | | | |
| 19 | विविध आकार ओळखून नावे देतो/ देते. (वर्तुळ, त्रिकोण, चौकोन, आयत) | | | |
| 20 | 2 ते 4 अडथळे असणारे पझल/ कोडे सोडवितो/ सोडविते. | | | |
| 21 | वर्गातील दिनचर्या आणि नियमांचे पालन करतो/ करते. | | | |
| 22 | प्रासयुक्त शब्द ओळखतो/ ओळखते. | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 23 | ध्वनी संकेतांचे संयोजन ओळखतो/ ओळखते. | | | |
| 24 | शब्द वाचण्याचा प्रयत्न करतो/ करते. | | | |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 8 दिवस – 43 (सोमवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 43 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | • कृती:1<br>एक-दो-एक/ 1-2-1 म्हणत ओळीने कदम ताल करत वर्गात प्रवेश करण्यास सांगणे.<br>• कृती :2<br>• साहित्य: टाळ्या मारणे, पाळणे , उड्या मारणे, बसणे, उभे राहणे इत्यादी क्रिया दाखविणारे कार्ड<br>• वेळ: 5 मिनिटे<br>• पध्दत:<br>मुलांना ओळीमध्ये उभे करणे.<br>कार्ड दाखवून कार्डातील क्रिया मुलांना करावयास सांगणे.<br>उदा. शिक्षकांनी टाळ्या मारण्याचे कार्ड दाखविल्यावर मुलांनी टाळ्या मारणे.<br>अशाप्रकारे इतर कार्डे दाखवून खेळ पुढे चालविणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | • सूचना: जास्त सूचना वापरू नका.<br>• कृती: माझी आवडती बाहुली<br>• साहित्य: विविध प्रकारच्या बाहुल्या.(कागदाची बाहुली,लाकडी बाहुली , TEDDYBEAR, कपड्याची बाहुली,लोकरीची बाहुली,काथ्यापासून बनविलेल्या बाहुली,स्थानिक उपलब्ध बाहुल्या)<br>• पध्दत:<br>➢ मुलांना अर्ध वर्तुळाकार उभे करणे.<br>➢ विविध प्रकारच्या बाहुल्या TRAY मध्ये ठेवा.<br>➢ मुलांना एकेक करून बोलावून त्यांना आवडणारी बाहुली उचलण्यास सांगा.<br>➢ नंतर त्यांनी घेतलेल्या बहुलीबद्दल अभिप्राय घेण्यासाठी काही प्रश्न विचार.<br>उदा.<br>○ ते काय आहे?<br>○ तीच बाहुली तु का उचललास?<br>○ तुम्ही हा खेळ कधी खेळला का?<br>○ ते तुला का आवडते?<br>○ ते तुला का आवडत नाही?<br>मुलांना त्यांच्या मातृ भाषेत उत्तरे देण्यास प्रोस्ताहित करा.<br>2 री व 3 री साठी : दिलेल्या प्रश्नावली व्यतिरिक्त हे प्रश्न वापरले जाऊ शकतात |

| | | |
|---|---|---|
| | | ○ तुम्ही निवडलेल्या बाहुली बरोबर कसे खेळाल?<br>○ तुम्ही स्वत: खेळणी तयार करता का?<br>○ तुम्ही ती कशी तयार करता?<br>○ तुम्हाला कोणाबरोबर खेळायला आवडते का? आणि का? |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुले अध्ययन कोपऱ्यात जावून आपल्या आवडत्या कृती करतात. शिक्षक मार्गदर्शकाचे कार्य करतात. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | ● सामर्थ्य:स्थळावकाशाची जाणीव<br>● कृती: 27 कोण कोठे आहे ? (विकासात्मक ध्येय-3)<br>● उद्देश: जवळ दूर संकल्पना दृढ करणे.<br>● साहित्य: वर्गात उपलब्ध असणारे साहित्य<br>● पध्दत:<br>एका मुलाला फळ्याकडे उभे राहण्यास सांगणे. त्याच्या शेजारी दुसऱ्याला उभे करा..(त्याला A असे नाव द्या) तिसऱ्या मुलाला फळ्यापासून दूर उभे करा. (त्याला B असे नाव द्या) A हा फळ्याजवळ उभ्या असलेल्या मुलाच्या जवळ आहे व B हा दूर आहे असे समजावून सांगणे. वेगवेगळ्या मुलांचा वापर करून वेगवेगळे गट करून समान कृती पुन्हा करा. वेगवेगळ्या मुलांच्या शेजारी शिक्षक उभे राहतात. माझ्या जवळ कोण ? माझ्यापासून दूर कोण?असे प्रश्न विचारून जवळ-दूर ची कल्पना देतात.<br>इ.2 री : 4 ते 5 मुलांना उभे करुय्न त्यांना A,B,C,D आणि E अशी नावे द्या.प्रश्न विचारून मुलांना जवळ-दूर ची कल्पना दृढ करा.<br>इ. 3 री : शाळेतील विविध वस्तू दाखवून दूर-जवळ काय आहे ते जाणून घ्या.<br>वापरायच्या कृती पत्रिका: l. L. -26,27,28 (इ. 1, 2, 3) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | ● सामर्थ्य: स्थूल आणि सूक्ष्म स्नायू वळण कौशल्याची अभिवृद्धी. डोळे हात यांचा समन्वय, आकाराची परिकल्पना.<br>● कृती : 33 A अक्षरावर गिरवा. ( विकासात्मक ध्येय-1 )<br>● उद्देश:<br>➢ सूक्ष्म स्नायूंचा विकास करणे.<br>➢ डोळे व हात यांच्यामध्ये समन्वय साधने<br>➢ मुळाक्षरे लिहिण्याची पुर्वसिद्धता कृती साध्य करणे.<br>साहित्य: वाळू , काठी<br>पध्दत:<br>मुलांना मुळाक्षरे लिहिण्याच्या क्रमानुसार गिरविण्यास सांगून त्या अक्षराशी संबंधित चित्र काढण्यास सांगणे. मुलांना स्वत:च्या नावातील अक्षरे लिहीण्यास प्रोत्साहित करणे.<br>इ. 2 री साठी: मुलांना समजलेले / माहित असलेले मराठी शब्द लिहिण्यास सांगणे.<br>इ. 3 री : मुलांना कोणत्याही अक्षरापासून सुरुवात होणारे शब्द लिहिण्यास सांगणे. उदा. क- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कप,कर,कळप,कमाल इ. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | • सामर्थ्य: ऐकणे,सृजनात्मकता,स्व-अभिव्यक्ती,औपचारिक भाषण,<br>• कृती 8: आशु भाषण (लक्ष्य – 2) ECL – 6<br>• उद्देश:<br>○ निवडलेल्या विषयावर अस्खलित बोलणे.<br>○ औपचारिक बोलण्याचे कौशल्य विकसित करणे.<br>○ ऐकलेल्या मुद्यावर त्यांचे मत तयार करणे.<br>○ सृजनशील अत्म-अभिव्यक्तीसाठी संधी देणे.<br>• साहित्य: प्राणी , पक्षी, वाहन याच्या चित्राच्या दृक पट्ट्या<br>• पध्दत: डब्यामध्ये प्राणी , पक्षी, वाहन याच्या चित्राच्या दृक पट्ट्या घालणे. मुलांना डब्यातील एक दृक पट्टी घेऊन त्याबद्दल बोलण्यास सांगणे.<br>इ. 2 री : निवडलेल्या चित्राबद्दल 2 ते 3 मिनिटे बोलण्यास सांगणे.<br>इ. 3 री: निवडलेल्या चित्राबद्दल दैनंदिन वापराबद्दल बोलणे. |
| | | आकलनासहीत वाचन | • सामर्थ्य: शब्द ओळखणे , छापील मजकुराची ओळख, आकलन, परिसराची जाणीव, शब्द संपत्तीची अभिवृद्धी.<br>• कृती 18:<br>चित्र संचयीका ( लक्ष्य 2)<br>विषय : फक्त प्राणी संग्रहालयात आढळणाऱ्या वस्तू<br>• उद्देश:<br>○ चित्रामधील वस्तू/व्यक्ती/घटना नाव देऊन प्रतिमेशी निगडीत अर्थ लावणे.<br>○ मुलाचे चित्रे वाचण्याचे कौशल्य वाढविणे.<br>○ चर्चा करून अर्थ समजून घेतात आणि व्यक्तिगत चित्र संचयीका तयार करणे.<br>○ व्यक्तिगत रित्या आणि गटामध्ये चर्चा करणे.<br>○ गटामध्ये बसून भित्तीपत्रक तयार करणे.<br>• साहित्य: मुलाने काढलेली चित्रे<br>• पध्दत:<br>मुलांनी फक्त प्राणीसंग्रालयात आढळणाऱ्या वस्तूसंबंधित काढलेली चित्रे चित्र संचयीकेतून घेऊन त्याबद्दल सहज बोलण्यासाठी प्रोत्साहित करणे.शिक्षकाने 2 री व 3 री च्या मुलांना 1 ली च्या मुलासोबत परस्पर सहाय्याने वागण्यास सांगणे. आणि विषयावर आधारित चर्चा करून २ री व 3 री च्या विध्यार्थ्यांना स्वतंत्रपणे बोलण्याची संधी देणे.<br>( सदर कृतीचा पुढील भाग ४३ व्या दिवसानंतर चालू ठेवणे.)<br>सराव पत्रिका EC-11 (इयत्ता 1, 2, 3) |
| | | उद्देशपूर्वक | • सामर्थ्य: मुलांकडून लेखन, उद्देशपूर्वक लेखन, लक्ष देणे आणि ऐकणे, सृजनशील चिंतन,परिसराची जाणीव, शब्द संपत्ती वाढविणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | लेखन | • कृती: 33 यादी करूया ( विकासात्मक ध्येय-2 ) ECW-10<br>• उद्देश:<br>➢ सामायिक लेखनाचा परिचय करून देणे.<br>➢ उद्देशानुसार लेखनाच्या क्रमाचा सराव करून घेणे.<br>➢ सृजनात्मकरित्या विचार करून ते लेखनव्दारे व्यक्त होणे.<br>➢ शब्द संपत्तीचा विकास करणे.<br>➢ परिसर जाणीव करून देणे.<br>➢ सूचना ऐकून अर्थ समजून घेणे.<br>• साहित्य: वही, कागद, क्रेयोन्स<br>• पध्दत: मुलांची शब्द संपत्ती वाढविण्यासाठी तसेच उद्देशीत लेखनाला संधी देण्यासाठी मुलांना विविध विषयासंबंधित शब्दांची यादी करण्यास सांगणे.<br>सूचित विषय: पाळीव प्राण्याची यादी<br>सर्व वर्गाला एकत्र करून एका चार्टपेपरवर पाळीव प्राण्याची यादी करण्याची कृती घेणे.या चार्टवर वापरलेल्या सामान्य शब्दांची यादी शिक्षकांनी तयार करावी आणि ते मुलांना पाहण्यास आणि वाचण्यास मदत होण्यासाठी वर्गात प्रदर्शित करा.<br>इ. 2 री: 1 ली च्या मुलांनी तयार केलेल्या यादीमध्ये दुसरीच्या मुलांनी आणखी शब्दांची भर घालावी.<br>3 रीच्या मुलांना यादीतील शब्द स्वतःच्या वाक्यात वापरण्यास संधी उपलब्द करून द्या. |
| | | | लेखनाचा नमुना:<br>शिक्षकांनी मुलांसमोर मुलाचे, मुलांनी काढलेल्या चित्राचे नाव इ फळ्यावर लिहिणे.लिहिण्याचा योग्य क्रम मुलांना पाहण्यास देणे.<br>तसेच जे काही फळ्यावर लिहितात ते सर्व मुलांच्या समोर लिहिणे. |
| | मैदानी खेळ | | कृती : चेंडूला लाथ मारणे.<br>सामर्थ्य : स्थूल आणि सूक्ष्म स्नायू वळण कौशल्याची अभिवृद्धी.गती संतुलन विकसित करणे.<br>साहित्य : हलका मोठा चेंडू<br>पध्दत :<br>➢ जमिनीवर सरळ रेषा मारण्यास सूचना देणे.<br>➢ मुलांना रांगेत उभे राहण्यास सांगणे.<br>➢ मुलांनी जमिनीवरील सरळ रेषेवरून पायाने चेंडूला लाथ मारून खेळ खेळावा.<br>2 री व 3 री च्या मुलांनी डाव्या व उजव्या पायाचा वापर करून चेंडूला लाथ मारण्याची सूचना देणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | • शीर्षक: कावळा आणि वाहतूक दिवे.<br>• साहित्य:गोष्टीचे साहित्य<br>• उद्देश :<br>ऐकण्याचे कौशल्य विकसित करणे.<br>विचार शक्ती वाढविणे.<br>• पध्दत:<br>**कथा कथन**<br>शिक्षकांनी कथा सांगण्यापूर्वी ती वाचून अर्थ समजून घेतला पाहिजे. |

| | | |
|---|---|---|
| | | कथा साध्या भाषेत सांगणे.<br>कथा सांगताना शिक्षकांनी वर्तुळात बसणे.<br>साधे प्रश्न विचारीत कथेचा अर्थ लावणे..<br>कथा:<br>एका वाहतूक दिव्याच्या बाजूला एक झाड होते.त्या झाडावर एक कावळा राहत होता.तो प्रत्येक दिवशी वाहतूक दिव्यांना पाहत होता.वाहने थांबत,जात होती हे पाहत होता.एक दिवस आपल्या सर्व मित्रांना त्याने बोलाविले.सर्वांना मीच राजा आहे असे सांगत होत.”राजा होण्यास तुझ्याकडे कोणती योग्यता आहे ?” असा प्रश्न सर्व कावळ्यांनी त्याला विचारला.तेव्हा त्याने माझ्याकडे एक विशेष शक्ती आहे असे सांगितले.ते दाखविण्यासाठी मंत्र पठण करण्याचे नाटक तो करत होता. “लाल दिवा पेटेल आणि सगळ्या गाड्या थांबतील” असे म्हणतो.लाल दिवा पेटताच सर्व वाहने थांबतात. हे पाहून इतर कावळ्यांना आश्चर्य वाटले. पिवळा दिवा पेटतच सर्व वाहने “बुर्रर्बुर्र” करत जाण्यासाठी सज्ज होतात. हिरवा दिवा पेटताच सर्व वाहने जातील असे कावळा म्हणतो. तेव्हाच हिरवा दिवा पेटताच वाहने जाऊ लागतात. हे पाहून इतर कावळ्यांना पुन्हा एकदा आश्चर्य वाटले. तेव्हा सर्व कावळ्यांनी मिळून त्या कावळ्याला राजा म्हणून जाहीर केले.<br>कथा सांगितल्यानंतर साधे प्रश्न विचाराने.<br>1. कावळ्याला कोणती इच्छा होती?<br>2. “राजा होण्यास तुझ्याकडे कोणती योग्यता आहे ?” असे कोणी विचारले? |
| | पुन्हा भेटू | • या दिवसातील कृतींचे स्मरण करा.<br>• या दिवसात केलेल्या कृती पालकासोबत करण्यास सांगणे.<br>• मुलांना आनंद वाटेल अशा कृती घ्या.<br>• साली सोलून आणि न सोलता खाणाऱ्या फळाबद्दल माहिती गोळा करा.<br>• मागे घडलेला एखादा सुखदायक प्रसंग/घटना सांगण्यास सांगणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 8 | दिवस – 44 (मंगळवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 44 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | 43 दिवसाची कृती घेणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक | 43 व्या दिवसाची कृती 2: माझी आवडती बाहुली ही कृती घेणे. |

| | | |
|---|---|---|
| | कृती) | |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुले अध्ययन कोपऱ्यात जावून आपल्या कृती करतात. शिक्षक मार्गदर्शकाचे कार्य करतात. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | • सामर्थ्य: आकृतींची परिकल्पना<br>• कृती: २६ आकृती ओळख आणि  नाव दे. (विकासात्मक ध्येय- 3)<br>• उद्देश: विविध आकृत्याबद्दल माहिती करून घेणे.<br>• साहित्य: विविध आकृत्या,  AUDIO PLAYER, TV इ.<br>• पध्दत:<br>1. मुलांना विविध आकृत्या देणे.<br>2. आकृतीबद्दल एखादे गीत / कविता म्हणणे किंवा गाणे लावणे.<br>3. मुलाना गाण्यात येणाऱ्या आकृत्त्या दाखवत गाणे म्हणण्यास सांगणे.<br>4. प्रत्येक मुलाने गाताना नमूद केलेल्या आकृत्याना स्पर्श करावा आणि नंतर मुलांना आकृतीबद्दल बोलण्यास प्रोत्साहित करा.<br>इ. 2 री : विविध आकृत्या देऊन त्यांची नावे सांगण्यास सुचविणे.<br>इ. 3 री : आकृत्या काढून रंग भरण्यास सांगणे.<br>वापरायच्या सराव पत्रिका: I.L. -29,30 (इ. 1, 2, 3) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | • सामर्थ्य: स्थूल आणि सूक्ष्म स्नायू वळण कौशल्याची अभिवृद्धी.डोळे हात यांचा समन्वय.आकाराची परिकल्पना.<br>• कृती : ३३ A अक्षरावर गिरवा. ( विकासात्मक ध्येय-1 )<br>• उद्देश:<br>➢ सूक्ष्म स्नायूंचा विकास करणे.<br>➢ डोळे व हात यांच्यामध्ये समन्वय साधने<br>➢ इंग्रजी मुळाक्षरे लिहिण्याची पुर्वसिद्धता कृती साध्य करणे.<br>साहित्य: वाळू, काठी<br>पध्दत:<br>मुलांना इंग्रजी मुळाक्षरे लिहिण्याच्या क्रमानुसार गिरविण्यास सांगून त्या अक्षराच्या आकाराला  चित्र बनविण्यास सांगणे. मुलांना स्वत:च्या नावातील अक्षरे लिहीण्यास प्रोत्साहित करणे.<br>इ. 2 री साठी: मुलांना समजलेले / माहित असलेले इंग्रजी शब्द लिहिण्यास सांगणे.<br>इ. 3 री : मुलांना कोणत्याही अक्षरापासून सुरुवात होणारे इंग्रजी शब्द लिहिण्यास सांगणे. उदा.  M- MAN, MANGO, MONKEY इ. |
| | भाषा वि — ऐकणे व बोलणे | • सामर्थ्य: ध्वनी विज्ञानाची जाणीव, शब्द संपत्तीचा विकास, चालना कौशल्याची अभिवृद्धी<br>• कृती: 15 प्रास शब्द ऐकणे.(विकासात्मक ध्येय -2 )ECL-4 (३८ व्या दिवसानंतर पुढे चालू)<br>• उद्देश: |

| | | | |
|---|---|---|---|
| | का<br>स<br>आ<br>णि<br>पा<br>या<br>भूत<br>सा<br>क्षर<br>ता | | ध्वनी विज्ञानाची जाणीव वाढविणे.<br>प्रास शब्दांद्वारे शब्द संपत्ती वाढविणे.<br>स्थूल आणि सूक्ष्म वळण कौशाल्यची अभिवृद्धी करणे.<br>● साहित्य: फळा,खडू.<br>● पध्दत:<br>प्रास शब्दांचे संच तयार करून ठेवणे..<br>मुलाचे गटामध्ये विभाजन करून आणि प्रत्येक गटाला प्रास शब्दांचा संच देणे.<br>प्रास शब्द वापरून शिक्षकांच्या मदतीने वेगवेगळी वाक्ये तयार करणे.<br>इ. 2 री व 3 री साठी : प्रास शब्दांच्या संचामधील शब्दांपासून वाक्ये तयार करतात.<br>56 व्या दिवसापासून सुरुवात. |
| | | आकलनासहीत वाचन | ● कृती: 1 चित्र वाच ( लक्ष्य – 2)<br>● सामर्थ्य: शब्द संपत्तीचा विकास, स्वं-अभिव्यक्ती,अभिनय वाचन<br>● साहित्य: विविध घटना,स्थळ,यात्रा,मेळावा यांचे चित्र, उद्यान/बाजारपेट/शाळा/प्राणी संग्रहालय/उत्सव इ. चित्रे.<br>● पध्दत: मुलांचा एक लहान व एक मोठा असे गट करणे.मुलांनी पाहिलेल्या चित्रांचे निरीक्षण करून त्याबद्दल विवरण देण्यास सांगणे. शिक्षकाने विविध वर्तमान पुस्तके, नियतकालिके इ. वापर करून याबद्दल विवरण देणे. स्पष्टीकरण देताना मुलांचे वय, अभिवृद्धीच्या आवश्यकता आणि मुलाच्या सभोवतालच्या वातावरणावर लक्ष्य केंद्रित करणे.<br>एखाद्या प्रसंगाबद्दल प्रश्न विचारताना मुलाला त्याच्या स्वत:च्या अनुभवाशी जुळून घेण्यास सांगणे. मुलाला प्रश्न विचारून संभाषणात गुंतवून ठेवल्याने दिलेल्या विषयावर लक्ष्य केंद्रित करण्यास आणि त्याचे स्वत:चे अनुभव सांगण्यास मदत होते. काही घटना दाखवून शिक्षकानी योग्य प्रश्न विचारत त्यांना प्रोत्साहित करणे.<br>काही घटना दाखवून शिक्षक खालील प्रमाणे प्रश्न विचारु शकतात.<br>➢ तुम्ही अशा ठिकाणी कधी गेला आहात का?<br>➢ ही परिस्थिती तुम्हाला कशाची आठवण करून देते.<br>➢ या चित्रातील लोक काय करत आहेत? इ |
| | | उद्देशपूर्वक लेखन | सामर्थ्य: हात-डोळे संयाजन, लेखनाचा सराव, सृजनशील अभिवृद्धी<br>कृती: 2 मुक्त चित्र रचणे. (विकासात्मक ध्येय -2) ECW-6<br>उद्देश:<br>○ लेखन कौशल्य प्रस्थापित करणे.<br>○ डोळा-हात समन्वय कौशल्याचा विकास करणे.<br>○ क्रियात्मक अभिवृद्दीला संधी देणे.<br>○ सृजन शील अभिवृद्धीला प्रात्साहन देणे.<br>साहित्य: क्रेयोन्स, रंगीत पेन्सिल, मार्कर, कागद,<br>पध्दत: कागदावर मुक्तपणे चित्र काढण्यासाठी/लिहिण्यासाठी, रंग भरण्यासाठी संधी द्या. काढण्याबद्दल बोलण्यास सांगणे. योग्य प्रश्न विचारून चित्राबद्दल माहिती मिळविणे.<br>2 री व 3 री साठी: मुलांनी त्यांना आवडणारेण चित्र/प्रसंग काढून त्याबद्दल 4-5 वाक्ये लिहिण्यास सांगणे. |
| | | | लेखनाचा नमुना: |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | शिक्षकांनी मुलांसमोर मुलाचे ,मुलांनी काढलेल्या चित्राचे नाव इ. फळ्यावर लिहिणे.लिहिण्याचा योग्य क्रम मुलांना पाहण्यास देणे.<br>तसेच जे काही फळ्यावर लिहितात ते सर्व मुलांच्या समोर लिहिणे. |
| | मैदानी खेळ | | कृती -17 विविध प्रकारचे चालणे.(विकासात्मक ध्येय -1)<br>सामर्थ्य: स्थूल आणि सूक्ष्म स्नायू वळण कौशल्याची अभिवृद्धी.डोळे हात यांचा समन्वय<br>पध्दत:<br>जमिनीवर विविध प्रकारच्या रेषा काढणे.उदा.सरळ,वक्र,वळणदार. मुलांना रेषेवर चालण्याची सूचना देणे. मुलांना रेषेवरून सावकाश किंवा वेगाने पुढे किंवा मागे चालण्यास सूचना देणे .वर्तुळ काढा आणि वर्तुळात गोलाकार फिरत गाणे गाण्याची सूचना देणे.<br>2 री व 3 री : ही कृती पुढे चालविणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | मागील दिवसाच्या सामर्थ्यानुसार कृती पुढे चालविणे.<br>**कथा कथन**<br>शिक्षक कथा सांगण्याबरोबर मुलांची मदत घेऊन कथा पूर्ण करतात.<br>उदा.<br>• या पुढे काय होईल?<br>• नंतर कोणी काय म्हटले?<br>कथा सांगितल्या नंतर साधे प्रश्न विचारणे.<br>• सिग्नलचा दिवा बघितल्यानंतर कावळ्याला काय वाटले?<br>• लाल दिवा पेटल्यानंतर कावळा काय म्हणतो? |
| | पुन्हा भेटू | | • या दिवसातील कृतींचे स्मरण करा.<br>• या दिवसात केलेल्या कृती पालकासोबत करण्यास प्रोत्साहन देणे.<br>• मुलांना आनंद वाटेल अशा कृती घ्या.<br>• साली सोलून आणि न सोलता खाणाऱ्या फळाबद्दल माहिती गोळा करा..<br>• मागे घडलेला एखादा सुखदायक प्रसंग/घटना सांगण्यास सांगणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 8

## दिवस – 45 (बुधवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 45 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण | 43 व्या दिवसाची कृती करणे. |

| | | |
|---|---|---|
| | (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 43 व्या दिवसाची कृती: माझी आवडती बहुली हा खेळ खेळणे. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुले अध्ययन कोपऱ्यात जावून आपल्या आपल्या आवडत्या कृती करतात. शिक्षक मार्गदर्शकाचे कार्य करतात. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | • सामर्थ्य : अनुक्रम चिंतन, परिसर जाणीव<br>• कृती : 22 अनुक्रमाणे जोडणे (विकासात्मक ध्येय - 3)<br>• उद्देश: अनुक्रमाणे जोडण्याचे कौशल्य वाढविणे.<br>• साहित्य: बिया, कोंब आलेल्या बिया, फुले, पाने इत्यादी.<br>• पध्दत:<br>1. 4 ते 5 असे मुलांचे गट करून बसविणे.<br>2. मुलांना बिया, कोंब आलेल्या बिया, फुले, पाने देणे.<br>3. हे झाडाच्या वाढीच्या अनुक्रमाने पूर्ण करण्यास प्रोत्साहन देणे.<br>4. उदा. पहिला बिया ठेवणे नंतर कोंब आलेल्या बिया त्यानंतर पान......<br>5. मुलांना झाडाच्या वाढीचे वेगवेगळे टप्पे विवरण करून सांगणे.<br>6. झाडामध्ये प्रथम बिया, कोंब आलेल्या बिया, पाने आणि त्यानंतर फुले फुलतात.<br>7. बिया, कोंब आलेल्या बिया, फुले, पाने या पासून भेटकार्ड बनविण्यास सांगणे.<br>2 री साठी :झाड दाखवून झाडाच्या भागांची नावे सांगण्यास सांगणे.<br>3 री साठी: झाडाचे चित्र काढून रंग भरण्यास सांगणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | सामर्थ्य: स्वत:ची स्वत: जाणीव करून घेवून इतरांबद्दल जाणीव करून घेणे. भाषा विकास, शब्द संपत्तीची अभिवृद्धी होणे.<br>कृती: 2 गाणे<br>एक होते जंगल<br>दोन मोठी झाडे<br>तीन खेळती अस्वले<br>चार होती पिले<br>पाच होते शिकारी<br>सहा त्यांचे सहकारी<br>सात पकडून अस्वले<br>आठ आहेत म्हणाले<br>कोणी म्हणे नऊ |

<table>
<tr><td></td><td colspan="2"></td><td>कोणी म्हणे दहा<br>शिकाऱ्याची झालेली<br>गंमत पहा<br><br>• उद्देश:<br>○ शारीरिक विकास करणे.<br>○ शब्द संपत्तीच्या वाढीबरोबर प्रास, लयबद्द, संदर्भ आणि स्पष्ट उच्चारण करणे.<br>○ आंतरिक भावना ओळखणे.<br>○ संख्यांची परिकल्पना करुन देणे.<br>• साहित्य: शिशु गीत आणि लहान लहान नाटकांचे संग्रह.<br>• पध्दत:<br>➢ मुलाना वर्तुळाकार उभे करणे.<br>➢ अभिनय गीत/ गाणी हवाभावासाहित म्हणणे.<br>➢ शिक्षकांनी तालबद्ध कृती करण्यासाठी मुलांना संधी देणे.<br>2 री व 3 री साठी गाणे / नाटकासंबंधी प्रश्न विचारणे.</td></tr>
<tr><td></td><td rowspan="2">भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता</td><td>ऐकणे व बोलणे</td><td>• सामर्थ्य : क्रियात्मक स्व अभिव्यक्ती, ध्वनी संकेत आणि प्रास शब्दाबद्दलची जाणीव, परिसर प्रज्ञा, शब्द संपत्तीचा विकास<br>• कृती: गाणे, प्रास गीत, कविता/ नाटक. ( विकासात्मक ध्येय - 2) ECL- 3 ( 39 व्या दिवसापासून सुरु आहे)<br>• उद्देश:<br>❖ ध्वनी संकेतांची जाणीव वाढविणे.<br>❖ प्रास शब्दांबद्दल जाणीव वाढविणे.<br>❖ क्रियात्मक स्व-अभिव्यक्तीसाठी संधी उपलब्ध करून देणे.<br>❖ स्वत:च्या आजूबाजूच्या परिसराशी संबंध प्रस्थापित करणे.<br>• पद्धत:<br>मुलांना गोलाकार उभे करणे.<br>39 व्या दिवशी सांगितलेले प्रास गीत अभिनायासहित मुलांना सांगणे. मुले शिक्षकांचे अनुकरण करतील.<br>लक्षात ठेवायचे घटक:<br>1. मुले गाण्याचा आनंद घेत योग्य अभिनयासह आनंदाने गातील.<br>2. मुले गाण्यातील प्रसं शब्द शिक्षकांच्या मदतीने ओळखतील.<br><br>2 री साठी गाण्यात आलेले प्रास शब्द ओळखतील.<br>3 री ची मुले त्या प्रास शब्दामध्ये आणखी शब्दांची भर घालतील.</td></tr>
<tr><td></td><td>आकलना सहीत वाचन</td><td>• सामर्थ्य: शब्द ओळखणे, छापील मजकुराची जाणीव, अर्थ ग्रहण आणि शब्द संपत्तीची अभिवृद्धी<br>• कृती : 11 नावांचे जग<br>• उद्देश:</td></tr>
</table>

➢ परिचित वस्तूंना लेखी संकेतांबरोबर परस्पर संबंध जोडणे.

➢ मजकूर आणि वस्तू हे एकच आहेत या निर्णयापर्यंत येवून वाचनामध्ये गोडी निर्माण करणे.

- साहित्य: वही, चार्ट पेपर, पेन्सिल, क्रेओन्स, आजूबाजूच्या वस्तू.
- पद्धत:

a. मुलांच्या मदतीने वर्गातील परिचित वस्तूंची यादी तयार करणे. उदा. खडू, फळा, दरवाजा इत्यादी


b. तयार केलेल्या नावाच्या पट्ट्या त्या त्या वस्तूवर चिकटविणे.

c. तशाच प्रकारच्या आणखी नावाच्या पट्ट्या तयार करणे.

d. शब्द उच्चारल्यानंतर मुलाला त्या वस्तूकडे जाण्यास सांगणे.

e. मुलाला कमीत कमी 4-5 वस्तू ओळखण्याची संधी देणे.

f. ते शब्द गोष्टीत ओळखण्यास संधी देणे.




2 री आणि 3 री इयत्तेसाठी कथा/ पाठामध्ये आलेल्या मुख्य शब्दांची यादी तयार करण्यास सांगणे.

शिक्षकांनी मुलांना कथा / मजकूर देवून वाचण्यास संधी देणे. त्यानंतर दृक पट्ट्यामधील शब्द कथेत ओळखण्यास सांगणे

लक्षात ठेवा: या मागे आलेल्या कृतीमधील शब्द बाहेर काढून वेगवेगळे प्रसंग, स्थळ येणारे शब्द वापरून कृती घेणे.

**उद्देश पूर्वक लेखन**

- सामर्थ्य: स्थूल आणि सूक्ष्म स्नायू वळण कौशल्याची अभिवृद्धी, अक्षरे ओळखणे.
- कृती:३६ ठिपके जोड-अक्षर लिही.(विकासात्मक ध्येय -2) ECW-17 (39 दिवसानंतर पुढे चालु ठेवणे)
- उद्देश:

➢ स्थूल आणि सूक्ष्म स्नायू वळण कौशल्याची अभिवृद्धी करणे.

➢ अक्षर ओळखणे.

➢ ठिपके जोडून अक्षरतयार करणे.

- साहित्य: फळा,वही,पेन्सिल,खडू
- पध्दत:

a. मुलांना ठिपके जोडून ब, द, क, म, ळ अक्षर लिहींण्याचे दाखविणे.

b. मुलांना ब, द, क, म, ळ अक्षरांचे ठिपके जोडण्यास सांगणे.

2 री साठी: मुलांनी वर्ण मालेतील कोणतीही 5 अक्षरे ठिपके जोडून तयार करणे.

3 री साठी: मुलांना माहित असलेले कोणतेही 5 शब्द ठिपके जोडून लिहिणे.

लेखनाचा नमुना:

शिक्षकांनी मुलांसमोर मुलाचे, मुलांनी काढलेल्या चित्राचे नाव इ फळ्यावर लिहिणे.लिहिण्याचा योग्य क्रम मुलांना पाहण्यास देणे.

तसेच जे काही फळ्यावर लिहितात ते सर्व मुलांच्या समोर लिहिणे.

**मैदानी खेळ**

- कृती: 18 मारू उडी.
- सामर्थ्य: स्थूल आणि सूक्ष्म स्नायू वळण कौशल्याची अभिवृद्धी
- साहित्य: लांब काठी, दोरी, उड्या मारायची दोरी,
- पध्दत:

➢ मोकळ्या जागेत कृती घेणे.

➢ पळण्याच्या धाव पट्टीवर मधेमधे अडथळे ठेवणे.

| | | |
|---|---|---|
| | | ➢ त्यानंतर मुलाना धावण्यास सांगणे.<br>➢ शरीराचा समतोल राखत खेळ पूर्ण करणे.<br>● 2 री व 3 री च्या मुलांनी हाच खेळ पुढे चालू ठेवावा. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | पहिल्या दिवसाच्या उद्देशाप्रमाणे कथा पुढे चालू ठेवणे.<br>.<br>**कथा कथन**<br>शिक्षकानी कथा सांगण्याबरोबर मुलांची मदत घेऊन कथा पूर्ण करणे.<br>उदा.<br>● या पुढे काय होईल?<br>● नंतर कोणी काय म्हटले?<br>कथा सांगितल्या नंतर साधे प्रश्न विचार.<br>✓ सिग्नल चा दिवा बघितल्यानंतर कावळ्याला काय वाटले?<br>✓ लाल दिवा पेटल्यानंतर कावळा काय म्हणतो? |
| | पुन्हा भेटू | ● या दिवसातील कृतींचे स्मरण करा.<br>● या दिवसात केलेल्या कृती पालकासोबत करण्यास सांगणे.<br>● मुलांना आनंद वाटेल अशा कृती घ्या.<br>● साली सोलून आणि न सोलता खाणाऱ्या फळाबद्दल माहिती गोळा करा..<br>● मागे घडलेला एखादा सुखदायक प्रसंग/घटना सांगण्यास सांगणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा - 8** **दिवस – 46 (गुरुवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 46 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | 35 व्या दिवसाची कृती करणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 43 व्या दिवसाची कृती 2: माझ्या आवडीची बाहुली ही कृती करा. |

<table>
<tr><td rowspan="4"></td><td colspan="2">माझा वेळ (Free Indore Play)</td><td>मुले अध्ययन कोपऱ्यात जावून आपल्या कृती करतात. शिक्षक मार्गदर्शकाचे कार्य करतात.</td></tr>
<tr><td colspan="2">पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती)</td><td>• सामर्थ्य: प्रयोग आणि निरीक्षण करणे.<br>• कृती 24: बुडबुड्याचा खेळ आणि अन्वेषण (विकासात्मक ध्येय - 3)<br>• उद्देश : साधे प्रयोग करणे.<br>• साहित्य : साबण, शाम्पू, धुण्याची पावडर, स्ट्रो/धागा<br>• पध्दत:<br>a. साबण/शाम्पू/धुण्याची पावडर यांचे मिश्रण तयार करून घेणे.<br>b. स्ट्रो/धागा त्यामध्ये बुडवून बुडबुडे तयार करणे.<br>c. मुलांनी बुड्बूड्याना धरल्यानंतर काय होते याचे निरीक्षण करणे.<br>d. पालकांच्या मदतीने अशाच प्रकारचा बुडबुड्याचा खेळ खेळण्यास प्रेरीत करणे.<br>e. मुलांना आपला अनुभव सांगण्यास सांगणे.<br>इ 2 री व 3 री साठी: याप्रकारचे साधे प्रयोग करून मुलांमध्ये आवड निर्माण करा.</td></tr>
<tr><td colspan="2">सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती)</td><td>सामर्थ्य: स्थूल आणि सूक्ष्म स्नायू वळण कौशल्याची अभिवृद्धी करणे.डोळे हात यांचा समन्वय साधणे.आकाराची परिकल्पना करणे.<br>कृती: 33 B- अक्षरांच्या आकारामध्ये रंग भरणे. (विकासात्मक ध्येय -1)<br>उद्देश:<br>➢ सूक्ष्म स्नायूंचा विकास करणे.<br>➢ डोळे व हात यांच्यामध्ये समन्वय साधणे.<br>➢ मुळाक्षरे लिहिण्याची पुर्वसिद्धता कृती साध्य करणे.<br>साहित्य: रबराची अक्षरे, रटाची अक्षरे<br>पध्दत:<br>1. मुलांना वर्तुळाकार बसविणे.<br>2. पांढरा कागद आणि रबराची अक्षरे/ रटाची अक्षरे देऊन त्या अक्षरांच्या बाजूने गिरवून त्याप्रकारची<br>3. रेषा चित्रे कागदावर काढण्यास सांगणे.<br>4. त्या अक्षरांमध्ये त्यांच्या आवडीचा रंग भरण्यास सांगणे.<br>सराव पत्रिका: H.W.-12 ( इ. 01, 02,03)</td></tr>
<tr><td>भाषा विकास आणि पा</td><td>ऐकणे व बोलणे</td><td>• सामर्थ्य: ध्वनी संकेतांची जाणीव आणि अक्षर शब्दांचा परस्पर संबंध<br>• कृती: 20: नावाच्या पहिल्या अक्षरापासून वस्तूचे नाव ओळखणे.<br>• (विकासात्मक ध्येय -2) ECL-2 ( 40 व्या दिबासापासून पुढे चालू ठेवणे.)<br>• उद्देश:<br>➢ ध्वनी संकेताबद्दल जागरूकता वाढविणे.<br>➢ अक्षरे आणि शब्दामधील परस्पर संबंध समजून घेणे.<br>➢ शब्द समजून घेऊन ओळखणे.</td></tr>
</table>

<table>
<tr>
<td rowspan="4"></td>
<td rowspan="4">या<br>भूत<br>सा<br>क्षर<br>ता</td>
<td></td>
<td>➢ अंताक्षरी शब्द लिहिणे.<br>• साहित्य: नाही<br>• नमुन्यादाखल विषय : वाहन<br>• पध्दत:<br>कोड्याच्या रुपात वाहनांची नावे ओळखून सांगण्याची कृती घेणे.उदाहरणात माझ्या मनातील वाहन पाण्यामध्ये तरंगते. त्याचे नाव ‘हो’अक्षरापासून सुरु होते.असे सांगितल्यानंतर मुले ‘होडी” म्हणून ओळखतात. अशी वेगवेगळी उदाहरणे देणे.<br>2 री व 3 री साठी: शब्दांचा पुढील भाग म्हणून मुलांना वाक्य रचना करण्यास सांगणे. ( ५२ दिवसापासून चालू ठेवणे)<br>वापरायच्या सराव वोर्कशीट : EC-12 (इ. 01, 02,03 री.)</td>
</tr>
<tr>
<td>आकलना सहीत वाचन</td>
<td>• सामर्थ्य: शब्द संपत्तीचा विकास ,स्वयं अभिव्यक्ती , अभिनय वाचन.<br>• कृती:1 A: आनंदी वाचन (विकासात्मक ध्येय - 2)<br>• उद्देश: मुले पुस्तकातील चित्र प्रसंग पाहिल्यानंतर चित्र संकेतांना समजून घेऊन अभिव्यक्त होतात.<br>• साहित्य: सचित्र कोश, सारणी चित्र कथा पुस्तक.<br>• पध्दत: मुलांनी सचित्र कोश, सारणी चित्र कथा, पुस्तक यातील चित्रे पाहून त्यामधील प्रसंगाचे उहापोह करून त्याचे आपल्या शब्दात विश्लेषण करणे.<br>2 री व 3 री साठी: चित्र प्रसंगाचा मजकुराबरोबर परस्पर संबंध जोडून सहज वाचनात समरस करणे.</td>
</tr>
<tr>
<td rowspan="2">उद्देश पूर्वक लेखन</td>
<td>• सामर्थ्य: उद्देशपूर्वक लेखन, निरीक्षण,सृजनशील चिंतन,परिसर प्रज्ञा<br>• कृती: 35 हवामान नक्षा (विकासात्मक ध्येय - 2) ECW- 16 (40 व्या दिवसापासून पुढे चालू)<br>• उद्देश:<br>➢ उद्देशीत लेखनाच सराव करणे.<br>➢ निरीक्षण कौशल्याचा विकास करणर.<br>➢ सृजनशील विचाराना प्रोत्साहन देणे.<br>➢ परिसरची जाणीव निर्माण करणे.<br>साहित्य: कागद,पेन्सिल,<br>पध्दत:<br>➢ मुलांशी आठवड्याच्या वारांबद्दल चर्चा करणे.<br>➢ आठवड्याच्या वाराची यादी प्रदर्शित करणे.<br>➢ वर्गातील हवामान नकाश्याच्या मदतीने ढग, पाऊस ,ऊन , थंडी ,वादळ इ. हवामानाच्या घटकांचा परिचय करून देणे.<br>➢ गट कृती दरम्यान दिवसाच्या हवामानाचे निरीक्षण करणे.<br>2 री व 3 री साठी : मुलांनी त्यांच्या पुस्तकातील हवामान तक्त्यात आपली निरीक्षणे नोंद करणे. (52 दिवसापासून चालू ठेवणे)</td>
</tr>
<tr>
<td>लेखनाचा नमुना:<br>शिक्षकांनी मुलांसमोर मुलाचे ,मुलांनी काढलेल्या चित्राचे नाव इ. फळ्यावर लिहिणे.लिहिण्याचा योग्य क्रम मुलांना पाहण्यास देणे.</td>
</tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | | | तसेच जे काही फळ्यावर लिहितात ते सर्व मुलांच्या समोर लिहिणे. |
| | मैदानी खेळ | | दिवस 46<br>कृती: 19- समतोल आणि रांगणे<br>सामर्थ्य: स्थूल आणि सूक्ष्म स्नायू वळण कौशल्याची अभिवृद्धी<br>साहित्य: पुस्तक,पाण्याचा तांब्या,दोरी.<br>पध्दत:<br>पाण्याने भरलेला एक तांब्या मुलांच्या हातात देणे.आणि डोकीवर पुस्तक ठेवणे.<br>तांब्यातील पाणी खाली जमिनीवर ओतत शेवटच्या रेषेपर्यंत डोकीवरील पुस्तक खाली न पाडवता कोण घेऊन जाईल त्याला विजेता करणे. ताब्यातील पाणी रेषेपर्यंत ओतत गेले पाहिजे.<br>2 री व ३ री : वरील खेळ पुढे चालू ठेवणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | पहिल्या दिवसाच्या उद्देश प्रमाणे कथा पुढे चालू ठेवणे.<br>.<br>**कथा कथन**<br>शिक्षक कथा सांगण्याबरोबर मुलांची मदत घेऊन कथा पूर्ण करतात.<br>उदा.<br>• या पुढे काय होईल?<br>• नंतर कोणी काय म्हटले?<br>कथा सांगितल्या नंतर साधे प्रश्न विचार.<br>• सिग्नल चा दिवा बघितल्यानंतर कावळ्याला काय वाटले?<br>लाल दिवा पेटल्यानंतर कावळा की म्हणतो? |
| | पुन्हा भेटू | | • या दिवसातील कृतींचे स्मरण करा.<br>• या दिवसात केलेल्या कृती पालकासोबत करण्यास सांगणे.<br>• मुलांना आनंद वाटेल अशा कृती घ्या.<br>• उदा. म अक्षरापासून सुरु होणाऱ्या घरातील वस्तूंची नावे लक्षात ठेऊन घेऊन सहकाऱ्यासोबत चर्चा/खेळ खेळण्यास सांगणे.<br>• मागे घडलेला एखादा सुखदायक प्रसंग/घटना सांगण्यास सांगणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 8     दिवस – 47 (शुक्रवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 47 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण | 35 व्या दिवासाची कृती करणे. |

| | | |
|---|---|---|
| | (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती: मी दाखविल्यानंतर बदलणे.<br>साहित्य: टाळ्या,पळणे,उद्या मारणे,बसणे,उभे राहणे,डोकी वर हात ठेवणे, इ. क्रिया दाखविणारी कार्डे.<br>पध्दत:<br>मुलांना रांगेत उभे करणे.<br>मुलांना एकेक कार्ड दाखवून त्या पध्दतीची कृती करण्यास सांगणे.<br>दिवस 43 ची कृत्ती घेणे : माझी आवडती बाहुली |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुले अध्ययन कोपऱ्यात जावून आपल्या कृती करतात. शिक्षक मार्गदर्शकाचे कार्य करतात. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | • सामर्थ्य: शोधणे आणि विवरण करणे<br>• कृती: 25 कोणते विरघळते आणि कोणते विरघळत नाही ते पाहू.(विकासात्मक ध्येय3)<br>• उद्देश: विरघळणाऱ्या आणि न विरघळणाऱ्या वस्तू बद्दल जाणून घेणे.<br>• साहीत्य: पात्र,मीठ,साखर,सोडा,माती, वाळू ,पीठ,तेल,डीजेल इ.<br>• पध्दत: एका पत्रात पाणी घेणे.मीठ किवा साखर त्यामध्ये घालून ते ढवळणे. मुलांनी त्याकडे लक्ष देणे.त्यानंतर आणखी एका पत्रात पाणी घेऊन त्यामध्ये वाळू किंवा दगड घालू ते ढवळणे. आता काय होईल? मुलासोबत कोणते विरघळले आणि कोणते. विरघळले नाही याबद्दल चर्चा करणे.<br>इ. 2 री : ,मीठ,साखर,सोडा,माती, वाळू ,पीठ,तेल,डीजेल इ.यामधील कोणते विरघळले आणि कोणते विरघळले नाही याबद्दल चर्चा करणे.<br>3 री: उपलब्ध वस्तुमधील कोणते विरघळले आणि कोणते विरघळले नाही हे प्रयोग करून त्याचे वर्गीकरण करणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | • सामर्थ्य: स्थूल आणि सूक्ष्म स्नायू वळण कौशल्याची अभिवृद्धी.डोळे हात यांचा समन्वय.आकाराची परिकल्पना.<br>• कृती: ३6 C – पाने आणि फुलांना विविध रचणे मध्ये जोडणे..(विकासात्मक ध्येय1)<br>• उद्देश:<br>➢ सूक्ष्म स्नायूंचा विकास करणे.<br>➢ डोळे व हात यांच्यामध्ये समन्वय साधने<br>➢ मुळाक्षरे लिहिण्याची पुर्वसिद्धता कृती साध्य करणे.<br>• साहित्य: पाने, फुले<br>• पध्दत: मुलांना पाने आणि फुले देऊन विविध रचना करण्यास सांगा.<br>इ. 2 री व 3 री : वरील कृती करून घेणे. |
| | भाषा — ऐकणे व | • सामर्थ्य: शब्द संपती वाढविणे,अंदाज करणे,गटातील सदस्याबरोबर सहसबंध साधने<br>• कृती : 6 A मला शोधा(विकासात्मक ध्येय 3) ECL- 12 |

| | | | |
|---|---|---|---|
| | विकास आणि पायाभूत साक्षरता | बोलणे | • उद्देश:<br>1. सुक्त शब्द रचणे.<br>2. सांघिक मनोभावना वाढविणे.<br>• साहित्य: परिचित वस्तू,प्राणी,पक्षी इ. चित्रे<br>• पध्दत:<br>1. चित्रांची दृक पट्टी, BOX मध्ये ठेवणे.<br>2. एकेक मुलाला बोलावून त्यातील एक दृक पट्टी घेऊन त्यावर चित्राचे नाव सांगण्यास सांगणे.<br>3. ओळखलेल्या चित्राबद्दल चर्चा करणे.<br>2 री : चित्राबद्दल 3-4 वाक्यात बोलणे.<br>3 री : चित्राबद्दल 2-3 मिनिटे बोलणे |
| | | आकलना सहीत वाचन | • सामर्थ्य: छापील मजकूरची जाणीव, शब्द ओळख, आकलन,शब्द संपत्तीचा विकास आणि पर्यावरण जागरुकता.<br>• कृती: 18<br>1. चित्र संचयीका(लक्ष्य – 2)<br>विषय : जलनिवास्थान आणि त्यात आढळणारे प्राणी/ पक्षी आणि वस्तू.<br>• उद्देश:<br>➢ चित्रातील वस्तू/व्यक्ती/घटनांची नाव सांगणे.<br>➢ तर्क लावणे.<br>➢ समजून घेणे आणि चित्राचा मजकुराशी संबंध लावणे.<br>मुलांनी चित्रांचे निरीक्षण करणे,<br>➢ अर्थ समजून घेणे आणि व्यक्तिगत चित्र संचयीका तयार करून व्यक्तिगत आणि गटामध्ये सादर करणे.<br>➢ गटामध्ये बसून भित्ती पत्रक तयार करतात.<br>• साहित्य: पाण्याचे उगम आणि त्यामध्ये आढळणारे प्राणी/पक्षी/वस्तू यांची चित्रे, त्यांच्याबद्दलची गाणी,गोष्टी यांची यादी<br>• पध्दत:<br>1. मुलांना परिचित गाणे/ गोष्टी संबंधित चित्रे दाखविणे.<br>2. गाणी / गोष्टी मधील विशेष शब्द ओळखणे.<br>3. गाणी/ गोष्टी मधील प्रमुख पत्रे ओळखून पुनरावर्तीत ओळ/शब्द म्हणणे/लिहिणे.<br>4. नमुना चित्रे वाचणे, त्याबद्दल प्रतिक्रिया घेणे.<br>5. व्यक्तिगत चित्र संचयिका- गाणे/ गोष्टी मध्ये येणारे विशेष शब्द,पात्र, वस्तू ओळखून,समजून घेऊन व्यक्तिगत चर्चा करण्यास आवड निर्माण करणे. त्यानंतर त्याबद्दल त्याने अभिव्यक्त होणे.<br>6. उदा. पाण्याचे उगम, जलचर,उभयचर,पक्षी इ. चित्र /व्हिडीओ/क्षेत्र भेटी<br>शिक्षकांनी वापरावयाचे प्रश्न-<br>➢ पाण्याचा उगम पाहिला आहात का?<br>➢ तुमच्या गावातील पाण्याचे उगमस्थान कोणकोणते? |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ➢ जलचर प्राणी कोणकोणते आहेत?<br>➢ तुला आवडणारा जलचर कोणता? इ.<br>➢ अशा पद्धत्तीने प्रश्नावली तयार करून अध्यापन सुलभ करून घेणे.<br>पाण्याचे उगम आणि त्यामध्ये आढळणारे प्राणी/पक्षी/वस्तू यांची चित्रे, त्यांच्याबद्दलची गाणी,गोष्टी यांचे वर्गात प्रदर्शन भरविणे.<br>सदर संदर्भात शिक्षकाने मुलांना चर्चा करण्यास, प्रश्न विचारण्यास संधी उपलब्द करून देणे.<br>शिक्षकाने 2 री व 3 री च्या मुलांना 1 ली च्या मुलासोबत परस्पर चर्चा करण्यास सूचना करणे. तसेच विषयाचा विस्तार होण्यासाठी सर्व मुले व्यक्त होत आहेत कि नाही याची खात्री करून घेणे.<br>2 री व 3 री च्या मुलांना त्यांच्या वयानुसार चर्चा करण्याची संधी उपलब्द करून देणे.<br>( सदर कृतीचा पुढील भाग ४९ व्या दिवशी सुरु राहील ) |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य: लेखन, उद्देशपूर्वक लेखन, निरीक्षण,सृजनशील चिंतन,परिसर प्रज्ञा<br>कृती : ३२ सामायिक लेखन ( लक्ष्य : 2) ECW-8<br>उद्देश:<br>➢ सामायिक लेखनाचा परिचय करून देणे.<br>➢ हेतू पुरस्कर लिहिण्याचा सराव करून घेणे.<br>➢ सामायिक लेखनात लक्षपूर्वक गुंतविणे.<br>➢ सृजनशील विचार करून लिखित स्वरुपात मांडणे.<br>➢ शब्द संपत्तीचा विकास करणे.<br>साहित्य: फळा, DRAWING पेपर<br>पद्धत:<br>महिन्यातून दोन किंवा तीन वेळा सामायिक लेखन आयोजित करणे.<br>मुलांना एक विषय देणे. आणि त्या विषयावरील त्यांचे अनुभव गोष्टी स्वरुपात किंवा लिखित स्वरुपात सदर करण्यास सांगणे.<br>सुचविलेला विषय: भाजीपाला.<br>लक्षात ठेवायचे घटक:<br>* प्रत्येक विषयासंदर्भात वाक्ये तयार करण्यासाठी आवश्यक संकेत देणे. मुलांना लेखनात गुंतविण्यासाठी आवश्यक प्रात्यक्षिक देणे.<br>* शिक्षकांनी पहिले वाक्य लिहून वाचावे. नंतर मुलांना त्यांची स्वत:ची वाक्ये लिहिण्यास सांगणे.<br>* मुलांना त्यांच्या मातृभाषेमध्ये प्रतिक्रिया देण्यासाठी संधी देणे. शिक्षकांनी प्रमाण भाषेत अनुवादित करावे.<br>सूचना: 1 लीच्या मुलांनी सांगितलेले घटक 2 री व 3 री च्या मुलांनी लिहिण्यासाठी सुचविणे. |
| | | | लेखनाचा नमुना:<br>शिक्षकांनी मुलांसमोर मुलाचे ,मुलांनी काढलेल्या चित्राचे नाव इ फळ्यावर लिहिणे.लिहिण्याचा योग्य क्रम मुलांना पाहण्यास देणे.<br>तसेच जे काही फळ्यावर लिहितात ते सर्व मुलांच्या समोर लिहिणे. |
| | मैदानी खेळ | | दिवस 47<br>• कृती: 19 रांगणे विकासात्मक ध्येय-1<br>• सामर्थ्य: स्थूल आणि सूक्ष्म स्नायू वळण कौशल्याची अभिवृद्धी. |

| | | |
|---|---|---|
| | | • साहित्य: दोरी<br>• पद्धत : दोन मुलांनी कमी उंचीवर दोरी धरून उभे राहणे.<br>• इतर मुलांना त्या दोरी खालुन रांगत जाण्यास सांगणे.<br>• परत येतांना पळत येण्यास सांगणे.<br>2 री व 3 री: हाच खेळ खेळणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | • शिर्षक: कावळा आणि वाहतूक दिवा<br>• साहित्य: माझे वाचन कार्ड<br>• उद्देश:<br>➢ ऐकणे व निरीक्षणाचे सामर्थ्य वाढविणे.<br>➢ शब्द संपत्ती वाढविणे.<br>➢ प्रश्न विचारण्याचा मनोभाव वाढविणे.<br>➢ वाचण्याचा छंद वाढविणे.<br>➢ अभिनय कौशल्य वाढविणे.<br>• पद्धत:<br>**पात्राभिनय**<br>1. कथेची उजळणी करणे.<br>2. कथा सांगण्यासाठी 2 री व 3 री च्या मुलांना मदत करणे.<br>3. मुले चुकल्यास साकारात्मकपणे स्विकारून दुरुस्त करून कथा पुढे चालू ठेवणे.<br>4. दृक पट्टीमध्ये पात्रांची संभाषणे लिहून देणे. |
| | पुन्हा भेटू | • या दिवसातील कृतींचे स्मरण करा.<br>• या दिवसात केलेल्या कृती पालकासोबत करण्यास सांगणे.<br>• मुलांना आनंद वाटेल अशा कृती घ्या.<br>• साली सोलून आणि न सोलता खाणाऱ्या फळाबद्दल माहिती गोळा करा..<br>• मागे घडलेला एखादा सुखदायक प्रसंग/घटना सांगण्यास सांगणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 8

## दिवस – 48 (शनिवार)

| | |
|---|---|
| प्रतिबिंब (वर्गातील निरंतर मूल्यमापन) | • विविध तंत्र वापरून (निरीक्षण, तपशील पट्टी, मुलांची अध्ययन पत्रके, व्हिडीओ, सांदर्भिक नोंदी, इत्यादी) तुम्ही संग्रह केलेल्या मूल्यमापन नोंदी/माहिती यांचे पुनरावलोकन करणे.<br>• प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिगत गरजेनुसार पुढील आठवड्यातील अध्ययन प्रक्रियेची योजना आखणे.<br>• अध्ययनाच्या तिन्ही विकासात्मक ध्येयांच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे. |

## 4.3 मासिक मूल्यमापन मार्गसूची

(शाळेसाठी विद्यार्थ्यांची पुर्वसिद्धता)

# दुसरा महिना

**उद्देश : शालेय उपक्रमात आवड निर्माण करणे आणि शालेय परिसराशी व अध्ययनाशी जुळवून घेण्यास मुलांना मदत करणे.**

| विद्यार्थ्याचे नाव | | | | वर्ग | |
|---|---|---|---|---|---|
| उंची आणि वजन | | | | | |
| वजन | | | उंची | | |
| व्यक्तिगत स्वच्छता (संबंधित रकान्यात ✓ अशी खूण करणे.) | | | | | |
| | स्वच्छ आहेत | सुधारणा हवी | | स्वच्छ आहेत | सुधारणा हवी |
| कपडे | | | नखे | | |
| दात | | | डोळे | | |
| कान | | | नाक | | |
| केस | | | | | |

*** खालील कृतींमध्ये संपूर्ण महिन्याची मुलाची प्रगती एकत्रित करून संबंधित रकान्यात ✓ अशी खुण करणे.**

| दैनंदिन कृतींची जुळवाजुळव व अनुकरण | क्वचित | कधीतरी | नेहमी |
|---|---|---|---|
| योग्य आहाराच्या व स्वच्छतेच्या सवयी जोपासतो/ जोपासते. | | | |
| आरोग्यकारक आहाराच्या पद्धती जोपासतो/ जोपासते. | | | |
| आरोग्यदायी स्वच्छतेच्या सवयी सराव करतो/ करते. | | | |
| गट चर्चेमध्ये सक्रीय भाग घेतो/ घेते. | | | |
| कृती करण्यास पुढे येतो/ येते. | | | |
| परीस्थितीला योग्य भावना व्यक्त करतो/ करते. | | | |
| कथा व चित्रातील भावना ओळखतो/ ओळखते. | | | |
| इतरांबरोबर सामाजिक संबंध प्रस्थापित करतो/ करते. | | | |
| खेळाचे नियम पालन करतो/ करते. | | | |
| वर्गातील दैनंदिन कृतीचे नियम पालन करतो/ करते. | | | |
| वर्गातील जबाबदाऱ्या आणि कृतीचे निर्वहन स्वतंत्रपणे प्रदर्शित करतो/ करते. | | | |
| कार्य पूर्ण करण्यासाठी जास्त लक्ष आणि निरंतरता दाखवितो/ दाखविते. | | | |
| **मैदानी खेळ / कृतींमधील सहभाग** | **मदतीची गरज आहे** | **परिश्रमाने करतो/करते** | **करतो /करते** |
| चेंडूने नेम धरतो/ धरते. | | | |
| चेंडू पकडतो /पकडते. | | | |
| माती आणि पाण्यातील खेळामध्ये सहभागी होतो/ होते. | | | |
| लक्ष किंवा दिशेला चेंडूला लाथ मारतो/ मारते. | | | |
| योगा, खेळ, आणि नृत्यामध्ये भाग घेतो/ घेते. | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| चेंडू ध्येयाकडे लाथाडतो/ लाथाडते. | | | |
| टायर/ बॅरल ढकलतो/ ढकलते. | | | |
| चेंडू सहज आपटतो/ आपटते. | | | |
| योग, लवचिक व्यायाम आणि नृत्यामध्ये चपळता दाखवतो/ दाखविते. | | | |
| **सृजनात्मक, सौंदर्यात्मक तसेच स्नायू चलन अभिवृद्धिसाठी कलाकृतीमध्ये सहभाग** | **मदतीची गरज आहे** | **परिश्रमाने करतो / करते** | **करतो / करते** |
| साधी ओरिगामी व कागदाची घडी घालतो/ घालते. | | | |
| रेषेच्या आत (रेखा चित्र) चित्र रंगवतो/ रंगवते. | | | |
| सूक्ष्म माहितीवरून चित्र काढतो/ काढते. | | | |
| लहान जागेत रंग भरतो/ भरते. | | | |
| बोटांनी ठसे उमटवितो/ उमटविटे. | | | |
| बिंदू जोडून चित्र रंगवतो/ रंगवते. | | | |
| मातीपासून विविध आकार तयार करतो/ करते. | | | |
| स्प्रिंग आणि लेस इत्यादी वस्तू वापरून वेगवेगळ्या नक्षी (रचना) बनवतो/ बनवते. | | | |
| **संख्याज्ञान तसेच परिसर जागृतीचे प्रदर्शन** | **मदतीची गरज आहे** | **परिश्रमाने करतो / करते** | **करतो / करते** |
| विविध वस्तूंची उंचीनुसार तुलना करतो/ करते. | | | |
| नैसर्गिक घटना ओळखतो/ ओळखते आणि शोधतो/ शोधते. | | | |
| एकापेक्षा जास्त गुणधर्मावरून वस्तूंचे वर्गीकरण करतो/ करते. (रंग, आकार, आकारमान) | | | |
| वस्तू क्रमाने जोडतो/ जोडते. (आकारमान- उंची) | | | |
| नमुना ओळखतो आणि पूर्ण करतो/ करते. | | | |
| आकार ओळखतो आणि नावे देतो/ देते. | | | |
| 2 ते 4 अडथळ्यांची कोडी सोडवितो/ सोडविते. | | | |
| लपलेला भाग , ण दिसणारा भाग किंवा चुका ओळखतो/ ओळखते. | | | |
| आकारमानानुसार वस्तू क्रमाने जोडतो/ जोडते. (लांब आणि उंच) | | | |
| स्वतंत्रपणे साध्या अनौपचारिक मापन कृती करतो/ करते. | | | |
| लहान-मोठा, उंच- ठेंगणा,जड-हलका असे शब्द वापरतो/वापरते. | | | |
| इतरांबरोबर सामाजिक संबंध व्यक्त करतो/ करते. | | | |
| परिस्थितीनुसार योग्य भावना व्यक्त करतो/ करते. | | | |
| घटना, मित्र आणि सण याबद्दल बोलतो/ बोलते. | | | |
| स्पर्शज्ञानाचा वापर करून रचना ओळखतो/ ओळखते. | | | |
| समस्या ओळखून उपाय शोधतो/ शोधते. | | | |
| **तोंडी अभिव्यक्तीचे प्रदर्शन** | **क्वचित** | **कधीतरी** | **नेहमी** |
| ऐकल्यानंतर समजून घेऊन उत्तरे देतो/ देते. | | | |
| लहान वाक्यात संपूर्ण विवरण करतो/ करते. | | | |
| उच्चारांश ओळखतो/ ओळखते, मिश्रण करतो/ करते आणि विभाग | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| करतो/ करते. | | | |
| सामान्य शब्दाचा पाहिला व शेवटचा ध्वनी ओळखतो/ ओळखते. | | | |
| शब्दांना अक्षरे जोडून नवीन शब्द तयार करतो/ करते. | | | |
| सृजनात्मकरित्या व्यक्त होतो किंवा उत्तरे देतो/ देते. | | | |
| **प्रारंभिक वाचन कौशल्यांचे प्रदर्शन** | **क्वचित** | **कधीतरी** | **नेहमी** |
| प्रास शब्द ओळखतो/ ओळखते. | | | |
| ध्वनी चिन्हांचे संयोजन ओळखतो/ ओळखते. | | | |
| शब्द वाचण्याचा प्रयत्न करतो/ करते. | | | |
| डावीकडून उजवीकडे लिहिणे वरून खाली वाचणे इत्यादी पध्दती ओळखतो/ ओळखते. | | | |
| **प्रारंभिक लेखन कौशल्यांचे प्रदर्शन** | **क्वचित** | **कधीतरी** | **नेहमी** |
| योग्य पकडीनुसार लिहिण्याचे व रंग भरण्याचे उपकरण वापरतो/ वापरते. | | | |
| उपकरणे योग्य पद्धतीने वापरतो/ वापरते. | | | |
| इतरांनी काढलेले रेखाचित्र वाचतो/ वाचते आणि योग्य शब्दात त्याचे विवरण करतो/ करते. | | | |

| | | |
|---|---|---|
| मुलांची वैशिष्टे | विशेष आवड | |
| | मुलाची प्रतिभा | |
| | सामर्थ्ये | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| हजेरी | नियमित | होय / नाही | वेळेचे बंधन/ पालन | होय / नाही |

| | |
|---|---|
| सामान्य टीप (Remarks) | |

| | | |
|---|---|---|
| शिक्षकांची सही व दिनांक | मुख्याध्यापकांची सही व दिनांक | पालकांची सही व दिनांक |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 9



## दिवस – 49 (सोमवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 49 | अभिवादन / शुभेच्छांची | कृती:1<br>एक-दो-एक/ 1-2-1 म्हणत ओळीने कदम ताल करीत वर्गात प्रवेश करण्यास सांगा. |

| | | | |
|---|---|---|---|
| | देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | | कृती :2<br>1. पाऊस टाळ्या मारण्यास सांगणे.<br>2. पाऊस टाळ्या मारत वर्गामध्ये गोलाकार थांबणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | | कृती: परिसराचा फेरफटका<br>पध्दत: मुलांना शाळेच्या किंवा जवळच्या बागेत घेऊन जाऊन त्यांना विविध प्रकारची झाडे झुडपे पाहण्याची संधी द्या. त्यांच्याबद्दल बोलण्यास प्रोत्साहित करा. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | | मुलांनी आपल्या आवडीच्या अध्ययन  कोपऱ्यात जाऊन कृती करणे. शिक्षकांनी सूचना/नियमावलीप्रमाणे कार्य करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाच्या मार्गदर्शक कृती) | | सामर्थ्य : आकृतिबंध, परिसराची जाणीव आणि सृजनात्मक चिंतन<br>कृती 20: आकृतिबंधांची  रचना आणि विस्तार करणे. विकासात्मक ध्येय- 3<br>उद्देश: वेगवेगळ्या नमुन्यातील आकृतीबंधांची रचना करणे.<br>साहित्य: विविध प्रकारची पाने, बाहुल्या, चिंचोके, दगड, माचीस कड्या, बिया इत्यादी<br>पध्दत:1) मुलांना परिचित असणारा  साधा आकृतिबंध  रचने.<br>2)विविध प्रकारची पाने, बाहुल्या, चिंचोके, दगड, माचीस काड्या, बिया इत्यादी पासून सोपी रचना तयार करणे.<br>3)नंतर  काठीण्य पातळी वाढविणे.  दोन बिया – एक चिंचोका, 2 बिया - 1पान, 2 बाहुल्या – 1 पान, 2 उभ्या माचीस काड्या- 1 आडवी माचीस काडी  याप्रकारचे विविधआकृतिबंध  तयार करण्यास संधी देणे.घरी आणि वर्गामध्ये नाविन्यपूर्ण आकृतिबंध रचण्याची संधी देणे.<br>मुलांनी सर्व प्रकारचे आकृतिबंध रचल्यानंतर ते ओळखणे, पुन्हा जोडणे, विस्तार करणे आणि नवीन तयार करणे. अशा कृती घेणे.<br>2 री व 3 री : विविध प्रकारचे  आकृतिबंध रचण्यास प्रोत्साहन देणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | | सामर्थ्य: सूक्ष्म स्नायू चलन कौशल्य आणि सृजनशीलतेचा विकास,डोळे हात यांचा समन्वय.आकाराची परिकल्पना.<br>कृती 33 A: गिरविणे .(विकासात्मक ध्येय-1)<br>उद्देश:<br>➢ सूक्ष्म स्नायूंचा विकास करणे.<br>➢ डोळे व हात यांच्यामध्ये समन्वय साधने<br>➢ मुळाक्षरे लिहिण्याची पुर्वसिद्धता कृती साध्य करणे.<br>साहित्य: वाळू<br>पध्दत: अंक लिहिण्याच्या योग्य क्रमाने संख्या गिरवून त्यापासून रेखाचित्र तयार करणे.<br>मुलाला त्याला आवडणारा अंक लिहिण्यास प्रोत्साहित करणे. संख्येनुसार वस्तू जोडण्यास सांगणे. तसेच अंक एवढ्या मातीचे ढीग रचण्यास सांगा.<br>2 री व 3 री : त्यांनी लिहिलेल्या संख्येला अनुसरून चित्र काढण्यास सांगा. |
| | भा षा वि | ऐकणे व बोल | सामर्थ्य: शब्द तयार करणे.<br>कृती 10 : शब्द रचना (विकासात्मक ध्येय – 2) ECL-10<br>उद्देश : शब्द रचना सामर्थ्य वाढविणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | का<br>स<br>आ<br>णि<br>पा<br>या<br>भूत<br>सा<br>क्षर<br>ता | णे | शब्द संपत्ती वाढविणे.<br>पध्दत: मुलांना गोलाकार बसवून स्पष्टपणे सूचना देऊन कृती सुरु करणे.<br>* मी सांगितलेले अक्षर ऐका.<br>* अक्षर वापरून शब्द तयार करा.<br>उदा. शिक्षक जोराने क ( विराम) र असे उच्चारल्यानंतर मुले 'कर' असा शब्द तयार करून सांगुदेत.<br>ही कृती शिक्षक टप्या टप्याने दोन अक्षरी, तीन अक्षरी, चार अक्षरी शब्दांसाठी वापरू शकतात..<br>2 री : मुलांनी एका अक्षराशी संबंधित 2-3 शब्द सांगणे.<br>3 री : 2 री च्या मुलांनी सांगितलेले शब्द वाक्यात उपयोग करणे. |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य: छापील मजकूराची जाणीव, शब्द ओळख, आकलन, शब्द संपत्तीचा विकास आणि पर्यावरण जागरुकता.<br>कृती18 :<br>● चित्र संचयीका (विकासात्मक ध्येय – 2) विषय : जलनिवासस्थाने आणि त्यात आढळणारे प्राणी/ पक्षी तसेच वस्तू.<br>उद्देश:<br>● चित्रातील वस्तू /व्यक्ती /घटनांची नाव सांगणे. तर्क लावणे. समजून घेणे आणि चित्राचा मजकुराशी संबंध लावणे.<br>● मुलांनी चित्रांचे वाचन करणे,अर्थ समजून घेणे आणि व्यक्तिगत चित्र संचयीका तयार करून व्यक्तिगत आणि गटामध्ये सादर करणे. गटामध्ये बसून भित्ती पत्रक तयार करणे.<br>साहित्य: मुलांनी काढलेली चित्रे.<br>पध्दत: 1) जलनिवासस्थान आणि त्यात आढळणारे प्राणी/ पक्षी आणि वस्तू याच्याशी संबंधित मुलांनी काढलेली चित्रे कृती संचयिकेतून काढून त्याबद्धल सहजपणे बोलण्यास सांगणे.<br>शिक्षकाने 2 री व 3 री च्या मुलांना 1 ली च्या मुलासोबत परस्पर चर्चा करण्याची सूचना देणे. तसेच विषयाचा विस्तार होण्यासाठी सर्व मुले व्यक्त होत आहेत की नाही याची खात्री करून घेणे.<br>2 री व 3 री: मुलांना त्यांच्या वयानुसार चर्चा करण्याची संधी उपलब्ध करून देणे.<br>(सदर कृतीचा पुढील भाग 53 व्या दिवशी सुरु राहील) |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य: उद्देशपूर्वक लेखन,सृजनशील चिंतन,परिसराची जाणीव, शब्द संपत्ती वाढविणे,आकलनासाहीत वाचन,परिसर जागृती.<br>कृती 33 : यादी करूया (विकासात्मक ध्येय-2 ) ECW-10<br>उद्देश:<br>➢ उद्देशानुसार लेखनाच्या क्रमाचा सराव करून घेणे.<br>➢ सृजनात्मकरित्या विचार करून ते लेखनव्दारे व्यक्त करणे.<br>➢ शब्द संपत्तीचा विकास करणे.<br>➢ परिसराची जाणीव करून देणे.<br>➢ सूचना ऐकून अर्थ समजून घेणे.<br>साहित्य: वही, कागद, क्रेयोन्स<br>पध्दत: मुलांची शब्द संपत्ती वाढविण्यासाठी तसेच उद्देशीत लेखनाला संधी देण्यासाठी मुलांना विविध विषयासंबंधित शब्दांची यादी करण्यास सांगणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सूचित विषय: पक्षांची  यादी<br>संपूर्ण वर्गाला एकत्र करून एका चार्टपेपरवर पक्षांची यादी करण्याची कृती घेणे.या चार्टमध्ये वापरलेल्या सामान्य शब्दांची यादी शिक्षकांनी तयार करावी आणि ते मुलांना  पाहण्यास आणि वाचण्यास मदत होण्यासाठी वर्गात प्रदर्शित करणे.<br>इ. 2 री: 1 ली च्या मुलांनी तयार केलेल्या यादीमध्ये दुसरीच्या मुलांनी आणखी शब्दांची भर घालावी.<br>३ रीच्या मुलांना यादीतील शब्द स्वत:च्या वाक्यात वापरण्यास संधी उपलब्ध  करून देणे. |
| | | | लेखणाचा नमुना:<br>शिक्षकांनी मुलांसमोर फळ्यावर लिहिणे.लिहिण्याचा योग्य क्रम मुलांना पाहण्यास देणे.शिक्षकांनी वर्गात जे कांही लिहायचे असेल ते मुलांसमोरच लिहिणे. |
| | मैदानी खेळ | | कृती: ३२ संगीत खुर्ची<br>सामर्थ्य: स्थूल स्नायू चलन कौशल्य वाढीस लावणे.<br>आवश्यक साहित्य: खुर्च्या आणि ड्रम/ संगीत<br>पध्दत:<br>➢ मोठ्या वर्तुळामध्ये खुर्च्या ठेवणे.<br>➢ खेळात भाग घेतलेल्या मुलांच्या पेक्षा एक खुर्ची कमी ठेवणे.<br>➢ मुलांना खुर्च्यांच्या बाजूने फिरण्यास सांगून संगीत चालू करणे.<br>➢ संगीत बंद झाल्यानंतर खुर्च्यांवर बसण्यास सांगणे.<br>➢ ज्या मुलाला खुर्ची मिळणार  नाही तो/ती खेळातून बाद ठरतो.<br>➢ त्यानंतर एक खुर्ची कमी करून खेळ पुन्हा शेवटपर्यंत सुरु ठेवणे.<br>➢ शेवटी ज्याला खुर्ची मिळेल त्याला  तो विजयी घोषित करणे.<br>2 री व 3 री च्या मुलांना हाच खेळ घेणे. |
| | रंजक कथा<br>(कथेची वेळ) | | शीर्षक: ग्र्यांडपाज (आजोबांची भेट) गिफ्ट<br>साहित्य: पांढरा कागद, पेन्सिल, क्रेयोन्स<br>उद्देश:<br>• ऐकण्याचे सामर्थ्य वाढविणे.<br>• वैचारिक शक्ती वाढविणे.<br>• सृजनशीलता वाढविणे.<br>• प्रश्न विचारण्याचे कौशल्य वाढीस लावणे.<br>• गोष्टीशी संबंधित चित्रे जमा करण्याचा छंद जोपासणे.<br>पध्दत:<br>1 )शिक्षकांनी इंग्रजीमध्ये कथा सांगणे.<br>2)मातृभाषेमध्ये गोष्टीचा सारांश सांगणे. इंग्रजी आणि मातृभाषेमध्ये कथा सांगताना बाहुल्याचा वापर करणे.<br>3)मुलांना लिखाणाचे साहित्य देऊन त्यांना  गोष्टीतील आवडणाऱ्या पात्रांचे चित्र काढण्यास सांगणे.<br>त्यानंतर रंग भरण्यास सांगणे. |

| | | |
|---|---|---|
| | |   |
| | पुन्हा भेटू | • या दिवसातील कृतींचे स्मरण करणे.<br>• या दिवसात केलेल्या कृती पालकासोबत करण्यास सांगणे.<br>• मुलांना आनंद वाटेल अशा कृती घेणे.<br>• उदा. म अक्षरापासून सुरु होणाऱ्या वस्तूंची नावे घरातून समजून घेऊन येणे आणि पुढच्या आठवड्यात सहकाऱ्यासोबत चर्चा करणे.<br>• मागे घडलेली एखादी सुखदायक प्रसंग/घटना सांगण्यास सांगणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 9     दिवस – 50 (मंगळवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 50 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | 49 व्या दिवसाची कृती करणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या | 49 व्या दिवसाची कृती: परिसराचा फेरफटका<br>खालील कवितेव्दारे झाडांचा परिचय करून देणे.<br>आम्ही झाडे |

| | | |
|---|---|---|
| | सामुहिक कृती) | धरणीच्या पोटीं आम्ही जन्मतो<br>आधाराने तिच्याच जगतो<br>हासत -खेळत आम्ही वाढतो<br>गोड फळे मग तुम्हांस देतो !<br><br>आम्ही झाडे ऊन सोसतो<br>गार सावली तुम्हांस देतो<br>शुद्ध हवेचे दान देऊनी<br>माया सगळ्यांवरती करतो<br><br>तुम्ही बालके हसा खेळा<br>आपुलकीची कास धरा<br>परोपकाराच्या मार्गावर<br>मंत्र शांतीचा जपू जरा....<br><br>सर्वेश (खानापूर) |
| | माझा वेळ (Free Indore Play) | * मुले सर्व कृती कोपऱ्यातील कृती करण्यात मग्न होऊन आणि योग्यपणे पूर्ण करत असल्याची खात्री करून घेणे.<br>* अपूर्ण कृती केलेल्या मुलाला कृती पूर्ण करण्यास मदत करणे.<br>* पुढील दिवसात कृती घेताना कोणत्या मुलांकडे जास्त लक्ष दिले पाहिजे हे ठरवून कृती करवून घेण्यास शिक्षकानी सिद्ध राहिले पाहिजे.<br>* पुढील दिवसासाठी भेटकार्ड तयार करण्यासाठी वाळलेल्या पानाची आवश्यकता असल्याने आतापासूनच मुलांनी वेगवेगळ्या आकाराची पाने संग्रह करून जुन्या पुस्तकात न दुमडता सुकण्यास ठेवावी. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य: शरीराचे भाग ओळखणे.<br>कृती १३ A : शरीराची रेखाकृती (विकासात्मक ध्येय-1)<br>साहित्य : वर्तमान पत्र, चार्ट पेपर, खडू<br>पध्दत : जमिनीवर वर्तमान पत्र किंवा चार्ट पेपर पसरविणे. एका मुलाला कागदावर झोपविणे. त्याच्या बाजूने बाह्य रेषा मारणे. दुसर्या मुलाला बाह्य रेषेवरून कागद कापण्यास सांगणे.आता तयार झालेल्या रेखाकृतीच्या विविध भागात इतर मुलांना रंग भरण्यास किंवा कागद चिकटविण्यास सांगणे. शरीराच्या प्रत्येक भागाचे विवरण करण्यास सांगणे. शरीराच्या भागासंबंधी शब्द संपत्ती वाढविण्यास मदत करणे.<br>2 री साठी: शरीराच्या भागाना क्रमाने जोडण्यास सांगणे व नावे देण्यास प्रोत्साहित करणे.<br>3 री साठी : शरीराच्या भागाची नावे लिहिण्यास सांगणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन | सामर्थ्य: स्थूल आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्याची अभिवृद्धी, सृजनशीलता, डोळे व हाताचा समन्वय आणि आकारांची परिकल्पना<br>कृती 33 : B अक्षरांचे आकाराना रंग भरणे. (विकासात्मक ध्येय -1)<br>उद्देश: |

| | | | |
|---|---|---|---|
| | कौशल्ये (मुलांची कृती) | | ➢ सूक्ष्म स्नायूंचा विकास करणे.<br>➢ डोळे व हात यांच्यामध्ये समन्वय साधणे.<br>➢ मुळाक्षरे लिहिण्याची पुर्वसिद्धता कृती साध्य करणे.<br>➢ स्थळ/जागेची परिकल्पना समजते.<br><br>साहित्य: रबरी अक्षरे, पुठ्याची अक्षरे<br>पध्दत: मुलांना वर्तुळाकार बसविणे.पांढरा कागद आणि रबरी अक्षरे/ पुठ्याची अक्षरे देऊन त्या अक्षरांच्या बाजूने गिरवून त्याप्रकारची रेषा चित्रे कागदावर काढण्यास सांगणे. त्या अक्षरांमध्ये त्यांच्या आवडीचा रंग भरण्यास सांगणे.<br>2 री व 3 री : कोणतेही आवडीचे अक्षर घेऊन त्याचे रेखा चित्र काढून त्यामध्ये आवडीचा रंग भरणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य: ध्वनी विज्ञान जाणीव, वाक्यातील शब्द ओळखणे.<br>कृती 9 : शब्द टाळ्या (विकासात्मक ध्येय – 2) ECL -19<br>उद्देश:<br>* शब्द उच्चारल्यानंतर ध्वनीचा अर्थ करून घेणे.<br>* सूचित केलेला शब्द वाक्यात ओळखणे.<br>साहित्य :नाही<br>पद्धत : मुलांना गोलाकार बसवून "रोहनची शाळा" असे म्हणा आणि शाळा म्हटल्यानंतर टाळी मारा. सुचविलेल्या प्रत्येक शब्दाला टाळी मारणे असे सांगणे. आवश्यकता असल्यास पुनरावृत्ती करणे. मुलांनी अनुकरण करणे. मुलांना प्रत्येक शब्दाला टाळ्या मारण्याचा सराव झाल्यानंतर मोठी आणि जास्त आवड असणारी वाक्ये किंवा मुलाचे नाव असणारे वाक्य वापरणे. उदा. मीराचे सुंदर हसणे. ही कृती आनंददायी होण्यासाठी एकच शब्द पुन्हापुन्हा येईल असे वाक्य वापरा.<br>2 री व 3 री साठी: वाक्यातील 2 – 3 शब्दांना टाळ्या मारणे. |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य: शब्द संपत्तीचा विकास, स्वअभिव्यक्ती,अभिनय वाचन<br>कृती : चित्र वाच (विकासात्मक ध्येय - 2)<br>साहित्य: विविध घटना,स्थळ,यात्रा,मेळावा यांचे चित्र. उद्यान/बाजारपेठ /शाळा/प्राणी संग्रहालय/उत्सव इ. चित्रे.<br>पध्दत: मुलांचे एक लहान व एक मोठा असे गट करणे.मुलांनी पाहिलेल्या चित्रांचे निरीक्षण करून त्याबद्दल विवरण देण्यास सांगणे. ते समजून सांगण्यासाठी शिक्षकांनी विविध वर्तमान पुस्तके, नियतकालिके इ. वापर करणे. स्पष्टीकरण देताना मुलांचे वय, अभिवृद्धीच्या आवश्यकता आणि मुलाच्या सभोवतालच्या वातावरणावर लक्ष्य केंद्रित करणे. एखाद्या प्रसंगाबद्दल प्रश्न विचारताना मुलांना त्याच्या स्वत:च्या अनुभवाशी जुळून घेण्यास शिकविणे. मुलाला प्रश्न विचारून संभाषणात गुंतवून ठेवल्याने दिलेल्या विषयावर लक्ष्य केंद्रित करण्यास आणि त्याचे स्वत: चे अनुभव सांगण्यास मदत होते. काही घटना दाखवून शिक्षक योग्य प्रश्न विचारीत प्रोत्साहित करणे.<br>काही घटना दाखवून शिक्षक खालील प्रमाणे प्रश्न विचारु शकतात.<br>➢ तुम्ही अशा ठिकाणी कधी गेला आहात का?<br>➢ ही परिस्थिती तुम्हाला कशाची आठवण करून देते.<br>या चित्रातील लोक काय करत आहेत? इ |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य: हात-डोळे यांचे संतुलन, लेखनाचा सराव, सृजनशील अभिवृद्धी<br>कृती: 2 मुक्त चित्र रचणे. (विकासात्मक ध्येय-2) ECW-6<br>उद्देश:<br>○ लेखन कौशल्य प्रस्थापित करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ○ डोळा-हात समन्वय कौशल्याचा विकास करणे.<br>○ क्रियात्मक अभिवृद्दीला संधी देणे.<br>○ सृजन शील अभिवृद्धीला प्रात्साहन देणे.<br>साहित्य: क्रेयोन्स, रंगीत पेन्सिल, मार्कर, कागद,<br>पध्दत: कागदावर मुक्तपणे चित्र काढण्यासाठी/लिहिण्यासाठी, रंग भरण्यासाठी संधी देणे. काढण्याबद्दल बोलण्यास सांगणे. योग्य प्रश्न विचारून चित्राबद्दल माहिती मिळविणे.<br>2 री व 3 री साठी: मुलांनी त्यांना आवडणारे चित्र/प्रसंग काढून त्याबद्दल 4-5 वाक्ये लिहिण्यास सांगणे. |
| | | | लेखनाचा नमुना:<br>शिक्षकांनी मुलांसमोर मुलाचे ,मुलांनी काढलेल्या चित्राचे नाव इ फळ्यावर लिहिणे.लिहिण्याचा योग्य क्रम मुलांना पाहण्यास देणे.<br>तसेच जे काही फळ्यावर लिहितात ते सर्व मुलांच्या समोर लिहिणे. |
| | मैदानी खेळ | | कृती: संगीत- रंग.<br>सामर्थ्य: सूक्ष्म स्नायू चलन कौशल्य लिहिणे.<br>साहित्य: खुर्च्या<br>पध्दत: संगीत खुर्चीप्रमाणे खेळ खेळविणे. खुर्च्यांवर रंगीत कागद चिकटविणे. शिक्षकाने खेळातील खुर्चीवर बसलेल्या एका मुलाचे नाव घेऊन त्याला आलेल्या कागदाचा रंग कोणता ते ओळखण्यास सांगणे.<br>2 री व 3 री च्या मुलांनी ही कृती पुढे चालविणे. |
| | रंजक कथा<br>(कथेची वेळ) | | पद्धत:<br>* पहिल्या दिवसाच्या उद्देशाप्रमाणे कथा पुढे चालू ठेवणे .<br>* कथा सांगितल्यानंतर साधे प्रश्न विचाराने.<br>उदा: आजोबांनी काय दिले? कोणाला दिले? असे... |
| | पुन्हा भेटू | | ● या दिवसातील कृतींचे स्मरण करा.<br>● या दिवसात केलेल्या कृती पालकासोबत करण्यास सांगणे.<br>● मुलांना आनंद वाटेल अशा कृती घ्या.<br>● उदा. म अक्षरापासून सुरु होणाऱ्या घरातील वस्तूंची नावे लक्षात ठेऊन घेऊन सहकाऱ्यासोबत चर्चा/खेळ खेळण्यास सांगणे.<br>● मागे घडलेला एखादा सुखदायक प्रसंग/घटना सांगण्यास सांगणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती


## आठवडा - 9 दिवस – 51 (बुधवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 51 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण | 49व्या दिवसाची पहिली कृती करणे. |

| | | |
|---|---|---|
| | (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 49व्या दिवसाची कृती: परिसराचा फेरफटका<br>50 व्या दिवसाचे गाणे सांगून साधे प्रश्न विचाराने. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | अध्ययन सिद्धतेसाठी पहिल्या टप्प्यातील कोपरावार कृतींबद्दल आणि सदर कोपर्यामधील साहित्य वापराचा मुलांना परिचय करून देणे. मुलांना प्रश्न विचारून आकलन झाल्याची खात्री करून घेणे.(कृती कोपरावार सल्लात्मक कृती देण्यात आल्या असून सामर्थ्य साध्य करण्यासाठी मुलांना अनुकूल कृतींची रचना शिक्षक करू शकतात.)<br>*********************************************************************<br>**बिल्डींग ब्लॉक्स कोपरा :**<br>सामर्थ्य : डोळे आणि हात यांचा समन्वय साधने.<br>कृती: चढती चढूया<br>उद्देश: एकाग्रता, समर्पकता आणि आत्मविश्वास वाढविणे.<br>साहित्य: अध्ययन कीट मधील बिल्डींग ब्लॉक्स. (उपलब्ध नसल्यास साबणाचे BOX, माचीस डबा इ.)<br>पद्धत: उपलब्ध साहित्य एकावर एक ठेवून मनोरा पद्धतीने जोडणे..<br>2 री व 3 री साठी: वरील कृती करणे.<br>***************************************************************************<br>**गणित कोपरा :**<br>सामर्थ्य: वस्तूंचे आकारमान उंच- ठेंगू, जड – हलके, याप्रमाणे वस्तूंचे वर्गीकरण करणे.<br>कृती: फाशांचा खेळ<br>उद्देश : ठराविक ध्येय साध्य करण्यासाठी सशक्त होणे.<br>साहित्य: चित्रात दाखविलेल्या प्रमाणे विविध संख्यांच्या टिपक्यांचा तक्ता, मनी<br>पद्धत : सदर तक्ता जमिनीवर ठेवणे. डायस जमिनीवर टाकल्यानंतर फास्यावर येणार्या टीपक्याएवढे मनी चार्टवर असणाऱ्या गोलात ठेवणे.<br>2 री व 3 री साठी: डायस जमिनीवर टाकल्यानंतर फास्यावर येणार्या टीपक्याएवढे मनी चार्टवर असणाऱ्या गोलात ठेवून संख्या वाचणे.<br>***************************************************************************<br>**अन्वेषण/ विज्ञान कोपरा :**<br>सामर्थ्य: वैज्ञानिक अन्वेषण , चिंतन मनोभाव वाढीस लागणे.<br>कृती: तहानलेला कावळा<br>उद्देश: पाण्यामध्ये वस्तू टाकल्यानंतर पाण्याच्या पातळीत होणार्या बदलाचे निरीक्षण करणे.<br>साहित्य: पात्र , पाणी, लहान खडे<br>पद्धत: ( वि.प्र. आणि इ. 2 री 3 री)<br>पाण्याने भरलेल्या पात्रात खडे टाकल्यानंतर पाण्याच्या पातळीत होणारा बदलाचे निरीक्षण करणे.<br>काठोकाठ पाण्याने भरलेल्या पात्रात खडे टाकल्यानंतर पाण्याच्या पातळीत होणारा बदल निरीक्षण करणे.<br>******************************************************************<br>**बाहुली कोपरा:** |

| | | |
|---|---|---|
| | | सामर्थ्य: सौन्दर्योपासना, व्यक्तिगत स्वच्छता, अभिव्यक्ती कौशल्य वाढविणे.<br>कृती: मीच बाहुली<br>उद्देश: निर्दिष्ट विषयाबद्दल अभिरुची वाढविणे.<br>साहित्य: गाय, वाघ, हत्ती, मोर,कब्बुतर आणि इतर प्राणी पक्षांच्या बाहुल्या.<br>पद्धत: वि. प्र.<br>कोपर्यात  बाहुल्यांतून एक बाहुली निवडून बाहुलीबद्धल 2-3 वाक्य सांगणे. (सिंहाची बाहुली(टेडीबेअर)असल्यास मी सिंह मी जंगलात राहतो, मी मांस खातो.अशा पद्धतीने वर्णन करणे .)<br>2 री व 3 री साठी:<br>कोपर्यात उपलब्ध बाहुल्यांतून स्वत: आपल्या मित्राबरोबर एकेक बाहुली घेऊन आपापल्या बाहुलीबद्दल सांगणे.<br>*******************************************************************************<br>**वाचन कोपरा/ वर्ग वाचनालय कोपरा :**<br>सामर्थ्य: चित्राचे वाचन करून अर्थ समजून घेणे. कल्पनाशक्ती, अभिव्यक्ती सामर्थ्य वाढविणे.<br>कृती: चित्रमालिका वाचन<br>उद्देश: चित्रमालिका समजून घेणे आणि अभिव्यक्त होणे.<br>साहित्य: साध्या सोप्या गोष्टींचे सरणी चित्र, चित्र कथा मालिका<br>पद्धत: : ( वि.प्र. आणि इ. 2 री 3 री)<br>परिचित गोष्टीची चित्रमालिका देऊन चित्रे दाखवत कथा मुलांना सानाजावून सांगणे आणि चित्रे जोडणे.<br>*******************************************************************************<br>**कलागृह / हस्तकला कोपरा:**<br>सामर्थ्य:  स्थूल स्नायू चलन कौशल्य वाढविणे, सौन्दर्योपासना, सृजनाशिलाता  वाढविणे.<br>कृती : दोरा आणि रंगांच्या मदतीने नक्षी तयार करणे.<br>उद्देश: दिलेल्या सूचना समजून घेऊन कार्य करणे.<br>साहित्य: कागद, दोरा, रंग<br>पद्धत:  ( वि.प्र. आणि इ. 2 री 3 री)<br>पांढरा कागद अर्ध्या भागामध्ये दुमडणे व परत कागद उघडून दोरा रंगात बुडवून मध्यभागी ठेवणे. नंतर दोरा सावकाश वेगवेगळ्या दिशेने ओढून नक्षी तयार करणे. ( शिक्षकांनी ही  कृती करण्याआधी  2-3 वेळा त्यांना प्रात्यक्षिक  कृती करून दाखवणे )<br>***************************************************************************<br>**लेखन कोपरा:**<br>सामर्थ्य: लिहिण्याच्या पध्दतींचा सराव करण्याबरोबर अक्षरांच्या आकृतीबंधांची  रचना करणे.<br>कृती: अक्षर आकृतिबंध  रचना<br>उद्देश: दिलेल्या अक्षराचा नमुना वापरून ठसे उमटविणे.<br>साहित्य: अक्षरांचा नमुना , कागद आणि चित्रकला पेपर.<br>पद्धत: वि. प्र.<br>अक्षरांचा नमुना वापरून नक्कल करणे.<br>2 री व 3 री : नक्कल केलेल्या अक्षरापासून सोप्या शब्दांची रचना करणे.<br>उदा:  मराठी- क-म-ळ   - कमळ ,इंग्रजी  c-a-t   - cat.<br>*********************************************************************************<br>**खेळणी / करा व शिका कोपरा:** |

| | | |
|---|---|---|
| | | **सामर्थ्य: आलोचना शक्ती, सृजनशीलता, स्वतंत्रपणे काम करणे.**<br>**कृती: जमिनीतून पिक**<br><br>**उद्देश: परिसर प्रेमाबरोबर शेतीची संकल्पना समजाविणे.**<br>**साहित्य: पारदर्शक प्लास्टिकचे भांडे, माती , पाणी, धणे (कोथिंबीर बी ), जोंधळा, आणि मुलांच्या नावाच्या चिठ्या आणि डिंक.**<br>**पद्धत: ( वि.प्र. आणि इ. 2 री 3 री)**<br>**प्रत्येक भांड्याला एका मुलाचे नाव चिकटविणे, अर्ध्यापर्यंत माती भरणे तळाला बारीक छिद्र करणे, बीज मातीत घालणे,रोज थोडे थोडे पाणी शिंपडणे,दिवसागणिक मातीच्या वरील भागात दिसून येणाऱ्या बदलांचे किंवा अंकुरांचे निरीक्षण करणे.** |
| | **पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शक कृती)** | **सामर्थ्य: वजन करण्याची कृती समजून घेणे.**<br>**कृती 13 B: परस्पर वजन करू. (विकासात्मक ध्येय1)**<br>**उद्देश: वजन करण्याची कृती समजून घेणे.**<br>**साहित्य: वजनाची मापने.**<br>**पध्दत:**<br>**एका मुलाला वजन काटयावर उभे करून दुसर्या मुलाला वजनाकडे लक्ष ठेवण्यास सांगणे. मुलांनी सांगितलेल्या वजनाची नोंद शिक्षकांनी ठेऊन चर्चा करून वर्गात प्रदर्शित करणे.आरोग्यकारक आहाराच्या सवयीमुळे मुलांची चांगली वाढ होते हे समजावून सांगणे.**<br>**2 री : धान्याचे वजन करून मुलाकडून वजन सांगणे.**<br>**3 री आपल्या मित्राचे वजन करून परस्पर तुलना करण्यास सांगणे.** |
| | **सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती)** | **सामर्थ्य: अडचणीशिवाय दोऱ्यापासून चित्राची रचना करणे.**<br>**कृती: ४४ दोऱ्यापासून चित्राची रचना करणे. (विकासात्मक ध्येय -1)**<br>**उद्देश:**<br>**सूक्ष्म स्नायूचा विकास.**<br>**हात आणि डोळे यांचा समन्वय साधने.**<br>**अडचणीशिवाय दोऱ्यापासून चित्राची रचना करण्याचा आत्मविश्वास निर्माण करणे.**<br>**साहित्य: दोरा , रंग, कागद**<br>**पध्दत: मुलांना गोलाकार बसविणे. प्रत्येकाला लांब 3 दोरे द्या.एक लाल रंगत,दुसरा निळ्या व तिसरा पिवळ्या रंगत बुडवा.दुमडलेल्या पांढर्या कागदावर विविध आकृतीत दोरे ठेवा. नंतर दुमडलेला कागदाचा दुसरा भाग त्यावर ठेवा. हळुवार दोरे बाहेर काढा आता कागद उघडून वेगवेगळ्या रंगाच्या आकृत्या तयर होतील.**<br>**2 री व 3 री : वरील कृती करण्यास सांगणे.** |
| | **भाषा विकास आणि**<br>**ऐकणे व बोलणे** | **सामर्थ्य : सृजनात्मक स्वयंअभिव्याक्ती , ध्वनी विज्ञानाची जाणीव,प्रास शब्दांची परिकल्पना, शब्द संपत्तीची अभिवृद्धी**<br>**कृती 3 A: लयबध्द गीत (अभिनय गीत ) गाऊ.(विकासात्मक ध्येय – 2 ) ECL-20**<br>**उद्देश: 1) अभिनयासहीत गाणे.**<br>**2) ध्वनी उच्चारांचे निरीक्षण**<br>**3) लयबध्द शब्दांचे संकलन.**<br>**पध्दत:** |

| | | | |
|---|---|---|---|
| | पा<br>या<br>भूत<br>सा<br>क्षर<br>ता | | 1) मुलांना गोलाकार उभे करून नवीन अभिनय गीत,लयबध्द गीत किंवा कविता सांगणे.<br>2) शिक्षकांनी सांगितलेले अभिनय गीत,प्रास गीत किंवा कविता योग्य अनुकारानासाहित पुनरुच्चार करणे.<br>3) अभिनायासाहित गीत गावून मुलानाचे मनोरंजन करणे.<br>4) मुलांना परिचित अभिनय गीत,प्रास गीत किंवा कविता संबंधित चित्रे प्रदर्शित करणे.<br>5) नवीन प्रास शब्द सांगण्यास प्रोत्साहित करणे.<br>6) अभिनय गीत किंवा कवितेत येणारी प्रमुख पात्रे,वस्तू, याबद्दल चर्चा करणे.<br>2 री : लयबध्द शब्द ओळखून प्रत्येक प्रास शब्दाला नवीन प्रास शब्द जोडण्यास सांगणे.<br>3 री: वेगवेगळया लयबध्द गीतांचा संग्रह करून त्यामधील लयबध्द शब्द ओळखणे. |
| | | आक<br>लना<br>सहीत<br>वाचन | सामर्थ्य:<br>शब्द ओळखणे , छापील मजकुराची ओळख, आकलन, शब्द संपत्तीची अभिवृद्धी.<br>कृती: नावाचे जग (विकासात्मक ध्येय-2 )<br>उद्देश : परिचित परिसरातील वस्तूचा लेखन संकेताबरोबर संबंध जोडणे. पाठ्य आणि वस्तू एकच आहेत या निष्कर्षापर्यंत येऊन वाचनामध्ये आवड निर्माण करणे.<br><br><br>साहित्य: वही, चार्ट पेपर, पेन्सिल, क्रेयोन्स इ. आजूबाजूच्या वस्तू.<br>पध्दत:<br>▪ मुलांच्या मदतीने आजूबाजूच्या परिचित/सामान्य वस्तूंच्या नावाची यादी करणे. उदा. टेबल , खुर्ची, पेन, पेन्सिल इ.<br>▪ तयार असलेल्या नावाच्या पट्ट्या त्या वस्तूवर चिकटविणे.<br>▪ अशाच प्रकारच्या आणखी एक एक नावाच्या पट्ट्या तयार करून ठेवणे.<br>▪ तयार झालेल्या नावाच्या पट्ट्या वर्गात प्रदर्शित करून मुलांना वाचण्यास सांगणे.<br>▪ शब्द वाचल्यावर मुलाने त्या वस्तूसमोर जाणे.<br>▪ कमीत कमीत 4 – 5 वस्तुंची नावे सांगण्याची संधी देणे.<br>▪ ‘ते’ शब्द गोष्टीमध्ये ओळखण्याची संधी देणे.<br>▪ चित्रासहीत नामफलक तयार करणे, कृतीच्या ठिकाणी मुलांना ओळखून वाचण्यास संधी देणे.<br>इयत्ता 2 री व 3 री<br>कथेमध्ये आलेल्या मुख्य शब्दांची यादी तयार करणे.<br>लक्ष्यात ठेवा: या मागील कृतीमध्ये आलेले शब्द सोडून वेगवेगळी स्थळे , प्रसंगांमध्ये आलेले शब्द वापरून ही कृती करून घेणे. |
| | | उद्देश<br>पूर्वक<br>लेखन | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चलन कौशल्य अभिवृद्धी. अक्षर ओळखणे.<br>कृती 36: ठीपके जोड – अंक लिही ( लक्ष्य : 2) ECW-17<br>उद्देश:<br>सूक्ष्म स्नायू चलन कौशल्य विकसित करणे.<br>अक्षर ओळखणे.<br>टिपक्यापासून अंक तयार करणे.<br>आवश्यक साहित्य:वही,पेन्सिल,फळा, खडू<br>पध्दत:<br>1)मुलांना ठीपके वापरून 1,2,3,4,5, लिहिण्याची पध्दत लिहून दाखविणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 2)मुलांना 1,2,3,4,5, या अंकांचे ठीपके जोडण्यास सांगणे.<br>इयत्तावर विवरण :<br>इयत्ता 2 री च्या मुलांना कोणत्याही 1- 5 अंकांचेचे ठीपके जोडून लिहिण्यास सांगणे. इयत्ता 3 री च्या मुलांना 1-10 अंकांचे ठीपके जोडून जोडून अंक लिहिण्यास सांगणे. ( 57 दिवसाच्या पुढील भाग ) |
| | | | लेखनाचा नमुना:<br>शिक्षकांनी मुलांसमोर मुलाचे ,मुलांनी काढलेल्या चित्राचे नाव इ फळ्यावर लिहिणे.लिहिण्याचा योग्य क्रम मुलांना पाहण्यास देणे.<br>तसेच जे काही फळ्यावर लिहावयाचे असेल ते सर्व मुलांच्या समोर लिहिणे. |
| | मैदानी खेळ | | कृती: संगीत- अंक.<br>सामर्थ्य: सूक्ष्म स्नायू चलन कौशल्य लिहिणे.<br>साहित्य: खुर्च्या<br>पध्दत: संगीत खुर्चीप्रमाणे खेळ खेळविणे. खुर्च्यांवर अंकांचे कार्ड चिकटविणे. शिक्षकाने खेळातील खुर्चीवर बसलेल्या एका मुलाचे नाव घेऊन त्याला आलेल्या अंक कोणता ते ओळखण्यास सांगणे.<br>2 री व 3 री च्या मुलांनी ही कृती पुढे चालविणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शीर्षक : ग्र्यांडपाज (आजोबांची भेट) गिफ्ट<br>उद्देश:<br>➢ ऐकण्याचे सामर्थ्य वाढविणे.<br>➢ विचार शक्ती वाढविणे.<br>➢ अंदाज करण्याचे कौशल्य वाढविणे.<br>➢ प्रश्न विचारण्याची वृत्ती वाढविणे.<br>पध्दत:<br>○ शिक्षकांनी कथेचे साहित्य प्रदर्शित करून मातृभाषेमध्ये कथा सांगणे.<br>○ मोठ्या मुलांना कथेतील पात्रांची नावे सांगण्यास सांगणे.<br>○ कथेतील पात्राचे नाव सांगितल्यानंतर लहान मुलांना पात्राची चित्रे ओळखण्यास सांगणे.<br>○ त्यानंतर शिक्षकांनी मातृभाषेमध्ये व इंग्रजीमध्ये कथा सांगणे. |
| | पुन्हा भेटू | | • या दिवसातील कृतींचे स्मरण करणे.<br>• या दिवसात केलेल्या कृती पालकासोबत करण्यास सांगणे.<br>• मुलांना आनंद वाटेल अशा कृती घेणे.<br>• उदा. म अक्षरापासून सुरु होणाऱ्या घरातील वस्तूंची नावे लक्षात ठेऊन घेऊन सहकाऱ्यासोबत चर्चा/खेळ खेळण्यास सांगणे.<br>• मागे घडलेला एखादा सुखदायक प्रसंग/घटना सांगण्यास सांगणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा - 9** **दिवस – 52 (गुरुवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 52 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | 51 व्या दिवसाची कृती घेणे. |
| | | दिवस 49 ची कृती : निसर्ग पर्यटन<br>इंग्रजी लयबध्द गीत सांगणे.<br>**Parts Of a Plant**<br>The roots on a plant grow under ground,<br>Underground under the ground,<br>Roots are part of a plant.<br><br>The stems on a plant hold up the leaves,<br>Up the leaves, up the leaves,<br>Stems are part of plant.<br>Leaves are part of plant. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी अध्ययन कोपऱ्यात जाऊन कृती करणे. शिक्षकांनी मार्गदर्शन करणे.. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य: प्रमाणित नसलेले मापन(रूढ अथवा पूर्वीपासून चालत आलेली मापने). निरीक्षण.<br>कृती: 30 दोन भांड्यांच्या क्षमताची तुलना करणे.<br>उद्देश- अनेक एकाच्या भांड्याची माहिती करून घेणे<br>साहित्य – वेगवेगळ्या आकाराची भांडी, चार वाट्या, रंगीत पाणी<br>पध्दत- दोन वेगवेगळ्या आकाराची भांडी घेऊन त्यांना अ आणि ब अशी नावे देऊन अ भांड्यात चार तांबे पाणी ओतणे. आता ब भांडे पाण्याने भरणे. ब भांडे फक्त दोन तांब्याने भरेल. अ भांड्यापेक्षा ब भांड्यात कमी पाणी भरेल. हे समजाऊन सांगणे.<br>इ. 2 री वेगवेगळ्या मापाची नावे सांगण्यास सांगणे.<br>इ. 3 री विविधप्रकारच्या मोजमापाचा वापर करून दैनंदिन जीवनात त्यांचा वापर कसा करावा हे सांगणे. |
| | सृजनात्मक | सामर्थ्य- सूक्ष्म स्नायू चलन कौशल्याचा विकास . सृजनाशिल अभिव्यक्ती |

| | | | |
|---|---|---|---|
| | कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्य (मुलांची कृती) | | कृती 49 – कापणे.<br>उद्देश – कात्री धरून कागद कापून चीकटविण्याची कला समजून घेणे.<br>हात आणि बोटांची कुशलता याबरोबर एकाग्रता वाढविणे.<br>साहित्य: कात्री , रंगीत कागद आणि डिंक<br>पध्दत: मुलांना एका हाताने कात्री आणि दुसऱ्या हाताने पेपर धरण्याचे प्रात्यक्षिक दाखविणे.<br>बोटाने कात्री घट्ट पकडण्याचा सराव करून घेणे. प्रत्येक मुलांना कॅलेंडरचे पान देऊन त्यातील संख्या कापण्यास सांगणे. मुलांना जुनी पुस्तके/मासिकातील ठळक अक्षरे कापण्यास सांगणे. आपल्या आवडीचे अंक किंवा अक्षरे रंगीत पेपर वर चिकटविण्यास सांगणे.<br>सूचना: मुलांना योग्य असणारी कात्री वापरण्यास सांगणे. शिक्षकांनी मुलाकडे लक्ष देणे. मुलांनी घ्यावयाची काळजी समजावून देणे.<br>इयत्ता 2 री आणि 3 री ला झिगझ्याग किंवा वेगवेगळ्या आकारात कागद कापण्यास सांगणे.त्यानंतर ते एका कार्डवर अथवा खाली कागदावर चिकटवून कोलाज काम करण्यास सांगणे.<br>वापरायच्या सराव वर्कशीट : H.W.-13 ( 01, 02,03 री.) |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य: ध्वनी संकेतांची ओळख, अक्षर शब्द सहसंबंध<br>कृती 20 : नावाच्या पहिल्या अक्षरापासून वस्तूंची नावे शोधणे.(विकासात्मक ध्येय -2 ) ECL – 2 ( 46 व दिवसापासून चालू ठेवणे.)<br>उद्देश:<br>ध्वनी संकेताबद्दल जागरूकता वाढविणे.<br>अक्षरे आणि शब्दामधील परस्पर संबंध समजून घेणे.<br>शब्द समजून घेऊन ओळखणे.<br>अंताक्षरी शब्द लिहिणे.<br>साहित्य: नाही<br>पध्दत: कोड्याच्या रुपात विद्युत उपकरणांची नावे ओळखून सांगण्याची कृती घेणे.उदा: माझ्या मनातील विद्युत उपकरण जगातील माहिती एका क्षणात देते. त्याचे नाव ‘दु’अक्षरापासून सुरु होते.असे सांगितल्यानंतर मुले ‘दूरदर्शन’ म्हणून ओळखतात. अशी वेगवेगळी उदाहरणे देणे.<br>2 री व 3 री साठी: शब्दांचा पुढील भाग म्हणून मुलांना वाक्य रचना करण्यास सांगणे. ( 64 दिवसापासून चालू ठेवणे)<br>वापरायच्या सराव वर्कशीट : EC-13 ( 01, 02,03 री.) |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य: लक्ष देणे आणि ऐकणे.<br>अनुक्रमिक विचार स्थूल स्नायू कौशल्य विकास.<br>कृती: 19 आवाजातील फरक विकासात्मक ध्येय-2)<br>उद्देश:<br>➢ मुलांनी शब्द ऐकून आवाजातील फरक ओळखणे.<br>साहित्य: खडू, मार्कर, तेलकट खडू, संख्या लिहिलेला तक्ता.<br>पध्दत: शिक्षकांनी फळ्यावर तीन एकाच लयीचे शब्द व एक वेगळ्या लयीचा शब्द लिहून मोठ्याने वाचणे. त्यामधील वेगळ्या ध्वनीतील शब्दांची ओळख करून देणे.<br>उदाहरणात पट,पदक , चरक , पुस्तक. यातील वेगळा शब्द कोणता? असे विचारणे.मुलांनी ओळखलेला शब्द चार्ट वर लिहिणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 2 री व 3 री इयत्तेसाठी : मुलांना लयबध्द शब्द वाचण्यास सांगणे. उदा. वाच-नाच , सात – भात |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य: उद्देशपूर्वक लेखन, निरीक्षण ,कल्पनाशक्ती ,सृजनशील विचार,परिसराची जाणीव.<br>कृती: हवामान नकाशा ( विकासात्मक ध्येय-2) ECW 16 (46 दिवसापासून सुरु)<br>उद्देश:<br>➢ उद्देशीत लेखनाचा सराव करणे.<br>➢ निरीक्षण कौशल्य विकसित करणे.<br>➢ सृजनशील विचारणा प्रात्साहन देणे.<br>➢ परीसराची जाणीव निर्माण करणे.<br>साहित्य: कागद,पेन्सिल<br>पध्दत:<br>○ आठवड्यातील दिवसांबद्दल वर्गात मुलांशी चर्चा करणे.<br>○ आठवड्याच्या दिवसांची यादी वर्गात प्रदर्शित करणे.<br>○ गटकृती दरम्यान त्यादिवशीचे हवामान ओळखण्यास सांगणे.<br>○ याबद्दल मुलाशी चर्चा करून रिकामा कागद देऊन त्यादिवशीचे हवामान चित्र काढण्यास सांगणे.<br>○ मुलांचे काम वर्गात प्रदर्शित करणे.<br>2 री व 3 री साठी : मुलांनी त्यांच्या पुस्तकातील हवामान तक्त्यात आपली निरीक्षणे नोंद करणे. (56 व्या दिवसापासून चालू करणे.) |
| | | | लिखाणाचा नमुना:<br>शिक्षकांनी मुलांसमोर मुलाचे ,मुलांनी काढलेल्या चित्राचे नाव इ फळ्यावर लिहिणे.लिहिण्याचा योग्य क्रम मुलांना पाहण्यास सांगणे.<br>तसेच जे काही फळ्यावर लिहावयाचे असेल ते मुलांसमोर लिहिणे.. |
| | मैदानी खेळ | | कृती: संगीत अक्षरे.<br>सामर्थ्य: सूक्ष्म स्नायू चलन कौशल्य लिहिणे.<br>साहित्य: खुर्च्या<br>पध्दत: संगीत खुर्चीप्रमाणे खेळ खेळविणे. खुर्च्यांवर अक्षरांचे कार्ड चिकटविणे. शिक्षकाने खेळातील खुर्चीवर बसलेल्या एका मुलाचे नाव घेऊन त्याला आलेले अक्षर कोणते ते ओळखण्यास सांगणे.<br>2 री व 3 री च्या मुलांनी ही कृती पुढे चालविणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शीर्षक : ग्र्यांडपाज गिफ्ट (आजोबांची भेट)<br>साहित्य: बाहुल्या<br>उद्देश:<br>➢ ऐकण्याचे सामर्थ्य वाढविणे.<br>➢ विचार शक्ती वाढविणे.<br>➢ सृजनशीलता वाढविणे.<br>➢ प्रश्न विचारण्याची वृत्ती वाढविणे.<br>पध्दत: |

| | | |
|---|---|---|
| | | ○ शिक्षकांनी मातृभाषा आणि इंग्रजी मध्ये अर्थ सांगणे.<br>○ कथेतील पात्राचे नाव सांगितल्यानंतर लहान मुलांनी पात्रांची चित्रे दाखविण्यास सांगणे.<br>○ त्यानंतर शिक्षकांनी इंग्रजीत कथा सांगणे.<br>○ आता मुलांना मराठीत प्रश्न विचारणे..<br>○ बाहुल्यांचे प्रदर्शन करून त्यांची ओळख एकदा मातृभाषेत आणि नंतर इंग्रजीत भाषेत करणे.<br>○ कथा सांगितल्यानंतर साधे प्रश्न विचारणे. |
| | पुन्हा भेटू | ● आजच्या दिवशी मुलांनी केलेल्या कृतींचा सराव करणे.<br>● आजच्या दिवशी मुलांनी केलेल्या सर्व कृती पालक व कुटुंबातील सदस्यांसोबत चर्चा करण्यास प्रोत्साहित करणे.<br>● मुलांसाठी मनोरंजक कृती करणे.उदा. म अक्षरापासून सुरु होणाऱ्या घरातील वस्तूंची नावे लक्षात ठेऊन सहकाऱ्यासोबत चर्चा/खेळ खेळण्यास सांगणे.<br>● मागे घडलेला एखादा सुखदायक प्रसंग/घटना सांगण्यास सांगणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 9 दिवस – 53 (शुक्रवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 53 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | 49 व्या दिवसाची 1 ली कृती करणे.<br><br>कृती 2 :<br>1. रेल्वे टाळ्या मारण्यास सांगणे.<br>2. मुलांना रेल्वेच्या टाळ्या वाजवित वर्तुळाकार उभे राहण्यास सांगणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 49 व्या दिवसाची कृती :<br>❖ परिसरात फिरण्यास सांगणे.<br>❖ इंग्रजी लयबध्द गीत म्हणण्यास सांगणे. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी अध्ययन कोपऱ्यात जावून क्रिया करणे. शिक्षकांनी मार्गदर्शन करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता | सामर्थ्य: तुलना, समायोजन वर्गीकरण, आकार आणि प्रमाणाची संकल्पना, पर्यावरण जागरुकता<br>कृती 18 : तुलना करणे. (विकासात्मक ध्येय -3)<br>उद्देश: आकार आणि प्रमाणाची तुलना करणे.<br>साहित्य : विविध मापने, पेन्सिली, नाणी, विविध आकाराच्या वस्तू, भाज्या आणि फळांच्या प्रतिकृती,भांडीं इत्यादी.<br>पध्दत: प्रथम स्ट्रो, पेन्सिल, नाणी, फळे , भाज्या,आणि इतर वस्तू घेऊन साधी तुलना करणे.आकार आणि प्रमाण |

| | | | |
|---|---|---|---|
| | आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | | दोन्हींची तुलना अंतर्निहित करून आकाराने प्रारंभ करा आणि मोठे – लहान ओळखणे. त्यांना गटातील सर्वात उंच मुलगा , सर्वात लांब खडू / काठी इ. ओळखण्यास सांगा. ही तुलनात्मक क्रिया उंचीशी संबंधित असल्याची खात्री करणे. आयताकृती खोडरबर घेऊन त्याची पुस्तकाशी तुलना करणे आणि सफरचंदाची चेंडूशी तुलना करणे. ( उंचीची आयताकारशी किंवा आयताकारची उंचीशी तुलना करू नका.) आकारातील फरक स्पष्ट असावा. त्याचप्रमाणे कोणत्याही एका मोठ्या वस्तूच्या वजनाबरोबर कोणकोणत्या लहान वस्तूचे वजन समान आहे याची तुलना करणे.<br>इयत्ता- 2 री<br>1. काकडी आणि कांदा यांच्या मधील जड आणि हलका हा फरक ओळखण्यास सांगणे.<br>2. मुळा आणि शेवग्याच्या शेंगा यांच्या लांब आणि लहान हा फरक ओळखण्यास सांगणे.<br>इयत्ता- 3 री<br>जाड-बारीक, उंच – ठेंगू, जड- हलका यांची उदाहरणे सांगून लिहिण्यास सांगणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | | सामर्थ्य: स्थूल आणि सूक्ष्म स्नायू वळण कौशल्याची अभिवृद्धी, सृजनशीलता आणि सौंदर्यप्रज्ञेचा विकास.<br>कृती 49 A: अक्षरे आणि संख्याचे कात्रण करणे.<br>उद्देश:<br>• कात्री धरून, कागद कापणे आणि चिकटवण्याचे कौशल्य समजावून देणे.<br>• हात आणि बोटे यांची कुशलता वाढवून एकाग्रता विकसित करणे.<br>• अक्षर आणि संख्या रेखाचीत्राप्रमाणे कापणे.<br>साहित्य: कात्री, रंगीत पेपर , डिंक आणि दिनदर्शिका (कॅलेन्डर)<br>पध्दत: मुलांना एका हाताने कात्री आणि दुसऱ्या हाताने पेपर धरण्याचे कौशल्य दाखवा.<br>बोटाने कात्री घट्ट पकडण्याचा सराव करून घेणे. प्रत्येक मुलांना कॅलेंडरचे पान देऊन त्यातील संख्या कापण्यास सांगणे. मुलांना जुनी पुस्तके/मासिकातील ठळक अक्षरे कापण्यास सांगणे. आपल्या आवडीचे अंक किंवा अक्षरे रंगीत पेपरवर चिकटविण्यास सांगणे.<br>सूचना: मुलांना योग्य असणारी कात्री वापरण्यास सांगणे. शिक्षकांनी मुलाकडे लक्ष देणे. मुलांनी घ्यावयाची काळजी समजावून देणे.<br>इयत्ता 2 री आणि 3 री ला दोन-तीन अंकी / 3-4 अक्षरी शब्द कॅलेंडर / पुस्तक/ मासिकमधील कागद कापण्यास सांगणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षर | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य: शब्द संपत्तीची अभिवृद्धी, तर्क करणे, गटातील सदस्यांबरोबर सहकार्याने कार्य करणे.<br>कृती 6 A: मला शोधा. ( विकासात्मक ध्येय-2 ) ECL 12<br>उद्देश:<br>• योग्य शब्दाची रचना करणे.<br>• सांघिक भावना विकसित करणे.<br>• सूचनांचे काळजीपूर्वक पालन करणे.<br>• शब्द संपत्ती विकसित करणे.<br>साहित्य: परिचित वस्तू , प्राणी , पक्षी यांची चित्रे.<br>पध्दत: चित्रांच्या दृक पट्ट्या एका पेटीमध्ये घालून ठेवणे.वर्गातील एक एक मुलाला बोलावून पेटीतील एक एक दृक पट्टी उचलून चित्राचे नाव सांगण्यास सांगणे. मुलाने ओळखलेल्या चित्राबद्दल चर्चा करणे. अशाच पद्दतीने ही कृती पुढे चालू ठेवणे.<br>इयत्ता 2 री साठी : मुलाने स्वत: ओळखलेल्या चित्राबद्दल 3-4 वाक्यात बोलणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | ता | | इयत्ता 3 री साठी: मुलाने स्वत: ओळखलेल्या चित्राबद्दल 3-4 वाक्यात बोलणे. |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य: छापील मजकूराची जाणीव, शब्द ओळख, आकलन,शब्द संपत्तीचा विकास आणि पर्यावरण जागरुकता.<br>कृती: 18<br>1. चित्र संचयीका(विकासात्मक ध्येय – 2) विषय : जलनिवासस्थान आणि त्यात आढळणारे प्राणी/ पक्षी आणि वस्तू.<br>उद्देश: चित्रातील वस्तू/व्यक्ती/घटनांची नावे सांगणे. तर्क लावणे.समजून घेणे आणि चित्राचा मजकुराशी संबंधलावणे. मुलांनी चित्रांचे निरीक्षण करणे, अर्थ समजून घेणे आणि व्यक्तिगत चित्र संचयीका तयार करून व्यक्तिगत आणि गटामध्ये सादर करणे. आणि गटामध्ये बसून भित्ती पत्रक तयार करणे.<br>साहित्य: मुलांनी तयार केलेली चित्रे<br><br>पध्दत- पाण्याची उगमस्थाने आणि त्यामध्ये असणारे प्राणी/पक्षी/वस्तू संबंधित मुलांनी काढलेल्या चित्राना कृती संचयीकेतून बाहेर काढून त्याबद्दल सहजपणे बोलण्यास प्रोत्साहित करणे.<br>शिक्षकांनी 2 री व 3 री च्या मुलांना 1 ली वर्गाच्या मुलांसोबत सहकार्याने राहण्यास सांगणे.आणि विषयाच्या विस्तारबद्दल चर्चा करताना सर्व मुले अभिव्यक्त होतील याची खात्री करून घेणे. तसेच 2 री व 3 री च्या मुलांना स्वतंत्रपणे बोलण्यास सांगणे. ( सदर कृतीचा पुढील भाग ५५ व्या दिवशी घ्यावी.) |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य: मुलांचे लेखन, उद्देशपूर्वक लेखन, निरीक्षण आणि ऐकणे, सृजनशील चिंतन,शब्द संपत्तीची अभिवृद्धी करणे.<br>कृती 32 : सामायिक लेखन ( लक्ष्य : 2) ECW-8<br>उद्देश:<br>● सामायिक लेखनाचा परिचय करून देणे.<br>● उद्देशानुसार लिहिण्याचा सराव करून घेणे.<br>● अवधानासहित उद्देशीत लेखनामध्ये गुंतविणे.<br>● सृजनात्मक विचारांचे लेखन करणे.<br>● शब्द संपत्ती वाढविणे.<br>आवश्यक साहित्य: फळा, चित्रकला कागद<br>पध्दत: सामायिक लेखन महिन्यातुन दोन किंवा तीन वेळा घेणे.<br>कोणताही एक विषय घेऊन त्या विषयाला संबंधित आपले अनुभव कथा किंवा लिखाणाद्वारे मुलांना व्यक्त होण्यास सांगणे .<br>उदाहरण:<br>● उद्यानाला भेट<br>● चहा करण्याची पद्धत<br>● आवडता खेळ इ.<br>ध्यानात ठेवण्याच्या गोष्टी:<br>प्रत्येक विषयाला संबंधित वाक्ये बनविण्यासाठी आवश्यक सूचना देणे.<br>शिक्षकांनी पहिले वाक्य लिहून वाचणे. नंतर मुलांनी स्वत: चे वाक्य लिहून वाचण्यास सांगणे.<br>मुलांना आपल्या मातृभाषेत प्रतिक्रिया देण्यास सांगणे.त्यानंतर शिक्षकांनी ते वाक्य प्रमाण भाषेत सांगणे.<br>इयत्ता 2 री व 3 री साठी: 1 ली च्या मुलांनी संगीतालेले वाक्य 2 री व 3 री च्या मुलाना लिहिण्यास सांगणे. |

<table>
<tr><td></td><td></td><td></td><td>लिहिण्याचा नमुना:<br>शिक्षकांनी मुलांसमोर मुलाचे ,मुलांनी काढलेल्या चित्रांचे नाव इ फळ्यावर लिहिणे.लिहिण्याचा योग्य क्रम मुलांना पाहण्याची संधी देणे.<br>तसेच जे काही फळ्यावर लिहवायाचे आहे ते सर्व मुलांच्या समोरच लिहिणे.</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">मैदानी खेळ</td><td>कृती: ३२ संगीत खुर्ची<br>सामर्थ्य: स्थूल स्नायू चलन कौशल्य वाढीस लावणे.<br>आवश्यक साहित्य: खुर्च्या आणि ड्रम/ संगीत<br>पध्दत:मोठ्या वर्तुळामध्ये खुर्च्या ठेवणे.<br>➢ खेळात भाग घेतलेल्या मुलांच्या पेक्षा एक खुर्ची कमी ठेवणे.<br>➢ मुलांना खुर्च्यांच्या बाजूने फिरण्यास सांगून संगीत चालू करणे.<br>➢ संगीत बंद झाल्यानंतर खुर्च्यांवर बसण्यास सांगणे.<br>➢ ज्या मुलाला खुर्ची मिळत नाही तो/ती खेळातून बाद ठरतो.<br>➢ त्यानंतर एक खुर्ची कमी करून खेळ पुन्हा शेवटपर्यंत सुरु करणे.<br>➢ शेवटी ज्याला खुर्ची मिळते तो विजयी घोषित ठरतो.<br>2 री व 3 री च्या मुलांना हाच खेळ घेणे.</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">रंजक कथा<br>(कथेची वेळ)</td><td>शीर्षक: ग्र्यांड पास गिफ्ट<br>साहित्य: पांढरा कागद, पेन्सिल,क्रेयोन्स<br>उद्देश:<br>• ऐकण्याचे सामर्थ्य वाढविणे.<br>• वैचारिक शक्तीचा विकास करणे.<br>• सृजनशीलता वाढविणे.<br>• प्रश्न विचारण्याचे कौशल्य वाढीस लावणे.<br>• गोष्टीशी संबंधित चित्रे जमा करण्याचा छंद जोपासणे.<br>पध्दत:<br>1)शिक्षकांनी इंग्रजीमध्ये कथा सांगणे.<br>2)मातृभाषेमध्ये गोष्टीचा सारांश सांगणे.इंग्रजी आणि मातृ भाषेमध्ये कथा सांगताना बहुल्याचा वापर करणे.<br>3)मुलांना लिखाणाचे साहित्य देऊन त्यांना आवडणाऱ्या गोष्टीतील पात्रांचे चित्र काढण्यास सांगणे.<br>त्यानंतर रंग भरण्यास सांगणे.</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">पुन्हा भेटू</td><td>• या दिवसातील कृतींचे स्मरण करणे.<br>• या दिवसात केलेल्या कृती पालकासोबत करण्यास सांगणे.<br>• मुलांना आनंद वाटेल अशा कृती घेणे.<br>• उदा.’म’ अक्षरापासून सुरु होणाऱ्या घरातील वस्तूंची नावे लक्षात ठेऊन घेऊन सहकाऱ्यासोबत चर्चा/खेळ खेळण्यास सांगणे.<br>• मागे घडलेला एखादा सुखदायक प्रसंग/घटना सांगण्यास सांगणे.</td></tr>
</table>

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 9 दिवस – 54 (शनिवार)

| | |
|---|---|
| प्रतिबिंब (वर्गातील निरंतर मूल्यमापन) | • विविध तंत्र वापरून (निरीक्षण, तपशील पट्टी, मुलांची अध्ययन पत्रके, व्हिडीओ, सांदर्भिक नोंदी, इत्यादी) तुम्ही संग्रह केलेल्या मूल्यमापन नोंदी/माहिती यांचे पुनरावलोकन करणे.<br>• प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिगत गरजेनुसार पुढील आठवड्यातील अध्ययन प्रक्रियेची योजना आखणे.<br>• अध्ययनाच्या तिन्ही विकासात्मक ध्येयांच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे. |

# माझी प्रगती-5

## आठवडा - 9 दिवस – 54 (शनिवार)

| प्राप्त केलेल्या अध्ययन निष्पत्ती | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती | क्वचित | कधीतरी | नेहमी |
| 1 | योग्य आहाराच्या व स्वच्छतेच्या सवयी जोपासतो/ जोपासते. | | | |
| 2 | आरोग्यकारक आहाराच्या पद्धती जोपासतो/ जोपासते. | | | |
| 3 | आरोग्यदायी स्वच्छतेच्या सवयींचा सराव करतो/ करते. | | | |
| 4 | गटचर्चेमध्ये सक्रीय भाग घेतो/ घेते. | | | |
| 5 | एकापेक्षा जास्त गुणधर्मावरून वस्तूंचे वर्गीकरण करतो/ करते. ( रंग, आकार, आकारमान) | | | |
| 6 | स्पर्श ज्ञानाने रचना ओळखतो/ ओळखते. | | | |
| 7 | समस्या ओळखून परिहार करतो/ करते. | | | |
| 8 | लहान मजकूर ऐकून अर्थ समजून घेतो/ घेते. | | | |
| 9 | कोणतीही घटना किंवा दृश्य लहान वाक्यात विवरण करून सांगतो/ सांगते. | | | |
| 10 | सृजनात्मकरित्या अभिव्यक्त होतो/ होते. | | | |
| 11 | चित्र पाहून आपल्या शब्दात सांगतो/ सांगते. | | | |
| 12 | 1 ते 10 पर्यंतच्या संख्यां लिहितो/ लिहिते. | | | |
| 13 | आकृतीबंध (Pattern) तयार करून विस्तार करतो/ करते. | | | |
| 14 | गुंतागुंतीची शब्दकोडी /कोडी/ जादू सोडवितो/ सोडविते. | | | |
| 15 | वस्तू आणि घटना क्रमाने मांडणे, जोडणे आणि सादर करणे इ. करतो/ करते. | | | |
| 16 | ऐकल्यानंतर ग्रहण करून उत्तर देतो/ देते. | | | |
| 17 | पूर्ण वाक्यामध्ये अधिक तपशील स्पष्ट करतो/ करते आणि पुनरावर्ती करतो/ करते. | | | |
| 18 | अर्थपूर्ण संभाषणामध्ये मग्न राहतो/ राहते. | | | |
| 19 | वाचन कोपऱ्यातून पुस्तक निवडतो/ निवडते. | | | |
| 20 | चित्रे जमा करून अर्थपूर्ण शब्द सांगतो/ सांगते. | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 21 | चित्रे काढण्यास साहित्य सहजपणे हाताळतो/ हाताळते. | | | |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा - 10** **दिवस – 55 (सोमवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 55 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती : 1<br>विद्यार्थ्यांनी शिस्तीने सावकाश वर्गात प्रवेश करणे. (slow motion)<br>1. रॉकेट टाळ्या वाजविण्यास शिकविणे.<br>2. मुलांनी वर्गात गोलाकार उभे राहून रॉकेट टाळ्या वाजविणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | पद्धत :<br>• विद्यार्थ्यांना वर्तुळाकार अथवा अर्धवर्तुळाकारात बसविणे .<br>• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सांकेतिक चिन्हे दाखविणे. ओळखण्यास सांगणे . उदा: पिण्याचे पाणी, हात धुणे, शौचालय.<br>• पुढे प्रत्येक विद्यार्थ्याने उभे राहून सांकेतिक चिन्हाचे कार्ड दाखविणे,आणि आपल्या मित्रांना ओळखण्यास सांगणे .<br>• शिक्षकाने प्रत्येक विद्यार्थ्याला संधी देणे . |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करणे.<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे कार्य निर्वहन करणे. |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : हलका , जड या परीकल्पनांची तुलना करणे.<br>कृती 32: तुलना - जड आणि हलके (विकासात्मक ध्येय-3)<br>उद्देश :- जड आणि हलका याची तुलना करणे .<br>साहित्य : कापडी चेंडू ,टेनिस बॉल, / फुटबॉल , दगड , लोखंड ,सुती कापड<br>( कापडी चेंडू आणि फुटबॉल / टेनिस बॉल यांचा आकार सारखा असावा.)<br>पध्दत : विद्यार्थ्यांना दोन चेंडू हातात घेण्यास सांगून हलका कोणता? जड कोणता ? विचारणे. जड व हलका याची तुलना करून ओळखण्यास सांगणे.<br>इयत्ता : 2 री<br>आकाराने समान असलेले फुटबॉल आणि कापडी बॉल देऊन जड कोणता व हलका कोणता असे प्रश्न विचारणे . ( दगड , लोखंड , सुती कापड इ.)<br>इयत्ता : 3 री<br>परिसरात आढळणाऱ्या अनेक वस्तूंची जड व हलका अशी तुलना करून नावांची यादी करणे. |

<table>
<tr><td rowspan="5"></td><td colspan="2"></td><td>अभ्यासासाठी अध्ययन पत्रके : I. L. -31,32 (वर्ग 1, 2, 3)</td></tr>
<tr><td colspan="2">सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती)</td><td>सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकास आणि सृजनशीलतेचा विकास,हात व डोळे याचा समन्वय, आकारांची परिकल्पना.<br>कृती 33 अ: ट्रेस करणे ( विकासात्मक ध्येय- 1 )<br>उद्देश :<br>● सूक्ष्म स्नायूंचा विकास करणे .<br>● डोळा आणि हात यांचा समन्वय साधणे.<br>● अक्षरांच्या आकारानुसार चित्रे ओळखणे .<br>साहित्य : वाळू<br>पध्दत : विद्यार्थ्यांना स्वत: अक्षरे, चित्रे रचण्यास सांगणे आणि संख्येनुसार वस्तू जोडणे . विद्यार्थ्यांना माहित असलेल्या कन्नड, मराठी, इंग्लिश तसेच अंकानुसार चित्र रचण्यास प्रोत्साहित करणे.<br>तपशील : 2 री आणि 3 री च्या विद्यार्थ्यांना माहित असलेल्या कन्नड, मराठी, इंग्लिश तसेच अंकानुसार चित्र रचण्यास प्रोत्साहित करणे.</td></tr>
<tr><td rowspan="3">भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता</td><td>ऐकणे व बोलणे</td><td>सामर्थ्य : ऐकणे , सृजनात्मकता , स्व-अभिव्यक्ती औपचारिक बोलणे.<br>कृती 8: उस्फुर्त भाषण (विकासात्मक ध्येय-2) ECL-6<br>उद्देश :- निवडलेल्या विषयावर अस्खलितपणे बोलणे .<br>* औपचारिक बोलण्याचे कौशल्य विकसित करणे.<br>* ऐकलेल्या मुद्यावर त्यांचे मत व्यक्त करणे.<br>* सृजनशील स्व - अभिव्यक्तीसाठी संधी देणे.<br>साहित्य : प्राणी, पक्षी, वाहन यांची चित्रपट्टी<br>पद्धत : प्राणी, पक्षी, आणि विविध वाहनाच्या चित्रांची कात्रणे ताब्यात टाकणे . विद्यार्थ्यांनी डब्यात हात घालून कोणतीही एक चित्र पट्टी घेवून त्यावर असलेल्या चित्राबद्दल माहिती सांगण्यास संधी देणे .<br>इयत्तावर विवरण : 2 री च्या वर्गातील विद्यार्थ्यांनी निवडलेल्या विषयावर 2 ते 3 मिनिटे बोलणे . 3 इयत्तेतील विद्यार्थ्यांनी विषयाच्या दैनंदिन वापराबद्दल बोलणे .</td></tr>
<tr><td>आकलना सहीत वाचन</td><td>सामर्थ्य : मुद्रित मजकुराची ओळख , आकलन ,शब्दसंपत्तीचा विकास .<br>कृती : 18<br>चित्र संग्रह (विकासात्मक ध्येय –2) विषय: ‘जलस्त्रोत्र आणि त्यामध्ये आढळणारे प्राणी /पक्षी/वस्तू अवधी :16<br>उद्देश :-<br>● विध्यार्थ्यांनी गटांमध्ये बसून भितीपत्राकाची रचना करणे.<br>● आवश्यक साहित्य : तक्ते, रेखाचित्रे ,क्रेयोन खडू , डिंक, दृक पट्टी ,टॅग<br>● पध्दत : विद्यार्थ्यांनी गटामध्ये आवश्यक साहित्य वापरून पाण्याचे स्त्रोत्र आणि प्राणी/ पक्षी/ वस्तूबद्दल भित्तीपत्रके तयार करणे. तयार केलेली भितीपत्रके वर्गात सादर करण्यास संधी देणे.<br>● तयार केलेली भितीपत्रके वर्गखोलीत प्रदर्शित करणे.<br>● शिक्षकाने इयत्ता 2 री व 3 री च्या विद्यार्थ्यांना मदत करून गटात योजनाकार्य करण्यास सूचना करणे.</td></tr>
<tr><td>उद्देश पूर्वक लेखन</td><td>सामर्थ्य : उद्देशानुसार लेखन , सृजनशील विचार , शब्द्संपतीचा विकास , ऐकणे , आकलन , पर्यावरण जागरुकता<br>कृती : 33 पट्टी तयार करूया (विकासात्मक ध्येय-2) ECW-10<br>उद्देश :-</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | | | • उद्देशानुसार लेखन करण्यास संधी देणे .<br>• सृजनशील विचार वाढविणे.<br>• पर्यावर्नाबद्दल जागरुकता निर्माण करणे.<br>• शब्दसंपत्ती वाढविणे.<br>• सूचना ऐकून अर्थग्रहण करणे .<br>साहित्य : नोटबुक, कागद ,तेलकट खडू<br>पद्धत: 1)मुलांचा शब्दसंग्रह वाढविण्यासाठी आणि उद्देश्पुरक लेखन सुलभ करण्यासाठी विविध विषयांवर शब्दांची यादी करण्यास सांगणे.<br>सुचवलेला विषय: खाऊ<br>संपूर्ण वर्गासाठी शब्दपट्टी कृती चार्टपेपरमध्ये आयोजित केली जाऊ शकते. शिक्षकांनी या तक्त्यामध्ये वापरल्या जाऊ शकणाऱ्या सामान्य शब्दांची यादी तयार करणे , मुलांना ते पाहण्यास आणि वाचण्यास मदत करण्यासाठी ते वर्गात प्रदर्शित करणे.<br>वर्ग प्रोफाइल: 1लीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या यादीमध्ये 2री वर्गाच्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त शब्द जोडू देणे. आणि 3री वर्गाच्या विद्यार्थ्यांना शब्दपट्टीतील शब्दांसाठी त्यांची स्वत:ची वाक्ये तयार करण्यास सांगणे. |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षकांनी फळ्यावर लेखन करणे. लेखनाची योग्य पद्धत पाहण्याची संधी देणे .<br>मुलाचे नाव ,मुलाने काढलेल्या चित्राचे नाव इत्यादी मुलांसमोर लिहिणे . शिक्षकांना वर्गात जे काही लेखन करायचे आहे ते मुलांसमोर करणे. |
| | मैदानी खेळ | | कृती : दोरीचा खेळ<br>सामर्थ्य : चपळता , जलद गतीचा विकास<br>साहित्य : स्किपींग दोरी<br>पद्धत:<br>• दोन मुलांनी दोरीची दोन टोके धरावी<br>• इतर मुलांना येऊन दोरीवरून उडी मारू देणे.<br>• दुसरी आणि तिसरी वर्गातील मुलांसाठी ही कृती चालू ठेवणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शिर्षक : करकोचा आणि खेकडा<br>साहित्य : कथेचे साहित्य<br>उद्देश :<br>➢ ऐकण्याचे कौशल्य विकसित करणे .<br>➢ अस्खलितपणे बोलण्याचा सराव करणे .<br>पद्धत :<br>**कथाकथन**<br>➢ शिक्षकांनी कथा सांगण्यापूर्वी कथा वाचून समजून घेणे.<br>➢ योग्य हावभावसह सोप्या भाषेत कथा सांगणे .<br>➢ कथा सांगताना शिक्षकांनी विद्यार्थ्यांसोबत वर्तुळात बसणे .<br>➢ साधे प्रश्न विचारून कथेचा अर्थ समजला का हे पाहणे..<br>कथा : |

| | | |
|---|---|---|
| | | एका तलावात मासे, खेकडे, बेडूक आणि करकोचा (बगळा ) राहत होते . ते सर्वजन विविध पद्धतीने जीवन जगत होते . अचानक बगळ्याला एक वाईट कल्पना सुचली .तेंव्हा त्याने तलावात राहणाऱ्या सर्व प्राण्यांना एकत्र करून सांगितले की, “ तलावातील पाणी कमी होत असल्याचे दिसत आहे ,असेच पुढे सुरु राहिल्यास एक दिवस तलावातील सर्व पाणी आटून जाईल आणि आम्ही जगणे अशक्य होईल . त्यासाठी मी एक मोठ्ठा तलाव पहिला आहे ज्यात भरपूर पाणी आहे . तेथे आपण जावूया”.तेंव्हा सर्वांनी आनंदाने होकार दिला . आम्हा सर्वांना एकदाच जाणे शक्य नाही त्यासाठी मी प्रत्येकाला माझ्या चोचीत घेवून बाजुच्या तलावात सोडतो,असे बगळ्याने सांगितले . बगळा प्रथम एकेक मास्याला आपल्या चोचीत घेवून झाडावर जायचा व त्यांना खावून त्यांची हाडे झाडाखाली टाकायचा . अशी ही बगळ्याची फसवणूक काही दिवस चालू राहिली . शेवटी एक दिवस एका मोठ्या खेकड्याची पाळी आली . खेकडा म्हणाला मला तुझ्या चोचीत बसून जाणे शक्य नाही . त्यासाठी मी तुझ्या मानेवर बसून येतो म् बगळ्याने कोणताच विचार न करता होकार दिला . खेकड्याला त्याच्या मानेवर बसवून घेतले व जावू लागला . मानेवर बसून जाताना खेकड्याला झाडाच्या खाली पडलेली मास्यांची हाडे दिसली . बगळ्याने आपली फसवणूक केल्याचे खेकड्याला समजले व त्याने बगळ्याच्या मानेचा जोरदार चावा घेऊन त्याला ठार मारले. आपल्या मित्रांच्या जाण्याचे दु:ख करीत खेकडा आपण पहिला राहत असलेल्या तलावाकडे हळू हळू चालत आला,आणि तिथेच राहण्यास सुरुवात केली .<br>कथा सांगितल्यानंतर सरळ सोपे प्रश्न विचाराने.<br>• बगळ्यासोबत कोणकोणते प्राणी राहत होते ?<br>• इतर प्राण्यांना खाण्यासाठी बगळ्याने काय उपाय केला ?<br>( कथेचा आनंद घेण्याबरोबरच मुले ऐकत आहेत याची खात्री करून घेणे. ) |
| | पुन्हा भेटू | • या दिवशी केलेल्या कृतींचे पुनरावर्तन करणे / आठवणे .<br>• मुलांनी आज केलेल्या सर्व कृती पालक आणि कुटुंबातील सदस्याना सांगण्यास मुलांना प्रोत्साहन देणे .<br>• पुन्हा दुसऱ्या दिवशी मुलांनी उत्साहाने परत येण्यासाठी आनंददायक प्रसंग आयोजित करणे व मुलांना निरोप देणे.<br>• पुढील आठवड्यात ‘ बाह्य भेटी योजना’ आखून मुलांना विविध रोपे,झाडे यांचे निरीक्षण करण्यासाठी आवश्यक तयारी करणे . |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा - 10** **दिवस – 56 (मंगळवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 56 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवा ण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | 55 व्या दिवसाच्या कृती करणे. |

| | | |
|---|---|---|
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 49 व्या दिवसाच्या गुजगोष्टी कृती पुढे चालू ठेवणे . |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करणे .<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे कार्य निर्वहन करणे . |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : निरीक्षण, ओळखणे, कमी – अधिक – समान , पर्यावरणविषयक जागरुकता<br>कृती : 33 कमी – अधिक – समान ( विकासात्मक ध्येय- 3)<br>उद्देश :-<br>कमी – अधिक – समान ओळखणे .<br>साहित्य : विविध प्रकारच्या धान्यांचा संग्रह<br>पद्धत : तांदूळ, डाळ, नाचना, बियाणे इत्यादी स्थानिक परिसरात आढळणाऱ्या धान्यांचा संग्रह करणे . मुलांनी त्या धान्यांचे निरीक्षण करणे . त्यांची नावे सांगणे .समान आकाराच्या भांड्यात समान प्रमाणात धान्य ठेवणे . एका भांड्यात कमी दुसऱ्या भांड्यात जास्त धान्य ठेवून कमी जास्त ओळखण्यास सांगणे . हीच कृती पुन्हा करून कमी जास्त ओळखण्यास सांगणे .आपल्या परिसरात कमी जास्त समान प्रमाणात उगवणाऱ्या धान्यांची तुलना करणे.<br>इयत्ता : 2 री<br>स्थानिक परिसरात आढळणाऱ्या दगड , गोळ्या , चिंचोके आणि धान्यांचा वापर करून वेगवेगळ्या भांड्यात ठेवून कमी –जास्त – समान दाखविणे .<br>1) कोणत्या भांड्यात जास्त आहेत?<br>2) कोणत्या भांड्यात कमी आहेत?<br>इयत्ता : 3 री<br>आपल्या सभोवतालच्या परिसरात वाढणाऱ्या धान्यांच्या राशींची ( ढीग ) कमी - जास्त – समान प्रमाण अशी तुलना करणे 1) दोन समान नाचण्याच्या पोत्यामध्ये कोणत्या पोत्यात जास्त नाचना आहे ?<br>2) कोणत्या पोत्यात कमी आहे?<br>3) कोणत्या पोत्यात समान आहे? |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकास आणि सृजनशीलतेचा विकास , डोळे व हात याचा समन्वय, आकारांची परिकल्पना.<br>कृती 33 अ.: अक्षरावर दुरुस्ती करणे. विकासात्मक ध्येय-1 )<br>उद्देश :-<br>• सूक्ष्म स्नायूंचा विकास होणे .<br>• डोळे व हात यांचा समन्वय साधणे.<br>साहित्य : वाळू<br>पद्धत : विद्यार्थ्यांना माहित असलेल्या साध्या मराठी, कन्नड अक्षरांचे लेखन करण्यास सांगून त्यावर दगड/ काठी/ मणी/ स्ट्रॉ ठेवून जोडण्यास सांगणे .<br>तपशील : 2 री आणि 3 री च्या विद्यार्थ्यांना माहित असलेल्या 3-4 मराठी, कन्नड अक्षरांचे लेखन करण्यास सांगून |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | त्यावर दगड/ काठी/ मणी/ स्ट्रॉ ठेवून जोडण्यास सांगणे . |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : ध्वनी विज्ञानाचे ज्ञान, शब्दसंपत्तीचा विकास , चालना कौशल्याचा विकास<br>कृती : 15 लयबद्ध ( यमक ) शब्द ऐकणे . (विकासात्मक ध्येय – 2 ) ECL-4 ( 44 व्या दिवसाच्या पुढे )<br>उद्देश :-<br>* ध्वनी विज्ञानाचे ज्ञान विकसित करणे.<br>* लयबद्ध शब्दाद्वारे शब्दसंपत्ती वाढविणे.<br>* स्थूल आणि सूक्ष्म चालना कौशल्यांचा विकास करणे.<br>साहित्य : नाही<br>पद्धत :<br>* यमक शब्दांचे विविध गट तयार ठेवणे.<br>* विद्यार्थ्यांचे विविध गट करून प्रत्येक गटाला प्रत्येक गटाला एकेक यमक शब्दांचा गट देणे.<br>* यमक शब्द घेवून शिक्षकांच्या सहाय्याने विविध वाक्ये तयार करणे.<br>* यमक शब्दांचे गटातून शब्द घेवून शिक्षकाच्या सहाय्याने सोपी यमकयुक्त गाणी तयार करणे.<br>इयत्तावर विवरण : 2 री वर्गाच्या विद्यार्थ्यांनी यमक शब्दांच्या गटातील यमक शब्दांपासून साधे सोपे यमक शब्द असलेले गीत तयार करणे. 3 री वर्गाच्या विद्यार्थ्यांनी यमक शब्दांच्या गटातील यमक शब्दांपासून साधे सोपे यमक शब्द असलेले गीत तयार करणे. (68व्या दिवसापर्यंत चालू ठेवणे ) |
| | | आकलनासहीत वाचन | सामर्थ्य : शब्द संपत्तीचा विकास, स्व-अभिव्यक्ती,अभिनयासह वाचन .<br>कृती : 1 चित्र वाचन (विकासात्मक ध्येय – 2 )<br>उद्देश :-<br>अनुभव व पुर्वज्ञानाच्या आधारावर चित्र प्रसंगाचे निरीक्षण करून अर्थग्रहण करणे .<br>साहित्य : विविध प्रकारच्या घटना / ठिकाण /जत्रा/जत्रेचे चित्र /उद्यान /बाजार /शाळा /प्राणीसंग्रहालय / उत्सव इत्यादीची चित्रे .<br>पद्धत : मुलांचे गट करून त्यांनी पाहिलेली प्रसंग चित्रे समजून घेवून त्याचे विवरण करण्यास सांगणे .शिक्षकांनी विविध वर्तमानपत्रे, पुस्तके,नियतकालिके इत्यादींचा वापर करून माहिती देणे. मुलांचे वय ,विकासाच्या गरजा तसेच त्यांच्या सभोवतालच्या वातावरणाचा विचार करून विवरण देणे. संदर्भानुसार प्रश्न विचारताना किंवा विवरण देताना त्यांच्या स्व अनुभवाचा वापर करण्यास शिकविणे. विद्यार्थ्यांना संभाषणणात सहभागी करताना प्रश्न विचारल्याने ते लक्षपूर्वक ऐकतात आणि तो प्रसंग स्वत:च्या अनुभवाशी संबंध लावण्यास मदत होते. काही घटना दाखवताना शिक्षकांनी योग्य प्रश्न विचारत तपासत जाणे.<br>शिक्षकांनी काही घटना दाखवताना त्यावर असे प्रश्न विचारणे .<br>* तुम्ही एकदा तरी अशा ठिकाणी गेला आहात काय?<br>* त्या प्रसंगातील तुम्हाला काय काय आठवण आहे?<br>* या चित्रातील लोक काय करत आहेत?<br>* या परीस्थितीत लोक काय करत आहेत? इत्यादी.<br>2 री व 3 री इयत्ता : मुलांना प्रश्न विचारताना अशा परिस्थितीतील अनुभव सांगण्यास संधी देणे आणि प्रश्नांची उत्तरे दिल्यानंतर शिक्षकांनी पुन्हा प्रश्न विचारताना मुलांना चिंतन करण्यास लावणे. |
| | | उद्देशपूर्वक लेखन | सामर्थ्य : हात व डोळ्यांचा समन्वय , लेखन कौशल्यांचा सराव सृजनशील अभिव्यक्ती<br>कृती : 2 मुक्त चित्ररचना (विकासात्मक ध्येय- 2) ECW-6<br>उद्देश :- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | लेखन कौशल्य बिंबविणे .<br>हात – डोळा समन्वय कौशल्य विकसित करणे.<br>क्रियात्मक अभिव्यक्तीला संधी देणे .<br>सृजनशील अभिव्यक्तीला प्रोत्साहन देणे.<br>आवश्यक साहित्य : तेलकट खडू , रंगीत पेन्सिल, मार्कर, पांढरे कागद<br>पद्धत : कागदावर मुक्तपणे चित्र काढणे / लेखन करणे ,मनातील कल्पनेनुसार रंग भरण्याची संधी देणे . व त्यांनी लिहिलेल्यावर बोलण्यास सांगणे.योग्य प्रश्न विचारून लेखनाविषयी माहिती घेणे .<br>इयत्तावर विवरण : इयत्ता 2 री व 3 री विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडते चित्र / परिस्थितीचे चित्र रेखाटून त्यावर 4-5 वाक्ये लिहायला सांगणे . |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षकांनी फळ्यावर लेखन करणे. लेखनाची योग्य पद्धत पाहण्याची संधी देणे .<br>मुलाचे नाव ,मुलाने काढलेल्या चित्राचे नाव इत्यादी मुलांसमोर लिहिणे . शिक्षकांना वर्गात जे काही लेखन करायचे आहे ते मुलांसमोर करणे. |
| | मैदानी खेळ | | कृती : दोरीचा खेळ (स्किपींग)<br>सामर्थ्य : चपळता , जलद गतीचा विकास<br>आवश्यक साहित्य : स्किपींग दोरी<br>पद्धत :<br>• दोन मुलांनी दोरीची दोन टोके धरणे.<br>• इतर मुलांना येऊन दोरीवरून उडी मारणे.<br>• दुसरी आणि तिसरी वर्गातील मुलांसाठी ही कृती चालू ठेवणे.<br>• जेंव्हा मुले दोरी फिरवतात तेंव्हा दुसऱ्या मुलाला दोरी त्याचा पायाजवळ आल्यावर उडी घेण्यास सांगणे. |
| | रंजक कथा (कथेची ळ) | | रंजक कथा (कथेची वेळ) पहिल्या दिवशी ठरल्याप्रमाणे चालू राहते .<br>**कथाकथन**<br>शिक्षकांनी कथा सांगत असताना मुलाचे लक्ष वेधून घेत कथा पूर्ण करणे<br>उदा. यानंतर काय झाले ? नंतर कोण आले ? इत्यादी<br>कथा सांगितल्यानंतर सोपे प्रश्न विचाराने .<br>• बगळा कोठे बसून प्राणी खात होता ?<br>• खेकडा कोठे बसला ?<br>(कथेचा आनंद घेण्याबरोबरच ऐकत आहेत याची खात्री करून घेणे.) |
| | पुन्हा भेटू | | • या दिवशी केलेल्या कृतींचे पुनरावर्तन करणे / आठवणे .<br>• मुलांनी आज केलेल्या सर्व कृती पालक आणि कुटुंबातील सदस्यांना घरी जाऊन सांगण्यास मुलांना प्रोत्साहन देणे .<br>• पुन्हा दुसऱ्या दिवशी मुलांनी उत्साहाने परत येण्यासाठी आनंददायक प्रसंग आयोजित करणे व मुलांना निरोप |


| | | |
|---|---|---|
| | | देणे.<br>• पुढील आठवड्यात ' बाह्य भेटी योजना' आखून मुलांना विविध रोपे,झाडे यांचे निरीक्षण करण्यासाठी आवश्यक तयारी करणे . |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 10      दिवस – 57 (बुधवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 57 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण | 55 व्या दिवसाच्या कृती करणे. |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कार्यपद्धत :<br>• मुलांना वर्तुळाकार बसण्यास सांगणे.<br>• चित्रे बुट्टीत किंवा उघड्या पेटीत ठेवणे.<br>• मुलांना कोणतेही चिन्ह किंवा चिन्हांचे चित्र काढण्यास सांगणे आणि त्या चिन्हावर किंवा चित्रावर त्यांचे मत ( विचार ) बोलण्यास सांगणे .<br>शिक्षकांनी मुलांना कृतीमध्ये आनंदाने सहभागी होण्यास प्रोत्साहन देणे. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करणे .<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे कार्य निर्वहन करणे . |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : मोजणे आणि संख्या शोधणे / समजून घेणे .<br>कृती : 34 वस्तू शोधणे (विकासात्मक ध्येय – 3)<br>उद्देश :-<br>एकसारख्या दिसणाऱ्या वस्तू मोजणे .<br>आवश्यक साहित्य : खडू, पेन्सिल, पुस्तके, दगड, पिशव्या ( सर्व वस्तू तीनपेक्षा जास्त असाव्यात )<br>पद्धत : शिक्षकांनी मुलांना एखादी वस्तू देणे . त्याप्रकारच्या वर्गखोलीत असणाऱ्या वस्तू शोधण्यास सांगणे .हा खेळ दिलेल्या विविध वस्तूसह पुन्हा पुन्हा घेणे. शिक्षकाने एक तक्ता करावा . दोन गट करावे .फरशीवर अ आणि ब भाग करून रेषा मारणे . अ भागात एक वस्तू ब भागात त्याला सारख्या वस्तू मोजून ठेवणे .त्यानंतर कोणत्या भागात किती वस्तू आहेत हे मोजणे .<br>इयत्ता 2 री :<br>विद्यार्थ्यांना समान असणाऱ्या अनेक वस्तू देऊन दोन डब्यामध्ये एकसारख्या वस्तू भरण्यास सांगणे . त्यांना पाहून कोणत्या गटात जास्त आहेत हे विचाराने .<br>इयत्ता 3 री :<br>दोन गट करून एका गटाला फळांची नावे व दुसर्या गटाला भाज्यांच्या नावांची पट्टी करण्यास सांगणे . कोणता गट |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | जास्त नावे लिहितो हे पाहाणे .<br>वापरावयाची अध्ययन पत्रके : I. L. -33 (इयत्ता 1, 2, 3) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | | **सामर्थ्य : मोजणे आणि संख्या शोधणे / समजून घेणे**<br>**कृती :** 34 **वस्तू शोधणे (विकासात्मक ध्येय – 3 )**<br>**उद्देश :-**<br>**समान असणाऱ्या वस्तू मोजणे .**<br>**आवश्यक साहित्य : खडू, पेन्सिल, पुस्तके, दगड, पिशव्या ( सर्व वस्तू तीनपेक्षा जास्त असाव्यात )**<br>**पद्धत : शिक्षकांनी मुलांना एखादी वस्तू द्यावी . त्याप्रकारच्या असणाऱ्या वस्तू वर्गखोलीत शोधण्यास सांगणे .हा खेळ दिलेल्या विविध वस्तूसह पुन्हा पुन्हा घेणे. शिक्षकाने एक तक्ता करावा . दोन गट करावे .फरशीवर अ आणि ब भाग करून रेषा मारणे . अ भागात एक वस्तू ब भागात त्याला सारख्या वस्तू मोजून ठेवणे .त्यानंतर कोणत्या भागात किती वस्तू आहेत हे मोजणे .**<br>**इयत्ता 2 री :**<br>**विद्यार्थ्यांना समान असणाऱ्या अनेक वस्तू देऊन दोन डब्यामध्ये एकसारख्या वस्तू भरण्यास सांगणे . त्यांना पाहून कोणत्या गटात जास्त आहेत हे विचाराने .**<br>**इयत्ता 3 री :**<br>**दोन गट करून एका गटाला फळांची नावे व दुसर्या गटाला भाज्यांच्या नावांची पट्टी करण्यास सांगणे . कोणता गट जास्त नावे लिहितो हे पाहाणे .** |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | **सामर्थ्य : क्रियात्मक स्व-अभिव्यक्ती, ध्वनी संकेत तसेच लयबद्धतेची जाणीव , परिसराची जाणीव ,शब्दसंपत्तीचा विकास**<br>**कृती : 3 गाणी ,लयबद्ध गीते, कविता / नाटक. (विकासात्मक ध्येय - 2)** ECL-3<br>**उद्देश :-**<br>*** ध्वनी संकेतांची जाणीव करून देणे.**<br>*** लयबद्धतेची जाणीव करून देणे.**<br>*** क्रियाशील स्व- अभिव्यक्तीला संधी देणे.**<br>*** आपल्या आजूबाजूच्या परिसराशी परस्पर संबंध जोडणे.**<br>**आवश्यक साहित्य : नाही**<br>**पद्धत : मुलांना वर्तुळाकारात थांबवून शिक्षकांनी मुलांना नवीन लयबद्ध गीत अभिनयासह म्हणून दाखवावे. शिक्षकाचे अनुकरण करत मुलांना ते गीत परत म्हणण्यास सांगणे.**<br>**लक्षात ठेवायचे अंश :**<br>*** मुलांना गाण्याचा आनंद घेता यावा म्हणून शिक्षकांनी योग्य अभिनय आणि उत्साहाने गाणे म्हणणे.**<br>*** मुलांनी शिक्षकाच्या सहाय्याने गाण्यातील लयबद्ध शब्द ओळखणे.**<br>**विवरण : 2 रीच्या वर्गातील मुलांनी लयबद्ध गीतात येणाऱ्या लयबद्ध शब्दांना ओळखणे . 3 री च्या वर्गातील मुलांनी त्या लयबद्ध शब्दांना आणखीन काही शब्द शोधून जोडन्यास सांगणे. (63 व्या दिवसापर्यंत चालू आहे)** |
| | | आकलना सहीत वाचन | **सामर्थ्य : शब्दांची ओळख , मुद्रित मजकुराची ओळख , आकलन, शब्दसंपत्तीचा विकास .**<br>**कृती : :** 11 **नावाच जग (विकासात्मक ध्येय-**2)<br>**उद्देश :**<br>**1)परिचित प्रसंगातील वस्तुंचे लिपी संकेताबरोबर परस्पर संबंध दर्शविणे , साहित्य आणि वस्तू एकच आहेत या निष्कर्षापर्यंत पोहोचणे व वाचनाची आवड निर्माण करणे .**<br>**आवश्यक साहित्य : वही , चार्ट पेपर ,पेन्सिल ,तेलकट खडू , आम्हाला डोळ्याला दिसणाऱ्या आजूबाजूच्या वस्तू.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पद्धत : 1) मुलांच्या मदतीने वर्गखोलीत असणाऱ्या सामान्य / ओळखीच्या वस्तूंच्या नावाची यादी करणे .<br>उदा: टेबल, खुर्ची , दरवाजा इत्यादी .<br>2) तयार केलेल्या नावाच्या पट्ट्या त्या त्या वस्तूवर चिकटवणे.<br>3) फ्लॅश कार्ड वर नावाचा दुसरा सट तयार करणे.<br>4) शब्दांची फ्लॅश कार्डे वर्गात प्रदर्शित करून मोठ्याने म्हणून घेणे .<br>5) शब्दाचा उच्चार करत त्या वस्तूजवळ मुलाला जाण्यास सांगणे.<br>6) मुलांना कमीत कमी चार पाच वस्तूंची नावे सांगण्याची संधी देणे.<br>7) ते शब्द कथेत ओळखण्याची संधी देणे.<br>8) चित्रासह नामफलक / फ्लॅश कार्ड तयार करून कृती करायच्या ठिकाणी / वेळेला मुलांना ओळखून वाचण्यास (चित्रांच्या मदतीने) संधी देणे .<br>2 री आणि 3 री च्या इयत्ता : कथा / पाठात आलेल्या मुख्य शब्दांची फ्लॅश कार्डे तयार करणे.<br>मुलांना शिक्षकाने कथा / पाठ देऊन वाचन करण्याची संधी देणे . नंतर फ्लॅश कार्डावर असलेले शब्द कथेत शोधण्यास सांगणे .<br>टीप :आत्तापर्यंत या कृतीत वापरल्या गेलेल्या शब्दाव्यतरिक्त वेगवेगळ्या ठिकाणी , प्रसंगात आलेल्या शब्दांचा वापर करून कृती करणे .<br><br> |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्याभिवृधी , अक्षरे ओळखणे<br>कृती : 36, बिंदू जोडून - अंक लिहिणे विकासात्मक ध्येय-2 ) ECW-17<br>उद्देश :-<br>● सूक्ष्म स्नायू चालना कौशल्याभिवृधी करणे .<br>● अक्षर ओळखणे .<br>● बिंदुपासून अंक तयार करणे.<br>आवश्यक साहित्य : वही , पेन्सिल, फळा ,खडू<br>पद्धत : - मुलांना ठिपके जोडून 1, 2, 3, 4 अंक लिहायचे पद्धत लिहून दाखविणे.<br>मुलांना 1, 2, 3, 4, 5 या अंकांचे ठिपके जोडण्यास सांगणे .<br>वर्गावर विवरण : 2 री वर्गातील मुलांना 1 ते 5 पर्यंतचे अंक ठिपके जोडून तयार करण्यास सांगणे . 3री वर्गाच्या मुलांना 1 ते 10 पर्यंतचे अंक ठिपके जोडून तयार करण्यास सांगणे. (57 व्या दिवसापर्यंत चालू ठेवणे) |
| | मैदानी खेळ | | कृती : दोरीचा खेळ<br>सामर्थ्य : चपळता , जलद गतीचा विकास<br>साहित्य : स्किपींग दोरी<br>पद्धत:<br>• चार मुले समोरासमोर बसून दोन दोरींची टोके ओढून धरतात .<br>• मुलांनी धावत येवून दोरीवर उडी मारत समोरच्या दोरीवर उडी मारावी.<br>• दुसरी आणि तिसरी वर्गातील मुलांसाठी ही कृती चालू ठेवणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शीर्षक : करकोचा आणि खेकडा<br>आवश्यक साहित्य : कापसाच्या बाहुल्या / काठीचे चित्र |

| | | |
|---|---|---|
| | | उद्देश :-<br>➢ ऐकण्याचे कौशल्य विकसित करणे .<br>➢ अस्खलितपणे बोलण्याचा सराव करणे .<br>➢ सृजनशीलतेचा विकास करणे.<br>➢ कुतूहल आणि आवड निर्माण करणे .<br>काठीवरील बाहुल्या कापसाच्या बाहुल्यांचे प्रदर्शन<br>पद्धत :<br>काठीचे चित्र / कापसाच्या बाहुल्या प्रदर्शन करून कथा सांगणे . विविध कार्यातंत्रांच्या अंतर्गत कथेचा वेळ मनोरंजनात्मक करणे .<br>(कथेचा आनंद घेण्याबरोबरच ऐकत आहेत याची खात्री करून घेणे.) |
| | पुन्हा भेटू | • या दिवशी केलेल्या कृतींचे पुनरावर्तन करणे / आठवणे .<br>• मुलांनी आज केलेल्या सर्व कृती पालक आणि कुटुंबातील सदस्यांना सांगण्यास मुलांना प्रोत्साहन देणे .<br>• पुन्हा दुसऱ्या दिवशी मुलांनी उत्साहाने परत येण्यासाठी आनंददायक प्रसंग आयोजित करणे व मुलांना निरोप देणे.<br>• पुढील आठवड्यात ‘ बाह्य भेटी योजना’ आखून मुलांना विविध रोपे,झाडे यांचे निरीक्षण करण्यासाठी आवश्यक तयारी करणे . |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 10      दिवस – 58 (गुरुवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती : 1<br>1. मुलांचे काही गट करून स्वागत टाळ्या सांगणे / शिकविणे .<br>2. शिक्षकाने स्वागत टाळ्या वाजवून पहिल्या गटाचे वर्गात स्वागत करणे. .<br>3. आत्ता पहिला गटाने उर्वरित गटांचे स्वागत टाळी वाजवून वर्गात स्वागत करणे . |
| 58 | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 51 व्या दिवसाची गुजगोष्टी कृती चालू ठेवणे . |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करणे .<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे कार्य निर्वहन करणे . |

| | | |
|---|---|---|
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | **सामर्थ्य : संख्या ओळखणे.**<br>**कृती :** 35 **संख्येची नक्कल विकासात्मक ध्येय-3)**<br>**उद्देश :-**<br>**संख्याचा आकार जाणून घेणे .**<br>**आवश्यक साहित्य : धान्य , पीठ ,वाळूची पेटी ,वाळू भरलेले ताट , काठ्या , काळी माती आणि खडू**<br>**पद्धत : प्रथम संख्यांचा परिचय करून देणे .**<br>● **जमिनीवरती अंक लिहून त्यावर धान्ये दगड ठेवून अंकांचा सराव करणे .**<br>● **वाळूची पेटी /वाळूने भरलेले ताटामध्ये खडू किंवा बोटाने 0 ते 9 पर्यंतचे अंक लिहीण्यास सांगून त्यांचा आकार ओळखण्यास प्रोत्साहन देणे .**<br>● **खेळाच्या मैदानात काठी आणि काड्यापासून अंक लिहून त्यावर धान्य दगड ठेवण्यास सांगणे.**<br>● **काळीमाती आणि पिठापासून मुलांना अंक लिहिण्यास सांगणे .0 ते 9 पर्यंतच्या संख्या बनवून प्रदर्शित करण्यास प्रोत्साहन देणे .**<br>**इयत्ता 2 री**<br>* **वाळूवरती 0 ते 9 पर्यंतच्या संख्या लिहिण्यास सांगणे.**<br>**हवेत संख्या गिरवून त्या संख्या म्हणायला सांगणे.**<br>**इयत्ता 3 री**<br>**काठ्यापासून संख्या लिहून त्यामध्ये रांगोळी आणि रंग भरून संख्या ओळखणे.**<br><br>**वापरायचे अध्ययन पत्रके** : I. L. -34 (**इयत्ता** 1, 2, 3) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | **सामर्थ्य सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकास आणि सृजनशीलतेचा विकास , कान-हात याचा समन्वय, आकारांची परिकल्पना.**<br>**कृती : 33 ब . अक्षरावर दुरुस्ती करणे. (विकासात्मक ध्येय -1 )**<br>**उद्देश :**<br>● **सूक्ष्म स्नायूंचा विकास होणे .**<br>● **कान-हात यांचा समन्वय साधणे.**<br>● **ठिकाणाची परिकल्पना ओळखणे .**<br>**आवश्यक साहित्य : पेपर ,रंग आणि रबरी अक्षरे**<br>**पद्धत : मुलांना अक्षरांच्या आकाराची रेखाचित्रे देवून रंग भरण्यास सांगणे . मुलाला येणारा इंग्रजी शब्द लिहून चित्र काढून रंग भरण्यास सांगणे .**<br>**विवरण : 2 री व ३रि मुलांसाठी एका अक्षर निवडा आणि त्यापासून सुरु होणाऱ्या शब्दांची रेखाचित्रे काढून रंग भरण्यास सांगणे**<br>* **वापरावयाची अध्ययन पत्रके** : H.W.-1 4 (**इयत्ता** 01, 02,03) |
| भाषा विकास | ऐकणे व बोलणे | **सामर्थ्य: ध्वनी संकेतांचे संयोजन ,लक्ष देणे आणि ऐकणे .**<br>**कृती : 29 मधले अक्षर ओळखणे ( ब द क ) (विकासात्मक ध्येय- 2)** ECL-21<br>**उद्देश :**<br>* **शब्दातील अक्षरांचा अक्षर – ध्वनी यांचा परस्पर संबंध ओळखणे.**<br>* **लक्षपूर्वक ऐकून अक्षर –ध्वनी यांच्यातील परस्पर संबंध समजून घेणे.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | आ<br>णि<br>पा<br>या<br>भूत<br>सा<br>क्षर<br>ता | | आवश्यक साहित्य : फळा , फ्लॅश कार्ड्स (दृक पट्ट्या )<br>पद्धत : मुलांना वर्तुळाकार बसवून फ्लॅश कार्ड्स वर लिहिलेले शब्द दाखवून स्वराक्षारांची परिचय करून द्या . आणि त्यां<br>शब्दांच्या मध्यभागातील अक्षर दाखविण्यास सांगणे.मुलाना फळ्यावर लिहायला सांगणे . अक्षर आणि शब्द एकत्र करणे<br>ओळखणे<br>इयत्तावर विवरण : 2 री इयत्तेतील मुलांनी चिन्हांकित केलेल्या अक्षराच्या मध्यभागी आलेले वेगवेगळे शब्द ओळखणे .3 री इयत्तेतील मुले स्वत:विविध शब्दामधील मधले अक्षर ओळखण्याची कृती करतात .<br>वापरावयाचे सराव पत्रक : EC- 14 ( इयत्ता 1,2,3) |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य :लक्ष देणे आणि श्रवण करणे , स्थूल स्नायू कौशल्य अभिवृद्धी<br>कृती 19 : आवाजातील फरक (विकासात्मक ध्येय – 2)<br>उद्देश :-<br>मुलांनी शब्द ऐकून आवाजातील फरक ओळखणे<br>आवश्यक साहित्य : खडू ,मार्कर,तेलकट खडू , क्रमानुसार लिहिलेल्या संख्यांचा तक्ता<br>पद्धत : शिक्षकांनी फळ्यावर तीन समान आवाजाने सुरु होणारे शब्द तसेच एक विभिन्न रीतीच्या आवाजाने सुरु होणारा शब्द लिहिणे . आणि मोठ्याने वाचन करणे. त्यातील वेगळा आवाज देणारा शब्द कोणता हे ओळखण्याचा अनुभव देणे .उदा : पट , पदक, चरक ,पुस्तक यातील विभिन्न पद कोणते हे विचाराने . मुलांनी ओळखलेला शब्द तक्त्यात लिहिणे .<br>2 री व 3 रीच्या इयत्तेतील मुलांना : मुलांनी आवाजातील फरकाचे शब्द वाचणे उदा: ताट- पाट , गरम – नरम |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य: उद्देशपूर्वक लेखन , निरीक्षण , कल्पना ,सृजनशील चिंतन ,परिसराची जाणीव<br>कृती: 35 हवामान नक्षा विकासात्मक ध्येय-2 ) ECW-16 (52 दिवसापासून पुढे चालू )<br>उद्धेश:<br>● उद्देशीत लेखनाचा सराव करवून घेणे .<br>● निरीक्षण कौशल्य वाढविणे.<br>● सृजनशील चिंतनाला वाव देणे.<br>● परिसराची जाणीव बिंबविणे.<br>साहित्य : कागद / अध्ययन पत्रके पेन्सिल<br>पद्धत : आठवड्यातील दिवसाबद्दल मुलांशी चर्चा करणे<br>- आठवड्याच्या दिवसांची यादी करून वर्गात लावणे.<br>- गट चर्चेच्या वेळी त्या दिवसाच्या हवामानाचे निरीक्षण करण्यास सांगणे .<br>- याबद्दल मुलांशी चर्चा करून रिकामी अध्ययन पत्रके देऊन काल आणि आजच्या हवा चीत्र काढण्यास सांगणे.<br>- मुलांच्या कार्याचे वर्गात प्रदर्शन करणे.<br>इयत्तावर विवरण : 2री च्या मुलांनी दिवसाचे हवामान आपल्या पुस्तकात दाखल करणे . 3री च्या मुलांनी वर्गाच्या हवामान नकाशात दिवसाचे हवामान दाखल करण्यास सांगावे . (64 व्या दिवसापर्यंत पुढे नेणे ) |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षकांनी फळ्यावर लेखन करणे. लेखनाची योग्य पद्धत पाहण्याची संधी देणे .<br>मुलाचे नाव ,मुलाने काढलेल्या चित्राचे नाव इत्यादी मुलांसमोर लिहिणे . शिक्षकांना वर्गात जे काही लेखन करायचे आहे ते मुलांसमोर करणे |

<table>
<tr><td></td><td>मैदानी खेळ</td><td>दोरीचा खेळ<br>सामर्थ्य : चपळता , जलद गतीचा विकास<br>साहित्य : स्किपींग दोरी<br>पद्धत :<br>• प्रत्येक मुलाला दोरी उड्या (स्किपींग ) खेळ खेळण्यास सांगणे.<br>• दोऱ्यांची संख्या कमी असल्यास वेळेचे नियोजन करणे.<br>• दुसरी आणि तिसरी मुलांना ही कृती पुढे चालू ठेवणे .</td></tr>
<tr><td></td><td>रंजक कथा<br>(कथेची वेळ)</td><td>शीर्षक : बगळा आणि खेकडा<br>आवश्यक साहित्य : कापसाच्या बाहुल्या / काठीचे चित्र<br>उद्देश :-<br>➢ ऐकण्याचे कौशल्य विकसित करणे .<br>➢ अस्खलितपणे बोलण्याचा सराव करणे .<br>➢ सृजनशीलतेचा विकास करणे.<br>➢ कुतूहल आणि आवड निर्माण करणे .<br>➢ प्रश्नार्थक मनोभाव निर्माण करणे .<br>➢ शब्द संपतीचा विकास करणे .<br>पद्धत :<br>कथाकथन<br>कथा सांगितल्यानंतर कथेचा सारांश मोठ्याने वाचा .कथेचा संवाद पुन्हा पुन्हा सांगितला जातो व लिहिला जातो .<br>कथेची वेळ मनोरंजक असायला हवी.<br>कथा सांगितल्यानंतर सोपे प्रश्न विचारा<br>खेकडा बगळ्याच्या मानेवर बसतो असे का म्हणाला कारण सांगा .<br>(कथेचा आनंद घेण्याबरोबरच ऐकत आहेत याची खात्री करून घ्या)</td></tr>
<tr><td></td><td>पुन्हा भेटू</td><td>• या दिवशी केलेल्या कृतींचे पुनरावर्तन करणे / आठवणे .<br>• मुलांनी आज केलेल्या सर्व कृती पालक आणि कुटुंबातील सदस्याना सांगण्यास मुलांना प्रोत्साहन देणे .<br>• पुन्हा दुसऱ्या दिवशी मुलांनी उत्साहाने परत येण्यासाठी आनंददायक प्रसंग आयोजित करणे व मुलांना निरोप देणे.<br>• पुढील आठवड्यात ‘ बाह्य भेटी योजना’ आखून मुलांना विविध रोपे,झाडे यांचे निरीक्षण करण्यासाठी आवश्यक तयारी करणे .</td></tr>
</table>

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा - 10** **दिवस – 59 (शुक्रवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 59 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | 59 व्या दिवसाची  कृती करणे . |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 51 व्या दिवसाची गुजगोष्टी कृती चालू ठेवणे. पासिंग द पार्सल ही  कृती घेणे. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करणे .<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे कार्य निर्वहन करणे . |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : संख्या जाणून घेणे .<br>कृती : 35 संख्येची नक्कल विकासात्मक ध्येय-3)<br>उद्देश :-<br>संख्याचा आकार जाणून घेणे .<br>आवश्यक साहित्य : धान्य , पीठ ,वाळूची पेटी ,वाळू भरलेले ताट , काठ्या , काळी माती आणि खडू<br>• पद्धत :<br>• प्रथम संख्यांचा परिचय करून देणे .<br>• जमिनीवरती अंक लिहून त्यावर धान्ये दगड ठेवून अंकांचा सराव करणे .<br>• वाळूची पेटी /वाळूने भरलेले ताटामध्ये खडू  किंवा बोटाने 0 ते 9 पर्यंतचे अंक लिहीण्यास सांगून त्यांचा आकार ओळखण्यास प्रोत्साहन देणे .<br>• खेळाच्या मैदानात काठी आणि काड्यापासून अंक लिहून त्यावर धान्य दगड ठेवण्यास सांगणे.<br>• काळीमाती आणि पिठापासून मुलांना अंक लिहिण्यास सांगणे<br>• 0 ते 9 पर्यंतच्या संख्या बनवून प्रदर्शित करण्यास प्रोत्साहन देणे .<br>इयत्ता 2 री<br>रबरी संख्या रंगात बुडवून पानावर उमटविणे. त्या वाचणे आणि शाळेत प्रदर्शित करणे<br>इयत्ता 3 री<br>काळ्या मातीपासून अंकांचे मॉडेल तयार करून शाळेत प्रदर्शित करणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकास आणि सृजनशीलतेचा विकास<br>कृती : 50 विविध प्रकारच्या साच्यांची रचना (लक्ष-1)<br>उद्देश :<br>• सूक्ष्म स्नायूंचा विकास होणे .<br>• कान-हात यांचा समन्वय साधणे<br>• कल्पना शक्तीचा विकास करणे . |

| | | | |
|---|---|---|---|
| | कृती) | | साहित्य : कागद / वर्तमानपत्र , विविध वस्तू , साचे तयार करण्यासाठी उपयोगात येणाऱ्या विविध वस्तू ,जाड कपडा इत्यादी<br>पध्दत: या पद्धतीमध्ये साचा उमटविण्यासाठी विविध साहित्य गोळा करणे उदा : जुना कंगवा, ट्वेन दोरा, अथवा रबर बँडने गुंडाळलेला दोरा, जुनी खेळणी ( प्लास्टिकची नसलेली ) इत्यादी. प्रत्येक मुलाला जुने वर्तमान पत्र देवून गोळा केलेल्या वस्तू रंगात बुडवून उमटवायला सांगणे.<br>विवरण: 2 री व 3 री वर्गाच्या मुलांना वरील कृती करावयास सांगणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : शब्द संग्रह विकास ,अंदाज लावणे ,गटातील सदस्यासह सहकार्याने कार्य करणे , सूचनांचे पालन करणे<br>कृती : 6 वस्तूंचा अंदाज विकासात्मक ध्येय-2 ) ECL-7<br>उद्देश :-<br>* योग्य शब्द तयार करणे.<br>* सांघिक मनोभावना वाढविणे.<br>* सूचनांचे काळजीपूर्वक पालन करणे.<br>* शब्द संग्रह विकसित करणे.<br>आवश्यक साहित्य : दप्तर (बॅग) , उपलब्ध वस्तू<br>पद्धत : वर्गातील खडू , रबर ,डस्टर,फासा इत्यादी वस्तू एका पिशवीत घालणे. एकेक मुलाला बोलावून बॅगमधील वस्तूंना स्पर्श करून त्या वस्तुंचा अंदाज लावण्यास सांगणे .मुलांना प्रश्न विचारून वस्तू अचूक ओळखण्यास सांगणे.<br>उदा :<br>• तू स्पर्श केलेली वस्तू लहान आहे कि मोठी ?<br>• तू स्पर्श केलेल्या वस्तूचा आकार कसा आहे ?<br>• ती वस्तू कश्यापासून बनलेली आहे ?<br>• तू स्पर्श केलेली वस्तू घट्ट आहे की मऊ आहे?<br>• तू स्पर्श केलेली वस्तू काय असेल ?<br>मुलांनी ओळखलेल्या वस्तू बद्दल चर्चा करणे .<br>इयत्तावार विवरण : 2 री विद्यार्थ्यांनी आपण ओळखलेल्या वस्तूबद्दल 3-4 वाक्यात बोलणे. 3 री वर्गातील मुलांनी 4 ते 5 वाक्ये त्या वस्तूबद्दल बोलणे. |
| | | आकलना सहीत वाचन | कृती : 18<br>चित्र संचयिका (विकासात्मक ध्येय – 2) विषय : मुलाच्या आवडीचा कोणताही विषय<br>सामर्थ्य : छापील मजकुराची जाणीव , शब्द ओळखणे , शब्दाचे आकलन, शब्द संपत्तीचा विकास आणि पर्यावरण जागरुकता<br>आवश्यक साहित्य : कागद , तेलकट खडू, डिंक,विविध चित्रे<br>पद्धत : मुलांनी परिचीत असलेली गाणी आणि बालगीते या संबंधित चित्रे ओळखणे.<br>* गाण्यातील / कथेतील विशेष शब्द ओळखून नाव देणे .<br>* गाण्यातील / कथेतील मुख्य पात्रे ओळखणे आणि वारंवार आलेले शब्द / ओळ सांगणे /लिहिणे .<br>* मुलांकडून चित्र संचयिका व्यक्तिगत आणि गटात बनवून घेणे.<br>व्यक्तिगत चित्र संचयिका – प्रत्येक मुलाला कथेतील किवा गाण्यातील वस्तू अथवा विशेष शब्द ओळखण्यस सक्षम करणे.<br>उदा : झाड,बस,प्राणी इत्यादी चित्रे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | गट चित्र संचयिका – मुलांना गटामध्ये विभाजित करणे आणि त्यांना विविध विषयावर चर्चा करन्यांस सांगणे.<br>उदा : बागेत पाहिलेल्या वस्तू, रात्री पाहिलेल्या वस्तू , पाण्यात आढळणाऱ्या वस्तू ,जमिनीवर सापडणाऱ्या वस्तू इत्यादी चित्रे .<br>* त्यांच्या आवडीच्या विषयावर त्यांची स्वत:ची कल्पना रंगविन्यास सांगणे. .<br>* मुलांनी काढलेल्या चित्राना नाव देणे.<br>* नंतर सर्व चित्रे जोडून चित्र संचयिका तयार करण्यास संधी उपलब्ध करून देणे.<br>* मुलांनी तयार केलेली चित्र संचयीका वर्गात प्रदर्शित करणे .<br>तू करून बघ : मुलांना अनुकूल कात्री देणे.योग्य चित्र कापून त्यांचा स्वत:चा चित्रकोश तयार करण्यास प्रोत्साहित करणे. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : मुलांसाठी लेखन, उद्देशपूर्वक लेखन ,लक्ष देणे आणि ऐकणे , सृजनशील चिंतन ,शब्दसंपत्तीचा विकास<br>कृती संख्या : 32 सामाईक लेखन (विकासात्मक ध्येय – 2 ) ECW-8<br>उद्देश :<br>● सामाईक लेखनाचा परिचय करणे .<br>● उद्देशानुसार लेखनाचा क्रम अभ्यासणे.<br>● अवधान देवून उद्देशीत लेखनात गुंतविणे.<br>● सृजनात्मक चिंतन करून त्याचे लिखितरुपात व्यक्त करणे .<br>● शब्दसंपत्तीचा विकास करणे .<br>साहित्य : फळा , चित्रकला कागद<br>पद्धत :<br>महिन्यातून दोन किंवा तीन वेळा सामाईक लेखन कृती आयोजित करणे .एक विषय देऊन संबंधी त्यांचे अनुभव कथेच्या माध्यमातून किंवा लेखनाच्या माध्यमातून व्यक्त करण्यास सांगणे .<br>सल्ला सूचित विषय : आम्ही खेळणारे खेळ<br>लक्षात ठेवायचे अंश :<br>● प्रत्येक विषयाला संबंधित वाक्य रचण्यासाठी आवश्यक संकेत देणे .मुलाना लेखनात गुंतवून प्रत्याक्षित लेखन दाखविणे.<br>● शिक्षकाने पहिले वाक्य लिहून वाचणे .नंतर मुलांना त्यांची स्वत:ची वाक्ये लिहायला सांगणे.<br>● मुलांना त्यांच्या मातृभाषेत प्रतिक्रिया देण्यासाठी संधी देणे .अशा परिस्थितीत शिक्षकांनी त्यांच्या शालेय भाषेत भाषांतर करून सांगणे.<br>इयत्तावर लेखन : 1 लीच्या वर्गातील विवरण केलेले अंश 2 री आणि 3 री वर्गातील मुलांना लेखनाच्या माध्यमातून अभिव्यक्त होण्यास सांगणे. |
| | | | आदर्श लेखन :<br>आदर्श लेखन :<br>शिक्षकांनी फळ्यावर लेखन करणे. लेखनाची योग्य पद्धत पाहण्याची संधी देणे .<br>मुलाचे नाव ,मुलाने काढलेल्या चित्राचे नाव इत्यादी मुलांसमोर लिहिणे . शिक्षकांना वर्गात जे काही लेखन करायचे आहे ते मुलांसमोर करणे |
| | मैदानी खेळ | | दोरीचा खेळ<br>सामर्थ्य : चपळता , जलद गतीचा विकास |

| | | |
|---|---|---|
| | | साहित्य : स्किपींग दोरी<br>पद्धत :<br>• प्रत्येक मुलाला दोरी उड्या (स्किपींग ) खेळ खेळण्यास सांगणे.<br>• दुसरी आणि तिसरी मुलांना हीच कृती पुढे चालू ठेवणे . |
| | रंजक कथा<br>(कथेची वेळ) | शीर्षक : बगळा आणि खेकडा<br>आवश्यक साहित्य : बोटांच्या बाहुल्या<br>उद्देश :-<br>➢ ऐकण्याचे कौशल्य विकसित करणे .<br>➢ अस्खलितपणे बोलण्याचा सराव करणे .<br>➢ सृजनशीलतेचा विकास करणे.<br>➢ कुतूहल आणि आवड निर्माण करणे .<br>➢ प्रश्नार्थक मनोभाव निर्माण करणे .<br>➢ शब्द संपतीचा विकास करणे<br>➢ पुस्तकी शब्दांचा परिचय करून देणे .<br>➢ नैतिक मुल्ये दृढ करणे .<br>➢ अभिव्यक्ती सामर्थ्य वाढविणे .<br>पद्धत :<br>**अभिनय**<br>➢ कथेची पुनरावृत्ती करणे .<br>➢ कथेचे वर्णन करण्यासाठी दुसरी आणि तिसरी मधील मुलांना सहकार्य करणे .<br>➢ कथेतील पात्रांची चित्रे बोटाने जोडून पात्रांना अनुरूप असे संभाषण करण्यास मुलांना प्रोत्साहित करणे. |
| | पुन्हा भेटू | • या दिवशी केलेल्या कृतींचे पुनरावर्तन करणे / आठवणे .<br>• मुलांनी आज केलेल्या सर्व कृती पालक आणि कुटुंबातील सदस्यांसोबत शेअर करण्यास मुलांना प्रोत्साहन देणे .<br>• पुन्हा दुसऱ्या दिवशी मुलांनी उत्साहाने परत येण्यासाठी आनंददायक प्रसंग आयोजित करणे व मुलांना निरोप देणे.<br>• पुढील आठवड्यात ‘ बाह्य भेटी योजना’ आखून मुलांना विविध रोपे,झाडे यांचे निरीक्षण करण्यासाठी आवश्यक तयारी करणे . |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 10 दिवस – 60 (शनिवार)

| | |
|---|---|
| प्रतिबिंब<br>(वर्गातील निरंतर | • विविध तंत्र वापरून (निरीक्षण, तपशील पट्टी, मुलांची अध्ययन पत्रके, व्हिडीओ, सांदर्भिक नोंदी, इत्यादी) तुम्ही संग्रह केलेल्या मूल्यमापन नोंदी/माहिती यांचे पुनरावलोकन करणे. |

| | |
|---|---|
| मूल्यमापन) | • प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिगत गरजेनुसार पुढील आठवड्यातील अध्ययन प्रक्रियेची योजना आखणे.<br>• अध्ययनाच्या तिन्ही विकासात्मक ध्येयांच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे. |


# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 11 दिवस – 61 (सोमवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 61 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती : 1<br>1. शाळेत पहिला आलेल्या मुलाला कागदाचा मुकुट घालून स्वागत करणे.<br>2. अश्याप्रकारे मुलांना शाळेत वेळेत येण्यासाठी प्रोत्साहित करणे.<br>कृती : 32<br>35 व्या दिवसाची कृती करणे . |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती : आठवतय का ?<br>पद्धत :<br>• मुलांना अर्ध वर्तुळाकारात बसविणे.<br>• वाढदिवस साजरा करण्यासंबंधित मुलांच्या कानात कोणतेही एक वाक्य हळू सांगणे.<br>मग प्रत्येक मुल वर्तुळातील आपल्या पुढील मुलाच्या कानात त्याने ऐकलेले वाक्य कुजबुजतो.<br>• शेवटच्या मुलाला संदेश पोहोचेपर्यंत कृती पुढे चालू राहील.<br>• शेवटच्या मुलाला त्याने ऐकलेला संदेश मोठ्याने बोलण्यास सांगणे.<br>• खेळ पुढे चालू ठेवणे.<br>• यावेळी संदेश देण्यासाठी दुसरे मुल निवडू शकता.<br>कृती : माझ्या वाढदिवशी<br>साहित्य : वाढदिवस साजरा करण्यासाठी वापरावयाचे साहित्य : टोप्या , मेणबत्ती , फुगे , चॉकलेट, फीत , भेटवस्तू , फुलांची सजावट , सजविलेले कागद इत्यादी.<br>पद्धत :<br>• मुलांना वर्तुळाकारात बसविणे.<br>• वरील यादी केलेल्या वस्तू वर्तुळाच्या मध्यभागी ठेवा.<br>• नंतर एका मुलाला बोलावून एक वस्तू निवडून त्याचे नाव सांगा. नंतर यादी केलेल्या वस्तूबद्दल त्याचे मत जाणून घेण्यासाठी काही प्रश्न विचारा.<br>आपण त्यांना कोठे पाहिलात?<br>आम्ही त्याचा वापर कोठे करतो?<br>तुम्ही कधी त्याचा वापर केला आहात का?<br>तुम्ही तुमचा वाढदिवस साजरा करता का? |
| | माझा वेळ (Free | मुलांनी स्वइच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करणे .<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे कार्य निर्वहन करणे . |

| | | | |
|---|---|---|---|
| | Indore Play) | | |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | | **सामर्थ्य : क्रमवार मोजण्याचे ज्ञान**<br>**कृती: 36 संख्या उलट मोजणे (विकासात्मक ध्येय- 3)**<br>**उद्देश : उलट मोजण्याचा क्रम दृढ करणे.**<br>**आवश्यक साहित्य : मोजण्यायोग्य उपलब्ध वस्तू / फ्लॅश कार्ड**<br>**पद्धत :** 9 **वस्तू क्रमवार जोडा. जोडलेल्या वस्तू मुलांना मोजण्यास सांगा . त्याप्रमाणे 1 ते 9 मधील फ्लॅश कार्ड देवून क्रमवार लावण्यास सांगा. याप्रमाणे चढता क्रम आणि उतरत्या क्रमाचा सराव करणे .**<br>**2 री इयत्ता**<br>**10. मुलांना उभे करून 1 ते 10 पर्यंतच्या संख्या चढत्या आणि उतरत्या क्रमात लिहिण्यास सांगणे .**<br>**3 री इयत्ता**<br>1 **ते 20 पर्यंतचे दगड क्रमवार जोडण्यास सांगणे. नंतर संख्या चढत्या आणि उतरत्या क्रमात लिहिण्यास सांगणे.** |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | | **सामर्थ्य:** सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकास आणि सृजनशीलतेचा विकास , डोळे - हात याचा समन्वय, आकारांची परिकल्पना.<br>**कृती :** अक्षरांवर गिरविणे. (विकासात्मक ध्येय -1 )<br>**उद्देश :-**<br>● सूक्ष्म स्नायूंचा विकास होणे .<br>● डोळे- हात यांचा समन्वय साधणे.<br>**साहित्य :** वाळू<br>**पद्धत :** विद्यार्थ्यांना माहित असलेल्या साध्या मराठी, कन्नड अक्षरांचे लेखन करण्यास सांगून त्यावर दगड / काठी / मणी / स्ट्रॉ ठेवून जोडण्यास सांगणे .<br>**तपशील :** 2 री आणि 3 री च्या विद्यार्थ्यांना माहित असलेल्या 3 - 4 मराठी, कन्नड, इंग्रजी अक्षरांचे लेखन करण्यास सांगून त्यावर दगड/ काठी/ मणी/ स्ट्रॉ ठेवून जोडण्यास सांगणे . |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | **सामर्थ्य:** ध्वनी संकेतांचे संयोजन , लक्ष देणे आणि ऐकणे<br>**कृती :** मधील अक्षर ओळखणे ( ब द क ) (विकासात्मक ध्येय- 2) ECL-21<br>**उद्देश :**<br>* शब्दातील अक्षर – ध्वनी यांचा परस्पर संबंध ओळखणे.<br>* लक्षपूर्वक ऐकून अक्षर – ध्वनी यांच्यातील परस्पर संबंध समजून घेणे.<br>**आवश्यक साहित्य :** फळा , फ्लॅश कार्ड्स ( दृक पट्ट्या )<br>**पद्धत :**<br>• मुलांना वर्तुळाकार बसवून फ्लॅश कार्ड्स वर लिहिलेले शब्द दाखवून स्वराक्षरांचा परिचय करून देणे आणि त्यांना शब्दांच्या मध्यभागी असलेले अक्षर दाखविण्यास सांगणे.<br>• मुलांना फळ्यावर लिहायला सांगणे<br>• अक्षर आणि शब्द एकत्र करणे आणि ओळखणे.<br>**टीप :** 2 री इयत्तेतील मुलांनी चिन्हांकित केलेल्या अक्षराच्या मध्यभागी आलेले वेगवेगळे शब्द ओळखणे. 3 री इयत्तेतील मुले स्वत: विविध शब्दामधील मधले अक्षर ओळखण्याची कृती करतात . |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | वापरावयाचे अध्ययन पत्रक : EC- 15 ( इयत्ता 1, 2, 3) |
| | | आकलना सहीत वाचन | कृती : 18<br>चित्र संचयिका (विकासात्मक ध्येय – 2) विषय : मुलाच्या आवडीचा कोणताही विषय<br>सामर्थ्य : छापील मजकुराची जाणीव , शब्द ओळखणे , शब्दाचे आकलन, शब्द संपत्तीचा विकास आणि पर्यावरण जागरुकता<br>आवश्यक साहित्य : कागद , क्रेयॉन, डिंक, विविध चित्रे<br>पद्धत : मुलांनी परिचीत असलेली गाणी आणि बालगीते संबंधित चित्रे ओळखणे.<br>* गाण्यातील / कथेतील विशेष शब्द ओळखून नाव देणे.<br>* गाण्यातील / कथेतील मुख्य पात्रे ओळखणे आणि वारंवार आलेले शब्द / ओळ सांगणे /लिहिणे.<br>* मुलांकडून चित्र संचयिका व्यक्तिगत आणि गटात बनवून घेणे.<br>व्यक्तिगत चित्र संचयिका – प्रत्येक मुलाला कथेतील किवा गाण्यातील वस्तू अथवा विशेष शब्द ओळखण्यास सक्षम करणे.<br>उदा : झाड, बस, प्राणी इत्यादी चित्रे<br>गट चित्र संचयिका – मुलांना गटामध्ये विभाजित करणे आणि त्यांना विविध विषयावर चर्चा करू करणे .<br>उदा : बागेत पाहिलेल्या वस्तू, रात्री पाहिलेल्या वस्तू , पाण्यात आढळणाऱ्या वस्तू , जमिनीवर सापडणाऱ्या वस्तू इत्यादी चित्रे .<br>* त्यांच्या आवडीच्या विषयावर त्यांची स्वताची कल्पना रंगवू देणे.<br>* मुलांनी काढलेल्या चित्राना नाव देणे.<br>* नंतर सर्व चित्रे जोडून चित्र संचयिका तयार करण्यास संधी उपलब्ध करून देणे.<br>* मुलांनी तयार केलेली चित्र संचयीका वर्गात प्रदर्शित करणे.<br>तू करून बघ : मुलांना अनुकूल कात्री द्या . योग्य चित्र कापून त्यांची स्वतःचा चित्रकोश तयार करण्यास प्रोत्साहन देणे. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : उद्देशपूर्वक लेखन , सृजनशील विचार , शब्दसंपत्तीचा विकास, श्रवण, आकलन आणि पर्यावरण जागरुकता<br>कृती 33 : यादी बनविणे (विकासात्मक ध्येय – 2) ECW-10<br>उद्देश :<br>● उद्देशानुसार लेखन करायला संधी देणे .<br>● सृजनशील विचार वाढविणे .<br>● पर्यावरण जागरुकता वाढविणे .<br>● शब्दसंपत्ती वाढविणे .<br>● सूचना ऐकून समजून घेणे .<br>आवश्यक साहित्य : वही ,कागद, क्रेयॉन<br>पद्धत : मुलांचा शब्द संग्रह वाढविण्यासाठी आणि उद्देशपूर्वक लेखन सुलभ करण्यासाठी त्याना विविध विषयावर शब्दांची यादी करण्यास सांगणे.<br>सुचविलेले विषय : स्वयंपाक घरातील साहित्य<br>पद्धत :<br>• संपूर्ण वर्गाकडून एका कार्ड्शीट पेपरवर यादी करायची कृती आयोजित करणे.<br>• या तक्त्यामध्ये शिक्षक वापरू शकतील अशा सामान्य शब्दांची यादी करून वर्गाच्या शेवटी प्रदर्शित करणे, जेणेकरून मुले ते पाहू आणि वाचू शकतील. |

| | | |
|---|---|---|
| | | टीप : इयत्ता पहिली वर्गाच्या मुलांनी तयार केलेल्या यादीमध्ये दुसरी वर्गाच्या मुलांना शब्द जोडू द्या आणि 3 री वर्गाच्या मुलांना सूचीबद्ध शब्दासाठी त्यांची स्वत:ची वाक्ये तयार करू द्या. |
| | | आदर्श लेखन :<br>शिक्षक फळ्यावर लेखन करतात. लेखनाची योग्य पद्धत पाहण्याची संधी देतात.<br>मुलाचे नाव , मुलाने काढलेल्या चित्राचे नाव इत्यादी मुलांसमोर लिहितात . शिक्षक वर्गात जे काही लेखन करायचे आहे ते मुलांसमोर करतात. |
| | मैदानी खेळ | कृती : स्थिर समतोल (static balance)<br>सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकास , शरीराच्या वेगवेगळ्या भागांचा समतोल.<br>आवश्यक साहित्य : मऊ जागा , चटई , जमखाना <br>पद्धत :<br>● ही कृती वर्ग कोपऱ्यात/ सभागृहामध्ये घेणे. चटईवर / जमखाना घालून मुलांना पाहिजे तेवढ्या जागेची सोय करून देणे .<br>● मुलांना चटईवर त्यांच्या पाठीवर झोपण्याची सूचना करणे.<br>● काही वेळाने पोटावर झोपण्याची सूचना करणे .<br>टीप : दुसरी व तिसरी वर्गातील मुलांना त्यांच्या पाठीवर झोपताना त्यांचे पाय आणि हात उचलण्याची सुचना करावी. |
| | रंजक कथा<br>(कथेची वेळ) | शीर्षक : उंट आणि कोल्हा<br>साहित्य : कथेचे साहित्य<br>उद्देश :<br>➢ ऐकण्याचे कौशल्य विकसित करणे .<br>➢ विचारशक्ती वाढविणे .<br>पद्धत :<br>**कथाकथन**<br>➢ शिक्षकांनी कथा सांगण्यापूर्वी ती कथा वाचून त्याचा अर्थ ग्रहण करावा.<br>➢ योग्य हावभावासह सोप्या भाषेत कथा सांगावी<br>➢ कथा सांगताना शिक्षकांनी मुलांसोबत वर्तुळात बसावे.<br>➢ साधे प्रश्न विचारून कथेचा अर्थ समजला का ते पहावे .<br>कथा :<br>एका जंगलात उंट आणि कोल्हा राहत होते. त्या जंगलाजवळ उसाचे शेत होते, पण शेत आणि जंगलाच्या मध्ये एक होती. एके दिवशी दोघांनाही वाटले की आज आपण नदीपलीकडे शेतात ऊस खायला जाऊ. दोघांनी निर्णय घेतला आणि उसाच्या शेताकडे निघाले. कोल्हा नदीजवळ पोहोचताच उंट म्हणाला, तू मला तुझ्या पाठीवर बसवलेस तर मी सुद्धा नदी पार करेन. उंटाने कोल्ह्याला पाठीवर बसवले आणि ते दोघे काही वेळाने शेतात पोहोचले.<br>शेतात पोहोचताच त्याला खूप गोड ऊस खायला मिळाले. दोघांनी ऊस खायला सुरुवात केली पण थोड्या वेळाने कोल्ह्याचे पोट भरले. आपले पोट भरताच तो विचित्र आवाज करू लागला. हे पाहून उंटाने त्याला तसे करण्यास मनाई केली. परंतु कोल्ह्याने त्याचे ऐकले नाही. उंट त्याला म्हणाला की तू असेच करत राहिलास तर शेताचा मालक येऊन आपल्याला मारहाण करील, पण कोल्हा अजूनही गप्प बसला नाही आणि मोठमोठ्याने आवाज करत राहिला. कोल्ह्याचा आवाज ऐकून शेताचा मालक आला. शेताच्या मालकाला पाहून कोल्हा पळाला आणि एका मोठ्या झुडपात लपला. उंट शरीराने मोठा असल्याने त्याला शेतकऱ्यांने पकडले आणि बदड बदड बदडले. उंटाला |

| | | |
|---|---|---|
| | | कोल्ह्याचा स्वार्थ दिसून आला .<br>कथा सांगताना साधे प्रश्न विचारावे .<br>● कोल्ह्याला काय खायची इच्छा झाली ?<br>● उंटाने कोल्ह्याला कोठे बसविले ?<br>(कथेचा आनंद घेण्याबरोबरच ऐकत आहेत याची खात्री करून घ्या) |
| | पुन्हा भेटू | ● या दिवशी केलेल्या कृतींचे पुनरावर्तन करणे / आठवणे.<br>● मुलांनी आज केलेल्या सर्व कृती पालक आणि कुटुंबातील सदस्यांसोबत शेअर करण्यास मुलांना प्रोत्साहन देणे.<br>● पुन्हा दुसऱ्या दिवशी मुलांनी उत्साहाने परत येण्यासाठी आनंददायक प्रसंग आयोजित करून मुलांना निरोप देणे. |


# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा - 11** **दिवस – 62 (मंगळवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 62 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | 61 व्या दिवसाची कृती करावी . |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 61 व्या दिवसाची कृती चालू ठेवावी . |
| | माझा वेळ (Free Indore Play) | * सर्व मुले अध्ययन कोपऱ्यातील कृतीमध्ये गुंतले आहेत तसेच योग्यरीतीने ती पूर्ण करत आहेत याची खात्री करून घेणे.<br>* अपूर्ण राहिलेल्या कृती मुलाला पूर्ण करण्यास सहकार्य करणे.<br>* पुढच्या दिवसाच्या कृतीमध्ये सहभागी होत असताना कोणत्या मुलांकडे लक्ष द्यावे याविषयी शिक्षकांनी मानसिकरित्या तयार राहणे.<br>* दिवसाच्या शेवटी अध्ययन कोपऱ्यात पुढच्या पायरीसाठी आवश्यक साहित्य तयार ठेवणे |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक | सामर्थ्य : पर्यावरण जागरुकता , अविष्कार आणि प्रयोगशीलता वाढविणे.<br>कृती 38 : वनस्पतीची आवश्यकता जाणून घेणे. (विकासात्मक ध्येय- 3 )<br>उद्देश : वनस्पतीची वाढ आणि उपयोग समजून घेणे .<br>आवश्यक साहित्य : कागदी कप / नारळाची करवंटी , माती आणि बियाणे.<br>पद्धत : वनस्पतींचा परिचय<br>❖ वनस्पतीच्या वाढीसाठी आवश्यक घटक असलेले माती, पाणी, हवा, बिया याविषयी सांगणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | | ❖ कागदी कपामध्ये माती घालून विविध प्रकारच्या बिया त्या मातीत घालणे. त्यांना दररोज पाणी देवून त्यात होणाऱ्या बदलाची इतरांना माहिती देणे.<br>❖ खालील गाणे शिकविणे .<br><br>आम्ही झाडे<br><br>धरतीच्या पोटीं आम्ही जन्मतो<br>आधाराने तिच्याच जगतो<br>हसत - खेळत आम्ही वाढतो<br>गोड फळे मग तुम्हांस देतो !<br>आम्ही झाडे ऊन सोसतो<br>गार सावली तुम्हांस देतो<br>शुद्ध हवेचे दान देऊनी<br>माया साऱ्यांवरती करतो<br>तुम्ही बालके हसा खेळा<br>आपुलकीची कास धरा<br>परोपकाराच्या मार्गावर<br>मंत्र शांतीचा जपू जरा....<br><br>इयत्ता 2 री :<br>वनस्पतीच्या वाढीसाठी आवश्यक घटक सांगणे. तुमच्या घरातील धान्यांची नावे सांगा.<br>इयत्ता 3 री :<br>नाचणा, जोंधळा, भात , मुग इत्यादी धान्ये घेवून नारळाच्या करवंटी मध्ये किंवा ग्लास मध्ये माती भरून त्यामध्ये बिया घालून पाणी घालण्यास सांगून धान्ये कशाप्रकारे वाढली याबद्दल मुलांकडून विचारून घेणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | | सामर्थ्य: सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकास आणि सृजनशीलतेचा विकास , कान-हात याचा समन्वय, आकारांची परिकल्पना.<br>कृती 33 अ : ट्रेसिंग [वाळू] ध्येय - 1<br>उद्देश :<br>❖ सूक्ष्म स्नायूंचा विकास होणे.<br>❖ कान-हात यांचा समन्वय साधणे<br>साहित्य : वाळू , ग्लास, नारळाची करवंटी, चमचा, पुठ्ठा<br>पद्धत : मुलांना वरील सर्व वस्तु देऊन घर, घरटे, डोंगर, कालवा, कट्टा बांधणे इत्यादी नमुन्याप्रमाणे वाळू घालण्यास सांगून त्याबद्दल थोडक्यात माहिती देण्यास सांगणे.<br>विवरण : इयत्ता 2 री आणि 3 री च्या मुलांना वरील कृती करण्यास सांगणे. |
| | भा षा वि का स आ | ऐकणे व बोल णे | सामर्थ्य : ध्वनी संकेतांचे संयोजन , शब्दसंपत्ती विकास अक्षर ओळखणे<br>कृती 26 : शब्दाचा शेवटचा आवाज ओळखतात आणि जोडतात (विकासात्मक ध्येय :2) ECL-22<br>उद्देश :<br>* ध्वनी संकेताबद्दल जागरूकता वाढवणे.<br>* शब्द समजून घेऊन ओळखणे.<br>* शब्दातील अक्षर – ध्वनी यांचा परस्पर संबंध ओळखणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | णि<br>पा<br>या<br>भूत<br>सा<br>क्षर<br>ता | | * लक्षपूर्वक ऐकून अक्षर – ध्वनी यांच्यातील परस्पर परस्पर संबंध समजून घेणे.<br>आवश्यक साहित्य : फळा<br>पद्धत :<br>मुलांना वर्तुळात उभे करून काही परिचित शब्द सांगणे.<br>उदा : सर, झाड, कर, दर, दुष्काळ<br>- (सर्व समान) शेवटच्या अक्षराचा आवाज ओळखणे.<br>- नवीन शब्द सांगा आणि त्याच शब्दाने शेवट होणारे शब्द म्हणा.<br>- विविध शब्द प्रदर्शित करून एक सारख्या आवाजाने शेवट होणाऱ्या शब्दांचा परिचय करून देणे.<br>इयत्तावार विवरण : 2 री इयत्तेतील मुले सुचवलेल्या आवाजाच्या शेवटी येणाऱ्या विविध शब्दाची यादी बनवितात.<br>इयत्ता 3 री ची मुले विविध शब्दातील सुचविलेले शेवटचे अक्षर ओळखून , ते शब्द वापरुन वाक्य तयार करतात.<br>वापरावयाची अध्ययन पत्रके : EC-16 ( इयत्ता 1, 2, 3) |
| | | आक<br>लना<br>सहीत<br>वाचन | कृती 27 : ध्वनीसह अक्षरे एकत्र करणे (विकासात्मक ध्येय- 2)<br>सामर्थ्य : ध्वनीसंकेतांचे सयोजन, अक्षर ओळखणे, सूक्ष्म स्नायू कौशल्य विकास<br>आवश्यक साहित्य : मणी, बटन, माती, वाळू, काठ्या, अक्षरांचे आकार इत्यादी<br>पद्धत:<br>* वर्गातील वस्तु आणि मुलांच्या नावातील अक्षरे ओळखणे.<br>* ओळखलेली अक्षरे त्यांच्या आवाजाशी जोडणे.<br>* विविध वस्तु वापरून (मणी, बटन, माती, वाळू, काठ्या) अक्षरांच्या आकाराची कल्पना करणे.<br>* वाळू आणि मातीवर अक्षरांचा सराव करणे.<br>* अक्षरे लिहून अक्षरामध्ये रंग भरण्यास सांगणे.<br>* जमिनीवर पाण्याने अक्षरांचे आकार तयार करणे<br>* कागद आणि पेन्सिल व्यतरिक्त अक्षरे तयार करण्याची संधी देणे.<br>* अक्षरांच्या आवाजावर जोर देऊन त्यांना परिचित शब्दाशी जोडणे. |
| | | उद्देश<br>पूर्वक<br>लेखन | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्याभिवृधी , उद्देशत लेखन<br>कृती 37 : चित्र काढणे आणि नाव देणे (विकासात्मक ध्येय-2 ) ECW-3<br>उद्देश :-<br>• सूक्ष्म स्नायू चालना कौशल्याभिवृधी करणे .<br>• उद्देशानुसार लेखनाचा क्रम अभ्यासणे.<br>• आवडीचे चित्र रंगविणे.<br>आवश्यक साहित्य : कागद, क्रेयॉन्स, पेन्सिल<br>पद्धत :<br>मुलांनी त्यांच्या आवडीचे प्राणी / पक्षी यांचे चित्र काढून रंग भरणे व नाव देणे.<br>टीप : 2 री आणि 3 री इयतेच्या मुलांनी त्यांच्या आवडीचे प्राणी / पक्षी यांचे चित्र काढून नाव देणे. |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षक फळ्यावर लेखन करतात. लेखनाची योग्य पद्धत पाहण्याची संधी देतात.<br>मुलाचे नाव ,मुलाने काढलेल्या चित्राचे नाव इत्यादी मुलांसमोर लिहितात . शिक्षक वर्गात जे काही लेखन करायचे आहे ते मुलांसमोर करतात. |
| | मैदानी खेळ | | कृती : स्थिर समतोल (static balance) |

| | | |
|---|---|---|
| | | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकास , शरीराच्या वेगवेगळ्या भागांचा समतोल साधणे.<br>आवश्यक साहित्य : मऊ जागा , चटई ,जमखाना<br>पद्धत :<br>• ही कृती वर्ग कोपऱ्यात / सभागृहामध्ये करायची आहे .चटईवर / जमखाना घालून मुलांना पाहिजे तेवढ्या जागेची सोय करून देणे .<br>• मुलांना चटईवर त्यांच्या पाठीवर झोपण्याची सूचना करणे.<br>• काही वेळाने पोटावर झोपण्याची सूचना करणे .<br><br>दुसरी व तिसरी वर्गातील मुलांनी त्यांच्या पाठीवर झोपताना त्यांचे पाय आणि ह |
| | रंजक कथा<br>(कथेची वेळ) | मागच्या दिवसाच्या उद्देशानुसार कथा चालू ठेवणे.<br>**कथाकथन**<br>शिक्षक कथा सांगतात आणि मुलांची मदत घेऊन कथा पूर्ण करतात.<br>उदा : ते कोठे गेले? मग काय झाल? इत्यादी<br>कथा सांगितल्यानंतर साधे प्रश्न विचारतात.<br>• ऊस कोठे होता?<br>• ऊस खाल्यानंतर कोल्हयाने काय म्हटले?<br>(कथेचा आनंद घेण्याबरोबरच ऐकत आहेत याची खात्री करून घेणे.) |
| | पुन्हा भेटू | • या दिवशी केलेल्या कृतींचे पुनरावर्तन करणे / आठवणे .<br>• मुलांनी आज केलेल्या सर्व कृती पालक आणि कुटुंबातील सदस्यांसोबत शेअर करण्यास मुलांना प्रोत्साहन देणे .<br>• पुन्हा दुसऱ्या दिवशी मुलांनी उत्साहाने परत येण्यासाठी आनंददायक प्रसंग आयोजित करणे व मुलांना निरोप देणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती


## आठवडा - 11      दिवस – 63 (बुधवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 63 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | 61 व्या दिवसाची कृती पुन्हा करावी . |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक | कृती : सण<br>पद्धत : ( खेळाचे मॉडेल )<br>• वर्गात जमिनीवर एक मोठे वर्तुळ काढणे. (मुलांच्या संख्येला अनुसरून) |

| | | |
|---|---|---|
| | कृती) | • मुलांना वर्तुळात बसविणे.<br>• शिक्षकानी सणाचे नाव सांगितल्यास मुलांनी वर्तुळात उडी मारणे आणि जर आठवड्याचे नाव सांगितले तर त्यांनी वर्तुळाच्या बाहेर उडी मारली पाहिजे. जर कोणी चूक केली तर त्याला खेळाच्या बाहेर काढणे.<br>**61 व्या दिवसाची कृती करावी।**<br>कृती : **माझे सण**<br>**आवश्यक साहित्य: तुमच्या भागात साजरे केले जाणाऱ्या विविध प्रकारच्या सणांची चित्रे.**<br>**कार्यपद्धत:**<br>1. **मुलांना अर्धवर्तुळात बसण्यास सांगणे.**<br>2. **सणांची चित्र कार्डे पिशवी मध्ये ठेवण्यास सांगणे.**<br>3. **चित्रे असणारी पिशवी संगीताच्या तालावर मुलांच्या हातातून पास करत जाणे.**<br>4. **मध्येच संगीत थांबवणे.**<br>5. **संगीत थांबल्यावर ज्या मुलाच्या हातात पिशवी असेल त्या मुलाने पिशवीतील कार्ड बाहेर काढणे.**<br>6. **कार्ड मध्ये असलेल्या सणाचे चित्र बघून मुलांनी घरी साजरा करणाऱ्या सणाविषयी आपला अभिप्राय सांगणे.**<br>7. **सणविषयी मुलांन व्यक्त होवू देण्यासाठी त्यांना काही प्रश्न विचारने.** |
| | **माझा वेळ (Free Indore Play)** | **अध्ययन सिद्धतेसाठी 8 कोपरे : पहिल्या टप्प्यामध्ये कोपऱ्यानुसार कृतीबद्दल आणि सदरी साहित्य वापराबद्दल शिक्षकांनी मुलांना माहिती देणे. प्रश्न विचारून मुलांना समजल्याचे खात्री करून घेणे.**<br>**बिल्डिंग ब्लॉक्स कोपरा :**<br>सामर्थ्य : **डोळे आणि हात यांचे संयोजन.**<br>कृती : **पिरॅमिड रचना**<br><br>उद्देश : **वस्तूंना जोडणारी कौशल्ये विकसित करणे.**<br>**एकाग्रता , सौदर्याची जाणीव आणि आत्मविश्वास वाढवणे.**<br>**साहित्य : बॉक्स, कागदी कप इत्यादी.**<br>**पद्धत : वि. प्र. आणि इयत्ता 2 & 3 री**<br>**दिलेल्या वस्तु पिरॅमिडच्या आकारात जोडणे**<br>*******************************************************************************<br>**गणित कोपरा :**<br>सामर्थ्य : **वस्तूंचा आकार, उंच - ठेंगू , जड – हलका आधारित साहित्याच्या आकारांचे वर्गीकरण आणि संख्यांची तुलना करणे.**<br>**कृती :**<br>**उद्देश : विशिष्ट अंकांच्या वस्तूंचा गट करणे.**<br>**साहित्य :- मणी, दाणे, बिया, गोट्या इत्यादी.**<br>**पद्धत :**<br>**विद्याप्रवेश ( वि .प्र ): शिक्षकानी पांढऱ्या शिटवर चिन्हांकित केलेल्या ठिपक्या इतकेच दाणे /बिया /मणी ठेवणे.**<br>2 **री व** 3 **री इयतेसाठी :**<br>**पांढऱ्या पेपरवर शिक्षकांनी लिहीलेल्या संख्येवर दाणे / बिया / मणी / यांचे दहाच्या गटामध्ये विभागणी करणे.**<br>********************************************************************************<br>**संशोधन / विज्ञान कोपरा :**<br>**सामर्थ्य : वैज्ञानिक शोधात्मक मनोभाव आणि विचार करण्याच्या सवयी जोपासणे.**<br>**कृती : घसरणे .. उडणे** |

| | | |
|---|---|---|
| | | उद्देश : हवेमध्ये वस्तूंचे विस्थापन जाणून घेणे.<br>साहित्य :- कापूस, कागद, पंख, वाळलेली पाने, प्लॅस्टिक बॉल, पट्टी.<br>पद्धत :<br>विद्याप्रवेश (वि .प्र):<br>दिलेल्या वस्तूंना फुकणे. काही वस्तु घसरतात आणि काही वस्तु उडतात. त्या वस्तूंचे विस्थापन जाणून घेणे.<br>इयत्ता 2 री व 3 री साठी :<br>परिसरातील आपण पाहिलेल्या उडणाऱ्या आणि न उडणाऱ्या वस्तूंची नावे सांगणे.<br>*************************************************************************************<br>**खेळणी कोपरा :**<br>सामर्थ्य: सौंदर्य शास्त्र, व्यक्तिगत स्वचता आणि अभिव्यक्ती कोशल्ये विकसित करणे.<br>कृती : बाहुलीची कथा<br>उद्देश : विशिष्ट विषयावर अभिव्यक्त होणे .<br>साहित्य : गाय, वाघ, हत्ती, मोर, कोंबडी, कबुतर आणि इतर प्राणी – पक्षांच्या बाहुल्या इत्यादी.<br>पद्धत : ( वि .प्र आणि 2 & 3 री इयतेसाठी )<br>मुले स्वत:ला आवडणाऱ्या 2 किंवा 3 बाहुल्या निवडून स्वत: च्या कल्पनेतून कथेची कल्पना करतात आणि मांडतात.<br>**वाचन /वर्ग वाचनालय कोपरा :**<br>सामर्थ्य : चित्रे वाचून अर्थ लावणे, कल्पनाशक्ती , अभिव्यक्ती सामर्थ्य विकसित करणे.<br>कृती : समजून वाचा<br>उद्देश : वाचक, साधी चित्रे असलेली कथा वाचण्याचा प्रयत्न करणे<br>साहित्य :- सोप्या गोष्टीतील साधीचित्रे , वाचक<br>पद्धत : ( वि .प्र आणि 2& 3 री इयतेसाठी )<br>परिचित कथांच्या चित्रांची सारणी वाचायला देऊन चित्रांच्या मदतीने कथा समजावून सांगणे.<br>*****************************************************************************<br>**कलागृह /हस्तकला कोपरा :**<br><br>सामर्थ्य : सूक्ष्म स्नायूची वाढ , सौन्दर्यशास्त्र, सृजनशीलता विकसित करणे.<br>कृती : शुभेच्छा पत्र<br>उद्देश : सौंदर्याची जाणीव आणि सृजनशील कौशल्य विकसित करणे.<br>साहित्य :- वाळलेली पाने , काड्या, बारीक खडे , रंग, चित्रकला पेपर, डिंक.<br>पद्धत : ( वि .प्र आणि इयत्ता 2 री व 3 री साठी )<br>दिलेल्या वस्तु पांढऱ्या पेपरवर चिकटून विविध चित्रे तयार करणे.<br>*****************************************************************************<br>**लेखन कोपरा :**<br><br>सामर्थ्य : लेखन तयारी सरावामध्ये सहभागी होऊन आकर्षक रचना तयार करणे.<br>कृती : अक्षर तयार करूया.<br>उद्देश : अक्षर तयार करण्याचे साधे कौशल्य जाणणे.<br>साहित्य : रंगीत माती ( काळी माती ) |

| | | |
|---|---|---|
| | | विधान : ( वि .प्र आणि इयत्ता 2 री व 3 री साठी)<br>मातीच्या मदतीने अक्षरांचे नमुने तयार करणे.<br>**************************************************************************************<br>**खेळणी / करा व शिका कोपरा :**<br>**सामर्थ्य : विचार करण्याची शक्ती, सृजनशीलता, स्वतंत्रपणे काम करणे.**<br>**कृती : स्पंज बाहुली तयार करणे.**<br>**उद्देश : पद्धतशीर आणि क्रमबद्ध दिलेल्या सूचनांचे पालन करणे.**<br>**साहित्य :- स्पंज , रबर बॅंड , टिकल्या, मार्कर पेन**<br><br>**पद्धत :**<br>(वि. प्र. आणि इयत्ता 2 री व 3 री साठी)<br>**. स्पंजला लांब धरून वरील दोन्ही कोपऱ्यांना रबर घालून कानाची रचना करणे.**<br>**. चित्रात दाखवल्याप्रमाणे स्पंजच्या मध्यभागी रबर बॅंड सैल घालणे.**<br>**. नंतर डोळ्यांच्या जागी टिकल्या चिकटवणे.**<br>**. मार्कर पेनने तोंडाच्या जागी एक रेषा ओढणे.**<br>**. नंतर रंगीत टिकल्यापासून बाहुलीला सजविणे.**<br>इयत्ता 2 री व 3 री साठी :<br>**बाहुलीला स्वत: च्या पद्धतीने सजवणे.** |
| | **पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती)** | **सामर्थ्य : फळाविषयी जागरूकता वाढविणे, निरोगी आहार खाणे.**<br>**कृती 39 : फळांबद्दल जाणून घेऊ.** (विकासात्मक ध्येय- **3)**<br>**उद्देश :- निरोगी अभ्यासात फळांचे महत्व जाणून घेणे.**<br>**आवश्यक साहित्य : विविध रंगाचे कागद , कात्री**<br>**पद्धत :**<br>❖ **फळांबद्दल काही प्रश्न विचारून वर्ग सुरू करणे. उदा : तुम्ही खात असलेल्या फळांची नावे सांगा. तुमचे आवडते फळ कोणते?**<br>*** मुलांनी आपल्या आवडीचे चित्र काढून रंग भरणे. कात्रीच्या सहाय्याने फळाचे चित्र कापून तयार करून घेणे. मुलांच्या डोक्याला पांढरी पट्टी बांधून नंतर कापलेले फळाचे चित्र डोक्याला बांधलेल्या पट्टीला चिकटून मुखवटा म्हणून वापरणे.**<br>*** मुलांना अधिक फळे आणि हिरव्या भाज्या सेवन करण्यास प्रोत्साहित करणे.**<br>**इयत्ता 2 री : तुम्हाला माहित असलेल्या फळांची नावे सांगा . तुमच्या आवडीचे फळाचे चित्र काढून रंग भरा. तुम्ही खालेल्या / पाहिलेल्या फळांच्या नावांची यादी बनवा. (10 पेक्षा जास्त ) आंब्याच्या फळाचे चित्र काढून रंग भरा.** |
| | **सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती)** | **सामर्थ्य : स्व- जाणीव, इतरांची जाणीव, भाषा विकास, शब्द संपतीचा विकास.**<br>**कृती 2 : गाणे**<br>**उद्देश :**<br>● **शारीरिक वाढीमुळे विकास होतो.**<br>● **शब्द संपत्ती वाढीमुळे प्रास , लय, संदर्भ, तसेच स्पष्ट उच्चार करणे.**<br>● **शारीरिक भावना ओळखणे.**<br>● **लयबद्ध शब्द ऐकण्याचा आनंद घेणे.**<br>**साहित्य : गाण्याच्या प्रती** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पद्धत : मुलांना वर्तुळाकारात थांबवने. संवाहकाने तालबद्ध कृती करण्यास मुलाना संधी देणे. अभिनय गीत / गाणी वापरून अथवा शारीरिक हालचालीसह गाणे म्हणणे.<br>टीप : 2 री व 3 री इयत्तेतील मुले गाण्याशी संबंधित प्रश्न विचारतात आणि उत्तरे मिळवतात. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : क्रियात्मक स्व-अभिव्यक्ती, ध्वनी संकेत तसेच लयबद्धतेची जाणीव, परिसराची जाणीव, शब्दसंपत्तीचा विकास<br>कृती 3 : गाणी , लयबद्ध गीते, कविता / नाटक. (विकासात्मक ध्येय- 2 ) ECL - 3<br>उद्देश :-<br>* ध्वनी संकेतांची जाणीव करून देणे.<br>* लयबद्धतेची जाणीव करून देणे.<br>* क्रियाशील स्व- अभिव्यक्तीला संधी देणे.<br>* आपल्या आजूबाजूच्या परिसराशी परस्पर संबंध जोडणे.<br>आवश्यक साहित्य : नाही<br>पद्धत : मुलांना वर्तुळाकारात थांबवून शिक्षकांनी मुलांना नवीन लयबद्ध गाणे अभिनयासह म्हणून दाखवणे. शिक्षकांचे अनुकरण करत मुलांना ते गाणे परत म्हणण्यास सांगणे.<br>लक्षात ठेवायचे अंश :<br>* मुलांना गाण्याचा आनंद घेता यावा म्हणून शिक्षकांनी योग्य अभिनय आणि उत्साहाने गाणे म्हणणे.<br>* मुलांनी शिक्षकांच्या सहाय्याने गाण्यातील लयबद्ध शब्द ओळखणे.<br>टीप : 2 रीच्या वर्गातील मुलांनी लयबद्ध गीतात येणाऱ्या, लयबद्ध शब्दांना ओळखणे. 3 री च्या वर्गातील मुलांनी त्या लयबद्ध शब्दांना आणखीन काही शब्द शोधून जोडावे. (63 व्या दिवसापर्यंत चालू राहील.) |
| | | आकलनासहीत वाचन | सामर्थ्य : शब्दांची ओळख , मुद्रित मजकुराची ओळख , आकलन, शब्दसंपत्तीचा विकास .<br>कृती 11 : नावाच जग (विकासात्मक ध्येय – 2 )<br>उद्देश :-<br>परिचित प्रसंगातील वस्तुंचे लिपी संकेतांनुसार परस्पर संबंध दर्शविणे. साहित्य आणि वस्तू एकच आहेत या निष्कर्षापर्यंत पोहोचणे व वाचनाची आवड निर्माण करणे<br>आवश्यक साहित्य : वही , कार्डशीट पेपर, पेन्सिल, क्रेयॉन्स, आम्हाला डोळ्याला दिसणाऱ्या आजूबाजूच्या वस्तू<br>पद्धत : - मुलांच्या मदतीने वर्गखोलीत असणाऱ्या सामान्य / ओळखीच्या वस्तूंच्या नावाची यादी करणे .<br>उदा: टेबल, खुर्ची , दरवाजा इत्यादी .<br>- तयार केलेल्या नावाच्या पट्ट्या त्या त्या वस्तूवर चिकटवणे.<br>- फ्लॅश कार्ड वर नावाचा दुसरा सट तयार करणे.<br>- शब्दांची फ्लॅश कार्डे वर्गात प्रदर्शित करून मोठ्याने म्हणून घेणे.<br>- शब्दाचा उच्चार करत त्या वस्तूजवळ मुलाला जाण्यास सांगणे.<br>- मुलांना कमीत कमी चार पाच वस्तूंची नवे सांगण्याची संधी देणे.<br>- ते शब्द कथेत ओळखण्याची संधी देणे.<br>- चित्रासह नामफलक / फ्लॅश कार्ड तयार करून कृती करायच्या ठिकाणी / वेळेला मुलांना ओळखून वाचण्यास (चित्रांच्या मदतीने) संधी देणे.<br><br><br>इयत्ता 2 री आणि 3 री : कथा / पाठात आलेल्या मुख्य शब्दांची फ्लॅश कार्डे तयार करणे.<br>मुलांना शिक्षकानी कथा / पाठ देऊन वाचन करण्याची संधी देणे. नंतर फ्लॅश कार्डावर असलेले शब्द कथेत शोधण्यास |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सांगणे.<br>टीप : आत्तापर्यंत या कृतीत वापरल्या गेलेल्या शब्दांव्यतरिक्त वेगवेगळ्या ठिकाणी, प्रसंगात आलेल्या शब्दांचा वापर करून कृती करणे . |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्याभिवृधी , अक्षरे ओळखणे<br>कृती 36 : बिंदू जोडून – अक्षर लिहिणे (विकासात्मक ध्येय -2 ) ECW-17<br>उद्देश :-<br>• सूक्ष्म स्नायू चालना कौशल्याभिवृधी करणे .<br>• अक्षर ओळखणे .<br>• बिंदुपासून अंक तयार करणे.<br>आवश्यक साहित्य : वही , पेन्सिल, फळा, खडू<br>पद्धत : - मुलांना ठिपक्या जोडून A, B, C, D, E अक्षरे लिहायची पद्धत लिहून दाखविणे.<br>मुलांना A, B, C, D, E या अक्षरांच्या ठिपक्या जोडण्यास सांगणे .<br>टीप : 2 री च्या वर्गातील मुलांना ठिपके जोडून इंग्रजी वर्णमालेतील कोणतीही पाच अक्षरे तयार करण्यास सांगणे. 3री च्या वर्गातील मुलांना आपणाला माहित असलेले कोणतेही पाच इंग्रजी शब्द ठिपके जोडून तयार करण्यास सांगणे. |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षक फळ्यावर लेखन करतात. लेखनाची योग्य पद्धत पाहण्याची संधी देतात.<br>मुलाचे नाव ,मुलाने काढलेल्या चित्राचे नाव इत्यादी मुलांसमोर लिहितात . शिक्षक वर्गात जे काही लेखन करायचे आहे ते मुलांसमोर करतात. |
| | मैदानी खेळ | | कृती : स्थिर समतोल (static balance)<br>सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकास , शरीराच्या वेगवेगळे भागांचा समतोल साधणे.<br>आवश्यक साहित्य : मऊ जागा, चटई, जमखाना<br>पद्धत :<br>• ही कृती वर्ग कोपऱ्यात / सभागृहामध्ये करायची आहे. चटईवर / जमखाना घालून मुलांना पाहिजे तेवढ्या जागेची सोय करून देणे .<br>• मुलांना चटईवर त्यांच्या पाठीवर झोपण्याची सूचना करणे.<br>• काही वेळाने पोटावर झोपण्याची सूचना करावी .<br>दुसरी व तिसरी वर्गातील मुलांनी त्यांच्या पाठीवर झोपताना त्यांचे पाय आणि हात उचलण्याची सुचना करावी . |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शीर्षक :उंट आणि कोल्हा<br>साहित्य : पपेट , स्क्रीन<br>उद्देश :<br>➢ ऐकण्याचे सामर्थ्य वाढविणे .<br>➢ विचार शक्ती वाढविणे .<br>➢ एकाग्रता वाढविणे.<br>➢ आवड निर्माण करणे.<br>पद्धत :<br>**पपेट प्रदर्शन** |

| | | |
|---|---|---|
| | | पपेट बाहुल्या पडद्यावर प्रदर्शित करून कथा सांगणे. शिक्षकांनी कथेतील संभाषणे मुलांना म्हणायला लावून कथेचे निरुपण करणे. पुढे काय? असे झाले तर? तसे झाले तर? असे प्रश्न मोठ्या मुलांना विचारून उत्तरे मिळवणे.<br>(कथेचा आनंद घेण्याबरोबरच ऐकत आहेत याची खात्री करून घ्या) |
| | पुन्हा भेटू | • या दिवशी केलेल्या कृतींचे पुनरावर्तन करणे / आठवणे .<br>• मुलांनी आज केलेल्या सर्व कृती पालक आणि कुटुंबातील सदस्यांसोबत शेअर करण्यास मुलांना प्रोत्साहन देणे .<br>• पुन्हा दुसऱ्या दिवशी मुलांनी उत्साहाने परत येण्यासाठी आनंददायक प्रसंग आयोजित करणे व मुलांना निरोप देणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 11      दिवस – 64 (गुरुवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 64 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | कृती : 1<br>1. शाळेत सर्वप्रथम हजर झालेल्या 3 मुलांना कागदी फुले देवून स्वागत करणे.<br>2. अशापद्धतीने मुलांना वेळेत येण्यास प्रोत्साहित करणे .<br>कृती : 32<br>अगोदरच्या दिवशी केलेली TPR कृती पुन्हा करणे . |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती : सण<br>पद्धत : ( तळ्यात मळ्यात खेळ )<br>• वर्गात जमिनीवर एक मोठे वर्तुळ काढा (मुलांच्या संख्येला अनुसरून)<br>• मुलांना वर्तुळात बसवा.<br>• शिक्षकानी सणाचे नाव सांगितल्यास वर्तुळात उडी मारणे आणि जर आठवड्याचे नाव सांगितले तर त्यांनी वर्तुळाच्या बाहेर उडी मारली पाहिजे. जर कोणी चूक केली तर त्याला खेळाच्या बाहेर काढणे.<br>61 व्या दिवसाची कृती पुन्हा करावी ।<br><br>कृती : माझे सण<br>आवश्यक साहित्य: तुमच्या भागात साजरे केले जाणाऱ्या विविध प्रकारच्या सणांची चित्रे.<br>कार्यपद्धत :<br>1. मुलांना अर्धवर्तुळात बसण्यास सांगणे.<br>2. सणांची चित्र कार्डे पिशवी मध्ये ठेवण्यास सांगणे.<br>3. चित्रे असणारी पिशवी संगीताच्या तालावर मुलांच्या हातातून पास करत जाणे.<br>4. मध्येच संगीत थांबवणे.<br>5. संगीत थांबल्यावर ज्या मुलाच्या हातात पिशवी असेल त्या मुलाने पिशवीतील कार्ड बाहेर काढणे.<br>6. कार्ड मध्ये असलेल्या सणाचे चित्र बघून मुलांनी घरी साजरा करणाऱ्या सणाविषयी आपला अभिप्राय सांगणे.<br>7. सणविषयी मुलांन व्यक्त होवू देण्यासाठी त्यांना काही प्रश्न विचारणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | माझा वेळ (Free Indore Play) | | कृती : सण<br>पद्धत : ( खेळाचे मॉडेल )<br>• वर्गात जमिनीवर एक मोठे वर्तुळ काढा (मुलांच्या संखेला अनुसरून)<br>• मुलांना वर्तुळात बसवणे.<br>• शिक्षकानी सणाचे नाव सांगितल्यास मुलांनी वर्तुळात उडी मारणे आणि जर आठवड्याचे नाव सांगितले तर त्यांनी वर्तुळाच्या बाहेर उडी मारली पाहिजे. जर कोणी चूक केली तर त्याला खेळाच्या बाहेर काढणे.<br>61 व्या दिवसाची कृती करावी। |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | | सामर्थ्य: परिसर जागरुकता, ‘कमी – जास्त’ची परिकल्पना, अभिव्यक्तीचा विकास<br>कृती 40 : फळांची विभागणी (विकासात्मक ध्येय- 3 )<br>उद्देश: फळांचे विविध प्रकार समजून घेणे.<br>साहित्य: वेगवेगळ्या फळांचे नमुने.<br>पद्धत : वेगवेगळ्या प्रकारची फळे मुलांना देऊन त्यांच्या बियानुसार फळांची विभागणी करणे. उदा. आंबा ( एक बी असणारे ), पेरू ( अनेक बिया असणारे )<br>2 री : मुलांना विविध फळांचे नमुने दाखवून गोड आणि आंबट फळांची विभागणी करण्यास सांगणे.<br>3 री : मुलांना विविध फळांची चित्रे दाखवून त्यांच्या बिया नुसार विभागणी करून फळांच्या नावांची यादी करण्यास सांगणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | | सामर्थ्य : सूक्ष्मचालना कौशल्य, अभिव्यक्ती आणि सृजनशीलता वाढविणे. हात व डोळे यांचा समन्वय, आकाराची परिकल्पना.<br>कृती 33 B : अक्षराच्या आकारानुसार रंग भरणे (विकासात्मक ध्येय - 1 )<br>उद्देश :<br>❖ सूक्ष्म स्नायू विकसित करणे,<br>❖ हात व डोळे यांचा समन्वय साधने.<br>❖ स्थळांची परिकल्पना जाणून घेणे.<br>साहित्य : वाळू आणि काठ्या<br>पद्धत : मुलांना अंकाच्या आकाराचे रेखाचित्र देवून रंग भरण्यास सांगणे. ज्या मुलांना अंक येतात अशा मुलांना रंग भरण्यास सांगणे.<br>2 री व 3 री : संख्यांचे रेखाचित्र काढून रंग भरणे. |
| | भाषा विकास आणि पा | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : ध्वनी संकेतांची ओळख, अक्षर - शब्द परस्पर संबंध<br>कृती 20 : नावाच्या पहिल्या अक्षरापासून वस्तूंची नावे शोधणे. (विकासात्मक ध्येय-2) ECL – 2 ( 52 व्या दिवसापासून पुढे चालू ठेवणे.)<br>उद्देश:<br>➢ ध्वनी संकेताबद्दल जागरूकता वाढविणे.<br>➢ अक्षरे आणि शब्दामधील परस्पर संबंध समजून घेणे.<br>➢ शब्द समजून घेऊन ओळखणे.<br>➢ अंताक्षरी शब्द लिहिणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | या<br>भूत<br>सा<br>क्षर<br>ता | | साहित्य : नाही<br>नमुन्यासाठी विषय: आहार पदार्थ<br>पध्दत : कोड्याच्या रुपात आहार पदार्थांची नावे ओळखून सांगण्याची कृती घेणे. उदा. शिक्षक माझ्या मनातील धान्य चपाती बनविण्यासाठी वापरतात. त्याचे नाव 'ग'अक्षरापासून सुरु होते. असे सांगितल्यानंतर मुले 'गहू' म्हणून ओळखतात. अशी वेगवेगळी उदाहरणे देणे.<br>2 री व 3 री साठी : शब्दांचा पुढील भाग म्हणून मुलांना वाक्य रचना करण्यास सांगणे. ( 70 व्या दिवसापासून पुढे चालू ठेवणे)<br>वापरावयाची अध्ययन पत्रके : EC-17 ( इ. 1 ली, 2 री, 3 री ) |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य: शब्द ओळखणे , छापील मजकुराची जाणीव, अर्थग्रहण<br>कृती 28 : वाक्याचे विभाजन (विकासात्मक ध्येय-2)<br>उद्देश:<br>कथा / प्रासयुक्त गाण्यातील शब्द ओळखणे , रचणे आणि विभाजन करणे .<br>साहित्य : प्रासगीते गाणी, आवडते गोष्टीचे पुस्तक, रिकामे कार्ड शीट पेपर<br>पद्धत :<br>* सोपे परिचित प्रास, गाणी, कथांचा तक्ता तयार करून त्या मधील प्रमुख शब्द/ वाक्ये जाड अक्षरात लिहून तो दाखवण्यासाठी फळ्यावर तक्ता प्रदर्शित करा .<br>* मुलांना कथा / प्रासगीतामधील वाक्ये पुन्हा पुन्हा वाचून दाखवणे आणि सांगणे.<br>* शिक्षकांनी वाक्यातील लयबद्ध शब्द मोठ्याने वाचणे. नंतर मुलांना फळ्याजवळ बोलवून त्यांनी सांगितलेले शब्द तक्त्यामध्ये लिहून दाखवण्यास सांगणे.<br>* शिक्षकांनी एक वाक्य वाचावे त्या वाक्यातील एक शब्द बदलून वाचावे. बदललेला शब्द कोणता हे मुलांनी फलकावर बोटाने दाखवावा<br>उदा : रवीजवळ एक कबुतर होते .<br>रवी जवळ एक मांजर होते.<br>शिक्षकांनी कोणता शब्द बदलला हे मुलांनी दाखवावे .<br>इयता 2 आणि 3 री : शिक्षकांनी मुलांना कथा /प्रासगीतामधील प्रमुख पात्रांची नावे बाहेर काढून वेगळी पात्रे नव्याने घालून ती कथा / प्रासगीते रचण्यास मार्गदर्शन करणे. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य: उद्देशपूर्वक लेखन, निरीक्षण, कल्पना, सृजनशील चिंतन, परिसराची जाणीव<br>कृती: 35 हवामान नकाशा (विकासात्मक ध्येय-2 ) ECW-16 (58 दिवसापासून पुढे चालू )<br>उद्देश:<br>● उद्देशीत लेखनाचा सराव करवून घेणे .<br>● निरीक्षण कौशल्य वाढविणे.<br>● सृजनशील चिंतनाला वाव देणे.<br>● परिसराची जाणीव बिंबविणे.<br>साहित्य : कागद / अध्ययन पत्रके पेन्सिल<br>पद्धत : आठवड्यातील दिवसाबद्दल मुलांशी चर्चा करणे<br>- आठवड्याच्या दिवसांची यादी करून वर्गात लावणे.<br>- गट चर्चेच्या वेळी त्या दिवसाच्या हवामानाचे निरीक्षण करण्यास सांगणे<br>- याबद्दल मुलांशी चर्चा करून रिकामी अध्ययन पत्रके देवून कालच्या आणि आजच्या हवामानाचे चित्र |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | काढण्यास सांगणे.<br>- मुलांच्या कार्याचे वर्गात प्रदर्शन करणे.<br>टीप : 2 री च्या मुलांनी दिवसाचे हवामान आपल्या पुस्तकात दाखल करणे . 3 री च्या मुलांनी वर्गाच्या हवामान नकाशात दिवसाचे हवामान दाखल करण्यास सांगावे |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षक फळ्यावर लेखन करतात. लेखनाची योग्य पद्धत पाहण्याची संधी देतात.<br>मुलाचे नाव ,मुलाने काढलेल्या चित्राचे नाव इत्यादी मुलांसमोर लिहितात . शिक्षक वर्गात जे काही लेखन करायचे आहे ते मुलांसमोर करतात. |
| | मैदानी खेळ | | कृती : स्थिर समतोल (static balance)<br>सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकास , शरीराच्या वेगवेगळे भागांचा समतोल साधणे.<br>आवश्यक साहित्य : मऊ जागा, चटई, जमखाना<br>पद्धत :<br>● ही कृती वर्ग कोपऱ्यात / सभागृहामध्ये करायची आहे. चटईवर / जमखाना घालून मुलांना पाहिजे तेवढ्या जागेची सोय करून देणे .<br>● मुलांना चटईवर त्यांच्या पाठीवर झोपण्याची सूचना करणे.<br>● काही वेळाने पोटावर झोपण्याची सूचना करावी .<br>दुसरी व तिसरी वर्गातील मुलांनी त्यांच्या पाठीवर झोपताना त्यांचे पाय आणि हात उचलण्याची सुचना करावी |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शीर्षक : उंट आणि कोल्हा<br>साहित्य : पपेट, स्क्रीन<br>उद्देश :<br>● ऐकण्याचे सामर्थ्य वाढविणे.<br>● विचार शक्ती वाढविणे .<br>● एकाग्रता वाढविणे<br>● आवड निर्माण करणे<br>पद्धत :<br>**कथेचे वाचन**<br>कथेचा सारांश सांगितल्यानंतर यथावत साहित्य मोठ्याने वाचणे. कथेमध्ये असणाऱ्या संभाषणाच्या ओळी पुनरुच्चार करून लिहिणे . कथेचा वेळ मनोरंजनात्मक करणे. नंतर मोठ्या विद्यार्थ्यांच्या कोपऱ्यात ठेवलेली गोष्टीची पुस्तके वाचणे.<br>कथा सांगितल्यानंतर साधे प्रश्न विचारणे.<br>(कथेचा आनंद घेण्याबरोबरच ऐकत आहेत याची खात्री करून घ्या) |
| | पुन्हा भेटू | | ● या दिवशी केलेल्या कृतींचे पुनरावर्तन करणे / आठवणे .<br>● मुलांनी आज केलेल्या सर्व कृती पालक आणि कुटुंबातील सदस्यांसोबत शेअर करण्यास मुलांना प्रोत्साहन देणे .<br>● पुन्हा दुसऱ्या दिवशी मुलांनी उत्साहाने परत येण्यासाठी आनंददायक प्रसंग आयोजित करणे व मुलांना निरोप देणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 11 दिवस – 65 (शुक्रवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 65 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | 64 व्या दिवसाची कृती चालू ठेवणे |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती : आमच्या गावातील जत्रा<br>साहित्य : गावातील जत्रेशी संबंधित चित्र<br>पद्धत :<br>* मुलांना अर्धवर्तुळाकार बसण्यास सांगणे.<br>* एकेक मुलाला बोलावून चित्र दाखवणे.<br>* मुलांना चित्र ओळखून ते कोठे पहिले ते विचारणे.<br>* त्यांना त्यांचे विचार मांडण्यासाठी प्रोत्साहित करणे.<br>प्रश्न :<br>चित्रात काय आहे?<br>तुम्ही चित्रातील विषय पहिला आहात का?<br>तुम्ही ते कोठे पहिलात?<br>तुम्ही कोणत्या जत्रेला भेट दिली आहे का?<br>जत्रेत तुम्ही काय पाहीला? |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करणे .<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे कार्य निर्वहन करणे . |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची | सामर्थ्य : परिसराची जाणीव, सृजनात्मक चिंतन आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्य वाढविणे.<br>कृती 41 : भाज्या समजून घेवू (विकासात्मक ध्येय- 3)<br>उद्देश : विविध प्रकारच्या भाज्या समजून घेणे.<br>साहित्य : पांढरे कागद, रंग, भेंडी, बटाटा किंवा कांदा<br>पद्धत :<br>➢ विविध प्रकारच्या भाज्या दाखवून त्याबद्दल मुलांना बोलण्यास प्रोत्साहित करणे.<br>➢ डोळ्यावर पट्टी बांधून भाज्यांच्या आकारावरून त्यांची नावे सांगण्यास सांगणे.<br>➢ भांज्यांच्या झाडाचे भाग आणि भाज्या आहार म्हणून आम्ही आणि काही प्राणी सेवन करतो हे स्पष्ट करून सांगणे.<br>➢ भाज्या मुळ, खोड, पाने तसेच फुलाच्या रुपात असतात. मुलांनी नियमितपणे भाज्यांचे सेवन करावे हे सांगणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | मार्गदर्शित कृती) | | ➢ भांज्यापासून चित्र रचू शकतो. पहिला भेंडी, कांदा अर्धा कापून रंगात बुडवून पांढऱ्या कागदावर ठसे उमटवून चित्र काढणे.<br>इ. 2 री : डोळ्यावर पट्टी बांधून हाताच्या स्पर्शाने भाज्यांच्या आकारावरून त्यांची नावे सांगणे.<br>इ. 3 री : मुळ, खोड, पाने तसेच फुलाच्या रुपात असलेल्या भाज्यांची यादी करण्यास सांगणे.<br><br>वापरावयाची अध्ययन पत्रके: I. L. -35 (इ. 1 ली, 2 री, 3 री) |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | | सामर्थ्य : सूक्ष्म चालना कौशल्य विकास आणि सृजनशीलता विकास, डोळे हात समन्वय, आकृतिबंध रचना.<br>कृती 36 क : पाने आणि फुले यापासून विविध रचना तयार करणे. (विकासात्मक ध्येय-1)<br>उद्देश :<br>➢ सूक्ष्म चालना कौशल्य विकास करणे.<br>➢ डोळे हात समन्वय साधण्यास सहकार्य करणे.<br>➢ आकार आणि आकारमान ओळखण्याबरोबर विविध रचना तयार करणे.<br>➢ आकलनशक्ती आणि एकाग्रता वाढविण्यास मदत करणे.<br>साहित्य : पाने, फुले, दोरा<br>पद्धत : मुलांना फुले, पाने आणि दोरा देऊन विविध प्रकारचे हार आणि तोरण तयार करण्यास सांगणे.<br>2 री व 3 री : वरील कृती करावी. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : शब्द संपत्ती विकास, अंदाज करणे, गट सहकार्याने कार्य करणे, सूचनांचे पालन करणे<br>कृती 6 : वस्तुंचा अंदाज करणे (विकासात्मक ध्येय- 2) ECL – 7<br>उद्देश :<br>➢ अर्थपूर्ण शब्द तयार करणे.<br>➢ सांघिक मनोभावना विकसित करणे.<br>➢ सूचनांचे काळजीपूर्वक पालन करणे.<br>➢ शब्द संपत्तीचा विकास करणे.<br>साहित्य : पिशवी, उपलब्ध वस्तू<br>पद्धत : वर्गातील खडू, रबर, डस्टर, फासे इ. वस्तू एका पिशवीत ठेवा. एकेक मुलांना बोलावून पिशवीतील कोणत्याही वस्तूला स्पर्श करून तिचा अंदाज करण्यास सांगणे. मुलांना वस्तू अचूक ओळखण्यास मदत करणे.<br>उदा :<br>● तू स्पर्श केलेली वस्तू लहान आहे की मोठी?<br>● तू स्पर्श केलेल्या वस्तूचा आकार कसा आहे?<br>● ती वस्तू कश्यापासून बनलेली आहे?<br>● तू स्पर्श केलेली वस्तू घट्ट आहे की मऊ आहे?<br>● तू स्पर्श केलेली वस्तू काय असेल?<br>मुलांनी ओळखलेल्या वस्तू बद्दल चर्चा करणे .<br>टीप : 2 री च्या मुलांनी आपण ओळखलेल्या वस्तूबद्दल 3 - 4 वाक्यात बोलणे. 3 री च्या वर्गातील मुलांनी 2 ते 3 मिनिटे त्या वस्तूबद्दल बोलणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आकलना सह वाचन | सामर्थ्य : ध्वनी संकेत जोडणे, शब्द ओळखणे, अक्षरे ओळखणे, शब्दसंपत्तीचा विकास<br>कृती 30 : अर्थपूर्ण शब्द रचना (विकासात्मक ध्येय-2)<br>उद्देश :<br>अक्षर / ध्वनी जोडण्यासाठी शब्दांची रचना करणे .<br>साहित्य : मुलांच्या नावातील अक्षरांची फ्लॅश कार्ड्स<br>पद्धत :<br>* मुलांचे दोन गट करणे.<br>* त्यांच्या नावातील अक्षरांची फ्लॅश कार्ड्स मुलांना देणे.<br>* अक्षरांची फ्लॅश कार्ड्स वापरून त्यांची नावे जोडण्यास (तयार करण्यास) मार्गदर्शन करणे.<br>* हीच कृती परिचित गाणे / कथा / प्रासगीते यातील शब्दांसाठी घेणे.<br>2 री आणि 3 री इयत्ता : शब्दांची फ्लॅश कार्ड्स तयार करून सरळ (सोपे) वाक्य रचण्यासाठी कृती घेणे. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : मुलांसाठी लेखन, उद्देशपूर्वक लेखन, लक्ष देणे आणि ऐकणे, सृजनशील चिंतन, शब्दसंपत्तीचा विकास<br>कृती संख्या 32 : सामाईक लेखन (विकासात्मक ध्येय – 2 ) ECW- 8<br>उद्देश :<br>● सामायीक लेखनाचा परिचय करणे .<br>● उद्देशानुसार लेखनाचा क्रम अभ्यासणे.<br>● अवधान देवून उद्देशीत लेखनात गुंतविणे.<br>● सृजनात्मक चिंतन करून लिखितरुपात व्यक्त होणे.<br>● शब्दसंपत्तीचा विकास करणे.<br>साहित्य : फळा, चित्रकला कागद<br>पद्धत :<br>➢ महिन्यातून दोन किंवा तीन वेळा सामाईक लेखन कृती आयोजित करणे.<br>➢ एक विषय देवून त्यासंबंधी त्यांचे अनुभव कथेच्या माध्यमातून किंवा लेखनाच्या माध्यमातून व्यक्त करण्यास सांगणे<br>नमुना विषय : पाळीव प्राणी<br>लक्षात ठेवायचे अंश :<br>● प्रत्येक विषयाला संबंधित वाक्य रचण्यासाठी आवश्यक संकेत देणे. मुलासोबत लेखनात गुंतवून प्रात्यक्षिक लेखन दाखविणे.<br>● शिक्षक पहिले वाक्य लिहून वाचतात. नंतर मुलांना त्यांची स्वत:ची वाक्ये लिहायला सांगतात.<br>● मुलांना त्यांच्या स्थानिक भाषेत प्रतिक्रिया देण्यासाठी संधी देणे. अशा परिस्थितीत शिक्षक त्याचे शालेय भाषेत भाषांतर करून सांगतात.<br>टीप : 1 लीच्या वर्गातील मुलांनी विवरण केलेले अंश 2 री आणि 3 री च्या वर्गातील मुलांना लेखनाच्या माध्यमातून अभिव्यक्त होण्यास सांगणे. |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षक फळ्यावर लेखन करतात. लेखनाची योग्य पद्धत पाहण्याची संधी देतात. मुलाचे नाव ,मुलाने काढलेल्या चित्राचे नाव इत्यादी मुलांसमोर लिहितात . शिक्षक वर्गात जे काही लेखन करायचे आहे ते मुलांसमोर करतात. |

| | | |
|---|---|---|
| | मैदानी खेळ | **कृती : स्थिर समतोल** (static balance)<br>**सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकास , शरीराच्या वेगवेगळे भागांचा समतोल साधणे.**<br>**आवश्यक साहित्य : मऊ जागा , चटई ,जमखाना**<br>**पद्धत :**<br>● हि कृती वर्ग कोपऱ्यात/ सभागृहामध्ये करायची आहे. चटईवर / जमखाना घालून मुलांना पाहिजे तेवढ्या जागेची सोय करून देणे .<br>● मुलांना चटईवर त्यांच्या पाठीवर झोपण्याची सूचना करणे.<br>● काही वेळाने पोटावर झोपण्याची सूचना करणे.<br>● दुसरी व तिसरी वर्गातील मुलांनी त्यांच्या पाठीवर झोपताना त्यांचे पाय आणि हात उचलण्याची सुचना करावी |
| | रंजक कथा<br>(कथेची वेळ) | **शीर्षक : उंट आणि कोल्हा**<br>**साहित्य : संभाषण FLASH कार्ड**<br>**उद्देश :**<br>➢ ऐकण्याचे सामर्थ्य वाढविणे .<br>➢ विचार शक्ती वाढविणे .<br>➢ एकाग्रता वाढविणे .<br>➢ आवड निर्माण करणे .<br>➢ अभिनय कौशल्य वाढविणे.<br>**पद्धत :**<br>**पात्राभिनय**<br>कथेचे पुनरावलोकन करणे. कथा सांगण्यासाठी 2 री व 3 री च्या वर्गातील मुलांना सहकार्य करणे.<br>शिक्षकांनी मुलांच्याकडून FLASH कार्ड वरील कथेतील संभाषणे मोठ्या मुलांना वाचण्यास सांगणे. शेवटी शिक्षकांनी कथेचा सारांश किंवा स्पष्टीकरण न देता साहित्य वाचले पाहिजे. हे ऐकून मुले कथेचा सारांश सांगतील.<br>(कथेचा आनंद घेण्याबरोबरच ऐकत आहेत याची खात्री करून घेणे) |
| | पुन्हा भेटू | ● या दिवशी केलेल्या कृतींचे पुनरावर्तन करणे / आठवणे .<br>● मुलांनी आज केलेल्या सर्व कृती पालक आणि कुटुंबातील सदस्यांसोबत शेअर करण्यास मुलांना प्रोत्साहन देणे .<br>● पुन्हा दुसऱ्या दिवशी मुलांनी उत्साहाने परत येण्यासाठी आनंददायक प्रसंग आयोजित करणे व मुलांना निरोप देणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 11 दिवस – 66 (शनिवार)

| | |
|---|---|
| प्रतिबिंब<br>(वर्गातील निरंतर मूल्यमापन) | ● विविध तंत्र वापरून (निरीक्षण, तपशील पट्टी, मुलांची अध्ययन पत्रके, व्हिडीओ, सांदर्भिक नोंदी, इत्यादी) तुम्ही संग्रह केलेल्या मूल्यमापन नोंदी/माहिती यांचे पुनरावलोकन करणे.<br>● प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिगत गरजेनुसार पुढील आठवड्यातील अध्ययन प्रक्रियेची योजना आखणे.<br>● अध्ययनाच्या तिन्ही विकासात्मक ध्येयांच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे. |

# माझी प्रगती-6

## आठवडा - 11 　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　दिवस – 66 (शनिवार)

| प्राप्त केलेल्या अध्ययन निष्पत्ती | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती | क्वचित | कधीतरी | नेहमी |
| 1 | सण, घटना आणि मित्राबद्दल बोलतो/ बोलते. | | | |
| 2 | स्पर्शज्ञानाने रचना ओळखतो/ ओळखते. | | | |
| 3 | समस्या ओळखतो/ ओळखते आणि सोडवितो/ सोडविते. | | | |
| 4 | शिशुगीते / गाण्याचा आनंद घेतो/ घेते. | | | |
| 5 | शब्द – संकेत यांचा सहसंबंध ओळखतो/ ओळखते. | | | |
| 6 | निरोगी आहाराचे पालन करतो/ करते. | | | |
| 7 | आरोग्याच्या उत्तम सवयी दृढ करतो/ करते. | | | |
| 8 | सामुहिक कृतीमध्ये सक्रियपणे भाग घेतो/ घेते. | | | |
| 9 | कृती करण्यासाठी पुढाकार घेतो/ घेते. | | | |
| 10 | स्वतंत्रपणे सरळ आणि अनौपचारिक मापने करतो/ करते. | | | |
| 11 | लहान-मोठा, उंच-ठेंगू जड-हलका वापरण्यास सांगतो/ सांगते. | | | |
| 12 | चित्र वाचून सरळ शब्दात स्पष्ट करतो/ करते. | | | |
| 13 | वर्ग जबाबदारी आणि कृतीचे व्यवस्थापनामध्ये स्वतंत्रपणे प्रदर्शन करतो/ करते. | | | |
| 14 | योगाभ्यास आणि नृत्यात चपळता दाखवितो/ दाखविते. | | | |
| 15 | विविध वस्तूपासून चित्र उमटवितो/ उमटविते. | | | |
| 16 | ध्वनी – चिन्हांचा सहसंबध ओळखतो/ ओळखते. | | | |
| 17 | शब्द वाचण्याचा प्रयत्न करतो/ करते. | | | |
| 18 | वाचनाची शैली ओळखतो/ ओळखते. | | | |
| 19 | वाचन व लेखनाचे सामान्य नियम ओळखतो/ ओळखते. | | | |
| 20 | एकापेक्षा जास्त गुणधर्मावर आधारित वस्तूंची विभागणी करतो/ करते. (उदा. आकार, रंग) | | | |
| 21 | वस्तू क्रमवार जोडतो/ जोडते. ( आकार, उंची) | | | |
| 22 | इतरांच्या भावना/ गरजांप्रती संवेदना दाखवितो/ दाखविते. | | | |
| 23 | स्वतःचा अनुभव व्यक्त करतो/ करते. | | | |
| 24 | अनेक सूचनांचे पालन करतो/ करते. | | | |
| 25 | खेळ, नृत्य आणि योग यामध्ये भाग घेतो/ घेते. | | | |
| 26 | चेंडू लक्षाच्या दिशेने टाकतो/ टाकते. | | | |
| 27 | चाक पळवतो/ पळविते. | | | |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा – 12 दिवस – 67 (सोमवार)

| दिवस | तासिका | कृतीचे विवरण |
|---|---|---|
| 67 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | संपूर्ण विद्याप्रवेश विद्याप्रवेश उपक्रमात मुलांना सर्वात जास्त आवडलेली कृती कोणती हे मुलांना विचारून त्या कृतीद्वारे मुलांचे वर्गात स्वागत करावे . |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | कृती : संकेत समजून घेवूया<br>साहित्य : रहदारीच्या दिव्यांचे चित्र<br>पद्धत :<br>➢ मुलांना वर्तुळाकारात थांबवणे.<br>➢ बाजूला दिलेले प्रासगीत गा.<br>➢ नंतर मुलांना वर्तुळाकारात बसविणे आणि त्यांना चर्चेत सामील<br>➢ करून घेणे आणि रहदारीच्या दिव्यांच्याबद्दल प्रश्न विचारून उत्तरे देण्यास प्रोत्साहित करणे.<br><br>Red says stop<br>Green says go<br>Yellow says wait |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करणे .<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे कार्य निर्वहन करणे . |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य : परिसराची जागृती - प्रकृती<br>कृती 43 : प्राण्यांविषयी बोलूया (विकासात्मक ध्येय-3)<br>उद्देश : प्राण्यांचे महत्व समजणे.<br>आवश्यक साहित्य : विविध प्राण्यांचे कागदी मुखवटे<br>पद्धत : विद्यार्थ्यांना त्यांच्या आजूबाजूला दिसणाऱ्या प्राण्यांबद्दल बोलण्यास सांगणे. दुध कोठे मिळते? असा प्रश्न विचारावा, उबदार कपडे बनविण्यासाठी लागणारे लोकर कोठून आणतो? नांगरणीसाठी कोणते प्राणी वापरतो? अशाप्रकारे प्रश्न विचारून आम्हाला उपयुक्त अशा पाळीव प्राण्यांबद्दल बोलायला मुलांना प्रोत्साहन देणे. प्राणी आपल्याला पर्यावरण समतोल राखण्यास उपयोगी पडतात आणि त्यांची काळजी घ्यायला हवी याबद्दल चर्चा करणे. आम्ही प्राण्याविषयी दया दाखवली पाहिजे तसेच त्यांना आहार दिला पाहिजे हे सुचविणे.<br>इयत्ता दुसरी :<br>तुमच्या घरातील पाळीव प्राण्यांची नावे सांगा .<br>इयत्ता तिसरी :<br>तुम्ही पाहिलेल्या कोणत्याही एका प्राण्याबद्दल बोला . |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू | सामर्थ्य: सूक्ष्म स्नायू चालना कौशल्याची अभिवृद्धी,सृजनशीलतेचा विकास ,डोळे हात यांचा समन्वय, आकृतिबंध-<br>कृती 38 : कप आणि कागदाचे ग्लास यापासून इमारत रचणे. (विकासात्मक ध्येय-1)<br>उद्देश: |

| | | | |
|---|---|---|---|
| | चलन कौशल्ये (मुलांची कृती) | | ➢ सूक्ष्म स्नायूंचा विकास करणे.<br>➢ डोळे व हात यांच्यामध्ये समन्वय साधने.<br>➢ आकार आणि आकाराचे माप समजण्याबोबरच विविध नमुने रचना करतील.<br>➢ ग्रहणशक्ती आणि एकाग्रता वाढीसाठी मदत होते.<br>आवश्यक सामग्री : वाट्या, लाकडी ठोकळे किंवा कागदी कप.<br><br>पद्धत: 3-4 मुलांना एका गटात बसविणे. त्यांना वाट्या किंवा कागदी कप देणे. संवाहकाने नमुन्यादाखल पूल (ब्रिज), इमारत बनवून दाखववावी. त्यानंतर मुलांना करण्यास सांगणे.<br>टीप : दुसरी आणि तिसरी वर्गासाठी वरील कृती घेणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : ध्वनी संकेतांचे संयोजन, लक्ष देणे आणि ऐकणे.<br>कृती 29 : मधील अक्षर ओळखणे ( ब द क ) (विकासात्मक ध्येय- 2) ECL-21<br>उद्देश :<br>* शब्दातील अक्षर - ध्वनी यांचा परस्पर संबंध ओळखणे.<br>* लक्षपूर्वक ऐकून अक्षर - ध्वनी यांच्यातील परस्पर संबंध समजून घेणे.<br>आवश्यक साहित्य : फळा , फ्लॅश कार्ड्स (दृक पट्ट्या )<br>पद्धत : मुलांना वर्तुळाकार बसवून फ्लॅश कार्ड्स वर लिहिलेले शब्द दाखवून स्वराक्षरांचा परिचय करून देणे आणि त्यांना शब्दाच्या मध्यभागी असलेले अक्षर दाखविण्यास सांगणे. मुलाना फळ्यावर लिहायला सांगणे. अक्षर आणि शब्द एकत्र करणे आणि ओळखणे.<br>टीप : इयत्ता 2 री च्या मुलांनी चिन्हांकित केलेल्या अक्षराच्या मध्यभागी आलेले वेगवेगळे शब्द ओळखणे.<br>इयत्ता 3 री ची मुले स्वत:विविध शब्दामधील मधले अक्षर ओळखण्याची कृती करतात .<br>वापरावयाचे सराव पत्रक : EC- 18 ( इयत्ता 1,2,3) |
| | | आकलनासहीत वाचन | सामर्थ्य: शब्द ओळखणे , छापील मजकुराची ओळख, आकलन, परिसराचे जाणीव, शब्द संपत्तीची अभिवृद्धी.<br>कृती 18:<br>चित्र संचयीका (विकासात्मक ध्येय 2) विषय : जमिनीवर दिसणारे प्राणी / पक्षी / वस्तू<br>उद्देश :<br>● मुलांनी चित्र वाचणे आणि चर्चा करून अर्थ समजून घेणे आणि व्यक्तिगत चित्र संचयिका तयार करणे .<br>● अनुभव आणि पूर्वज्ञानावर आधारित अंदाज करणे .<br>साहित्य : जमिनीवर दिसणारे प्राणी / पक्षी / वस्तूना संबंधित रचलेली चित्रे<br>पद्धत : याआधी रचलेल्या चित्रांचा वापर करून बोलण्याची संधी देणे .<br>व्यक्तिगत चित्र संचयीका – मुलांनी तयार केलेली चित्रे स्वत:च्या कृती संचयिकेमध्ये ठेवण्यास सांगणे आणि त्याविषयी पुढे 71 व्या दिवशी चर्चा करण्यास सांगणे.<br>शिक्षकांनी दुसरी व तिसरी मुलांना पहिलीच्या मुलांशी परस्पर सहाय्य करण्यास सुचविणे आणि विषयाचा विस्तार करून चर्चा करताना सर्व मुले अभिव्यक्त होत आहेत याची खात्री करणे. त्याचसोबत 2 री आणि 3 रीच्या मुलांनी स्वतंत्रपणे चित्र रचणे आणि रंगवून आपल्या कृती संचायिकेत संग्रहित करण्याची त्यांना संधी देणे.<br>( सदर कृती पुढील 71 व्या दिवशी पर्यंत पुढे नेणे.) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : उद्देशानुसार लेखन, सृजनशील विचार, शब्दसंपत्तीचा विकास, ऐकणे, आकलन, पर्यावरण जागरुकता<br>कृती 33 : पट्टी तयार करूया (विकासात्मक ध्येय-2) ECW-10<br>उद्देश :-<br>• उद्देशानुसार लेखन करण्यास संधी देणे.<br>• सृजनशील विचार वाढविणे.<br>• पर्यावरण जागरुकता करणे.<br>• शब्दसंपत्ती वाढविणे.<br>• सूचना ऐकून अर्थग्रहण करणे .<br>साहित्य : नोटबुक, कागद, क्रेयॉन्स<br>पद्धत : मुलांचा शब्दसंग्रह वाढविण्यासाठी आणि उद्देशपूर्वक लेखन सुलभ करण्यासाठी विविध विषयांवर शब्दांची यादी करण्यास मुलांना सांगा.<br>सुचवलेला विषय :<br>• आम्ही पाहिलेल्या वस्तू<br>• बाजारात खरेदी करावयाच्या वस्तू<br>• रंगांची नावे<br>• शहरात आणि गावात आढळणारे प्राणी / पक्षी इत्यादी.<br>संपूर्ण वर्गाने सुचविलेल्या कृती कार्डशीट पेपरमध्ये आयोजित केला जाऊ शकतो. शिक्षकांनी या तक्त्यामध्ये वापरल्या जावू शकणाऱ्या सामान्य शब्दांची यादी तयार करणे. मुलांना ते पाहण्यास आणि वाचण्यास मदत करण्यासाठी ते वर्गात प्रदर्शित करणे.<br>टीप : 1 ली च्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या यादीमध्ये 2 रीच्या मुलांना अतिरिक्त शब्द जोडू द्या आणि 3 री च्या विद्यार्थ्यांना सूचीबद्ध शब्दांसाठी त्यांची स्वत:ची वाक्ये तयार करू द्या. |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षक फळ्यावर लेखन करतात. लेखनाची योग्य पद्धत पाहण्याची संधी देतात. मुलाचे नाव ,मुलाने काढलेल्या चित्राचे नाव इत्यादी मुलांसमोर लिहितात . शिक्षक वर्गात जे काही लेखन करायचे आहे ते मुलांसमोर करतात. |
| | मैदानी खेळ | | कृती 43 : वाघ आणि गाय<br>सामर्थ्य : स्थूल स्नायू चालना कौशल्य वाढविणे<br>साहित्य : वाघ, गाय यांचे मुखवटे<br>पद्धत :<br>• मुलांना खेळाच्या मैदानावर घेवून जाणे .<br>• एका वर्तुळात मुलांना थांबण्यास सांगणे .<br>• एका मुलाला वाघाचे आणि दुसऱ्या मुलाला गाईची मुखवटा देणे .<br>• उर्वरित मुलांना वर्तुळावर हात धरून उभे राहण्यास सांगणे .<br>• गायीचा मुखवटा घातलेले मुल वर्तुळात थांबते आणि वाघाचा मुखवटा घातलेले मुल वर्तुळाच्या बाहेर असावे असे सुचविणे. वाघाचा मुखवटा घातलेल्या मुलाने गाईचा मुखवटा घातलेल्या मुलाला पकडायचा प्रयत्न करावा. |

| | | |
|---|---|---|
| | | ● वर्तुळावर उभ्या असलेल्या मुलांना गाईचे रक्षण करण्याची सूचना देणे .<br>● 2 री आणि 3 री वर्गातील मुलांसाठी ही कृती चालू ठेवणे . |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | शीर्षक : टो टो आणि द कॅप<br>साहित्य : चित्रे आणि खेळणी<br>उद्देश:<br>➢ आवड निर्माण करणे .<br>➢ सृजनशीलतेचा विकास करणे.<br>पद्धत :<br>● शिक्षकांनी साहित्याचा आधार घेवून कथा सांगणे .<br>● चित्रे / खेळणी दाखवून कथेतील संभाषण मातृभाषेत सांगणे .<br>● कथेतील मुख्य शब्द इंग्रजीमध्ये सांगणे .<br>कथा : TOTO AND THE CAP<br>**This is Toto, the baby cat. He lives with Papa cat and Mama Cat. Papa cat has a cap. Mama cat has a cap. Toto also wanted a cap. Papa cat said "baby cats do not wear caps." One day, Papa cat was going out. He hid the cap in a pot. He put the pot on the cot and went out. Toto cat got on to the cot, put his hand in the pot and pulled out the cap. Toto cat put the cap on his head. He was very happy.**<br>(कथेचा आनंद घेण्याबरोबरच ऐकत आहेत याची खात्री करून घेणे.) |
| | पुन्हा भेटू | ● या दिवशी केलेल्या कृतींचे पुनरावर्तन करणे / आठवणे .<br>● मुलांनी आज केलेल्या सर्व कृती पालक आणि कुटुंबातील सदस्यांसोबत शेअर करण्यास मुलांना प्रोत्साहन देणे.<br>● पुन्हा दुसऱ्या दिवशी मुलांनी उत्साहाने परत येण्यासाठी आनंददायक प्रसंग आयोजित करणे व मुलांना निरोप देणे.<br>टीप :<br>✓ अध्ययन फलांचे परीक्षण करून पालकांना अहवाल देण्यासाठी दाखले तयार करा.<br>✓ तुमची मुले पहिली इयत्ताच्या कृती शिकण्यास तयार आहेत हे लक्षात ठेवा<br>✓ पहिली इयत्ताच्या कृती आणि विद्याप्रवेश उपक्रम याच प्रकारे करण्यासाठी तयार रहा आणि पालकांशी बोलून त्यांना सहभागी करण्यासाठी तयारी ठेवा. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

## आठवडा - 12 दिवस – 68 (मंगळवार)

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 68 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत | संपूर्ण विद्याप्रवेश उपक्रमात मुलांना सर्वात जास्त आवडलेली कृती कोणती हे मुलांना विचारून त्या कृतीद्वारे मुलांचे वर्गात स्वागत करावे . |

| | | |
|---|---|---|
| | शिक्षकांचे हितगुज) | |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 67 व्या दिवसाची कृती : इंग्रजी प्रासगीत गाणे. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करणे .<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे कार्य निर्वहन करणे . |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य: परिसर जागृत्ती<br>कृती 43 क : प्राण्यांबद्दल कोडे (विकासात्मक ध्येय – 3)<br>उद्देश : प्राण्यांच्या शरीराचे भाग क्रमवारपणे जोडणे.<br>साहित्य : प्राण्यांच्या शरीराच्या अवयवांची चित्रे (उदा : हत्ती , उंट, सिंह , मगर)<br>पद्धत : मुलांना प्राण्यांच्या शरीराच्या भागाची चित्रे देवून क्रमाने जोडण्यास सांगणे .<br>दुसरी इयत्ता :<br>तुम्ही पाहिलेल्या एका पाळीव प्राण्याच्या शरीराच्या भागाची नावे सांगा .<br>तिसरी इयत्ता :<br>तुमच्या आवडीच्या पाळीव किंवा जंगली प्राण्याचे चित्र काढून रंग भरा. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकास आणि सृजनशीलतेचा विकास , कान-हात याचा समन्वय, आकारांची परिकल्पना.<br>कृती 33 अ : सीताफळ , तारानाथ वर दुरुस्ती (विकासात्मक ध्येय – 1 )<br>उद्देश:<br>• सूक्ष्म स्नायूंचा विकास होणे .<br>• कान-हात यांचा समन्वय साधणे.<br>साहित्य : सीताफळ , तारानाथ<br>पद्धत : मुलांना वर्तुळाकारात बसवा. एका मुलाच्या हातात तारानाथ द्यावा . त्या मुलाने त्याच्यावर स्पर्श ( हात फिरविल्यानंतर ) बाजूच्या मुलाला देणे. अशारितीने एका नंतर दुसऱ्याला दिल्याने सर्व मुलांना तारानाथ आणि सीताफळास स्पर्श करण्याची संधी देणे .<br>विवरण : दुसरी आणि तिसरी वर्गाने ही कृती करण्यास सांगणे . |
| | भाषा विकास — ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : ध्वनी विज्ञानाचे ज्ञान, शब्दसंपत्तीचा विकास , चालना कौशल्याचा विकास<br>कृती 15 : प्रासयुक्त ( प्रासयुक्त ) शब्द ऐकणे . (विकासात्मक ध्येय – 2 ) ECL- 4 ( 44 व्या दिवसाच्या पुढे)<br>उद्देश :-<br>* ध्वनी विज्ञानाचे ज्ञान सक्षम करणे.<br>* प्रासयुक्त शब्दाद्वारे शब्दसंपत्ती वाढविणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | आ<br>णि<br>पा<br>या<br>भूत<br>सा<br>क्षर<br>ता | | * स्थूल आणि सूक्ष्म चालना कौशल्यांचा विकास करणे.<br>साहित्य : फळा , खडू<br>पद्धत :<br>* प्रासयुक्त शब्दांचे विविध गट तयार ठेवणे.<br>* विद्यार्थ्यांचे विविध गट करून प्रत्येक गटाला प्रत्येक गटाला एकेक प्रासयुक्त शब्दांचा गट देणे .<br>* प्रासयुक्त शब्द घेवून शिक्षकांच्या सहाय्याने विविध वाक्ये तयार करणे.<br>* प्रासयुक्त शब्दांचे गटातून शब्द घेवून शिक्षकाच्या सहाय्याने सोपी प्रासयुक्त गाणी तयार करणे.<br>* स्वतंत्रपणे साधी प्रासगीते रचणे .<br>टीप : 2 री वर्गाच्या विद्यार्थ्यांनी प्रासयुक्त शब्दांच्या गटातील प्रासयुक्त शब्दांपासून साधे सोपे प्रासयुक्त शब्द असलेले गीत तयार करणे. 3 री वर्गाच्या विद्यार्थ्यांनी प्रासयुक्त शब्दांच्या गटातील प्रासयुक्त शब्दांपासून साधे सोपे प्रासयुक्त शब्द असलेले गीत तयार करणे. (68 व्या दिवसापर्यंत चालू ठेवणे ) |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य: ध्वनी संकेत जोडणे , शब्द ओळखणे, अक्षरे ओळखणे, शब्दसंपत्तीचा विकास<br>कृती 30 : अर्थपूर्ण शब्द रचना (विकासात्मक ध्येय-2)<br>उद्देश :<br>अक्षर / ध्वनी जोडण्यासाठी शब्दांची रचना करणे .<br>साहित्य : मुलांच्या नावातील अक्षरांची फ्लॅश कार्ड्स<br>पद्धत :<br>* मुलांचे दोन गट करणे.<br>* त्यांच्या नावातील अक्षरांची फ्लॅश कार्ड्स मुलांना देणे.<br>* अक्षरांची फ्लॅश कार्ड्स वापरून त्यांची नावे जोडण्यास (तयार करण्यास) मार्गदर्शन करणे.<br>* हीच कृती परिचित गाणे / कथा / प्रासगीते यातील शब्दांसाठी घेणे.<br>2 री आणि 3 री इयत्ता : शब्दांची फ्लॅश कार्ड्स तयार करून सरळ (साधे) वाक्य रचण्यासाठी कृती घेणे. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य: मुलांकडून लेखन, उद्देशपूर्वक लेखन, लक्ष देणे आणि ऐकणे, सृजनशील चिंतन, शब्द संपत्ती वाढविणे.<br>कृती:32 सामायिक लेखन (विकासात्मक ध्येय-2) ECW-8<br>उद्देश:<br>➢ सामायिक लेखनाचा परिचय करून देणे.<br>➢ उद्देशानुसार लेखनाच्या क्रमाचा सराव करून घेणे.<br>➢ लक्षपूर्वक उद्देशीत लेखनात गुंतवून ठेवणे.<br>➢ सृजनात्मकरित्या विचार करून ते लेखनव्दारे व्यक्त होणे.<br>➢ शब्द संपत्तीचा विकास करणे.<br>साहित्य: फळा, कोरा पेपर.<br>पद्धत: सामायिक लेखनाची कृती महिन्यातून दोन ते तीन वेळा आयोजित करणे. कोणताही एक विषय घेऊन त्या विषयाला संबंधित आपले अनुभव कथा किंवा लिखाणाद्वारे मुलांना व्यक्त होण्यास सांगणे .<br>उदाहरण : आमची खेळणी<br>लक्षात ठेवायच्या गोष्टी :<br>▪ प्रत्येक विषयाला संबंधित वाक्ये बनविण्यासाठी आवश्यक सूचना देणे. मुलाना लेखनात गुंतवून प्रात्यक्षिक लेखन दाखविणे.<br>▪ शिक्षकांनी पहिले वाक्य लिहून वाचणे. नंतर मुलांना स्वत:चे वाक्य लिहून वाचण्यास सांगणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ▪ मुलांना आपल्या स्थानिक भाषेत प्रतिक्रिया देण्यास सांगणे. त्यानंतर शिक्षकांनी ते वाक्य प्रमाण भाषेत सांगणे.<br>इयत्ता 2 री व 3 री साठी : 1 ली च्या मुलांनी संगीतालेले वाक्य 2 री व 3 री च्या मुलाना लिहिण्यास सांगणे. |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षक फळ्यावर लेखन करतात. लेखनाची योग्य पद्धत पाहण्याची संधी देतात. मुलाचे नाव , मुलाने काढलेल्या चित्राचे नाव इत्यादी मुलांसमोर लिहितात . शिक्षक वर्गात जे काही लेखन करायचे आहे ते मुलांसमोर करतात. |
| | मैदानी खेळ | | कृती43 : रहदारीचे दिवे<br>सामर्थ्य : स्थूल स्नायू चालना कौशल्य वाढविणे, सूचना आणि आदेशांचे पालन<br>आवश्यक साहित्य : रहदारीच्या दिव्यांचे रंग, मार्कर<br><br><br>पद्धत :<br>• मुलांनी वर्तुळाकारात थांबणे.<br>• शिक्षकांनी रहदारीच्या दिव्यांच्या खेळाचे नियम सांगणे .<br>• मुलांना वर्तुळाकारात चालण्याची सूचना द्या.<br>• शिक्षकांनी वर्तुळात थांबून लाल रंग असे सांगितल्यास थांबण्यास सांगणे.<br>• पिवळा रंग सांगितल्यास तयार राहणे असे सांगणे.<br>• हिरवा रंग सांगितल्यास चालण्यास सुरवात करणे.<br>2 री आणि 3 री मुलांसाठी ही कृती करणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | पद्धत :<br>पहिल्या दिवशी ठरल्याप्रमाणे रंजक कथा चालू राहते .<br>शिक्षकांनी कथा सांगत असताना मुलाचे लक्ष वेधून घेत कथा पूर्ण करणे<br>उदा. टोपी कोणा जवळ होती? मांजर कोठे गेले? इत्यादी.<br>कथा सांगितल्यानंतर सोपे प्रश्न मराठीत विचारने .<br>(कथेचा आनंद घेण्याबरोबरच ऐकत आहेत याची खात्री करून घेणे) |
| | पुन्हा भेटू | | ● या दिवशी केलेल्या कृतींचे पुनरावर्तन करणे / आठवणे .<br>● मुलांनी आज केलेल्या सर्व कृती पालक आणि कुटुंबातील सदस्यांसोबत शेअर करण्यास मुलांना प्रोत्साहन देणे.<br>● पुन्हा दुसऱ्या दिवशी मुलांनी उत्साहाने परत येण्यासाठी आनंददायक प्रसंग आयोजित करणे व मुलांना निरोप देणे.<br>टीप :<br>✓ अध्ययन फलांचे परीक्षण करून पालकांना अहवाल देण्यासाठी दाखले तयार करणे .<br>✓ तुमची मुले इयत्ता पहिली च्या कृती शिकण्यास तयार आहेत हे लक्षात.<br>✓ इयत्ता पहिली च्या कृती आणि विद्याप्रवेश उपक्रम याच प्रकारे करण्यासाठी तयार रहा आणि पालकांशी बोलून त्यांना सहभागी करण्यासाठी तयारी ठेवणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा - 12** **दिवस – 69 (बुधवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 69 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | संपूर्ण विद्याप्रवेश उपक्रमात मुलांना सर्वात जास्त आवडलेली कृती कोणती हे मुलांना विचारून त्या कृतीद्वारे मुलांचे वर्गात स्वागत करावे . |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 67 व्या दिवसाची कृती : इंग्रजी प्रासगीत म्हणणे .<br>एक ओळ शिक्षकांनी, एक ओळ मुलांनी म्हणावी. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करणे .<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे कार्य निर्वहन करणे . |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य: परिसराची जाणीव – प्रकृती<br>कृती 43 : ड प्राण्यांचे वर्गीकरण (विकासात्मक ध्येय-3)<br>उद्देश:<br>प्राण्यांचे वर्गीकरण समजून घेणे .<br>साहित्य : विविध प्राण्यांची चित्रे ( जलचर प्राणी, पाळीव प्राणी, वाहतुकीसाठी वापरले जाणारे प्राणी)<br>पद्धत : विविध प्राण्यांची चित्रे मुलांना देऊन त्यामधील दुध देणारे प्राणी, वाहतुकीसाठी वापरले जाणारे प्राणी, जलचर प्राणी आणि पाळीव प्राणी असे वर्गीकरण करण्यास सहाय्य करणे.<br>इयत्ता 2 री -<br>विविध प्राण्यांच्या चित्रांच्या दृकपट्ट्या देऊन त्या मध्ये पाळीव प्राणी आणि जंगली प्राणी असे वर्गीकरण करणे.<br>इयत्ता 3 री -<br>विविध प्राण्यांची नावे असलेली दृकपट्ट्या देऊन त्या मध्ये पाळीव प्राणी आणि जंगली प्राणी असे वर्गीकरण करणे. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती) | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकास आणि सृजनशीलतेचा विकास , कान-हात याचा समन्वय, आकारांची परिकल्पना.<br>कृती 42 : (विकासात्मक ध्येय – 1 )<br>उद्देश:<br>• सूक्ष्म स्नायूंचा विकास होणे .<br>• कान-हात यांचा समन्वय साधणे.<br>• एकाग्रता वाढविण्यास मदत करणे.<br>साहित्य : पाण्याची बाटली , नरसाळे, पाण्याने भरलेला तांब्या.<br>पद्धत : तांब्या / मग हातात धरून न सांडता नरसाळ्यातून बाटलीत कसे घालावे हे दाखवणे आणि मुलांकडून करून घेणे. वस्तू कुशलतेने हाताळण्याची कृती किंवा पाणी ओतण्याचे कौशल्य यामुळे डोळे व हात यांचा समन्वय |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | साधण्यास खूप मदत होते.<br>टीप : इयत्ता 2 री आणि 3 री ला वेगवेगळे आकार आणि मापनाच्या पात्रामध्ये नरसाळे वापरून पाणी भरण्यास सांगणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : ध्वनी संकेतांचे संयोजन , शब्द संपत्तीचा विकास, अक्षर ओळखणे<br>कृती : 26 शब्दातील शेवटचे अक्षर ओळखणे आणि जोडणे. (विकासात्मक ध्येय-2) ECL-22<br>उद्देश :<br>* ध्वनी संकेतांची जाणीव होणे.<br>* शब्दांचा अर्थ समजून घेणे .<br>* शब्दातील अक्षर – ध्वनी यांच्यातील परस्पर संबंध समजून घेणे.<br>* लक्षपूर्वक श्रवण करून अक्षर – ध्वनी यांच्यातील परस्पर परस्पर संबंध समजून घेणे<br>आवश्यक साहित्य : फळा<br>पद्धत : मुलांना वर्तुळाकार बसवून काही परिचित शब्द सांगण्यास सांगा. उदा. कळ, मळ, जळ, पळ, नळ (एकाच प्रकारच्या ) अक्षराचा शेवटचा ध्वनी ओळखण्यास सांगणे.<br>– नवीन शब्द सांगून त्या शब्दातील शेवटचा अक्षर विचारणे.<br>– विविध शब्द प्रदर्शित करून एकाच प्रकारच्या ध्वनीने शेवट होणाऱ्या शब्दांचा परिचय करून देणे.<br>टीप : इयत्ता 2 री च्या मुलांनी सुचविलेल्या शब्दातील शेवटचा ध्वनी ओळखून त्याची यादी करणे.<br>इयत्ता 3 री च्या मुलांनी विविध शब्दामधील शेवटचे अक्षर ओळखून त्यापासून वाक्य रचणे .<br>वापरावयाचे सराव पत्रक : EC- 19 ( इयत्ता 1, 2, 3 ) |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य : शब्द ओळखणे, छापील मजकुराची जाणीव, अर्थग्रहण<br>कृती 28 : वाक्याचे विभाजन (विकासात्मक ध्येय-2)<br>उद्देश :<br>कथा / प्रासयुक्त गाण्यातील शब्द ओळखणे , रचणे आणि विभाजन करणे .<br>साहित्य : प्रासगीते, गाणी, आवडते गोष्टीचे पुस्तक, रिकामे कार्डशीट पेपर<br>पद्धत : 64 व्या दिवसातील कृती क्रमांक 28 मधील निवडलेली कथा / प्रासगीते निवडून कृतीची पुनरावृत्ती करणे. .<br>* सोपे परिचित प्रास, गाणी, कथांचा तक्ता तयार करून त्या मधील प्रमुख शब्द/ वाक्ये जाड अक्षरात लिहून तो दाखवण्यासाठी फळ्यावर तक्ता प्रदर्शित करणे.<br>* मुलांना कथा / प्रासगीतामधील वाक्ये पुन्हा पुन्हा वाचणे आणि सांगणे.<br>* शिक्षकांनी वाक्यातील शब्द मोठ्याने वाचणे. नंतर मुलांना फळ्याजवळ बोलवून त्यांनी सांगितलेले शब्द तक्त्यामध्ये लिहून ते शब्द दाखवण्यास सांगणे.<br>* शिक्षकांनी एक वाक्य वाचणे. त्या वाक्यातील एक शब्द बदलून वाचावे. बदललेला शब्द कोणता हे मुलांनी फलकावर बोट लाऊन दाखवावा.<br>उदा: रवी जवळ एक कबुतर होते.<br>रवी जवळ एक मांजर होते.<br>शिक्षकांनी कोणता शब्द बदलला हे मुलांनी दाखवावे .<br>इयता 2 आणि 3 री : शिक्षकांनी मुलांना कथा / प्रासगीतामधील प्रमुख पात्रांची नावे बाहेर काढून वेगळी पात्रे नव्याने घालून ती कथा / प्रासगीते रचण्यास मार्गदर्शन करणे. |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्याभिवृधी , अक्षरे ओळखणे<br>कृती 36 : बिंदू जोडून – अक्षर लिहिणे (विकासात्मक ध्येय-2 ) ECW-17<br>उद्देश :- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | • सूक्ष्म स्नायू चालना कौशल्याभिवृद्धी करणे .<br>• अक्षर ओळखणे .<br>• बिंदुपासून अंक तयार करणे.<br>आवश्यक साहित्य : वही , पेन्सिल, फळा ,खडू<br>पद्धत : - मुलांना ठिपके जोडून A, B, C, D, E अक्षरे लिहून दाखविणे.<br>मुलांना A, B, C, D, E या अक्षरे ठिपके जोडण्यास सांगणे .<br>टीप : 2 री वर्गातील मुलांना इंग्रजी वर्णमालेतील कोणतीही पाच अक्षरे ठिपके जोडून तयार करण्यास सांगणे . 3 री वर्गातील मुलांना आपणाला माहित असलेले कोणतेही पाच इंग्रजी शब्द ठिपके जोडून तयार करण्यास सांगणे. |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षक फळ्यावर लेखन करतात. लेखनाची योग्य पद्धत पाहण्याची संधी देतात. मुलाचे नाव ,मुलाने काढलेल्या चित्राचे नाव इत्यादी मुलांसमोर लिहितात . शिक्षक वर्गात जे काही लेखन करायचे आहे ते मुलांसमोर करतात. |
| | मैदानी खेळ | | कृती: टोपी पाहिजे का टोपी .<br>सामर्थ्य: स्थूल स्नायू चालना कौशल्य वाढविणे,संभाषण कौशल्य वाढविणे .<br>साहित्य : टोपी<br>पद्धत :<br>• मुलांना वर्तुळाकारात बसण्यास सांगणे. .<br>• एका मुलाला टोपी देऊन वर्तुळाच्या बाहेरील भागात चालण्यास सांगणे.<br>• टोपी घातलेला मुलाला चालत असताना टोपी पाहिजे का टोपी असे म्हणत चालण्यास सांगणे.<br>• उर्वरित मुलांना कसली टोपी असे विचारायला सांगणे.<br>• "सोन्याची टोपी", "किती रुपयाला" “शंभर रुपये" "नको नको" "दहा रुपये" "पाहिजे पाहिजे."<br>• तेव्हा टोपी घातलेला मुलाला बसलेल्या कोणत्याही मुलाच्या मागे टोपी ठेवण्यास सांगणे .<br>• टोपी मिळालेल्या मुलाने टोपी ठेवलेल्या मुलाला पकडण्याचा प्रयत्न करावा. तेव्हा टोपी ठेवलेल्या मुलाने टोपी मिळालेल्या मुलाच्या जागेवर बसण्यास सांगणे.<br>• 2 री आणि 3 री मुलांसाठी ही कृती चालू ठेवणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | | शीर्षक : टो टो आणि द कॅप<br>साहित्य : टोपी आणि खेळणी<br>उद्देश:<br>➢ श्रवण कौशल्य विकसित करणे.<br>➢ विचार करण्याच्या कौशल्याचा विकास करणे.<br>➢ सृजनशीलतेचा विकास करणे.<br>➢ प्रश्नार्थक मनोभाव निर्माण करणे.<br>➢ बचत कौशल्य वाढविणे.<br>पद्धत :<br>➢ शिक्षकांनी साहित्य वापरून कथा मातृभाषेत सांगणे.<br>➢ मोठ्या मुलांना कथेतील पात्रांची नावे विचारणे.<br>➢ जेंव्हा शिक्षक / मोठ्या वर्गातील विद्यार्थी कथेतील पात्रांची नावे सांगतात तेंव्हा लहान वर्गातील विद्यार्थ्यांना पात्रांची चित्रे दाखविण्यास सांगणे. |

| | | |
|---|---|---|
| | | ➢ टोप्या आणि खेळण्यातील मांजर दाखवून त्यांची नावे मातृभाषेत आणि इंग्रजी भाषेत सांगणे.<br>➢ शिक्षकांनी मातृभाषा आणि इंग्रजी भाषेत कथा सांगणे.<br>(कथेचा आनंद घेण्याबरोबरच ऐकत आहेत याची खात्री करून घेणे.) |
| | पुन्हा भेटू | ● या दिवशी केलेल्या कृतींचे पुनरावर्तन करणे / आठवणे .<br>● मुलांनी आज केलेल्या सर्व कृती पालक आणि कुटुंबातील सदस्यांसोबत शेअर करण्यास मुलांना प्रोत्साहन देणे .<br>● पुन्हा दुसऱ्या दिवशी मुलांनी उत्साहाने परत येण्यासाठी आनंददायक प्रसंग आयोजित करणे व मुलांना निरोप देणे.<br>टीप :<br>✓ अध्ययन फलांचे परीक्षण करून पालकांना अहवाल देण्यासाठी दाखले तयार करा.<br>✓ तुमची मुले पहिली इयत्ताच्या कृती शिकण्यास तयार आहेत हे लक्षात ठेवा.<br>✓ पहिली इयत्ताच्या कृती आणि विद्याप्रवेश उपक्रम याच प्रकारे करण्यासाठी तयार रहा आणि पालकांशी बोलून त्यांना सहभागी करण्यासाठी तयारी ठेवा. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा - 12** **दिवस – 70 (गुरुवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|
| 70 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | संपूर्ण विद्याप्रवेश उपक्रमात मुलांना सर्वात जास्त आवडलेली कृती कोणती हे मुलांना विचारून त्या कृतीद्वारे मुलांचे वर्गात स्वागत करणे . |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 67 व्या दिवसाची कृती : इंग्रजी प्रासगीत म्हणणे.<br>एका ओळ शिक्षकांनी, एक ओळ मुलांनी म्हणणे.<br>चर्चेसाठी वापरले जाऊ शकणारे प्रश्न :<br>1. रस्त्यावर धावणे चांगले आहे का?<br>2. रस्त्यावर चालल्याने काय होईल ?<br>3. तुम्ही शाळेला कसे येता?<br>4. वडिलधाऱ्यांचा हात पकडून रस्ता पार करणे याबद्दल तुम्हाला काय वाटते ?<br>5. तुम्ही एकटे जात असताना रस्ता कसा पार करता ? इत्यादी. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | मुलांनी स्वेच्छेने त्यांच्या आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात जावून कृती करणे .<br>शिक्षकांनी नियमावलीत सांगितल्याप्रमाणे कार्य निर्वहन करणे . |
| | पायाभूत संख्याज्ञान, | सामर्थ्य : परिसराची जाणीव<br>कृती 43 ब : प्राण्यांच्या नावाचे पहिले अक्षर सांगणे. (विकासात्मक ध्येय – 3) |

<table>
<tr><td rowspan="3"></td><td colspan="2">परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती)</td><td>उद्देश :<br>प्राण्याच्या पहिल्या अक्षरावरून नाव ओळखणे<br>साहित्य : विविध प्राण्यांची मराठी आणि इंग्रजी नावांची यादी<br>पद्धत : विविध प्राण्यांच्या मराठी आणि इंग्रजी नावांची यादी देऊन नावातील पहिल्या अक्षराचा उच्चार करण्यास सांगणे. उदा : शेळी- शे, बैल – बै तसेच c फॉर काऊ, d फॉर dog<br>इयत्ता 2 री -<br>प्राण्यांची नावे व नावाचे पहिले अक्षर देऊन जोडण्यास सांगणे . ( गा – गाय )<br>इयत्ता 3 री -<br>प्राण्यांच्या नावातील अक्षरांची लहान लहान फ्लॅश कार्ड तसेच अक्षरंचा गट देऊन प्राण्यांची नावे रचण्यास सांगणे.</td></tr>
<tr><td colspan="2">सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची कृती)</td><td>सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकास आणि सृजनशीलतेचा विकास , कान-हात याचा समन्वय, आकारांची परिकल्पना.<br>कृती 33 ब : अक्षरांच्या आकारामध्ये रंग भरणे. (विकासात्मक ध्येय – 1 )<br>उद्देश :<br>• सूक्ष्म स्नायूंचा विकास होणे .<br>• कान-हात यांचा समन्वय साधणे.<br>• स्थळांची संकल्पना समजतात.<br>साहित्य : रंग, टूथ ब्रश, पांढरा कागद, विविध चित्रे ( अक्षर अंक, प्राणी आणि पक्षी )<br>पद्धत : 3-4 मुलांना गट करून बसविणे. प्रत्येक गटाला रंग, कागद, ब्रश आणि विविध चित्रे पुरविणे. त्यामधील एका चित्राची निवड करून पांढऱ्या कागदावर ठेवणे. त्यानंतर आपल्या आवडीचा रंग ब्रशने चित्राभोवती फवारणे. नंतर ठेवलेले चित्र बाजूला काढल्यानंतर तिथे उमटलेले चित्र बघून मुले आनंदी होतात.<br>विवर : सदर कृती 2 री व 3 री वर्गांना करण्यास सांगणे .<br>* वापरावयाची अध्ययन पत्रके : H.W.-15 ( 01, 02,03 री इयत्ता )</td></tr>
<tr><td>भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता</td><td>ऐकणे व बोलणे</td><td>सामर्थ्य: - ध्वनी संकेतांची जाणीव , अक्षर – शब्द परस्पर संबंध ओळखणे .<br>कृती: -20 नावाच्या पहिल्या अक्षरावरून वस्तू शोधणे (विकासात्मक ध्येय- 2) ECL-2 (64 दिवसापासून पुढे चालू )<br>उद्देश:<br>* ध्वनी संकेतांची जाणीव करून देणे.<br>* अक्षर आणि शब्दांचा परस्पर संबंध समजून घेणे.<br>* शब्द समजून घेवून ओळखणे.<br>* अंताक्षरी शब्द लिहिणे .<br>साहित्य - नाही<br>नमुना विषय : पोशाख<br>पद्धत : संकेतांच्या (क्ल्यू ) माध्यमाने पोशाखांची नावे अंदाज करून सांगण्याच्या कृतीचे आयोजन करणे. उदा : शिक्षक माझ्या मनातील पोशाख आपण हिवाळ्यात जास्त वापरतो. त्याचे नाव स्वे.. अक्षराने सुरु होते. असे सांगितल्यानंतर मुले स्वेटर असे सांगतात. अशी आणखीन उदाहरणे देणे.<br>टीप : 2री व 3 री वर्गातील मुलांना शब्दाच्या आधारे वाक्यर बनवण्यास तसेच साधी – सोपी वाक्यांचा समूह बनवण्याच्या कृती देणे .<br>वापरावयाची अध्ययन पत्रके : EC-20 (इयत्ता : 1, 2, 3)</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य: ध्वनी संकेत, अक्षर ओळखणे सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकास<br><br>कृती : 27 (विकासात्मक ध्येय-2 ) अक्षर आणि ध्वनींचे संयोजन करणे<br>उद्देश :<br>आकाराच्या आधारावर अक्षरे ओळखणे आणि अक्षर व ध्वनींचे संयोजन करून वाचणे .<br>साहित्य : मणी, बटन, माती, वाळू , काड्या, अक्षरांचे आकार इत्यादी.<br>पद्धत : मुलांना अध्ययनात अभिरुची निर्माण करण्यास मागील वर्गात वापरलेले साहित्य न वापरता नवीन साहित्य वापरणे आणि मागील काळात वापरलेल्या वस्तुंच्या व मुलांच्या नावातील अक्षरांचा उपयोग न करता नवीन अक्षरे ओळखण्यास सांगणे.<br>• ओळखलेल्या अक्षरांचे आणि ध्वनींचे संयोजन करणे.<br>• विविध वस्तू वापरून (मणी, बटन , माती, वाळू , काड्या ) अक्षरांच्या आकाराची संकल्पना बिंबवणे.<br>• वाळू आणि मातीत अक्षरांचा सराव करणे.<br>• अक्षरे लिहून त्याच्यात रंग भरण्यास सांगणे.<br>• जमिनीवर पाण्याने अक्षरांचा आकार काढण्यास सांगणे.<br>• कागद आणि पेन्सिल शिवाय अक्षरे वाचण्यास संधी देणे.<br>• स्पष्ट उच्चाराबरोबरच शब्द वाचनाचा वेग वाढविणे.<br>• अक्षरांच्या ध्वनीवर जोर देणे . आणि परिचित शब्दांशी संबंध सांगणे .<br>2 री आणि 3 री : या वर्गातील विद्यार्थ्यांना गटात असणाऱ्या मागील अवधीत ( 62 व दिवस ) वापरलेले अक्षर, शब्द, वाक्ये सोडून इत्तर अक्षरे, शब्द, वाक्ये ओळखणे व भाग करणे आणि वाचन कृती करून घेणे . |
| | | उद्देश पूर्वक लेखन | सामर्थ्य : उद्देशपूर्वक लेखन , निरीक्षण , कल्पना ,सृजनशील चिंतन ,परिसराची जाणीव<br>कृती 35 : हवामान नकशा (विकासात्मक ध्येय-2 ) ECW-16 (64 दिवसापासून पुढे चालू )<br>उद्देश:<br>● उद्देशीत लेखनाचा सराव करवून घेणे .<br>● निरीक्षण कौशल्य वाढविणे.<br>● सृजनशील चिंतनाला वाव देणे.<br>● परिसराची जाणीव बिंबविणे.<br>साहित्य : कागद / अध्ययन पत्रके, पेन्सिल<br>पद्धत : आठवड्यातील दिवसाबद्दल मुलांशी चर्चा करणे<br>- आठवड्याच्या दिवसांची यादी करून वर्गात लावणे.<br>- गट चर्चेच्या वेळी त्या दिवसाच्या हवामानाचे निरीक्षण करण्यास सांगणे<br>- याबद्दल मुलांशी चर्चा करून रिकामी अध्ययन पत्रके देवून कालच्या आणि आजच्या हवामानाचे चित्र काढण्यास सांगणे.<br>- मुलांच्या कार्याचे वर्गात प्रदर्शन करणे.<br>टीप : 2 री च्या मुलांनी दिवसाचे हवामान आपल्या पुस्तकात दाखल करणे . 3 री च्या मुलांना वर्गाच्या हवामान नकाशात दिवसाचे हवामान दाखल करण्यास सांगावे . |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षक फळ्यावर लेखन करतात. लेखनाची योग्य पद्धत पाहण्याची संधी देतात. मुलाचे नाव ,मुलाने काढलेल्या चित्राचे नाव इत्यादी मुलांसमोर लिहितात . शिक्षक वर्गात जे काही लेखन करायचे आहे ते मुलांसमोर करतात. |

| | | |
|---|---|---|
| | मैदानी खेळ | कृती: - रिंग मास्टर<br>सामर्थ्य: स्थूल स्नायू चालना कौशल्याच्या हालचाली, अनुकरण आणि कल्पना शक्ती विकसित करणे.<br>आवश्यक साहित्य : प्राण्यांची चित्रे<br>पद्धत : मुलांना वर्तुळाकार बसण्यास सांगणे .<br>शिक्षक ज्या प्राण्याचे चित्र दाखवतात त्या प्राण्याचा आवाज काढण्यास सांगणे .<br>उदा : कुत्रा - भो भो<br>दुसरी व तिसरीच्या मुलांना प्राण्यांचे चित्र दाखवून त्या प्राण्याचा आवाज काढण्यास सुचविणे . |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | शीर्षक : टो टो आणि द कॅप<br>साहित्य : बोटांच्या बाहुल्या<br>उद्देश:<br>➢ श्रवण कौशल्य विकसित करणे .<br>➢ विचार कौशल्याच्या विकास करणे.<br>➢ सृजनशीलतेचा विकास करणे.<br>➢ प्रश्नार्थक मनोभाव निर्माण करणे .<br>➢ शब्दसंपत्ती वाढविणे .<br>पद्धत : शिक्षक मातृभाषा आणि इंग्रजी भाषेमध्ये कथेचा अर्थ सांगणे.<br>➢ जेंव्हा शिक्षक / मोठ्या वर्गातील विद्यार्थी कथेतील पात्रांची नावे सांगतात तेंव्हा लहान वर्गातील विद्यार्थ्यांना पात्रांची चित्रे दाखविण्यास सांगणे.<br>➢ बोटांच्या बाहुल्या दाखवून त्यांची नावे एकदा मातृभाषेत आणि नंतर इंग्रजी भाषेत सांगून परिचय करणे .<br>➢ शिक्षक संवादाच्या स्वरुपात बोटांच्या बाहुल्या दाखवतात .<br>कथा सांगितल्यानंतर सोपे प्रश्न विचारणे.<br>(कथेचा आनंद घेण्याबरोबरच ऐकत आहेत याची खात्री करून घेणे) |
| | पुन्हा भेटू | ● या दिवशी केलेल्या कृतींचे पुनरावर्तन करणे / आठवणे.<br>● मुलांनी आज केलेल्या सर्व कृती पालक आणि कुटुंबातील सदस्यांसोबत शेअर करण्यास मुलांना प्रोत्साहन देणे .<br>● पुन्हा दुसऱ्या दिवशी मुलांनी उत्साहाने परत येण्यासाठी आनंददायक प्रसंग आयोजित करणे व मुलांना निरोप देणे.<br>टीप :<br>✓ अध्ययन फलांचे परीक्षण करून पालकांना अहवाल देण्यासाठी दाखले तयार करणे.<br>✓ तुमची मुले पहिली इयत्ताच्या कृती शिकण्यास तयार आहेत हे लक्षात ठेवणे.<br>✓ पहिली इयत्ताच्या कृती आणि विद्याप्रवेश उपक्रम याच प्रकारे करण्यासाठी तयार रहा आणि पालकांशी बोलून त्यांना सहभागी करण्यासाठी तयारी ठेवणे. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा - 12** **दिवस – 71 (शुक्रवार)**

| दिवस | तासिका | कृतींचे विवरण |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 71 | अभिवादन / शुभेच्छांची देवाणघेवाण (मुलांसोबत शिक्षकांचे हितगुज) | संपूर्ण विद्याप्रवेश उपक्रमात मुलांना सर्वात जास्त आवडलेली कृती कोणती हे मुलांना विचारून त्या कृतीद्वारे मुलांचे वर्गात स्वागत करणे . |
| | गुजगोष्टी (सकाळच्या सामुहिक कृती) | 70 व्या दिवसाच्या कृतीचे पुनरावर्तन करा. |
| | माझा वेळ (Free Indore Play) | * मुले सर्व अध्ययन कोपऱ्यातील कृतीमध्ये गुंतले आहेत तसेच योग्यरीतीने पूर्ण करत आहेत याची खात्री करून घेणे.<br>* अपूर्ण राहिलेल्या कृती मुलाला पूर्ण करण्यास सहकार्य करा.<br>* पुढच्या दिवसाच्या कृतीवर मुलांचे लक्ष अधिक असेल याची शिक्षकांनी मानसिक तयारी करणे आवश्यक आहे.<br>* दिवसाच्या शेवटी अध्ययन कोपऱ्यात पुढच्या पायरीसाठी आवश्यक साहित्य तयार ठेवणे.<br>* या टप्प्याच्या शेवटपर्यंत अध्ययन सिद्धता कृती आहेत. पुढील अध्ययन  काळात आपणाला शक्य तेंव्हा विद्याप्रवेश कृतीत घेणे. विद्याप्रवेश कृती या 'निपुण भारत'च्या साधनेतून घेतलेल्या आहेत . मुलाच्या पुढील अध्ययन टप्प्यात पूर्ण करणे आवश्यक आहे . |
| | पायाभूत संख्याज्ञान, परिसर जागरुकता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन (शिक्षकांनी सुरु करावयाची मार्गदर्शित कृती) | सामर्थ्य :  परिसर जाणीव आणि आरोग्यदायक आहार पद्धती.<br>कृती 42 : जमिनीखाली आणि जमिनीवर असणाऱ्या भाज्या       (विकासात्मक ध्येय-3)<br>उद्देश:<br>मातीखाली आणि मातीवर वाढणाऱ्या भाज्यांबद्दल माहिती असणे.<br>साहित्य : विविध भाज्यांचे नमुने<br>पद्धत : मुले भाज्यांवर आधारित असलेली गाणी म्हणतात.<br>घेवू घेवू भाजी ..........<br>............................<br>मुलांना विविध भाज्या दाखवून मातीखाली (जमिनीखाली ) आणि मातीवर (जमिनीवर ) वाढणाऱ्या भाज्या ओळखून विवरण देण्यास सांगणे. नियमितपणे भाज्या खाण्यासाठी मुलांना प्रोत्साहन देणे. विविधप्रकारच्या भाज्या दाखवून त्यावर संबंधित सोपे प्रश्न विचारून उत्तरे घेणे .<br>उदा: 1. तू पाहिलेल्या जानिनीवर वाढणाऱ्या भाज्यांची नावे सांग.<br>इयत्ता दुसरी -<br>मातीखाली (जमिनीखाली ) आणि मातीवर (जमिनीवर ) वाढणाऱ्या भाज्यांची नावे सांग.<br>इयत्ता तिसरी -<br>मातीखाली (जमिनीखाली ) आणि मातीवर (जमिनीवर ) वाढणाऱ्या भाज्यांची/ आहार धान्यांची यादी कर. |
| | सृजनात्मक कला आणि सूक्ष्म स्नायू चलन कौशल्ये (मुलांची | सामर्थ्य : सूक्ष्म स्नायू चालना कौशल्य विकास आणि सृजनशीलतेचा विकास<br>कृती 50 : विविध प्रकारचे ठसे उमटविणे.       (विकासात्मक ध्येय-1)<br>उद्देश :-<br>• सूक्ष्म स्नायूंचा विकास होणे .<br>• कान-हात यांचा समन्वय साधणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | कृती) | | ● कल्पना शक्तीचा विकास करणे .<br><br>साहित्य : कागद / वर्तमानपत्र, विविध वस्तू, साचे तयार करण्यासाठी उपयोगात येणाऱ्या विविध वस्तू , जाड कापड इत्यादी.<br>पध्दत : या पद्धतीमध्ये ठसे उमटविण्यासाठी विविध साहित्य गोळा करणे. उदा : जुना कंगवा, ट्वेन दोरा, अथवा रबर बँडने गुंडाळलेला दोरा, जुनी खेळणी ( प्लास्टिकची नसलेली ) इत्यादी. प्रत्येक मुलाला जुने वर्तमान पत्र देवून गोळा केलेल्या वस्तू रंगात बुडवून ठसे उमटवायला सांगणे.<br>विवरण: 2 री व 3 री वर्गाच्या मुलांना वरील कृती करावयास सांगणे. |
| | भाषा विकास आणि पायाभूत साक्षरता | ऐकणे व बोलणे | सामर्थ्य : शब्द संग्रह विकास, अंदाज लावण , गटातील सदस्यासह सहकार्याने कार्य करणे, सूचनांचे पालन करणे<br>कृती : 6 वस्तूंचा अंदाज (विकासात्मक ध्येय-2 ) ECL-7<br>उद्देश :-<br>* योग्य शब्द तयार करणे.<br>* सांघिक मनोभावना वाढविणे.<br>* सूचनांचे काळजीपूर्वक पालन करणे.<br>* शब्द संग्रह विकसित करणे.<br>आवश्यक साहित्य : दप्तर (बॅग) , उपलब्ध वस्तू<br>पद्धत : वर्गातील खडू , रबर , डस्टर, फासा इत्यादी वस्तू एका पिशवीत घाला. एकेक मुलाला बोलावून बॅगमधील वस्तूंना स्पर्श करून त्या वस्तुंचा अंदाज लावणे. मुलांना वस्तू अचूक ओळखण्यास सांगणे.<br>उदा :<br>● तू स्पर्श केलेली वस्तू लहान आहे कि मोठी?<br>● तू स्पर्श केलेल्या वस्तूचा आकार कसा आहे?<br>● ती वस्तू कश्यापासून बनलेली आहे?<br>● तू स्पर्श केलेली वस्तू घट्ट आहे की मऊ आहे?<br>● तू स्पर्श केलेली वस्तू काय असेल?<br>मुलांनी ओळखलेल्या वस्तू बद्दल चर्चा करणे .<br>टीप : 2 री विद्यार्थ्यांनी आपण ओळखलेल्या वस्तूबद्दल 3-4 वाक्यात बोलणे. 3 री वर्गातील मुलांनी 2 ते 3 मिनिटे त्या वस्तूबद्दल बोलणे. |
| | | आकलना सहीत वाचन | सामर्थ्य: छापील मजकुराची ओळख, शब्द ओळखणे, आकलन, परिसराची जाणीव, शब्द संपत्तीची अभिवृद्धी.<br>कृती 18 : चित्र संचयिका (विकासात्मक ध्येय – 2 )<br>विषय : जमिनीवर पाहिलेले प्राणी / पक्षी / वस्तू<br>उद्देश:<br>मुलांनी गटात बसून तयार केलेली भित्तीपत्रके सादर करणे .<br>साहित्य : तक्ते, स्वतः रचलेली चित्रे, क्रेयोन्स, डिंक, टॅग<br>पद्धत : मुलांना आवश्यक साहित्य वापरून जमिनीवर पाहिलेल्या प्राणी/पक्षी/वस्तू बद्दल भित्तीपत्रके तयार करण्यास सहाय्य करणे. तयार केलेली भित्तीपत्रके वर्गखोलीच्या शेवटी प्रदर्शित करणे.<br>शिक्षकांनी दुसरी व तिसरी मुलांना सहाय्य करून गटामध्ये योजनाकार्य करण्यास सांगणे. |
| | | उद्देश | सामर्थ्य : मुलांसाठी लेखन, उद्देशपूर्वक लेखन, लक्ष देणे आणि ऐकणे, सृजनशील चिंतन, शब्दसंपत्तीचा विकास |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पूर्वक लेखन | कृती संख्या 32 : सामाईक लेखन (विकासात्मक ध्येय – 2 ) ECW-8<br>उद्देश :<br>● सामाईक लेखनाचा परिचय करणे .<br>● उद्देशानुसार लेखनाचा क्रम अभ्यासणे.<br>● अवधान देवून उद्देशीत लेखनात गुंतविणे.<br>● सृजनात्मक चिंतन करून लिखितरुपात व्यक्त होणे.<br>● शब्दसंपत्तीचा विकास करणे .<br>साहित्य : फळा, चित्रकला कागद<br>पद्धत :<br>महिन्यातून दोन किंवा तीन वेळा सामाईक लेखन कृती आयोजित करणे. एक विषय देवून त्यासंबंधी त्यांचे अनुभव कथेच्या माध्यमातून किंवा लेखनाच्या माध्यमातून व्यक्त करण्यास सांगणे.<br>नमुना विषय : आम्ही खेळणारे खेळ<br>लक्षात ठेवायचे अंश :<br>● प्रत्येक विषयाला संबंधित वाक्य रचण्यासाठी आवश्यक संकेत देणे. मुलासोबत लेखनात गुंतवून प्रात्यक्षिक लेखन दाखविणे.<br>● शिक्षकांनी पहिले वाक्य लिहून वाचणे. नंतर मुलांना त्यांची स्वत:ची वाक्ये लिहायला सांगणे.<br>● मुलांना त्यांच्या स्थानिक भाषेत प्रतिक्रिया देण्यासाठी संधी देणे. अशा परिस्थितीत शिक्षकांनी त्यांच्या शालेय भाषेत भाषांतर करून सांगणे.<br>टीप : 1 ली च्या वर्गातील विवरण केलेले अंश 2 री आणि 3 री वर्गातील मुलांना लेखनाच्या माध्यमातून अभिव्यक्त होण्यास सांगणे. |
| | | | आदर्श लेखन :<br>शिक्षक फळ्यावर लेखन करतात. लेखनाची योग्य पद्धत पाहण्याची संधी देतात. मुलाचे नाव ,मुलाने काढलेल्या चित्राचे नाव इत्यादी मुलांसमोर लिहितात . शिक्षक वर्गात जे काही लेखन करायचे आहे ते मुलांसमोर करतात. |
| | मैदानी खेळ | | कृती : खजिन्याचा शोध<br>सामर्थ्य : स्थूल स्नायू चालना कौशल्याच्या हालचाली, सहकार्य भावनांचा विकास करणे.<br>आवश्यक साहित्य : रंगीत काड्या / रंगीत क्रेयॉन्स<br>पद्धत :<br>• चार मुलांचा समान गट करण्यास मुलांना सूचना देणे.<br>• प्रत्येक गटाला एकेक रंग देणे.<br>• लाल-2, हिरवा-2, निळा- 2, पिवळा-2<br>• जमिनीवर चार घरे काढणे. ही चार घरे चार रंगांचे प्रतिनिधित्व करतील.<br>• खेळ सुरु करण्याअगोदर रंगीत काठी / वस्तू वेगवेगळ्या जागेवर ठेवण्यास सांगणे.<br>• खेळ सुरु झाल्यानंतर मुलांनी स्वत:ला आलेल्या रंगीत वस्तू शोधून स्वत:च्या रंगाच्या घरात ठेवण्यास सांगणे.<br>• जो गट त्यांना दिलेल्या रंगाच्या वस्तू सर्वात लवकर शोधून ठेवतो तो विजयी होईल. |

| | | |
|---|---|---|
| | | • दुसरी आणि तिसरी वर्गातील मुलांसाठी ही कृती चालू ठेवणे. |
| | रंजक कथा (कथेची वेळ) | शीर्षक : टो-टो आणि द कॅप<br>साहित्य : पपेट आणि स्क्रीन<br>उद्देश:<br>➢ श्रवण कौशल्य विकसित करणे.<br>➢ शब्दसंपत्ती वाढविणे.<br>➢ संवाद कौशल्य दृढ करणे.<br>पद्धत :<br>➢ कथा मराठी आणि कन्नडमध्ये सांगणे.<br>➢ तयार केलेले पपेट आणि स्क्रीन वापरून मोठ्या विद्यार्थ्यांना पात्रे (भूमिका) वितरण करून शिक्षकांनी सांगितलेला मराठी आणि कन्नड भाषेतील संवादाचा पुनरुच्चार करणे.<br>➢ कथेचा वेळ मनोरंजनात्मक करणे .<br>कथा सांगितल्यानंतर सोपे प्रश्न विचारणे.<br>(कथेचा आनंद घेण्याबरोबरच ऐकत आहेत याची खात्री करून घेणे.) |
| | पुन्हा भेटू | ● या दिवशी केलेल्या कृतींचे पुनरावर्तन करणे / आठवणे.<br>● मुलांनी आज केलेल्या सर्व कृती पालक आणि कुटुंबातील सदस्यांसोबत शेअर करण्यास मुलांना प्रोत्साहन देणे.<br>● पुन्हा दुसऱ्या दिवशी मुलांनी उत्साहाने परत येण्यासाठी आनंददायक प्रसंग आयोजित करणे व मुलांना निरोप देणे.<br>टीप :<br>✓ अध्ययन फलांचे परीक्षण करून पालकांना अहवाल देण्यासाठी दाखले तयार करा.<br>✓ तुमची मुले पहिली इयत्ताच्या कृती शिकण्यास तयार आहेत हे लक्षात ठेवा.<br>✓ पहिली इयत्ताच्या कृती आणि विद्याप्रवेश उपक्रम याच प्रकारे करण्यासाठी तयार रहा आणि पालकांशी बोलून त्यांना सहभागी करण्यासाठी तयारी ठेवा. |

# विद्याप्रवेश - दैनंदिन कृती

**आठवडा - 12** **दिवस – 72 (शनिवार)**

| | |
|---|---|
| प्रतिबिंब (वर्गातील निरंतर मूल्यमापन) | ● विविध तंत्र वापरून (निरीक्षण, तपशील पट्टी, मुलांची अध्ययन पत्रके, व्हिडीओ, सांदर्भिक नोंदी, इत्यादी) तुम्ही संग्रह केलेल्या मूल्यमापन नोंदी/माहिती यांचे पुनरावलोकन करणे.<br>● प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिगत गरजेनुसार पुढील आठवड्यातील अध्ययन प्रक्रियेची योजना आखणे.<br>● अध्ययनाच्या तिन्ही विकासात्मक ध्येयांच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे. |

## 4.4 मासिक मूल्यमापन मार्गसूची

(शाळेसाठी विद्यार्थ्यांची पुर्वसिद्धता)

# तिसरा महिना

**उद्देश : शालेय उपक्रमात आवड निर्माण करणे आणि शालेय परिसराशी व अध्ययनाशी जुळवून घेण्यास मुलांना मदत करणे.**

| विद्यार्थ्याचे नाव | | | | वर्ग | |
|---|---|---|---|---|---|
| उंची आणि वजन | | | | | |
| वजन | | | उंची | | |
| व्यक्तिगत स्वच्छता (संबंधित रकान्यात ✓ अशी खूण करणे.) | | | | | |
| | स्वच्छ आहेत | सुधारणा हवी | | स्वच्छ आहेत | सुधारणा हवी |
| कपडे | | | नखे | | |
| दात | | | डोळे | | |
| कान | | | नाक | | |
| केस | | | | | |

*** खालील कृतींमध्ये संपूर्ण महिन्याची मुलाची प्रगती एकत्रित करून संबंधित रकान्यात ✓ अशी खुण करणे.**

| दैनंदिन कृतींची जुळवाजुळव व अनुकरण | क्वचित | कधीतरी | नेहमी |
|---|---|---|---|
| चांगला व वाईट स्पर्श याविषयी समज दर्शवतो/ दर्शविते. | | | |
| इतरांशी सामाजिक संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करतो/ करते. | | | |
| कृतीमध्ये सक्रियपणे भाग घेतो/ घेते. | | | |
| समस्यांवर उपाय सुचवितो/ सुचविते आणि समायोजन करतो/ करते. | | | |
| योग्य आणि अयोग्य ओळखतो/ ओळखते. | | | |
| समस्या सोडविण्याच्या उपायावर चर्चा करतो/ करते. | | | |
| शाळेमध्ये शिक्षक, वयस्कर, किंवा मुलांना मदत करतो/ करते. | | | |
| इतरांच्या भावना आणि गरजांबद्दल संवेदना व्यक्त करतो/ करते. (विशेष करून दिव्यांग मुलांविषयी) | | | |
| स्वत:चा विषय सांगताना बंधुत्व आणि संघ भावना दाखवतो/ दाखविते. (प्रदर्शन करतो) | | | |
| एकाधिक सूचनांचे पालन करतो/ करते. | | | |
| वस्तू योग्य जागी ठेवतो/ ठेवते. | | | |
| प्राणी आणि वनस्पतींची काळजी घेतो/ घेते. | | | |
| **मैदानी खेळ / कृतीमधील सहभाग** | **मदतीची गरज आहे** | **परिश्रमाने करतो/ करते** | **करतो/ करते** |
| चेंडूने नेम धरतो/ धरते. | | | |
| चेंडू पकडतो/ पकडते. | | | |
| उत्साह दर्शवतो/ दर्शविते, लंगडी खेळतो/ खेळते. | | | |
| दोरी आणि शिडीवर आत्मविश्वासाने चढतो/ चढते. | | | |
| योग, खेळ, आणि नृत्यामध्ये भाग घेतो/ घेते. | | | |
| चेंडू ध्येयाकडे लाथाडतो/ लाथाडते. | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| टायर/ बॅरल ढकलतो/ ढकलते. | | | |
| चेंडू सहज आपटतो/ आपटते. | | | |
| योग, लवचिक व्यायाम आणि नृत्यामध्ये चपळता दाखवतो/ दाखवते. | | | |
| **सृजनात्मक, सौंदर्यात्मक तसेच स्नायू चलन अभिवृद्धिसाठी कलाकृतीमध्ये सहभाग** | **मदतीची गरज आहे** | **परिश्रमाने करतो/ करते** | **करतो/ करते** |
| साधी चित्रे काढतो/ काढते. | | | |
| रेषेच्या आत (रेखा चित्र ) चित्र रंगवतो/ रंगावते. | | | |
| वस्तू योग्य रीतीने मांडणी करतो/ करते. | | | |
| कात्री वापरून चित्रे कापणे व चिकटविणे इ. करतो/ करते. | | | |
| बोटांनी ठसे उमटवितो/ उमटविते. | | | |
| बिंदू जोडून चित्र रंगवतो/ रंगावते. | | | |
| कोलाज करतो/ करते. | | | |
| स्प्रिंग आणि लेस इत्यादी वस्तू वापरून वेगवेगळ्या नक्षी (रचना) बनवतो/ बनवते. | | | |
| **संख्याज्ञान तसेच परिसर जागृतीचे प्रदर्शन** | **मदतीची गरज आहे** | **परिश्रमाने करतो/ करते** | **करतो/ करते** |
| सध्या सरळ नैसर्गिक घटनांचे निरीक्षण करतो/ करते, परीशोधन करतो/ते आणि वर्णन करतो/ करते. | | | |
| 1 ते 10 पर्यंत वाढणाऱ्या संख्या समजून घेतो/ घेते. | | | |
| 1 ते 10 पर्यंत क्रमवार मोजतो/ मोजते. | | | |
| गट करताना कमी किंवा जास्त प्रमाण ठरवतो/ ठरावते. | | | |
| बटन, बिया इत्यादी वस्तूंचा वापर करून अंकांचा आकार तयार करतो/ करते. | | | |
| 1 ते 10 पर्यंतचे अंक लिहितो/ लिहिते. | | | |
| नक्षी तयार करतो आणि स्पष्ट करतो/ करते. | | | |
| कठीण चक्रव्यूह ( maze) किंवा कोडी सोडवतो/ सोडवते. | | | |
| वस्तू आणि घटनांचा एका क्रमाने विचार करून जोडतो आणि कथन करतो/ करते. | | | |
| प्रयोगामध्ये सक्रियपणे सहभाग घेतो/ घेते. | | | |
| जेष्ठांच्या मार्गदर्शनात सरळ नैसर्गिक घटनाचे निरीक्षण किंवा अन्वेषण करतो/ करते. | | | |
| सणामध्ये सक्रियपणे सहभाग घेतो/ घेते. | | | |
| वनस्पतीचे भाग आणि त्यांच्या वाढीसाठी कोणते घटक आवश्यक आहेत हे समजून घेतो/ घेते. | | | |
| रंग , लक्षणे आणि चव यावरून फळे आणि भाज्या ओळखतो/ ओळखते. | | | |
| पाळीव प्राणी आणि जंगली प्राणी यांच्यातील फरक ओळखतो/ ओळखते. | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| दिवसा आणि रात्री होणारे भौतिक बदल सांगतो/ सांगते. | | | |
| तोंडी अभिव्यक्तीचे प्रदर्शन | क्वचित | कधीतरी | नेहमी |
| ऐकल्यानंतर समजून घेवून उत्तरे देतो/ देते. | | | |
| पूर्ण वाक्यात संपूर्ण (विवरणात्मक) विवरण  करतो/ करते. | | | |
| अर्थपूर्ण संभाषणात सहभागी होतो/ होते | | | |
| शब्दातील सुरुवातीचा, मधला आणि शेवटचा ध्वनी ओळखतो/ ओळखते. | | | |
| शब्दांना अक्षरे जोडून नवीन शब्द तयार  करतो/ करते. | | | |
| सृजनात्मकपणे उत्तरे देतो किंवा प्रश्न विचारतो/ विचारते. | | | |
| प्रारंभिक वाचन कौशल्यांचे प्रदर्शन | क्वचित | कधीतरी | नेहमी |
| मुद्रित साहित्यातील पूर्णविराम, स्वल्पविराम यासारखी व्याकरण चिन्हे ओळखतात/ ओळखते. | | | |
| वाक्यातील सोपा मजकूर स्वतंत्रपणे वाचतो/ वाचते. | | | |
| अनुक्रमे सुरुवातीच्या, मधील आणि शेवटच्या घटनांक्रमाने परिचित कथांची पुनरावृत्ती  करतो/ करते. | | | |
| वाचन कोपऱ्यातून पुस्तके निवडतो /निवडते. | | | |
| प्रारंभिक लेखन कौशल्यांचे प्रदर्शन | क्वचित | कधीतरी | नेहमी |
| आपले विचार शब्द आणि चित्रातून व्यक्त करण्याचा प्रयत्न  करतो/ करते. | | | |
| वर्णमाला आणि संख्या लिहिण्याचा प्रयत्न  करतो/ करते. | | | |
| चित्रामधून व्यक्त होणाऱ्या भावनांचा अर्थ लावण्यासाठी उपकरणांचा सहज वापर  करतो/ करते. | | | |

| | | |
|---|---|---|
| मुलांची वैशिष्टे | विशेष आवड | |
| | मुलाची प्रतिभा | |
| | सामर्थ्ये | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| हजेरी | नियमित | होय / नाही | वेळेचे बंधन/ पालन | होय / नाही |

| | |
|---|---|
| सामान्य टीप (Remarks) | |

| | | |
|---|---|---|
| शिक्षकांची सही व दिनांक | मुख्याध्यापकांची सही व दिनांक | पालकांची सही व दिनांक |